# “कोरेगाव तालुक्याचा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक इतिहास (इ. स. १९४७ ते २०००)”

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
इतिहास विभाग

तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध

संशोधक

श्री. कमलसिंग विक्रमसिंग क्षत्रिय

मार्गदर्शक
प्रा. डॉ. एस. पी. शिंदे

नोव्हेंबर, २०१७

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) या पदवीसाठी श्री. कमलसिंग विक्रमसिंग क्षत्रिय यांनी **"कोरेगाव तालुक्याचा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक इतिहास (इ. स. १९४७ ते २०००)"** या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोधप्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यु. जी. सी.) २००९ च्या नवीन नियमाला अनुसरून सदर शोधप्रबंधाचे काम केलेले आहे.

स्थळ : सातारा
दिनांक :

मार्गदर्शक

(प्रा. डॉ. एस. पी. शिंदे)

# CERTIFICATE

**This is to certify that the thesis entitled, '' कोरेगाव तालुक्याचा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक इतिहास (इ. स. १९४७ ते २०००)'' Submitted by Shri. Kshatriya Kamalsing Vikramsing to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune for the award of the degree of Doctor of philosophy (Ph. D.) is a bonafide record of the research work carried out by him under my supervision. The contents if the thesis, in full or parts have not been submitted to any other Institute or University for the award of any other degree or diploma.**

**Furthermore, in accordance with the UGC rules 2009: that govern the Ph. D. students, the students has completed the due process that includes Entrance Examination, Interview and pre-submission Viva.**

**Place: Pandharpur** **Signature of Research Guide**

**Date :**

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, **''कोरेगाव तालुक्याचा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक इतिहास (इ. स. १९४७ ते २०००)''** हा शोधप्रबंध मी प्रा. डॉ. एस. पी. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच. डी. पदवीसाठी सादर केला आहे. हा शोधप्रबंध इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : सातारा संशोधक

दिनांक :

(श्री. कमलसिंग विक्रमसिंग क्षत्रिय)

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास विभागात विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी हा शोध प्रबंध सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे. या माझ्या कार्याला अनेकांचे मोलाचे मार्गदर्शन, प्रेरणा आणि प्रत्यक्षात सहकार्य मिळालेले आहे. त्याच्याबद्दल कृतज्ञताभाव व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

''कोरेगाव तालुक्याचा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक इतिहास (इ. स. १९४७ ते २०००)'' या विषयावर संशोधन काम करण्यासाठी माझे मार्गदर्शक मा. प्रा. डॉ. एस. पी. शिंदे यांनी मला मार्गदर्शन केले. त्यांनी मला वेळोवेळी मदत केली, तसेच लेखन प्रभावी होण्यासाठी व त्यात सुत्रबद्धता आणण्यासाठी योग्य त्या ठिकाणी अनमोल अशा सूचना केल्या. त्यांच्या मार्गदर्शनामुळे मी माझे काम पूर्ण करू शकलो. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे, तसेच त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे.

श्री मुधाईदेवी शिक्षण संस्था, देऊर संस्थापक मा. प्रा. संभाजीराव कदम, अध्यक्ष श्री. धैर्यशील जगताप, चेअरमन मा. भिमराव कदम, सचिव मा. श्री. हणमंतराव कदम, विश्वस्त श्री. सर्जेराव कदम, श्री. किसनराव कदम, श्री.दत्तात्रय शिंदे, प्रा.संभाजीराव कदम महाविद्यालयाचे महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष मा. श्री धनसिंग कदम यांची प्रेरणा व मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले. या सर्वाचे मनःपूर्वक आभार मानतो. प्रा. डॉ. नलिनी वाघमारे, इतिहास विभाग प्रमुख, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे व डॉ. शिरीष शिंदे, डॉ. दिपक देवरे, प्रा. डॉ. दत्तात्रय कोरडे, सहा. प्रा. संतोष साठे, सहा. प्रा. संपत डफळे, श्री. चंद्रकांत कुंभार, श्री. पांडुरंग सुतार या सर्वानी मला मदत केल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

संशोधनासाठी माझ्या महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. जयसिंह कदम व डॉ. डी. के. पाटील यांनी प्रेरणा दिली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. माझ्या संशोधन कार्याला सतत प्रेरणा व मदत करणारे माझ्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत भोसले यांचे मनःपूर्वक आभार मानतो. तसेच माझ्या महाविद्यालयातील माझे सर्व सहकारी प्राध्यापक वृंद आणि महाविद्यालयातील सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी संशोधनासाठी मला वेळोवळी सहाय्य केले, त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. तसेच माझे सहकारी सहा. प्रा. अशोक शेलार, डॉ. मनोज

गुजर, सहा. प्रा. सुर्यकांत अदाटे, यांनी मला मराठी व इंग्रजी शुद्धलेखन तसेच तांत्रिक बाबींसाठी सहकार्य केल्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहे.

माझ्या संशोधन कार्यासाठी इतर अनेकांचे सहकार्य लाभले. त्यामध्ये मुंबई पुराभिलेखागार मुंबई, पेशवे दप्तर पुणे, पुणे अभिलेखागार, पुणे, मराठी साहित्य विश्वकोश मंडळ, वाई, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथालय, सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर ग्रंथालय, छ.शिवाजी कॉलेज ग्रंथालय, छ. प्रतापसिंह महाराज नगरवाचनालय, सातारा, लोकमान्य टिळक ग्रंथसंग्रहालय वाई, सातारा जिल्हा परिषद सांख्यिकी विभाग, सातारा, सातारा नगरपालिका सातारा, पंचायत समिती, कोरेगाव, कृषी विभागीय कार्यालय, कोरेगाव, रहिमतपूर नगरपालिका रहिमतपूर, विविध ग्रामपंचायतीचे सरपंच व सदस्य तसेच प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय देऊरचे ग्रंथालय या ठिकाणी जी माहिती उपलब्ध झाली, याबद्दल ग्रंथपालांचे आभार मानतो.

माझ्या संशोधन कार्यात माझ्या कुटुंबाचे फार मोठे योगदान आहे. माझे स्व.आई व वडील, माझे दादा व वहिनी यांचे आशीर्वाद आणि माझी पत्नी सौ. रिना हिची साथ, प्रोत्साहन, चिरंजीव सुमेश यांनीही मला खूप मदत केली आहे. या सर्वाचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

अभ्यासक,
श्री. कमलसिंग विक्रमसिंग क्षत्रिय

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रं |
|---|---|---|
| ● | प्रमाणपत्र | I-II |
| ● | प्रतिज्ञापत्र | III |
| ● | ऋणनिर्देश | IV-V |
| १. | सातारा जिल्हयाचा पूर्वेतिहास | १ ते ३८ |
| | प्रबंधाचे शिर्षक, संशोधन विषयाची निवड, संशोधनाची | |
| | आवश्यकता, संशोधनाची व्याप्ती, संशोधनाची मर्यादा, | |
| | संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, सिद्धांत कल्पना, | |
| | संदर्भ साहित्याचे पुनर्विलोकन, संशोधन पद्धती, | |
| | संदर्भ साधने, प्रकरण नियोजन | |
| | सातारा जिल्हयाचा पूर्वेतिहास, | |
| | सातारा जिल्हयाची भौगोलिक परिस्थिती, सातारा जिल्हयाचे वर्णन, | |
| | प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक सातारा जिल्हयाचे वर्णन | |
| २. | कोरेगाव तालुक्याचा राजकीय इतिहास | ३९ ते १२० |
| ३. | कोरेगाव तालुक्याचा सामाजिक इतिहास | १२१ ते १६४ |
| ४. | कोरेगाव तालुक्याचा सांस्कृतिक इतिहास | १६५ ते २२१ |
| ५. | कोरेगाव तालुक्याचा आर्थिक इतिहास | २२२ ते २५८ |
| ६. | उपसंहार | २५९ ते २७७ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | २७८ ते २८८ |
| | परिशिष्टे | २८९ ते २९५ |
| | नकाशे | २९६ ते २९८ |
| | छायाचित्रे | २९९ ते ३०६ |

# प्रकरण पहिले

# सातारा जिल्हयाचा पूर्वेतिहास

## १.१ प्रास्ताविक

भारताच्या इतिहासात पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्हयाने राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक इतिहासात महत्त्वाचे योगदान दिले आहे. या सातारा जिल्हयाने प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक या काळामध्ये आपले स्थान टिकविण्यात यश मिळविले आहे. सातारा जिल्हयाचा प्राचीन इतिहास हा इतिहास पूर्वकाळापासून सुरू होतो. सातारा जिल्हयात पुराश्मयुगीन अवशेष कृष्णा व कोयना खोऱ्यात सापडले आहेत. पुढे सातवाहन काळातील अवशेष कराड येथे उत्खननातून उपलब्ध झाले आहेत. सातारा जिल्हयाचा इतिहासकाळ खऱ्या अर्थाने इ. स. पू. चौथ्या शतकापासून सुरू होतो. या काळात कराड येथील बौद्ध लेणी तसेच शिरवळ, वाई, भोसे व मलवडी येथील गुंफा सातवाहनांच्या काळातील आहेत. सातवाहनानंतर सातारा जिल्हयावर राष्ट्रकुट, वाकाटक, चालुक्य, शिलाहार आणि यादव या राजघराण्यांनी राज्य केले. त्यांचे हे राज्य १३ व्या शतकापर्यंत टिकून राहिले होते. १४ व्या शतकात देवगिरीच्या यादवांची सत्ता मुबारक खिलजी या दिल्लीच्या सुलतानाने नष्ट केली. त्याने सन १३१८ मध्ये यादवांचा राजा हरपालदेव याचा दारूण पराभव केला. यानंतर मुबारक खिलजीने 'मलिक याखलखी' या सरदारास देवगिरीचा राज्यपाल नियुक्त केले. या सरदाराने देवगिरी येथून राज्य सुरू केले.

मुस्लिम राजवटीत सातारा जिल्हयातील सत्ता सतत हस्तांतरीत होत गेली. मराठा काळात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. छत्रपती शिवाजी महाराजांनी सातारा जिल्हा आपल्या ताब्यातून जाऊ नये यासाठी मुस्लिम सत्ताधिशांशी सतत संघर्ष केला. त्यांच्यानंतर छत्रपती संभाजी महाराज व छत्रपती राजाराम महाराज यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे धोरण तसेच पुढे चालू ठेवले. एवढेच नव्हे तर छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात सातारा ही मराठयांची राजधानी म्हणून नावारूपास आली. पुढे पेशवाईचा अस्त होईपर्यंत ती टिकून राहिली.

आधुनिक काळात सातारा जिल्हयाने राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिकदृष्टया महत्त्वाचे योगदान दिले आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये जे विविध उपक्रम राबविले गेले. त्यामध्ये सातारा जिल्हयातील अनेक कार्यकर्त्यांनी सक्रीय सहभाग घेतला. चळवळीस यश मिळण्यासाठी अनेक नवनवीन उपक्रम आखले. तसेच १९४२ साली सातारा जिल्हयात क्रांतिसिंह नाना पाटील यांनी स्थापन केलेल्या प्रतिसरकारने संपूर्ण भारताचे लक्ष वेधून घेतले. जिल्हयातील यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र व भारताच्या राजकारणात महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. तेव्हा कोरेगाव तालुक्याचा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक इतिहास पाहत असताना प्रथमतः सातारा जिल्हयाचा पूर्वेतिहास पाहणे महत्त्वाचे आहे.

## १.२ प्रबंधाचे शिर्षक

''कोरेगाव तालुक्याचा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक इतिहास (इ. स. १९४७ ते २०००)''

## १.३ संशोधन विषयाची निवड

इतिहास लेखन करणाऱ्यांमध्ये भारताच्या राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहासावर लेखन करणाऱ्यांची संख्या विपुल प्रमाणात आढळून येते. देशातील या राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहासात महाराष्ट्रातील अनेक जिल्हे व तालुक्यांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. यामध्ये कोरेगाव तालुक्यानेही आपले महत्त्वाचे योगदान दिले आहे. कोरेगाव तालुक्यास प्राचीन काळापासून राजकीय सामाजिक व सांस्कृतिक इतिहास आहे. यामध्ये आधुनिक काळात कोरेगाव तालुक्यामध्ये ज्या राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक बदल झाले, ते महत्त्वपूर्ण आहेत. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत या तालुक्याने मोलाची कामगिरी पार पाडली होती. या शिवाय या काळात महाराष्ट्रामध्ये ज्या सामाजिक व सांस्कृतिक सुधारणा राबविल्या गेल्या त्यात कोरेगाव तालुक्याने सहभाग घेतला आहे. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रात जे राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक घडामोडी घडल्या. त्याचेही पडसाद कोरेगाव तालुक्यावर पडले. ''कोरेगाव तालुक्याचा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक इतिहास (इ. स. १९४७ ते २०००)'' हा संशोधनाचा विषय नाविन्यपूर्ण असून या विषयावर संशोधन झालेले नाही.

त्यामुळे प्रस्तुत संशोधन विषयाची निवड केली आहे. या संशोधनामुळे कोरेगाव तालुक्याच्या राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहासावर अभ्यास करणे शक्य होईल. कोरेगाव तालुक्यास धार्मिक व सांस्कृतिकदृष्टया महत्त्वाचे स्थान आहे. तेथे मध्ययुगात निर्माण केलेली मंदिरे, त्यातील मुर्तीकला, ऐतिहासिक वाडे व मंदिरे यातील वास्तुकला व नक्षीकाम यातून कोरेगाव तालुक्याच्या सांस्कृतिक वैभवात भर पडली आहे. धार्मिक बाबतीत कोरेगाव हा तालुका महत्त्वपूर्ण आहे. अशा प्रकारे कोरेगाव तालुक्याचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहासाची समाजाला ओळख व्हावी, म्हणून हा विषय निवडला आहे.

## १.४ संशोधनाची आवश्यकता

१) कोरेगाव तालुक्याचा प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंतचा राजकीय इतिहास उजेडात आणणे.

२) कोरेगाव तालुक्याने भारतीय स्वातंत्र्य चळवळीत दिलेल्या योगदानाची माहिती करून घेणे.

३) कोरेगाव तालुक्यातील सामाजिक संस्थांनी केलेल्या कार्याची माहिती करून घेणे.

४) कोरेगाव तालुक्याचा सांस्कृतिक इतिहास जाणून घेणे.

५) कोरेगाव तालुक्याचा शैक्षणिक इतिहास जाणून घेणे.

६) कोरेगाव तालुक्याचा धार्मिक इतिहास जाणून घेणे.

७) कोरेगाव तालुक्याचा आर्थिक इतिहास जाणून घेणे.

८) कोरेगाव तालुक्याचा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक इतिहास यासंबंधी युवा पिढीला माहिती देऊन त्यांना प्रेरणा व मार्गदर्शन करणे.

## १.५ संशोधनाची उद्दिष्टे

नियोजित संशोधनासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत.

१. कोरेगाव तालुक्याची स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरची राजकीय परिस्थिती अभ्यासणे.

२. कोरेगाव तालुक्यातील समाजसुधारकांनी समाजप्रबोधनाच्या माध्यमातून स्वातंत्र्य चळवळीस कसा हातभार लावला याचा आढावा घेणे.

३. कोरेगाव तालुक्यातील सामाजिक परिस्थितीतून कोरेगाव तालुक्याचा सामाजिक विकास कसा होत गेला हे अभ्यासणे.

४. कोरेगाव तालुक्याचा विकासास हातभार लावणाऱ्या राजकीय व सामाजिक संस्थांचे कार्य अभ्यासणे.

५. कोरेगाव तालुक्यातील सांस्कृतिक दृष्टीकोनातून धार्मिक, ऐतिहासिक व पर्यटन स्थळे यांचे महत्त्व पाहणे.

६. कोरेगाव तालुक्याचा आर्थिक विकास करणाऱ्या संस्थांचे कार्य अभ्यासणे.

७. कोरेगाव तालुक्याचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक भूमिकेतून उत्कर्ष कसा होत गेला हे अभ्यासणे.

## १.६ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती कोरेगाव तालुक्यापुरती मर्यादित आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर कोरेगाव तालुक्याचा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक विकास कसा झाला याचा शोध घेण्यात आलेला आहे. सातारा जिल्हयातील फलटण, माण, खटाव, या तालुक्याबरोबर कोरेगाव तालुक्याने केलेल्या प्रगतीचा अभ्यास केलेला आहे. सातारा जिल्हयातील कोरेगाव तालुक्याचा संशोधनात्मक अभ्यास करणे यासाठी कोरेगाव तालुक्याचा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक इतिहास हा विषय अभ्यासासाठी निवडलेला आहे. ब्रिटीशकाळात या तालुक्यात झालेल्या बदलापेक्षा स्वातंत्र्या नंतरच्या काळात स्वातंत्र्यवीरांना अपेक्षित बदल घडून आले काय? आजचे राजकारण व पूर्वीचे राजकारण यात बदल काय? सध्याचा समाज व पूर्वीचा समाज यात असलेले अंतर काय? या बरोबर समाजातील वैचारिकतेत काळानुसार होणाऱ्या बदलांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

कोरेगाव तालुक्याचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास पाहत असताना कोरेगाव तालुक्यातील स्वातंत्र्यपूर्व काळातील परिस्थितीचा व तेथील राजकीय संस्थांनी केलेल्या कार्याची माहिती घ्यावी लागेल. यामध्ये असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ, चले-जाव आंदोलन इत्यादी राष्ट्रीय चळवळीच्या उपक्रमात कोरेगाव तालुक्यातील जनतेने सहभाग घेतला होता. तरी आपणास या संशोधनामध्ये कोरेगाव तालुक्याविषयी घडलेल्या परिस्थितीची माहिती घ्यावी लागेल. क्रांतीकारकांनी स्वातंत्र्य चळवळीत दिलेले योगदान याची माहिती पाहणे महत्त्वाचे आहे.

कोरेगाव तालुक्यातील सामाजिक संस्थांनी समाजात सुधारणा करण्याचा प्रयत्न सुरू केला होता. तेव्हा या संस्थांची माहिती या संशोधनातून घ्यावी लागेल. कोरेगाव तालुक्यातील रूढी, प्रथापरंपरा, चालीरिती, जातीयता व वर्गीयता इत्यादीची माहिती संशोधनातून घ्यावी लागणार आहे. अस्पृश्यता निवारण, अंधश्रध्दा, प्रतिगामी व सनातनी धार्मिक आचार–विचार याविरूध्द समाज व धर्म सुधारकांनी केलेल्या कार्याची माहिती घेणे.

कोरेगाव तालुक्याचा सांस्कृतिक दृष्टीने तेथील लोकांचा आहार, विहार, पोशाख या बरोबर शैक्षणिक कार्य, धार्मिक कार्य व पर्यटन स्थळे यांचा अभ्यास, तसेच कोरेगाव तालुक्यातील मंदिर स्थापत्य यामध्ये चवणेश्वर, किन्हई, जरंडेश्वर, बोरबन, मुधाईदेवी मंदिर व इतर देवतांच्या मंदिरांची माहिती पाहणार आहोत.

सातारा जिल्हयाच्या इतिहासात कोरेगाव तालुक्याचा स्वातंत्र्यपूर्वकाळ व स्वातंत्र्योत्तर काळात महत्त्वाचा वाटा आहे. या तालुक्याने राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक बाबतीत आपले लक्ष केंद्रित करून आपली प्रगती केली म्हणून तालुक्याच्या राजकीय, सामाजिक व शैक्षणिक इतिहासावर संशोधनदृष्टी केंद्रीत केलेली आहे. तालुक्याचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास (इ. स. १९४७ ते २०००) या विषयावर संशोधन करीत असताना तालुक्याचा संबंध महाराष्ट्रातील किंवा महाराष्ट्राबाहेरील ठिकाणाशी येत असला तरी या संशोधनाचा भर हा प्रामुख्याने तालुक्यावर देण्यात आलेला आहे. ही या संशोधनाची मर्यादा आहे.

## १.७ गृहीतके

संशोधन कार्य यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी संशोधनामध्ये विधान मांडावे लागते. या विधानाच्या आधारे संशोधनाचे अनुमान काढता येईल. या संपूर्ण संशोधनामध्ये खालीलप्रमाणे काही गृहीतके मांडण्यात आलेली आहेत.

१) स्वातंत्र्यपूर्वकाळात महाराष्ट्रातील अनेक तालुक्यांनी स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला होता. त्यामध्ये कोरेगाव तालुक्याचेही योगदान असून त्या चळवळीमध्ये महत्त्वपूर्ण कामगिरी केली होती.

२) कोरेगाव तालुक्यात मध्ययुगीन काळापासून समाजसुधारणेसाठी सुधारकांनी प्रयत्न सुरू केले होते.

३) सत्यशोधक समाजाने समाज व धर्म सुधारणेसाठी महत्त्वपूर्ण कामगिरी बजाविली होती.

४) कोरेगाव तालुक्यातील सामाजिक संस्थांनी सामाजिक बांधिलकीतून परंपरा व आधुनिकता यांच्यातील संगती साधण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले होते.

५) कोरेगाव तालुक्यातील सांस्कृतिक कार्याचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रभर उमटलेले होते.

६) कोरेगाव तालुक्यात आर्थिक सुधारणा करण्यास जरंडेश्वर सहकारी साखर कारखाना व कूपर कंपनी यांनी महत्त्वाची कामगिरी पार पाडली होती.

## १.८ सिद्धांत कल्पना

१) भारतीय स्वातंत्र्य चळवळीत कोरेगाव तालुक्यातील क्रांतिकारकांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळ यशस्वी करण्यासाठी  भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला होता.

२) स्वातंत्र्योत्तर काळात कोरेगाव तालुक्यामध्ये प्रारंभापासून काँग्रेस पक्षाचे व नंतरच्या काळात राष्ट्रवादी पक्षाचे वर्चस्व होते.

३) कोरेगाव तालुक्यातील सामजिक व सांस्कृतिक संस्थानी केलेल्या सुधारणांमुळे समाजात पुष्कळसा बदल झालेला दिसून येतो.

४) कोरेगाव तालुक्यातील मंदिरशैली, वास्तुकला, मुर्तीकला व ऐतिहासिक वाडे कलात्मकदृष्टया वैशिष्टयपूर्ण आहेत.

५) कोरेगाव तालुक्याचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास आजच्या आधुनिक काळातील समाजाच्या दृष्टिकोन बदलास मार्गदर्शक, प्रेरक व स्फूर्तीदायक असा आहे.

## १.९ संदर्भ साहित्याचे पुनर्विलोकन (Review of Literature)

'कोरेगाव तालुक्याच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक इतिहासाचा अभ्यास १९४७ ते २०००' या विषयावर अजून लिखाण केलेले नाही. सातारा राज्यातील सहा जहागिरदार या विषयावर प्रा. विनायकराव जाधव, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा यांनी २०१२ मध्ये पीएच. डी. प्रबंध सादर केला आहे. मात्र यात कोरेगाव तालुक्याविषयी माहिती नाही. तसेच सातारा शहर, अजिंक्यतारा किल्ला, सातारचे छत्रपती यांच्याविषयी अनेकांनी लेखन केलेले आहे. श्री. धायगुडे ए. आर. यांनी सातारा जिल्हयातील सत्यशोधक चळवळ हा शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे एम. फिल. प्रबंध २००६ मध्ये सादर केलेला आहे. तसेच प्रा. नलावडे उज्वला, 'सत्यशोधकाची संक्षिप्त गाथा' हे पुस्तक प्रकाशित केलेले आहे. या

पुस्तकात त्यांनी केशवराव विचारे आणि सातारा जिल्हयातील सत्यशोधक चळवळ याविषयीची माहिती नमूद केलेली आहे. मात्र यात कोरेगाव तालुक्यातील सत्यशोधक चळवळीचा स्वतंत्रपणे इतिहास मांडलेला नाही. तसेच प्रा. पाटील ए. जे., कऱ्हाडचा इतिहास (सन १९५० ते २०००), पीएच. डी. शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०११, प्रा. कोरडे डी. डी., वाई शहराचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास (१९०० ते २०००), पीएच. डी. शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१२, प्रा. सावंत जे. सी., स्वातंत्र्योत्तर सातारा, पीएच. डी. शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१६ यात सातारा जिल्हयातील चळवळी विषयीची माहिती नमूद केलेली आहे. मात्र यामध्ये कोरेगाव तालुक्याची स्वतंत्र माहिती लिहिलेली नाही. सातारा जिल्हयाच्या उत्तर भागात असलेला हा तालुका राजकीयदृष्टया जसा दुर्लक्षित राहिला तसाच संशोधनाच्या दृष्टीने दुर्लक्षित राहिलेला दिसून येतो.

## १.१० संदर्भ साधने

प्रस्तुत संशोधनाकरीता आवश्यक असणाऱ्या माहितीचे संग्रह करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. या साधनांच्या आधाराने संदर्भ साधनांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. ती साधने पुढीलप्रमाणे आहेत.

### अ) प्राथमिक साधने (अप्रकाशित)

१) कोरेगाव तालुक्यातील राजकीय व सामाजिक संस्थांची घटनापत्रके.

२) कोरेगाव तालुक्यातील राजकीय व सामाजिक संस्थांचे वार्षिक अहवाल.

३) गुरूवर्य केशवराव विचारे यांचे समाज सुधारणा विषयीचे पत्रक

४) जोत्याजीराव बयाजीराव फाळके यांचे समाजसुधारणेविषयीचे पत्रक (सत्यशोधक समाज)

५) सातारा जिल्हा परिषदेचे वर्षनिहाय वार्षिक अहवाल

६) कोरेगाव ग्रामपंचायतीचे वार्षिक अहवाल

७) पंचायत समिती, कोरेगावचे वार्षिक अहवाल

८) रहिमतपूर नगर परिषदेचे अहवाल

९) जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्याचे वार्षिक अहवाल

१०) कूपर कंपनी स्थापनेचे घटनापत्रक

११) कूपर कंपनीचे वार्षिक अहवाल

**ब) प्राथमिक साधने (प्रकाशित)**

१) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर

२) सातारा जिल्हा गॅझेटियर

३) विश्वकोश खंड – ०१ ते १७

**क) दुय्यम साधने**

१) विविध संदर्भ ग्रंथ

२) एम. फिल. व पीएच. डी. चे प्रबंध

३) विविध संस्थाच्या स्मरणिका व नियतकालिके

४) आत्मचरित्रे व गौरव ग्रंथ

५) विविध कार्यालय व संस्थाचे रेकॉर्ड

६) विविध वर्तमानपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, त्रैमासिक व सहामाही अंक.

७) नकाशे, सीडी व कॅसेटस्

८) विश्वकोश, संस्कृतीकोश खंड व ज्ञानकोश

## १.११ संशोधन गृहीतके

संशोधन कार्य यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी संशोधनामध्ये विधान मांडावे लागते. या विधानाच्या आधारे संशोधनाचे अनुमान काढता येईल. या संपूर्ण संशोधनामध्ये खालीलप्रमाणे काही गृहीतके मांडण्यात आलेली आहेत.

१. स्वातंत्र्यपूर्वकाळात महाराष्ट्रातील अनेक तालुक्यांनी स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला होता. त्यामध्ये कोरेगाव तालुक्याचेही योगदान असून त्या चळवळीमध्ये महत्त्वपूर्ण कामगिरी केली होती.

२. कोरेगाव तालुक्यात मध्ययुगीन काळापासून समाजसुधारणेसाठी सुधारकांनी प्रयत्न सुरू केले होते.

३. सत्यशोधक समाजाने समाज व धर्म सुधारणेसाठी महत्त्वपूर्ण कामगिरी बजाविली होती.

४. कोरेगाव तालुक्यातील सामाजिक संस्थांनी सामाजिक बांधिलकीतून परंपरा व आधुनिकता यांच्यातील संवाद साधण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले होते.

५. कोरेगाव तालुक्यातील सांस्कृतिक कार्याचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रभर उमटलेले होते.

६. कोरेगाव तालुक्यात आर्थिक सुधारणा करण्यास जरंडेश्वर सहकारी साखर कारखाना व कूपर कंपनी यांनी महत्त्वाची कामगिरी पार पाडली होती.

## १.१२ संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनामध्ये आवश्यकतेनुसार वेगवेगळया संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. विषयाची मांडणी करताना १.विश्लेषणात्मक पध्दत २.सूक्ष्म पध्दत ३.मुलाखत ४.संदर्भ पध्दत या पध्दती वापरल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने सामाजिक व ऐतिहासिक संशोधन पद्धतीच्या अनुषंगाने कोरेगाव तालुक्यातील सामाजिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक इतिहासाचा शोध घेताना प्रत्यक्ष मुलाखत घेऊन सर्वेक्षण करून संबंधित ऐतिहासिक दस्तऐवज संकलन करून कोरेगाव तालुक्याचा राजकीय, आर्थिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक इतिहास सदरच्या संशोधनातून पुढे आणण्याचा मानस आहे.

## १.१३ प्रकरण नियोजन

संशोधन नियोजनात पुढीलप्रमाणे सहा प्रकरणांची निश्चिती केली आहे.

**प्रकरण पहिले**

**सातारा जिल्हयाचा पूर्वेतिहास**

या प्रकरणात संशोधन विषयाची निवड, उद्दिष्टे, गृहीतके व महत्त्व विशद केले आहे.. माझ्या अभ्यासाची प्रादेशिक व्याप्ती सातारा जिल्हा व कोरेगाव तालुका यापुरती मर्यादित केलेली आहे. त्यामुळे या प्रकरणात सातारा जिल्हा व कोरेगाव तालुक्याच्या ऐतिहासिक वाटचालीवर प्रकाश टाकणे महत्त्वाचे वाटल्याने त्या अनुषंगाने कोरेगाव तालुक्याच्या भौगोलिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमीचा आढावा घेतला आहे.

**प्रकरण दुसरे**

**कोरेगाव तालुक्याचा राजकीय इतिहास**

या प्रकरणात स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय स्वातंत्र्य लढयातील कोरेगाव तालुक्यातील क्रांतीकारकांचे स्वातंत्र्य चळवळीतील कार्यामध्ये राष्ट्रीय शिक्षण, असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळीतील सहभाग याचा आढावा घेतला आहे. तसेच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कोरेगाव तालुक्यातील राजकीय परिस्थितीचा व राजकीय संस्थांनी केलेल्या कार्याचा अभ्यास या प्रकरणात केलेला आहे.

**प्रकरण तिसरे**

**कोरेगाव तालुक्याचा सामाजिक इतिहास**

या प्रकरणामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात कोरेगाव तालुक्यातील सत्यशोधक समाजाचे गुरूवर्य केशवराव विचारे, ज्योत्याजीराव फाळके, राजारामबापू फाळके आदींनी केलेले सामाजिक कार्य विशद केले आहे. यामध्ये सनातनवादी व पुरोगामी विचारांच्या विद्वानांमधील संघर्षाची माहिती दिलेली केले आहे. समाजसुधारकांचे अस्पृश्यता निवारण, समाज परिवर्तन व राष्ट्रीय एकात्मतेसाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली आहे.

**प्रकरण चौथे**

**कोरेगाव तालुक्याचा सांस्कृतिक इतिहास**

या प्रकरणात सोळशी, हर्णेश्वर, चवणेश्वर, जरंडेश्वर, किन्हई, देऊर व चिमणगाव येथील धार्मिक व ऐतिहासिक स्थळांच्या माध्यमातून झालेला सांस्कृतिक विकास तसेच रयत शिक्षण संस्था, स्वामी विवेकानंद संस्था, कोरेगाव एज्युकेशन सोसायटी, श्री मुधाईदेवी शिक्षण संस्था इत्यादींनी सामाजिक बांधिलकीने परंपरा व आधुनिकता यांच्यातील समन्वय साधण्यासाठी केलेले सामाजिक कार्य व राबविलेले विविध उपक्रम याची मांडणी केली आहे.

**प्रकरण पाचवे**

**कोरेगाव तालुक्याचा आर्थिक इतिहास**

या प्रकरणात आर्थिक दृष्टीने जरंडेश्वर सहकारी साखर कारखाना, चिमणगाव व कूपर कंपनी, सातारारोड यांनी औद्योगिक क्षेत्रातील कोरेगाव तालुक्याच्या विकासात महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. त्यामुळे डोंगराळ, दुष्काळी भागात व्यापार व उद्योगधंदयांची भरभराट होऊन आर्थिक संपन्नता कशी निर्माण झाली याचे साधार विवेचन केलेले आहे.

**प्रकरण सहावे**

**उपसंहार**

या प्रकरणात संशोधनातून निघालेल्या निष्कर्षांची मांडणी केलेली आहे.

अशा प्रकारे कोरेगाव तालुक्याचा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक इतिहास संशोधन करीत असताना येथील राजकीय, सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक संस्थांच्या आधारे

कोरेगाव तालुक्याच्या इतिहासावर प्रकाश टाकला आहे. अशा प्रकारे मी माझ्या प्रबंधाची मांडणी वरील सहा प्रकरणात केलेली आहे.

## १.१४ सातारा जिल्हयाची भौगोलिक पार्श्वभूमी

सातारा जिल्हा इ. स. १८४८ मध्ये ११ शासकीय विभागात विभागलेला होता. यामध्ये विजापूर (सध्या कर्नाटक राज्यात), विजापूर, जावळी, कराड, खटाव, कोरेगाव, पंढरपूर, सातारा, तासगाव, वाळवा व वाई यांचा समावेश झालेला होता.[१]

१८४८ नंतर सातारा जिल्हयाचे विलगीकरण होऊ लागले. त्यानुसार सातारा जिल्हयातील विजापूर विभाग अनुक्रमे १८६४ व १८७५ मध्ये सोलापूर जिल्हयास जोडण्यात आले. १५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. त्यावेळी मांडलिक संस्थानांचे भारतात विलिनीकरण केले गेले. त्यानुसार फलटण संस्थानचा काही भाग, जमखंडी, अक्कलकोट, भोर, औंध व सांगली या संस्थानचा प्रदेश सातारा जिल्हयास जोडण्यात आला. सन १९५० मध्ये सातारा जिल्हयाचे दोन भाग पाडण्यात आले. त्यानुसार 'दक्षिण सातारा' हा पहिला विभाग पाडला असून त्याचे मुख्यालय सांगलीला ठेवले होते. तर दुसरा भाग 'उत्तर सातारा' बनवला असून त्याचे मुख्य केंद्र सातारा शहर हे ठेवले होते. इ. स. १९६० मध्ये दक्षिण सातारा जिल्हयाचे नाव 'सांगली' तर उत्तर सातारा जिल्हयाचे नाव सातारा असे ठेवण्यात आले.[२] सातारा जिल्हा हा चार महसुल विभागात विभागला असून त्यामध्ये ११ तालुक्यांचा समावेश आहे. या तालुक्यात सातारा, कोरेगाव, वाई, महाबळेश्वर, जावळी, कराड, पाटण, खटाव, माण, फलटण व खंडाळा इत्यादी आहेत.[३]

### १.१४.१ सातारा जिल्हयाचे स्थान

सातारा जिल्हा हा महाराष्ट्राच्या दक्षिण विभागात मध्यभागी येतो. भौगोलिकदृष्टया त्याचा विस्तार दक्षिण पठाराच्या पश्चिम सीमावर्ती भागात १७$^{\circ}$५ ते १८$^{\circ}$११ उत्तर अक्षांश आणि ७३$^{\circ}$३३ ते ७४$^{\circ}$५४ पूर्व रेखांश आहे. जिल्हयाचा पूर्व-पश्चिम विस्तार सुमारे १४५ किलोमीटर व दक्षिणोत्तर विस्तार सुमारे १२० कि.मी. आहे.[४]

### १.१४.२ सातारा जिल्हयाची सीमा

सातारा जिल्हयाच्या उत्तरेस पुणे जिल्हा, पूर्वेस सोलापूर जिल्हा, दक्षिणेस आणि अग्नेयेस सांगली जिल्हा व पश्चिमेस रत्नागिरी जिल्हा आहे. उत्तरेकडील या जिल्हयाची सीमा

नीरा नदीने निर्धारीत केली असून पश्चिम आणि नैऋत्येकडील सीमा सहयाद्रीच्या मुख्य रांगांमुळे सुनिश्चित झाल्या आहेत. तसेच महादेव डोंगराच्या शिखर शिंगणापूर रांगेमुळे पूर्वेकडील सातारा, सोलापूर जिल्हयाची सीमा थोडया फार प्रमाणात तयार झाली आहे.[५]

### १.१४.३ सातारा जिल्हयाचे क्षेत्रफळ

सन २००१ च्या जनगणनेनुसार सातारा जिल्हयाचे क्षेत्रफळ १०,७८० चौ. कि. मी. आहे. महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रफळाशी तुलना करता ते सुमारे ३.४ टक्के आहे. महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ३. ०८ लाख चौ. कि. मी. आहे. सातारा जिल्हयाचा आकारमानाच्या दृष्टीने राज्यातील एकूण ३५ जिल्हयांमध्ये १२ वा कमांक लागतो.[६]

### १.१४.४ सातारा जिल्हयाचे हवामान

सातारा जिल्हयाच्या हवामानात ऋतूमानानुसार भिन्नता आहे. सातारा जिल्हयात जून ते सप्टेंबर पावसाळा, ऑक्टोबर ते फेब्रुवारी हिवाळा तर मार्च ते जून उन्हाळा ऋतू असतो. त्यामुळे पावसाळयात दमट, हिवाळयात थंड हवामान तर उन्हाळयात उष्ण व कोरडे हवामान आढळते. अशा प्रकारे सातारा जिल्हयातील हवामान हे वर्षभर आल्हाददायक असते.[७]

### १.१४.५ पर्जन्य

सातारा जिल्हयात पर्जन्याची भिन्नता असलेली आढळते. पश्चिम घाट प्रदेशात मोठया प्रमाणावर पाऊस पडतो तर पूर्वेकडील भागात ते अत्यंत कमी प्रमाणात पडतो. पश्चिम घाट प्रदेशात महाबळेश्वरला वार्षिक सरासरी ११९ पर्जन्य पडतो तर पूर्वेकडील माण, म्हसवड भागात तो सरासरी ३० इतका पडतो. मिलीमीटरमध्ये पर्जन्याचा विचार केला तर असे आढळते की, महाबळेश्वर येथे ६,२०९ मि. मी. इतके पर्जन्यमान आहे. तर माण, म्हसवडला ४७३ मि. मी. एवढे पर्जन्य आहे. त्यामुळे सातारा जिल्हयातील पूर्वेकडील हा भाग दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो.[८]

## १.१५ लोकसंख्या

सन २००१ च्या जनगणनेनुसार जिल्हयाची एकूण लोकसंख्या २८,०८,९९४ एवढी आहे. त्यामुध्ये पुरूष १४,०८,२२६ व स्त्रिया १४००६६८ आहेत. सातारा जिल्हयाचे क्षेत्रफळ महाराष्ट्र राज्याच्या ३.४ टक्के असून लोकसंख्येचे प्रमाण राज्याच्या २.८९ टक्के आहे

जिल्हयातील लोकसंख्येची घनता दर चौ. कि. मी. २८६ एवढी आहे. जिल्हयातील स्त्री–पुरूष प्रमाण दर १००० पुरूषांमागे ९९५ स्त्रिया असे आहे.[९]

## १.१६ सातारा जिल्हयाचा पूर्वेतिहास

सातारा जिल्हयाचा पूर्वेतिहास पाहत असताना आपणास या जिल्हयाचा प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन राजकीय इतिहास पाहणे आवश्यक आहे.

### १.१६.१ प्राचीन काळातील सातारा जिल्हा

सातारा जिल्हयास प्राचीन काळापासून निसर्गतः साधनसंपत्ती लाभली आहे. नद्या, पर्वत, डोंगररांगा व किल्ले यांनी हा भाग संपन्न असला तरी प्राक्–इतिहास तज्ज्ञांचे लक्ष या विभागाकडे गेले नसल्याने सातारा जिल्हयाचा प्रागैतिहासिक काळ सविस्तपणे ज्ञात होत नाही. उपलब्ध झालेल्या मोजक्या साधनांद्वारे या प्रदेशाचा प्रागैतिहास जुळवावा लागतो. राजकीय वा प्रशासकीय सोयीसाठी प्राचीन काळापासून अनेकदा सातारा जिल्हयातील प्रदेशाच्या सीमारेषा बदलत गेल्या आणि म्हणूनच आजच्या सातारा जिल्हयाचा सविस्तर अभ्यास करताना या गोष्टींचा प्रामुख्याने अभ्यास करावा लागतो.

सातारा जिल्हयाचा प्राचीन इतिहास प्रागैतिहास काळापासून सुरू होतो. या काळातील केवळ मानवनिर्मित दगडी हत्यारे व तत्कालीन प्राण्यांचे अश्मीभूत अवशेष यावरूनच निष्कर्ष काढावे लागतात.[१०]

### १.१६.१.१ प्रागैतिहासिक काळ

सातारा जिल्हयातील आसगाव, पाचवड, मर्ढे, माहुली, लिंब आणि सोनगाव इत्यादी ठिकाणी प्रागतैहासिक काळातील हत्यारे उपलब्ध झाली आहेत. यामध्ये हातकुऱ्हाडी, फरश्या, तासण्या व एकपृष्ठसंस्कारी तोड हत्यारे या प्रकारची हत्यारे आहेत. या सापडलेल्या हत्यारावरून त्या काळातील हवामान समजण्यास मदत झाली आहे. त्या काळात मोठया प्रमाणात पाऊस पडत होता. तसेच सातारा जिल्हयात घनदाट जंगल होते. तेव्हा या जंगलातील झाडे तोडण्यासाठी व हिंस्त्र प्राण्यांच्या शिकारीसाठी त्याकाळात हातकुऱ्हाडीचा वापर केला जात होता.[११]

### १.१६.१.२ मध्याश्मयुग

या काळातील मानवाचे अस्तित्व सातारा जिल्हयात उंब्रज, कराड, काशिळ, कोपर्डे, गोवरे, चिंचनेर, टेंभू तारगाव, धामणेर, माहुली, लिंब, वेणेगाव इत्यादी ठिकाणी आढळले आहे. या काळातील हत्यारे आकाराने लहान होती. तासण्या, वेधण्या आणि नोकहत्यारे यांचा समावेश त्यामध्ये होत होता. या हत्यारावरून असे स्पष्ट होते की, हवामान, वनस्पती पशू–पक्षी आणि स्वतःच्या गरजा यांच्या अनुमानाने हत्यारात व अवजारात योग्य तो बदल करण्याची काळजी त्याकाळातील मानवाने घेतलेली होती. हा काळ साधारणपणे इ. स. पू. तीस हजार ते पंचवीस हजार वर्षे असा होता. मध्याश्मयुगीन हत्यारे व अवजारे सातारा जिल्हयात कृष्णेकाठी संगम माहुली, पाचगणी, वाई, महाबळेश्वर विभाग, प्रतापगड, तळेकामत व आंबेनळी–जावळी इत्यादी ठिकाणी सापडली आहेत.[१२]

### १.१६.१.३ उत्तर अश्मयुग

सातारा जिल्हयातील कराड येथे या काळातील हत्यारे सापडली आहेत. उपलब्ध झालेल्या हत्यारांवरून या काळातील मानवाच्या राहणीमानाचा अंदाज बांधता येतो. तसेच तत्कालीन मानवाच्या गरजा कोणत्या असाव्यात हे ही समजते. या काळातील अत्यल्प वस्तुरूप पुराव्यामुळे उत्तर अश्मयुगीन जीवनावर अधिक प्रकाश टाकता येत नाही.

### १.१६.१.४ नवाश्मयुग व ताम्रपाषाणयुग

नवाश्मयुगीन संस्कृतीचे अवशेष महाराष्ट्राबरोबरच सातारा जिल्हयातही कोठेही पहावयास मिळत नाही. मात्र ताम्रपाषाणयुगीन अवशेष कराडशिवाय इतरत्र कोठेही पहावयास मिळत नाहीत. या काळातील वसाहती जमिनीवर झालेल्या दिसून येतात. तेथील घनदाट जंगले तोडून तो भाग वसाहती योग्य केला गेला होता. सातारा जिल्हयातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचे स्वरूप, तिची व्याप्ती, कालखंड, वैशिष्टये तिचे परस्पर प्रादेशिक संबंध, इतर जिल्हयांशी झालेली देवाण–घेवाण, त्या काळातील लोकांची शरीररचना व वांशिक वैशिष्टये समजण्यास मदत होते.[१३]

### १.१६.१.५ ऐतिहासिक काळ

कराड येथे उपलब्ध झालेल्या आहत नाण्यावरून इ. स. पू. ५ व्या शतकात सांस्कृतिकदृष्टया साताऱ्याचा परिसर हा महाराष्ट्राशी संबंधित होता हे दिसून येते. मौर्य,

सातवाहन काळातील अवशेष उत्खणनातून कराड व कोल्हापूर याठिकाणी उपलब्ध झाले आहेत. इ. स. पूर्व तिसऱ्या शतकात सातारा जिल्हा सातवाहनांच्या साम्राज्याखाली मोडत होता. इ. स. पूर्व दुसऱ्या शतकात सातारा जिल्हयातील कराड या गावातील यात्रेकरूंनी मध्यप्रदेशातील सुप्रसिद्ध भारहुत येथील स्तूपाच्या वेदिकेच्या बांधणीसाठी काही अनुदाने दिल्याचा अभिलेखात उल्लेख आहे.[१४] यावरून असे स्पष्ट होते की, सातवाहन काळात या परिसरातील लोक इतर प्रातांच्या संपर्कात आलेले होते. कराड, शिरवळ, वाई, भोसे माळवाडी व कुंडल येथील बौद्ध लेणी सातवाहनांच्या काळातच खोदल्या गेल्या होत्या.

सातवाहन साम्राज्याचे विभाजन होऊन महाराष्ट्रात अनेक शाखा निर्माण झाल्या. त्यामध्ये कुंतल शाखेत सातारा–सांगली–कोल्हापूर हा दक्षिण महाराष्ट्रातील प्रदेश मोडत होता. या काळात वशिष्ठपुत्र विळिवायकुर, माढरीपुत्र सिवलुकर आणि गौतमीपुत्र विळिवायकुर हे तीन राजे सातारा परिसरात राज्य करीत होते.[१५]

सातारा जिल्हयाच्या परिसरात मानपूरचे राष्ट्रकूट हे पहिले घराणे स्थापन झाले होते. हे राज्य वाकाटक सम्राटाच्या समकालीन होते. कोल्हापूर परिसरात सापडलेल्या पांडरंगपल्ली ताम्रपटात सातारा जिल्हयातील वेण्णा नदी व जावळीचा उल्लेख येतो. राष्ट्रकूट घराण्यातील अविधेय हा राजा सातारा जिल्हा व आसपासच्या प्रदेशावर राज्य करीत होता. राष्ट्रकुटांचे वाकाटकांशी वैवाहिक संबंध होते.[१६]

राष्ट्रकूटानंतर सातारा परिसरावर वाकाटक बदामीचे चालुक्य शिलाहार व देवगिरीचे यादव यांची सत्ता होती. देवगिरीच्या यादवांनी ११८५ पासून ते ११३८ पर्यंत आपले साम्राज्य निर्माण केले होते. महाराष्ट्राच्या राजकीय स्थित्यंतरात यादवांच्या नंतर शिलाहार घराण्याचे महत्त्व आहे. शिलाहार घराण्याचाही सातारा जिल्हयाच्या परिसराशी संबंध आलेला आहे. द्वितीय जतिग (सन १००० ते १०२०) याच्या कारकिर्दीपासून संबंध आलेला होता. या राजाने सिंदवंशीय राजाचा पराभव करून कराड येथे आपली राजधानी स्थापन केली होती.[१७]

देवगिरीच्या यादवांचे पूर्वज हे राष्ट्रकूट सम्राटाचे आणि कल्याणी चालुक्यांचे मांडलिक म्हणून राज्य करीत होते. पुढे स्वपराक्रमाच्या बळावर यादव वंशाला सम्राट पदवी प्राप्त झाली आणि देवगिरी ही राजधानी बनविली. पुढे कुतुबुद्दीन मुबारक शहाने यादवांचा पाडाव करून त्यांचे राज्य नष्ट केले.[१८]

सातारा जिल्हयात प्राचीन काळी लेणी व मंदिरे या दोन प्रकारच्या वास्तुस्थापत्याची निर्मिती झाली आहे. सातवाहनकालीन लेणी कराड, वाई, भोसे, शिरवळ येथे आढळतात.[१९] ही बौद्धलेणी असून हीनयान पंथीयांची आहेत. याठिकाणी लेणींची देणगी दिल्याचे नमूद करणारे काही ब्राह्मी लिपीतील अभिलेख आहे. तर सातारा जिल्हयातील प्राचीन काळातील मंदिरे ही हेमाडपंथी आहेत. परळी, विटा, फलटण, शिंगणापूर, चिमणगाव, बहुले, बावधन व देवराष्ट्रे इत्यादी गावी अशी मंदिरे आहेत.[२०] या मंदिरांची वैशिष्टये म्हणजे चुन्याचा वापर न करता, खोबण्या करून, दगडावर दगड रचून, कौशल्यपूर्ण संतुलन साधलेले आढळून येते. मोठया दगडाच्या छताचे ओझे पेलून धरण्यासाठी या मंदिराच्या भिंती खूप रूंद केलेल्या आहेत. त्यांच्या आतील व बाहेरचा दर्शनी भाग घडीव दगडांचा असून दोहोमधील जागा दगडगोटेयांनी भरून टाकली आहे. सातारा जिल्हयातील मंदिरे ही मध्यम आकाराची आहेत. मुखमंडप, सभामंडप, अंतराळ आणि गर्भगृह हे भाग मंदिरांना आहेत. मंदिरातील मंडप उघडा किंवा बंदिस्त असे. सभामंडपाच्या मधोमध अगदी अल्पशा उंचीची भली मोठी शिळा असे. तिच्या चार कोपऱ्यावर चार स्तंभ आहेत. या शिळांना रंग शिळा म्हणतात. सातारा जिल्हयातील बहुतेक मंदिराची अशीच रचना आढळते. क्वचित मंदिरे ही रंगशिळेवरील छतच फक्त समतल असण्याऐवजी एकावर एक निमुळत्या होता जाणाऱ्या एक केंद्रक वर्तुळांचे आढळते. गाभाऱ्याच्या आतील भिंती अनलंकृत, छत समतल आणि गाभाऱ्यात शिवलिंग अशी रचना दिसून येते.[२१]

अशा प्रकारे काळातील सातारा जिल्हा हा महाराष्ट्रातील इतर जिल्हयाप्रमाणेच राजकीय व धार्मिक बाबतीत अग्रेसर असलेला दिसून येतो. यावरून सातारा जिल्हयास प्राचीन काळापासून राजकीय वारसा आहे हे स्पष्ट होते.

### १.१६.२ मध्ययुगीन सातारा जिल्हा

मध्ययुगीन सातारा जिल्हा हा देश आणि कोकण यांना जोडणारा दुवा होता. देशातून कोकणात जाणारे सर्व व्यापारी मार्ग प्रामुख्याने बोर, उंबराणी, वरंध, अंबानळी, पार, कुंभार्ली घाटातून जात असल्याने आणि पहिले दोन घाट सोडता अन्य घाट सातारा जिल्हयात असल्याने सातारा जिल्हा महत्त्वाचा ठरतो. तथापि जिल्हयाचा अर्धा भाग डोंगराळ असल्याने त्यावर नियंत्रण ठेवणे अवघड होते. तसेच सहयाद्री व महादेवाच्या डोंगरांनी अडचणीमध्ये भरच घातल्याचे दिसते. सातारा जिल्हयात लहान मोठे असे एकूण ३४ किल्ले असून त्यामधील काही

प्राचीन म्हणजेच शिलाहार राजवटीत बांधलेले आहेत.[२२] शिवकाळात किल्ला हे संरक्षणाचे प्रभावी माध्यम ठरल्याने किल्ल्यांचे महत्त्व वाढले. छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेला प्रतापगडचा किल्ला होय. किल्ल्याचा उपयोग तुरूंग म्हणूनही केलेला दिसून येतो. साताऱ्याचा अजिंक्यतारा हा अभेद्य पुरातन किल्ला असून आदिलशाही व शिवशाहीमध्ये त्याचा तुरूंग म्हणून वापर केल्याचे स्पष्ट दिसते. याशिवाय चंदनवंदन, नांदगिरी, वैराटगड, वर्धनगड, वासोटा हे सातारा जिल्हयातील अन्य पुरातन किल्ले आहेत. यामध्ये काळाप्रमाणे वाढ होत गेली आणि लहानमोठे असे एकूण ३४ किल्ले निर्माण झाले.[२३] तेव्हा मध्ययुगीन सातारा जिल्हयाचा अभ्यास करीत असतांना शिवपूर्वकाळ, शिवकाळ व पेशवेकाळ यांची माहिती पहावी लागते.

### १.१६.२.१ शिवपूर्वकाळ

#### १.१६.२.१.१ सुलशाहीचा काळ

इ. स. १२९६ मध्ये महाराष्ट्रावर पहिले मुस्लिम आक्रमण होऊन त्यात देवगिरीच्या यादवांचा पराभव झाला होता. तरी देखील १३१८ पर्यंत यादवांची सत्ता टिकून राहिली होती. सन १३१८ मध्ये यादव सत्तेच्या अखेरच्या वारसदाराचा पराभव होऊन दक्षिणेवर मुस्लिम राजवट सुरू झाली होती. मुबारक खिलजीने 'मलिक याखलखी' यास देवगिरीचा राज्यपाल म्हणून नियुक्त केले होते. तथापि उत्तरेत खिलजी घराण्याची राजवट संपुष्टात येऊन तुघलक घराणे गादीवर आले. तुघलक घराण्यातील महंमद तुघलकाची कारकिर्द अनेक घटनांनी गाजली. त्यामध्ये त्याने देवगिरीचे नाव बदलून 'दौलताबाद' हे नाव दिले. दौलताबादला राजधानीचा दर्जा देऊन त्यामध्ये अद्ययावत नागरी सुविधा उपलब्ध करून दिल्या.[२४]

तुघलकाची सत्ता भारतावर सुरू झाली त्यावेळी त्याने दक्षिण भारताकडे लूट करण्याच्या हेतूनेच पाहिले होते. कारण इ. स. १३४१ मध्ये त्याच्या जुलमी राजवटीविरूद्ध दक्षिणेत सर्वत्र उठाव झाले आणि त्याचे नियंत्रण करणे स्वतः महंमद तुघलकालाही शक्य झाले नाही. इ. स. १३४५ मध्ये आपले वर्चस्व दक्षिणेवर निर्माण करण्याचा कसून प्रयत्न केला. त्यामध्ये त्याच्या अधिकाऱ्यांनी स्थानिक प्रजेवर मोठया प्रमाणावर जुलुम जबरदस्ती केली. अखेर त्याच्या जाचाला कंटाळून दक्षिणेतील मुस्लिम सरदारांनी सन १३४७ मध्ये हसन गंगू उर्फ जाफरखान याच्या नेतृत्वाखाली बंड केले. दौलताबाद येथेच हे बंड होऊन त्यामध्ये

तुघलकाच्या सेनेचा पराभव झाला. दौलताबादचा किल्ला पुन्हा जिंकण्याचा त्याने बराच प्रयत्न केला. परंतु त्याला यश मिळाले नाही.[२५]

### १.१६.२.१.२ बहमनी कालखंड (१३४७ ते १३८९)

बहमनी सत्ता साधारणतः १५० वर्षे दक्षिण भारतातील सार्वभौम सत्ता होती. या सत्तेचा संस्थापक हसन गंगू बहमनी होय. गुलबर्गा हे त्याच्या राजधानीचे शहर साताऱ्याच्या पूर्वेस १८० मैलावर होते. पुढे १४२६ मध्ये त्याची राजधानी बिदरला म्हणजे गुलबर्ग्यापासून पूर्वेकडे १०० मैल अंतरावर केली होती. बहमनी सुलतान अल्लाउद्दीन हसनने इ. स. १३४५ ते १३४७ ते १३५८ या कालावधीत दक्षिणेमध्ये बहमनी राजवटीची भक्कम आर्थिक पायावर उभारणी केली. सन १३५१ पर्यंत त्याने तुघलकाच्या वर्चस्वाखालील दक्षिण भारतातील सर्व भूप्रदेश बहमनी साम्राज्यात समाविष्ट केला. सन १३५१ मध्ये महंमद तुघलकाचा मृत्यू झाल्याने उत्तरेकडील आक्रमणाची भिती संपली. त्यावेळी त्याने दक्षिणेतील स्थानिक हिंदू प्रमुखास विश्वासात घेऊन राज्य चालविले.[२६] त्यावेळी सातारा, गुलबर्गा तरफाचा एक भाग बनून राहिला होता. साताऱ्याच्या पश्चिमेकडील म्हणजेच कोकणातील भाग वगळता सर्व भूभाग बहमनी साम्राज्यात असून त्यावर हसन गंगूचे प्रत्यक्ष नियंत्रण होते.[२७]

अशा प्रकारे दक्षिण महाराष्ट्रात १२ ऑगस्ट १३४७ पासून बहमनी म्हणजे मुस्लिम राजवट सुरू झाली होती. या राजवटीत एकंदर १८ सुलतान झाले आणि त्यांनी सन १५२६ पर्यंत राज्यकारभार केला. तथापि शेवटचे चार सुलतान (सन १५१८ ते १५२६) केवळ नामधारीच होते. महंमद गवानच्या मृत्यूनंतर (सन १४८१) बहमनी साम्राज्याचे पाच तुकडयात विभाजन झाले आणि परस्पर हेवदाव्यामुळे या पाच शाहया मुघल आक्रमणाच्या बळी ठरल्या. विजापुरच्या आदिलशाहीमध्ये साताऱ्याचे महत्त्व वाढले आणि नंतरच्या मराठा राजवटीमध्ये सातारा परिसर राजकीय घडामोडीचे महत्त्वाचे केंद्र बनले.[२८]

### १.१६.२.२ शिवकाळ

सातारा परिसरावर छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य निर्माण होण्यापूर्वी आदिलशाहीची सत्ता होती. सन १४८९ पासून आदिलशहा सातारा परिसरावर राज्य करीत होता. छत्रपती शिवाजी महाराजांचा उदय होईपर्यंत कोणतीही सत्ता आदिलशहाला आव्हान देण्यासाठी सातारा परिसरात अस्तित्वात नव्हती. आदिलशहाच्या काळात साताऱ्याला विशेष

महत्त्व प्राप्त झाले होते. महमुद गवानच्या मृत्यूनंतर विजापूर सुभ्यातील त्याची जहागिरी युसूफ आदिलखान या सरदाराकडे बहाल करण्यात आली होती. त्यामध्ये सातारा जिल्हयाचा समावेश होत होता. युसूफ आदिलशहानंतर आदिलशाही सत्तेत एकूण आठ सरदार निर्माण झाले होते. या सरदारांनी १६८६ पर्यंत विजापूर येथून राज्यकारभार केला होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या उदयापर्यंत आदिलशाहीची सातारा परिसरावर चांगली पकड होती. तथापि साताऱ्याच्या परिसरावर वर्चस्व प्रस्थापित केल्यास आपण उत्तरेकडील मोगल, दक्षिणेतील विजापूरकर आणि कोकणातील सिद्दी यांच्या लढा देऊ शकतो असा आत्मविश्वास बाळगून छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या सर्व राजकीय डावपेचांचा साताऱ्यापासून आरंभ केला. सातारा जिल्हयातील वाई, महाबळेश्वरच्या दुर्गम पट्टयांनी शिवाजी महाराजांना आकर्षित केले आणि याच्याच जोरावर मराठा साम्राज्य स्थापन केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या उदयाच्यावेळी सातारा जिल्हयात जावळीचे चंद्रराव मोरे, फलटणचे रावनाईक निंबाळकर, मलवडीचे झुंजारराव घाटगे, जतचे डफळे, म्हसवडचे माने, कापशीचे घोरपडे आदी मातब्बर मराठा घराणी वंशपरंपरेने आपल्या जहागिरीच्या ठिकाणी कार्यरत होती. ही घराणी आदिलशाहीची इमानेइतबारे सेवाचाकरी करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या भोसले घराण्याविरूद्ध राजकारण करीत होती. या घराण्यांच्या जोरावरच विजापूरी सत्तेने कोकण, पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर भागावर आपली सत्ता कायम केली होती.[२९]

### छत्रपती शिवाजी महाराज

सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रातील बहुतांश प्रदेश अहमदनगरच्या निजामशहा आणि विजापूरचा आदिलशहा यांच्या ताब्यात होता. आपले प्रशासन चालविण्यासाठी हे सुलतान स्थानिक लोकांची मदत घेत होते. हिशोबनीस, कारकून यासारख्या अनेक पदांवर त्यांनी मराठी माणसे नेमली होती. डोंगराळ भागातील किल्ल्यांची माहिती मराठयांना होती. तसेच मराठयांच्या स्वामीनिष्ठा या गुणांमुळे किल्ल्यांच्या प्रशासनामध्ये त्यांचा सहभाग मोठा होता. या शाहयामध्ये आपापसात सतत संघर्ष होत होता.त्याचबरोबर उत्तरेकडून मुघलांच्या होणाऱ्या आक्रमणास तोंड द्यावे लागत होते. अशा धामधुमीच्या काळात आपापले सामर्थ्य वाढविण्यासाठी सुलतानांनी स्थानिक मराठयांना आपल्या लष्करात स्थान दिले. जे मराठे

सरदार लष्करी सेवेत विशेष कर्तृत्व दाखवित त्यांना सुलतान निरनिराळया पदव्या व किताब देत असत. १६ व्या शतकाच्या अखेरीस आदिलशाहीत आणि निजामशाहीत चाकरी करणाऱ्या अनेक मराठयांनी स्वकर्तृत्वाच्या जोरावर जहागिऱ्या संपादन केल्या होत्या. यातूनच या काळात अनेक मराठी सरदार घराणी उदयास आली. शिवाजी महाराजांचे भोसले घराणे हे त्यापैकी एक होय.[३०]

मालोजीराजे भोसले यांचा मुलगा शहाजीराजे भोसले हे निजामशाहीतील एक मातब्बर सरदार होते. मुघलांविरूद्धच्या संघर्षात निजामशाही वाचविण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. इ. स. १६३६ मध्ये निजामशाही नष्ट झाली. तेव्हा शहाजीराजे आदिलशहाचे सरदार बनले. आदिलशहाने पुणे, सुपे, चाकण व इंदापूर या भागाची जहागिरी व सातारा जिल्हयातील मसूर गावासह बावीस खेडयांची देशमुखीही दिली.[३१]

पुढे शहाजीराजांना आदिलशहाने कर्नाटकात कामगिरीवर पाठविले पुण्याच्या जहागिरीच्या प्रदेशाचा कारभार शिवाजीराजे व त्यांच्या मातोश्री जिजाबाई यांच्याकडे सोपविला. त्यांच्या मदतीस दादोजी कोंडदेव हा कारभारी म्हणून नेमला. शिवाजी महाराजांनी आपल्या जहागिरीचे स्वराज्यात रूपांतर करण्याचे ठरविले. त्यावेळी त्यांचे सातारा जिल्हयातील वाई प्रांताकडे लक्ष गेले. वाई प्रांत हा पुणे परगण्यास लागून असून तो आदिलशहाच्या राज्याचा एक भाग होता. वाई प्रांताचा जो सुभेदार असे त्याच्या अंमलाखाली पांडवगड, कमळगड आणि त्याच्या आसपासचे किल्ले असत. शिवाजी महाराजांच्या वाढत्या हालचालींना पायबंद घालण्यासाठी आदिलशहाने वाई प्रांताच्या सुभेदारीवर अफजलखान याची इ. स. १६४९ मध्ये नेमणूक केली. वाई प्रांतातील जावळी खोऱ्यावर चंद्रराव मोरे हा पिढीजात सत्ता गाजवित होता. सातारा जिल्हयाच्या वायव्येस असलेला जावळीचा मुलुख लष्करीदृष्टया अत्यंत महत्त्वाचा होता. कोकणामध्ये उतरण्याचे घाटमार्ग त्यामधूनच जातात. ज्याच्या ताब्यात जावळी त्याच्या ताब्यात वाई प्रांत, सहयाद्री घाटमाथा व त्यासमोरचे संपूर्ण कोकण असे म्हटले जात होते. हा प्रदेश भरपूर पावसाचा, घनदाट अरण्याचा व दऱ्याखोऱ्यांचा होता. त्यामुळे तो लष्करीदृष्टया अभेद्य होता.आपले राज्य व नव्याने जिंकलेला मुलूख यांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने हा प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली असणे शिवाजी महाराजांना आवश्यक वाटत होते. या दुर्गम प्रदेशाचा

उपयोग शत्रू फौजांशी लढतांना होईल हे शिवाजी महाराजांनी ओळखले होते. म्हणूनच राजांनी जावळीवर हल्ला करण्याचे ठरविले.[३२]

शिवाजी महाराजांनी दहा हजार सैनिकांसह जावळीच्या चंद्रराव मोरेवर हल्ला केला. त्यावेळी त्यांना कोठेही प्रतिकार झाला नाही. १५ जानेवारी, १६५६ रोजी शिवाजी महाराजांनी जावळी जिंकून घेतली. पुढे चंद्रराव मोरे शरण आला. लगेचच शिवाजी महाराजांनी साताऱ्याच्या पश्चिमेस असलेला मोऱ्यांच्या ताब्यातील वासोटा किल्ला आणि शिवथरघळ काबीज करून जावळी मोहीम पूर्ण केली.[३३]

छत्रपती शिवाजी महाराजांनी आदिलशाहीच्या ताब्यातील जावळी प्रांत जिंकून घेतला. त्यामुळे आदिलशहाने चिडून जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी शूर सरदार अफझलखान यास पाठविले. अफझलखान हा विजापूरहून पंढरपूर, फलटण, मलवडी, शिखर शिंगणापूर, जेजुरी, शिरवळमार्गे इ. स. १६५९ मध्ये सातारा जिल्हयातील वाई येथे कृष्णा नदीकाठी येऊन थांबला. त्यावेळी सातारा जिल्हयातील खोपडे–देशमुख अफझलखानास जाऊन मिळाले होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी अफझलखानाचे पारिपत्य करण्यासाठी वाई प्रांतातील जावळी येथील प्रतापगडच्या पायथ्याची निवड केली होती. अफझलखान हा शिवाजी राजांना जावळी प्रांतात प्रारंभी भेटण्यास तयार होत नव्हता. मात्र राजे आपली भेट घेण्यासाठी वाईस येण्यास घाबरतात असे समजून तो प्रतापगडच्या पायथ्याशी भेट घेण्यास तयार झाला. तेव्हा १० नोव्हेंबर, १६५९ रोजी शिवाजी महाराज व अफझलखान यांची भेट प्रतापगडच्या पायथ्याशी झाली. याप्रसंगी झालेल्या भेटीत अफझलखानाने छत्रपती शिवाजी महाराजांस दगा फटका करण्याचा प्रयत्न केला. महाराजांनी कपटी दगाबाज खानास ठार केले. इशारा मिळताच महाराजांच्या सैन्याने आदिलशाही फौजेस घेरले आणि तिच्यावर हल्ला चढविला. त्यात रूस्तुमखान, अंबरखान राजाजी, झुंजारराव घाटगे व अफझलखानाचे दोन धाकटे मुलगे वगैरेंचा पाडाव झाला. खंडूजी खोपडे याने द्रव्याच्या लालसेने खानास मिळून त्याच्याकडील माणसांना आडवाटेने पळवून नेऊन कऱ्हाड येथे सुरक्षितपणे पोहचविले. म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यास शिक्षा करून एक हात व एक पाय तोडला.[३४]

अफझलखान वधानंतर शिवाजीराजे वाईस येऊन वाई जिंकली व माणकोराम यास तेथील ठाणेदार नेमले. यानंतर कऱ्हाडचा वायव्येस असलेला वसंतगड मराठयांनी जिंकून

घेतला.पण हे प्रांत जास्त काळ त्यांच्याकडे राहिले नाहीत. पुढे आदिलशहाने पुन्हा तो प्रदेश जिंकून घेतला.[३५]

शाहिस्तेखान पुण्यातील लाल महाल या वाडयात तळ देऊन बसला होता. त्यावेळी त्याने दक्षिण कोकणातून व पुणे, सातारा प्रांतातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या उच्छेदाचे काम सुरू केले होते. त्याने फौजेच्या दोन तुकडया करून एक उत्तर कोकणात चौलजवळ व दुसरी घाटावर रहिमतपूर येथे ठेवली व दोन्ही बाजूंनी महाराजांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न चालविला होता. शाहिस्तेखानासारख्या प्रबळ शत्रूबरोबर समोरासमोर लढणे कठीण होते. हे जाणून महाराजांनी लाल महालात शिरून खानावर सन १६६३ मध्ये हल्ला केला. या हल्ल्यात खानाचे प्राण वाचले पण त्याच्या हाताची तीन बोटे तुटल्याने तो जखमी झाला.[३६]

सन १६६५ मध्ये मिर्झाराजा जयसिंग व छत्रपती शिवाजी महाराज यांच्यात पुरंदरचा तह झाला. तहामध्ये ठरल्यानुसार महाराजांनी मुघलांच्या आदिलशहाविरूद्धच्या दक्षिण मोहिमेस साहय करण्याचे ठरले होते. आदिलशाहीविरूद्धच्या मोहिमेची सुरूवात आदिलशहाचे जहागिरदार फलटणचे बजाजी नाईक निंबाळकर यांच्यापासून केली. मुघल–मराठयांच्या संयुक्त फौजांनी ७ डिसेंबर, १६६५ रोजी फलटण जिंकून घेतले. नंतर ताथवडा, खटाव ही ठिकाणेही जिंकून घेतली.[३७]

छत्रपती शिवाजी महाराजांनी आग्रा भेटीनंतर पुरंदरच्या तहात गेलेले किल्ले त्यांनी हळूहळू परत जिंकून घेतले. ८ मार्च, १६७३ रोजी त्यांनी प्रथम आदिलशहाच्या ताब्यातील पन्हाळा किल्ला जिंकून घेतला. एप्रिल, १६७३ मध्ये साताऱ्यापासून ६ कि. मी. अंतरावर असलेल्या परळीचा किल्ला जिंकला. २७ जुलै, १६७३ रोजी सातारा किल्लाही काबीज केला. त्यानंतर सातारा जिल्हयातील चंदन–वंदन, पांडवगड, नांदगिरी, केळंजा आणि ताथवडा हे किल्लेही त्यांनी जिंकले.[३८]

इ. स. १६७६ मध्ये शिवाजी महाराज आजारी पडले होते. त्यावेळी दोन ते तीन महिने त्यांचे वास्तव्य सातारच्या किल्ल्यावर होते. या आजारातून बरे होताच त्यांनी आदिलशाही प्रदेशावर हल्ले करून खटाव प्रांत पुन्हा जिंकून घेतला होता. डिसेंबर, १६७९ मध्ये शिवाजी महाराज सज्जनगडावर (परळी) समर्थ रामदासाच्या भेटीसाठी आले होते.[३९]

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठयांच्या सत्तेवर छत्रपती संभाजी महाराज विराजमान झाले. त्यावेळी विजापूरचे राज्य खालसा झाले होते. तेव्हा आदिलशहाच्या पदरी काम करणारा सर्जाखान हा मुघलांच्या सेवेत सामील झाला होता. औरंगजेब बादशहाने त्यास संभाजींचा मुलुख जिंकण्यास पाठविले. सर्जाखान वाई प्रांताकडे चालून आला. वाई येथे त्याची व मराठयांचा सेनापती हंबीरराव मोहिते यांची गाठ पडून लढाई झाली. या लढाईत सर्जाखानाचा पराभव होऊन मराठयांना भरपूर लूट मिळाली. पण ऐन लढाईत सेनापती हंबीरराव मोहिते ठार झाला. त्यामुळे वाई ठाणे पुन्हा मुघलांच्या ताब्यात गेले. संभाजी महाराजांच्या मृत्यूवेळी मराठी प्रदेशावर मुघलांचे हल्ले चालूच होते. सप्टेंबर, १६८९ मध्ये सातारा परिसरातील सातारा, परळी, लिंब, चंदन, वंदन, कराड, माजगाव व मसूर इत्यादी प्रदेश मराठयांच्या ताब्यात होता.[४०]

छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात सर्जाखानाने सातारचा किल्ला घेण्याचे ठरविले. त्यावेळी शंकराजी नारायण, रामचंद्रपंत अमात्य व संताजी, धनाजी यांनी बादशहाला यश मिळू दिले नाही. एवढेच नव्हे तर यांच्यामुळेच मराठी राज्याचा बचाव झाला. याच काळात परशुराम त्रिंबक हा सरदार म्हणून प्रसिद्धीस आला होता. तो कोरेगाव तालुक्यातील नांदगिरीजवळील किन्हई गावचा राहणार होता. माधवराव व परशुराम हे दोघे किन्हई गावचे कुलकर्णी होते. रामचंद्रपंत अमात्याच्या तालमीत परशुरामपंत तयार झाला होता. युद्धात पराक्रम गाजविल्यामुळे 'सुभालष्कर' व 'समशेरजंग' हे किताब व पुढे प्रतिनिधी, प्रधान व अमात्य अशी पदे त्यास मिळत गेली. परशुरामपंताचा पहिला पराक्रम पन्हाळा किल्ला परत मिळविण्यात दिसून येतो. परशुरामपंताने बादशहाकडे नोकरी करणाऱ्या मराठा सरदारांची मने वळवून व त्यांना नवीन वतने देऊन स्वराज्यात आणण्याचे फार मोठया प्रमाणावर प्रयत्न केले होते. उदा. फलटणच्या अमृतराव निंबाळकर व म्हसवडचा नागोजी माने हे होते.

राजाराम महाराज जिंजीहून महाराष्ट्रात परतल्यानंतर सातारा हे आपले राजधानीचे ठिकाण त्यांनी बनविले. त्यामुळे सातारचे महत्त्व पुन्हा वाढू लागले. एवढेच नव्हे तर येथून पुढच्या छत्रपतींनी आपली राजधानी साताराच ठेवली.[४१]

महाराणी ताराबाईच्या काळात सातारचा किल्ला जिंकण्यासाठी खुद्द बादशहा औरंगजेब सातारा येथे आला होता. त्याने करंजे येथून मोहिमेची सुत्रे हलविली होती. सातारच्या

किल्ल्यास मुघलांनी वेढा दिला होता. तसेच तटाला सुरूंग लावून किल्ल्यास भगदाड पाडण्याचे प्रयत्न चालू ठेवले होते. मराठयांच्या वतीने धनाजी जाधव, हणमंतराव निंबाळकर, राणोजी घोरपडे इत्यादींनी मुघलांना जेरीस आणले होते. १० जानेवारी, १७०० रोजी रहिमतपूरजवळ मराठे व झुल्फिकार खान यांच्यात लढाई होऊन उभयतांचे मोठे नुकसान झाले होते. सभोवतालचा प्रदेश बेचीराख केल्यामुळे मुघल सैनिकांचे मोठे हाल झाले होते. शेवटी औरंगजेब बादशहाने किल्ल्याच्या तटास सुरूंग लावून भगदाड पाडले. त्यात दोन्ही पक्षांचेही नुकसान झाले होते. तेव्हा आपला फार दिवस निभाव लागणार नाही असे समजून मराठे तडजोडीस तयार झाले तर मुघलांचेही धैर्य खचले होते. तेव्हा मुघलही तडजोडीस तयार झाले. अशा प्रकारे काही रक्कम घेऊन मराठयांनी सातारचा किल्ला २१ एप्रिल, १७०० रोजी मुघलांच्या ताब्यात दिला. शहाजादा आझमने केलेल्या वाटाघाटीमुळे किल्ला मुघलांच्या ताब्यात आला. म्हणून औरंगजेब बादशहाने या किल्ल्याचे नाव 'आझमशहा' ठेवले.[४२] २२ एप्रिल, १७०० रोजी औरंगजेबाने सातारा किल्ल्यात प्रवेश केला आणि छत्रसाल राठोड याची किल्लेदार म्हणून नियुक्ती केली. याच दिवशी त्याने परळीचा किल्ला जिंकला. पुढे विशाळगड, पन्हाळा, वर्धनगड, नांदगिरी, चंदन व वंदन हे किल्लेही जिंकले.[४३]

महाराणी ताराबाईने आपल्या रणनीतीचे सूत्रच असे ठरविले होते की, किल्ला लढवायचा व शेवटी मोठी रक्कम घेऊन त्या मोबदल्यात किल्ला मुघलांना देऊन टाकायचा व मुघलांची तिजोरी रिकामी करावयाची. पुढे पुन्हा तो मुघलांच्या ताब्यात दिलेला किल्ला जिंकून घ्यायचा आणि त्याप्रमाणेच तिने ते किल्ले पुन्हा जिंकून घेतले. याचा पश्चाताप मुघल बादशहा औरंगजेब यास होऊन तो औरंगाबाद याठिकाणी २० फेब्रुवारी, १७०७ रोजी मरण पावला. त्यावेळी मराठयांच्या मुघली प्रदेशावर स्वाऱ्या चालूच होत्या.

### १.१६.२.३ पेशवेकालीन सातारा

औरंगजेब बादशहाच्या मृत्यूनंतर मराठयांच्यात यादवी निर्माण व्हावी या हेतूने मुघल बादशहा आझमशहाने आपल्या कैदेतून छत्रपती शाहूची सुटका केली. छत्रपती शाहू व महाराणी ताराबाई यांच्यात १२ ऑक्टोबर, १७०७ रोजी युध्द होऊन त्यात छत्रपती शाहूचा विजय झाला. तेव्हा शाहूने १२ जानेवारी, १७०८ रोजी स्वतःस राज्याभिषेक करून घेतला. सातारा राजधानी बनविली. आपले अष्टप्रधान मंडळ घोषित केले. पुढे छत्रपती शाहूने बाळाजी विश्वनाथ

याच्या सहाय्याने आपली बाजू बळकट करण्यास मदत केली. त्याचवेळी १७१० मध्ये महाराणी ताराबाई हिने आपला मुलगा दुसरा शिवाजी यास गादीवर बसवून करवीर गादीची स्थापना केली. त्यामुळे छत्रपती शाहूस होणारा विरोध मावळत गेला होता.

बाळाजी विश्वनाथ पेशवा बनल्यावर त्याने कान्होजी आंग्रे, चंद्रसेन जाधव या बंडखोर सरदारांना धडा शिकविला. एवढेच नव्हे तर मुघल बादशहाकडून चौथाई व सरदेशमुखीची सनद मिळविली. मार्च, १७९१ मध्ये वाईचे ठाणे शाहूने हस्तगत केले. पुढे छत्रपती शाहूने बाळाजी विश्वनाथ याच्या साहाय्याने सातारा, वाई, भुईंज इत्यादी ठिकाणी फिरून चौथाई व सरदेशमुखीची वसुली केली होती. अशा प्रकारे शाहूच्या काळात महाराष्ट्रात राज्यकारभाराची घडी नीट बसून शांतता व समृद्धी दिसू लागली होती.[४४]

छत्रपती शाहूच्या काळात मराठा राज्य भरभराटीस आले होते. त्याने दिल्ली दरबारातील बादशहाचा वजीर सय्यद हुसेन यांना दक्षिणेत बोलावून तह घडवून आणला होता. चौथाई, सरदेशमुखी व स्वराज्य सनदांची प्राप्ती केली होती. मराठा मंडळाची निर्मिती केली होती. छत्रपती दुसरा शिवाजी व छत्रपती शाहू यांच्यात वारणेचा तह घडून आला होता.त्यामुळे या दोन्ही मराठा राजातील यादवी संपुष्टात येण्यास मदत झाली होती. छत्रपती शाहूच्या मृत्यूनंतर छत्रपती रामराजा हा सत्तेवर आला होता. रामराजा गादीवर बसल्यावर ताराबाईने सर्व सत्ता आपल्या हाती घेण्याचा प्रयत्न चालविला होता. त्याचवेळी पेशव्यानेही छत्रपतीस आपल्या नियंत्रणाखाली आणण्याचे प्रयत्न चालविले होते. पेशव्यांना वाटत होते की, ताराबाईने प्रत्यक्ष कारभारात लक्ष न घालता फक्त सल्लागाराची भूमिका बजवावी. परंतु ताराबाईने राज्यकारभारात लक्ष घालण्याचे ठरविल्याने पेशव्याच्या दृष्टीने छत्रपतीची सत्ता ताराबाईच्या हाती जाईल अशी भिती होती. तर छत्रपती रामराजे यांची स्वतंत्रपणे राज्यकारभार करण्याची इच्छा होती. त्यांना वाटत होते की, ताराबाईपेक्षा पेशव्याचे सहकार्य अधिक महत्त्वाचे व उपयुक्त आहे. पण ताराबाईला पेशव्याचे वर्चस्व नको होते. त्यामुळे ताराबाई व पेशवे यांच्यात मतभेद निर्माण झाले. शेवटी ताराबाईने आपल्या पक्षातील सरदारांना एकत्र करून १७५० मध्ये सिंहगडावर मुक्काम केला. तेथून पेशवे व ताराबाई यांच्यात समझोता घडून यावा यासाठी रघुजी भोसले याने प्रयत्न केले. पण उपयोग झाला नाही. पुढे २२ नोव्हेंबर, १७५० रोजी ताराबाईने रामराजास अटक करून स्वतः राज्यकारभार पाहण्यास सुरूवात केली. पुढे पेशव्यांनी विरोध

केला व ताराबाईचे महत्त्व हळूहळू कमी होण्यास सुरूवात झाली. कारण पेशव्यांनी उत्तर भारतात व कर्नाटकात विजय मिळविल्याने महाराष्ट्रात पेशव्यांचे महत्त्व वाढीस लागले व ताराबाईचे महत्त्व कमी झाले. अल्पावधीतच १० डिसेंबर, १७६१ रोजी ताराबाईचे सातारा येथे निधन झाले व तिच्या अटकेत असणारा रामराजा स्वतंत्र झाला. यावरून असे दिसते की, ज्याच्या हातात छत्रपती त्याच्या हातात मराठयांची सत्ता अशी परिस्थिती महाराष्ट्रात निर्माण झाली होती. तर पेशव्यांच्यात माधवराव पेशवा व रघुनाथराव यांच्यात संघर्ष सुरू झालेला होता.

छत्रपती रामराजाच्या काळात बाळाजी बाजीराव व माधवराव पेशवा या पेशव्यांनी मराठयांचे राज्य पुणे येथून सांभाळले होते. तर दुसऱ्या शाहूच्या काळात इ. स. १७७८ पासून बारभाई मंडळाने सहा वर्षे कारभार सांभाळला. या काळापर्यंत मराठी सत्तेत छत्रपतींचे महत्त्व पेशव्यांनी कमी कमी करत आणून अखेरच्या छत्रपतींना तर बंदीवासाची वागणूक मिळू लागली. त्याचप्रमाणे दुसरा शाहू यास कधीही स्वतंत्रपणे राज्यकारभार करता आला नाही. मराठयांचा छत्रपती साताऱ्याच्या किल्ल्यात पेशव्यांच्या खडया पहाऱ्यात राहू लागला. पुण्यास राज्याचा कारभार सुरळित चालला होता तोपर्यंत पेशव्यांच्या विरूद्ध उठण्याचा प्रयत्न केला नाही. सवाई माधवरावांच्या मृत्यूनंतर (२७ ऑक्टोबर, १७९५) पुण्यास नवनवीन राजकारणे सुरू झाली. त्यावेळी नाना फडणीसांच्या हाती सर्व सत्ता आली होती. पूर्वीच्या पेशव्यांपेक्षा नाना फडणीसयांनी मराठा छत्रपतींचा मोठया प्रमाणात कोंडमारा केला. छत्रपतीच्या खर्चाचे ऐवज जे स्वतंत्र होते ते बंद करून जो ऐवज देणे तो पुण्याहून रोख पाठवावा असे ठरविले. साताऱ्याच्या राजवाडयातील महत्त्वाच्या वस्तू पुण्यात आणल्या गेल्या होत्या. अशाप्रकारे दुसरा शाहू याच्या नशिबी बंदीवास, तेजोभंग व अपमानाचे प्रसंग येऊ लागले. पुढे ४ मे, १८०८ रोजी दुसरा शाहू याचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर सातारच्या गादीवर छत्रपती प्रतापसिंह महाराज (१८०८ ते १८३९) विराजमान झाले.[४५]

### १.१६.३ आधुनिक काळातील सातारा जिल्हा

छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या काळापासून सातारा जिल्हयाच्या आधुनिकतेची सरूवात झाली. सातारा राज्याच्या संरक्षणार्थ छत्रपती प्रतापसिंह महाराजांना जोरदार लढा द्यावा लागला. हा लढा सशस्त्र नसला तरी त्यात आत्मनिष्ठा, मुत्सद्देगिरी आणि कर्तव्यनिष्ठा

होती. त्यांनी केलेल्या चोख कारभाराबद्दल ब्रिटीश अधिकाऱ्यांनी इंग्लंडच्या सरकारकडे पारितोषिक मिळावे म्हणून शिफारस केली होती. त्यानुसार प्रशंसेचा खलिता व मौल्यवान तलवार कंपनी सरकारकडून इंग्लंडमधून पाठविण्यात आली. परंतु ही गोष्ट गव्हर्नर रॉबर्ट ग्रँट यास भावली नाही म्हणून त्याने तो खलिता व तलवार मध्येच दडपून ठेवली. लंडनमधील न्यायालयात साक्ष देताना कर्नल ब्रिग्ज याने म्हटले आहे की, ज्या हिंदुस्थानी राजांशी आपला संबंध आला त्या सर्वात प्रतापसिंह सच्छील व सद्वर्तनी होता.[४६]

छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी आपल्या सातारा संस्थानचा रेसिडेंटच्या मदतीने विकास घडवून आणला. त्यांनी यवतेश्वर, महादरा याठिकाणी तलाव बांधून सातारा शहरासाठी पाण्याची व्यवस्था केली. शहरात आखीव-रेखीव रस्ते बांधले.[४७] प्रारंभी महाबळेश्वर प्रतापसिंह महाराजांच्याकडे होता. छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी महाबळेश्वर हे गिरीस्थान विकसित केले. त्यांनी कर्नल ब्रिग्जच्या सूचनेवरून स्वखर्चाने सातारा ते महाबळेश्वर असा रस्ता बांधून तो पुढे प्रतापगडापर्यंत वाढविला. पुढे १८२९ च्या करारानुसार महाबळेश्वर इंग्रजांकडे तर त्याबदल्यात प्रतापगड किल्ला प्रतापसिंह राजांना मिळाला. २५ सप्टेंबर, १८१९ च्या तहानुसार ब्रिटीशांचे सार्वभौमत्व मान्य करून छत्रपती प्रतापसिंह महाराजांना मराठा गादी प्राप्त झाली होती. त्यानुसार सातारा संस्थानात १८८५ मध्ये अस्तित्वात असलेल्या सातारा जिल्हयातील प्रदेशाचा समावेश होता. छत्रपती प्रतापसिंह राजांना सर्वाधिकार न देता इंग्रजांनी सातारला इंग्रज रेसिडेंट म्हणून जेम्स ग्रँट डफची नियुक्ती केली होती. ग्रँट डफला सहायक म्हणून एलफिन्स्टनच्या खास विश्वासातील बाळाजीपंत नातू याची नियुक्ती केली होती. बाळाजीपंत नातू हा स्वार्थी व कटकारस्थानी होता. त्यामुळे छत्रपती प्रतापसिंहाला तो आवडत नव्हता. मात्र राजांचे ग्रँट डफ याच्याबरोबर सौहार्दपूर्ण संबंध होते. त्यामुळे ग्रँट डफ व प्रतापसिंह महाराज यांच्या परस्पर सहकार्याने सातारा संस्थानात चांगल्या सुधारणा झाल्या. त्यामध्ये पाणी पुरवठा, रस्ते सुधारणा, राजवाडा निर्मिती, वक्षारोपण, तगाई कर्ज, देवालये बांधणे, शिक्षणविषयक सुधारणा केल्या. त्यामुळे कारागिरी, उद्योग व व्यापार यांस राजाश्रय प्राप्त झाला.[४८]

गव्हर्नर माऊंटएलफिन्स्टननंतर सत्तेवर सर जॉन माल्कम गव्हर्नर म्हणून आला. तर सातारचा रेसिडेंट म्हणून कर्नल रॉबर्टसन नियुक्त झाला. मार्च १८३५ पर्यंत छत्रपती प्रतापसिंह राजांचा चांगल्या प्रकारे राज्यकारभार सुरू होता. परंतु पुढे राजांना अनेक कटकटी व

कारस्थानांना तोंड द्यावे लागले. प्रतापसिंहाच्या एतद्देशीय शत्रूंनी व इंग्रजांनी कटकारस्थाने करून त्यांना खूप कोंडीत पकडले व पदच्युत करण्याचा कट रचला. त्यातूनच प्रतापसिंह महाराजांचा ऱ्हास झाला. पुण्यातील शनिवारवाडयावर इंग्रजांचा युनियन जॅक स्वहस्ते फडकविणारा बाळाजीपंत नातू प्रतापसिंहाविरूद्ध गेले हे स्पष्ट होते.[४९]

छत्रपती प्रतापसिंह महाराजांना पदावरून दूर सारून त्यांचा भाऊ आप्पासाहेब भोसले यांना इंग्रजांनी ४ सप्टेंबर, १८३९ रोजी नवीन तह करून गादीवर बसविले. हा नवीन तह म्हणजे सन १८१९ मध्ये केलेल्या तहातील कलमांची दुरूस्ती होय. त्यानुसार छत्रपतींकडे असलेल्या सहा जहागिरदारांवरील ताबा इंग्रजांनी स्वतःकडे घेतला. त्यामुळे सातारा संस्थानावर ब्रिटीशांची सत्ता दृढ होण्यास मदत झाली. त्याचवेळी प्रतापसिंह महाराजांना रेसिडेंट ओव्हन्सने रात्रीच्यावेळी पकडून लिंब या गावी नेले. तेथे दोन महिने ठेवून नंतर काशी येथे पाठविले. तेथेच १४ ऑक्टोबर, १८४७ रोजी त्यांचे निधन झाले.[५०]

छत्रपती प्रतापसिंह महाराजांना १८३९ मध्ये पदच्युत करून त्यांचा छळ केल्यामुळे महाराष्ट्रातील संस्थानिकांमध्ये असंतोष पसरला. सातारा परिसरात तर बंडाळी सुरू झाली. कराड येथे धारराव पोवार यांनी बंड पुकारले. त्यास 'धाररावाचे बंड' असे म्हणतात. इस्लामपूरच्या नरसिंग दत्तात्रय पेटकर या ब्राह्मण गृहस्थाने लिंब गावी प्रतापसिंह महाराजांची भेट घेऊन बंडाळी केली. त्यासाठी पुणे, अहमदनगर, नाशिक व रायचूर जिल्हयामध्ये दौरे करून अरब जमादारांची मदत घेऊन १००० सैनिक जमविले. देवदुर्ग या ठिकाणी सेना एकत्र जमवून ब्रिटीशांच्या ताब्यात असणारा बदामीचा किल्ला जिंकून घेतला. पुढे ब्रिटीशांनी हा किल्ला पुन्हा जिंकला. नरसिंगराव पेटकर व त्याच्या सहकार्यांना फाशीची शिक्षा ठोठावली. परंतु पुढे फाशीऐवजी जन्मठेप देण्यात आली.[५१]

इ. स. १८४८ मध्ये लॉर्ड डलहौसीने सातारा संस्थान खालसा केले होते. त्यामुळे १८५७ च्या उठावात सातारा जिल्हयाने सहभाग घेतला होता. त्यात ब्रिटीशांना शह देण्यासाठी रंगो बापूजींनी भूमिगत अवस्थेत उत्तर हिंदुस्थानचा दौरा करीत असताना क्रांतिकारक तात्या टोपे यांची भेट घेतली. तात्या टोपे यांनी नानासाहेब पेशवा व रंगो बापूजीची बिदर येथे बैठक आयोजित केली. त्यात ब्रिटीशांविरोधी लढा देण्याचे निश्चित झाले. पुढे रंगो बापूंनी उमाजी

नाईकांच्या बंडाच्या वेळी मावळे, रामोशी, कातकरी, कोळीव भंडारी लढवय्ये यांना संघटीत केले. सातारा जिल्हयात गुप्त संघटना उभारली.[५२]

ब्रिटीशांच्या कैदेत असणाऱ्यांची मुक्तता करणे, सातारा, यवतेश्वर व महाबळेश्वर येथील युरोपियनांची कत्तल करणे सरकारी तिजोरी लुटणे व सातारच्या गादीवर छत्रपती प्रतापसिंह महाराजांचा दत्तक मुलगा शाहू यास बसवून मराठा राजवट पुन्हा सुरू करण्याची योजना ठरविण्यात आली. अशाप्रकारे १८५७ चा उठाव घडून आल्यानंतर रंगो बापूजीच्या नेतृत्वाखाली सातारा येथे ब्रिटीशांविरूद्ध कार्यवाही सुरू झाली.[५३]

**सातारा जिल्हयात सार्वजनिक सभेची स्थापना**

महाराष्ट्रातील कर्जनिवारण करण्यासाठी पुणे येथे १८७० मध्ये सार्वजनिक सभेची स्थापना करण्यात आली. यात सातारा जिल्हयातील वाई येथे पहिली शाखा १८७० मध्ये निघून पुढे १८७१ मध्ये गणेश वासुदेव जोशी यांच्या नेतृत्वाखाली दुसरी शाखा सातारा येथे निघाली. या सभेने सातारा जिल्हयात १८७५ मध्ये पडलेल्या दुष्काळ विरोधी मोहीम चालवून महसूल माफ होण्यासाठी प्रयत्न केले. शेतकऱ्यांच्या कर्जनिवारण विषयांचे गरजांकडे लक्ष देणे भाग पाडले. सार्वजनिक सभेने उपस्थित केलेल्या प्रश्नांवर विचार करण्यासाठी मुंबई इलाखा शासनाला चौकशीसाठी 'डेक्कन राईट्स कमिशन' नेमावे लागले. कमिशनच्या अहवालानुसार उपाययोजना करण्यासाठी 'डेक्कन ॲग्री कल्चरिस्ट रिलिफ ॲक्ट' पास करण्यात आला. या अधिनियमांच्या रूपाने दख्खनचे दंगे व सार्वजनिक सभेची मोहीम यांची फलनिष्पती झाली.

सार्वजनिक सभेच्या शेतसारा बंदी आंदोलनाच्या जिल्हयामधील मोहिमेचे नेतृत्व न. चि. केळकर यांच्याकडे होते. त्यांचा भाऊ सातारा जिल्हाधिकारी कार्यालयात असल्याने जिल्हयात केळकरांना चांगला प्रतिसाद मिळाला. त्यामुळे त्यांच्या कार्याला काही प्रमाणात यश मिळाले. अशाप्रकारे सार्वजनिक सभेला साराबंदी व जनजागृतीच्या कार्यात मिळालेले यश फार महत्त्वाचे होते.[५४]

**स्वातंत्र्य चळवळीतील सातारा जिल्हा**

**अ) टिळक युग**

लोकमान्य टिळकांच्या विचारांनी प्रेरित झालेले अनेक अनुयायी सातारा जिल्हयात होते. लोकमान्य टिळकांचे रघुनाथ पांडुरंग करंदीकर व गणेश फणसकर हे दोन जवळचे

सहकारी असून व्यवसायाने वकील होते. त्यामुळे टिळकांच्या काळात साताऱ्याचे नेतृत्व यांच्याकडे होते. सातारा जिल्हयात कराड व वाई येथे 'काँग्रेस'च्या सभा सन १९८३ मध्ये संपन्न झाल्या होत्या.[५५]

प्रांतिक परिषद ही राष्ट्रवादी संघटना म्हणजे अखिल भारतीय काँग्रेसची विभागीय शाखा होती. ही परिषद मुंबई इलाख्यात कार्यान्वित झाल्यापासून तिच्यावर मुंबई महानगरातील नेत्यांचे वर्चस्व होते. तेव्हा या परिषदेचे अधिवेशन १२ मे, १९०० रोजी साताऱ्यात भरविण्यात आले. या संघाने टिळकांचा प्रभाव प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. मात्र टिळकांना त्यात फारसे यश मिळाले नाही. पुणे येथे १८९१ मध्ये भरलेल्या प्रांतिक परिषदेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष साताऱ्याचे गोविंद धोंडो लिमये होते. सन १९०० मध्ये प्रांतिक परिषद सातारा येथे मुंबईचे गोकुळदार पारेख यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. तर पुढचे अधिवेशन सातारा येथे इ. स. १९१४ मध्ये विठ्ठलराव पाठक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.[५६]

टिळकांनी १९०५ मध्ये सुरू केलेल्या वंगभंग आंदोलनास व स्वदेशी चळवळीस सातारा परिसरात फार मोठया प्रमाणावर पाठिंबा मिळाला होता. यावेळी कार्यकर्त्यांनी इंग्रजांविरूद्ध भूमिगत सशस्त्र प्रतिकाराचा पुरस्कार करू लागले होते. कृष्णराव कळंबे हे या चळवळीने मार्गदर्शक होते. १९११ साली इंग्लंडचा राजा पंचम जॉर्ज याचे राज्यारोहण झाल्यावर 'शिवाजीचे बंड' नावाने सशस्त्र प्रतिकार करण्याचाही पुरस्कार केला. बनारस येथे सन १९०५ साली झालेल्या काँग्रेस अधिवेशनातील निर्णयानुसार काँग्रेसचे कार्य सतत चालू ठेवण्यासाठी 'सातारा जिल्हा सभा' ही संघटना स्थापन करण्यात आली. या सभेचे पहिले अध्यक्ष दादासाहेब करंदीकर हे होते. ही जिल्हा सभा १९३७ पर्यंत कार्यरत होती. सुरूवातीस या सभेची वार्षिक अधिवेशने तालुक्याच्या ठिकाणी भरविण्यात येत असत. यानुसार सातारा जिल्हयात अनेक सुधारणा होण्यास मदत झाली. अशाप्रकारे या काळात सातारा जिल्हयातील बहुसंख्य काँग्रेसजनांवर टिळकांचा प्रभाव होता.[५७]

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव हे जनजागृती व राष्ट्रवादी आंदोलनाचे एक प्रभावी साधन म्हणून उपयोगात आणले. या चळवळीला 'गणेश मेळे' नामक कला पथकांची जोड देऊन मेळयांच्या माध्यमातून राष्ट्रीय गीते, पोवाडे, पथनाटय व नाटकांचे प्रयोग करून लोकांची देशभक्ती जागृत करण्याचा उपक्रम हाती घेतले.

१९०५ मध्ये महाराष्ट्रातील ७२ शहरांमध्ये गणेशोत्सव सोहळा सुरू झाला. त्यामध्ये सातारा जिल्हयाचाही समावेश होता. त्या सोहळयांतून सरकारविरोधी वातावरण तयार करण्यास मदत झाली. त्यामुळे सरकारने त्याव बंदी घालण्याचा प्रयत्न केला.[५८]

लोकमान्य टिळकांनी मे, १९१६ मध्ये महारााराष्ट्रात होमरूल लीगची स्थापना केली. यास सातारा जिल्हयात अनुकूल प्रतिसाद मिळाला. साताऱ्याचा युनियन क्लब, शिवाजी क्लब या राष्ट्रवादी संघटनांच्या वतीने टिळकांचा सत्कार करण्यात आला.[५९] तेव्हापासून सातारा जिल्हयात होमरूल लीगचा प्रसार झाला. १९१७ मध्ये आप्पासाहेब आळतेकर, दिगंबरपंत गोखले यांनी तासगाव, इस्लामपूर, कराड, विटा भागात होमरूल लीगच्या शाखा स्थापन केल्या. अच्युतराव कोल्हटकर, भाऊसाहेब सोमण, अष्टपुत्रे यांनी रहिमतपूर, माहुली, पाटखळ, बोरखळ, पाटण परिसरात प्रचारकार्य केले.[६०]

### ब) महात्मा गांधी युग

सातारा जिल्हयाने महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या स्वातंत्र्य संग्रामात सहभाग घेतला होता. त्यामध्ये असहकार आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी सातारा व वाई येथे राष्ट्रीय पाठशाळा स्थापना केल्या गेल्या. कराड, मसूर व रहिमतपूर येथे राष्ट्रीय प्राथमिक शाळा सुरू झाल्या. आप्पासाहेब आळतेकर, साताऱ्याचे अष्टपुत्रे, यशवंत देशपांडे, गोविंद श्रोत्री, मारूलकर यांनी वकीलीचा व्यवसाय सोडला. तासगाव तालुक्यात डॉ. दातार व चिंतोपंत काळेंच्या नेतृत्वाखाली बारा लवाद न्यायालये स्थापन झाली होती. याच काळातील मुळशी सत्याग्रहात सातारचे काकासाहेब मारूलकर सहभागी झाले होते. खेडयापाडयात दारूबंदी व खादीचा प्रचार सुरू झाला होता. नोव्हेंबर, १९२१ मध्ये प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या भारतातील आगमनावर बहिष्कार घालण्याच्या निमित्ताने ठिकठिकाणी हरताळ पाळण्यात आले. नाथ, घाणेकर, वा. वि. आठल्ये, रा. ग. सोमण, ग. ह. खरे, दादासाहेब करंदीकर, आप्पासाहेब आळतेकर इत्यादींनी या आंदोलनात सहभाग घेतलेला होता.[६१]

सविनय कायदेभंग आंदोलनात डॉ. वासुदेव आठल्ये, पंढरीनाथ घाणेकर, आचार्य शं. द. जावळेकर, बुवा गोसावी, बाबुराव साखळकर, हणमंत महाजनी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, निळकंठ घाणेकर, रामचंद्र सोमण, जी. डी. साने इत्यादी कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता. यात सुत कताई व खादी कार्यास प्रोत्साहन देण्यावर भर दिला होता. गांधीजींनी सुरू

केलेल्या मिठाच्या सत्याग्रहात दांडी यात्रेसाठी सातारा जिल्हयातील अनेक जण सहभागी झाले होते. या आंदोलनाचे पडसाद सातारा, कराड, वाई, तासगाव, इस्लामपूर, रहिमतपूर, दहिवडी, कोरेगाव, शिराळा पेठेतील बिळाशी येथे उमटले होते. बिळाशी येथे तर मोठे बंड घडून आले. त्यास 'बिळाशीचे बंड' असे म्हणतात.[६२]

राष्ट्रीय काँग्रेसने 'छोडो भारत' चा ठराव मंजूर केला. त्याच दिवशी मुंबईतच सातारकरांच्या भूमिगत कारवायांचा प्रारंभ झाला. भारतातील शेकडो काँग्रेस प्रतिनिधी मुंबई अधिवेशनानंतर आपापल्या भागात परत गेले. मात्र सातारा भागातील प्रतिनिधींनी मुंबई शहरातच राहून काँग्रेस पुढाऱ्यांशी चर्चा करून मग साताऱ्यात पोहोचले. सातारा जिल्हयातील 'छोडो भारत' क्रांतीला गांधीवादी आकृतिबंधानुसार स्वरूप नव्हते. त्यास हिंसक व दहशतवादी स्वरूप होते. सातारा जिल्हयात शंकरराव देव, रा. ग. सोमण, पंडित दिनकरशास्त्री कानडे, व्यंकटराव पवार यांनी हे आंदोलन सुरू केले. क्रांतिसिंह नाना पाटील यांनी प्रतिसरकारची स्थापना करून इंग्रजांना शह दिला. यात तारायंत्र तोडणे, रेल्वे रूळ उखडणे, रेल्वे लुटणे, सरकारी खजिने लुटणे अशा प्रकारचे उपक्रम राबविण्यात आले.[६३]

सातारा जिल्हयात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली निर्माण झालेल्या प्रतिसरकारने स्वतःचे कोर्ट चालविले, सामाजिक स्वरूपाची कामे केली. इंग्रजांना जिल्हयातून हुसकावून लावण्यासाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न केले. जून, १९४५ मध्ये ब्रिटीश सरकारने राजकीय कैदीची मुक्तता केली. अशाप्रकारे सातारच्या प्रतिसरकारने सातारा जिल्हयात दिलेले योगदान महत्त्वपूर्ण आहे.[६४]

१५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. ०१ नोव्हेंबर, १९५६ रोजी द्विभाषिक मुंबई राज्याची निर्मिती झाली. परंतु मराठी व गुजराती लोकांमध्ये भावनिक ऐक्य निर्माण झाले नाही. केंद्र शासनाने गुजरातची बाजू घेतल्याने संयुक्त महाराष्ट्र चळवळ सुरू झाली. त्यातून १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. मुंबई महाराष्ट्राची राजधानी बनली. सातारा जिल्हयाचे नेते यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले. राज्याच्या व राष्ट्राच्या राजकारणात सातारा जिल्हयातील ज्या व्यक्तींनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविला होता. त्यामध्ये श्री. यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई,

यशवंतराव मोहिते, बॅरिस्टर बाबासाहेब भोसले, दादासाहेब जगताप, आनंदराव चव्हाण व अभयसिंहराजे भोसले इत्यादींचे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

## १.१७ कोरेगाव तालुक्याची इतर तालुक्यांशी तुलना

सातारा जिल्हयाचा राजकीय इतिहास पाहत असताना त्यातील सर्व भागाची माहिती मिळते की ज्याप्रमाणे मध्ययुगीन काळातील सातारा जिल्हा आदिलशहा, निजामशहा, पुन्हा आदिलशहा, मराठे, मुघल व पुन्हा मराठे यांच्या अंमलाखाली होता. या सत्तांनी सातारच्या भूप्रदेशावर सत्ता गाजविलेली दिसून येते. मध्ययुगात विशेषतः शिवपूर्वकाळ व शिवकाळात सातारा हा प्रदेश 'वायदेशात' मोडत होता. 'वायदेश' म्हणजेच वाई शहरापासून ते खटाव माणपर्यंतचा संपूर्ण प्रदेश होय. या प्रदेशात सातारा जिल्हयातील जवळजवळ सर्वच जिल्हयाचा समावेश होत होता. यामध्ये कोरेगाव तालुकाही होता. यावरून असे स्पष्ट होते की, ज्याप्रमाणे वाईवर वरील सत्ताधीशांची सत्ता होती. त्याचप्रमाणे कोरेगाव तालुक्यावरही वरील सत्ता राज्य करीत असल्याचे स्पष्ट होते. म्हणजेच मध्ययुगीन काळातील वाई, सातारा यासारख्या तालुक्यांशी कोरेगाव तालक्याची तुलना केली असता असे आढळून येते की, तिन्हीही ठिकाणी एकसारखीच सत्ता वेळोवळी दिसून येते. कारण हा सर्व भाग वायदेशात मोडत होता. पेशवे काळातसुद्धा सातारा, वाई व कराड येथे जशी परिस्थिती होती तशीच परिस्थिती कोरेगाव तालुक्यातही असल्याचे स्पष्ट होते. फरक एवढाच होता की, वाई येथील कारभार करणारे रास्ते सरदार सातारच्या छत्रपतीच्या अधिपत्याखाली राज्यकारभार पाहत होते. तर इतरत्र मात्र थेट सातारच्या छत्रपतींची सत्ता होती. त्यामुळे कोरेगाव तालुक्यातही छत्रपतींची सत्ता होती हे स्पष्ट होते.[६५]

## १.१८ समारोप

इ. स. १८४८ मध्ये सातारा जिल्हयाचे ११ शासकीय भाग होते. स्वातंत्र्यानंतर या संस्थानाचे विलीनीकरण होऊन दोन भाग पाडण्यात आले. त्यानुसार सातारा जिल्हयाच्या सीमा पुन्हा बदलल्या होत्या. यात 'दक्षिण सातारा' हा पहिला विभाग असून त्याचे मुख्यालय सांगलीला होते. दुसरा विभाग 'उत्तर सातारा' असून याचे मुख्यालय सातारा हे होते. पुढे इ. स. १९६० मध्ये दक्षिण सातारा जिल्हयाचे नाव 'सांगली' ठेवण्यात आले. अशा प्रकारे सांगली जिल्हा सातारा जिल्हयापासून वेगळा करण्यात आला. सातारा जिल्हयात सातारा, महाबळेश्वर,

पाटण व फलटण हे चार उपविभाग पाडले आहेत. यामध्ये सातारा, कोरेगाव, जावळी, वाई, महाबळेश्वर, पाटण, कराड, फलटण, खटाव, दहिवडी (माण) व खंडाळा असे ११ तालुके आहेत.

सातारा जिल्हयास प्राचीन इतिहास हा प्रागैतिहासिक काळापासून सुरू होतो. प्राचीन काळातील अश्मयुग, मध्याश्मयुग, उत्तर मध्याश्मयुग, नवाश्मयुग व ताम्रपाषाणयुगाचे अवशेष मोठया प्रमाणात उपलब्ध झाले आहेत. त्याचप्रमाणे ऐतिहासिक काळात महाराष्ट्राप्रमाणे सातारा जिल्हयातही प्रगती होत गेली होती.

मध्ययुगीन काळात सातारा जिल्हयास फार महत्त्वाचे स्थान आहे. देवगिरीच्या यादव काळापासून ते पेशवेकाळापर्यंत ज्या ऐतिहासिक घडामोडी घडल्या त्याचे पडसाद सातारा जिल्हयात उमटलेले दिसून येतात. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना व विस्तार सातारा जिल्हयातच केला. तेव्हापासून सातारा जिल्हयाचे महत्त्व वाढत गेले. पेशवे काळात छत्रपती गादी सातारा ही असून ते राजधानीचे ठिकाण बनले होते. पेशव्यांनी पुणे येथून राज्यकारभार केला असला तरी ते सातारच्या छत्रपतीच्याच मार्गदर्शनाखाली हालचाली करीत असत.

आधुनिक कालखंडात सातारा जिल्हयाने १८५७ च्या उठावापासून भारतीय स्वातंत्र्य लढयात सक्रीय सहभाग घेऊन पुढे वंगभंग आंदोलन, सविनय कायदेभंग चळवळ, १९४२ च्या भारत छोडो चळवळीत मोठया प्रमाणावर सहभाग घेतल्याचे दिसून येते. स्वातंत्र्योत्तर कालखंडात संयुक्त महाराष्ट्र चळवळ, भारत–चीन युद्ध यामध्येही सातारा जिल्हयाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे सातारा जिल्हयास राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक वारसा आहे हे स्पष्ट होते.

## संदर्भग्रंथ


१. पाठक अरूणचंद्र (संपा.), 'महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सातारा जिल्हा', सुधारित आवृत्ती, १९९९, पृ. २

२. कित्ता, पृ. २

३. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, मार्च २००९, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. १

४. सेन्सस ऑफ इंडिया १९९१, सिरीज १४, महाराष्ट्र, पार्ट १२, सातारा जिल्हा सेन्सस, प्रायमरी सेन्सस अब्स्ट्रॅक्ट, मुंबई, १९९१, पृ. १५

५. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. ४

६. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २००९–१०, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. ३

७. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. २२

८. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, मार्च २००९, उपरोक्त, पृ. ३

९. तत्रैव, पृ. ५

१०. देगलूरकर गो. बं. यांचे डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट अँड रिसर्च इन्टिटयुट, पुणे, प्राचीन काळाविषयी लेख, पृ. २, ३

११. देव शां. भा., महाराष्ट्र एक पुरातत्वीय समालोचन, मुंबई, १९६८, पृ. ११०

१२. Malik S. C., Stone Age Industries of the Bombay and Satara District, Baroda, 1959, Page No. 34-42

१३. कित्ता, पृ. ४२

१४. Canningham, Stoops of Bharhut, Article No. 135

१५. मिराशी वा. वी., 'वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ', नागपूर, १९६८, पृ. ४६

१६. Mirashi V. V., The Rashtrakutas of Manpore, In Studies in Indology, Nagpur, 1968, Page No. 195-205

१७. पानसे मु. ग., 'यादवकालीन महाराष्ट्र', १९६३ पृ. ४२

१८. कित्ता, पृ. ८७

१९. Barges and Ferguson, Cave Temples of India, Page No. 217

२०. Naik J. V., New Indian Antiquery, Vol. – 9, 1947, page No. 296

२१. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. १०३

२२. Naravane M. S., Forts of Maharashtra, New Delhi, 1995, Page No. 152-153

२३. कित्ता, पृ. १५३

२४. Husen M. Tughlak Dynasty, Culcutta, 1963, Page No. 163

२५. कित्ता, पृ. ५९१

२६. कुंटे भ. ग., गुलशने इब्राहिमी (अनुवाद), महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८९, पृ. ५५८

२७. ब्रिग्जस् फेरिश्ता, खंड–२, पृ. २९६

२८. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. १११

२९. कित्ता, पृ .११७–११८

३०. कुलकर्णी सुमित्रा (प्रपाठक), मराठा काळ याविषयीचा लेख, पुणे विद्यापीठ, पुणे, पृ. ३

३१. शिवकालीन पत्रसारसंग्रह, पुणे, १९३०, पत्र क्र. ८८५, पृ. १८५

३२. आपटे द. वि., दिवेकर स. म. (संपा.), शिवचरित्र प्रदीप, जेधे करीना, पुणे, १९२५, पृ. ४२

३३. आपटे द. वि., दिवेकर स. म. (संपा.), शिवचरित्र प्रदीप, शिवापूर दप्तर यादी, पुणे, १९२५, पृ. ४२

३४. आपटे दिवेकर (संपा.), उपरोक्त जेधे करीना, पृ. ४५

३५. शिवचरित्र साहित्य खंड–६, पुणे, १९३७, पृ.६१, ६७

३६. सरदेसाई गो. स., मराठी रियासत, खंड–१, मुंबई, १९८८, पृ. २११

३७. कित्ता, पृ. २४४

३८. आपटे दिवेकर, उपरोक्त, पृ. २७

३९. Sardesai G. S., History of The Maratha's, Vol. 1, Mumbai, 1971, Page No. 274-276

४०. पगडी सेतु माधवराव (संपा.), मोगल–मराठा संघर्ष (फुतूहाते आलमगिरी), पुणे, १९६४, पृ. ७०, ७१
४१. सरदेसाई गो. स. 'मराठी रियासत' खंड–२, १९८८, पृ. २३५
४२. Kulkarni G. T., The Mughal- Maratha Relations, Twenty Five Faithful Cheers (1682-1707), Pune, 1983, Page No. 177
४३. कित्ता, पृ. १९३
४४. सरदेसाई गो .स. 'मराठी रियासत' खंड–३, मुंबई, १९८८, पृ. १२२
४५. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. १६०
४६. कित्ता, पृ. १६१
४७. सप्तर्षी–आमची शाहुनगरी नगरपालिका अहवाल १९५३–५४ पृ. २६
४८. ठाकरे के. सी., प्रतापसिंह छत्रपती आणि रंगो बापूजी, १९४८, पृ. ८०
४९. मराठी रियासत खंड–८, १९९२, पृ. ६२९–६३६
५०. कित्ता, पृ. ६४३,६४८
५१. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. १७०
५२. ठाकरे के. सी., उपरोक्त, पृ. ३५८–३६०
५३. माटे गो. रा., 'असा घडला जिल्हा सातारा', १९८८, पृ. १२२
५४. केळकर न. चि., गतगोष्टी, १९८३, पृ. २१३
५५. गोखले पु. पा., जागृत सातारा, १९३५, पृ. २८
५६. Cashman Richard, The Myth of the Lokmanya Tilak and Mass Politics in Maharashtra, Page No. 161
५७. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. १७८
५८. कॅशमन रिचर्ड, उपरोक्त, पृ. ८१
५९. Source Material for History of Freedom Movement, Vol. 2, Page 242
६०. गोखले पु. पा., उपरोक्त, पृ. ६९–७०
६१. कित्ता, पृ. ८४–९५
६२. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. १९८–१९९

६३. Bombay Archive Dept., Home Department (Spl.), File No. 800 (74) (14)-3, 1941-43

६४. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. २१७

६५. कोरडे डी. डी. (डॉ.), वाई शहराचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास (१९०० ते २०००), पीएच. डी. अप्रकाशित शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१२

# प्रकरण दुसरे

# कोरेगाव तालुक्याचा राजकीय इतिहास

## २.१ प्रस्तावना :

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत जसे महाराष्ट्राने महत्वाची कामगिरी पार पाडली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या राजकारणातही सातारा जिल्हा अग्रेसर आहे. सातारा जिल्हयात सन १८५७ च्या उठावापासून ते भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यतच्या काळात सातारा जिल्हयासह कोरेगाव तालुक्यातील अनेक क्रांतिकारकांनी सहभाग घेतलेला होता. यामध्ये सन १९४२ च्या चलेजाव आंदोलनात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या बरोबरीने कोरेगाव तालुक्यातील अनेक क्रांतिकारक सहभागी झाले होते. यावरूनच सातारा जिल्हयातील कोरेगाव येथील क्रांतिकारकांनी दिलेले योगदान सिद्ध होते. कोरेगाव तालुक्यातील अनेक क्रांतिकारकांनी दिलेल्या योगदानामुळे साताऱ्याचे नाव संपूर्ण महाराष्ट्रासह भारतात झाले. त्यात विशेषतः लढा गाजला तो सन १९४२ चा. क्रांतिसिंह नाना पाटील यांनी हा लढा प्रतिसरकार व पत्रीसरकार या दोन मार्गाने लढविला. हा लढा खूप गाजला होता. या लढयामुळेच सातारा जिल्हा हा क्रांतिकारकांचा जिल्हा म्हणून नावारूपास आला. यात कोरेगाव तालुक्याचाही समावेश होता. कोरेगाव तालुका हा सातारा जिल्हयात मोडतो तेव्हा सातारा जिल्हा हा स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये फार विस्तारित होता किंवा मुंबई प्रांतामध्ये आजच्या सांगली व सातारा या दोन जिल्हयांचा मिळून सातारा जिल्हा होत होता. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सातारा जिल्हा हा भौगोलिकदृष्टया विस्तृत प्रदेश होत असल्याने एवढया मोठया प्रदेशाचे प्रशासन करणे अवघड बनले तेव्हा या सातारा जिल्हयाचे १ ऑगस्ट, १९४९ रोजी विभाजन केले गेले. त्यातून या जिल्हयाचे उत्तर सातारा व दक्षिण सातारा असे दोन वेगवेगळे जिल्हे अस्तित्वात आले. तेव्हा कोरेगाव तालुका हा उत्तर साताऱ्यात मोडत होता.

स्वातंत्र्योत्तर काळातील कोरेगावचा राजकीय इतिहास पाहताना राजकीय घडामोडी त्यामध्ये लोकसभा व विधानसभा निवडणूकांची माहिती घेणार आहोत. याशिवाय कोरेगाव तालुका पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणूका याबाबतीतही माहिती घेणार आहे. या निवडणूकांची माहिती पाहत असताना त्यावेळची राजकीय स्थिती किंवा राजकारण कशा पद्धतीने खेळले जात होते. याचाही आढावा या प्रकरणात घेतला जाणार आहे. कोरेगाव

तालुक्यात ज्या राजकीय सुधारणा घडून आल्या त्यामार्फत तालुक्याचा विकास घडून येण्यास मदत झाली याचीही सविस्तर माहिती या प्रकरणात पाहणार आहोत.

## २.२ १९५२ पर्यतच्या कोरेगाव तालुक्यातील राजकीय घडामोडी

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि सातारा जिल्हयासह कोरेगाव तालुक्यात सर्वत्र आनंद साजरा केला गेला. २० नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे तत्कालीन सरसेनापती जनरल करीअप्पा यांनी कोरेगाव तालुक्यातील मुक्त झालेल्या सैनिकांना भेट दिली. त्यावेळचे सातारा जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब देसाई यांनी पुढाकार घेतल्यामुळे त्यावेळी सातारला पंधरा हजार मुक्त सैनिकांचा मेळावा जमलेला होता. यामध्ये कोरेगाव तालुक्यातील सैनिकांचाही समावेश होता.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राजकीय नेत्यांनी भारताच्या विकासाकडे लक्ष दिले. कोरेगाव तालुक्याचा राजकीय विकास व्हावा म्हणून राजकारणात सहभाग घेतला. २६ जानेवारी, १९५० पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या घटनेनुसार भारताचा राज्यकारभार सुरू झाला. सार्वत्रिक निवडणूका होऊन राजकीय नेते निवडले जाऊ लागले. कोरेगाव तालुक्यात लोकसभा, विधानसभा, नगरपरिषदा, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांच्या निवडणूका होऊन उमेदवार निवडले जाऊ लागले. त्याचबरोबर संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती संग्राम यामध्येही कोरेगाव तालुक्यातील कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता. तेव्हा आपण कोरेगाव तालुक्याचे राजकारण पाहण्यापूर्वी प्रथमतः संयुक्त महाराष्ट्र चळवळ व गोवा मुक्ती संग्राम याविषयी माहिती पाहू.

### २.२.१ कोरेगाव तालुक्याचा गोवा मुक्ती संग्राम व संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील सहभाग

भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले असले तरी भारतातील गोवा, दीव दमण आदी भाग अजूनही पोर्तुगिजांच्या वर्चस्वात होता. हा प्रदेश पोर्तुगीजांच्या वर्चस्वाखालून मुक्त करण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. यासाठी गोवा मुक्ती संग्राम समिती स्थापन करण्याचे निश्चित झाले. द. रा. कुलकर्णी मास्तर यांचे अध्यक्षतेखाली सातारा येथे गोवा मुक्ती संग्राम समितीची शाखा सुरू झाली. या समितीमार्फत बाळकृष्ण गणपतदास उर्फ बबनराव गुजर यांनी गोवा सत्याग्रहात तीन वेळा भाग घेतला. त्यात त्यांनी तुरूंगवास भोगला. त्याचबरोबर या गोवा मुक्ती संग्रामात मकबुल रेहमान शेख व नाथ घाणेकर आदीनींही भाग घेतला. गोवा मुक्ती सत्याग्रहाचे

आयोजन १५ ऑगस्ट १९५५ रोजी करण्यात आले होते. या सत्याग्रहासाठी नाथ घाणेकरांच्या बरोबर श्री. भाऊराव एकबोटे आणि श्री. केशवराव सदाशिव साठे या दोघांना पाठविण्यात आले. गोव्याच्या सरहद्दीवर सुरू झालेल्या या सत्याग्रहात पोर्तुगिजांनी केलेल्या गोळीबारात तीन ठिकाणी १०० पेक्षा जास्त माणसे मृत्युमुखी पडली. ही बातमी सातारा येथे समजताच १६ ऑगस्टच्या पहाटे पोर्तुगिजांचा निषेध करणारी फेरी काढण्यात आली. संध्याकाळी द. रा. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेत गांधी मैदानावर सभा आयोजित करून हजारो लोकांनी पोर्तुगिजांचा निषेध केला.[१]

### २.२.३ संयुक्त महाराष्ट्र चळवळ

काँग्रेस पक्षाने इंग्रजांकडे भारतात भाषावार प्रांतरचना करावी, ही मागणी स्वातंत्र्यापूर्वीच केली होती. परंतु १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले तरी भाषावार प्रांतरचना झाली नाही, म्हणून महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसने मराठी भाषेसाठी महाराष्ट्र राज्य निर्माण करण्याची मागणी काँग्रेस पक्षात मांडण्यास सुरूवात केली. परंतु भारत सरकार आणि अखिल भारतीय काँग्रेस कार्यकारिणीने त्याला नकार दिला. त्यामुळे मुंबई, बेळगांव, कारावार, निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण व्हावा, यासाठी महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसने महाराष्ट्रात जाहीर सभा घेण्यास आरंभ केला. इ. स. १९५६ मध्ये विदर्भ, मराठवाडा, मुंबई राज्यास जोडण्यास आले. पण गुजरात व महाराष्ट्राचे राज्य द्विभाषिक बनविण्यात आले. संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न भाषावार प्रांत रचना झाल्यानंतर मोठा गंभीर बनला होता. 'आपल्यावर अन्याय होत आहे. इतर प्रांतापेक्षा वेगळी नीती महाराष्ट्राबाबत वापरली जात आहे'. अशी भावना सर्वत्र निर्माण झाली होती.[२]

सन १९५६ साली सातारमध्ये गांधी मैदानावर काँग्रेस पक्षाच्या जाहीर सभेत काँग्रेसचे जुने जाणते नेते राजाराम केशव तथा राजाभाऊ पालकर व्यासपीठावर आले आणि म्हणाले की, 'संयुक्त महाराष्ट्र व्हावा, याच मताचे आपण सर्वजण आहोत, महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसने आवाहन केल्याप्रमाणे काँग्रेसजन आपापल्या पदाचे राजीनामे देणार आहेत. सातारा नगरपालिकेच्या सर्व सभासदांनी नगरपालिकेच्या सदस्यत्वाचे राजीनामे देण्याचा ठराव बिनविरोध मंजूर केला आहे. नगराध्यक्ष म्हणून सर्वांनी माझ्याकडे राजीनामे दिलेले आहेत. मी माझ्या राजीनाम्यासह सर्व राजीनामे माननीय जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्त करणार आहे. अशा

रितीने संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी राजीनामा देणारी सातारची नगरपालिका सर्वात पहिली आहे.'[३]

महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसने सुरू केलेल्या या चळवळीला अखिल भारतीय काँग्रेस पक्षाने धमकी देऊन शांत करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी काँग्रेस व्यतिरिक्त इतर सर्व पक्षांनी एकत्रित येऊन त्यांनी संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना केली. संयुक्त महाराष्ट्राच्या सातारा जिल्हा समितीचे अध्यक्षपदी व्ही. एन. पाटील यांची निवड झाली. केंद्र सरकारने यासाठी एका समितीची नेमणूक केलेली होती. कारण संयुक्त महाराष्ट्र पुनर्बांधणीची अडचण सोडविण्यासाठी या समितीचा अहवाल अतिशय अस्वस्थतेचा होता. त्यामध्ये मुंबईबरोबर संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीस नाकारले होते.

१० फेब्रुवारी, १९५६ रोजी अमृतसर येथे काँग्रेस पक्षाची परिषद पार पडली. त्यात द्विभाषा सूत्राला मान्यता मिळाली. यशवंतराव चव्हाण दोन भाषा असणाऱ्या (गुजरात व महाराष्ट्र) राज्याचे मुख्यमंत्री बनले. प्रतापगडावर उभारलेल्या छ. शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळयाचे अनावरण करण्यासाठी ७ नोव्हेंबर, १९५७ रोजी भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आले होते. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा जोर पंतप्रधानांना समजावा यासाठी संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे निदर्शने केली. त्यावेळी या निदर्शकांना प्रतापगडच्या अलिकडेच अडविले गेले. थंडीचे दिवस असतानाही शेकोटया पेटवून व घोषणा देत लोकांनी आपले प्रदर्शन मांडले. या लोकांना आचार्य अत्रे, एस. एम. जोशी, कॉ. डांगे, नाना पाटील, माधवराव बागल, केशवराव जेधे, शंकरराव मोरे आदि नेते मार्गदर्शन करीत होते. पोवाडे, गाणी, नकला व भाषणे याद्वारे निदर्शन रात्रभर सुरू होती. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीची तीव्रता पंडित नेहरूंना समजली. हजारो निदर्शकांना पंडित नेहरूंनी पाहिले, त्यावेळी त्यांना समजले की, या चळवळीचे लोण किती दूरवर पसरले आहे, याची जाणीव त्यांना झाली.[४]

यशवंतराव चव्हाण व श्रीमती इंदिरा गांधी यांना महाराष्ट्रातील या परिस्थितीची खात्री पटली. या दोघांनी पंडित जवाहरलाल नेहरूंच्या कानावर महाराष्ट्रातील जनतेच्या तीव्र भावना

घातल्या. पंडित नेहरूंनी संयुक्त महाराष्ट्राचा प्रस्ताव मान्य केला. त्यातूनच १ मे, १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले.[५]

## २.३ भारत व चीन युद्ध (१९६२)

भारतावर चीनने १९६२ मध्ये आक्रमण केले. यावेळी केंद्र सरकारच्या मदतीसाठी सातारा व कोरेगाव येथील जनता धावून गेली होती. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण भारताचे संरक्षणमंत्री झाले. लोकसभेच्या सातारा मतदार संघातून किसन महादेव वीर खासदार झाले होते. विधानसभा कोरेगाव मतदार संघातील आमदार श्री. तुषार पांडुरंग पवार महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात मंत्री बनले होते. या सर्वांनी सर्व देशात सातारा व कोरेगावचा परिचय करून दिला होता.[६]

## २.४ भारत पाकिस्तान युद्ध (१९६५)

पाकिस्तानने भारतावर सन १९६५ मध्ये हल्ला केल्याने भारत पाकिस्तान युद्ध सुरू झाले. त्यावेळी सातारा जिल्हयातील वीर शरद नारायण राजगुरू, लान्स नाईक लक्ष्मण किर्दत, कॅप्टन वसंतकुमार चव्हाण या सैनिकांनी वीर मरण पत्करले. कॅप्टन वसंतकुमार चव्हाण यांनी केलेल्या पराक्रमाबद्दल सरकारने मरणोत्तर गौरवपदक देवून त्यांचा गौरव केला.

भारत–पाकिस्तान युद्ध संपल्यावर युद्धावरून रजेवर परतलेल्या तीनशे पन्नास सैनिकांचा सत्कार करण्यात आला. सातारा येथील संरक्षण समितीच्या अध्यक्षा छत्रपती सुमित्राराजे भोसले यांनी सर्वाचा गौरव केला आणि देशावर पुन्हा संकट आले तर यापेक्षा जास्त पराक्रम करण्याचा आशीर्वाद दिला.[७]

## २.५ १९५२ पूर्वीच्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूका

सन १९५२ च्या सार्वत्रिक निवडणूकीपासून विधानसभेचे स्वतंत्र मतदार संघ बनविण्यात आले होते त्यापूर्वी मुंबई विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीची सुरूवात इ. स. १९३७ पासून सुरू झाली होती. या निवडणुकीत इ. स. १९३७ ते १९५२ या काळात झालेल्या विधानसभा निवडणुकीत निवडून आलेल्या सदस्यांची माहिती पुढीलप्रमाणे :

**मुंबई विधानसभा सार्वत्रिक निवडणूक उत्तर सातारातील विजयी उमेदवार व त्यांचा पक्ष (इ. स. १९३७ ते १९४६)**

| अ.नं. | उमेदवाराचे नाव | पक्ष |
|---|---|---|
| १. | सर कूपर धनजीशा बोमनजी | अपक्ष |
| २. | श्री. साठे शंकर हरी | काँग्रेस |
| ३. | श्री. शिंदे बाजीराव जगदेवराव | काँग्रेस |
| ४. | श्री. सावंत खंडेराव सखाराम | अपक्ष[८] |

(मुंबई विधानसभा निवडणूक अहवाल – १९३७)

**मुंबई विधानसभा सार्वत्रिक निवडणूक उत्तर सातारातील विजयी उमेदवार व त्यांचा पक्ष (इ. स. १९४६ ते १९५२)**

| अ.नं. | उमेदवाराचे नाव | पक्ष |
|---|---|---|
| १. | श्री. तपासे गणपती देवजी | काँग्रेस |
| २. | श्री. गोसावी दत्तात्रय कृष्णा | काँग्रेस |
| ३. | श्री. शिंदे बाजीराव जगदेवराव | काँग्रेस |
| ४. | श्री. सिंहासने गौरीहर एकनाथ | काँग्रेस[९] |

(मुंबई विधानसभा निवडणूक अहवाल – १९४६)

**सन १९५१–५२ ची सार्वत्रिक विधानसभा निवडणूक :**

भारतीय राज्यघटना तयार झाल्यानंतर सन १९५१–५२ ची पहिलीच सार्वत्रिक निवडणूक झाली. या सार्वत्रिक विधानसभा निवडणूकीच्या निमित्ताने पारतंत्र्यातील लोकांना स्वतंत्र होऊन पहिल्यांदाच मतदानाचा अधिकार मिळाला होता. भारतीय राज्यघटनेनुसार लोकशाही पद्धतीने प्रथमतःच निवडणूका होत असल्याने लोकांमध्ये एक प्रकारची उत्सुकता लागून राहिली होती. स्वातंत्र्यपूर्व काळात भारताच्या स्वातंत्र्य लढयामध्ये काँग्रेसने आपली पकड घट्ट केली होती. तरीही सातारा जिल्हयात मात्र शेतकरी कामगार पक्षाची ताकद होती. महाराष्ट्र, गुजरात व कर्नाटक अशा त्रिभाषिक मुंबई प्रांताच्या या निवडणूकीचे पडसाद सातारा जिल्हयात उमटले होते. स्वातंत्र्यानंतर प्रथमच लोकशाही मार्गाने लोकप्रतिनिधी निवडून देण्याच्या प्रक्रियेबाबत जनता अजाण होती. त्यामुळे मतदानाची टक्केवारी खूप कमी होती.

सातारा जिल्हयात शेतकरी कामगार पक्ष स्थापन होऊन त्यामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील, श्री. शंकरराव मोरे, श्री. केशवराव जेधे, कर्मवीर भाऊराव पाटील यासारखी अनुभवी नेतेमंडळी सहभागी झाली होती. त्यामुळे या काळात काँग्रेस पक्षात श्री. यशवंतराव चव्हाण यांचे काँग्रेस पक्षातील स्थान बळकट होत गेले. श्री. यशवंतराव चव्हाणांनी आलेल्या संधीचा फायदा घेऊन प्रथमतः सातारा जिल्हयामध्ये व नंतर महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये आपले स्थान बळकट केलेले या निवडणूकांमधून जाणवते. या विधानसभा निवडणूकीमध्ये सातारा जिल्हयातून एकूण दहा मतदारसंघ होते. या मतदार संघातून एकूण अकरा आमदारांची निवड होणार होती. या अकरा आमदारांपैकी आठ आमदार काँग्रेस पक्षाचे, दोन शेकापचे तर एक कामगार किसान पक्षाचा उमेदवार निवडून आला. या निवडणूकीमध्ये विधानसभा निवडणुकीत सातारा जिल्हयातील कोरेगाव तालुक्यात सन १९५१–५२ साली झालेल्या पहिल्याच सार्वत्रिक निवडणूकीने जिल्हयाचे राजकारणही ढवळून निघाले होते.

**विधानसभा निवडणूक १९५१**

**कोरेगाव मतदारसंघ (१६०)**

| अ. क्र. | एकूण मतदार | एकूण मतदान | वैध मतदान | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | ५५०६८ | २९६७३ | २९६७३ | ५३.८८ |

**उमेदवारनिहाय मतदान यादी (कोरेगाव)**

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. घार्गे शंकरराव गणपतराव | इंडियन नॅशनल काँग्रेस | ९११२ | ३०.७१ |
| ०२ | श्री. बोराटे पांडुरंग कोंडीबा | समाजवादी पार्टी | ४५३६ | १५.२९ |
| ०३ | श्री. पवार तुषार पांडुरंग | कामगार किसान पक्ष | ३२८० | ११.०५ |
| ०४ | श्री. कुलकर्णी गणेश रामचंद्र | अपक्ष | २९३३ | ९.८८ |
| ०५ | श्री. विचारे केशव विश्राम | अपक्ष | २५०२ | ८.४३ |
| ०६ | श्री. म्हेत्रस दत्तात्रय बळवंत | पीझंटस् अँड वर्कर्स पार्टी | २२३८ | ७.५४ |
| ०७ | श्री. माने रघुनाथराव आनंदराव | अपक्ष | २०९१ | ७.०५ |
| ०८ | श्री. पाटील रामराव दादासाहेब | अपक्ष | १४०२ | ४.७२ |
| ०९ | श्री. घोरपडे सोपानराव कुंडलिक | अपक्ष | ८२९ | २.७९ |
| १० | श्री. काटकर नागेश मारूती | अपक्ष | ७५० | २.५३[१०] |

सातारा जिल्हयातील कोरेगाव विधानसभा मतदारसंघ (१६०) यामधील निवडणूक सन १९५१ मध्ये झाली. या निवडणुकीत एकूण मतदार म्हणून नोंद झालेल्या लोकांची संख्या ५५०६८ एवढी होती. परंतु प्रत्यक्षात २९६७३ एवढेच मतदान झाले. विशेष म्हणजे भारतीय राज्यघटनेनुसार ही पहिलीच निवडणूक होणार होती. तरीही जेवढया लोकांनी मतदान केले ते सर्व मतदान वैध झाले. यात एकही मत बाद झाले नाही. त्यामुळे मतदानाची टक्केवारी ही ५३.८८ एवढी झालेली पहावयास मिळते.

या निवडणूकीसाठी एकूण १० उमेदवार उभे राहिले होते. त्यामध्ये सहा उमेदवार हे अपक्ष म्हणून निवडणूक लढवित होते. तर बाकीचे चार उमेदवार हे आपल्या पक्षामार्फत उभे राहिले होते. या निवडणुकीत इंडियन नॅशनल काँग्रेसतर्फे उभे राहिलेले उमेदवार श्री. घार्गे शंकरराव गणपतराव हे सर्वात जास्त मते म्हणजेच ९११२ मते मिळवून विजयी झाले होते. त्यामुळे कोरेगाव विधानसभेचे पहिले आमदार होण्याचा मान श्री. घार्गे शंकरराव गणपतराव यांना मिळाला होता. तर सर्वात कमी मते श्री. काटकर नागेश मारूती हे अपक्ष उमेदवार यांना केवळ ७५० मते मिळाली होती. अशाप्रकारे कोरेगाव विधानसभा मतदार संघात या निवडणूका उत्तम रितीने पार पडून आमदार म्हणून आपला प्रतिनिधी तेथील जनतेने निवडून दिलेला होता.

## विधानसभा निवडणूक १९५७

## कोरेगाव मतदारसंघ (२०६)

| अ.क्र. | एकूण मतदार | एकूण मतदान | वैध मतदान | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | ५५००० | ३१२१२ | ३१२१२ | ५६.७५ |

## उमेदवारनिहाय मतदान यादी

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. माने विश्वासराव विठ्ठलराव | इंडियन नॅशनल काँग्रेस | १३११० | ४२.०० |
| ०२ | श्री. देशमुख दिनकरराव दगडोबा | अपक्ष | १२१९२ | ३९.०६ |
| ०३ | श्री. फाळके राजाराम व्यंकट | अपक्ष | ५९१० | १८.९४[११] |

सातारा जिल्हयातील कोरेगाव विधानसभा मतदारसंघ (२०६) यामधील निवडणूक सन १९५७ मध्ये झाली. या निवडणुकीत एकूण मतदार म्हणून नोंद झालेल्या लोकांची संख्या ५५००० एवढी होती. परंतु प्रत्यक्षात ३१२१२ एवढेच मतदान झाले. या निवडणुकीत जेवढया

लोकांनी मतदान केले ते सर्व मतदान वैध झाले. यात एकही मत बाद झाले नाही. त्यामुळे मतदानाची टक्केवारी ही ५६.७५ एवढी झालेली पहावयास मिळते.

या निवडणूकीसाठी एकूण ०३ उमेदवार उभे राहिले होते. त्यामध्ये दोन उमेदवार हे अपक्ष म्हणून निवडणूक लढवित होते. तर श्री. माने विश्वासराव विठ्ठलराव हे इंडियन नॅशनल कॉँग्रेस या पक्षामार्फत उभे राहिले होते. या निवडणुकीत इंडियन नॅशनल कॉँग्रेसतर्फे उभे राहिलेले उमेदवार श्री. माने विश्वासराव विठ्ठलराव हे सर्वात जास्त मते म्हणजेच १३११० मते मिळवून विजयी झाले होते. त्यामुळे कोरेगाव विधानसभेचे दुसरे आमदार होण्याचा मान श्री. माने विश्वासराव विठ्ठलराव यांना मिळाला होता. त्यांच्या बरोबरीने निवडणूक लढविलेले अपक्ष उमेदवार श्री. देशमुख दिनकरराव दगडोबा यांना एकूण १२१९२ इतकी मते मिळाली होती. त्यामुळे या दोघांच्यात मोठया प्रमाणावर चुरस झालेली होती. परंतु यात श्री. देशमुख दिनकरराव दगडोबा यांना पराभव स्वीकारावा लागला होता. तर सर्वात कमी मते श्री. फाळके राजाराम व्यंकट असून त्यांना एकूण ५९१० मते मिळाली होती. अशाप्रकारे कोरेगाव विधानसभा मतदार संघात या निवडणूका उत्तम रितीने पार पडून आमदार म्हणून आपला प्रतिनिधी तेथील जनतेने निवडून दिलेला होता.

**विधानसभा निवडणूक १९६२**

**कोरेगाव मतदारसंघ (९९)**

| **अ.क्र.** | **एकूण मतदार** | **एकूण मतदान** | **वैध मतदान** | **मतदानाची टक्केवारी** |
|---|---|---|---|---|
| ०१ | ६७१९० | ४३८०९ | ४०४७१ | ६५.२० |

**उमेदवारनिहाय मतदान यादी (कोरेगाव)**

| **अ.क्र.** | **उमेदवाराचे नाव** | **पक्ष** | **प्राप्त मते** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. पवार तुषार पांडुरंग | इंडियन नॅशनल कॉँग्रेस | २०६०९ | ५०.९२ |
| ०२ | श्री. भोसले विठ्ठल पांडुरंग | अपक्ष | ८१०७ | २०.०३ |
| ०३ | श्री. कदम काकोजी कृष्णा | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया | ६२३५ | १५.४१ |
| ०४ | श्री. धुमाळ पिलाजीराव धोंडीराम | अपक्ष | १८६४ | ०४.६१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०५ | श्री. बोराटे पांडुरंग कोंडीबा | प्रजा समाजवादी पार्टी | १६३७ | ०४.०४ |
| ०६ | श्री. देशमुख दिनकरराव दगडोबा | अपक्ष | ७३३ | ०१.८१ |
| ०७ | श्री. शिंदे मुगुटराव गणपती | अपक्ष | ५२२ | ०१.२९ |
| ०८ | श्री. चव्हाण भगवान बयाजी | अपक्ष | ४१७ | ०१.०३ |
| ०९ | श्री. बर्गे रामराव सुभानराव | अपक्ष | ३४७ | ०.८६[१२] |

सातारा जिल्हयातील कोरेगाव विधानसभा मतदारसंघ (९९) यामधील निवडणूक सन १९६२ मध्ये झाली. या निवडणुकीत एकूण मतदार म्हणून नोंद झालेल्या लोकांची संख्या ६७१९० एवढी होती. परंतु प्रत्यक्षात ४३८०९ एवढेच मतदान झाले. विशेष म्हणजे या निवडणुकीत ४०४७१ मतदान वैध झाले. त्यामुळे मतदानाची टक्केवारी ही ६५.२० एवढी झालेली पहावयास मिळते.

या निवडणूकीसाठी एकूण ०९ उमेदवार उभे राहिले होते. या निवडणुकीत इंडियन नॅशनल काँग्रेस, कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया, प्रजा समाजवादी पार्टी आणि सहा उमेदवार हे अपक्ष म्हणून निवडणूक लढवित होते. या निवडणुकीत इंडियन नॅशनल काँग्रेसतर्फे उभे राहिलेले उमेदवार श्री. पवार तुषार पांडुरंग हे सर्वात जास्त मते म्हणजेच २०६०९ मते मिळवून विजयी झाले होते. त्यामुळे कोरेगाव विधानसभेचे तिसरे आमदार होण्याचा मान श्री. पवार तुषार पांडुरंग यांना मिळाला होता. तर सर्वात कमी मते अपक्ष उमेदवार श्री. बर्गे रामराव सुभानराव असून त्यांना एकूण ३४७ मते मिळाली होती.

## विधानसभा निवडणूक १९६७
## कोरेगाव मतदारसंघ (२४५)

| अ. क्र. | एकूण मतदार | एकूण मतदान | वैध मतदान | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | ७११८७ | ५१३८७ | ४८०२३ | ७२.१९ |

## उमेदवारनिहाय मतदान यादी

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. फाळके ए. एन. | इंडियन नॅशनल काँग्रेस | ३७५४७ | ७८.१९ |
| ०२ | श्री. देशपांडे पी. एन. | प्रजा समाजवादी पार्टी | १०४७६ | २१.८१[१३] |

सातारा जिल्हयातील कोरेगाव विधानसभा मतदारसंघ (२४५) यामधील निवडणूक सन १९६७ मध्ये झाली. या निवडणुकीत एकूण मतदार म्हणून नोंद झालेल्या लोकांची संख्या ७११८७ एवढी होती. परंतु प्रत्यक्षात ५१३८७ एवढेच मतदान झाले. विशेष म्हणजे या निवडणुकीत ४८०२३ मतदान वैध झाले. त्यामुळे मतदानाची टक्केवारी ही ७२.१९ एवढी झालेली पहावयास मिळते.

ही निवडणूक इंडियन नॅशनल कॉंग्रेस व प्रजा समाजवादी पार्टी या दोनच पक्षांनी ही निवडणूक लढविली होती. या निवडणूकीचे विशेष म्हणजे एकही उमेदवार अपक्ष म्हणून उभा राहिलेला नव्हता. या निवडणुकीत इंडियन नॅशनल कॉंग्रेसतर्फे उभे राहिलेले उमेदवार श्री. फाळके ए. एन. हे सर्वात जास्त मते म्हणजेच ३७५४७ मते मिळवून विजयी झाले होते. त्यामुळे कोरेगाव विधानसभेचे चौथे आमदार होण्याचा मान श्री. फाळके ए. एन. यांना मिळाला होता. तर त्यांचे प्रतिस्पर्धी प्रजा समाजवादी पार्टीचे उमेदवार श्री. देशपांडे पी. एन. यांना १०४७६ एवढी मते मिळाली होती. त्यामध्ये त्यांचा पराभव झालेला होता. अशाप्रकारे या निवडणुकीत रहिमतपूरच्या डॉ. पुरूषोत्तम देशपांडे यांनी कोरेगावातून संयुक्त समाजवादी पक्षातर्फे निवडणूक लढवली. कॉंग्रेसच्या आनंदराव फाळकेंनी त्यांचा पराभव केला.

### विधानसभा निवडणूक १९७२

### कोरेगाव मतदारसंघ (२४५)

| अ. क्र. | एकूण मतदार | एकूण मतदान | वैध मतदान | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | ७११८७ | ५१३८७ | ४८०२३ | ७२.१९ |

### उमेदवारनिहाय मतदान यादी

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. बर्गे दत्ताजीराव बी. | अपक्ष | ४१३०७ | ६९.१७ |
| ०२ | श्री. फाळके वसंतराव आनंदा | इंडियन नॅशनल कॉंग्रेस | १९३२२ | ३३.००[१४] |

सातारा जिल्हयातील कोरेगाव विधानसभा मतदारसंघ (२४५) यामधील निवडणूक सन १९७२ मध्ये झाली. या निवडणुकीत एकूण मतदार म्हणून नोंद झालेल्या लोकांची संख्या ७११८७ एवढी होती. परंतु प्रत्यक्षात ५१३८७ एवढेच मतदान झाले. विशेष म्हणजे या

निवडणुकीत ४८०२३ मतदान वैध झाले. त्यामुळे मतदानाची टक्केवारी ही ७२.१९ एवढी झालेली पाहावयास मिळते. पुढे ज्योत्याजीराव फाळकेंचे चिरंजीव व शालिनीताईं पाटलांचे बंधू असणाऱ्या वसंतराव फाळकेंना डावलून १९७२ साली काँग्रेसने दत्ताजीराव बर्गेंना उमेदवारी दिली यामुळे वसंतराव फाळकेंनी बंडखोरी केली. परंतु त्यांचा पराभव झाला.

ही निवडणूक अपक्ष उमेदवार श्री. दत्ताजीराव बी. बर्गे यांनी जिंकली. या निवडणूकीचे विशेष म्हणजे कोरेगाव तालुक्यातील अपक्ष उमेदवाराने प्रथमतःच जिंकली. तसेच या उमेदवाराने इंडियन नॅशनल काँग्रेसचे उमेदवार श्री. फाळके वसंतराव आनंदा यांचा ३२०८५ एवढया मतांनी पराभव केला. त्यामुळे कोरेगाव विधानसभा मतदार संघात इंडियन नॅशनल काँग्रेसचे महत्व या काळात संपुष्टात आलेले दिसून येते.

## विधानसभा निवडणूक १९७८
## कोरेगाव मतदारसंघ (२६१)

| अ.क्र. | एकूण मतदार | एकूण मतदान | वैध मतदान | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | ९६९३९ | ७२०१८ | ७०५३४ | ७४.२९ |

## उमेदवारनिहाय मतदान यादी

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. जगताप शंकरराव चिमाजी | इंडियन नॅशनल काँग्रेस | ३०७६५ | ४३.६२ |
| ०२ | श्री. माने पांडुरंग निळकंठराव उर्फ बाबासाहेब | अपक्ष | २४७४५ | ३५.०८ |
| ०३ | श्री. भंडारी शांतीलाल राजाराम | जनता पार्टी | ९०७५ | १२.८७ |
| ०४ | श्री. गुरव बाबुराव नारायण | अपक्ष | २६५६ | ०३.७७ |
| ०५ | श्री. पुराणिक जनार्दन धोंडीराज | अपक्ष | २३०० | ०३.२६ |
| ०६ | श्री. तळेकर विठ्ठलराव शिवराम | अपक्ष | ९३३ | ०१.४१[१५] |

सातारा जिल्हयातील कोरेगाव विधानसभा मतदारसंघ (२६१) यामधील निवडणूक सन १९७८ मध्ये झाली. या निवडणुकीत एकूण मतदार म्हणून नोंद झालेल्या लोकांची संख्या ९६९३९ एवढी होती. परंतु प्रत्यक्षात ७२०१८ एवढेच मतदान झाले. विशेष म्हणजे या

निवडणुकीत ७०५३४ मतदान वैध झाले. त्यामुळे मतदानाची टक्केवारी ही ७४.२९ एवढी झालेली पहावयास मिळते.

ही निवडणूक इंडियन नॅशनल काँग्रेसचे उमेदवार श्री. जगताप शंकरराव चिमाजी व अपक्ष उमेदवार श्री. माने पांडुरंग निळकंठराव उर्फ बाबासाहेब या दोघांच्यात मोठया प्रमाणात चुरस होऊन इंडियन नॅशनल काँग्रेसचे उमेदवार श्री. शंकरराव जगताप हे ६०२० एवढया मतांनी निवडून आले त्यामुळे पुन्हा इंडियन नॅशनल काँग्रेसला सत्तेवर येण्यास संधी मिळाली होती. मागील निवडणुकीत झालेल्या पराभवाचे उट्टे भरून काढण्याची संधी या निवडणुकीत मिळाली होती. वरील दोन उमेदवाराशिवाय जनता पार्टीचे उमेदवार श्री. भंडारी शांतीलाल राजाराम यांना ९०७५ मते मिळाली तर अपक्ष म्हणून श्री. गुरव बाबुराव नारायण, श्री. पुराणिक जनार्दन धोंडीराज व श्री. तळेकर विठ्ठलराव शिवराम यांना अनुक्रमे २६५६, २३०० व ९३३ मते मिळाली होती. परंतु या तिघांचाही पराभव या निवडणुकीत झालेला पाहावयास मिळतो.

**विधानसभा निवडणूक १९८०**
**कोरेगाव मतदारसंघ (२६१)**

| अ.क्र. | एकूण मतदार | एकूण मतदान | वैध मतदान | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | १०९३२४ | ६५०३७ | ६३२९९ | ५९.४९ |

**उमेदवारनिहाय मतदान यादी**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. जगताप शंकरराव चिमाजी | इंडियन नॅशनल काँग्रेस (U) | ३४८२९ | ५५.०२ |
| ०२ | श्री. बर्गे दत्ताजीराव भाऊसाहेब | इंडियन नॅशनल काँग्रेस(I) | २३२२७ | ३६.६९ |
| ०३ | श्री. माने गुलाबराव रामचंद्र | अपक्ष | ३४४६ | ०५.४४ |
| ०४ | श्री. मोरे जयकुमार जगन्नाथ | अपक्ष | १३०४ | ०२.०६ |
| ०५ | श्री. बर्गे शंकरराव हरिबा | अपक्ष | ४९३ | ०.७८[१६] |

सातारा जिल्हयातील कोरेगाव विधानसभा मतदारसंघ (२६१) यामधील निवडणूक सन १९८० मध्ये झाली. या निवडणुकीत एकूण मतदार म्हणून नोंद झालेल्या लोकांची संख्या १०९३२४ एवढी होती. परंतु प्रत्यक्षात ६५०३७ एवढेच मतदान झाले. विशेष म्हणजे या

निवडणुकीत ६३२९९ मतदान वैध झाले. त्यामुळे मतदानाची टक्केवारी ही ५९.४९ एवढी झालेली पहावयास मिळते.

या निवडणूकीच्यावेळी इंडियन नॅशनल कॉंग्रेसमध्ये दोन गट पडले होते. हे गट म्हणजे इंडियन नॅशनल कॉंग्रेस (U) व इंडियन नॅशनल कॉंग्रेस (I) हे होते. ही निवडणूक इंडियन नॅशनल कॉंग्रेस (U) चे उमेदवार श्री.जगताप शंकरराव चिमाजी यांनी इंडियन नॅशनल कॉंग्रेस(I) चे उमेदवार श्री. बर्गे दत्ताजीराव भाऊसाहेब यांचा ११५०२ मतांनी पराभव केला होता. या दोन उमेदवारांच्यात मोठी चुरस झाली होती. याशिवाय अपक्ष म्हणून तीन उमेदवार उभे होते. त्यांचाही या निवडणुकीत दारूण पराभव झाला होता.

## विधानसभा निवडणूक १९८५

## कोरेगाव मतदारसंघ (२६१)

| अ.क्र. | एकूण मतदार | एकूण मतदान | वैध मतदान | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | ११६३६३ | ८३२६३ | ८१८६८ | ७१.५५ |

## उमेदवारनिहाय मतदान यादी

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. जगताप शंकरराव चिमाजी | इंडियन नॅशनल कॉंग्रेस | ४८०४९ | ५८.६९ |
| ०२ | श्री. फाळके शिवाजी गेविंदराव | इंडियन कॉंग्रेस (सोशॅलिस्ट) | ३३१६५ | ४०.५१ |
| ०३ | श्री. माने बाळकृष्ण रामचंद्र | अपक्ष | ६५४ | ०.८०[१७] |

सातारा जिल्हयातील कोरेगाव विधानसभा मतदारसंघ (२६१) यामधील निवडणूक सन १९८५ मध्ये झाली. या निवडणुकीत एकूण मतदार म्हणून नोंद झालेल्या लोकांची संख्या ११६३६३ एवढी होती. परंतु प्रत्यक्षात ८३२६३ एवढेच मतदान झाले. विशेष म्हणजे या निवडणुकीत ८१८६८ मतदान वैध झाले. त्यामुळे मतदानाची टक्केवारी ही ७१.५५ एवढी झालेली पहावयास मिळते.

या निवडणुकीत एकूण तीन उमेदवार निवडणुकीसाठी उभे राहिले होते. यात इंडियन नॅशनल कॉंग्रेसचे उमेदवार श्री. जगताप शंकरराव चिमाजी यांनी इतर दोन उमेदवारांचा पराभव केला. इंडियन कॉंग्रेस (सोशॅलिस्ट) चे उमेदवार  श्री. फाळके शिवाजी गेविंदराव यांचा १४८८४ मतांनी पराभव केला होता. या दोन उमेदवारांच्यात मोठी चुरस झाली होती. याशिवाय अपक्ष

उमेदवार श्री. माने बाळकृष्ण रामचंद यांना केवळ ६५४ मते मिळून दारूण पराभव झालेला होता.

कोरेगांव विधानसभा मतदारसंघावर श्री. शंकरराव जगताप यांचे वर्चस्व निर्माण झाले होते. तेव्हा त्यांचा हा विजय रोखण्यासाठी काँग्रेस एसने शिवाजीराव फाळके यांना त्यांच्या विरोधात निवडणूकीसाठी उभे केले. परंतु त्यांचाही पराभव श्री. शंकरराव जगताप यांनी केला. श्री.शंकरराव जगताप यांच्या या सततच्या विजयामुळे त्यांना पुढे विधानसभेचे सभापतीपद देण्यात आले.

## विधानसभा निवडणूक १९९०

## कोरेगाव मतदारसंघ (२६१)

| अ.क्र. | एकूण मतदार | एकूण मतदान | वैध मतदान | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | १४५६२२ | १०६४५१ | १०४८१९ | ७३.१० |

## उमेदवारनिहाय मतदान यादी

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. जगताप शंकरराव चिमाजी | इंडियन नॅशनल काँग्रेस | ५६२४७ | ५३.६६ |
| ०२ | श्रीमती पाटील शालिनीताई | जनता दल | ४४६८८ | ४२.६३ |
| ०३ | श्री. भोसले नानासाहेब | शिवसेना | ३३९८ | ०३.२४ |
| ०४ | श्री. वर्मा सियाराम रामचंदर | दुरदर्शी पार्टी | २०८ | ०.२० |
| ०५ | श्री. बर्गे दत्तात्रय निवृत्ती | अपक्ष | १४६ | ०.१४ |
| ०६ | श्री. बगाडे अरूण | अपक्ष | ७३ | ०.०७ |
| ०७ | श्री. शिंदे एकनाथ खाशाबा | अपक्ष | ५९ | ०.०६[१८] |

सातारा जिल्हयातील कोरेगाव विधानसभा मतदारसंघ (२६१) यामधील निवडणूक सन १९९० मध्ये झाली. या निवडणुकीत एकूण मतदार म्हणून नोंद झालेल्या लोकांची संख्या १४५६२२ एवढी होती. परंतु प्रत्यक्षात १०६४५१ एवढेच मतदान झाले. विशेष म्हणजे या निवडणुकीत १०४८१९ मतदान वैध झाले. त्यामुळे मतदानाची टक्केवारी ही ७३.१० एवढी झालेली पहावयास मिळते.

या निवडणुकीत एकूण सात उमेदवार निवडणूकीसाठी उभे राहिले होते. यात इंडियन नॅशनल काँग्रेसचे उमेदवार श्री. जगताप शंकरराव चिमाजी यांनी इतर सहा उमेदवारांचा पराभव केला. यामध्ये जनता दलाच्या उमेदवार डॉ. पाटील शालिनीताई व श्री. जगताप शंकरराव यांच्यात मोठी चुरस झाली होती. मात्र श्री जगताप शंकरराव यांनी डॉ. पाटील शालिनीताई यांचा ११५५९ मतांनी पराभव केला. तर बाकीचे पाच उमेदवार यामध्ये शिवसेनेमार्फत उभे असलेले भोसले नानासाहेब यांना ३३९८ मते मिळाली. तर अपक्ष उमेदवार श्री. बर्गे दत्तात्रय निवृत्ती, श्री. बगाडे अरूण व श्री. शिंदे एकनाथ खाशाबा या तिघांना अनुक्रमे १४६, ७३ व ५९ एवढी मते मिळाली. त्यामुळे त्यांचा दारूण पराभव झालेला पाहावयास मिळतो.

औरंगाबाद येथे राजीव गांधी यांच्या उपस्थित समाजवादी काँग्रेसचे विलिनीकरण झाल्यानंतर शिवसेना व भाजप यांची ताकद वाढू लागली होती. निवडणुकीसाठी सातारा जिल्हयात ज्या प्रचार सभा आयोजित केल्या जात होत्या. त्यामध्ये शिवसेनेचे अध्यक्ष बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रचार सभांना मोठया प्रमाणावर गर्दी होत असे. परंतु मतदारांनी शिवसेनेला मते दिलीच नाहीत. याचे कारण जनतेचा नेता म्हणून नावारूपास आलेले शरद पवार यांच्यावर जिल्हयाचा विश्वास होता. समाजवादी काँग्रेस विलीन झाल्यामुळे सन १९९० च्या निवडणुकीत जिल्हयात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची पुन्हा चांगलीच ताकद वाढली. याच दरम्यान स्थापन झालेल्या शिवसेना आणि त्यानंतर राज्यात आलेल्या भाजपची ताकद वाढू लागली होती. या पक्षांचे महत्व शहराबरोबरच ग्रामीण भागातही पोहचले होते. या परिस्थितीतही माण मतदार संघ वगळाला तर इतर सर्व जागी राष्ट्रीय काँग्रेसने आपला प्रभाव कायम ठेवला. कोरेगांवात शालिनीताई पाटील यांनी निवडणूक लढविण्याचा निर्णय घेऊन शंकरराव जगताप यांना आव्हान दिले. परंतु श्री. शंकरराव जगताप यांच्यापुढे शालिनीताईं पाटील यांचा टिकाव लागला नाही. थोडक्यात या सर्व कालखंडात सातारा जिल्हयात काँग्रेसशिवाय कोणत्याही पक्षाला आपले बस्तान बसवता आलेले नाही. संपूर्ण जिल्हा शरद पवारांच्या मागे जेव्हा त्यांनी हाक दिली तेंव्हा उभा राहिलेला दिसतो.

**विधानसभा निवडणूक १९९५**
**कोरेगाव मतदारसंघ (२६१)**

| अ. क्र. | एकूण मतदार | एकूण मतदान | वैध मतदान | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | १५४४३६ | १२२२१२ | ११९५५९ | ७९.१३ |

## उमेदवारनिहाय मतदान यादी

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. जगताप शंकरराव चिमाजी | इंडियन नॅशनल कॉंग्रेस | ५९७९३ | ५०.०१ |
| ०२ | श्रीमती पाटील शालिनीताई | अपक्ष | ५३८०७ | ४५.०० |
| ०३ | श्री. पंडित श्रीकांत दत्तात्रय | शिवसेना | ४७४४ | ०३.९७ |
| ०४ | श्री. सोनवणे विनायक केदारी | अपक्ष | ८९१ | ०.७५ |
| ०५ | श्री. चव्हाण शिवाजी दिनकर | समाजवादी जनता पार्टी (महाराष्ट्र) | २३२ | ०.१९ |
| ०६ | श्री. हिरेमठ छैनबसैय्या मुरगैय्या | दुरदर्शी पार्टी | ९२ | ०.०८[१९] |

सातारा जिल्हयातील कोरेगाव विधानसभा मतदारसंघ (२६१) यामधील निवडणूक सन १९९५ मध्ये झाली. या निवडणुकीत एकूण मतदार म्हणून नोंद झालेल्या लोकांची संख्या १५४४३६ एवढी होती. परंतु प्रत्यक्षात १२२२१२ एवढेच मतदान झाले. विशेष म्हणजे या निवडणुकीत ११९५५९ मतदान वैध झाले. त्यामुळे मतदानाची टक्केवारी ही ७९.१३ एवढी झालेली पहावयास मिळते.

या निवडणुकीत एकूण सहा उमेदवार निवडणूकीसाठी उभे राहिले होते. यात इंडियन नॅशनल कॉंग्रेसचे उमेदवार श्री. जगताप शंकरराव चिमाजी यांनी इतर पाच उमेदवारांचा पराभव केला. यामध्ये अपक्ष म्हणून प्रतिस्पर्धी उमेदवार डॉ. पाटील शालिनीताई यांना ५३८०७ मते मिळाली. त्यामुळे याही निवडणुकीत श्री. जगताप शंकरराव व डॉ. पाटील शालिनीताई यांच्यात मोठी चुरस झाली होती. मात्र याही वेळेस डॉ. पाटील शालिनीताई यांचा पराभव झाला. याशिवाय शिवसेनेमार्फत निवडणूकीसाठी उभे राहिलेले उमेदवार श्री. पंडित श्रीकांत दत्तात्रय यांना केवळ ४७४४ मते मिळाली. अपक्ष उमेदवार श्री. सोनवणे विनायक केदारी यांनाही ८९१, समाजवादी जनता पार्टी (महाराष्ट्र) या पक्षामार्फत उभे असलेले श्री. चव्हाण शिवाजी दिनकर यांना केवळ २३२ व दुरदर्शी पार्टीमार्फत उभे असलेले श्री. हिरेमठ छैनबसैय्या मुरगैय्या

यांना सर्वात कमी म्हणजे ९२ मते मिळाली. अशाप्रकारे श्री. शंकरराव जगताप यांनी या पाचही उमेदवारांचा पराभव केला होता.

## विधानसभा निवडणूक १९९९
## कोरेगाव मतदारसंघ (२६१)

| अ. क्र. | एकूण मतदार | एकूण मतदान | वैध मतदान | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | १५०६७९ | ११०२६७ | १०४८३७ | ७३.१८ |

## उमेदवारनिहाय मतदान यादी

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती डॉ. पाटील शालिनीताई | राष्ट्रवादी काँग्रेस | ६१६९२ | ५८.८५ |
| ०२ | श्री. जगताप शंकरराव चिमाजी | इंडियन नॅशनल काँग्रेस | ३६०६९ | ३४.४० |
| ०३ | श्री. बर्गे दत्ताजीराव निवृत्ती | शिवसेना | ६७२६ | ०६.४२ |
| ०४ | श्री. जाधव सतीश शंकर | अखिल भारतीय सेना | ३५० | ०.३३[२०] |

सातारा जिल्हयातील कोरेगाव विधानसभा मतदारसंघ (२६१) यामधील निवडणूक सन १९९९ मध्ये झाली. या निवडणुकीत एकूण मतदार म्हणून नोंद झालेल्या लोकांची संख्या १५०६७९ एवढी होती. परंतु प्रत्यक्षात ११०२६७ एवढेच मतदान झाले. विशेष म्हणजे या निवडणुकीत १०४८३७ मतदान वैध झाले. त्यामुळे मतदानाची टक्केवारी ही ७३.१८ एवढी झालेली पाहावयास मिळते.

या निवडणुकीत एकूण चार उमेदवार निवडणूकीसाठी उभे राहिले होते. या निवडणूकीचे वैशिष्ट म्हणजे इंडियन नॅशनल काँग्रेसचे उमेदवार श्री. शंकरराव चिमाजी जगताप यांनी आजपर्यत कोरेगाव विधानसभा मतदार संघात सलगपणे पाचवेळा निवडून आले होते. त्यांचा राष्ट्रवादी काँगेस पार्टीच्या उमेदवार डॉ. शालिनीताई पाटील यांनी २५६२३ एवढया मोठया फरकाने पराभव केला होता. त्यामुळे कोरेगाव तालुक्यातील इंडियन नॅशनल काँग्रेसचे वर्चस्व संपुष्टात आले होते. याशिवाय शिवसेनेचे श्री. बर्गे दत्ताजीराव निवृत्ती यांना ६७२६ व अखिल

भारतीय सेना या पक्षाचे उमेदवार श्री. जाधव सतीश शंकर यांना केवळ ३५० मते मिळाली होती. या दोनही उमेदवारांचा दारूण पराभव झालेला होता.

नामदार शरद पवार यांनी स्वतंत्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना सन १९९९ मध्ये केली. या वेळी सातारा जिल्हयाचे अनेक आमदार राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेल्याचे दिसते. सातारा जिल्हयात सातारा, कोरेगाव, वाई, पाटण, कराड उत्तर, कराड दक्षिण, फलटण व माण असे आठ विधानसभा मतदारसंघ अस्तित्त्वात आहेत. या विविध मतदार संघातून निवडल्या गेलेल्या अनेक व्यक्तींनी आपल्या व्यक्तिमत्वाचा व कर्तृत्वाचा ठसा महाराष्ट्र राज्याच्या राजकारणावर पाडलेला आहे.

अशा प्रकारे सन १९५२ ते १९७६ पर्यंत काँग्रेसचे महाराष्ट्रावरील वर्चस्व निर्विवादीत होते. १ मे, १९६० पासून राजकारणात मोठी उलथापालथ होऊन एक नवे पर्व सुरू झाले. असे असले तरीही सन १९५६ पासूनच काँग्रेस वर्चस्वाची चौकट उदयास आली होती. यशवंतराव चव्हाणांनी ही चौकट बळकट करण्यावर भर दिला. सत्तेचे एक प्रारूप तयार करून घेतले. म्हणूनच महाराष्ट्रात काँग्रेसच्या वर्चस्वाचे वर्णन 'चव्हाण मॉडेल' म्हणून केले जाते. या संदर्भातील यशवंतराव चव्हाणांचे श्रेय वादातीत आहे. पुढे ब्राह्मणेतर चळवळीतील एक मोठा गट काँग्रेसमध्ये सामील झाल्यामुळे महाराष्ट्रातील काँग्रेस विस्तारण्यास मोठा हातभार लागला. यातून पुढे काँग्रेसच्या मार्फत आपल्या राजकीय आकांक्षा पूर्ण करण्याचे मराठा नेतृत्वाचे प्रयत्न सुरू झाले.

## २.६ लोकसभा निवडणूक

पश्चिम महाराष्ट्रातील राजकारण प्रारंभीपासूनच टोकाचे असले तरी राजकारण बाजूला ठेऊन सर्वजण एकत्र यायचे. महाराष्ट्रावर संकट येताच सर्वजण एकजूट दाखवत असत. उदा. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, कोयनानगरचा भूकंप इ. नैसर्गिक आपत्ती वगैरे होत. देशावर चिनी आक्रमण झाल्यावर पंडित जवाहरलाल नेहरू यांनी यशवंतराव चव्हाणांना संरक्षणमंत्रीपद दिले. त्यावेळी 'हिमालयाच्या रक्षणासाठी सहयाद्री धावला' असे रसभरीत वर्णन आचार्य अत्रे यांनी वृत्तपत्रात केले होते. दिल्लीतील कारभाराची सूत्रे सांभाळल्यानंतर यशवंतराव चव्हाण राज्याच्या राजकारणात फारसे आलेच नाहीत.

## लोकसभा निवडणूक १९५१

## उत्तर सातारा मतदारसंघ (२१)

| अ.क्र. | एकूण मतदार | एकूण मतदान | वैध मतदान | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | ३५९७३१ | १९८७३९ | १९८७३९ | ५५.२५ |

## उमेदवारनिहाय मतदान यादी

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. आळतेकर गणेश सदाशिव | इंडियन नॅशनल कॉंग्रेस | ९१३१६ | ४५.९५ |
| ०२ | श्री. नलावडे रामचंद्र मनोहर | पीझंटस अँड वर्कर्स पार्टी | ५४०९५ | २७.२२ |
| ०३ | श्री. देशमुख दिनकर दगडोबा | अपक्ष | ४११५९ | २०.७१ |
| ०४ | श्री. दिक्षीत रामचंद्र दत्तात्रय | अपक्ष | १२१६६ | ०६.१२[२१] |

भारतात लोकसभेच्या निवडणूकीस सन १९५१ पासून सुरूवात झाली. त्यावेळी महाराष्ट्रातील उत्तर सातारा लोकसभा मतदार संघामध्ये कोरेगाव तालुक्याचा समावेश होत होता. या निवडणुकीत उत्तर सातारा लोकसभा मतदार संघात एकून मतदारांची नोंदणी ३५९७३१ एवढी होती. तर त्यामध्ये १९८७३९ एवढे मतदान वैध ठरले. या मतदार संघावर इंडियन नॅशनल कॉंग्रेसचे वर्चस्व होते. त्यामुळे या निवडणुकीत या पक्षाच्या उमेदवार श्री. आळतेकर गणेश सदाशिव यांना एकूण ९१३१६ एवढी मते मिळाली. त्यामुळे त्यांनी इतर उमेदवारांचा पराभव केला होता. यामध्ये पीझंटस् अँड वर्कर्स पार्टी या पक्षाचे उमेदवार श्री.नलावडे रामचंद्र मनोहर यांना ५४०९५ एवढी मते मिळाली. तर अपक्ष उमेदवार श्री. देशमुख दिनकर दगडोबा व श्री. दिक्षीत रामचंद्र दत्तात्रय यांना अनुक्रमे ४११५९, १२१६६ एवढी मते मिळाली होती. अशाप्रकारे ही लोकसभेची पहिली निवडणूक उत्तर सातारा मतदार संघात चांगल्याप्रकारे पार पडली होती.

## लोकसभा निवडणूक १९५७

## उत्तर सातारा मतदारसंघ (३५)

| अ. क्र. | एकूण मतदार | एकूण मतदान | वैध मतदान | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | ३६६५९८ | २२१९३९ | २२१९३९ | ६०.५४ |

## उमेदवारनिहाय मतदान यादी

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.पाटील नाना रामचंद्र | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया | १४५१९४ | ६५.४२ |
| ०२ | श्री.आळतेकर गणेश सदाशिव | इंडियन नॅशनल काँग्रेस | ७६७४५ | ३४.५८ |
| ०३ | श्री.देशमुख दिनकरराव दगडोबा | अपक्ष | ० | ०[२२] |

लोकसभेच्या पहिल्या निवडणूकीनंतर महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्राची चळवळ जोर धरू लागली. त्यातच सन १९५७ मध्ये लोकसभेची दुसरी निवडणूक लागली होती. सन १९५७ साली मुंबईच्या त्रिभाषिक प्रांताच्या निवडणुकीत सातारा जिल्हयात मोठी राजकीय उलथापालथ झाली. या निवडणूकी वेळी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा जोम वाढून सातारा जिल्हयातील काँग्रेसला याचा धक्का बसला. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा परिणाम होऊन फलटण, वाई, माण, सातारा, कराड दक्षिण, खटाव, जावली या सात मतदारसंघात काँग्रेसचा पराभव झाला. या निवडणुकीत समितीला अनेक ठिकाणी विजय मिळाला. कराड उत्तर व पाटणचा याठिकाणी समितीला यश मिळाले नाही. मात्र बाकीच्या पाच ठिकाणी समितीने आपला विजय साजरा केला. या विजयामुळे समितीतील कार्यकर्त्यामध्ये उत्साह वाढला. त्याचबरोबर सातारा जिल्हयातील शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी डावी आघाडी एकसंघपणे उभी राहिली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळ बलशाली झाल्यामुळे सन १९५७ च्या निवडणुकीत काँग्रेसला पराभवाचा सामना करावा लागला असला तरी या निवडणूकीनंतर द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांची निवड झाली.

या निवडणुकीत एकूण मतदारांची नोंदणी ३६६५९८ झाली होती. तर त्यातील २२१९३९ मते वैध ठरली होती. या निवडणुकीत कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया पक्षाचे उमेदवार श्री. पाटील नाना रामचंद्र यांनी १४५१९४ मते मिळवून प्रतिस्पर्धी असलेल्या इंडियन नॅशनल काँग्रेसचे उमेदवार श्री. आळतेकर गणेश सदाशिव यांचा ६८४४९ मतांनी पराभव केला होता. या निवडणुकीत अपक्ष उभे राहिलेले उमेदवार श्री. देशमुख दिनकरराव दगडोबा यांना ० मते मिळाली होती. अशाप्रकारे या निवडणुकीत इंडियन नॅशनल काँग्रेसचा कम्युनिस्ट पार्टी ऑफ

इंडिया पक्षाने मोठा पराभव केला होता. त्यामुळे यशवंतराव चव्हाण यांचे व या पक्षाचे सातारा जिल्हयातील महत्त्व संपुष्टात आले होते.

## लोकसभा निवडणूक १९६२

## उत्तर सातारा मतदारसंघ (१७)

| अ. क्र. | एकूण मतदार | एकूण मतदान | वैध मतदान | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | ४२४४४७ | २७०९३२ | २५८९१५ | ६३.८३ |

## उमेदवारनिहाय मतदान यादी

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. वीर किसन महादेव | इंडियन नॅशनल कॉंग्रेस | १६५८७९ | ६४.०७ |
| ०२ | श्री. पाटील नाना रामचंद्र | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया | ६२१८८ | २४.०२ |
| ०३ | श्री. कचरे बापूराव भाऊराव | प्रजा समाजवादी पार्टी | १७३२४ | ६.६९ |
| ०४ | श्री. बर्गे रामराव सुभानराव | अपक्ष | १०१६४ | ३.९३ |
| ०५ | श्री. शिंदे बाबासाहेब जगदेवराव | स्वतंत्रता पार्टी | ३३६० | १.३०[२३] |

यशवंतरावांनी जिल्हयातील कॉंग्रेस पुन्हा रूळावर आणली आणि सन १९५७ च्या निवडणुकीत पराभूत झालेल्या कॉंग्रेसने सन १९६२ च्या महाराष्ट्र विधानसभेच्या पहिल्या निवडणुकीत पुन्हा घवघवीत यश मिळविले. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या चळवळीतील एक महत्त्वाचा प्रसंग होता तो म्हणजे नोहेंबर १९५७ मध्ये भारताचे तत्कालिन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू छ. शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे अनावरणासाठी प्रतापगडला येणार होते. यावेळी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वतीने काळे झेंडे दाखवून त्यांचा निषेध करीत होते. तर दुसऱ्या क्षणी हेच लोक पंतप्रधानांना नमस्कार करत होते. हे पाहून पंडित जवाहरलाल नेहरू यांना आश्चर्य वाटले. तेव्हा त्यांनी आपल्या कार्यकत्यांना विचारले की, हा काय प्रकार आहे? तेव्हा त्यांना सांगण्यात आले की, संयुक्त महाराष्ट्र व्हावा अशी जनतेची इच्छा आहे. हा संयुक्त महाराष्ट्र मिळत नाही. म्हणून ते आपला निषेध करत आहेत. आपल्याविषयी जो आदर आहे तो व्यक्त करण्यासाठी ते आपणास नमस्कार करत आहेत. पुढे संयुक्त महाराष्ट्र हवा होता तो

महाराष्ट्रीयन जनतेला मिळाला. त्यामुळे जनता आनंदीत झाली. १ मे १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्राची निर्मिती करण्यात आली. या नव्या राज्याच्या मुख्यमंत्री पदावर श्री. यशवंतराव चव्हाण यांची निवड झाली. त्याचवेळी उत्तर साताऱ्याचे रूपांतर सातारा जिल्हयात व दक्षिण साताऱ्याचे रूपांतर सांगली जिल्हयात करण्यात आले.

सन १९६२ मध्ये भारतावर चीनने आक्रमण केले. पं. नेहरूंनी यावेळी यशवंतराव चव्हाण साहेबांना दिल्लीला बोलवून भारताच्या संरक्षणमंत्रीपदी नियुक्त केले. याच काळात महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूका आल्या. कोरेगांवमध्ये समाजवादी असलेल्या तुषार पवार यांना यशवंतराव चव्हाणांनी कॉंग्रेसमध्ये आणले. सन १९६२ च्या निवडणूकीमध्ये कूपरमधील कामगारांचे संघटन आणि यशवंतरावांचा पाठिंबा यामुळे पवारांच्या विरोधात उमेदवारच मिळाला नाही आणि पवारांनी विठ्ठल भोसले या अपक्ष उमेदवाराचा सहज पराभव केला.

सन १९५७ च्या निवडणुकीत समाजवादी पक्षाकडून केशवराव पाटील यांना खटावमध्ये तिकीट दिले होते. तसेच त्यांच्या पाठीमागे मोठी शक्ती निर्माण केली होती. सन १९५७ च्या निवडणुकीत कॉंग्रेसचा मोठा पराभव झालेला होता. मात्र सन १९६२ मध्ये कॉंग्रेसने जिल्हयातील सर्व सत्ताकेंद्रे हस्तगत करण्यात यश मिळाले होते. श्री. यशवंतराव चव्हाण यांचे महत्त्व या काळात चांगलेच वाढले होते. त्यानंतरच जिल्हयात विकासाचे राजकारण सुरू झाले.
सन १९६२ च्या निवडणुकीत इंडियन नॅशनल कॉंग्रेसचे उमेदवार श्री. वीर किसन महादेव यांनी सन १९५७ च्या निवडणुकीत निवडून आलेले कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया या पक्षाचे उमेदवार श्री. पाटील रामचंद्र नाना यांचा दारूण पराभव केला. त्यामुळे पुन्हा एकदा इंडियन नॅशनल कॉंग्रेसचे महत्त्व वाढीस लागले.

## लोकसभा निवडणूक १९६७

## उत्तर सातारा मतदारसंघ (४१)

| अ. क्र. | एकूण मतदार | एकूण मतदान | वैध मतदान | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | ४५९१२० | ३१७२३१ | ३०२२७६ | ६९.१० |

## उमेदवारनिहाय मतदान यादी

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. चव्हाण वाय. बी. | इंडियन नॅशनल कॉंग्रेस | २०७८९५ | ६८.७८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२ | श्री. पवार के. पी. | पीझंटस् अँड वर्कर्स पार्टी | ८००५९ | २६.४९ |
| ०३ | श्री. रसाळ डी. एस. | अपक्ष | १४३२२ | ०४.७४[२४] |

सन १९६७ च्या लोकसभा निवडणुकीत उत्तर सातारा लोकसभा मतदार संघात एकूण मतदार ४५९१२० एवढे असून प्रत्यक्ष मतदान ३१७२३१ एवढे झाले होते. तर त्यामध्ये ३०२२७६ एवढे मतदान वैध ठरले. या मतदार संघावर इंडियन नॅशनल काँग्रेसचे वर्चस्व होते. त्यामुळे या निवडणुकीत या पक्षाच्या उमेदवार श्री. चव्हाण वाय. बी. यांना एकूण २०७८९५ एवढी मते मिळाली. त्यामुळे त्यांनी इतर उमेदवारांचा पराभव केला होता. यामध्ये पीझंटस् अँड वर्कर्स पार्टी या पक्षाचे उमेदवार श्री. पवार के. पी. यांना ८००५९ एवढी मते मिळाली. तर अपक्ष उमेदवार श्री. रसाळ डी. एस. यांना १४३२२ एवढी मते मिळाली होती. या निवडणुकीत एकूण ६९.१० टक्के एवढे मतदान झाले होते. सन १९६७ च्या निवडणुकीतही यशवंतराव चव्हाण यांनीच उत्तर सातारा लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढवून इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाला विजय मिळवून दिला होता. यावरून त्यांच्या कार्याचा जनमानसावर किती खोल परिणाम झाला होता हे समजते.

## लोकसभा निवडणूक १९७२

## उत्तर सातारा मतदारसंघ (४१)

| अ.क्र. | एकूण मतदार | एकूण मतदान | वैध मतदान | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | ४९५७६० | ३२९१३३ | ३१८६९५ | ६६.३९ |

## उमेदवारनिहाय मतदान यादी

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. चव्हाण यशवंतराव बळवंतराव | इंडियन नॅशनल काँग्रेस | २४६१०० | ७७.२२ |
| ०२ | श्री. पवार केशवराव पाटलोजी | पीझंटस् अँड वर्कर्स पार्टी | ६९२७० | २१.७४ |
| ०३ | श्री. बोराटे पांडुरंग कोंडीबा | अपक्ष | ३३२५ | १.०४२५ |

सन १९७२ च्या लोकसभा निवडणुकीत उत्तर सातारा लोकसभा मतदार संघात एकूण मतदार ४९५७६० एवढे असून प्रत्यक्ष मतदान ३२९१३३ एवढे झाले होते. तर त्यामध्ये ३१८६९५ एवढे मतदान वैध ठरले. या मतदार संघावर इंडियन नॅशनल काँग्रेसचे वर्चस्व होते. त्यामुळे या निवडणुकीत या पक्षाच्या उमेदवार श्री. चव्हाण वाय. बी. यांना एकूण २४६१०० एवढी मते मिळाली. त्यामुळे त्यांनी इतर उमेदवारांचा पराभव केला होता. यामध्ये पीझंटस् अँड वर्कर्स पार्टी या पक्षाचे उमेदवार श्री. पवार के. पी. यांना ६९२७० एवढी मते मिळाली. तर अपक्ष उमेदवार श्री. बोराटे पांडुरंग कोंडीबा यांना ३३२५ एवढी मते मिळाली होती. या निवडणुकीत एकूण ६६.३९ टक्के एवढे मतदान झाले होते.

सन १९७२ च्या दुष्काळात झालेल्या निवडणुकीत जिल्हयातील अनेकांनी बंडाचा झेंडा फडकवला. यशवंतराव चव्हाण यांचे त्यांच्या मतदार संघामध्ये कोणीही महत्त्व देत नव्हते. मात्र दिल्लीतील राजकारणात त्यांना महत्त्व प्राप्त झाले होते. तरीही उत्तर सातारा लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढवून इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाला विजय मिळवून दिला होता. त्यावेळचे जिल्हा परिषद अध्यक्ष भागवतराव देसाई यांना दूर करून बाबुराव घोरपडे यांना अध्यक्ष बनविले तर कोरेगाव तालुक्यातील ज्येष्ठ नेते श्री. शंकरराव जगताप यांना उपाध्यक्ष करण्यात आले.

## लोकसभा निवडणूक १९७७

## सातारा मतदारसंघ (४४)

| अ.क्र. | एकूण मतदार | एकूण मतदान | वैध मतदान | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | ५८०१५७ | ३५१५५२ | ३४११३८ | ६०.६० |

## उमेदवारनिहाय मतदान यादी

| अ.क्र | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. चव्हाण यशवंतराव बळवंतराव | इंडियन नॅशनल काँग्रेस | २६०५६२ | ७६.३८ |
| ०२ | श्री. लावंगारे नितीन जगन्नाथ | भारतीय लोक दल | ६८९६१ | २०.२१ |
| ०३ | ॲड. ठाकूर वसंतराव कृष्णा | अपक्ष | ६८०८ | २.०० |
| ०४ | श्री. सहस्त्रबुध्दे शामसुंदर अनंत | अपक्ष | ४८०७ | ०१.४१[२६] |

सन १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत उत्तर सातारा लोकसभा मतदार संघात एकूण मतदार ५८०१५७ एवढे असून  प्रत्यक्ष मतदान ३५१५५२ एवढे झाले होते. तर त्यामध्ये ३४११३८ एवढे मतदान वैध ठरले. या मतदार संघावर इंडियन नॅशनल काँग्रेसचे वर्चस्व होते. त्यामुळे या निवडणुकीत या पक्षाच्या उमेदवार श्री. चव्हाण वाय. बी. यांना एकूण २६०५६२ एवढी मते मिळाली. त्यामुळे त्यांनी इतर उमेदवारांचा पराभव केला होता. यामध्ये भारतीय लोक दल या पक्षाचे उमेदवार श्री. लावंगारे नितीन जगन्नाथ यांना ६८९६१ एवढी मते मिळाली. तर अपक्ष उमेदवार ॲड. ठाकूर वसंतराव कृष्णा व श्री. सहस्त्रबुध्दे शामसुंदर अनंत यांना अनुक्रमे ६८०८ व ४८०७ एवढी मते मिळाली होती. या निवडणुकीत एकूण ६०.६० टक्के एवढे मतदान झाले होते.

सन १९७८ नंतर झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात मोठा बदल झाला. याचवेळी शरद पवार यांनी राजकारण हे सत्तेसाठी असते याची ओळख शरद पवारांनी महाराष्ट्राला करून दिली. त्यामुळे सत्ता मिळविण्यासाठी आमदारांची मोठया प्रमाणात फोडाफोडी झाली. विशेष म्हणजे स्वतः शरद पवारांनी ३८ आमदारांना किसन वीरांच्या नेतृत्त्वाने फोडून पुलोदचा प्रयोग केला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शरद पवार बनले होते. त्याचवेळी दिल्लीत इंदिरा गांधी यांची सत्ता निर्माण झाली होती. त्यामुळे इंदिरा गांधीनी जनता पक्षातील आमदारांच्या सहकार्याने पुलोद सरकार बरखास्त करून टाकले. यामुळे महाराष्ट्रात मध्यावधी निवडणूका लागल्या. या सर्व बाबींचा साहजिकच सातारा जिल्हयाच्या राजकारणावरही मोठा परिणाम झाला होता. काँग्रेसमध्ये मोठया प्रमाणावर फुटाफूट झाली होती. त्याचा सातारा जिल्हयाच्या राजकारणावरही विपरीत परिणाम झालेला होता. काँग्रेसमध्ये आडवाआडवीचे राजकारण सुरू झाले होते. त्यातच सत्तेसाठी हापापलेल्या नेत्यांच्यामुळे जनतेत संभ्रम निर्माण झाला. निवडणुकीत या पक्षाची चिन्हे गायवासरू तसेच बेडूकउडया, हाताचा पंजा आणि बैलजोडी इ. होती. असे राजकारण महाराष्ट्रात सुरू झाले असतानाच शरद पवार यांचा महाराष्ट्र राज्याच्या राजकारणात प्रवेश झाला. पुलोदचा प्रयोग सुरू झाला. तसेच या दरम्यान कर्नाटकचे तत्कालीन मुख्यमंत्री देवराज अर्स यांच्या नेतृत्वाखाली अर्स काँग्रेसची स्थापना केली गेली. याचवेळी शरद पवार यांनी अर्स काँग्रेसला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. त्यांनी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे सातारा जिल्हयाने अर्स काँग्रेसला पाठींबा दिला.

## लोकसभा निवडणूक १९८०

## सातारा मतदारसंघ (४४)

| अ.क्र. | एकूण मतदार | एकूण मतदान | वैध मतदान | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | ६५९८६२ | ४२५४३६ | ४१३७५७ | ६४.४७ |

## उमेदवारनिहाय मतदान यादी

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. चव्हाण यशवंतराव बळवंतराव | इंडियन नॅशनल काँग्रेस (U) | २२३२१३ | ५३.९५ |
| ०२ | श्रीमती पाटील शालिनी वसंतराव | इंडियन नॅशनल काँग्रेस (I) | १७०१८० | ४१.१३ |
| ०३ | श्री. ठाकूर वसंत कृष्णा | अपक्ष | ७८२२ | १.८९ |
| ०४ | श्री. जगदाळे शामराव बंडुजी | अपक्ष | ५०६६ | १.२२ |
| ०५ | श्री. चव्हाण बाजीराव दादासाहेब | अपक्ष | २६०१ | ०.६३ |
| ०६ | श्री. परांजपे बाळकृष्ण भास्कर | अपक्ष | २०९७ | ०.५१ |
| ०७ | श्री. सहस्त्रबुध्दे शामसुंदर अनंत | अपक्ष | १७१३ | ०.४१ |
| ०८ | श्री. रोकडे श्रीरंग रामचंद्र | अपक्ष | १०६५ | ०.२६[२७] |

सन १९८० च्या लोकसभा निवडणुकीत उत्तर सातारा लोकसभा मतदार संघात एकूण मतदार ६५९८६२ एवढे असून प्रत्यक्ष मतदान ४२५४३६ एवढे झाले होते. तर त्यामध्ये ४१३७५७ एवढे मतदान वैध ठरले. या निवडणुकीच्यावेळी काँग्रेस पक्षात फूट पडली होती. त्यानुसार इंडियन नॅशनल काँग्रेस (U) व इंडियन नॅशनल काँग्रेस (I) हे दोन पक्ष होत. या दोन्हीमध्ये मोठया प्रमाणात स्पर्धा होऊन शेवटी इंडियन नॅशनल काँग्रेस (U) चे उमेदवार श्री. चव्हाण यशवंतराव बळवंतराव यांनी इंडियन नॅशनल काँग्रेस (I) च्या महिला उमेदवार श्रीमती पाटील शालिनी वसंतराव यांचा ५३,०३३ मतांनी पराभव केला होता. या निवडणुकीत इतर उमेदवारांचा पराभव केला होता. यामध्ये सहा अपक्ष उमेदवार होते. हे उमेदवार म्हणजे श्री.

ठाकूर वसंत कृष्णा, श्री. जगदाळे शामराव बंडुजी, श्री. चव्हाण बाजीराव दादासाहेब, श्री. परांजपे बाळकृष्ण भास्कर, श्री. सहस्त्रबुध्दे शामसुंदर अनंत व श्री. रोकडे श्रीरंग रामचंद्र यांना अनुक्रमे ७८२२, ५०६६, २६०१, २०९७, १७१३ व १०६५ या निवडणुकीत एकूण ६४.४७ टक्के एवढे मतदान झाले होते.

## लोकसभा निवडणूक १९८४

## सातारा मतदारसंघ (४४)

| अ.क्र. | एकूण मतदार | एकूण मतदान | वैध मतदान | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | ७१२७३६ | ४७३६३७ | ४६१८८२ | ६६.४५ |

## उमेदवारनिहाय मतदान यादी

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. भोसले प्रतापराव बाबुराव | इंडियन नॅशनल काँग्रेस | २७०११० | ५८.४८ |
| ०२ | श्री. निंबाळकर यशवंतसिंग आप्पासाहेब उर्फ दादाराजे खर्डेकर | इंडियन काँग्रेस (सोशॅलिस्ट) | १७४५९० | ३७.८० |
| ०३ | श्री. भगवान रशिद अब्दुलकरीम | अपक्ष | ८९८८ | ०१.९५ |
| ०४ | श्री. गायकवाड निवृत्ती ईश्वरा | अपक्ष | ३७८३ | ०.८२ |
| ०५ | श्री. दुपटे रघुनाथ बळवंत | अपक्ष | २३७४ | ०.५१ |
| ०६ | श्री. मुल्ला शौकतअली बाबालाल | अपक्ष | ९५० | ०.२१ |
| ०७ | श्री. कचरे बापूराव भाऊराव | अपक्ष | ६९७ | ०.१५ |
| ०८ | श्री. शेख दिलावर बादशहा | अपक्ष | ३९० | ०.०८[२८] |

सन १९८४ च्या लोकसभा निवडणुकीत उत्तर सातारा लोकसभा मतदार संघात एकूण मतदार ७१२७३६ एवढे असून प्रत्यक्ष मतदान ४७३६३७ एवढे झाले होते. तर त्यामध्ये ४६१८८२ एवढे मतदान वैध ठरले. या निवडणुकीत इंडियन नॅशनल काँग्रेस व इंडियन नॅशनल काँग्रेस (सोशॅलिस्ट) हे दोन पक्ष होते. या दोन्हीमध्ये मोठया प्रमाणात स्पर्धा होऊन शेवटी इंडियन नॅशनल काँग्रेसचे उमेदवार श्री. भोसले प्रतापराव बाबुराव यांनी इंडियन नॅशनल काँग्रेस (सोशॅलिस्ट) चे उमेदवार श्री. निंबाळकर यशवंतसिंग आप्पासाहेब उर्फ दादाराजे खर्डेकर यांच्यासह इतर उमेदवारांचा पराभव केला होता. यामध्ये सहा अपक्ष उमेदवार होते. हे उमेदवार

म्हणजे श्री. भगवान रशिद अब्दुलकरीम, श्री. गायकवाड निवृत्ती ईश्वरा, श्री. दुपटे रघुनाथ बळवंत, श्री. मुल्ला शौकतअली बाबालाल, श्री. कचरे बापूराव भाऊराव व श्री. शेख दिलावर बादशहा यांना अनुक्रमे ८९८८, ३७८३, २३७४, ९५०, ६९७ व ३९० या निवडणुकीत एकूण ६६.४५ टक्के एवढे मतदान झाले होते.

सन १९८४ ची निवडणूक सातारा जिल्हयाच्या दृष्टीने वेगळी होती. या निवडणूकी पूर्वी यशवंतराव चव्हाण आणि किसन वीर हे जिल्हयाच्या राजकारणाचे प्रमुख आधारवड गळून पडलेले होते. कॉंग्रेस एसच्या स्थापनेमुळे सातारा जिल्हयात प्रचंड बदल हाऊ लागला होता. शरद पवारांच्या धोरणी राजकारणाला संपूर्ण राज्यातून पाठिंबा मिळत असतानाच १९८५ ची निवडणूक एस. (समाजवादी) कॉंग्रेसच्या लाटेवर हेलखावे खावू लागली. पवारांना याच निवडणुकीत सातारा जिल्हयाची नस सापडली. प्रतापराव भोसले, अभयसिंहराजे भोसले, विलासराव उंडाळकर असे मातब्बर नेते या निवडणूकीने घडवले.

## लोकसभा निवडणूक १९८९

## सातारा मतदारसंघ (४४)

| अ.क्र. | एकूण मतदार | एकूण मतदान | वैध मतदान | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | ९११९०१ | ४६४७१० | ४५०९०८ | ५०.९६ |

### उमेदवारनिहाय मतदान यादी

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. भोसले प्रतापराव बाबुराव | इंडियन नॅशनल कॉंग्रेस | ३६९४६७ | ८१.९४ |
| ०२ | श्री. रणनवरे डी. डी. | जनता दल | ५२४७६ | ११.६४ |
| ०३ | श्री. जाधव लक्ष्मण वामन | अपक्ष | ५७७३ | ०१.२८ |
| ०४ | श्री. काकडे बळवंत वामन | बहुजन समाज पक्ष | ३६३६ | ०.८१ |
| ०५ | श्री. मेटकरी दस्तगिर कादरभाई | अपक्ष | ३४५२ | ०.७७ |
| ०६ | श्री. कुंभार रामचंद्र बिकानू | दुरदर्शी पार्टी | ३२८३ | ०.७३ |
| ०७ | श्री. मुल्ला शौकतअली बाबालाल | ऑल इंडिया दलित मुस्लिम मायनॉरिटीज सुरक्षा महासंघ | २७२३ | ०.६० |
| ०८ | श्री. पवार अरविंद बापूराव | अपक्ष | २५६१ | ०.५७ |
| ०९ | श्री. लोखंडे मारूती शंकर | अपक्ष | २१८४ | ०.४८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | श्री. माने बाळकृष्ण रामचंद्र | अपक्ष | २१०१ | ०.४७ |
| ११ | श्री. फाळके बाळु सदाशिव | अपक्ष | १४३६ | ०.३२ |
| १२ | श्री. बर्गे दत्तात्रय निवृत्ती | अपक्ष | ११९४ | ०.२६ |
| १३ | श्री. जराड सुर्यकांत आनंदराव | अपक्ष | ६२२ | ०.१४[२९] |

सन १९८९ च्या लोकसभा निवडणुकीत उत्तर सातारा लोकसभा मतदार संघात एकूण मतदार ९११९०१ एवढे असून प्रत्यक्ष मतदान ४६४७१० एवढे झाले होते. तर त्यामध्ये ४५०९०८ एवढे मतदान वैध ठरले. या निवडणूकीचे विशेष म्हणजे अनेक पक्ष एकमेकांविरूद्ध उभे ठाकले होते. त्यामध्ये इंडियन नॅशनल काँग्रेस, जनता दल, बहुजन समाज पक्ष, दुरदर्शी पार्टी, ऑल इंडीया दलित मुस्लिम मायनॉरिटीज सुरक्षा महासंघ व सात अपक्ष उमेदवार निवडणूकीसाठी उभे राहिले होते. या निवडणुकीत इंडियन नॅशनल काँग्रेसचे उमेदवार श्री. भोसले प्रतापराव बाबुराव यांनी जनता दलाचे उमेदवार श्री. रणनवरे डी. डी. यांचा ३,१७०२६ मतांनी पराभव केला होता. श्री. रणनवरे डी. डी. यांना एकूण ५२४७६ एवढी मते मिळाली होती. तर अपक्ष उमेदवार श्री. जाधव लक्ष्मण वामन यांना ५७७३ मते, बहुजन समाज पक्षाचे उमेदवार श्री. काकडे बळवंत वामन यांना ३६३६ मते, ऑल इंडिया दलित मुस्लिम मायनॉरिटीज सुरक्षा महासंघांचे उमेदवार श्री. मुल्ला शौकतअली बाबालाल यांना २७२३ मते तर आणखी सहा अपक्ष उमेदवार या निवडणुकीसाठी उभे होते. त्यामध्ये प्रामुख्याने श्री. पवार अरविंद बापूराव, श्री. लोखंडे मारूती शंकर, श्री. माने बाळकृष्ण रामचंद, श्री. फाळके बाळु सदाशिव, श्री. बर्गे दत्तात्रय निवृत्ती व श्री. जराड सुर्यकांत आनंदराव यांना अनुक्रमे २५६१, २१८४, २१०१, १४३६, ११९४ व ६२२ मते पडून यांचा दारूण पराभव झाला होता. या निवडणुकीत एकूण ५०.९६ टक्के एवढे मतदान झाले होते.

## लोकसभा निवडणूक १९९१

## सातारा मतदारसंघ (४४)

| अ.क्र. | एकूण मतदार | एकूण मतदान | वैध मतदान | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | ९३१८५६ | ३९८२०४ | ३९०६०३ | ४२.७३ |

## उमेदवारनिहाय मतदान यादी

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. भोसले प्रतापराव बाबुराव | इंडियन नॅशनल कॉंग्रेस | २६११२९ | ६६.८५ |
| ०२ | श्री. हिंदुराव नाईक निंबाळकर | शिवसेना | १०१९१७ | २६.०९ |
| ०३ | श्री. रणनवरे डी. डी. | जनता दल | १२६७५ | ३.२४ |
| ०४ | श्री. जमदाडे के. बी. | जनता पार्टी | ५२४८ | ०१.३४ |
| ०५ | श्री. जाधव लक्ष्मण वामन | भारतीय कृषी उद्योग संघ | ४२१९ | ०१.०८ |
| ०६ | श्री. मेटकरी दस्तगीर कादरभाई | अपक्ष | १८५६ | ०.४८ |
| ०७ | श्री. शेलार कोंडीराम धोंडीबा | अपक्ष | १२१८ | ०.३१ |
| ०८ | श्री. घाडगे शिवाजी कृष्णराव | अपक्ष | ९७० | ०.२५ |
| ०९ | श्री. पतंगे पांडुरंग जनार्दन | दुरदर्शी पार्टी | ७०९ | ०.१८ |
| १० | श्री. बर्गे दत्तात्रय निवृत्ती | अपक्ष | ६६२ | ०.१७[३०] |

सन १९९१ च्या लोकसभा निवडणुकीत उत्तर सातारा लोकसभा मतदार संघात एकूण मतदार ९३१८५६ एवढे असून प्रत्यक्ष मतदान ३९८२०४ एवढे झाले होते. तर त्यामध्ये ३९०६०३ एवढे मतदान वैध ठरले. याही निवडणुकीमध्ये अनेक पक्ष एकमेकांच्याविरूद्ध उभे राहिले होते. त्यामध्ये इंडियन नॅशनल कॉंग्रेस, शिवसेना, जनता दल, जनता पार्टी, भारतीय कृषी उद्योग संघ, दुरदर्शी पार्टी व चार अपक्ष उमेदवार निवडणूकीसाठी उभे राहिले होते. या निवडणुकीत इंडियन नॅशनल कॉंग्रेसचे उमेदवार श्री. भोसले प्रतापराव बाबुराव यांनी शिवसेनेचे उमेदवार श्री. नाईक–निंबाळकर हिंदुराव यांचा १५९२१२ मतांनी पराभव केला होता. श्री. नाईक–निंबाळकर हिंदुराव यांना एकूण १०१९१७ एवढी मते मिळाली होती. जनता दलाचे उमेदवार श्री. रणनवरे डी. डी. यांना १२६७५, जनता पार्टीचे उमेदवार श्री. जमदाडे के. बी. यांना ५२४८, भारतीय कृषी उद्योग संघ या पक्षाचे उमेदवार श्री. जाधव लक्ष्मण वामन यांना ४२१९ मते, अपक्ष उमेदवार श्री. मेटकरी दस्तगिर कादरभाई यांना १८५६, दुसरे अपक्ष उमेदवार श्री.घाडगे शिवाजी कृष्णराव, दुरदर्शी पार्टीचे श्री. पतंगे पांडुरंग जनार्दन यांना ७०९ व

अपक्ष उमेदवार श्री. बर्गे दत्तात्रय निवृत्ती यांना ६६२ मते मिळाली होती. या सर्वांचा दारूण पराभव झालेला होता.

## लोकसभा निवडणूक १९९६

## सातारा मतदारसंघ (४४)

| अ.क्र. | एकूण मतदार | एकूण मतदान | वैध मतदान | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | ९४९९३४ | ५४८७७५ | ५३४२२७ | ५७.७७ |

## उमेदवारनिहाय मतदान यादी

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. हिंदुराव नाईक निंबाळकर | शिवसेना | १९०५२६ | ३५.६६ |
| ०२ | श्री. भोसले प्रतापराव बाबुराव | इंडियन नॅशनल काँग्रेस | १७८७१७ | ३३.४५ |
| ०३ | श्री. भोसले श्री. छ. उदयनराजे प्रतापसिंह | अपक्ष | ११३६८५ | २१.२८ |
| ०४ | श्री. निकम आर. डी. | अपक्ष | २०९१७ | ३.९२ |
| ०५ | श्री. पोळके पार्थ मरिप्पा | अपक्ष | ५८८६ | १.१० |
| ०६ | श्री. जाधव लक्ष्मण वामन | महाराष्ट्र प्रदेश क्रांतिकारी पार्टी | ५७६५ | १.०८ |
| ०७ | डी .नरळे सोनाप्पा रंगू | अपक्ष | ५५६७ | १.०४ |
| ०८ | श्री. शौकतअली बाबालाल मुल्ला | भारिप बहुजन महासंघ | २२१० | ०.४१ |
| ०९ | श्री. कचरे बापूराव भाऊराव | अपक्ष | २१८६ | ०.४१ |
| १० | श्री. जाधव विठ्ठलराव शंकरराव | ऑल इंडीया इंदीरा काँग्रेस (तिवारी) | १९१५ | ०.३६ |
| ११ | श्री. इनामदार गणेश दिगंबर | अपक्ष | १६५३ | ०.३१ |
| १२ | श्री. माने गुलाबराव रामचंद्र | अपक्ष | १६२३ | ०.३० |
| १३ | श्री. हिरेमठ छानबसैय्या मुरगैय्या | अपक्ष | १२३७ | ०.२३ |
| १४ | श्री. दगडोबा बापूराव यादव | अपक्ष | ११८० | ०.२२ |
| १५ | श्री. सहस्त्रबुध्दे शामसुंदर अनंत | अपक्ष | ६१९ | ०.१२ |
| १६ | श्री. नुनेकर जगन्नाथ रामचंद्र | अपक्ष | ५४१ | ०.१०[३१] |

सन १९९६ च्या लोकसभा निवडणुकीत उत्तर सातारा लोकसभा मतदार संघात एकूण मतदार ९४९९३४ एवढे असून  प्रत्यक्ष मतदान ५४८७७५  एवढे झाले होते. त्यामध्ये ५३४२२७ एवढे मतदान वैध ठरले. या निवडणूकीमध्ये अनेक पक्ष एकमेकांविरूद्ध उभे राहिले होते. विशेष म्हणजे आजपर्यत झालेल्या लोकसभा निवडणूकीपेक्षा या निवडणुकीत सर्वात जास्त उमेदवार निवडणूकीसाठी उभे राहिले होते. निवडणूकीसाठी एकूण १६ उमेदवार रिंगणात होते. त्यामध्ये शिवसेनेचे उमेदवार श्री. हिंदुराव नाईक निंबाळकर  यांनी या मतदार संघात प्रथमच शिवसेनेला विजय मिळवून दिलेला होता. त्यामुळे या निवडणुकीत इंडियन नॅशनल काँग्रेसची पिछेहाट झाली होती. या निवडणुकीत इंडियन नॅशनल काँग्रेसचे उमेदवार श्री. भोसले प्रतापराव बाबुराव यांचा श्री. हिंदूराव नाईक निंबाळकर यांनी केवळ ११,८०९ मतांनी पराभव केला होता. याशिवाय इतर पक्षाचे उमेदवार पुढीलप्रमाणे होते. त्यामध्ये महाराष्ट्र प्रदेश क्रांतिकारी पार्टीचे  श्री. जाधव लक्ष्मण वामन, भारिप बहुजन महासंघ पक्षाचे श्री. शौकतअली बाबालाल मुल्ला, ऑल इंडिया इंदिरा  काँग्रेस (तिवारी) या पक्षाचे श्री. जाधव विठ्ठलराव शंकरराव हे होते. तर अपक्ष म्हणून निवडणूक लढविणारे अकरा उमेदवार होते. या सर्व उमेदवारांचा दारूण पराभव झालेला होता. मात्र या निवडणुकीत शिवसेनेला यश मिळाले होते.

## लोकसभा निवडणूक १९९८

## सातारा मतदारसंघ (४४)

| अ.क्र. | एकूण मतदार | एकूण मतदान | वैध मतदान | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | ९६५७७२ | ६०५५२५ | ५९७००० | ६२.७० |

## उमेदवारनिहाय मतदान यादी

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. भोसले अभयसिंह शाहुमहाराज | इंडियन नॅशनल काँग्रेस | ३८९२३८ | ६५.२० |
| ०२ | श्री. नाईक–निंबाळकर हिंदुराव निळकंठराव | शिवसेना | २०७७६२ | ३४.८०[३२] |

सन १९९८ च्या लोकसभा निवडणुकीत उत्तर सातारा लोकसभा मतदार संघात एकूण मतदार ९६५७७२ एवढे असून  प्रत्यक्ष मतदान ६०५५२५  एवढे झाले होते. तर त्यामध्ये

५९७००० एवढे मतदान वैध ठरले. याही निवडणूकीमध्ये दोनच पक्षाचे उमेदवार एकमेकांचे प्रतिस्पर्धी होते. या निवडणुकीत सातारा येथील भोसले राजघराण्याने इंडियन नॅशनल काँग्रेस या पक्षातून सहभाग घेतला होता. आजपर्यत एवढया निवडणूक झाल्या परंतु या घराण्याने तिकडे विशेष लक्ष दिलेले दिसत नाही. या भोसले घराण्यातील श्री. भोसले अभयसिंह शाहुमहाराज यांच्याविरोधात माजी खासदार श्री. नाईक–निंबाळकर हिंदुराव हे निवडणूकीसाठी उभे होते. या निवडणुकीत श्री.भोसले अभयसिंह शाहुमहाराज यांना ३८९२३८ एवढी मते मिळाली. तर शिवसेनेचे उमेदवार श्री. नाईक–निंबाळकर हिंदुराव यांना २०७७६२ मते मिळाली. त्यामुळे त्यांचा या निवडणुकीत दारूण पराभव झाला होता. या निवडणुकीत इंडियन नॅशनल काँग्रेसला विजय मिळाल्याने पुन्हा एकदा सातारा जिल्हयात तिचे महत्व वाढीस लागले होते.

## लोकसभा निवडणूक १९९९

## सातारा मतदारसंघ (४४)

| अ.क्र. | एकूण मतदार | एकूण मतदान | वैध मतदान | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | ९८४४६९ | ७०३०२७ | ६६९२६१ | ७१.४१ |

## उमेदवारनिहाय मतदान यादी

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. जाधव पाटील लक्ष्मणराव पांडुरंग | राष्ट्रवादी काँग्रेस | ३१३३२५ | ४६.८२ |
| ०२ | श्री. नाईक–निंबाळकर हिंदुराव | शिवसेना | १८८५५४ | २८.१७ |
| ०३ | श्री. खर्डेकर निंबाळकर यशवंतराव | इंडियन नॅशनल काँग्रेस | १५९९५३ | २३.९० |
| ०४ | श्री. ॲड. जाधव लक्ष्मण वामन | महाराष्ट्र प्रदेश क्रांतिकारी पार्टी | ३५७१ | ०.५३ |
| ०५ | श्री. जाधव लक्ष्मण सोपान | अपक्ष | २५३५ | ०.३८ |
| ०६ | श्रीमती गायकवाड संगिता जगदिश | अपक्ष | १३२३ | ०.२०[३३] |

सन १९९८ च्या लोकसभा निवडणुकीत उत्तर सातारा लोकसभा मतदार संघात एकूण मतदार ९८४४६९ एवढे असून प्रत्यक्ष मतदान ७०३०२७ एवढे झाले होते. तर त्यामध्ये ६६९२६१ एवढे मतदान वैध ठरले. या निवडणूकीमध्ये एकूण सहा उमेदवार निवडणूकीसाठी उभे होते. या निवडणूकीच्या वेळी मा. शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली

होती. त्यामुळे सातारा जिल्हयातील अनेक खासदार हे राष्ट्रवादी पक्षाला जावून मिळाले होते. तसेच जनतेनेही हा नवीन पक्ष असल्याने व शरद पवार यांचा पक्ष असल्याने या पक्षाचे उमेदवार श्री. जाधव पाटील लक्ष्मणराव पांडुरंग यांना मते देऊन विजय मिळवून दिला होता. त्यांचे प्रतिस्पर्धी शिवसेनेचे उमेदवार हिंदूराव नाईक निंबाळकर यांना १८८५५४, इंडियन नॅशनल काँग्रेस या पक्षाचे उमेदवार श्री. खर्डेकर निंबाळकर यशवंतराव यांना १५९९५३ मते मिळाली होती. महाराष्ट्र प्रदेश क्रांतिकारी पार्टीचे उमेदवार श्री. ॲड. जाधव लक्ष्मण वामन यांना ३५७१ मते मिळाली होती. तर अपक्ष म्हणून दोन उमेदवार होते. त्यामध्ये श्री. जाधव लक्ष्मण सोपान व श्रीमती गायकवाड संगिता जगदिश यांना अनुक्रमे २५३५ व १३२३ इतकी मते मिळाली होती. या सर्वाचा पराभव राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार श्री. जाधव पाटील लक्ष्मणराव पांडुरंग यांनी केला होता.

अशाप्रकारे उत्तर सातारा लोकसभा मतदार संघात सातारा जिल्हयावर इंडियन नॅशनल काँग्रेसचा वरचष्मा असलेला पहावयास मिळतो. काही निवडणुकीत या पक्षाला अपयश मिळाले असले तरी स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेनुसार ज्या निवडणूका पार पडल्या होत्या. त्यामध्ये इतर पक्षाच्या तुलनेत या पक्षाला जास्तीत जास्त वेळा यश मिळालेले पाहावयास मिळते.

## २.७ पंचायत समिती कोरेगाव निवडणूका (इ. स. १९६२ ते २००२)

कोरेगाव पंचायत समितीची निर्मिती १९६२ साली झाली. कोरेगाव पंचायत समिती अंतर्गत १४१ ग्रामपंचायती येतात. यात १० गण असून ०५ गट आहेत.

### कोरेगाव तालुक्यातील गट

०१ पिंपोडे खु. ०२ वाठार स्टे. ०३ सातारा रोड ०४ ल्हासुर्णे ०५ वाठार किरोली

### कोरेगाव तालुक्यातील गण

०१ पिंपोडे खु. ०२ देऊर ०३ वाठार स्टे. ०४ किन्हई ०५ सातारा रोड ०६ कुमठे ०७ ल्हासुर्णे ०८ एकंबे ०९ वाठार किरोली १० साप

### पंचायत समिती कोरेगाव पदाधिकारी व सभासद सन १९६२ ते १९६७

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | गाव | हुद्दा |
|---|---|---|---|
| १ | श्री. हरिभाऊ कृष्णराव धुमाळ | करंजखोप | सभापती |
| २ | श्री. आनंदराव नागेशराव फाळके | सातारारोड | उपसभापती |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्री. हणमंतराव नारायणराव बर्गे | कोरेगाव | जि.प.सदस्य |
| ४ | श्री. आण्णासो. दाजी यादव | आर्वी | जि.प.सदस्य |
| ५ | श्री. सर्जेराव ज्ञानू झांजूर्णे | तडवळे सं.कोरेगाव | जि.प.सदस्य |
| ६ | श्री. भाऊसाो कुष्णराव पवार | नांदवळ | पं.स.सदस्य |
| ७ | श्री. रघुनाथ दत्तोबा जाधव | वाठार स्टे. | पं.स.सदस्य |
| ८ | श्री. इसाक पट्टू इनामदार | पळशी | पं.स.सदस्य |
| ९ | श्री. वसंतराव रामचंद्र भोसले | किन्हई | पं.स.सदस्य |
| १० | श्री. गणपतराव कृष्णा | त्रिपुटी | पं.स.सदस्य |
| ११ | श्री. दत्ताजीराव भाऊसाो बर्गे | कोरेगाव | पं.स.सदस्य |
| १२ | श्री. आनंदराव बंडू जाधव | चिमणगाव | पं.स.सदस्य |
| १३ | श्री. नानासाो कोंडीबा केंजळे | कठापूर | पं.स.सदस्य |
| १४ | श्री. विश्वासराव बळी घाडगे | बोरगाव | पं.स.सदस्य |
| १५ | श्री. एकनाथ पाटलू कणसे | पिंपरी | पं.स.सदस्य |
| १६ | श्री. विठ्ठलराव बळवंतराव घोरपडे | शिरढोण | ::::::::::: |
| १७ | श्रीमती कृष्णाबाई ग्यानबा झांजुणे | तडवळे सं.कोरेगाव[३४] | ::::::::::: |

## पंचायत समिती कोरेगाव

## पदाधिकारी व सभासद सन १९६७ ते १९७२

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | गाव | हुद्दा |
|---|---|---|---|
| १ | श्री. शिवाजीराव भाऊसाो बर्गे | कोरेगाव | सभापती |
| २ | श्री. रामचंद्र विठ्ठल शिंदे | अपशिंगे | उपसभापती |
| ३ | श्री. एकनाथ श्रीपती भोसले | नागझरी | जि.प.सदस्य |
| ४ | श्री. जनार्दन बाबाजी जगदाळे | कुमठे | जि.प.सदस्य |
| ५ | श्री. रामभाऊ भाऊसाो भोईटे | वाघोली | जि.प.सदस्य |
| ६ | श्री.नामदेव अबाजी भोसले | किन्हई | जि.प.सदस्य |
| ७ | श्री. बापूराव सिताराम चव्हाण | दहिगाव | पं.स.सदस्य |
| ८ | श्री. भिकोबा कोंडीबा सोळसकर | सोळशी | पं.स.सदस्य |
| ९ | श्री. इसाक पट्टू इनामदार | पळशी | पं.स.सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | श्री. सुर्यकांत पांडुरंग ढोले | भाडळे | पं.स.सदस्य |
| ११ | श्री. दत्ताजीराव भाऊसाो बर्गे | कोरेगाव | पं.स.सदस्य |
| १२ | श्री. रामचंद्र निळू केंजळे | कठापूर | पं.स.सदस्य |
| १३ | श्री. व्यंकटराव कृष्णराव नलवडे | नलवडेवाडी | पं.स.सदस्य |
| १४ | श्री. दत्तात्रय गणपती कदम | अपशिंगे | पं.स.सदस्य |
| १५ | श्री. वसंतराव कृष्णराव कदम | खेड | पं.स.सदस्य |
| १६ | श्री. भिकू रामा माने | भोसे | पं.स.सदस्य |
| १७ | श्रीमती कृष्णाबाई ग्यानबा झांजुणे | तडवळे सं.कोरेगाव | ::::::::::: |
| १८ | श्री. बचाराम धोंडिबा काटकर | त्रिपुटी[३५] | ::::::::::: |

## पंचायत समिती कोरेगाव

## पदाधिकारी व सभासद सन १९७२ ते १९७९

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | गाव | हुद्दा |
|---|---|---|---|
| १ | श्री. इसाक पट्टू इनामदार | पळशी | सभापती |
| २ | श्री. जनार्दन बाबाजी जगदाळे | कुमठे | उपसभापती |
| ३ | श्री. शंकरराव चिमाजी जगताप | वाघोली | जि.प.सदस्य |
| ४ | श्री. अर्जुन गणपत जाधव | भक्तवडी | जि.प.सदस्य |
| ५ | श्री. शिवाजीराव भाऊसाो बर्गे | कोरेगाव | जि.प.सदस्य |
| ६ | श्री. तुकाराम पांडुरंग भोसले | नागझरी | जि.स.सदस्य |
| ७ | श्री. गंगाराम तुकाराम साळुंखे | पिंपोडे बु. | जि.प.सदस्य |
| ८ | श्री. बापूराव सिताराम चव्हाण | दहिगाव | पं.स.सदस्य |
| ९ | श्री. सुर्यकांत पांडुरंग ढोले | भाडळे | पं.स.सदस्य |
| १० | श्री. सर्जेराव ज्ञानू झांजुर्णे | तडवळे सं.कोरेगाव | पं.स.सदस्य |
| ११ | श्री. भिकू रामा माने | भोसे | पं.स.सदस्य |
| १२ | श्री. कृष्णराव बाबुराव घोरपडे | शिरढोण | पं.स.सदस्य |
| १३ | श्री. हणमंतराव नारायणराव बर्गे | कोरेगाव | पं.स.सदस्य |
| १४ | श्री. लक्ष्मण बापूजी गायकवाड | वाठार किरोली | पं.स.सदस्य |
| १५ | श्री. कृष्णराव आनंदराव जाधव | साप | पं.स.सदस्य |
| १६ | श्री. दत्ताजीराव भाऊसाो बर्गे | कोरेगाव | पं.स.सदस्य |
| १७ | श्री. शिवराम बाळा बडेकर | तडवळे सं.वाघोली | ::::::::::: |
| १८ | सौ. लीला मानसिंग माने | कोरेगाव | ::::::::::: |
| १९ | श्री. व्यंकटराव कृष्णराव नलवडे | नलवडेवाडी[३६] | ::::::::::: |

## पंचायत समिती कोरेगाव

## पदाधिकारी व सभासद सन १९७९ ते १९९०

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | गाव | हुद्दा |
|---|---|---|---|
| १ | श्री. बापूराव सिताराम चव्हाण | दहिगाव | सभापती |
| २ | श्री. व्यंकटराव कृष्णराव नलवडे | नलवडेवाडी | उपसभापती |
| ३ | श्री. इसाक पट्टू इनामदार | पळशी | जि.प.सदस्य |
| ४ | श्री. आनंदराव बंडू जाधव | चिमणगाव | जि.प.सदस्य |
| ५ | श्री. शिवाजीराव भाऊसाो बर्गे | कोरेगाव | जि.प.सदस्य |
| ६ | श्रीमती लीला शिवाजी कदम | खेड | जि.स.सदस्य |
| ७ | श्री. अंकुश लक्ष्मण जाधव | वाठार स्टे. | पं.स.सदस्य |
| ८ | श्री. सुरेश गंगाराम साळुंखे | पिंपोडे बु. | पं.स.सदस्य |
| ९ | श्री. मारूतराव महादेव भोसले | रेवडी | पं.स.सदस्य |
| १० | श्री. वसंत आबाजी गाढवे | सातारारोड | पं.स.सदस्य |
| ११ | श्री. शंकर कृष्णा कदम | खेड | पं.स.सदस्य |
| १२ | श्री. भिकू रामा माने | भोसे | पं.स.सदस्य |
| १३ | श्री. रामचंद्र बाजीराव घोरपडे | एकंबे | पं.स.सदस्य |
| १४ | श्री. मुरलीधर लक्ष्मण बर्गे | कोरेगाव | पं.स.सदस्य |
| १५ | श्री. पांडुरंग दादु गायकवाड | वाठार किरोली | पं.स.सदस्य |
| १६ | श्री. निवृत्ती दादू बनसोडे | सुर्ली | पं.स.सदस्य |
| १७ | श्री. जमुना राजाराम कदम | पिंपोडे खु. | ::::::::::: |
| १८ | श्री. कृष्णराव आनंदराव जाधव | साप | ::::::::::: |
| १९ | श्री. दत्ताजीराव भाऊसाो बर्गे | कोरेगाव[३७] | ::::::::::: |

## पंचायत समिती कोरेगाव

## पदाधिकारी व सभासद सन १९९२ते १९९७

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | गाव | हुद्दा |
|---|---|---|---|
| १ | श्री. जगन्नाथ भाऊसाो झांजुर्णे | कोरेगाव | सभापती |
| २ | श्री. भिमराव परशराम पाटील | वाठार किरोली | उपसभापती |
| ३ | श्री. इसाक पट्टू इनामदार | पळशी | जि.प.सदस्य |
| ४ | श्री. उत्तम कुंडलिक शिंदे | खेड(नांदगिरी) | जि.प.सदस्य |
| ५ | श्री. सुरेश गंगाराम साळुंखे | पिंपोडे बु. | जि.प.सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | श्री. बबनराव सावळाराम चव्हाण | एकंबे | जि.स.सदस्य |
| ७ | श्रीमती महानंदा गोपाळराव जाधव | भक्तवडी | जि.स.सदस्य |
| ८ | श्रीमती बबई शिवाजीराव घाडगे | कोरेगाव | जि.स.सदस्य |
| ९ | श्री. विठ्ठल तुकाराम निकम | न्हावी बु. | जि.स.सदस्य |
| १० | श्री. विजयराव बाबुराम कणसे | धामणेर | पं.स.सदस्य |
| ११ | श्री. श्रीमंत सर्जेराव झांजुर्णे | तडवळे सं.कोरेगाव | पं.स.सदस्य |
| १२ | श्री. मारूती महादेव भोसले | रेवडी | पं.स.सदस्य |
| १३ | श्री. प्रकाश ज्योत्याजीराव फाळके | सातारारोड | पं.स.सदस्य |
| १४ | श्री. दत्तात्रय रघुनाथ भगत | विखळे | पं.स.सदस्य |
| १५ | श्री. बबनराव यशवंतराव भोईटे | वाघोली | पं.स.सदस्य |
| १६ | श्री. दिलीप रामचंद्र घोडके | कोरेगाव | पं.स.सदस्य |
| १७ | श्री. तानाजी महादेव मदने | रामोशीवाडी | पं.स.सदस्य |
| १८ | श्रीमती भारती रविंद्र बर्गे | कोरेगाव | पं.स.सदस्य |
| १९ | श्रीमती मंगल संपत गायकवाड | कुमठे | पं.स.सदस्य |
| २० | श्रीमती गोदावरी शिवाजी कदम | देऊर | पं.स.सदस्य |
| २१ | श्रीमती बिंदू रविंद्र जगताप | रणदुल्लाबाद | पं.स.सदस्य |
| २२ | श्री.प्रतापराव दत्ताजीराव बर्गे | कोरेगाव | पदसिद्ध सदस्य |
| २३ | श्री. रामचंद्र कृष्णराव नावडकर | राऊतवाडी | स्वीकृत सदस्य[३८] |

## पंचायत समिती कोरेगाव

## पदाधिकारी व सभासद सन १९९७ ते २००२

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | गाव | हुद्दा |
|---|---|---|---|
| १ | सौ. आशा संजय आवडे | सातारारोड | सभापती |
| २ | (१४.०३.१९९७ ते २००१) | कोरेगाव | उपसभापती |
| ३ | श्री. किशोर बबनराव बाचल (१४.०३.१९९७ ते २००१) | तारगाव | पं.स.सदस्य |
| ४ | श्री. सुनिल महादेव मलवडकर | नागझरी | पं.स.सदस्य |
| ५ | श्री. तात्याबा शंकर यादव | कोरेगाव | पं.स.सदस्य |
| ६ | सौ. सुरेखा रमेश पाटील | कठापूर | पं.स.सदस्य |
| ७ | सौ. भारती प्रल्हाद केंजळे | भोसे | पं.स.सदस्य |
| ८ | श्री. तुकाराम ज्ञानू माने | पिंपोडे बु. | पं.स.सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | श्री. शिवाजी भगवान कदम | हिवरे | पं.स.सदस्य |
| १० | श्री. जालींदर शामराव कदम | देऊर | पं.स.सदस्य |
| ११ | श्री. लक्ष्मण आप्पा खताळ | सोनके | पं.स.सदस्य |
| १२ | श्री. संभाजी नानासाो धुमाळ | अनपटवाडी | सभापती |
| १३ | सौ. सुनंदा राजेद्र धर्माधिकारी | अंभेरी | सभापती |
| १४ | सौ. कमल विजय निकम | रामोशीवाडी | पं.स.सदस्य[३५] |

## २. ८ उत्तर सातारा लोकसभा मतदारसंघ व कोरेगाव तालुक्यातील राजकारणात बदल घडवून आणणाऱ्या काही व्यक्ती

### १) क्रांतिसिंह नाना पाटील :-

क्रांतिसिंह नाना पाटील यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महाराष्ट्राचे विशेषतः सातारा जिल्हयाचे नेतृत्त्व केले. क्रांतिसिंह नाना पाटील यांनी छ. शिवाजी महाराजांच्या इतिहासाचे मूलतत्त्व लक्षात घेऊन आणि इंग्रजी सत्ता भारतातून गेल्याशिवाय भारतीय शेतकरी सुखी होणार नाही. या जिद्दीने ते स्वातंत्र्य लढयात उतरले. यामध्ये त्यांनी ऑगस्ट १९४२ च्या चले-जाव आंदोलनात सहभाग घेतला होता. क्रांतिसिंह नाना पाटील म्हणजे स्वातंत्र्य लढयाच्या पर्वातील निर्धारी, निश्चयी नेतृत्त्व होय.

क्रांतिसिंह नाना पाटील यांचा जन्म ३ ऑगस्ट १९०० रोजी सातारा जिल्हयातील वाळवे तालुक्यात (बोरगाव) येथे त्यांच्या आजोळी झाला. त्यांचे गाव येडेमच्छिंद्र हे होय. त्यांच्या आईचे नाव गोजराबाई व वडिलांचे नाव रामचंद्र पाटील हे होते. नांनाचे घराणे हे वारकरी संप्रदायाचे असल्याने त्यांनाही वारकरी बनविण्यात आले.

बालपणी नाना अत्यंत वात्रट, खोडकर आणि पुंडावा करणारे असे होते. आई-वडिलांची परिस्थिती गरिबीची असताना देखील नानांना शाळा शिकविले. सन १९१८ मध्ये नाना फायनल परीक्षा पास झाले. वडिलांच्या इच्छेनुसार त्यांनी त्यांच्याच गावात तलाठयाच्या हाताखाली नोकरी धरली. त्यामुळे त्यांना कायद्याचे ज्ञान थोडेफार मिळू लागले. त्याचवेळी कोल्हापूर प्रांतात सत्यशोधक चळवळ सुरू झाली. कासेगावचा नाथोबा सत्यशोधक जलसा येडेमच्छिंद्र येथे आला. नानांनी तो पाहिला. एवढेच नव्हे तर त्या भागातील सर्व जलसे पाहण्यासाठी नाना जाऊ लागले. तेथून त्यांच्या सामाजिक कार्यास सुरूवात झाली. पुढे त्यांनी

मुंबई कौन्सिलच्या निवडणुकीत कूपर विरूद्ध नामदार भास्करराव जाधव यामध्ये नानांनी भास्करराव यांची बाजू घेऊन प्रचार सुरू केला. त्यामुळे त्यांचे तलाठयाच्या कामाकडे दुर्लक्ष झाले. म्हणून प्रांतानी नानांना तलाठयाच्या कामावरून सस्पेंड केले. त्याचा परिणाम असा झाला की, नानांच्या आयुष्यात क्रांतिकारी विचार आले. त्यांनी गुलामगिरी सोडून ते स्वातंत्र्योन्मुख बनले.[४०]

**जंगल सत्याग्रहातील सहभाग**

नाना पाटील यांना तलाठयाच्या नोकरीतून सस्पेंड केल्यानंतर त्यांनी नोकरी सोडून दिली. सतत दोन वर्षे भूमिगत राहून खेडोपाडयातील सामान्य जनतेचे स्वातंत्र्यासाठी जागरण करीत ते फिरत होते. बिळाशीच्या जंगल सत्याग्रहात त्यांनी भाग घेतला होता. त्याचबरोबर रेठरे जंगल सत्याग्रहाचा शुभारंभ नाना पाटील यांच्या हस्ते नारळ फोडून झाला होता.[४१]

**८ ऑगस्ट १९४२ चा ठराव**

८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथे काँग्रेस कमिटीने 'ब्रिटीशांनो चालते व्हा , असा इंग्रजांना निर्वाणीचा इशारा देणारा ठराव प्रचंड मतांनी मंजूर केला. मुंबईतील या अधिवेशनास क्रांतिसिंह नाना रामचंद्र पाटील हे मुंबईला न जाता संघटना बांधणीसाठी सातारा जिल्हयातच राहिले. 'छोडो भारत' हा ठराव समंत होताच ९ ऑगस्ट १९४२ रोजी क्रांतिसिंह नाना पाटील विटा येथे सभा घेऊन कुंडल गावी आले.' कुंडल गाव हे त्यांच्या कार्यकर्त्याचे कार्यक्षेत्र होते. तेथे त्यांनी १००-१५० कार्यकर्त्याची सभा घेऊन त्यात पाटील यांनी न सापडता सभांचा कार्यक्रम करावा असा ठराव झाला व इस्लामपूर या तालुक्याच्या गावी होणारी सभा रहीत करून लहान लहान खेडेगावी सभेच्या रूपाने प्रचार करण्याचे पाटील यांनी अंगिकारले.[४२]

**क्रांतिसिंह नाना पाटील यांचे १९४२ च्या चळवळीतील कार्य**

महात्मा गांधी व काँग्रेस श्रेष्ठी यांना ९ ऑगस्टच्या पहाटेच्या वेळी पोलिसांनी अटक केल्याने सातारा जिल्हयात प्रचंड लोकक्षोभ पसरला. सातारा जिल्हयात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्यासह भूमिगत झालेल्या कार्यकर्त्यानी आंदोलन सुरू केले. सरकारी दडपशाहीच्या अंमलाने व पोलिसांच्या हिंसाचाराने प्रक्षुब्ध झालेल्या जनतेने जिल्हयातील सर्व शहरामध्ये व शेकडो गावांमध्ये स्वयंस्फूर्त हरताळ पाळला. सरकारी कारवाईच्या विरोधात निषेधपर सभा झाल्या. घोषणा, मिरवणूका, प्रचार सभा व निषेधाच्या सभा यामुळे वातावरण तापले. उत्स्फूर्त हरताळ,

निरोधने व शाळावरील बहिष्काराने आंदोलनाचा प्रारंभ झाला. महात्मा गांधीजींचा 'करेंगे या मरेंगे' हा संदेश गावोगावापर्यंत पोहोचला. त्यामुळे लोक भारावून जाऊन आपण स्वतंत्र झालो अशा भावनेने प्रेरित झाले. प्रारंभी या चळवळीची सुरूवात शांततेच्या मार्गाने झाली होती. परंतु सरकारच्या दडपशाहीच्या धोरणाने या चळवळीस हिंसक वळण लागले.[४३]

**मामलेदार कचेरीवर मोर्चा**

क्रांतिसिंह नाना पाटील यांनी किर्लोस्करवाडीच्या कारखान्यात संप घडवून आणला. २४ ऑगस्ट १९४२ रोजी कराडच्या तालुका कार्यालयावर पहिला मोर्चा काढण्यात आला. या मोर्च्याचे नेतृत्त्व बाळकू आण्णा पाटील उंडाळकर, काशिनाथ राजाराम देशमुख, ल. ग. कुलकर्णी व यशवंतराव चव्हाण इ. नेत्यांनी केले होते. याच पद्धतीने पाटणच्या कार्यालयावरही मोर्चा काढण्यात आला. सातारा जिल्हयातील मोर्च्याच्याबाबत सर्वात मोठी घटना म्हणजे तासगाव मामलेदार कचेरीवर काढलेला मोर्चा होय. या मोर्च्याचे नेतृत्त्व स्वतः क्रांतिसिंह नाना पाटील यांनी न करता कृष्णा रामा कुऱ्हाडे, वि. स. पागे, गोविंद खोत, डॉ. सोहनी यांच्याकडे सोपविले. या मामलेदार कार्यालयावर भूमिगत कार्यकर्ते गेले, तेव्हा या मामलेदारकडे ३३ सशस्त्र व नऊ लाठीधारी पोलिसांची तुकडी होती. तथापि मोर्चाची धडक इतकी जोरात होती की, मामलेदारास प्रतिकार करणे शक्य झाले नाही. इतकेच नव्हे, तर त्याने आपल्या कार्यालयाचा मुख्य दरवाजा उघडून कार्यालयावर काँग्रेसचा राष्ट्रध्वज फडकवून झेंडा–वंदन करू दिले. पुढाऱ्यासमवेत राष्ट्रीय घोषणा दिल्या. तसेच या पूर्वी अटक केलेल्या स्वातंत्र्य सैनिकांना भेटण्याची परवानगी पुढाऱ्यांना दिली. शासकीय अधिकाऱ्यांनी काँग्रेसच्या मोर्चापुढे पत्करलेल्या अशा शरणागतीने मुंबई इलाख्याचे प्रशासन फारच अस्वस्थ झाले होते.[४४]

**रेल्वे रूळ उखडणे**

सातारा जिल्हयात भूमिगत कार्यकर्त्यांनी रेल्वे गाडया रूळावरून घसरविण्याची मोहिम सुरू केली . इंग्रज सरकारची सेनादलाची आणि युद्ध सामग्रीची वाहतूक विस्कळीत करून सरकारला जेरीस आणणे हा हेतू होता. या घटना अशा पद्धतीने आयोजित करण्यात येते की, फारशी प्राणहानी न होता दळणवळणात अधिकाधिक खंड पडावा. नाना पाटील यांनी इस्लामपूरच्या मोर्चानंतर खानापूर तालुक्यातील १०–१५ गांवचे शेतकरी घेऊन रेल्वे रूळ उखडले. ऑक्टोबर १९४२ पासून प्रारंभ झालेल्या या घटनांनी इंग्रज प्रशासन भयंकर अस्वस्थ

झाले होते. शांततामय मार्गाने सरकार विरूद्धचा राग प्रकट करणे अशक्य झाल्याने आंदोलनात घातपात आणि हिंसाचाराचा अवलंब करण्याशिवाय काँगेसजनांना दुसरा मार्ग उरला नव्हता.[४५]

## क्रांतिसिंह नाना पाटील यांचे प्रतिसरकारमधील कार्य

सातारा जिल्हयात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली जी चळवळ झाली, तिचे स्वरूप पुढीलप्रमाणे होते. सरकारी दळणवळणाची साधने आणि सरकारी कार्यालये यावर हल्ले करणे, ब्रिटिश सरकार न मानने, मुलकी व पोंलिस पाटील यांचे राजीनामे घेऊन सरकारी यंत्रणा बंद पाडणे, पोलिसांची हत्यारे पळवून नेणे व तरूणांची सशस्त्र दले उभारणे, महात्मा गांधी व नाना पाटील यांचे जयजयकार करीत दरोडे घालणाऱ्यांचा बंदोबस्त करणे, गावातील कज्जे कोर्टातून काढून त्यांचा पंचायतीमार्फत निकाल करणे व ते अमलात आणणे, द्विभार्या प्रतिबंध करणे, संपूर्ण दारूबंदीचा अमंल करणे, साधेपणाने लग्नविधी करणे, शिक्षणाला प्रोत्साहन देणे इत्यादी.[४६]

प्रतिसरकारचे कार्य पाहून पोलिसांनी गुन्हेगारांना हाताशी धरून काँग्रेसची चळवळ बदनाम करण्यास सुरूवात केली. सातारा येथील पोलीस अधिक्षक गिल्बर्ट याने दरोडेखोरांना हाताशी धरून काही सवलती दिल्या. त्यानुसार भूमिगतांना समूळ नष्ट करण्याचे धोरण स्वीकारले. त्यामुळे हे दरोडेखोर नाना पाटील यांच्या नावाने दरोडे टाकू लागले. प्रचंड महागाई, अन्नधान्याचा तुटवडा, सक्तीची धान्य लेव्ही, दुष्काळी परिस्थिती इत्यादी आर्थिक समस्यांनी लोक वैतागले होते. त्यात या दरोडेखोरांची भर पडली. त्यामुळे लोक न्याय व संरक्षण मिळण्याच्या अपक्षेने काँग्रेसकडे पाहू लागले. त्यासाठी काँग्रेसनेही समांतर शासन यंत्रणा संघटित केली. या प्रतिसरकारने साठेबाजी करणाऱ्यांचे धान्याचे साठे, कर्जबाजारी लोकांचे शोषण करणाऱ्या सावकारांचे धन, रेशन दुकानातील वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्यांचे साठे हस्तगत करण्याचे कार्य सुरू केले.

नाना पाटील यांनी गनिमी कारवायांनी सरकारला त्रस्त केले होते. तालुका कोषागर व पोलीस चौकीवर झालेल्या हल्ल्यांना नाना पाटीलच जबाबदार आहेत. म्हणून त्यांना पकडण्यासाठी पोलीस यंत्रणेने सर्व मार्गाचा अवलंब करूनही पोलिसांना लोकांची काहीच मदत मिळत नव्हती. मात्र ४ जानेवारी १९४३ रोजी झालेल्या सशस्त्र हल्ल्याशी नानांचा संबंध असूनही काही गावकऱ्यांनी पोलिसांना मदत केली. स्वातंत्र्य आंदोलक व गावकरी यांच्यात

लढाई होऊन यामध्ये बरेच लोक जखमी झाले होते. त्यांनी स्वातंत्र्य सैनिकांना पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. गावकरी सरकारला मदत करत असल्याने सरकारने त्यांना त्या वर्षीच्या जमीन महसूलात सुट दिली. याचा अर्थ काही लोक सरकारलाही सक्रीय मदत करीत होते.[४७]

प्रतिसरकारने केलेल्या धाडसी कृत्यामुळे भूमिगत कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढला होता. मात्र त्याबरोबर पोलिसांचे दडपणही वाढले होते. पोलिसांचे खबरे प्रतिसरकारच्या स्वातंत्र्य सैनिकांची माहिती पोलिसांना पुरवित असत. त्यामुळे अनेकांना शिक्षा भोगावी लागत असे. प्रतिसरकारचे काही कार्यकर्ते पोलिसांचा गणवेश करून जमीन महसूल व निधी गोळा करीत. पोलिसांच्या खबऱ्या हैराण करीत असत. काही सरकारनिष्ठ लोक खास करून पोंलिस पाटील भूमिगत सैनिकांची माहिती पोलिसांना पुरवित. म्हणून अशा विरोधकांचा समाचार घेण्यासाठी प्रतिसरकाचे कार्यकर्ते तुरळक हिंसाचार करण्यासाठीही प्रवृत्त होत असत. ते पोलिसांच्या खबऱ्यांच्या तळपायावर मिठाचे पाणी ओतून काठीचे आघात करून त्यांना चालणे अशक्य करीत. शिक्षेचा हा प्रकार पत्री लावणे या नावाने ओळखला जात असे. यावरूनच प्रतिसरकाला अपभ्रंशाने 'पत्री सरकार' हे नाव मिळाले. या संघटनेतील कार्यकर्ते जीवावर उदार होऊन इंग्रजांचे सरकार उखडून टाकण्यासाठी करीत असलेल्या संग्रामाला आम जनतेचा पाठिंबा होता. चळवळीतील लोकांबद्दल जनतेच्या मनात आदराचे स्थान होते. जनतेच्या पाठिंब्यामुळेच १ जून १९४३ पासून १३ जून १९४६ पर्यत प्रतिसरकार कार्यरत राहिले.[४८]

१९२० ते १९४२ या काळात नाना अनेक वेळा तुरूंगात गेले. १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीचे कार्य करण्यासाठी त्यांनी नोकरीचा त्याग केला. नाना पाटील यांनी ग्रामीण भागातील, बहुजन समाजातील लोकांचा स्वाभिमान जागृत करून त्यांना स्वातंत्र्य चळवळीत सहभागी करून घेणे हे क्रांतिसिंहांचे प्रमुख योगदान होय.[४९]

१९४२ ते ४६ या काळात ते भूमिगतच होते. ते ब्रिटिशांना सापडले नाहीत. शेवटी ब्रिटिशांनी त्यांच्या घरावर जप्ती आणली. त्यांची जमीनही सरकारजमा केली. याच काळात त्यांच्या मातोश्रीचे निधन झाले. १९४६ साली सातारा भूमिगतांवरील नाना पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांच्यावरील पोलिस वॉरंट रद्द केली. क्रांतिसिंह नाना पाटील आपल्या सर्व भूमिगत कार्यकर्त्यांच्यासह कराड तालुक्यातील कोणेगाव येथे हे १९४६ मध्ये प्रकट झाले. त्यानंतर

त्यांचे व त्यांच्या सहकार्यांचे मोठया प्रमाणावर सत्कार झाले. त्यावेळी केशवराव जेधे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांनी नाना पाटील व सातारचे भूमिगत कार्यकर्ते यांचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यास सुरूवात केली. त्याचबरोबर मुंबई इलाख्याचे बाळासाहेब खेराचे मंत्रिमंडळ हे वरिष्ठ वर्गाची पाठराखण करीत असून बहुजन समाजाच्या विरोधात काम करत असल्याची टीका जाहीरपणे करण्यास सुरूवात केली. त्यामुळे त्यांच्या विरोधात केशवराव जेधे, क्रांतिसिंह नाना पाटील, शंकरराव मोरे, तुळशीदास जाधव, भाऊसाहेब राऊत, दत्ता देशमुख, काकासाहेब वाघ हे बहुजन समाजातील नेत्यांनी ऑगस्ट १९४८ रोजी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली.[५०]

शेतकरी कामगार पक्ष्याच्या स्थापनेनंतर क्रांतिसिंह नाना पाटील पुन्हा एकदा संपूर्ण महाराष्ट्रभर झंझावती दौरा काढून पक्ष्याला महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात जनमाणसामध्ये भक्कम आधार मिळवून दिला. तथापि शेकाप पक्ष्यामध्येही शंकरराव मोरे यांच्या स्वभावामुळे क्रांतिसिंह नाना पाटील, दत्ता देशमुख, भाई संथा या पुढाऱ्यांचे त्यांचे पटले नाही. त्यामुळे १९५२ मध्ये शेतकरी कामगार पक्ष सोडून कामगार किसान पक्ष या नव्या पक्षाची स्थापना केली.

१९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत शेतकरी कामगार पक्ष व कामगार किसान पक्ष एकमेंकाच्या विरोधात लढले. याचा परिणाम असा झाला की, या दोन्ही पक्षाचे नुकसान होऊन फायदा काँग्रेस पक्षाला झाला. व काँग्रेस पक्ष बहुमताने निवडून आला. त्यानंतर केशवराव जेधे, शंकरराव मोरे, तुळशीदास जाधव यासारखे शेकाप नेते काँग्रेसला जाऊन मिळाले. कामगार किसान पक्षातही फूट पडली. या सर्व गोष्टीचा विचार करून शेवटी क्रांतिसिंह नाना पाटील यांनी १९५३ मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला व शेवटपर्यत याच पक्षात कार्य करीत राहिले.[५१]

क्रांतिसिंह नाना पाटील यांचे महाराष्ट्रातील बहुजन समाज, कष्टकरी शेतकरी वर्गाविषयीचे काम लक्षात घेऊन कम्युनिस्ट पक्षाने महाराष्ट्रातील किसान सभेची जबाबदारी त्यांच्यावरच सोपवली. एवढेच नव्हे तर १९५४ मध्ये महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या अध्यक्षपदी त्यांची बिनविरोध निवड झाली. १९५५ च्या मे महिन्यात अखिल भारतीय किसान सभेच्या अध्यक्षपदी निवड झाली. किसान सभेच्या व्यासपीठावरून त्यांनी शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्नांना वाचा फोडली, अनेक लढे लढवले. वाढीव पाणीपट्टी विरूद्धचा लढा, खंडकरी शेतकऱ्यांचा

लढा, धरणग्रस्त शेतकऱ्यांचा लढा,  सक्तीच्या लेव्ही विरूद्धचा लढा असे अनेक प्रश्न घेऊन पुन्हा एकवेळ स्वातंत्र्यातील, सत्ताधीशांच्या विरोधात तीव्र संघर्ष केला. शेतीमालाच्या बाजारभावाची कैफियत त्यांनीच या देशाच्या संदर्भात पहिल्यांदा मांडली. शेतकऱ्याने पिकविलेल्या शेतीमालाचे भाव त्यांच्या उत्पादन खर्च लक्षात घेऊन सरकारने बांधून दिले पाहिजेत ही मागणी या देशात पहिल्यांदा क्रांतिसिंह नाना पाटील यांनी मांडली. क्रांतिसिंह नाना पाटील यांना ऑगस्ट १९५५ मध्ये सोव्हियत युनियनने आपल्या देशाच्या भेटीचे निमंत्रण दिले. या निमंत्रणावरून भारतीय शेतकऱ्यांच्या शिष्ट मंडळाचे नेतृत्त्व करून सोव्हिएत युनियन, झेकोस्लोव्हाकिया व हंगेरी या देशांना भेटी देण्याचा बहुमान मिळाला. सन १९५७ साली सातारा व १९६७ साली बीड मतदारसंघातून ते लोकसभेवर निवडून गेले.[५२] संसदेत मराठीतून भाषण करणारे ते पहिले खासदार होते.[५३] क्रांतिसिंह नाना पाटील यांचा मृत्यू ६ डिसेंबर १९७६ रोजी वाळवा या गावी झाला.[५४]

**मा. श्री. यशवंतराव चव्हाण**

मा. यशवंतराव चव्हाण हे  सुधारणावादी विचारांचे अग्रदूत व अशाच प्रकारचे गूढ तत्वज्ञानवादी म्हणून त्यांचा भारताच्या राजकीय धोरणात प्रभाव उमटलेला दिसून येतो. महराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनण्याचा बहुमान मा. यशवंतराव चव्हाण यांना मिळाला होता. यावरूनच त्यांच्या कार्याचे महत्व लक्षात येते. मा. श्री. यशवंतराव चव्हाण यांनी बहुजन समाजाच्या सर्वांगीण विकासाचा विचार करून समाजवादी समाजरचना निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. त्यांच्या नेतृत्वामध्ये सामान्य लोकांना दिलेले विशिष्ट स्थान, प्रतिष्ठा किंवा गुणवत्ता दिसून येते. त्याच्याच जोरावर त्यांनी राजकारण करून देशासह महाराष्ट्राचा विकास केलेला दिसून येतो. यशवंतरावांनी आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक, आर्थिक, सांस्कृतिक, जडणघडणीत मोलाचे योगदान दिलेले दिसते. 'यशवंतराव चव्हाण ही एक व्यक्ती नसून तो एक विचार आहे' असे का म्हटले जाते याचे कारण त्यांनी महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक परिवर्तनाच्या विचारधारेला विकसित केले होते. त्यांनी सत्तास्थानी राहून आपल्या विचारांना व्यावहारीकदृष्टया महत्त्वपूर्ण बनविले.

**पुर्वचरित्र :**

यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्हयातील देवराष्ट्रे या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव श्री. बळवंतराव आणि आईचे नाव विठाबाई होते. यशवंतराव चव्हाण केवळ ४ वर्षाचे असताना सन १९१७ मध्ये त्यांच्या वडिलांचे प्लेगच्या साथीमध्ये निधन झाले. त्यामुळे त्यांना आपले बालपण आई विठाबाई समवेत देवराष्ट्रे येथ घालवावे लागले. एवढेच नव्हे तर यशवंतरावांना घडविण्याची संपूर्ण जबाबदारी त्यांची माता विठाबाई यांच्यावर येऊन पडली ती जबबदारी त्यांनी चांगल्या प्रकारे बजावली. यशवंतराव चव्हाण यांच्या प्राथमिक शिक्षणाची सुरूवात देवराष्ट्रे या गावी झाली. तेथे अपुरे राहिलेले प्राथमिक शिक्षण व माध्यमिक शिक्षण त्यांनी कराडला घेतले. मुंबई विद्यापीठातून त्यांनी सन १९३८ मध्ये इतिहास व राज्यशास्त्र या विषयांतून बी. ए. पदवी मिळवली. पुढे सन १९४१ मध्ये पुण्याच्या लॉ कॉलेजमधून एल. एल. बी. पदवी प्राप्त केली. यशवंरावांचा विवाह फलटण येथील मोरे घराण्यातील वेणूताई यांच्याशी झाले.

**मा. यशवंतराव चव्हाण यांच्या राजकारणातील घडामोडी :–**

महात्मा गांधीजींनी सन १९३० मध्ये सविनय कायदेभंग चळवळ सुरू केली. त्यांच्या या चळवळीमुळे यशवंतराव चव्हाण प्रभावित झाले. त्यावेळी त्यांचे शिक्षण सुरू होते. या चळवळी वेळी यशवंतरावांनी तिरंगा फडकवला म्हणून त्यांना अठरा महिन्यांची सक्त मजूरीची शिक्षा झाली होती. यशवंतराव चव्हाण यांची सन १९४० मध्ये सातारा जिल्हा कॉग्रेसच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. १९४२ साली भारतात चलेजाव आंदोलन सुरू झाले. त्यावेळी यशवंतराव चव्हाण यांनी भूमिगत राहून कार्य केले. त्यावेळी ते पकडले जाऊन त्यांना दोन वर्षांची कारावासाची शिक्षा भोगावी लागली होती. तरीही त्यांनी न घाबरता आपले राजकीय कार्य पुढे चालूच ठेवले. यशवंतराव चव्हाण हे १६४६ साली दक्षिण सातारा मतदार संघातून कायदेमडळांच्या निवडणुकीत निवडून गेले. त्यावेळी त्यांना गृहखात्याचे पार्लेमेंटरी सेक्रेटरी म्हणून नेमण्यात आले. सन १९५२ मध्ये कराड मतदारसंघातून विधानसभेवर निवड होऊन ते नागरी पुरवठा मंत्री झाले.[५५] सन १९५६ मध्ये व्दिभाषिक मुंबई राज्याची स्थापना होऊन व्दिभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांची निवड झाली.[५६] १९५६ ते १९६० हा कालखंड संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा होता. गुजराती पुढारी मुंबई गुजरात राज्याला मिळावी

यासाठी प्रयत्नशील होते. या बिकट प्रसंगी यशवंतरावांच्या नेतृत्वाची कसोटी लागली. यशवंतराव चव्हाण नेहमी पं.नेहरूंना झुकते माप देत असत. त्यांच्या या वागण्यामुळे काही काळ संयुक्त महाराष्ट्र चळवळवादी आणि यशवंतराव चव्हाण यांच्यात तणाव निर्माण झालेला दिसतो. त्यांची भूमिका स्पष्ट होती की, आधी केंद्रीय नेतृत्त्व मुंबईसह महाराष्ट्र या कल्पनेला राजी होऊ द्यावे. यशवंतराव चव्हाण यांनी फलटण येथील १ डिसेंबर १९५५ च्या सभेतील भाषणात, संयुक्त महाराष्ट्रापेक्षा पं. नेहरू अधिक मोठे आहेत. त्यांच्या नेतृत्त्वाचा आदर करणे हे मी अधिक महत्त्वाचे समजतो.असे म्हटले होते.[५७] त्यांच्या या भूमिकेमुळे यशवंतराव महाराष्ट्रात अप्रिय ठरलेले होते.

यशवंतराव चव्हाण यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सहभाग घेऊन त्याबाबतची भूमिका दुरदर्शीपणाने घेतली. महाराष्ट्र हा जरी आपला असला तरी त्याहीपेक्षा देश महत्वाचा आहे. आपण मुख्य राष्ट्रीय प्रवाहापासून अलग राहिलो तर आपल्या राज्याची प्रगती होणार नाही. अशी भिती यशवंतराव चव्हाण यांचा वाटत होती. म्हणूनच ते बाजूला न राहता त्यांनी पंडित नेहरूंशी एकनिष्ठ राहून महाराष्ट्राचा प्रश्न सोडवला. १ मे १९६० रोजी व्दिभाषिक मुंबई राज्याचे विभाजन होऊन स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासूनच महाराष्ट्र एकसंघ कसा राहील याकडे राजकारणाच्या दृष्टीने न पाहता लोकांच्या मानसिकतेकडे पाहिले. प्रारंभीपासूनच स्वतंत्र विदर्भाची मागणी केली जात होती ती महाराष्ट्राला धोकादायक आहे हे ओळखून यशवंतराव चव्हाण यांनी पं. नेहरूंद्वारे उपमुख्यमंत्रीपद कन्नमवारांना दिले व स्वतंत्र विदर्भाची मागणी सोडायला लावली.[५८]

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनल्यानंतर मा. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रात प्रशासन चांगल्या पद्धतीने सांभाळले. त्याचबरोबर विकेंद्रीकरणाला महत्त्व, पंचायत राज, कसेल त्याची जमीन, सहकारी तत्वांवर १८ साखर कारखान्यांची उभारणी, पाटबंधारे व उद्योग विकासासाठी मंडळ, बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण आणि मराठी भाषेला राज्य भाषेचा दर्जा मिळवून दिला.[५९] सन १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले यावेळी पं. नेहरूंनी मा. यशवंतराव चव्हाण यांना दिल्लीच्या राजकारणात बोलावले आणि त्यांना भारताचे संरक्षणमंत्री बनवले. मा. यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या संरक्षण मंत्रीपदाच्या सन १९६२ ते १९६६ या कार्यकाळात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतलेले आहेत. त्यामध्ये भारतीय हवाई दल मजबूत

बनविण्याकरीता त्यांनी 'मिग-२१' ही लढाऊ विमान तयार करणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील स्वतंत्र कंपनीची स्थापना करून विमान उत्पादनास प्रारंभ केला.[६०] सन १९६५ चे भारत पाकिस्तान युध्दाच्या वेळीही श्री. यशवंतराव चव्हाण यांची कसोटीच लागली. या युध्दाने यशवंरावांचे मुत्सद्दी युध्दनेतृत्व सर्वमान्य झाले. देशाचे सर्व सैन्य व जनता यशवंतराव चव्हाण यांच्याकडे एक समर्थ राजकीय नेता म्हणून पाहू लागली.[६१]

मा. यशवंतराव चव्हाण यांनी भारताचे संरक्षण मंत्रीपद चांगल्या पद्धतीने सांभाळल्यानंतर त्यांच्याकडे भारताचे गृहमंत्रीपद देण्यात आले. पुढे सन १९७० मध्ये त्यांच्यावर केंद्रिय अर्थखात्याची जबाबदारी सोपविण्यात आली. यावेळीही यशवंतराव चव्हाण यांनी चांगल्याप्रकारे आपली जबाबदार पार पाडली. सन १९७४ मध्ये त्यांना पुन्हा परराष्ट्रमंत्रीपद देण्यात आले. मा. यशवंतराव चव्हाण जसे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून ओळखले जातात तसेच ते भारतीय परराष्ट्र व्यवहाराचे शिल्पकार म्हणूनही ओळखले जातात. एक मुरब्बी, निर्णयकुशल प्रशासक, अभ्यासू चतुरस्त्र वक्तृत्त्व शैली असणारा विद्वान राजकारणी अशीही त्यांची ओळख आहे.

### शिक्षण व साहित्य ः

मा. यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या विचारातून शिक्षणामुळे मानवाचा सर्वांगीण विकास होतो. तेव्हा त्याला विविध प्रकारचे शिक्षण देऊन शहाणा करण्याची जबाबदारी त्या समाजाइतकीच शासनाची आहे, म्हणून त्यानी आपले शिक्षणाचे विचार मांडताना सार्वत्रिक शिक्षण, प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, उच्च शिक्षण, तांत्रिक शिक्षण व कृषी शिक्षण याविषयी विचार मांडलेले होते.

### शिक्षणाची व्याख्या

यशवंतराव चव्हाण यांनी शिक्षणाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे, शिक्षित व्यक्तीला स्वतःभोवती घडणाऱ्या गोष्टी आणि जगामध्ये घडणाऱ्या इतर गोष्टी यांची ज्यामुळे काही संगती लावता येते, त्यांचा योग्य अर्थ समजावून घेता येतो आणि त्याचा परिणाम आपल्या जीवनावर व व्यक्तिमत्त्वावर काय घडतो हे समजावून घेता येते व देता येते, त्याला शिक्षण असे म्हणतात.[६२]

## सार्वत्रिक शिक्षण

यशवंतराव चव्हाण यांच्या विचारातून हे स्पष्ट होते की, ब्रिटीशांनी भारतात राबविलेल्या शिक्षणपद्धतीतून फक्त कारकूनी नोकरी करणारा वर्गच निर्माण झाला होता. त्यामुळे यशवंतराव चव्हाण याना वाटत होते की, आजच्या सुशिक्षित तरूणानी नोकरीच्या मागे न लागता इतर क्षेत्रातही आपली प्रगती करावी त्याशिवाय महाराष्ट्राची प्रगती होणार नाही. सन १९६० मधील काँग्रेसच्या शिबीरात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना यशवंतराव चव्हाण म्हणतात की, शिक्षणाकडे निव्वळ सामाजिक गरजेच्या दृष्टीने मी पाहत नाही. माझ्या मते शिक्षण हे आर्थिक विकासाचे एक मुलभूत साधन आहे. आमच्यामध्ये शक्ती निर्माण करण्याकरिता आमच्याजवळ मनुष्यबळाशिवाय दुसरे काही साधन नसल्यामुळे आम्हाला या साधनांचा विकास करण्यासाठी त्याला शिक्षणाची जोड द्यावयाची आहे. खेडयात वीज नेऊन पोहचविल्याशिवाय ज्याप्रमाणे शेतीचा विकास होणार नाही, त्याचप्रमाणे आमचा नापीक पडलेला मनुष्यबळाचा हा जो मोठा साधनसंपत्तीचा भाग आहे, त्यात शिक्षणाची वीज नेल्याशिवाय नवसामर्थ्य निर्माण होणार नाही, शिक्षणाकडे पाहण्याचा माझा स्वतःचा हा दृष्टिकोन आहे. महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती करण्याचा कार्यक्रम जितका महत्त्वाचा आहे, तितका शिक्षणाचा हा कार्यक्रम महाराष्ट्रात महत्त्वाचा आहे.[६३] उद्योग शेती आणि शिक्षण ही सर्वांगिण विकासाच्या तत्त्वज्ञानाची त्रिसूत्री होती. आणि पाश्चात्य देशात जी औद्योगिक क्रांती झाली ती या त्रिसूत्रीच्या आधारेच झाली आहे, असे यशवंतराव चव्हाण यांच्या विचारातून स्पष्ट होते.

## प्राथमिक शिक्षण

अलिगड मुस्लिम विद्यापीठाच्या पदवीदान समारंभावेळी केलेल्या भाषणामध्ये प्राथमिक शिक्षणासंदर्भात यशवंतराव चव्हाण म्हणतात, आपल्या नवजात लोकशाहीची मुळे खोलवर रूजविण्याच्या दृष्टीने प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारास साहजिकच राजकीय महत्त्व आहे. त्याचप्रमाणे आपल्या प्रचंड मनुष्यबळाची कार्यक्षमता वाढविण्यासही त्याची पुष्कळच मदत होऊ शकेल, तसे झाल्यास आर्थिक क्षेत्रातही त्याचे इष्ट असे परिणाम घडून येतील. शिवाय शिक्षणाच्या या प्रसारात संस्कृतीच्या प्रसाराची बीजे साठलेली असून, त्यामुळे मानवी मूल्ये व ध्येये आम जनतेच्या आवाक्यात आणणे शक्य होणार आहे.[६४] त्यांच्या या विचारातून हे स्पष्ट होते की, महाराष्ट्राचा राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकास होण्यासाठी सर्वत्र

प्राथमिक शिक्षणाचा प्रसार होणे आवश्यक आहे.

**माध्यमिक शिक्षण**

७ मार्च १९६६ रोजी पुणे येथे माध्यमिक शिक्षण मंडळाच्या उद्‌घाटन प्रसंगी बोलताना यशवंतराव चव्हाण माध्यमिक शिक्षणाविषयी म्हणाले होते की, माध्यमिक शिक्षण हेच बहुसंख्य मुलांच्या जीवनातील अंतिम शिक्षण असून त्यांच्यापुरते बोलायचे झाल्यास हे शिक्षण म्हणजे त्यांच्या भावी जीवनाची खूपच मोठी शिदोरी ठरणार आहे. तेव्हा प्रश्न असा निर्माण होतो की, हे शिक्षण पुरे होत असताना जीवनामध्ये प्रवेश करण्यासाठी लागणारी साधनसामुग्री विद्यार्थ्यांच्या पदरात पडते आहे किंवा नाही, हे सर्व पाहण्याची जबाबदारी अर्थात शासनावर आहे आणि ती आता या माध्यमिक शिक्षण मंडळावर आहे.[६५]

**उच्च शिक्षण**

यशवंतराव चव्हाण याच्या मते उच्च शिक्षणाचा लाभ सर्वांना मिळाला पाहिजे. उच्च शिक्षणाविषयी ते म्हणतात की, आज उच्च शिक्षणाचा प्रसार होत आहे त्यामागे देशातील लोकशाहीच्या प्रसाराची प्रभावी शक्ती आहे. उच्च शिक्षणाचा लाभ जोपर्यंत फक्त मुठभर लोकांनाच मिळत होता. तोपर्यंत समाज जीवनाच्या निरनिराळया क्षेत्रात पुढे येणाऱ्याची संख्या अगदी अल्प असे, अशा परिस्थितीत मुठभर लोकांची बौद्धिक वाढ खुंटल्यास सर्व समाजाची अधोगती होण्याचा धोका  निर्माण होतो, म्हणून निरक्षरता व अज्ञान यात रूतून बसलेल्या लोकांच्या बुद्धीचा विकास घडवून आणून आणि त्यांच्या अंगच्या सुप्त गुणांचा विकास होण्यासाठी त्यांना अधिकाधिक संधी उपलब्ध करून देऊन गुणवत्तेवर आधारलेले नेतृत्त्व आपण निर्माण करू शकू. तसे झाल्यास सामाजिक दर्जा, जात, कूळ यासारख्या गोष्टी हळूहळू मागे पडत जातील आणि परिणामी आपले सामाजिक जीवन अधिक निकोप व निर्मळ होईल यात वाद नाही.[६६] या विचाराद्वारे त्यांनी लोकशाहीच्या प्रसाराची शक्ती म्हणून शिक्षणाकडे पाहिले शिक्षण हे सर्वांगीण असावे. मुठभर लोकांची त्यावर मक्तेदारी अशी त्यांची धारणा होती.

**तांत्रिक शिक्षण**

या शिक्षणाविषयी विचार स्पष्ट करताना ते म्हणतात, आम्हाला तांत्रिक शिक्षण वेगवेगळया शास्त्रांचे शिक्षण घेतले पाहिजे. अशा तऱ्हेच्या शिक्षणाला आम्ही प्राधान्य दिले पाहिजे. याशिवाय ज्याला आपण निव्वळ हयुमॅनिटीजचे शिक्षण म्हणतो, अशा तऱ्हेच्या

शिक्षणाचेही महत्त्व आहेच. ते मुलभूत शिक्षण आम्हाला मंजूर आहे. आणि या शिक्षणाच्या बाबतीत शिक्षणाची दारे सताड उघडी करून ते खालच्या थरापर्यंत पोहचविण्याचे आमचे ध्येय असले पाहिजे. मी तर असे म्हणेन की, या तऱ्हेच्या शिक्षणाचे प्रकाशज्योत अगदी शेवटच्या थरापर्यंत जर आम्ही नेऊ शकलो तर महाराष्ट्राची शक्ती इतकी जबरदस्त वाढेल की, त्याला कोणाच्याही मेहरबानीवर अवलंबून राहण्याचे कारण राहणार नाही. तो स्वतःचे रक्षण करील आणि राष्ट्राचेही रक्षण करील.[६७]

**कृषी शिक्षण**

शेतीच्या शिक्षणाची आवश्यकता आहे. शेतकरी आणि शेतीशी संबध असणारा मनुष्य हा शहाणा असल्याशिवाय शेती शहाणी होणार नाही, यावर माझा विश्वास आहे आणि म्हणून शेतीसंबधीचा शास्त्रीय दृष्टीकोन अगदी झोपडीतील शेतकऱ्यापर्यंत नेऊन पोहोचविण्याची आवश्यकता आहे. आपली शेती शहाणी नाही, त्याचे कारण आपला शेतकरी शहाणा नाही. शेतीचा प्रश्न एवढा गंतागुतीचा व बिकट आहे की त्याने भारताच्या जीवनातच एकप्रकारची व्यथा निर्माण केली आहे असे यशवंतरावांना वाटत होते.[६८]

मा. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावर असताना त्यांनी शैक्षणिक बाबतीत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. आर्थिकदृष्टया कमकुवत असणाया विद्यार्थ्यांना इ. बी. सी. सवलत सुरू केली. सन १९६२ साली कोल्हापूरला शिवाजी विद्यापीठाची स्थापना, राहुरी येथे कृषी विद्यापीठाची स्थापना, आदिवासींच्या मुलांसाठी आश्रमशाळांची स्थापना. साताऱ्यात सैनिक स्कूलची स्थापना, कराड व औरंगाबादेस अभियांत्रिकी महाविद्यालयांची सुरूवात, सर्वात महत्त्वपूर्ण बाब म्हणजे ते तहहयात रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष होते आणि जेव्हा ते या संस्थेचे अध्यक्ष झाले तेव्हा ते उदगारले होते की, मी मुख्यमंत्री झालो त्यापेक्षा अधिक आनंद मला मी रयत शिक्षण संस्थेचा अध्यक्ष झालो त्यावेळी झाला.[६९]

मा. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाची स्थापना करून नवोदित लेखक व कवींना यांचे ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी प्रेरणा दिली. १ मे १९६० रोजी शपथविधी समारंभात महाराष्ट्राचा राज्यकारभार इंग्रजी ऐवजी मराठीत चालवण्याचे त्यांनी आश्वासन दिले व यासाठी त्यांनी डायरेक्टोरेट ऑफ लँगवेजेस हे खाते सुरू केले. यशवंतराव चव्हाण हे देखील एक मोठे उत्तम लेखक होते. त्यांनी सन १९७५ मध्ये कराड येथे भरलेल्या

साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते. तर १९८४ मध्ये विदर्भ साहित्य संमेलनाचे उद्घाटक असे साहित्यिक सन्मानही त्यांना मिळालेले होते. 'कृष्णाकाठ' ही कृती त्यांच्यातील साहित्यिकाचे दर्शन घडवते.[७०]

**यशवंतराव चव्हाण यांचे अर्थकारण :**

भारतात आर्थिक सुबत्ता नांदावी यादृष्टीने महाराष्ट्रासह संपूर्ण भारत देश आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावा, यादृष्टीने मा. यशवंतराव चव्हण यांनी काही मूलगामी स्वरूपाचे विचार मांडलेले आहेत. त्यांच्या मते, ''वैयक्तिक जीवनात जशी आपण प्रगती करतो तशीच ती सार्वजनिक जीवनात करावयाची असते. राज्यकारभारामध्ये सुधारणा व प्रगती करण्याचे ठरवून तुम्ही आणि मी जर काम करणार असलो तरी आत्मसंशोधनाची आत्मटीकेची आपल्याला फार जरूरी आहे. ''यशवंतराव चव्हाण यांच्या मनातील देशाच्या आर्थिक विकासाची तळमळ, त्यांची आर्थिक विश्लेषणाबाबतची बुध्दी आणि कसब या गोष्टी लक्षात घेऊन इंदिरा गांधींनी आपल्या मंत्रिमंडळात १९७० – ७१ ते १९७५ पर्यत साली अर्थमंत्री पदावर त्यांना नेमले. त्यांच्या मते, ''देशाची प्रगती ही आर्थिक वा राजकीय परिंस्थिती यावर अवलंबून नसून त्या देशाचे नियोजन कशा प्रकारचे आहे यावर अवलंबून असते. एखाद्या देशाची आर्थिक, सामाजिक किंवा राजकीय पध्दती कोणती का असेना आर्थिक विकसनशील किंवा आर्थिक विकसातील नियोजनाचे महत्त्व त्या देशाला कळालेले नसेल तर त्याला आर्थिक क्षेत्रात प्रगती करणे फार अवघड होऊन जाईल.''[७१] असे यशवंतराव चव्हाणांचे स्पष्ट मत होते.

अर्थमंत्री पदावर कार्यरत असताना त्यांनी देशातील काळया पैशावर नियंत्रण ठेवण्याची निकड त्यांनी वारंवार प्रतिपादीत केलेली दिसते.ते म्हणतात  या काळया पैशाच्या निर्मितीची साधने बरीच असतात. करचुकवेगिरी हे त्यातले एक प्रमुख साधन होय. याद्वारा प्राप्तीकर चुकवला जातो. या मिळकतीचा अंदाज सन १९६८–६९ मध्ये १४०० कोटी रू. इतका वांछू समितीने केल्याचा दाखला यशवंतराव देतात. या काळया पैशाच्या नियंत्रणाची नितांत गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी वारंवार केले होते.[७२] महाराष्ट्राचा विकास व्हावा यादृष्टीने त्यांनी महाराष्ट्रातील ग्रामीण भागात शेतीमालावर प्रक्रिया करण्याचे उद्योग उभारावेत, औद्योगिक वसाहती स्थापन कराव्या आणि त्यात वीज, पाणी, रस्ते आदींची सोय करावी. याला अनुसरूनच १ ऑगस्ट १९६२ रोजी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना

ठाण्यातील वागळे इस्टेटमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या उपस्थितीत समारंभपूर्वक करण्यात आली.[७३]

मा. श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या मते, कृषी उत्पादन वाढवण्यासाठी सहकारी तत्वावर कृषी पध्दतीचा पुरस्कार करावा. शेतीसंबंधी त्यांची विचारसरणी आधुनिक स्वरूपाची होती. कसेल त्याची जमीन हा कायदा त्यांनी अमलात आणला. कोयना आणि उजनी प्रकल्पांच्या उभारणीला गती दिली. महार वतने नष्ट केली व दलितांच्या इनामी जमिनी त्यांच्या मालकीच्या केल्या व त्यांना गावाच्या कामाच्या शेकडो पिढयांच्या वेठबिगारीतून मुक्त केले.[७४]

थोडक्यात यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्याच्या विकासासाठी जे राजकीय योगदान दिले होते. त्याचबरोबर महाराष्ट्र राज्याच्या शैक्षणिक, सामाजिक व साहित्यिक क्षेत्रात मोलाची कामगिरी केलेली होती. मा. श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याची महती महााष्ट्राबरोबरच भारताने घेतलेली होती. त्यांनी केलेल्या कार्याचे कौतुक म्हणून त्यांना पुढील मानसन्मान मिळालेले आहेत. मा. श्री. यशवंतराव चव्हाण यांना डिसेंबर १९५९ मध्ये अलीगड मुस्लिम विद्यापीठाची ऑनररी डिग्री ऑफ एल. एल. बी. मिळालेली होती. कानपूर विश्वविद्यालय, मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर या विद्यापीठांनी डॉक्टर ऑफ लॉ, मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी यांनी १९७६ साली डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी तर मार्च १९८४ मध्ये पुणे विद्यापीठाने डी. लिट. ही पदवी देऊन सन्मानित केले. ३१ मे १९८६ रोजी क्षेत्र माहूली येथील रामशास्त्री प्रभूणे प्रतिष्ठानाने मरणोत्तर सामाजिक न्याय पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले होते.[७५]

यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाबाबत लेखक स्टॉगडिल आर. एम. म्हणतात की, नेतृत्व म्हणजे निष्क्रीय स्थान किंवा विशिष्ट गुणवत्ता असलेले व्यक्तिमत्व नाही. एखाद्या समुहाच्या कार्यातील सक्रिय सहभाग व स्वातंत्र्याच्या नेतृत्वाने ते कार्य यशस्वी करण्याची क्षमता यामुळे नेत्याचे विशिष्ट स्थान निर्माण होते.[७६] अशा या महान नेत्याचा मृत्यू २५ नोहेंबर १९८४ रोजी झाला.

## किसन वीर

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील अखेरच्या दशकात म्हणजेच सन १९४२ च्या चले जाव आंदोलनात ज्या महत्त्वपूर्ण क्रांतिकारकांनी योगदान दिले त्यात किसन वीर यांचे नाव अग्रक्रमाने

घ्यावे लागते. किसन वीर यांचा जन्म ११ ऑगस्ट १९०६ रोजी गोकुळाष्टमी दिवशी झाला. गोकुळाष्टमी हा दिवस श्रीकृष्णाचा जन्मदिवस मानला गेल्याने या मुलाचेही नाव किसन ठेवले गेले.[७७] किसन वीर यांच्या आईचा मृत्यू ते एक वर्षांचे असताना प्लेगमुळे झाला. तेंव्हापासून त्यांचा सांभाळ त्यांच्या थोरल्या भावाच्या पत्नीने(वहीनी) केला.[७८] त्यांचे वडील कापडाचा व्यापार करत असत. त्याना या कामात किसन वीर यांचे थोरले भाऊ मदत करत असे.

किसन वीर यांच्या बालपणातच वैचारिक जडणघडण झालेली दिसून येते. महात्मा गांधीजी सातारा जिल्हयाच्या दौऱ्यावर आले असता त्यांच्या वाई, सातारा व सांगली येथे सभा झाल्या. तेव्हा वाई येथील सभेला किसन वीर आपल्या मित्रांसह हजर होते. पुढे किसन वीर हे महात्मा गांधीजीच्या विचारांनी भारावून गेले.[७९] याच काळात पाचगणीच्या हरीभाऊ गाडेकर यांची कन्या राधाबाई यांच्याशी त्यांचा विवाह झाला.[८०] तर किसन वीरांचा दुसरा विवाह १९२६ मध्ये एकनाथ तुकाराम एकबोटे यांची कन्या लक्ष्मीबाई यांच्याशी झाला.[८१] पुढे किसन वीर यांचे जीवन खूप हलाखीचे बनले होते. त्यांच्या थोरल्या भावाचे निधन झाले. याचवेळी त्यांचे राहते घर व व्यापारातील कापड आगीत भस्मसात झाले.[८२] यानंतर किसन वीर यांनी आपल्या सासऱ्यांच्या मदतीने करंजखोप येथील कुलकर्णी व वाघोली येथील भोईटे यांची शेतजमीन वार्षिक खंडावर कसण्यासाठी घेतली. काँग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनात पं. नेहरूंनी ब्रिटिश सरकारकडे 'स्वराज्या' ची मागणी केली. तेव्हा त्यास प्रतिसाद देण्यासाठी सातारमधून भाऊ साहेब सोमण, किसन वीर व आळतेकर हे पुढे आले.[८३]

किसन वीर यांच्या जीवनात बदल घडवून आणण्याचे कार्य 'त्रिंबक वामन कुलकर्णी किंवा देव मास्तर' यांनी केले. देव मास्तरांनी किसन वीर यांना अनेक थोर नेत्यांची चरित्र वाचण्यास दिली होती. त्यातील छ. शिवाजी महाराज यांच्या चरित्र, श्री. एन. के. बेहरे यांच्या '१८५७ चा उठाव' हे दोन ग्रंथ वाचून त्याचा प्रभाव किसन वीर यांच्यावर झाला होता. किसन वीर यांनी पुरंदर किल्ल्यावर अनेक शस्त्रास्त्रे होती. ती मिळविण्यासाठी किसन कोळी या सहकाऱ्यास पुरंदर किल्ल्यावर पाठविले होते.[८४] देव मास्तर यांच्या सांगण्यावरून किसन वीर हे सातारच्या नाथ घाणेकर व निळूभाऊ यांना भेटले. परंतु नाथ घाणेकरांनी त्यांना मदत करण्याचे नाकारले. यानंतर देव गुरूजी व किसन वीर हे श्री. भुस्कूटे यांना बाँब बनवण्याच्या प्रक्रियेबाबत भेटलेही परंतू त्यातील धोके लक्षात आल्यानंतर त्यांनी तो विचार सोडून दिला.[८५]

यानंतर किसन वीर म. गांधीजीच्या विचारांकडे ओढले गेले.त्यांनी काँग्रेसचे सदस्यत्व स्वीकारले आणि काँग्रेसच्या विचारांचा प्रचार प्रसार करण्यास प्रारंभ केला.

## किसन वीर यांचे क्रांतिकारक कार्य

किसन वीर यांनी आपल्या क्रांतिकार्याची सुरूवात जंगल सत्याग्रहाने केली त्यावेळी त्यांना ११ महिन्यांची शिक्षा भोगावी लागली होती. विलासपूर येथील तुरूंगात असताना वामनराव कुलकर्णी यांची भेट झाली. तेव्हा त्यांनी तुरूंगातून सुटल्यावर किसन वीर यांची भेट यशवंतराव चव्हाण यांच्याशी घालून दिली. येथून यशवंतराव चव्हाण व किसन वीर यांची मैत्री जुळली ही मैत्री शेवटपर्यंत राहीली होती.[८६] किसन वीरांनी चलेजाव चळवळीत कैद झाल्यानंतर येरवडा जेलमधून पळून जाण्यासाठी जेलच्या भिंतीला शिडी लावून उडी मारली होती. त्याबाबत श्री. यशवंतराव चव्हाण यांनी आपले मत व्यक्त करताना म्हटले होते की, जेव्हा १९४२ च्या आंदोलनाचा इतिहास लिहिला जाईल तेव्हा या घटनेचा उल्लेख इतिहासकार आवर्जून करतील. ही घटना सातारच्या स्वांतंत्र्यचळवळीतील एक नवा अध्याय आहे.''[८७] क्रांतिसिंह नाना पाटील यांनी जे प्रतिसरकार स्थापन केले होते. त्याचे एक सक्रीय सदस्य म्हणून किसन वीर यांनी कार्य केलेले दिसून येते. या चळवळीत क्रांतिकारक कार्य करणाऱ्या प्रतिसरकाच्या नेत्यांना पकडण्यासाठी ब्रिटीश सरकारने वॉरंट  काढले त्यावेळी हे क्रांतिकारक भूमिगत झाले. शेवटी २५ एप्रिल १६४६ रोजी सरकारने या भूमिगत नेत्यांच्या विरोधात काढलेली वॉरंट रद्द केली. यानंतर हे भूमिगत कार्य करणारे क्रांतिकारक लोकांच्यापुढे आले. किसन वीरांनी भूमिगत राहून जे कार्य केले होते. त्यांच्या या कार्याविषयी श्री. धन्वंतरी कासेगांवकर म्हणतात की, किसन वीर हे सातारचे असे अव्दितीय व्यक्तिमत्त्व होते की ज्यांनी सरकारला झुकण्यास भाग पाडले. भारतात सर्वत्र स्वांतंत्र्यचळवळ दडपण्यात आली मात्र सातारमध्ये प्रतिसरकार आणि सातारच्या जनतेपुढे सरकारला झुकावे लागले.[८८] किसन वीर यांना पकडण्यासाठी खूप मोठया प्रमाणावर प्रयत्न केले परंतु सरकारला ते शक्य झाले नाही.

## किसन वीर यांचा राजकारणातील सहभाग

किसन वीर यांच्यावरील वॉरंट रद्द झाल्यावर ते सातारा जिल्हा काँग्रेस वर्किंग कमिटीच्या बैठकीसाठी कराडला गेले. या बैठकीत त्यांची सचिव म्हणून सचिवपदी निवड झाली. पुढे लोकल बोर्डाची निवडणूक लागली. यावेळी किसन वीर यांनी बाळासाहेब देसाई

यांची बाजू घेतली होती. विशेष म्हणजे या झालेल्या निवडणुकीत बाळासाहेब देसाई निवडून आले. त्यामुळे किसन वीर यांना सातारा जिल्हा काँग्रेसचे सर्वाधिकारच मिळाले.[८९] ३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधीजींची हत्या झाली. या हत्येनंतर सर्वत्र ब्राह्मणविरोधी दंगली उसळल्या. याचे लोण वाई शहरात येऊन पोहोचले. तेव्हा या दंगली थोपविण्यासाठी किसन वीर यांनी प्रयत्न केले. त्याचा परिणाम असा झाला की, लोकांना वाटले की किसन वीर हे ब्राह्मणांची बाजू घेतात. असे समजून सन १९५२ च्या निवडणुकीत किसन वीर हे इंडियन नॅशनल काँग्रेस या पक्षाच्यावतीने वाई खंडाळा मतदार संघातून उभे राहिले असता त्यांचा पराभव रिपब्लिकन पार्टी आणि शेकापची युती होऊन शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार दादासाहेब जगताप यांनी केला होता.[९०]

सन १९५२ च्या निवडणुकीत किसन वीर यांचा पराभव झाला असला तरी त्यांना सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी निवडण्यात आले होते. किसन वीर यांनी मार्केट कमिटीची स्थापना केली. त्यामुळे तिचेही अध्यक्षपद त्यांना देण्यात आले.[९१] सन १९५५ ते १९५९ या काळात जो सयुंक्त महाराष्ट्र चळवळीचा लढा उभा राहिला होता. त्यामध्ये यशवंतराव चव्हाण यांनी पंडित नेहरू यांची बाजू घेतली होती. तर किसन वीर यांनी यशवंतराव चव्हाण यांना पाठिंबा दिला होता.[९२] सन १९५७ साली महाराष्ट्रात निवडणूका झाल्या. वाईतून काँग्रेसने पुन्हा किसन वीरांना तिकीट दिले मात्र या निवडणूकांमध्येही किसन वीर विजयी होऊ शकले नाहीत. संयुक्त महाराष्ट्रच्या संदर्भातील किसन वीरांची यशवंतराव चव्हाणांना पाठींबा देण्याची भूमिका हे या अपयशाचे प्रमुख कारण होते.[९३] सन १९६० साली किसन वीरांची स्थानिक स्वराज्य संस्थामधून आमदारपदी निवड झाली. याचवर्षी महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाणांची निवड झाली.

सन १९६२ साली लोकसभेच्या निवडणुकीत इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षामार्फत उभे राहिले असता त्यांनी शेकाप पक्षाचे उमेदवार क्रांतिसिंह नाना पाटील यांचा दणदणीत पराभव केला होता. सन १९६४ मध्ये भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा मृत्यू झाला. त्यामुळे पंतप्रधान पदासाठी नेते मंडळीमध्ये चढाओढ सुरू झाली. अशावेळी लालबहाद्दूरशास्त्री यांना पंतप्रधान होण्यासाठी किसन वीर यांनी मदत केली होती. सन १९६६ मध्ये लालबहाद्दूरशास्त्री यांचा मृत्यू झाला. त्यामुळे पंतप्रधानपदासाठी पहिलीच स्थिती निर्माण झाली

होती. मात्र किसन वीरांना यावेळी यशवंतराव चव्हाणांची  निवड पंतप्रधान पदासाठी व्हावी असे वाटत होते. तसा त्यांनी प्रयत्नही केला परंतु इंदिरा गांधींनी यशवंतराव चव्हाणांची भेट घेतल्यानंतर त्यांनी इंदिरा गांधींना पाठिंबा दिला आणि इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या. या प्रसंगी किसन वीरांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती.[९४]

किसन वीर यांनी सन १९६७ च्या निवडणुकीत आपली उमेदवारी नाकारली होती. त्यावेळी त्यांनी म्हटले की मला महाराष्ट्र व आपल्या लोकांसाठी स्थानिक पातळीवर काम करावयाचे आहे. यानंतर त्यांनी काँग्रेसच्या प्रचार प्रसारात स्वतःला वाहून घेतले. या निवडणूकांमध्ये किसन वीरांच्या नेतृत्वात काँग्रेसने सातारा जिल्हयात सर्व जागा जिंकल्या. किसन वीर हे २८ जून १९७० ते १९७८ या कालावधीत कवठे गावचे सरपंच म्हणून कार्यरत राहिले. सन १९७२ मध्ये झालेल्या सातारा जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत किसन वीर यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्ष म्हणून श्री. बाबूराव घोरपडे तर उपाध्यक्ष म्हणून किसन वीरांनी सातारा जिल्हयावर आपले वर्चस्व असल्याचे दर्शवले. पुढे वाई तालुका पंचायत समितीच्या निवडणूका झाल्या या निवडणुकीतही किसन वीर यांच्या गटाचा विजय झाला. त्यामुळे लक्ष्मणराव पाटील हे पंचायत समितीचे सभापती बनले.[९५] यानंतर किसन वीर यांनी आपले लक्ष वाई नगरपरिषदेच्या निवडणुकीत घातले. ही निवडणूक सन १९७४ साली नव्या नियमांनुसार वाईच्या नगराध्यक्षांची निवड थेट जनतेतून झाली. यावेळी ही निवडणूक किसन वीर यांच्या पाठिंब्यावर जिंकली जाऊन श्री. राजाभाऊ जाधव हे नगराध्यक्ष झाले. १९७७ सालच्या निवडणुकीत इंदिरा गांधीचा पराभव झाला. तर जनता पक्षाने एकूण ३७४ जागा जिंकल्या. यावेळी आपले मत मांडताना किसन वीरांनी स्पष्टपणे म्हटले की, निवडणूकांच्या कालखंडात तरी प्रत्येक नेत्याने आपआपसातील मतभेद दूर करून एकत्रितरित्या काम करणे गरजेचे आहे. जर पक्षातील प्रत्येकाने आपला स्वार्थ पाहिला तर पक्षाचे भवितव्य अंधाकारमय होईल. आता जो पक्षाचा पराभव झालेला आहे त्याचे कारण म्हणजे काँग्रेस सामान्य लोकांच्या आकांक्षा पूर्ण करण्यात अपयशी ठरलेली आहे. आपण चांगली स्वप्ने पाहतो आहे परंतु त्यांना सत्यात उतरवण्यात अपयशी ठरतो आहे.[९६] त्यांच्या या भाषणातून त्यांची काँग्रेसप्रती असणारी अपार निष्ठा येथे स्पष्ट होते.

सन १९७८ मध्ये काँग्रेस पक्ष दुभंगला गेला. तेव्हा काँग्रेस (आय) व काँग्रेस (रेड्डी)

असे दोन पक्ष निर्माण झाले. सन १९७८ साली झालेल्या निवडणुकीत ज्या पक्षांनी सहभाग घेतला होता. त्यातील कोणत्याच पक्षाला बहुमत मिळाले नव्हते. म्हणून वसंतदादा पाटील यांनी दोन्ही काँग्रेस एकत्र करून सरकार बनविले. परंतु हे सरकार जास्त काळ टिकले नाही. यानंतर श्री.शरद पवार यांनी किसन वीरांच्या भक्कम पाठिंब्यावरच पुरोगामी लोकशाही दलाची स्थापना केली. तसेच शरद पवार यांनी आपले सरकार स्थापन केले.[९७] किसन वीर यांचा मृत्यू काविळीच्या आजारामुळे २८ नोहेंबर १९७९ रोजी सेंट जॉर्ज हॉस्पिटलमध्ये झाला.[९८]

## श्री. शंकरराव जगताप

श्री. शंकरराव जगताप यांनी राजकारणात राहूनही समाजसेवेसाठी समाजातील सर्व स्तरात महत्वाचे कार्य केले. शंकरराव जगताप यांचे व्यक्तिमत्त्व हे चारित्र्यशील म्हणून सर्व पक्षात प्रसिद्ध होते. शंकरराव जगताप यांच्यावर महात्मा गांधीजींच्या विचारांचा प्रभाव पडलेला होता. यशंवतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात जी एक नवी पिढी निर्माण केली त्यामध्ये शंकरराव जगताप यांचा समावेश होतो.

### जन्म व शिक्षण

शंकरराव जगताप यांचा जन्म संमत वाघोली ता. कोरेगाव येथे १४ फेब्रुवारी १९२३ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव चिमाजी व आईचे नाव गिरीजा हे होते. शंकरराव जगताप यांचे प्राथमिक शिक्षण आपल्या जन्मगावी म्हणजेच वाघोली येथे झाले. माध्यमिक शिक्षण वाई शहरातील द्रविड हायस्कूलमध्ये झाले. शंकरराव जगताप यांचे लहानपणीचे मित्र श्री. पंडीतराव शेंडे सांगतात की, शंकर माझा मित्र, आम्ही दोघे द्रविड हायस्कूलचे विद्यार्थी. तो मुळचा वाघोलीचा. लहान वयातच तो वाईला शिकण्यासाठी आला. रोकडोबा मंदीराचे मागील बाजूस राहणारे सिध्दनाथवाडीतील सिताराम बापू सूर्यवंशी यांचेकडे त्याचे शालेय शिक्षण झाले. शंकरला लहाणपणापासूनच शिक्षणाची आवड. शिक्षकांपैकी गोटखिंडीकर संस्कृतला तर गोंधळेकर इंग्रजीला. दोन्ही भाषेंवर शंकरचे प्रभुत्व. संस्कृत विषयाची शंकरशेठ शिष्यवृत्ती फक्त दोन मार्कांनी हुकली. शालांत परीक्षेत शंकरला ९८ मार्क पडले. पुढे तो शिकत गेला.[९९]

शंकरराव जगताप यांचे शिक्षण चालू असतानाच त्यांच्या मनावर महात्मा गांधीजीनी सुरू केलेल्या स्वातंत्र्य लढयाचा मोठा प्रभाव पडला होता. त्यामुळे शंकरराव जगताप हे भारतीय स्वातंत्र्यलढयाकडे झुकले. शंकरराव जगताप यांनी आपले माध्यमिक शिक्षण द्रविड

हायस्कूल वाई येथे पूर्ण केल्यानंतर उच्च शिक्षणासाठी फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे दाखल झाले. पुढे कायद्याचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी त्यांनी लॉ कॉलेज पुणे येथे प्रवेश घेतला. सन १९५१ मध्ये कायद्याचे शिक्षण पूर्ण झाले. त्यानंतर शंकरराव जगताप यांनी आपल्या गावच्या तालुक्याच्या ठिकाणी म्हणजेच कोरेगाव येथे वकिलीचा व्यवसाय सुरू केला. ते निष्णात फौजदारी वकील म्हणून अल्पकाळातच प्रसिद्धीस आले. कोरेगाव येथे वकिली करत असतानाच त्यांचा विवाह कारवार येथील कमलताई यांच्याशी झाला. पुढे त्यांना आशा आणि सुनिता अशा दोन मुली झाल्या. शंकरराव जगताप यांच्यावर बालपणापासूनच शिक्षणाचे चांगले संस्कार झाल्यामुळे त्यांना वाचन व कलेचा छंद होता. ते कोरेगाव येथे फौजदारी वकील म्हणून काम करत असतानाच त्यांनी राजकारणात प्रवेश केला होता.

**श्री. शंकराव जगताप यांचा विधान सभा निवडणुकीतील विजय**

श्री. शंकरराव जगताप यांनी आपल्या राजकारणाचा प्रारंभ सातारा जिल्हा परिषदेच्या निवडणूकीने केला. तेव्हापासून ते काँगेस पक्षाचे निष्ठावंत म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यामुळे सन १९७८ मध्ये इंडियन नॅशनल काँग्रेस (यू) या पक्षामार्फत त्यांना कोरेगाव विधान सभेचे तिकीट त्यांना देण्यात आले. या निवडणुकीत एकूण ७०५३४ मतापैकी ३०७६५ एवढी मते मिळाली. त्यांनी आपले प्रतिस्पर्धी उमेदवार श्री. पांडुरंग निळकंठराव माने यांचा ६०३० मतांनी पराभव केला.[१००]

श्री. शंकरराव जगताप यांना पुन्हा सन १९८० मध्ये कोरेगाव विधानसभेच्या निवडणूकीचे इंडियन नॅशनल काँग्रेस (यू) पक्षामार्फत तिकीट देण्यात आले. या निवडणुकीत त्यांनी आपल्या जवळचे प्रतिस्पर्धी इंडियन नॅशनल काँग्रेस (आय) पक्षाचे उमेदवार श्री. बर्गे दत्ताजीराव भाऊसाहेब यांना ११६०२ मतांनी पराभूत केले. या निवडणुकीत कोरेगांव मतदार संघात एकूण वैध मतदान ६३२९९ इतके झाले होते. त्यातील श्री. जगताप शंकरराव चिमाजी यांना ३४८२९ मते मिळाली होती.[१०१]

सन १९८५ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत कोरेगांव मतदार संघात एकूण वैध मतदान ८१८६८ इतके झाले. यावेळी इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाचे उमेदवार श्री. जगताप शंकरराव चिमाजी यांना ४८०४९ मते पडली आणि त्यांचे जवळचे प्रतिस्पर्धी इंडियन काँग्रेस (सोशॅलिस्ट) पक्षाचे उमेदवार श्री. फाळके शिवाजी गोविंदराव यांना ३३१६५ मतदान मिळाले.

अशा रितीने श्री. जगताप शंकरराव चिमाजी यांनी आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवारावर १४८८४ मतांनी विजय मिळवला.[१०२] या विजयानंतर श्री. शंकरराव जगताप यांच्या विद्वत्ता आणि कायद्याच्या अभ्यासाचा उपयोग सर्वांना व्हावा या हेतूने त्यांची विधानसभेच्या उपसभापतीपदी निवड करण्यात आली आणि अण्णांच्या कार्यकुशलतेची प्रचिती पुढील पाच वर्षात सर्वांना आली.

सन १९९० साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत कोरेगांव मतदार संघात एकूण वैध मतदान १०४८१९ इतके झाले. यावेळी इंडियन नॅशनल कॉंग्रेस पक्षाचे उमेदवार श्री.जगताप शंकरराव चिमाजी यांना ५६२४७ मते पडली आणि त्यांचे जवळचे प्रतिस्पर्धी जनता दल पक्षाच्या उमेदवार श्रीमती शालिनीताई पाटील यांना ४४६८८ मतदान मिळाले. अशा रितीने श्री. जगताप शंकरराव चिमाजी यांनी आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवारावर ११५५९ मतांनी विजय मिळवला.[१०३] या विजयानंतर श्री. शंकरराव जगताप यांच्या मागील पाच वर्षात केलेल्या कामामुळे त्यांची विधानसभेच्या सभापतीपदी निवड करण्यात आली.

सन १९९५ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत कोरेगांव मतदार संघात एकूण वैध मतदान ११९५५९ इतके झाले. यावेळी इंडियन नॅशनल कॉंग्रेस पक्षाचे उमेदवार श्री. जगताप शंकरराव चिमाजी यांना ५९७९३ मते पडली आणि त्यांचे जवळचे प्रतिस्पर्धी जनता दल पक्षाच्या उमेदवार श्रीमती शालिनीताई पाटील यांना ५३८०७ मतदान मिळाले.अशा रितीने श्री. जगताप शंकरराव चिमाजी यांनी आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवारावर ११५५९ मतांनी विजय मिळवला.[१०४]

सन १९९९ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत कोरेगांव मतदार संघात एकूण वैध मतदान १०४८३७ इतके झाले. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवार श्रीमती शालिनीताई पाटील यांना ६१६९२ मते पडली आणि त्यांचे जवळचे प्रतिस्पर्धी इंडियन नॅशनल कॉंग्रेस पक्षाचे उमेदवार श्री. जगताप शंकरराव चिमाजी यांना ३६०६९ मतदान मिळाले. अशा रितीने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवार श्रीमती शालिनीताई पाटील यांनी श्री. जगताप शंकरराव चिमाजी यांच्यावर २५६२३ मतांनी विजय मिळवला.[१०५]

अशाप्रकारे श्री. शंकरराव जगताप हे कोरेगाव विधानसभेच्या निवडणुकीत एकूण पाच वेळा निवडून येऊन त्यांनी महाराष्ट्रात एक नवीन इतिहास रचला होता. मात्र शेवटी सन १९९९

मध्ये मा. श्री. शरद पवार यांनी राष्ट्रवादी पक्षाची स्थापना केली त्यावेळी कोरेगाव तालुक्यातील लोकांनी शरद पवार यांचा राष्ट्रवादी पक्षास पाठिंबा दिला. त्यामुळे इंडियन नॅशनल काँग्रेसचे महत्त्व कमी होत गेले. त्याचा परिणाम असा झाला की सन १९९९ च्या निवडणुकीत शंकरराव जगताप यांना पराभव स्वीकारावा लागला. तर या निवडणुकीत राष्ट्रवादी पक्षाच्या उमेदवार श्रीमती शालिनीताई पाटील निवडून आल्या होत्या.

**शंकरराव जगताप यांचे लोकांच्या हितांची कामे :–**

शंकरराव जगताप हे सर्व सामान्य लोकांच्या हिताची अनेक कामे केली आहेत. ते विधानसभेत आमदार म्हणून काम करीत असताना त्यांनी वीज, रस्ते, पाणी, आरोग्य, समाजमंदीरे आदी सुविधा देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. तसेच बहुजन समाजाला शिक्षण मिळावे यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. त्यांनी माध्यमिक शिक्षण खेडयातील विद्यार्थ्यांना मिळावे यासाठी खेडेगावात हायस्कूल काढली. तसेच आपल्या जन्मगावी म्हणजेच वाघोली येथे त्यांनी एक उच्च शिक्षण देणारे महाविद्यालय स्थापन केले. यातून त्यांची शिक्षणाविषयीची जी तळमळ होती ती दिसून येते. त्यांनी १९७२ च्या दुष्काळात कोरेगांव तालुक्यात १००–१२५ पाझर तलाव बांधले. पाण्याचे महत्त्व ओळखून जलसंधारणाची अनेक कामे हाती घेतली. या कामामध्ये त्यांनी स्वतः लक्ष घातले होते. समाजातील मागासलेल्या लोकांना एकत्र आणून त्यांनी त्यांचा स्वाभिमान जागृत केला. प्रत्येक खेडेगांव जवळच्या शहरास किंवा गावास जोडले. इतर तालुक्यांच्या तुलनेत सर्वाधिक लांबीचे डांबरी रस्ते कोरेगांव तालुक्यात आहेत. शंकरराव जगताप यांच्या विधानसभेचे अध्यक्ष असतानाच्या कारकिर्दीत रहिमतपूर येथे पुढील प्रसंग घडला होता. रहिमतपूर येथील झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना नळाचे पाणी नव्हते म्हणून या लोकांनी मोर्चा काढला होता. तेव्हा शंकरराव जगताप त्या झोपडपट्टीत पाणी पुरविण्यासाठी पाईपलाईन कशी टाकता येईल हे पाहण्यासाठी रात्रीच्यावेळी गेले होते. तेव्हा त्यांना तिथे पहावयास मिळाले की, त्या झोपडीतील एका दलित कुटुंबातील मूल भाजलेले होते. हे पाहून त्यांचे मन कळवळून आले. त्यांनी त्या भाजलेल्या मुलाला स्वतःच्या गाडीत घालून त्यास हॉस्पिटलमध्ये नेले. ते गाडीतून त्या मुलाला नेत असताना त्या झोपडपट्टीतील नागरिकांनी त्यांची गाडी अडवली. त्यावेळी शंकरराव जगताप म्हणाले की, मला जरूर घेराव घाला परंतु मला या मुलाला उपचारासाठी नेऊ द्या.[१०६] यावरून त्यांच्या मनात गोरगरिबाविषयी किती

तळमळ होती हे दिसून येते.

अशा प्रकारे शंकरराव जगताप यांनी कोरेगांव मतदार संघावरची आपली पकड २५ वर्षे मजबूत ठेवलेली दिसते. त्यांनी आपला नवीन रस्ता बनविला होता. सर्वसामान्य लोकांच्या गरजा त्यांनी स्वतः त्यांच्या घरापर्यत जाऊन भागविल्या होत्या. दुष्काळी भागातील पाणीप्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. प्रत्येक जातीधर्माबाबत त्यांना आस्था होती म्हणूनच त्यांनी लिहून ठेवले होते की, माझ्या मृत्यूनंतर अठरा पगड जातीतील लोकांनी मला खांदा द्यावा आणि माझा शेवटचा प्रवासही बौध्द व मातंग वस्तीतून व्हावा.[१०७] कोरेगांव एज्युकेशन सोसायटी ही शिक्षण संस्था काढून त्यांनी दुर्गम भागात शिक्षणाचा प्रसार केला.

महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती मा. शिवाजीराव देशमुख त्यांच्या आठवणी मांडताना म्हणतात, महात्मा गांधी यांच्या विचारांचा आणि जीवनाचा त्यांच्यावर फार मोठा प्रभाव होता. त्यामुळेच स्व. जगताप साहेबांनी देशप्रेमाने प्रेरीत होऊन स्वातंत्र्यलढयात सहभाग घेतला. आणि महात्मा गांधींचे विचार अखेरपर्यंत जोपासण्याचा प्रयत्न करून समाजातील गोरगरीब व पिडीत जनतेची सेवा करण्यासाठी पुढाकार घेतला.[१०८] शंकररावजी जगताप यांच्या निधनानंतर शोक प्रकट करताना महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. पृथ्वीराज चव्हाण म्हणतात, अगदी विद्यार्थी दशेत त्यांनी देशप्रेमाने प्रेरीत होऊन स्वातंत्र्यलढयात भाग घेतला. महात्मा गांधी यांच्या विचारसरणीचा आणि जीवनाचा त्यांच्यावर फार मोठा प्रभाव होता. हा प्रभाव त्यांच्या आयुष्यावर अखेरपर्यंत राहिला.[१०९]

### डॉ.शालिनीताई पाटील :-

कोरेगांव तालुक्यातील 'सत्यशोधक समाज' चे कार्यकर्ते कै. ज्योत्याजीराव बयाजीराव फाळके-पाटील यांच्या पोटी ०८.०८.१९३३ रोजी डॉ. शालिनीताईंचा जन्म झाला. राजकीय क्षेत्र, शेतीक्षेत्र आणि सार्वजनिक क्षेत्रात भरीव कामगिरी करण्याचा संस्कार त्यांच्यावर बालपणापासूनच झालेला होता. वडिलांच्या समाजाभिमुख व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावाने डॉ. शालिनीताईचा पिंड घडण्यात सिंहाचा वाटा आहे.

डॉ. शालिनीताईचे बालपण, प्राथमिक-माध्यमिक शिक्षण पाडळी-सातारारोड येथेच झाले. पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण कोल्हापूर येथे झाले. त्यांनी आपल्या आयुष्यात बी. ए.

(ऑनर्स) एल्. एल्. बी. आणि पीएच्. डी. अशी गुणवत्ता प्राप्त केली आहे. सर्व सुविधा उपलब्ध असूनही तरूणांना जी शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त करणे जमत नाही ते, शालिनीताईंनी, सर्व व्याप सांभाळून गुणवत्ता प्राप्त करून दाखविली आहे.

ताईचा पिंड राजकारणी आणि समाजकारणी असला तरी, त्यांनी साहित्यिक क्षेत्रातही आपण लेखनकौशल्य सिद्ध करून दाखविलेले आहे. अनंत अडचणी येऊनही आपला चिरंजीव 'शिवाजी' हा छत्रपती होण्यासाठी प्रेरणा देणारी 'राजमाता जिजाऊसाहेब' यांचे ऐतिहासिक ललित चरित्र ताईंनी लिहून सन १९७७ मध्ये प्रसिद्ध केलेले आहे. तसेच 'स्वयंसिद्धा' हे, ताईनी पन्नास वर्षांच्या राजकीय वाटचालीचे पुस्तक लिहून प्रसिद्ध केलेले आहे. कोल्हापूर राजगादीच्या संस्थापिका 'महाराणी ताराराणी' यांच्या जीवनचरित्राचा, थोर कार्याचा साक्षेपी अभ्यास करून, पीएच्. डी. पदवीसाठी 'ताराऊ' हा संशोधनपर ग्रंथ लिहिला. या अभ्यासपूर्ण ग्रंथावरून सन १९८७ मध्ये मुंबई विद्यापीठाने ताईना  पीएच्. डी. ही डॉक्टरेट पदवी बहाल केली. हा प्रबंध त्यांनी पुढे ग्रंथरूपाने प्रसिद्ध केला आहे.

देश, राज्य, जिल्हा किंवा तालुका असा कोणताही विभाग असो, अनेक स्त्रियांना आयुष्य घडविण्यासाठी संधी, मदत, सहकार्य मिळत नाही म्हणून काही तरी विशेष करून दाखवावे अशी जिद्द असणाऱ्या स्त्रियांना आणि इतरांनाही वित्तपुरवठा व्हावा या उद्देशाने ताईनी सन १९७१ साली 'श्री लक्ष्मी महिला सहकारी बँक लि. सांगली' या बँकेची स्थापना केली. आपल्या देशातील महिलांसाठीची ही पहिली बँक स्थापन करून त्यांनी यशस्वी रितीने चालवून दाखविली आहे. हे एक आदर्श उदाहरण दाखवून दिल्यामुळे महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर अनेक राज्यांत महिलांसाठीच्या बँका स्थापन झाल्या आहेत. अशा बँकाना अनेक मार्गदर्शन करण्याचे कार्य , 'श्री लक्ष्मी महिला सहकारी बँक' करीत आहे. या बँकेच्या अनेक शाखा निघाल्या असून त्या समर्थ आर्थिक पायावर उभ्या आहेत. अनेक स्त्रियांना या बँकेचा फायदा झालेला आहे.

ताईनी आपले बंधू अॅड. वसंतराव फाळके त्यांच्या सहकार्याने स्वर्गीय सत्यशोधक ज्योत्याजीराव फाळके–पाटील यांच्या नावाने ट्रस्ट स्थापन केला आहे. या ट्रस्टतर्फे सन १९९२ मध्ये पाडळी–सातारारोड येथे माँटेसरीपासून इ. १२ वी ज्यूनि. कॉलेज (कला व विज्ञान) पर्यंतची शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. या विद्यालयास ताईचे स्वर्गीय

सुपुत्र चंद्रकांत पाटील यांचे नाव देण्यात आलेले आहे.

ताईच्या राजकीय जीवनाचा आलेख चित्तथरारक आहे. बालपणापासूनच समाजकारण आणि त्यातून राजकारण यांचे संस्कार झालेले होते. वयाच्या अठराव्या वर्षी म्हणजेच १९५१ मध्ये राष्ट्रसेवादलाच्या सातारारोड–पाडळी शाखेच्या, मुलींच्या विभागाच्या त्या प्रमुख झाल्या होत्या. नंतर वयाच्या चोविसाव्या वर्षी म्हणजे सन १९५७ साली त्यांनी सांगली जिल्हा लोकल बोर्डाची निवडणूक लढविली आणि त्या विजयी झाल्या. समाजकारणातून राजकारणातील हे त्यांचे पहिले पाऊल होय. या लोकल बोर्डाचे नंतर जिल्हापरिषदेमध्ये रूपांतर झाले. सन १९६४ अखेर त्यांनी सदस्य म्हणून कामकाज पाहिले. सन १९६२ ते १९६४ या काळात त्यांनी 'महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस महिला फ्रंट' च्या प्रमुखपदाची जबाबदारी सांभाळली. जानेवारी १९८० च्या लोकसभेच्या निवडणूकीच्या वेळी सातारा लोकसभा मतदार संघातून त्यांनी निवडणूक लढविली होती. नंतर जून १९८० मध्ये महाराष्ट्र विधान सभेची सांगली मतदार संघातून, त्यांनी निवडणूक लढवून मंत्रीमंडळात काम केले. याच काळात, 'वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट' संस्थेसाठी, दोनशे एकर जागा उपलब्ध करून देऊन, संस्थेच्या स्थापनेचा शुभारंभ केला होता. सन १९८२–८३ या काळात त्यांनी सार्वजनिक बांधकाम आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री म्हणून काम पाहिले. त्या काळात काही राजकीय कारणांमुळे वसंतदादा पाटील यांनी राजसंन्यास घेतला होता. त्यांना राजकारणात परत आणण्यासाठी ताईंनी, १९८२ मध्ये अंकलखोप (जि.सांगली) येथे यशवंतराव चव्हाण आणि वसंतदादा पाटील यांचे मनोमिलन व्हावे म्हणून भेट घडवून आणली होती.

डॉ. शालिनीताई पाटील यांनी मार्च १९८३ मध्ये सांगली लोकसभा मतदार संघातील पोटनिवडणूक लढवून जिंकली. नोव्हेंबर १९८४ अखेर त्यांनी खासदार म्हणून काम केले. या कालावधीत साखर कारखान्यांच्या 'लायसेंसिंग पॉलिसी' बाबतचे भारत सरकारचे जुने धोरण बदलले जावे म्हणून यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली खास प्रयत्न केले होते. विशेष म्हणजे 'जिथे ऊस तिथे साखर कारखाना' देण्याचे धोरण जाहीर करवून घेण्यात त्या यशस्वी झाल्या. त्यामुळेच कोरेगाव–खटाव तालुक्यासाठी, सहकारी साखर कारखाना मंजुरीचे इरादापत्र मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. सप्टेंबर १९९९ मध्ये कोरेगाव विधानसभा मतदार संघातून त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे निवडणूक लढवून जिंकली.[११०]

आमदार डॉ. शालिनीताई पाटील यांनी चिमणगाव येथे स्थापन केलेला 'श्री जरंडेश्वर सहाकरी साखर कारखाना' होय. या कामासाठी त्यांनी सन १९८४ पासून प्रयत्नाला सुरूवात केली होती. भारत सरकारच्या धोरणात बदल करण्यासाठी लोकसभेत त्यांनी केलेल्या प्रयत्नामुळे  या कारखान्यास सन १९८९ मध्ये इरादापत्र मिळाले. परंतु प्रारंभापासूनच या कामात, अनेक कारणांनी, अनंत अडचणी आल्या. दोन वेळा अगदी सुप्रीम कोर्टापर्यत जावे लागले. परंतु त्यात त्या यशस्वी झाल्या. न्यायालयीन यशस्विता मिळाली तरी प्रत्यक्ष कार्यवाहीचेही काम अवघडच होते. शासकीय अर्थसाहाय्य मिळविणे, शेअर्स जमविणे, कर्ज उभारणी करणे अशा अनेक कामांमधून यशस्वी वाटचाल करून, त्यांनी कारखान्याची उभारणी केली. सन १९९८–९९ मध्ये, ऊसाचे पहिले गाळप यशस्वी झाले.

श्री. जरंडेश्वर साखर कारखान्याच्या उभारणीबरोबरच इतरही अनेक लघुद्योग सुरू करण्यासाठी ताई प्रयत्नशील आहेत. कोरेगाव तालुक्याचा उत्तर आणि उत्तरपूर्व भाग सतत दुष्काळी असल्यामुळे तेथे सिंचनाची सोय व्हावी म्हणून १८०/– कोटींच्या वसना व वांगना उपसा जलसिंचन योजना मंजूर करून घेतली आहे. या योजनेमुळे सुमारे वीस हजार एकर क्षेत्र ओलिताखाली येऊन चाळीस गावांना लाभ झालेला आहे.[१११]

अशाप्रकारे आमदार डॉ. शालिनीताई पाटील यांनी आयुष्यभर खडतर तपश्चर्या केली. अनेक थोरा मोठयांच्या सहकार्याचा लाभ मिळविला. प्रत्येक कामाच्या वेळी, त्यांना लाभ मिळाला. पण, प्रत्येक कामाच्या वेळी त्यांना संघर्ष करावा लागला. मुख्यमंत्री पद मिळण्यापर्यतचे क्षण त्यांना आले होते. परंतु ते शक्य झाले नाही. डॉ. शालिनीताई पाटील यांना सन २००१ साली 'राजमाता जिजाऊ पुरस्कार' बहाल करण्यात आला.

### आमदार आनंदराव नागेश फाळके (भाऊ), सातारा रोड (कारकीर्द १९६७ ते १९७२)

#### जन्म व शिक्षण

श्री. आनंदराव नागेश फाळके (भाऊ) यांचा जन्म १३ जानेवारी, १९२३ रोजी एका शेतकरी कुटुंबात कोरेगाव तालुक्यातील चंचळी येथे झाला. शेतकरी व कामकरी यांच्या सहवासात त्यांचे बालपण गेले. त्यांचे इयत्ता ७ वी पर्यंत प्राथमिक शिक्षण सातारारोड येथे झाले.[११२]

**आनंदरावांनी हातगाडी कामगार संघटना उभारली**

शेतीच्या व्यवसायावर त्यांचा कौटुंबिक उदरनिर्वाह होत नव्हता म्हणून ते कामधंद्याच्या शोधात मुंबईला गेले. व मुंबईत ते कापड बाजारात हातगाडी कामगार म्हणून ते काम करू लागले. आपल्या मेहनती, प्रामाणिक, प्रेमळ स्वभावाने त्यांनी सर्वांची मने जिंकली. व समाजकार्याचा श्रीगणेशा १९३९ साली राष्ट्रीय कामगार संघटनेत प्रवेश करून केला. इ. स. १९४४ मध्ये मुंबई कापड बाजार हातगाडी कामगारांची संघटना उभारली. इ. स. १९४९ श्री कापड बाजार मराठा कामगार मंडळ, मुंबई या कामगार बोर्डाची सहकारी मित्रांच्या सहाय्याने स्थापना केली.[११३]

**आनंदरावांचा स्वातंत्र्य संग्रामातील सहभाग**

देशात इ. स. १९४२ साली चलेजाव चळवळ महात्मा गांधीच्या नेतृत्वात सुरू झाली. यात सातारा जिल्हाही अग्रेसर होता. तेव्हा कोरेगाव तालुक्यातील आनंदराव फाळके यांचा पिंड एक सामाजिक कार्यकर्त्याचा असल्याने त्यांनी त्यामध्ये सहभाग घेतला व स्वतःला स्वातंत्र्य युद्धाच्या अग्नीकुंडात झोकून दिले. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी कामगारांना विचाराने व देशप्रेमाने एकत्रित केले. त्यांच्यामध्ये देशकार्यासाठी त्यागाची भावना जागृत केली. त्यावेळी सातारा जिल्हयामध्ये इंग्रजांविरूद्ध आवाज उठविण्यासाठी पत्री सरकारची स्थापना झालेली होती. थोर स्वातंत्र्य सेनानी किसन वीर आबा यांच्याशी त्यांची भेट झाली. त्यामुळे आनंदराव फाळके (भाऊ) यांनी आणखी जोमाने कामास सुरूवात केली. पुढे ते किसन वीर यांचे विश्वासू, प्रामाणिक कार्यकर्ते झाले. भूमिगतांना साहय करणे, दारूगोळा आणणे, लढाईचे साहित्य जमा करणे इत्यादी अतिशय जोखमीचे कार्य आनंदराव फाळके यांनी किसन वीरांसाठी केली.[११४]

**मुंबईहून काडतुसांची पेटी आणली**

नोव्हे. १९४३ च्या सुमारास सित्तुर येथे जिल्हयातील प्रमुख भूमिगतांची बैठक झाली. किसन वीर आबा या बैठकीत हजर राहिले होते. यशवंतराव चव्हाण, के. डी. पाटील हे पहिले संघटन प्रमुख अटकेत गेल्यामुळे धन्वंतरी कासेगावकर वैद्य यांची भूमिगत संघटनेचे प्रमुख म्हणून निवड झाली. धन्वंतरींनी पूर्वीच्याच उत्साहाने सर्व जिल्हाभर फिरून भूमिगत कार्यात सुत्रबद्धता आणली. नांदवळचे श्रीरंगराव बेसके यांना मुंबईतील एका काडतुसे विक्रेत्याकडून रिव्हॉल्व्हरची काडतुसे मिळाली होती ती करंजखोपला आणावयाची होती. हे जबाबदारीचे काम

आबांनी मुंबईत असलेले सातारारोडच्या आनंदराव फाळके यांच्यावर सोपविले होते. त्यांनी काडतुसांची पेटी गावाकडील एका पोलिस मित्राच्या मदतीने रेल्वेने आणली. पुण्यात गाडी बदलतांना पोलिस चौकशीच्या कचाटयातून निसटले व स्वारगेटला आले. तेथून ओळखीच्या पॅसेंजर बसने जोशी विहीर येथे उतरले व पायी ती वजनदार पेटी वाघोलीच्या भाऊसाहेब भोईटे यांच्याकडे ठेऊन दिली. आबा त्यावेळी करंजखोपला असतील म्हणून चौकशी केली पण ते तेथे नव्हते. मग आबांची चौकशी केली असता मालगावच्या वरच्या बाजूस राऊतवाडीस आहेत असे कळले. आनंदराव फाळके तेथे गेले व काडतुसे आणल्याची माहिती सांगितली. रामचंद्र भाऊसाहेब भोईटेकडून नंतर ती पेटी आबांना मिळाली. भूमिगतांना मदत करणारी मित्रमंडळी हत्यारे व साहित्य देत असत. पण ती गुप्तपणे इकडून तिकडे पोहोचविण्याचे हे कामही तितकेचे अवघड असे. त्याकरिता आनंदराव फाळकेसारखी तरूण मंडळी आबांनी तयार केली होती.[११५]

## आबांच्या मार्गदर्शनाखाली कूपर कामगार युनियन सातारा रोड चे नेतृत्व

सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या २७ फेब्रुवारी, १९५५ च्या सभेत किसन वीर आबांची अध्यक्ष म्हणून एकमताने फेरनिवड झाली. दुर्दैवाने त्याच वर्षी १९५५ साली सातारा जिल्हयात फार मोठा दुष्काळ पडला. तेव्हा आबांनी सर्वपक्षीय नेत्यांची बैठक बोलावून दुष्काळ निवारणाचे काम सरकारच्या मदतीने युद्ध पातळीवर केले होते. त्याच साली फलटण साखर कारखान्याचा खंडवाढीचा प्रश्न व सातारा रोड कूपर कारखान्यामध्ये रेंगाळत व चिघळत गेलेल्या मजूर प्रश्नामध्ये आबांनी जिल्हा काँग्रेस कमिटीमार्फत चिकाटीने यशस्वी नेतृत्व केले. कम्युनिस्ट पक्षाने या दोन्ही ठिकाणी परिस्थिती नाजूक करून ठेवली होती. दहशतवादावर आधारलेली सत्याग्रह चळवळ आरंभून कामगार जीवन उध्वस्त होण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. अशा वेळी कूपर इंटक युनियनमधील टाळेबंदीची परिस्थिती सोडवून तो कारखाना पुन्हा सुरू करण्याइतके उभयपक्षी विश्वासाचे वातावरण आबांनी निर्माण केले. आनंदराव नागेश फाळके सारख्या कार्यकर्त्यांच्या सहकार्याने अनेक दिवस चुकीच्या व आततायी नेतृत्वामागे धावत गेलेले कामगार योग्य नेतृत्वाखाली आणले. सहकार्यांच्या बळावर टाळेबंदीची स्थिती संपवण्यास चालकांना आबांनी प्रवृत्त केले. इ.स.१९५५ ते १९६२ पर्यंत आनंदराव फाळके यांनी आबांच्या मार्गदर्शनाखाली कूपर कामगार युनियनचे काम कौशल्याने हाताळले होते.[११६]

## किसन वीर साखर कारखाना भुईंज च्या उभारणीत किसन वीरांना साहाय्य

शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक परिवर्तन व्हावे व गोरगरिबांच्या मुलांना रोजगार मिळावा या उदात्त भावनेतून किसन वीर आबांनी किसन वीर साखर कारखाना, भुईंजच्या उभारणीसाठी प्रयत्न चालविले होते. नियमाप्रमाणे नियोजित साखर कारखान्याचे प्रपोजल तयार करण्यात आले व ते २२ मे, १९६८ रोजी केंद्र शासनाकडे राज्य सरकारमार्फत मंजुरीस पाठविले. त्यासाठी किमान १ कोटी रूपयांचे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे भागभांडवल जमा झाल्यानंतर कारखान्याला परवाना देण्याचा नियम होता. परंतु कारखान्याचे प्रपोजल पाठवताना ४५ लाख रूपयांचे भागभांडवल जमा होते व ५५ लाख रूपयांचे भागभांडवल पुढील सहा महिन्यात जमा करण्याची हमी आबांनी घेतल्यामुळेच सदर कारखान्याचे प्रपोजल साखर संचालकांनी स्वीकारले होते. या भुईंज साखर कारखाना उभारणीसाठी भागभांडवल जमा करण्यासाठी किसन वीर आबांना आनंदरावांना मदत केली.[११७] कारखाना उभारणीनंतर आनंदराव फाळके यांना कारखान्याचे व्हा. चेअरमन केले. आनंदराव फाळके आबांचे विश्वासू सहकारी होते. याचे उदाहरण म्हणजे कारखान्याचा पहिला हंगाम संपल्यानंतर कारखान्याची मशिनरी तपासून पाहता टरबाईनमध्ये काही दोष निर्माण झाल्याचे दिसून आले. ती दुरूस्ती करण्याचे तज्ज्ञ इंजिनिअर संकेश्वर सहकारी साखर कारखान्याकडे होते. त्यांना प्रत्यक्ष जाऊन बोलावले तरच ते येऊ शकणार होते. म्हणून आबांनी कार्यकारी संचालक रामरगबीर व व्हा. चेअरमन आनंदराव फाळके यांना संकेश्वरला पाठविले.[११८] कारखान्याचा दुसरा गळीत हंगाम १९७२ च्या ऑक्टोबरमध्ये सुरू झाला. कमी पडत असलेला असलेला ऊस मिळविण्याचे प्रयत्न होत होते. शेती महामंडळाच्या बेलवंडी फार्मवरचा ५०० एकर ऊस कारखान्याने घेतला होता. तो तोड करून पाठविण्याच्या कामावर देखरेख करण्यास कारखान्याचे व्हा. चेअरमन आनंदराव फाळके तिकडे ३ महिने मुक्काम ठोकून होते. आनंदराव फाळके यांनी स्वातंत्र्यपूर्व काळापासून किसन वीर आबा यांच्याबरोबर सहकार्याने काम केले व त्याचे फळ म्हणजे ते किसन वीर साखर कारखाना भुईंजचे व्हा. चेअरमन झाले. याच काळात इ. स. १९६७ ते १९७२ मध्ये आमदार म्हणून यशस्वी कारकीर्द पूर्ण केली. जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष भिलारे गुरूजी नेहमी म्हणत की, माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्यास आबांच्यामुळेच प्रतिष्ठेने काम करण्याची संधी मिळाली. त्याचप्रमाणे आनंदराव फाळके, लक्ष्मणराव पाटील, सर्जेराव जाधव, शंकरराव गाढवे वगैरे

कार्यकर्त्यांना आबांच्यामुळेच राजकारणात काम करण्याची संधी मिळाली. त्या संधीचा उपयोग त्यांनी करून घेतला. त्यातूनच जि. प. पदाधिकारी, आमदार व खासदार जनतेने निवडून दिले.[११९] यावरून किसन वीर आबा यांचे सातारा जिल्हयातील अनन्यसाधारण महत्त्व स्पष्ट होते.

## १९६७ च्या विधान सभा निवडणुकीत यश

१९६७ च्या निवडणूकीसाठी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांची निवड करावयाची होती. जिल्हयाचे नेते यशवंतराव चव्हाण त्यावेळी मुंबईत आजारी होते. म्हणून जिल्हा काँग्रेसच्या कार्यकारिणीची सभा जिल्हाध्यक्ष भिलारे गुरूजी यांच्या अध्यक्षतेखाली ना. दादासाहेब जगताप यांच्या मुंबई येथील निवासस्थानी झाली. आबांनी १९६७ च्या निवडणूकीचे जे अडाखे बांधले होते त्यानुसार उमेदवार ठरले. लोकसभेसाठी यशवंतराव चव्हाण व आनंदराव चव्हाण यांची निवड झाली. विधानसभेसाठी पाटणमधून बाळासाहेब देसाई, कराड उत्तरमधून यशवंतराव पार्लेकर, कराड दक्षिणमधून यशवंतराव मोहिते, सातारा शहरामधून दादासाहेब जगताप, जावलीमधून भिलारे गुरूजी, खटावमधून चंद्रहार पाटील, वाईमधून प्रतापराव भोसले, फलटणमधून कृष्णचंद्र भोईटे, माणमधून डॉ. प्रभावती सोनावणे व कोरेगावमधून आनंदराव फाळके यांची शिफारस करण्यात आली व तीच शिफारस पुढे कायम करण्यात आली. यात चंद्रहार पाटील, प्रतापराव भोसले, कृष्णचंद्र भोईटे, आनंदराव फाळके यांना प्रथमच उमेदवारी दिली होती. त्यामुळे जुने इच्छुक कार्यकर्ते नाराज झाले होते. यानंतर जिल्हा कार्यकारिणीची सभा होऊन जिल्हा निवडणूक समिती स्थापन झाली. निवडणूक प्रचार धुमधडाक्याने सुरू झाला. फेब्रुवारी १९६७ मध्ये सार्वत्रिक निवडणूका झाल्या. लोकसभेत काँग्रेसला २७५ जागा मिळाल्या तर विधानसभेत २०२ जागा मिळाल्या. सातारा जिल्हयात काँग्रेसला १०० टक्के यश मिळाले होते. यशवंतरावांच्या मागे किसन वीर आबांनी सातारा जिल्हा कसा सांभाळला याची ती साक्षच होती.[१२०] या विधानसभा निवडणूक प्रचारासाठी आनंदराव फाळके यांना मुंबई येथील कामगारांनी निधी दिला होता. त्याशिवाय एक गाडीदेखील खरेदी करून दिली होती. आमदार म्हणून ते कोरेगाव मतदार संघात २७ हजार मतांनी निवडून आले होते. त्यांनी विधानसभेमध्ये कोरेगाव तालुक्यातील जनतेचे प्रश्न मांडले व त्यास न्याय मिळवून दिला. त्याचप्रमाणे सरकारचे दरबारी कामगारांच्या हितासाठी ठोस भूमिका मांडून त्यास न्याय मिळवून घेतला.[१२१]

## सहकार चळवळीतील कार्य

सातारा जिल्हयाचे ज्येष्ठ नेते क्रांतिसिंह किसन वीर उर्फ आबासाहेब व यशवंतराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली व नेतृत्वाखाली आनंदरावांनी सहकार चळववळीत सातारा जिल्हयात उल्लेखनीय कार्य केले. सातारा किसन वीर सहकारी साखर कारखाना, भुईंज कारखान्याच्या उभारणीत सिंहाचा वाटा व भुईंज सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन म्हणून उल्लेखनीय कार्य, भूविकास बँकेचे संचालक, डॉ.शिवाजी शिक्षण संस्थेच्या डॉ.गदगकर विद्यालयाचे संस्थापक, नवयुग वाचनालयाचे संस्थापक, शिवाजी सहकारी दुध संस्था, सातारारोड, फाळके पाडळी नं.२ वि.का.स.सेवा सोसायटी स्थापना, सातारा जिल्हा मजूर फेडरेशनचे व्हाईस चेअरमन यासारखी पदे भूषवून लोकांच्या कल्याणासाठी कार्य केले.[१२२]

मुंबईमध्ये पोटाची खळगी भरण्यासाठी हमाली करण्यासाठी हातगाडी ओढणारा साधा हातगाडीवाला महाराष्ट्र विधान सभेचा आमदार होईल असे कोणी सांगितले असते तर कोणी विश्वास केला नसता. परंतु कोरेगाव तालुक्यातील आनंदराव फाळके यांच्या बाबतीत प्राचीन धर्मग्रंथातील 'नर करणी करे तो नर का नारायण हो जाय'. ही उक्ती सार्थ वाटते. ते आमदार झाले. हे लोकशाहीच्या परिपक्वतेचे उदाहरण आहे. सातारा जिल्हयातील कोरेगाव तालुक्यातील सातारारोड येथील शेतकरी कुटुंबात जन्मलेला सर्वसामान्य तरूण मुंबईला जाऊन हातगाडी ओढतो आणि आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्र विधान सभेचा आमदार होऊन असाध्य ते साध्य करून दाखवतो.

सामान्यांचे अष्टपैलू लाडके नेतृत्व म्हणजे आनंदराव फाळके होत. आनंदराव फाळके हे जनमाणसात भाऊ या नावानेच सुपरिचित होते. गोरगरिबांना आधार, प्रेम देण्याचा स्वभाव, परोपकारी वृत्ती, मनमिळाऊ मृदूभाषी संयमी वागणे, आपुलकी हे त्यांच्या स्वभावाचे विशेष गुण होते. ते अतिशय नम्र व्यक्तिमत्वाचे होते. त्यांचा मृत्यू २२ नोव्हेंबर, २००० साली झाला.[१२३]

## आमदार दत्ताजीराव बर्गे, कोरेगाव (१९७२ ते १९७७)

हे कोरेगावचे सरपंच होते. शासनाकडून ग्रामपंचायतीची जकात मंजूर करून घेतली. त्यामुळे गामपंचायतीची आर्थिक परिस्थिती सुधारली. सरपंच म्हणून चांगले प्रशासक म्हणून कारकीर्द गाजली. कोरेगाव पिपल्स बँकेचे संचालक, सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक, कोरेगाव तालुका मार्केट कमिटीचे संचालक, २५ वर्षे कोरेगाव तालुका खरेदी विक्री संघाचे

चेअरमन, उत्तम पशासक म्हणून संघात कार्य केले. सहकाराचा गाडा अभ्यासक, कोरेगाव तालुका पंचायत समितीचे सदस्य, सातारा जिल्हा इंदिरा काँग्रेसचे सुमारे २० वर्षे अध्यक्ष, कोरेगाव तालुक्याचे आमदार म्हणून कार्य केले. आज त्यांच्या नावे दत्ताजीराव बर्गे पतसंस्था जुना मोटार स्टँड येथ कार्यरत आहे.[१२४]

## २.९ कोरेगाव तालुक्याची इतर तालुक्यांशी तुलना

सातारा जिल्हयातील लोकसभा निवडणूकीत कोरेगाव तालुक्याचा समावेश हा उत्तर सातारा मतदारसंघात होत होता. त्यावेळी सातारा जिल्हयातील लोकसभेचे मतदारसंघ हे प्रामुख्याने उत्तर सातारा, दक्षिण सातारा, कराड हे होते. सन १९५१ च्या लोकसभा निवडणुकीत उत्तर सातारा व दक्षिण सातारा लोकसभा मतदारसंघात इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाचा विजय झालेला होता. सन १९५७ च्या लोकसभा मतदारसंघात कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया तर कराड मतदारसंघात पीझंटस् अँड वर्कर्स पार्टी हे दोन काँग्रेस व्यतिरिक्त पक्ष निवडून आले होते. सन १९६२, १९६७, १९७२, १९७७ च्या लोकसभा निवडणूकीत सातारा व कराड लोकसभा मतदारसंघात इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाचा विजय झालेला होता. सन १९८० च्या लोकसभा निवडणुकीत सातारा येथे इंडियन नॅशनल काँग्रेस (यू) तर कराड मतदारसंघात इंडियन नॅशनल काँग्रेस(आय) हे पक्ष निवडून आले होते. सन १९८४, १९८९, व १९९१ च्या लोकसभा निवडणुकीत इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाचा विजय झालेला होता. तर सन १९९६ च्या लोकसभा निवडणुकीत सातारा मतदारसंघात शिवसेना व कराडमध्ये इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाचा विजय झालेला होता.[१२५]

अशाप्रकारे या लोकसभा निवडणुकीवरून हे स्पष्ट होते की, सातारा जिल्हयातील लोकसभा मतदारसंघामध्ये इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाला जास्तीत जास्त वेळा बहुमत मिळाले होते. विशेष म्हणजे कोरेगाव तालुक्यातील जनतेनेही यात इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षालाच जास्तीत जास्त वेळा निवडून दिलेले दिसते. यावरून हे स्पष्ट होते की, इतर तालुक्यातील जनतेने ज्याप्रमाणे आपले मतदान ज्या पक्षाच्या उमेदवाराला केलेले आहे. त्याच पक्षाच्या उमेदवाराला कोरेगाव तालुक्यातील जनतेने आपले मतदान केलेले दिसून येते.

## २.१० समारोप :

भारतास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सन १९५० मध्ये आपल्या राज्यघटनेनुसार स्वतंत्रपणे

राज्यकारभार सुरू झाला. त्यासाठी सन १९५१ मध्ये संपूर्ण भारतात पहिली निवडणूक होऊन खऱ्या अर्थाने लोकशाही राज्य सुरू झाले. या लोकशही राज्यात ज्या राजकीय वाटचाली सुरू झाल्या होत्या. त्यामध्ये महाराष्ट्रासह सातारा जिल्हा व कोरेगाव तालुकाही यात सहभागी झालेला होता. महाराष्ट्राच्या राजकारणाचा विचार केला असता असे दिसून येते की, सन १९५१ ते २००० या काळात राजकारणात कॉंग्रेस पक्षासह इतर पक्षही सहभागी झाले होते. यामध्ये अनेक वेळा कॉंग्रेस पक्षालाच विजय मिळालेला पहावयास मिळतो. इतर पक्ष एक दोन वेळा निवडून आले होते. परंतु कॉंग्रेस पक्षाने मात्र अनेक वेळा विजय मिळविला आहे. कॉंग्रेस पक्ष हा यशवंतराव चव्हाण व इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली निवडणूका लढवित असे. यावरून हे स्पष्ट होते की या काळात महाराष्ट्रात कॉंग्रेस पक्षासह इतर अनेक राजकीय पक्षांनी आपले स्थान अत्यंत मजबूतरित्या निर्माण केलेले आहे. मात्र हाच संदर्भ घेऊन सातारा जिल्हयाचे राजकारण अभ्यासले असता सातारा जिल्हयात कॉंग्रेस वगळता कोणत्याही राजकीय पक्षाला स्थान मिळालेले नाही. अपवादात्मक स्थितीत ज्या ज्या वेळी सातारा जिल्हयातील कॉंग्रेसेतर कोणत्याही पक्षाला जे यश मिळालेले आहे ते यश त्या पक्षाचे नसून त्या पक्षामार्फत उभ्या करण्यात आलेल्या उमेदवाराचे वैयक्तिक यश असल्याचे स्पष्टपणे जाणवते कारण त्यापुढील निवडणूकांमध्ये जर तो उमेदवार दुसऱ्या पक्षामार्फत निवडणूकीस उभा राहिल्यास मागील वेळी विजयी झालेल्या पक्षाच्या उमेदवारास अत्यंत कमी मते मिळाली आहेत. सातारा जिल्हयाच्या राजकारणात फक्त कॉंग्रेस पक्षाचेच वर्चस्व असल्याचे जाणवते. सुरूवातीच्या काळात शेतकरी कामगार पक्षामार्फत क्रांतिसिंह नाना पाटील यांनी सातारा जिल्हयात कॉंग्रेस पक्षाला कडवा विरोध केला. मात्र त्यांच्या नंतर यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वात सातारा जिल्हा हा कॉंग्रेसचा बालेकिल्ला म्हणून महाराष्ट्र आणि देशात ओळखला गेलेला आहे.

कोरेगाव विधानसभा निवडणुकीतही इंडियन नॅशनल कॉंग्रेसचेच वर्चस्व दिसून येते. या निवडणुकीत श्री. शंकरराव जगताप यांनी सलग पाच वेळा निवडून आमदार बनण्याचा बहुमान मिळविला. त्यामुळे या मतदार संघात कॉंग्रेसला किती महत्व प्राप्त झाले होते हे स्पष्ट होते. पुढे सन १९९९ मध्ये डॉ. शालिनीताई पाटील यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसमार्फत निवडणूक लढवून श्री. शंकरराव जगताप यांचा पराभव केला. तेव्हापासून कॉंग्रेस आयचे वर्चस्व कमी होऊन राष्ट्रवादी कॉंग्रेसचे महत्व वाढीस लागलेले दिसून येते.

सातारा व कोरेगाव मतदार संघात ज्या राजकीय व्यक्तिमत्व लाभलेल्या व्यक्ती होऊन गेल्या त्यामध्ये श्री. क्रांतिसिंह नाना पाटील, श्री. किसन वीर, श्री. यशवंतराव चव्हाण, श्री. शंकरराव जगताप, डॉ. शालिनीताई पाटील इत्यादि होत. यांनी आपापल्या परीने निवडणूका लढवून राजकीय, सामाजिक व सार्वजनिक सुधारणा केलेल्या पहावयास मिळतात. या लोकांनी सर्वसामान्य लोकांच्या दुःखाला वाचा फोडून त्यांना न्याय मिळवून देण्याचे कार्य केले.

मा. यशवंतराव चव्हाण यांना महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनण्याचा मान मिळाला होता. यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या राजकीय कार्याबरोबरच समाजकारण, अर्थकारण, तांत्रिक प्रगती, शिक्षण, सहकार, आर्थिक इ. बाबतीत महत्वाचे कार्य केलेले दिसून येते. त्याचबरोबर शंकरराव जगताप व डॉ. शालिनीताई पाटील यांनीही लोकांच्या हिताची अनेक कामे करून कोरेगाव तालुक्यास महाराष्ट्रातील इतर तालुक्याप्रमाणे प्रगती पथावर नेले.

## संदर्भ


१. बहुलेकर बाळासाहेब, आपला सातारा, मावळा प्रकाशन, मार्च १९९४, पृ. १३१

२. लेले सुमती यशवंत, कर्मयोगी, २१ मार्च २००४, पृ. १३९

३. मुलाखत, श्री.जगताप रामराव, मु. पो. जकातवाडी, ता. जि. सातारा, दि. ०६.०५.२०१५ वेळ स. १०:०० वा., स्थळ : जकातवाडी

४. लेले सुमती यशवंत, कर्मयोगी, २१ मार्च २००४, पृ. ५३

५. चव्हाण य.ब., कृष्णाकाठ, खंड – १, १९८४, पृ. ७९

६. बहुलेकर बाळासाहेब व उपारण्य म. चि., आपला सातारा, ६ मार्च १९९४, पृ. ११७

7. Election Commission of India - General Election, 1985 to the Legislative Assembly of Maharashtra, Statistical Report, Page No. 363

८. मुंबई विधानसभा निवडणूक अहवाल– १९३७

९. मुंबई विधानसभा निवडणूक अहवाल– १९४६

10. Election Commission of India - General Election, 1951 to the Legislative Assembly of Maharashtra, Statistical Report, Page No. 306

11. Election Commission of India - General Election, 1957 to the Legislative Assembly of Maharashtra, Statistical Report, Page No. 384

12. Election Commission of India - General Election, 1962 to the Legislative Assembly of Maharashtra, Statistical Report, Page No. 295

13. Election Commission of India - General Election, 1967 to the Legislative Assembly of Maharashtra, Statistical Report, Page No. 321

14. Election Commission of India - General Election, 1972 to the Legislative Assembly of Maharashtra, Statistical Report,

Page No. 318

15. Election Commission of India - General Election, 1978 to the Legislative Assembly of Maharashtra, Statistical Report, Page No. 353
16. Election Commission of India - General Election, 1980 to the Legislative Assembly of Maharashtra, Statistical Report, Page No. 345
17. Election Commission of India - General Election, 1985 to the Legislative Assembly of Maharashtra, Statistical Report, Page No. 363
18. Election Commission of India - General Election, 1990 to the Legislative Assembly of Maharashtra, Statistical Report, Page No. 395
19. Election Commission of India - General Election, 1995 to the Legislative Assembly of Maharashtra, Statistical Report, Page No. 438, 439
20. Election Commission of India - General Election, 1999 to the Legislative Assembly of Maharashtra, Statistical Report, Page No. 356
21. Election commission of India - general elections, 1951 (1st loksabha) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) Page no. 81
22. Election commission of India - general elections, 1957 (2nd loksabha) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) Page no. 87
23. Election commission of India - general elections, 1962 (3rd loksabha) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) Page no. 139
24. Election commission of India - general elections, 1967 (4th

loksabha) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) Page no. 148, 149

25. Election commission of India - general elections, 1971 (5th loksabha) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) Page no. 156
26. Election commission of India - general elections, 1977 (6th loksabha) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) Page no. 165
27. Election commission of India - general elections, 1980 (7th loksabha) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) Page no. 188, 189
28. Election commission of India - general elections, 1984 (8th loksabha) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) Page no. 188,189
29. Election commission of India - general elections, 1989 (9th loksabha) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) Page no. 225, 226
30. Election commission of India-general elections, 1991 (10th loksabha) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) Page no. 156
31. Election commission of India - general elections, 1996 (11th loksabha) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) Page no. 355, 356
32. Election commission of India - general elections, 1996 (12th loksabha) statistical report - volume I (national and state abstracts & detailed results) Page no. 222
33. Election commission of India - general elections, 1999 (13th loksabha) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) Page no. 211, 212

३४. पंचायत समिती निवडणूक अहवाल–१९६२

३५. पंचायत समिती निवडणूक अहवाल–१९६७

३६. पंचायत समिती निवडणूक अहवाल–१९७२

३७. पंचायत समिती निवडणूक अहवाल–१९७९

३८. पंचायत समिती निवडणूक अहवाल–१९९२

३९. पंचायत समिती निवडणूक अहवाल–१९९७

४०. अप्पासाहेब लाड व पाटील उत्तमराव, क्रांतिवीर नाना पाटील, १९८९, पृ. ९ –३०

४१. इंगळे व. न., सत्यशोधक क्रांतिसिंह नाना पाटील, साकेत प्रकाशन २००९, पृ. १३७

४२. अप्पासाहेब लाड व पाटील उत्तमराव, पृ. ६२

43. Bombay Archive Dept., Home Department (Spl.), File No. 800 (74) (14)-3, 1941-43, P. 1

४४. मुंबईच्या गृह विभागाने केंद्रीय गृह विभागास पाठविलेला गोपनीय पाक्षिक अहवाल, फाईल क्र. १८/९/१९४२, सप्टेंबर १९४२, बॉम्बे काँग्रेस बुलेटिन क्रमांक २७, ९ सप्टेबर १९४२

45. Bombay Archive Dept., Home Department (Spl.), File No. 18/10/1942, Oct. 1942, P. 3

४६. पवार जयसिंगराव भाऊसाहेब (संपा.), क्रांतिसिंह नाना पाटील, अरूंघटी प्रकाशन, कोल्हापूर, १९८३, पृ. ३५

४७. मुंबईच्या गृह विभागाने केंद्रीय गृह विभागास पाठविलेला गोपनीय पाक्षिक अहवाल, फाईल क्र. १८/१/१९४३, जानेवारी १९४३

48. Chaudhari K. K., Maharashtra And Indian freedom strugle, 1989, P. 130

४९. भगत रा. तु. (संपा.), क्रांतिसिह नाना पाटील यांची निवडक भाषणे, क्रांतिवैभव प्रकाशन कराड,१९८२, पृ. ७३

५०. पाटील रा. तू. सांगली सातार्‍याचे राजकारण परखड प्रकाशन कराड १९८६ पृ. ४४

५१. इंगळे, व. न. पत्री सरकार : चरित्र, व्यक्तिमत्व आणि चळवळ, पृ. ४६

52. http://www.dainikgomantak.com

५३. पाटील रा. तू. उपरोक्त पृ. ७३

५४. पाटील विलास, क्रांतिसिह नाना पाटील, क्रांतिवैभव प्रकाशन, कराड, १९८४ पृ. ४३

५५. काळे बाबूराव, यशवंतराव चव्हाण, राणे प्रकाशन पुणे, व्दितियावृत्ती, १९६५ पृ. १७

५६. दिक्षित दुर्गा (संपा.), महाराष्ट्र संस्कृतीकोश, डायमंड प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००९, पृ. ५०

५७. वाघ रामनाथ (संपा.), युगप्रवर्तक यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण व्यासपीठ, अहमदनगर, व्दितीय आवृत्ती, पृ. १७

५८. नलावडे प्रमोद, मासिक लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचनालय, मुंबई, मार्च २०१२, पृ. १४

५९. मेहंदळे विश्वास, यशवंतराव ते विलासराव, अनुबंध प्रकाशन, पुणे, २००७, पृ. ८०

६०. सारडा शंकर, यशवंतराव कर्तृत्व आणि नेतृत्व, दिलिपराज प्रकाशन, पुणे, २००३, पृ. १४७

६१. जोशी रामभाऊ, यशवंतरावांचे अंतरंग विरंगुळा, यशोदा प्रकाशन, पुणे, २००८, पृ. १२९

६२. चव्हाण यशवंतराव, सहयाद्रीचे वारे, मुंबई, १९६२, पृ. १४०

६३. कल्याणकर बा. ह.(संपा.), युगंधर नेतेः यशवंतराव चव्हाण, औरंगाबाद, १९८८, पृ. १०७

६४. चव्हाण यशवंतराव, सहयाद्रीचे वारे, उपरोक्त, पृ. १५३

६५. चव्हाण यशवंतराव, युगांतर, पुणे, १९७०, पृ. १६६

६६. चव्हाण यशवंतराव, सहयाद्रीचे वारे, उपरोक्त, पृ. १५६, १५७

६७. पाटील कायंदे, गंगाधर वि., यशवंतराव चव्हाण, नाशिक, २०००, पृ. १५२

६८. कल्याणकर बा. ह. (संपा.), उपरोक्त, पृ. ११०

६९. थोरात संभाजीबाबा, यशवंतराव चव्हाण झुंझार नेतृत्वाचा शोध आणि बोध, आगाशिव प्रकाशन, कराड, १९८८, पृ. १०५

७०. पाटील रा.तु. यशवंतराव चव्हाण : एक कर्तबगार पण वादग्रस्त मुसद्दी, जनवाणी

प्रकाशन, पुणे, १९८७, पृ. ३३

७१. चव्हाण यशवंतराव, सहयाद्रीचे वारे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, तिसरी आवृत्ती, मुंबई, १९९२, पृ. १९९

७२. कित्ता पृ. ६५

73. Chavan Y.B., Pradhan R. D. (Ed.) Selected Speeches in Parliament 3 Volumes, P. 59

७४. चव्हाण यशवंतराव, युगांतर, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे, १९९९, पृ. १४०, १४१

७५. दुकळे प्रकाश, यशवंतराव चव्हाण : माणूस आणि लेखक, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २०१२, पृ. ४२

७६. दिवान चंद्रशेखर, राजकिय सिध्दांत आणि राजकिय विश्लेषण, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ. ६७

७७. पाटील बी. एच., (संपा.), किसन वीर जीवन दर्शन, किसन वीर सत्कार समिती, सातारा, १९६७ ,पृ. ०४

७८. धर्माधिकारी बी. व्ही., क्रांतिवीर, विशकर्मा प्रकाशन सातारा, १९६९, पृ. १३

७९. देशमुख आर. के. किसन वीर : जीवन व कार्य, अप्रकाशित एम. फिल शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, १९९०, पृ.०५

८०. धर्माधिकारी बी. व्ही. उपरोक्त, पृ. १४

८१. पाटील बी. एच., (संपा.), उपरोक्त, पृ. ८

८२. धर्माधिकारी बी. व्ही. उपरोक्त, पृ. १९

८३. पाटील बी. एच., (संपा.), उपरोक्त, पृ.११

८४. कित्ता पृ. १२

८५. कित्ता, चव्हाण यशवंतराव, लेख पृ. ०१

८६. चिटणिस बी. एन. (संपा.) किसन वीर स्मृती विशेषांक, यशवंत शिक्षण संस्था, सुरूर, १९८१, पृ. २३

८७. कासेगावकर धन्वंतरी, दै.ऐक्य, १ सप्टेबर १९८०, किसन वीर स्मृती अंक, पृ. १२

८८. देशमुख आर .के. उपरोक्त, पृ. ७१

८९. धर्माधिकारी बी. व्ही. उपरोक्त, पृ.१२९

९०. कित्ता, पृ. १३४

९१. कित्ता, पृ. १४३

९२. देशमुख आर. के. उपरोक्त, पृ. ७५

९३. कित्ता, पृ. ८०

९४. कित्ता, पृ. ८०

९५. मुलाखत – लक्ष्मणराव पाटील दि. २८.०८.२०११, स्थळ : सातारा, वेळ : सायं.४ वा.

९६. देशमुख आर. के. उपरोक्त, पृ. ८४

९७. कित्ता, पृ. ८५

९८. दै. पुढारी, कोल्हापूर, दि.१४ जून, १९६०, पृ. २

९९. शेंडे पंडीतराव, स्मरणिका, स्मृतीग्रंथ आठवणीची पुष्पांजली, प्रकाशक सौ. सुनिता शंकरराव जगताप, सातारा सप्टेंबर २०१३, पृ.२४

100. Election commission of India - general election, 1978 to the legislative assembly of Maharashtra, statistical report, Page no. 352, 353

101. Election commission of India - general election, 1980 to the legislative assembly of Maharashtra, statistical report, Page no. 346

102. Election commission of India - general election, 1985 to the legislative assembly of Maharashtra, statistical report, Page no. 362

103. Election commission of India - general election, 1990 to the legislative assembly of Maharashtra, statistical report, Page no. 395

104. Election commission of India - general election, 1995 to the legislative assembly of Maharashtra, statistical report, Page no. 438

105. Election commission of India - general election, 1999 to the legislative assembly of Maharashtra, statistical report, Page no. 356

१०६. दै. सकाळ २६ ऑगस्ट २०१३ सातारा पा. क्र. ८

१०७. मुलाखत ॲड. सुनिता जगताप, दि. १९.१२.२०१३, स्थळ–सातारा, वेळ स. ११ वा.
१०८. देशमुख शिवाजीराव, स्मरणिका, स्मृतीग्रंथ आठवणीची पुष्पांजली, कित्ता पृ. १०
१०९. दै .ऐक्य, दि.२६/०८/२०१२ पृ. १
११०. कमंडूलचा माथा वसनेची गाथा, उपरोक्त, पृ.२५, २६
१११. पाटील शालिनीताई, स्वयंसिद्धा राजकारणातील ५० वर्षे, प्रकाशक जालींधर फाळके अध्यक्ष, चंद्रकांत पाटील, प्रतिष्ठान, साताराराेड, सप्टेंबर २००३, पृ. ९१, ९२
११२. साप्ताहिक स्थैर्य, सातारा आवृत्ती, दि.१९ ते २५ नोव्हेंबर, २०००, पृ. ०१
११३. कित्ता, पृ.०२
११४. कित्ता, पृ.०२
११५. धर्माधिकारी भालचंद्र वि., क्रांतिवीर, विश्वकर्मा प्रकाशन, सातारा, प्र. आ. ११ ऑगस्ट, १९९०, पृ. ७७, ७८
११६. कित्ता, पृ. १४१
११७. धर्माधिकारी भालचंद्र वि., क्रांतिवीर, विश्वकर्मा प्रकाशन, सातारा, प्र. आ. ११ ऑगस्ट, १९९०, पृ. १७८–१७९
११८. कित्ता, १८३
११९. कित्ता, २६९
१२०. कित्ता, पृ. २०९, २१०
१२१. साप्ताहिक स्थैर्य, सातारा आवृत्ती, उपरोक्त, पृ.०२
१२२. कित्ता, पृ.०१
१२३. मुलाखत – बर्गे विठ्ठल माधवराव, ग्रामपंचायत सदस्य, कोरेगाव, दि. १२.०७.२०१६ वेळ सायं. ६.३०, स्थळ : कोरेगाव
१२४. मुलाखत – बर्गे बाबुराव दिनकरराव, सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी, दि. १२.०७.२०१६ वेळ सायं. ६.३०, स्थळ : कोरेगाव
125. Election commission of India - general Elections, 1951, 1957, 1962, 1967, 1978, 1972, 1978, 1980, 1985, 1990, 1995, 1996, 1999 (loksabha) statistical report - volume I (national and state abstracts & detailed results)

# प्रकरण – तिसरे

## कोरेगाव तालुक्याचा सामाजिक इतिहास

### ३.१ प्रास्ताविक

कोरेगाव तालुक्यास प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन असा इतिहास आहे. या काळात येथील समाज सामाजिकदृष्टया समृध्द असलेला आपणास दिसून येतो. येथील समाज व संस्कृती काळानुसार प्रगत होत गेली आहे. येथील समाज प्राचीन काळापासून आज तागायत खेडयात राहत आलेला आहे. येथील खेडी स्वयंपूर्ण असल्याने समाजात आपुलकी, जिव्हाळा, आत्मीयता, सुरक्षितपणा व स्वास्थ्य आहे. लोक सरळमार्गी, प्रामाणिक, सचोटी व नीतीमत्तेने जीवन जगणारे आहेत. समाजातील चालीरिती, रूढी–परंपरा मानणारे असल्याने धार्मिकतेचा लोकांच्या आचार–विचारांवर प्रभाव पडलेला दिसून येतो. धार्मिक आचार–विचार, परंपरा, कर्मकांड यांना भारतातील इतर भागांप्रमाणे येथेही महत्त्व आहे. परंतु स्वातंञ्यानंतर येथील समाज प्रगत झालेला आहे.

कोरेगाव तालुक्यातील सामाजिक इतिहासात महत्त्वाची भूमिका पार पाडणारी अनेक ग्रामदैवते असून यात मुधाई, विठ्ठल, खंडोबा, महाकाली, यमाई, भैरोबा, शिव, गणेश, विष्णू, हनुमान, महालक्ष्मी, भवानी यांचा समावेश होतो. या भागात नाथ, वारकरी संप्रदाय प्रचलित आहेत. या संप्रदायातील संतांनी येथे समाजप्रबोधन घडवून आणले.

सातारा जिल्हयातील सत्यशोधक समाजाचे मूळ कोरेगाव तालुक्यात आहे. कोरेगाव तालुक्यातील सातारारोड–पाडळी येथील गुरूवर्य केशवराव विचारे यांनी सातारा जिल्हयात सर्वप्रथम सत्यशोधक समाजाच्या कार्याला सुरूवात केली. त्यांच्यानंतर ज्योत्याजीराव फाळके व अॅड्. वसंतराव फाळके यांनी आजतागायत सत्यशोधक समाजाचे कार्य अविरतपणे केले आहे. कोरेगावातील या सत्यशोधक समाजाने अंधश्रद्धा निर्मुलनाचे कार्य केले आहे.

या परिसरात हिंदू धर्मातील लोक अधिक प्रमाणात आढळून येतात. त्याखालोखाल बौध्द, जैन, मुस्लिम व इतर धर्मातील लोक आहेत. यांना पूर्वीपासून आपापल्या धर्मानुसार आचरण करण्यास मुभा होती. शिवकाळापासून या प्रदेशात स्थिरता प्राप्त झाल्याने रूढी–परंपरा मोठया प्रमाणात जतन केल्या जाऊन येथील समाजाचा आपला विकास घडून आलेला आहे. यात अनेकांनी आपले योगदान दिले आहे.

कोरेगाव तालुक्याचा सामाजिक इतिहास पाहत असताना येथील समाजाची रचना व समाजाची परिस्थिती कशी होती. समाजाचे उद्योग, व्यवसाय, राहणीमान, पोशाख, लोकसंख्या, समाजातील रूढी, प्रथा, परंपरा, लोकांची भाषा इत्यादि विषयी विवेचन करणे महत्त्वाचे ठरते.

तसेच भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर कोरेगाव तालुक्याच्या सामाजिक कार्यात योगदान देणारे सामाजिक कार्यकर्ते या शिवाय कोरगाव तालुक्यातील शिक्षण व्यवस्थेची माहिती व या काळात समाजात सुधारणा होण्यासाठी जे प्रयत्न झाले त्याचीही माहिती घेणार आहोत. यामध्ये सनातनवादी व पुरोगामी विचारांच्या विद्वानांमधील संघर्षाची माहिती घेणार आहोत. समाज सुधारकांचे अस्पृश्यता निवारण, समाज परिवर्तन व राष्ट्रीय एकात्मतेसाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती पाहणार आहोत.

### ३.२ आहार

कोरेगाव तालुका हा डोंगरी दुष्काळी ग्रामीण भाग असून तालुक्यात ब्राह्मण, जैन व लिंगायत लोकांचे प्रमाण कमी असून ते शाकाहारी पद्धतीचे जेवण घेतात. त्यांच्या जेवणात पालेभाज्या, डाळी, ज्वारी, बाजरी, गहू, भात, दही, दुध, तूप यांचा समावेश अधिक प्रमाणात आढळतो. जैन लोक कांदा व लसूण वर्ज्य करतात तसेच फळे, काजू, बादाम, पिस्ता यांचे सेवन न्याहारीत व अन्य वेळेत केला जातो तसेच नाथपंथी व वारकरी संप्रदायातील लोक मांसाहार करीत नाहीत.

क्षत्रिय वर्णव्यवस्थेतील लोकांचा आहारात मांसाहार व शाकाहार अशा दोन्ही प्रकारचा आहार आढळतो. या तालुक्यात शिवकालीन राजकीय वारसा असलेली शिवकाळातील सरदार, वतनदार, इनामदार, पाटील, देशमुख, भोसले, मोरे, जाधव, शिर्के यासारख्या गावकारभार चालवणाऱ्या कुटुंबांचे अस्तित्व आहे. या कुटुंबातील लोक मांसाहार करीत असताना आढळतात. तसेच कोरेगाव व सातारा परिसरात यात्रा साजरी करण्याचे प्रमाण मोठया प्रमाणात आहे. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी मोठया प्रमाणावर मांसाहार केला जातो. यासाठी जवळचे नातेवाईक व मित्रमंडळींना आमंत्रण दिलेले असते. उदा तडवळे, रहिमतपूर, किन्हई, कुमठे, देऊर, चिमणगाव, हिवरे, पिंपोडे बु., इत्यादि सर्व गावात यात्रा साजऱ्या केल्या जातात तसेच देवीला नवस म्हणून बकऱ्याचा बळी दिल्यावर त्याचे मांस प्रसाद म्हणून आप्तेष्टांना वाटण्याची

प्रथा आहे. या व्यतिरिक्त रोजच्या जीवनात शाकाहार केला जातो.

यानंतरच्या बहुजन समाजातील सर्व जाती–जमातीतील लोक मांसाहारी असले तरी त्यांच्या जेवणात आठवडयातून किंवा महिन्यातून एकदा मांसाहार असतो. शेतकरी, कारागीर व श्रमिक वर्ग दिवसातून तीन वेळा जेवण करतात. रोजच्या भोजनात गहू, ज्वारी व बाजरी यांचा वापर केला जातो. सण–उत्सवावेळी ते पुरणपोळी व भात करतात. भाकरीबरोबर भाज्या, चटणी, कांदे, ठेचा, डाळी इत्यादि पदार्थ रोजच्या भोजनात घेतात. सकाळी न्याहरीला दुध चपाती किंवा चहा चपाती घेतात. उच्च वर्गियांमध्ये आहारात गव्हाची पोळी, वरण, भात, तूप, भाजी, कोशिंबीर, लोणचे, पापड, मुरंबा इत्यादि पदार्थ असतात.[१]

मुंज, बारसे, विवाह व वास्तुशांती इत्यादि प्रसंगी आपापल्या कुवतीनुसार मेजवानी दिली जाते. यावेळी शिरा, भात, आमटी, वेगवेगळया भाज्या, पुरी, पुरणाची पोळी, जिलेबी, लाडू, गुलाब जाम यासारखे गोड पदार्थ बनविले जातात.

### ३.३ निवासव्यवस्था

कोरेगाव तालुका हा ग्रामीण भाग असल्यामुळे या ठिकाणी गावोगावी बारा बलुतेदारी पद्धतीची समाजरचना दिसून येते त्यानुसार लोकांच्या राहणीमानातही परिवर्तन जाणवते.

इ. स. १९९१ मध्ये कोरेगाव तालुक्यात घरांची संख्या ४१४०४ होती. दर चौरस कि.मी.ला सरासरी घरांचे प्रमाण ४४.९२ टक्के होते.[२]

यामध्ये ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र अशी जातीव्यवस्था असल्याने त्यानुसारच गावाची रचना केलेली आढळते. यामध्ये ब्राह्मण आणि क्षत्रिय वर्णव्यवस्थेतील लोकांची घरे चिरेबंदी वाडा पद्धतीची आहेत. या वाडयात चौक असत. या तालुक्याला शिवकालीन राजकीय वारसा असल्यामुळे शिवकाळातील सरदार, वतनदार, इनामदार, पाटील, कुलकर्णी हया गावकारभार चालवणाऱ्या कुटुंबांचे मोठमोठे वाडे आजही अस्तित्वात आहेत. उदा. तडवळे,, रहिमतपूर, किन्हई, कुमठे या गावात शिवकालीन वाडे आढळतात.[३]

त्यानंतर वैश्य लोकवस्तीची घरे ही व्यापारी पेठांच्या स्वरूपातील आहेत. व्यापारी, नोकरदार लोकांची घरे ही एक, दोन किंवा तीन मजली दगड, माती, कौले यापासून बनविलेली असत. शेतकऱ्यांची घरे छपराची, कुडाची, मातीची तसेच अलिकडे दुगई पत्र्याची आहेत. गुराकरीता मागील बाजूस गोठा असे. मागील परसात फुलझाडे असत. घरासमोर तुलसीवृंदावन

असे. गावाला मोठा दिंडी दरवाजा (वेस) व देवडी अशी रचना असे. सध्या अशा वाडयातही आधुनिकतेप्रमाणे सुधारणा झाल्या आहेत.

त्यानंतरचा उरलेला बहुजन समाज हा वेगवेगळया आळयांमध्ये (चाळ) विभागलेली निवासव्यवस्था आहे. मध्यम वर्गीयांची घरे ही प्रामुख्याने भाजलेल्या प्रमाणबद्ध विटांच्या भिंती व कौलारू छपरांची, गवत, कामटयांचे विणलेले छप्पर आणि कच्च्या विटा अथवा मातीच्या भिंती, गवत, कामटयांचे  छप्पर दिसून येतात. स्वातंत्र्यपूर्व काळात अशाप्रकारे मध्यम वर्गीयांची घरे होती. कोरेगाव तालुक्यातील गरीब व भटक्या लोकांची घरे जाडयाभरडया कापडाचे लहान तंबू अथवा पाल आणि बांबूच्या कामटयापासून अथवा पावसापासून बचावासाठी गवत व काडयांचा आडोसा बांधून तयार केलेली घरे होती. उदा. कुंभार आळी, माळी वस्ती, सुतार गल्ली, आहेत. याशिवाय उपेक्षित समाज हा गावकुसाबाहेर राहत असलेला दिसून येतो. उदा. मांग वाडा, रामोशी वस्ती, चांभार वाडा, वडार वस्ती, इत्यादि समाज.

कोरेगाव तालुक्यातील आधुनिक घरे मुख्यत्वे करून बंगलेवजा आणि दोन–तीन मजली दिसून येतात. त्यात प्रामुख्याने सिमेंट काँक्रीट, लोखंड व लाकडाचा अल्प वापर  केलेला आढळतो. ही घरे सर्व सुखसोयींनी युक्त आहेत. यातील घरात अनेक खोल्या असून त्यात चौक, ओटा, पडवी, भोजनगृह, स्वयंपाकघर, स्नानगृह, कोठीघर, शयनगृह, अतिथीगृह अशा सर्व सुखसोयी आहेत.[४]

## ३.४ पोशाख

अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण या मानव जातीच्या मुलभूत गरजा आहेत. वस्त्रासाठी लागणारा कापूस भारताच्या अनेक भागात पिकवला जातो. कोरेगाव तालुक्यातील लोक आर्थिक परिस्थितीनुसार कपडे वापरत होते. श्रीमंत घराण्यातील लोक  घरी सदरा आणि उपरणे वापरीत होते. बाहेर वावरताना सदरा, कोट व पागोटे असा पोशाख करीत होते. स्त्रिया घरात किंवा समारंभात रंगीत साडी, पोलके व कपाळावर कुंकू लावीत होत्या. पुरूष लंगोटी, लेंगा, चड्डी, पंचा, धोतर, चोळणा, तुमान, पायजामा, सलवार हे नेसण्याचे कपडे व उपरणे, शेला, सदरा, बाराबंदी, पैरण, बंडी, कुडते, कोपरी, कबजा, अंगरखा, अचकन, शेरवानी, डगला, हे अंगात घालावयाची कपडे वापरीत असत. डोक्याला टोपी, पागोटे, पगडी, मुंडासे, रूमाल व पटका घालीत असत.

यातील पुष्कळ वस्त्र व फेटे सध्या लोकांच्या वापरत नाहीत. सध्या गांधीटोपी प्रचलित आहे. धोतर व सातारी शेल्याचे फेटे घालणाऱ्या लोकांचे प्रमाण अत्यल्प आहे. लग्नप्रसंगी सातारी शेल्याचे फेटे लोक परिधान करताना पहावयास मिळतात. पायजामा, सदरा, व पँट हाच पुरूषांचा पोशाख आढळतो. श्रीमंत लोक तलम, सुती, पॉलिस्टर व कृत्रिम धाग्याचे कपडे व पटके वापरताना दिसतात. पटके वापरणाऱ्यांचे प्रमाणही अत्यल्प आहे. स्त्रिया रेशीमकाठी, जरीकाठी, साडया अथवा लुगडी वापरतात. मध्यम वर्गातील पुरूष सदरा व धोतर हा पेहराव करतात. शेतकरी आणि मजूर वर्ग जाडेभरडे कपडे घालतात. तसेच ते सदरा, पंचा, कबजा व पायात वाहना वापरतात. पावसाळयात व हिवाळयात घोंगडीचा वापर करतात. प्रौढ स्त्रिया हया नऊवारी लुगडे, पाठ व पोट झाकणारी कोपरापर्यत पोहोचणारी खणाची चोळी असा पोशाख करीत असत. स्त्रियांच्या साडयांमध्ये लुगडी, साडया, पातळे, पितांबर, शालू, पैठणी इत्यादि प्रकार असत. त्या अंगावर प्रसंगाविशेष शेले नेसत असत. लग्नसमारंभारख्या प्रसंगात शालू, पैठणी, बनारशी, पितांबर अशी भरजारी वस्त्रे नेसली जात. सध्या पाश्चिमात्य कपडयांचे चलन स्त्रिया व तरूणीमध्ये मोठया प्रमाणावर दिसून येते. यामुळे पारंपारिक वस्त्रे ही समारंभापुरतीच मर्यादित आहेत. लहान मुलांना आंगडे, टोपडे, झबले, कुचळे किंवा कुंची घालत असत. तीन–चार वर्षांच्या मुलांना चड्डी, तुमान, चोळणा व सदरा घालत असत. मुलींना परकर व झगे घालत असत. आठ–दहा वर्षाची मुले चड्डी, पैरण व पँट वापरत असत व शाळेतील मुले गांधीटोपी घालत असत. तर मुली फ्रॉक व लहान साडया वापरत असत.[५]

कोरेगाव तालुक्यातील लोकांचा स्वतंत्र असा पोशाख नाही. सातारा जिल्हयातील संस्कृतीचा या भागावरही परिणाम झालेला दिसून येतो. काही कुटूंबातील पोशाखात बदल झाला असला तरी बदलत्या काळानुसार शहरी भागात वेगवेगळे पोशाख दिसून येतात. मात्र ग्रामीण भागातील समाज आजही पारंपरिकता जपताना दिसून येतो.

हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पारसी, जैन इत्यादि धर्मातील लोकांच्यात एकसारखाच पोशाख असतो. सण–उत्सवादिवशी पुरूष घरंदाज पोशाख परिधान करतात. वृद्ध स्त्रिया विशिष्ट चालीचा पोशाख वापरतात. अलिकडच्या काळात स्त्री व पुरूषांमध्ये नव–नवीन पद्धतीचे पोशाख वापरण्याची प्रथा दिसते.

### ३.५ अलंकार

कोरेगाव तालुक्यात अलंकारात जातीनुसार विविधता आढळते. पुरूष, स्त्रिया, मुले व मुली यांचे अलंकार किंवा दागदागिने वेगवेगळे आहेत. स्त्रिया सोने, हिरे, माणके यांचे विविध अलंकार वापरतात. स्त्रिया पायात तोडे व साखळया चांदीच्या वापरतात. कानात चौकडी व मोत्याच्या कुडया घालतात. विवाहित स्त्री गळयात मंगळसूत्र वापरतात. मंगळसूत्र सौभाग्याचे लेणे मानले जाते. पूर्वीच्या साध्या काचेच्या मण्याऐवजी आता सोन्याच्या साखळीत मंगळसूत्राच्या वाटया गुंफणे रूढ झाले आहे. त्याशिवाय चंद्रहार, जोंधळी पोत, बकुळी हार, पोहेहार, मोहनमाळ, बोरमाळ, पुतळयांची माळ, कोल्हापुरी साज इत्यादि दागिने समारंभ प्रसंगी घालतात. याशिवाय एकदाणी, सरी, वज्रटीका, तन्मणी, लफ्फा, पोत व पेंडे हेही रत्नमोत्याचे दागिने वापरतात. हातात निरनिराळया घाटांच्या बांगडया व पाटल्या घालतात. श्रीमंत स्त्रिया मोती व हिरे यांनी जडवलेल्या बांगडया वापरतात. नथ, मुरणी, फु ली व मुगबट (चमकी) हे नाकात घालण्याचे दागिने आहेत. लहान मुलांना बिंदल्या, मनगटया, कडीतोडे, वाळे, तोरडया, साखळया व चाळ, चांदीचे करगोटे वगैरे घालतात. पुरूषांमध्ये सध्या दागिने वापरण्याचे प्रमाण फार कमी झाल्याचे दिसते. तरीही काही पुरूष भिकबाळी, पोची, गोफ किंवा कंठा वापरताना आढळतात. अनेक पुरुष बोटात आंगठया वापरतात. याशिवाय गळयात सोन्याची चैन, हातात कडी वापरताना दिसतात.[६]

### ३.६ भाषा

कोरेगाव तालुक्यात बहुतांश लोक मराठी भाषा बोलतात. व्यापारी जैन व लिंगायत लोक घरात कानडी व हिंदी, गुजराती भाषा बोलतात. परंतु घराबाहेर व्यवहारात मराठी भाषा बोलतात. मुसलमान लोक उर्दू व हिंदी भाषा बोलतात. कोरेगाव तालुक्यात ख्रिश्चन लोकांचे प्रमाण अत्यल्प असून त्यांचीही भाषा मराठी आहे. त्याचप्रमाणे कोरेगाव तालुका हा डोंगराळ भाग असल्यामुळे प्रादेशिक सातारी बोली भाषेचा वापर सर्रास केला जातो.

### ३.७ उपनयन (मुंज) संस्कार

हिंदू धर्मात उत्तर वैदिक काळापासून ब्रह्मचर्याश्रम जीवनाच्या प्रारंभी पाळावा असा संकेत आहे. त्यानुसार या संस्काराचे महत्त्व आहे. प्रत्येक बालकाने वयाच्या आठव्या वर्षी गुरूच्या आश्रमात जाऊन वयाच्या २५ वर्षापर्यंत ज्ञानार्जन करावे ही त्यामागील कल्पना होती.

सद्य परिस्थितीत हा संस्कार केवळ प्रतिकात्मक उरलेला आहे. कोरेगाव तालुक्यात काही कुटुंबात आजही मुंजविधी घडून येताना दिसतात. हा संस्कार लोक खास मुहूर्तादिवशी मोठा समारंभ करून साजरा करीत असतात. कुटुंबातील नातेवाईक व मित्रमंडळीच्या गाठीभेटी या निमित्ताने होण्याची संधी असे स्वरूप या विधीला प्राप्त झालेले आहे. या विधीसाठी घरासमोर मंडप घालून ब्राह्मणाकरवी उपनयन विधी केला जातो.[७]

## ३.८ मुहूर्तानुसार शुभकार्य

हिंदू धर्म परंपरा आणि ज्योतिष शास्त्राकरीता जगविख्यात आहे. हिंदू धर्माने जगास सर्वप्रथम पंचांग दिले. पंचांगाची निर्मिती ही सुर्य, चंद्र, ग्रह व तारे यावर आधारित आहे. त्याचबरोबर पंचांगाप्रमाणे प्रत्येक व्यक्तीचे राशी–भविष्यही सांगितले जाते. शुभ–अशुभ ही संकल्पना भारतात फार मोठया प्रमाणात मानल्या जातात. या सर्व बाबींना कोरेगाव तालुक्यातील लोकसमाज असा भिन्न असणे अशक्य बाब आहे. कोरेगाव तालुक्यात सातारारोड पाडळी या परिसरात गुरूवर्य केशवराव विचारे यांनी महात्मा फुले यांच्या प्रेरणेने सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या समाजाने जनमाणसात प्रबोधन घडवून आणण्यासाठी आजतागायत आटोकाट प्रयत्न केले जात आहेत. परंतु भारतीय हिंदू समाजाला कर्मकांड हे कर्णाच्या कवच कुंडलासारखे चिकटले आहेत. त्यामुळे बारस, मुंज, दत्तक विधान, साखरपुडा, विवाह व गृहप्रवेश या गोष्टी करण्यासाठी शुभमुहूर्त काढून शुभमुहूर्तावरच या गोष्टी केल्या जातात.[८]

## ३.९ विवाह संस्कार

विवाह हा संस्कार माणसाच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा सामाजिक व धार्मिक संस्कार आहे. वैदिक संस्कृतीनुसार चार आश्रम, चार वर्ण, चार पुरूषार्थ व सोळा संस्कार सांगितले आहेत. यातील सोळावा संस्कार विवाह हा आहे. वैदिक काळात विवाहाचे आठ प्रकार सांगितले आहेत.[९] परंतु त्यातील आई–वडील आप्तेष्टांनी लावून दिलेला विवाह व प्रेम विवाह हे दोन प्रकार आज समाजात रूढ आहेत. त्यातील प्रेम विवाहाला समाज नाखुशीने मान्यता देतो. त्यामुळे व्यक्ती प्रेमविवाहासाठी सहजासहजी धजावत नाही. त्यामुळे आई–वडील, आप्तेष्टांनी लावून दिलेल्या विवाहालाच अधिक महत्त्व आहे.

तारूण्यात आलेल्या वधू व वरास पती–पत्नी म्हणून मान्यता देण्यासाठी व त्यांच्या

वैवाहिक दाम्पत्य जीवनास प्रारंभ होण्याच्या दृष्टीने विवाह संस्कारास अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. पूर्वी विवाहाचा कार्यक्रम चार ते पाच दिवस चालत असे. मात्र सध्याच्या आधुनिक काळात माणसाचे जीवन धकाधकीचे झाले आहे. माणसांना पूर्वीएवढा वेळ शिल्लक राहिलेला नाही. त्यामुळे अलिकडच्या काळात प्रत्येक कार्यक्रम कमी वेळात व कमी खर्चात करण्यामागे लोकांचा कल आहे. त्यामुळे एका दिवसात फक्त आवश्यक धार्मिक संस्कारच आटोपशीर पद्धतीने केले जातात त्यामुळे विवाह सोहळा हा अल्पकालीन झाला आहे. समाजात कोर्टात जाऊन नोंदणी पद्धतीने विवाह करणाऱ्यांचे प्रमाण अजून फारसे रूजलेले दिसून येत नाही. फार थोडे लोक व किंबहुना प्रेम विवाह करणारे नोंदणी पद्धतीने विवाह करतात. कोरेगाव तालुक्यात प्रतिष्ठित घराण्यातील मंडळी अतिशय डामडौलात विवाहविधी करीत असतांना आढळून येतात. गरीब कुटुंबातील लोक मंदिरात विवाह लावत असतात. विवाहप्रसंगी वधूपित्याकडून वधूला हुंडा सोन्याची दागिने व वस्तू भेट देण्याची प्रथा आहे. या गोष्टी साखरपुडयाच्या प्रसंगी दोन्ही पक्षांच्या मध्यस्थाकडून ठरविली जातात. आपापल्या कुवतीप्रमाणे मुलीला हुंडा देण्याची प्रथा रूढ आहे.[१०] या प्रथेला मूठमाती देण्याची गरज अलिकडच्या काळात वर्तविली जाते. शासनानेही तसा कायदा केलेला आहे परंतु समाजाची मानसिकता बदलण्यास अजून अवकाश असल्याचे दिसून येते.

हिंदू समाजातील विविध जाती–जमातींमध्ये विवाह संस्कार जवळपास एकसारखाच म्हणजे ब्राह्मणाकरवी मंत्रोक्त विधिपूर्वक पार पाडला जातो. परंतु अलिकडील काळात मंगलाष्टके ज्येष्ठ आप्तेष्ट व मित्रमंडळींकडून म्हटली जातात. तसेच सत्यशोधक समाजातील काही मंडळींनी सत्यशोधक पद्धतीने विवाह लावल्याचे आढळते. भट जोश्यांचे प्रस्थ समाज मनातून दूर करावयाचे असेल तर विधी, संस्कार, पूजा, धर्मकार्य, विवाह संस्कार भट जोशी या पुरोहित शिवाय केले पाहिजे अशी भूमिका सत्यशोधक चळवळीतील कार्यकर्ते गुरूवर्य विचारे, ज्योत्याजीराव फाळके यांनी घेतली. तसेच सत्यशोधक चळवळीने घरचा पुरोहित या नावाची पुस्तिका तयार करून भट, जोशी यांच्या शिवाय धार्मिक कार्य पार पाडले.[११] त्याचबरोबर अलिकडच्या काळात नवबौद्ध समाजामध्ये बौद्ध भंत्त्यांकडून विवाह लावले जातात.[१२]

### ३.१० धार्मिक श्रद्धा व चालीरिती

कोरेगाव तालुक्यातील लोकांवर धर्माचा मोठा पगडा होता. दैनंदिन–आचार विचारांवर

धर्माचे खूपच प्राबल्य होते. शहरातील हिंदू, जैन, वाणी, लिंगायत, मुसलमान, ख्रिश्चन इत्यादि लोक होते. बहुतेक घरात जाती धर्माप्रमाणे देव आहेत. ख्रिश्चन लोक मिलाग्रीस चर्चमध्ये प्रार्थना करतात. वाणी लोक, शिव, राम, विठोबा देवाची पूजा करतात. हिंदू लोक विठ्ठल, मारूती, गणपती, मुरलीधर, दत्त लक्ष्मीनारायण वेताळ, शंकर यांची पूजा करीत असत. तर मुस्लिम लोक मशिदीमध्ये नमाज पडत.[१३]

## ३.११ स्त्रियांचे सामाजिक स्थान

भारतात पाचीन काळापासून स्त्रियांना पुरूषांपेक्षा कमी महत्त्व दिले जाते. ही परिस्थिती कोरेगाव तालुक्यासाठी वेगळी नाही. सातारा जिल्हयातील कोरेगाव तालुक्याला शिवाजी महाराजांची व त्यानंतरच्या राजांनी आणि इंग्रजांच्या प्रभावामुळे स्त्रियांची परिस्थिती हळूहळू बदलतांना दिसते. राजघराण्यातील व उच्चकुलीन स्त्रियांना शिक्षण दिले जात होते. १९ व्या व २० व्या शतकात स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण वाढत गेले. तसेच या काळात स्त्रिया राजकारणातही भाग घेऊ लागल्या. याचे कोरेगाव तालुक्यातील उत्कृष्ट उदाहरण म्हणजे डॉ. शालिनीताई पाटील या आहेत. त्यांनी कोरेगाव तालुक्याचा आमदार म्हणून कार्य केले.[१४] त्यांचे हे कार्य कोरेगाव तालुक्यातील स्त्रियांचे सामाजिक परिस्थितीचे वर्णन करण्यासाठी गौरवास्पद व भूषणावह असे आहे.

पूर्वीपासून सर्वसामान्य समाजातील स्त्रियांची परिस्थिती हलाखीची आहे. स्त्री ही स्वातंत्र्याला पात्र नाही अशा अर्थाचे विचार मनुस्मृती, याज्ञवल्क्यस्मृती इत्यादि धर्मग्रंथांनी पुन्हा पुन्हा मांडले आहे. स्त्रियांना ‘चुल आणि मूल’ यापुरते मर्यादित ठेवले गेले आहे. स्त्रिया या अबला, दुबळया व सर्व बाबतीतच कमी दर्जाच्या मानल्या गेल्या आहेत. त्यांना शिक्षण दिले गेले नाही. शिक्षणाचा अधिकार दिला नाही. स्त्रियांना कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यासाठी कुटुंबातील पुरूषांबरोबर कष्टाची कामे करावी लागत असत.[१५] स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रियांची परिस्थिती सुधारावी म्हणून ब्रिटीशांनाही विशेष काही प्रयत्न केले नाहीत. परंतु समाजसुधारकांनी केलेल्या प्रयत्नामुळे स्त्रियांच्या परिस्थितीत बदल झाला. यात महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाची केलेली सुरूवात महत्त्वाची आहे. तर सातारा जिल्हयातील कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केलेले शिक्षणाचे कार्य महत्त्वाचे आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने केलेल्या विविध कायद्याने स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार मिळून त्यांना राजकीय, सामाजिक,

शैक्षणिक क्षेत्रात अधिकार प्राप्त झाले आहेत. विविध क्षेत्रात स्त्रियांनी आपले कर्तृत्व सिध्द केले आहे.[१६]

## ३.१२ कोरेगाव तालुक्यातील हिंदू समाजातील जाती

भारतीय समाजात अनेक व्यवसाय केले जात होते. या व्यवसायावरून जाती-जातीचे वेगवेगळे गट निर्माण झाले आहेत. त्यामुळे एक जात दुसऱ्या जातीपासून स्वतंत्र राहू लागली. विशिष्ट जातीच्या विशिष्ट रूढी, परंपरा आचारपद्धती निर्माण झाल्या. उच्च जातीने अधिकार व हक्क उपभोगावेत व कनिष्ठ जातींनी त्यांची सेवा करावी अशी समाजरचना प्राचीन काळापासून असलेली दिसून येते.[१७]

जातीव्यवस्थेवर अनेक प्रकारची बंधने होती. धर्मशास्त्रानुसार मनुष्य ज्या जातीत जन्मला त्या जातीत मरणे आवश्यक होते. त्याला इतर जातीचा व्यवसाय करणेही जातीसंस्थेविरूद्ध मानले जात होते. त्यामुळे धर्मानुसार जाती, रूढी-परंपरा यांच्या मर्यादा कोणालाही ओलांडता येत नव्हत्या. प्रत्येक जण आपल्या कुवतीनुसार धर्माने निर्माण केलेल्या जातीच्या बंधनात राहून आपल्या मर्यादेत जीवन व्यतीत करण्याचा प्रयत्न करीत असे. समाजात प्रत्येक व्यक्ती ज्या घरात जन्माला आला. त्यावरून त्या व्यक्तीची जात ठरविली जात असे. परंतु त्या व्यक्तीच्या कामानुसार त्याची जात ठरविली गेली होती. त्या-त्या जातीतील लोकांचा विशिष्ट सामाजिक दर्जा ठरविलेला होता. त्यामुळे प्रत्येक जातीच्या लोकांना आपापल्या वेगळया वस्त्या, वेगळे पाणवठे, वेगळे सभागृहे आणि स्मशानेही वेगवेगळी निर्माण केली. यातून समाजातील जातीत दुरावा निर्माण झालेला दिसून येतो. याचाच अनिष्ट परिणाम म्हणजे अस्पृश्यता निर्माण झाली. त्याचे दुष्परिणाम आजही आपणास दिसून येतात.

### ३.१२.१ ब्राह्मण

हिंदू धर्म हा सामान्यतः चार वर्ण, चार पुरूषार्थ आणि १६ संस्कार यावर आधारित आहे. यात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असे चार वर्ण मानले जातात. या सर्व वर्णात ब्राह्मण हा वर्ण अतिशय महत्त्वाचा आहे. त्यांना वेदांचे अध्ययन व अध्यापन करण्याचा अधिकार प्राचीन काळापासून मिळालेला आहे. म्हणून ब्राह्मणांना परंपरेने धर्मशास्त्रीय पूजा-अर्चा, वेदपठण, वेदांचे, ज्योतिषशास्त्र यांचे ज्ञान मिळविण्याचा अध्यापनाचा एकाधिकार होता. धार्मिक विधी करतांना पौराहित्य करण्यासाठी तसेच विवाह, सत्य नारायणाची पूजा, वास्तूशांती, मुंज,

माणसाच्या मृत्यूनंतरचे विधींमध्ये उत्तरकार्य यासारखे यासारखे विधी करणारे ब्राह्मण होते. त्यामुळे हिंदू समाजात वेदविद्या जाणणारे म्हणून ब्राह्मण समाजाला उच्च मान दिला जात होता.

महाराष्ट्रामध्ये साधारणतः ब्राह्मणांच्या तीस पोटजाती आहेत. यामध्ये कोरेगाव तालुक्यात कुलकर्णी, देशस्थ, कोकणस्थ, दिक्षित, देशमुख, देशपांडे, कनोजे, गुजराती, देवरूखे, तेलंग इत्यादि उपप्रकार होते.[१८] या सर्वांचे नितीनियम, परंपरा, संस्कार थोडया–फार फरकाने सारखेच आहेत. यांच्यामध्ये बेटीव्यवहार होत असतात. ब्राह्मणांना हिंदू परंपरेने धार्मिक पूजा–अर्चना करण्याचा अधिकार मिळालेला आहे. यांच्यात पौरोहित्य करणारे, ज्योतिष जाणणारे, भजन, वेदशास्त्र जाणणारे ब्राह्मण होते. या सर्व कर्मकांड जाणण्यामुळे ब्राह्मणांना हिंदू समाजात अतिशय मानाचे स्थान होते. त्यांचे शब्द ब्रह्मवाक्य मानून प्रमाण मानले जात असल्याने त्यांना समाजात मान–सन्मान दिला जात होता.[१९]

ब्राह्मण शेतकरी, सावकार, ज्योतिषी पुरोहित, सावकारी इत्यादि व्यवसाय सुद्धा करतात. हे पूर्वी जमीनदार, सावकार, पुराहित, भिक्षुक, लेखक इत्यादि व्यवसाय करीत असत. हे हिंदू धर्मातील सोळा संस्कार व चोवीस नैमित्तीक संस्कार नित्य नियमाने पाळतात. इंग्रजांच्या आगमनानंतर मात्र ब्राह्मणांनी शासकीय नोकरीत प्रवेश केला. त्यांच्याकडे असलेला बुद्धीमत्ता हा गुण या समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात अत्यल्प म्हणजे अडीच टक्के असूनही समाजावर वर्चस्व गाजविण्यासाठी उपयोगी ठरला. व स्वातंत्र्योत्तर काळातही त्यांना नोकरी व्यवसायात महत्त्वाचे स्थान मिळालेले आहे. अलिकडच्या काळात आधुनिकतेमुळे त्यांचे समाजातील स्थान पूर्वीएवढे भक्कम नसले तरीही त्यांनी आपले महत्त्व कमी होऊ दिलेले नाही.

### ३.१२.२ मराठा समाज

छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राला नवसंजीवनी दिली. महाराजांनी येथील समाजात नवचैतन्य निर्माण करून यवनांच्या गुलामगिरीतून महाराष्ट्राला मुक्त केले. त्यांच्या स्वराज्याचे मूळ म्हणजे सातारा जिल्हा होय. त्यांनी महाराष्ट्रातील बारा बलुतेदारांना एकत्र करून स्वराज्याची निर्मिती केली. यात मराठा समाजाचा वाटा मोठा आहे. महाराजांनी १७ व्या शतकात महाराष्ट्रात हिंदूंचे राज्य निर्माण करून हिंदूंना भारतवर्षात पुन्हा प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. त्यांच्या राज्यभिषेकावेळी त्यांच्या क्षत्रियत्वाचा प्रश्न निर्माण केला गेला. मात्र त्यांनी त्यांच्या कर्तृत्वाने स्वतःचे क्षत्रियत्व सिद्ध केलेले आहे. त्याला दुसऱ्या कोणत्याही पुराव्याची

आवश्यकता नाही. त्यामुळे भोसले कुळातील छत्रपती शिवाजी महाराज हे क्षत्रिय होते हे निर्विवादपणे मानले पाहिजे.[२०] त्यांच्याबरोबर पराक्रमाने लढलेल्या सर्व मराठयांनी क्षत्रियांचेच कार्य केलेले आहे. त्यामुळे मराठा समाजातील लोकांना क्षत्रिय मानले जाते.

त्यांची घरे चिरेबंदी वाडा पद्धतीची होती. या वाडयात चौक असत. या तालुक्याला शिवकालीन राजकीय वारसा असल्यामुळे शिवकाळातील सरदार, वतनदार, इनामदार, पाटील, कुलकर्णी हया गावकारभार चालवणाऱ्या कुटुंबांचे मोठमोठे वाडे आजही अस्तित्वात आहेत. उदा. तडवळे, रहिमतपूर, किन्हई, कुमठे, रहिमतपूर, साप, तारगाव या गावात शिवकालीन वाडे आढळतात. मात्र बहुसंख्य मराठे हे साध्या घरात राहत होते. 'मराठे' हे स्वतःला क्षत्रिय वंशाचे मानत असले तरीही त्यांच्यात राजघराण्यांशी रक्तसंबंध असलेले क्षत्रिय मराठे, कुणबी मराठे व इतर मराठे असे वर्ग आहेत. क्षत्रिय मराठयांचे कुलीन, लेकावळे व अकरमासी असे पोटभेद दिसून येतात. क्षत्रिय मराठे कुणबी मराठयांपेक्षा वर्णाने उजळ, देखणे व सदृढ आहेत.

पूर्वी मराठा समाजात 'घोषापद्धती' रूढ होती. श्रीमंत घराण्यातील स्त्रिया पडद्यात राहत असत. मराठा स्त्रियांना सार्वजनिक ठिकाणी वावर करण्यास प्रतिबंध होता. मुलांना विवाहामध्ये गळयात जानवे घालावे लागत होते. कोरेगाव तालुक्यात मराठयांमध्ये भोसले, पवार, माने, कदम, जाधव, बर्गे, काळे, इनामदार, पाटील, भोईटे, मोरे, साळुंखे, मोहिते, पवार, घाटगे, शिर्के, चव्हाण, घोरपडे, सरनाईक, गावडे, नलगे, सरनोबत, नलावडे, फडतरे व शिंदे इत्यादि आडनावे आहेत.[२१]

सामान्य मराठा लोक हे सध्या शेतीव्यवसाय, व्यापार, सहकारक्षेत्र, नोकरी व राजकारण इत्यादि क्षेत्रात आढळतात. कोरेगाव तालुक्यातील अनेक तरूण लोक संरक्षण दलात आहेत. अनेकांनी देशासाठी प्राणाचे बलिदान देऊन सातारा जिल्हयाच्या पराक्रमाच्या परंपरेत मानाचा तुरा रोवला आहे. बहुसंख्य लोक उदरनिर्वाहासाठी मुंबई, पुणे येथे नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने स्थलांतरित झाले असले तरी त्यांची आपल्या परंपरेशी असलेली नाळ जोडलेली आहे.

### ३.१२.३ गोस्वामी

'गोस्वामी' समाज हा स्वतःला कपील ऋषीचे वंशज समजतात. त्यांच्यातील आडनावे सरस्वती, सागर, बन, अरण्य, गिरी, भारती, पुरी, गोस्वामी आणि वैरागी या आहेत. हा

समाज शिवभक्त असून शंकराची भक्ती करणारा आहे. गोस्वामी वेदांचे व शास्त्राचे जाणकार असून औषधोपचारासाठी प्रसिद्ध आहेत. त्यांच्या पोटजातीत रोटीबेटी व्यवहार होतात.

गोस्वामी जातीतील साधू पुरूषाचा पोशाख भगवी वस्त्रे, काखेत झोळी, हातात कमंडलू व दंड असा असून ते अनवाणी चालतात. भस्म लावून रूद्राक्षांची माळ परिधान करून भिक्षा मागून चरितार्थ चालवितात. अलिकडे गोस्वामी लोक नोकरी, व्यापार, शेतीही करतात.[२२]

### ३.१२.३.१ गोस्वामींची चिरसमाधी

योगी, ऋषींचा अनुवंश असल्यामुळे या समाजातील लोक योगसाधना करत असतात. त्यातून काहींची कुंडलीनी शक्ती जागृत होते व असे साधु, गोस्वामी ऋषी जिवंत समाधी (संजीवन समाधी) घेतात. व योगसाधनेतून परमेश्वराला प्राप्त करून मोक्ष पदाला जाऊन पोहचून जन्म–मरणाच्या फेऱ्यातून स्वतःची सुटका करून घेतात अशी धारणा आहे. उदा. भाडळे येथे 'संजीवन भारती' ची समाधी, जोग मठावर 'पुरी' समाधी या सर्व गोस्वामी समाजातील साधु, ऋषींनी जिवंत समाधी घेतली आहे. तसेच पुसेगाव येथील सेवागिरी महाराजांची समाधी, भोसे येथील राजेंद्र गिरी यांची समधी, औंध येथील हिरा पुरी महाराजांची समाधी महत्त्वपूर्ण आहेत.[२३]

### ३.१२.४ गुरव

कोरेगाव तालुक्यात गुरव लोकांची संख्या विपुल प्रमाणात आहे. गुरवांना प्रत्येक गावात मंदिरातील पुजारी म्हणून वंशपरंपरागत अधिकार मिळालेले आहेत. त्यांची घरे मंदीराच्या आजूबाजूला बांधलेली असतात. काही वेळेला मंदिराच्या आवारातच त्यांच्या निवासाची व्यवस्था केलेली असते. मंदिरांची देखभाल करणे, मंदिरातील दैनंदिन नैमित्तिक विधी अर्थात पूजा–अर्चा, स्वच्छता इत्यादि कामे गुरवाला करावी लागतात. ग्रामस्थ गुरवास देवपूजेसाठी दररोज नियमितपणे तुळशीची पाने आणि फुले पुरवितात.

याशिवाय गुरवांचा पत्रावळी व द्रोण तयार करण्याचा व्यवसाय होता. गुरव विवाह लावणे, लग्नात मंगलाष्टके म्हणणे, विवाहप्रसंगी होमहवन करणे, सत्य नारायणाची पूजा मांडणे व सांगणे ही कामे करतात. परंपरेनुसार त्यांच्या पोटजातीत बेटीव्यवहार होतात. गुरव हे वंशपरंपरागत मंदिराची निस्सिम सेवा करीत असल्याने त्यांचा कामाचा मोबदला म्हणून तत्कालीन राजे–महाराजे यांनी गुरवांना देवस्थानच्या वंशपरंपरागत इनामी जमिनी दिलेल्या आहेत. या हक्कास

'गुरवकी' असे म्हणतात. त्यांच्या गुरवकीच्या कामामुळे गावातील लोकांकडून त्यांना सुगीनंतर धान्य देण्याची पद्धत रूढ आहे. तसेच देवापुढे ठेवलेली दक्षिणाही त्यांनाच मिळते. अलिकडील काळात ट्रस्ट झाल्यामुळे दानपेटी ठेवली जाते व दानपेटीत जमा झालेली रक्कम ट्रस्टमध्ये जमा होते. त्यांच्यात गुरव, सातभाई, कुदळे, दळवी, साखरे, पोरे, निकम, पवार, बारभाई आणि शिर्के इत्यादि. हे मौजीबंधन करतात. गुरव समाजातील लोक मद्य व मांस सेवन वर्ज करतात. गुरव इतर मागास वर्गात मोडतात.[२४]

### ३.१२.५ जंगम

पौराहित्य करणे जंगमांचे प्रमुख काम आहे. ज्योतिष पाहणे, पंचांग पाहणे, कुंडली बनविणे व लग्नविधी पार पाडणे यासारखी कामे जंगम करतात. हे शाकाहारी असून घरोघरी भिक्षा मागून आपला उदरनिर्वाह करतात. हे आपल्या गळ्यात धातूची शिवमूर्ती असलेली डबी बांधतात. जंगम समाजाचा प्रमुख कराडच्या मठात राहतो. तो चार–पाच वर्षातून एकदा जेव्हा आपल्या शिष्याच्या घरी येतो तेव्हा त्यांना धान्य व भेटवस्तू मिळतात. ही जात इतर मागास वर्गीयात मोडते.[२५]

### ३.१२.६ तेली

तेली संपूर्ण तालुक्यात असून या जातीतील लोकांचा तेल विकण्याचा व्यवसाय होता. यांच्यात लिंगायत तेली व मराठा तेली अशा दोन पोटजाती आढळून येतात. तेली हे रंगाने काळे, धडधाकट व मजबूत बांध्याचे असून या दोन्ही पोटजातीचा व्यवसाय, वेशभूषा आणि रूढी समान दिसून येतात. तेली तीळ, खोबरे व एरंडीचे तेल व पेंडीची ढेप विकण्याचा परंपरागत व्यवसाय करतात. लिंगायत तेली केवळ महादेवाची भक्ती करतात. जंगम हा त्यांचा पुरोहित असतो. तर मराठा तेली ब्राह्मणांसारखे देवदेवतांची पूजा करून नेहमीचे उपवास करून सण साजरे करतात. गावातील ब्राह्मण पुरोहित हा यांचा पुरोहित असतो. लिंगायत तेली यांच्या लग्नसमारंभावेळी वधू वराच्या मध्ये आंतरपाट धरत नाही तर मराठा तेली यांचे विवाह मराठयांप्रमाणेच होतात.[२६]

### ३.१२.७ वाणी

वाणी समाज हा फार पूर्वीपासून व्यापार करणारा असून तो सर्वत्र आढळतो. या जातीमध्ये लिंगायत वाणी, मराठा वाणी, गुजराती वाणी, मारवाड वाणी इत्यादि जाती आढळून

येतात. लिंगायत वाणी समाजात पंचम, तीळवंत, तिरूळे आणि शिलवंत इत्यादि पोटजाती आहेत. हे रंगाने काळे व मध्यम बांध्याचे असून घरी गाई, म्हशी व घोडे पाळतात. पुरूष व स्त्री दोघेही कपाळावर भस्म लावतात आणि गळयात लिंग बांधतात. हिंदू धर्मातील सर्व देवदेवतांचे पुजन करतात व उपवास ठेवतात. देवाधिदेव महादेव हे वाणी लोकांचे प्रमुख दैवत आहे. हे प्रामुख्याने किराणा व्यापार, सावकारी, कापडाची दुकाने, धान्य व्यापार आणि इतर किरकोळ सामानांची विक्री करतात. मराठा वाणी व्यापारी किराणा दुकानदार व शेतीचा व्यवसाय करतात. मध्यम बांध्याचे लड्ड मारवाड वाणी सावकारी, कापड, धान्य, तेल, तूप, तसेच इतर किराणा मालाचा व्यापार करतात. तर गुजराती वाणी सर्व प्रकारचा व्यापार करतात.[२७]

### ३.१२.८ कासार

कासारांचा मुख्य व्यवसाय बांगडया भरणे हा असून फार पूर्वीपासून हे लोक गावोगावी फिरून बायकांना बांगडया भरतात. तसेच बांगडया देखील तयार करतात. यांच्यात कासार आणि बांगड अशा पोटजाती आहेत. त्यांच्यात आपसात रोटीबेटी व्यवहार होत असतो. हे लोक तांबे आणि पितळ या धातूंची भांडीही तयार करीत होते. काही सुया, धागे इत्यादि वस्तूंची विक्री करतात. तर काही सावकारी, शेती व नोकरी देखील करतात. यांच्यात विधवा विवाह व बहुपत्नीत्वाची प्रथा आहे . यांच्यातील सामाजिक तंटयांचे निवारण जातपंचायती मध्ये केले जाते.[२८]

### ३.१२.९ कोष्टी

कोरेगाव तालुक्यात कोष्टी लोक सर्वत्र आढळतात. यांच्यात मराठा कोष्टी आणि लिंगायत कोष्टी अशा दोन पोटजाती आहेत. मराठा कोष्टी हे मांसाहारी असून लिंगायत कोष्टी शाकाहार करतात. यांचा पोशाख मराठयांसारखा असतो. यांच्या घरी विणकामाचे साहित्य असून हे विणकाम करतात. हे लोक लिंग धारण करतात. त्यांना लिंग जंगम देतो. ही जात शेती व शेतमजूरीही करतात.[२९]

लिंगायत कोष्टी हे फक्त शिवाची पूजा करतात. मराठा कोष्टी हे ब्राह्मणांप्रमाणे सर्व देवदेवतांची पूजा–अर्चा करतात. हयांचा मुख्य व्यवसाय विणकाम असून त्यांना या कामात त्यांच्या स्त्रिया मदत करतात. हे लोक मलमल, रेशीम, मखमल, सुती इत्यादि सर्व प्रकारची वस्त्रे विणण्याचे काम करीत. हयांना ही कला पुरातन काळापासून अवगत होती. हे लोक

महाराष्ट्रातील कापड विणण्याची प्रमुख केंद्रे नगर, ठाणे, पैठण, चौल, मुंबई इत्यादि प्रसिध्द ठिकाणांहून सातारा जिल्हयात व कोरेगाव तालुक्यात आली.[३०] कोरेगाव तालुक्यात यांची संख्या अल्प आहे.

### ३.१२.१० गोंधळी

गोंधळी हे स्वतःला आई भवानीचे उपासक मानतात. गळयामध्ये कवडयांची माळ घालून आई भवानी व अंबाबाईचे नाचगाणे करतात. हिंदू लोक लग्न समारंभ, मुंज, इत्यादि शुभ प्रसंगाला गोंधळी लोकांना बोलावून गोंधळाचा कार्यक्रम करीत असत. हा कार्यक्रम कोरेगाव तालुक्यात देऊर येथील मुधाईदेवी मंदिर, किन्हई येथील यमाईदेवी मंदिर व प्रत्येक गावातील मंदीरात व वेळप्रसंगी आपल्या घरातही कुलदेवीच्या नावाने केला जातो. गोंधळी लोक जगदंबा, यमाई, रेणुका, भवानी, अंबाबाई, यल्लमा, मुधाई इत्यादि देवींची नावाने गोंधळ घालतात. गोंधळ हा तीन भागात पूर्ण केला जातो. पहिल्या भागात देवीला रंग लावला जातो. यावेळी चौक भरून त्यात कूंकू व तांदूळ भरतात. तांब्यावर खण, नारळ ठेऊन त्याच्यासमोर दिवटी पेटवतात. सभोवताली ऊसाचे किंवा केळीचे खांब रोवले जातात. दुसऱ्या भागात देवीचे नावाचा गजर करून रात्रभर जागरण केले जाते. यावेळी भजन, किर्तन, गोंधळी कथा व गाणी गाऊन रात्रभर नाचतात. तिसऱ्या भागात देवीची आरती केली जाते व भार उतरविण्याचा कार्यक्रम केला जातो. गोंधळी लोकांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून इनाम जमिनी व वतने मिळालेली होती. त्यांना दहा ते बारा गावातून फिरून गोंधळाचा कार्यक्रम करण्यास परवानगी होती. त्यांना नेमून दिलेल्या गावा व्यतिरिक्त इतर गावात परवानगी शिवाय भिक्षा मागितली तर त्यांना दंड केला जात असे. मूळ वतनदारास हिस्सा द्यावा लागत असे. याचा निवाडा जातपंचायत करीत असे. गोंधळ करण्यासाठी संबळ, तुणतुणे, दिवटी आवश्यक असते व कवडयांची माळ घालावी लागते.[३१] अजूनही ही प्रथा कोरेगाव तालुक्यात आपणास मराठा व इतर बहुजन समाजात रूढ असलेली दिसून येते.

### ३.१२.११ महार

महार हे एक प्रकारचे वतन होते. त्यांच्या कामाच्या बदल्यात त्यांना शेती वतन म्हणून मिळालेली असे. ही जात हिंदू धर्मातील एक जात असून या जातीला अतिशूद्र समजले जात होते. महारांची वस्ती गावाबाहेर होती. कारण त्यांच्यावर गावाच्या रक्षणाची जबाबदारी टाकलेली

होती. ते गावाच्या वेशीवर छोटया झोपडयातून राहत. त्यांच्यावर गावजमिनीची राखणाची जबाबदारी असल्याने शेतकरी आपली कुडाची घरे सोडून निर्धास्तपणे शेतीच्या कामाला जात असे. त्यांची राहणी साधीसरळ होती. हे गावाचे सेवेकरी असल्याने मराठा काळापासून पाटलाला एक राबता महार देण्याची पद्धत होती. त्याला गावपाटलाला मदत करणे, त्यांचा निरोप पोहचविणे, गावच्या सीमा लक्षात ठेवणे इत्यादि कामे त्यांना करावी लागत. त्यांच्यातील काही लोक ब्रिटीशांच्या लष्करात होते. यात महार, गावकी महार, मुरळी महार व जोगती महार या पोटजाती आढळून येतात. शेतात खळे लावण्याच्या वेळी यांना खळयाचे रक्षण करावे लागे. अशांना खळे वेसकर असे म्हणत.[३२]

### ३.१२.१२ मांग

सातारा जिल्हयात माण, खटाव, सातारा, कराड व पाटण या तालुक्यात हे लोक बहुसंख्येने आढळतात. मात्र कोरेगाव तालुक्यात मांग जातीचे लोक अल्प प्रमाणात आढळतात. मांग जातीचा संस्कृत साहित्यात मातंग असा उल्लेख सापडतो. जंब ऋषीपासून ही जात निर्माण झाली असावी असा त्यांचा समज आहे. अंबाडी व वाखाचे दोर बनवून विकणे हा जातीचा परंपरागत मुख्य व्यवसाय आहे. याशिवाय नारळाच्या झावळयांपासून टोपल्या, केरसुण्या, सुपे वगैरे बनवून ते गावच्या बाजारात विकून आपला उदरनिर्वाह करतात. धार्मिक प्रसंगी, विवाह प्रसंगी तसेच सण–समारंभाच्या वेळी वाजंत्री वाजवण्याची कामेही करतात. त्यामुळे या समाजात तबला, डोलकी, हार्मोनियम, तुतारी, डफ, तुणतुणे वाजवणारे कलाकार निर्माण झालेले आहेत. यातील काही लोक तमाशा कलावंत म्हणूनही काम करतात. आजही अनेक गावात मयत नेण्याप्रसंगी डफ वाजवण्यासाठी मांगांना बोलवितात. त्याचप्रमाणे हे पूर्वी फाशी देण्याचे कठोर कामही करीत असत. हे मिळेल ती कष्टाची कामे करतात. यांचे राहणीमान अत्यंत साधे असून यांनाही महारांप्रमाणे गावच्या वेशीच्या बाहेर राहावे लागत असे. त्यांना कोणत्याच प्रकारचे हक्क नसून हयांनाही हिंदू धर्माने शूद्र मानले होते. अतिशय बिकट व गरीबीची परिस्थिती असल्याने या समाजात अंधश्रद्धा निर्माण झालेल्या दिसून येतात.[३३]

त्यांना केलेल्या कामाच्या बदल्यात दिवाळी संपल्यानंतर धान्य मिळत असे. दिवाळीच्या सणाला केलेले फराळाचे पदार्थ त्यांना दिले जात असे. दिवाळीच्या सणाला मांग घरोघरी रांगोळी आणून देत असे. याच्याही बदल्यात त्याला दिवाळीत केलेले पदार्थ दिले जात

असे. त्यास लोकांच्या घरचे उष्टे खरकटे अन्न खावे लागत असे. गावातील विवाह व इतर समारंभाप्रसंगी त्याला जेवणाच्या पत्रावळया उचलाव्या लागत. थोडक्यात मांगांना अतिशय नित्कृष्ट प्रतीची कामे दिली जात असून त्यांचा सामाजिक दर्जा खालावलेला होता. तरीही या जातीत त्यांच्या कामाच्या व धंद्यावरून काही पोटजाती निर्माण झालेल्या दिसून येतात.[३४]

### ३.१२.१३ चांभार

या जातीला चर्मकार असेही संबाधले जाते. १९६१ मध्ये चांभार हे अनुसूचीत जातींमध्ये संख्येने दुसऱ्या क्रमांकावर होते. सातारा जिल्हयात कराड, खटाव, पाटण आणि कोरेगाव या तालुक्यांमध्ये बहुसंख्येने आहेत. चांभार जातीला प्राचीन काळापासून शूद्र मानले जाते. या जातीचे तीन पोटभेद पडले होते. त्यात स्थानिक कुणबी चांभार, मोची व परदेशी हे असून त्यांच्यात रोटीबेटी व्यवहार होत नाहीत.[३५]

चांभार हे मेलेले जनावराचे कातडे काढून आणत व त्या कातडयाला रापवून त्यापासून चप्पल, पट्टे, कपडे, पिशव्या व बुट इत्यादि वस्तू तयार करण्यात पारंगत आहेत. तसेच जनावरांच्या कातडयापासून विहिरीतून पाणी काढण्यासाठी वापरली जाणारी मोट व पखाली बनवित असत. ढोर ही चांभारांची पोटजात मानली जाते. ही जात मेलेल्या ढोरांची विल्हेवाट लावीत व चांभारांना कातडे मिळत असे. मध्ययुगीन काळात कापडाच्या खालोखाल चर्मोद्योग भरभराटीस आलेला होता. गुजरात सारखाच महाराष्ट्रातही चामडयाचा व्यवसाय भरभराटीस आलेला होता. गुजरात मधील चर्मकारांना मोची असे म्हटले जाऊन ते स्वतःला उच्च जातीतील समजतात. कमावलेल्या कातडयापासून मऊ पट्टे विणून त्यावर केलेले नक्षीकाम, त्यावरील बेलपत्या, जनावर आणि पक्षांची चित्रे काढणे इत्यादि कलाकुसरीची कामे करण्यात दौलताबाद व नंदुरबार येथील चर्मकार निष्णांत होते. अशी इब्न बतुताने त्यांची प्रशंसा केलेली आहे. चामडयापासून बनविलेल्या सर्व वस्तू ठाणे बंदरातून परदेशात पाठविल्या जात. याशिवाय स्थानिक चांभार चामडयापासून बनविलेल्या वस्तू विकून आपला उदरनिर्वाह करीत. काही गरीब चांभार आजही मोट शिवणे, तिला ढिगळ लावणे, जुन्या चप्पला व बुट शिवणे, आसूड सांधणे यासारखी कामे आजही करीत असतात. अशी आजही अशा प्रकारची कामे अत्यंत अल्प दरात करीत असून त्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे. मात्र उद्योजक गर्भश्रीमंत झाले आहे. यांच्यात काळे, कदम, तांबे, साळुंखे, पवार, कांबळे, मोरे, कारंडे, गायकवाड व दळवी इत्यादि

आडनावे आहेत.[३६]

### ३.१२.१४ लोहार

लोहार हे पूर्वीपासून ग्रामव्यवस्थेत बारा बलुतेदारांपैकी एक आहेत. शेतीची उगमापासून मानवाला शेतीची अवजारे लागतात. प्राचीन व मध्युगीन काळात तसेच शिवकाळात शेतकऱ्याला शेतीची अवजारे पुरविणारा लोहार हा बलुतेदार महत्त्वाचा मानला गेलेला आहे. शेतीची अवजारे बनविणे हा त्याचा मुख्य व्यवसाय आहे. नांगराचा फाळ व वसू, पाभारीचे फारोळे, कुळवाचे वसू, कुदळ, कुऱ्हाड, विळा, खुरपे यासारखी शेतीची अवजारे व विळी, उलथणे, जात्याचे खुंटे यासारख्या घरगुती वस्तू बनविणे तसेच सुताराचे वाकस, किंकरे, सामते, सोनाराची ऐरण, सांडस, हातोडे, चिमटे, चांभाऱ्याच्या आऱ्या, राप्या, कुंभाराची कुदळ, टिकाव, खोरे, मुलाण्याचा सुरा, सुऱ्या अशा नवीन वस्तू बनविणे तसेच जुन्या वस्तू शेवटण्याचे काम लोहार करतो. त्यांच्यातही मराठयांप्रमाणे कावरे, जाधव, निकम, माने, थोरात, कोकणी, पांचाळ, पोवार व लोहार इत्यादि आडनावे आहेत.[३७]

लोहार समाजात एकाच कुळात लग्ने होत नाहीत. मामाच्या मुलीशी लग्न करता येते. आत्येच्या मुलीशी किंवा मावशीच्या मुलीशी लग्न करता येत नाही. लोहार हिंदूंचे सर्व सण साजरे करतात. तथापि गुढीपाडवा उत्साहात साजरा करतात. हे शाकाहारी व मांसाहारी आहेत व यांचे आहार कुणब्यांप्रमाणेच आहेत. घरे मातीची, छपराची, कौलारू तसेच काही लोक झोपडीत राहतात.[३८]

### ३.१२.१५ कुंभार

कुंभार हे नाव कुंभ म्हणजे मातीचा घडा व कार म्हणजे बनविणारा या शब्दावरून पडले असून कुंभ ऋषीला कुंभार जातीचा मूळ पुरूष मानले जाते. कुंभार ही जातसुद्धा बारा बलुतेदारांपैकी एक असून समाजाला यांची आवश्यकता असल्याने त्यांना समाजात मान होता. कुंभार हा मातीची भांडी, कौले, विटा, मडके, घागरी, मातीची बैले, मातीची खेळणी, दिवाळी–दसरा या सण उत्सवाला लागणाऱ्या पणत्या, महालक्ष्मीची मूर्ती, गणपती, दुर्गादेवी यासारख्या मातीची अनेक कलाकुसरीची वस्तू बनवित असे.[३९] या मातीच्या वस्तूंचे वैशिष्टये म्हणजे या वस्तू इकोफ्रेंडली असून त्यांच्यापासून निसर्गाला धोका नव्हता त्यामुळे पर्यावरणाची हानी होत नव्हती. परंतु अलिकडच्या काळात प्लॅस्टिक व प्लास्टर ऑफ पॅरिसपासून निर्माण झालेल्या

वस्तू पर्यावरणात असमतोल निर्माण करीत आहेत.

कुंभार जातीमध्ये लिंगायत कुंभार आणि मातीची भांडी बनविणारे असे दोन प्रकार आहेत. त्यांनी बनविलेल्या वस्तू ते लोकांना देत व त्याच्या मोबदल्यात त्यांना धान्य मिळत असे. याशिवाय मडके, घागरी व विटा इत्यादि मातीच्या वस्तू तसेच मानव व प्राण्यांच्या मूर्त्या, रांजण, मडकी, मातीची भांडी तयार करीत असत.[४०]

### ३.१२.१६ परीट

परीट ही जात सर्वत्र आढळते. यांच्यात कामाठी परीट, कुणबी परीट आणि परदेशी परीट अशा तीन पोटजाती आहेत. ते आपसात रोटीबेटी व्यवहार करीत नाहीत.[४१] परीट सोयरं, लग्नकार्य, सुतक प्रसंगी तसेच पाटलाचे, श्रीमंत गावकरी व गावकऱ्यांचे धुणे धुतो. हा लग्नात नवरा–नवरीवर चांदवा धरतो. लग्नात नवरा–नवरी व पाहुणे मंडळीसाठी पायघडया घालतो. त्याच्या कामात त्याला त्याची पत्नी व घरातील सदस्य मदत करतात. या कामाच्या बदल्यात त्याला गावाकडून बलुते मिळत असे. म्हणजे सुगी झाल्यावर शेतकऱ्यांडून धान्य व व्यापाऱ्यांकडून इतर वस्तू मिळत. हा समाज आर्थिकदृष्टया गरीब होता.[४२]

### ३.१२.१७ न्हावी

कोरेगाव तालुक्यात न्हावी जातीचे लोक पूर्वीपासून दाढी व हजामत (कटींग) करीत आहेत. हे काम मिळविण्यासाठी रस्त्याच्या चौकात तसेच गावच्या पारावर बसत. तसेच आपल्या साहित्याची पेटी घेऊन घरोघरी जाऊन लोकांचे केश कर्तन करीत होते. या मोबदल्यात त्यांना बलुता मिळत असे. याशिवाय नागपंचमीला मातीचे नाग बनवून पूजनासाठी घरोघरी देत. तसेच मराठा व इतर समाजाच्या विवाहाचे लोकांचे दवंडी देऊन आंमत्रण देण्याचे कामही करत.[४३] परंतु अलिकडील काळात न्हावी समाजात व त्यांच्या कामात आमुलाग्र बदल झालेला आहे. पूर्वीच्या दुकानाचे स्वरूप आता आधुनिक झालेले आहे. विविध मसाज केंद्रे निर्माण झाले आहेत. तसेच केसांच्याही वेगवेगळया फॅशन निर्माण झाल्या आहेत. महिलांसाठी वेगळे व पुरूषांसाठी वेगळे पार्लर सुरू झाले आहेत. विवाहप्रसंगी वधु–वरास एका विशिष्ट पद्धतीने सजविणारे वेगवेगळे व्यावसायिक निर्माण झालेले आहेत.

### ३.१२.१८ माळी

या जातीमध्ये फुल माळी व लिंगायत माळी असे दोन प्रकार आहेत. फळे व

भाजीपाल्याची बागायत शेती करून माळी लोक आपला उदरनिर्वाह करतात. मराठा व माळी समाजाची अनेक आडनावे एकसारखी असतात. त्यात नायकवडी, अडसुळ, शेलार, जाधव, ओवाळे, शिंदे, राऊत, गदादे, जमदाडे, कुदळे, फुले, बोराटे, गोरे, काळे, झोरे, दगडे, रासकर, वाघ, निकम इत्यादि आहेत. माळी स्त्रिया पूर्वी कपाळावर कुंकवाची आडवी रेघ ओढत असत व गळयामध्ये चांदीच्या सरी घालत होत्या. कोरेगाव तालुक्यातील अनेकांचे कोल्हापूरमधील जोतीबा हे दैवत आहे. लग्नानंतर हे देवदर्शनाप्रमाणे जोतीबाला जातात. हे अतिशय कष्टाळू, अतिथ्यशील व मनमिळाऊ असतात. यांच्या रूढी–परंपरा, चालीरिती, सण–उत्सव मराठा समाजाप्रमाणेच आहेत. देशस्थ ब्राह्मण हे त्याचे धर्मगुरू होते. आळंदी, जेजुरी, पंढरपूर व जोतीबा येथील यात्रा हे लोक करतात. तसेच संत सावता माळी यांची पुण्यतिथी साजरी करतात.[४४]

### ३.१२.१८ सुतार

सुतारांमध्ये पांचाळ व गाडे सुतार हे दोन प्रकार आहेत. लाकडापासून विविध आकर्षक वस्तू बनविणे हा त्यांचा पारंपरिक व्यवसाय आहे. तसेच शेतीला लागणारे लाकडी अवजारे त्यात नांगर, वखर, चाके, बैलगाडी मोटेचे सुळे, फावडयाचा दांडा, मेखा, डांडे, खुंटे, मुठी, देवळातील तुतारी व इतर वाद्यांचा लाकडी भाग इत्यादि वस्तू बनवित असे. या व्यतिरिक्त सोनार व लोहार यांच्या ऐरणीचे खोद, घन व हातोडयांचे दांडे, चांभाराची फरांडी, कुंभाराच्या चाकाचे तळ, परटाची मोगरी इत्यादि वस्तू तयार करणे तसेच नादुरूस्त वस्तू दुरूस्त करणे इत्यादि कामे सुतार करीत असे. पूर्वी हा व्यवसाय खेडयापुरताच मर्यादित होता. सुतार फावल्या वेळात पोळपाट, लाकडाच्या खेळणीही बनवून ती बाजारात विकत असे.[४५] अलिकडच्या काळात शहरीकरण मोठया प्रमाणात झाल्याने तसेच लाकडाऐवजी प्लायवूडचा वापर सुरू झाल्याने सुतारांच्या व्यवसायाला भरभराटीचे दिवस आले आहेत.

**कोरेगावाची १९५१ ते १९९१ पर्यंतची लोकसंख्या**

| अ.नं. | वर्ष | लोकसंख्या | पुरूष | स्त्रिया |
|---|---|---|---|---|
| १ | १९५१ | ७,२३० | ३,७०१ | ३,५२९ |
| २ | १९६१ | ९,१३५ | ४,९३९ | ४,१९६ |
| ३ | १९७१ | १२,४५३ | ६,७२५ | ५,७२८ |
| ४ | १९८१ | १४,५९४ | ७,४९१ | ७,१०३ |
| ५ | १९९१ | १९,७३३ | १०,१५७ | ९,५७६[४६] |

| कोरेगाव तालुक्यातील लोकसंख्येची धर्मनिहाय विभागणी, १९९१. | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण लोकसंख्या | हिंदू | मुसलमान | बौध्द | जैन | ख्रिश्चन | शीख | इतर धर्म | धर्म न सांगितलेले |
| २११०४१७ | १८९७५४ | ७०९९ | ११४३८ | ९०७ | १३४ | — | १०४ | ९८१[४७] |

## ३.१३ हिंदू धर्माव्यतिरिक्त समाज

कोरेगाव तालुक्यातील हिंदू धर्माव्यतिरीक्त इतर धर्मांचा अभ्यास करावयाचा झाल्यास आपणास सातारा जिल्हयातील विविध धर्मीयांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. कारण कोरेगाव तालुका हा सातारा जिल्हयाच्या पश्चिमेला उत्तर–दक्षिण पसरलेला असून याला शिवछत्रपतींची परंपरा लाभलेली आहे. तसेच आजही सातारच्या गादीचा परिणाम या तालुक्यावर दिसून येतो. येथे २० व्या शतकाच्या उत्तरार्धात हिंदू धर्माव्यतिरीक्त इतर समाजही आपापले अस्तित्व टिकवून असल्याचे दिसून येतात. परंतु त्यांचे प्रमाण हिंदू धर्माच्या तुलनेत अल्प आहे. यात ख्रिश्चन, इस्लाम, बौद्ध व जैन इत्यादि धर्माचे लोक होते व आहेत.

### ३.१३.१ ख्रिश्चन समाज

इ. स. १८१८ मध्ये ब्रिटीशांनी दुसऱ्या बाजीरावाशी वसईचा तह करून पेशवाई नष्ट केली. इंग्रजांनी महाराष्ट्रातील सर्व किल्ले जिंकून घेतले. ब्रिटीशांनी सातारा हस्तगत केला. सातारा राज्याची निर्मिती करून त्यात अक्कलकोटचे भोसले, फलटणचे निंबाळकर, किन्हई येथील पंतप्रतिनिधी, पसरणी (वाई) येथील शेखमिरे व भोरचे पंतसचिव अशी सहा जहागिरदारांची संस्थाने सामील केली. सातारा राज्याचे छत्रपती म्हणून प्रतापसिंह महाराजांना घोषीत केले. परंतु प्रतापसिंह महाराज अल्पवयीन असल्याने राज्यकारभार पाहण्यासाठी ग्रँट डफची रेसिडेंट म्हणून नेमणूक केली.[४८] यानंतर ब्रिटीशांनी साताऱ्यात अनेक सुधारणा घडवून आणल्या. याबरोबर शैक्षणिक सुधारणाही घडवून आणल्या. शैक्षणिक मिशन काढून शिक्षणाबरोबर धर्मप्रसार करणे हे ब्रिटीशांचे धोरण असल्याने त्यांनी जिल्हयात अमेरिकन मराठी मिशनचे काम इ. स. १८६४ मध्ये सुरू झाले. साताऱ्यात ब्रिटीशांनी सर्वप्रथम वाई तालुक्यात मिशनचे कामे भुईंज जवळील बदेवाडी येथे इ. स. १८६६ मध्ये सुरू केले. मिस्टर व मिसेस डीन हया पतीपत्नीने एकत्र येऊन हया कामाला सुरूवात केली. मिशनऱ्यांनी सातारा जिल्हयात शाळा व दवाखाने काढून शिक्षणप्रसार व रोग्यांची सेवा केली. परंतु याचबरोबर धर्मप्रसाराचे

कार्यही केले.

येशू ख्रिस्तांच्या नावाने प्रचलित झालेल्या या धर्माला ख्रिस्ती धर्म म्हणून ओळखले जाते. येशूवरील दृढ श्रद्धा हा या धर्माचा मूळ आधार आहे. येशू सदासर्वकाळ जिवंत राहणार असून, मानवाच्या कल्याणासाठी अवतार घेऊन तो या जगात अवतरला आहे. असा ख्रिस्ती लोकांचा विश्वास आहे.[४९] बायबल हा ख्रिस्ती धर्माचा ग्रंथ असून तो स्वतः येशूने परमेश्वराच्या आज्ञेने लिहिलेला आहे. सातारा जिल्हयात व कोरेगाव तालुक्यात ख्रिस्ती धर्माचे तत्वज्ञान आत्मसात करणारे लोक आहेत. या धर्मात स्वर्ग, नरक या कल्पना असल्या तरी पुनर्जन्माची कल्पना नाही. ख्रिस्ती धर्माची बैठक प्रेम, करूणा व सेवा या मुल्यांवर आधारलेली आहे. ख्रिस्ती धर्माने शैक्षणिक संस्था व दवाखाने काढून गरीब लोकांपर्यंत जाऊन त्यांची सेवा केली. यासाठी लागणारी मदत ख्रिस्ती अनुयायांनी वैयक्तिक व सामुदायिक देणग्या देऊन केली.[५०] परंतु शैक्षणिक व आरोग्याच्या सेवेबरोबर त्यांनी गरीब लोकांना आपल्या धर्माचे तत्वज्ञान सांगून आपल्या धर्मात खेचले. त्यानुसार कोरेगाव तालुक्यातील वाठार स्टेशन, कोरेगाव यासारख्या ठिकाणी येशूची मंदिरे निर्माण करून त्यातून धर्मप्रसार चालविलेला आहे.

### ३.१३.२ मुस्लिम समाज

मुसलमान व्यवसायानुसार तीस पोटभेद आहेत. त्यातील नऊ पोटभेदांमध्ये आपापसात बेटीव्यवहार होतो. त्यात मुगल, पठाण, शेख, सय्यद, अत्तार, कलाईगार, महावत, मणियार, नालबंद तसेच गुजरात व कच्छमधून आलेले बोहरा आणि मेहमान म्हैसूरमधून आलेले मुकरी व गायकसाब, बागवान, तांबोळी, धावड, लोहार, धोंडफोडे, गवंडी (विटांचे बांधकाम करणारे), झारस (राख गाळणारे), बकर कसाब (मटण विकणारे), मोमीन (विणकाम करणारे), पटवेगार (रेशीमकाम करणारे), पिंजारी (कापूस पिंजणारे), रंगारी (रंगकाम करणार), शिकलगार (हत्यारांना धार लावणारे) धोबी, हजाम आणि पखाली हे नोकरी करणारे तर नगारजी आणि गारूडी इत्यादि लोक होते. वरील जातीपैकी पठाण, शेख आणि सय्यद यांची संख्या कोरेगाव तालुक्यात फार मोठी आहे. हे लोक घरात उर्दू भाषा तसेच बाहेर मराठी भाषा बोलतात. मुसलमान पुरूष हे अंगावर शेरवानी, पायजमा, चुडीदार, सलवार, लुंगी, शर्ट आणि डोक्यावर गोल टोपी हा पोषाख वापरतात. स्त्रिया अंगात चोळी ब्लाऊज घालतात व गोल साडी नेसतात त्या डोक्यावर साडीचा पदर घेऊन त्यावर बुरखा घेतात. बोहरा स्त्रिया मात्र घागरा, चोळी किंवा

ब्लाऊज व ओढणी असा पोशाख होता. मुसलमान लोक हे ईद–ए–मिलाद, मेराज, शबेरात, रमजान ईद, बकरी ईद इत्यादि सण साजरे करतात. सणामध्ये अन्न, वस्त्र व पैश्याचा दानधर्म करतात. दिवसातून नेमून दिलेल्या वेळी ते नमाज पडतात. बागवान, कसाब, धोंडफोडे, गवंडी, पिंजारी व पखाली हे स्थानिक मुसलमान मशिदीत जात नाही. श्रीमंत मुसलमान हज यात्रा करणे हे जीवनातील एक परमपवित्र कर्तव्य समजतात.[५१]

### ३.१३.३ जैन

कोरेगाव तालुक्यात कोरेगाव तालुक्यात जैन समाजाची लोकसंख्या कमी होती. जैन लोक घरात कानडी व मराठी भाषा बोलतात. जैन लोक हे महावीर यास मानणारे असून ते कुणबी जमीनदारासारखे दिसतात. काही जैन लोक शेती करणारे शेतकरी असून ते शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उत्पादन मोठया प्रमाणावर काढतात. काही व्यापार व दुकानदारी करतात. आजचे शैव किंवा लिंगायत हे मूळचे जैनधर्मीय होते.[५२]

### ३.१३.४ बौद्ध

बौद्ध धर्मात महार, मुरळी महार, गावकी महार आणि जोगती महार अशा पोटजाती आढळतात. या सर्व पोटजातीचे लोक रोटीव्यवहार होतात. परंतु आपापसात बेटीव्यवहार होत नाहीत. महार दिसण्यास काळे, धडधाकट आणि कष्टाळू व प्रामाणिक होते. ते गावसेवक म्हणून गावकीची कामे करीत, गावकी महार हे स्थानिक ब्राह्मणांसारखे देवदेवतांची पूजा करीत. हिंदू धर्मातील महार लोकांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला आहे. १४ ऑक्टोबर, १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतल्यावर हजारोंनी त्यांचे अनुकरण केले. यास धम्मचक्र परिवर्तन दिवस म्हणून पाळतात. तेव्हापासून महारांना बौद्ध संबोधले जाते. धर्मांतरामुळे पूर्वाश्रमीच्या महार लोकांच्या जीवनात बदल घडून आला आहे. धम्मचक्र परिवर्तनानंतर बौद्धांचे धार्मिक व सामाजिक विधी बौद्ध भिक्षूद्वारे होत असले तरी काही जुन्या रूढींचे अनुपालन काही लोक करतात.[५३]

## ३.१४ कोरेगाव तालुक्यातील सत्यशोधक समाजाचे कार्य (कोरेगाव तालुक्यातील सामाजिक चळवळ)

१९ व २० व्या शतकात महाराष्ट्रात अनेक राजकीय व सामाजिक चळवळी उदयास आल्या. या सामाजिक चळवळी फुले–शाहू–आंबेडकर यांनी केलेल्या आहेत. यामध्ये महात्मा

फुले यांनी सुरू केलेली सत्यशोधक चळवळ अग्रगामी व प्रभावी अशी चळवळ मानली पाहिजे. आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनात महत्त्वाची असलेली ही चळवळ ग्रामीण व अज्ञानी लोकांपर्यंत पोहोचलेली पहिली चळवळ होय. महात्मा फुल्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करण्यापूर्वी महाराष्ट्रात प्रार्थना समाज, आर्य समाज, मानवधर्म सभा आदी सामाजिक कार्य संस्था अस्तित्वात होत्या. या मुख्यत्वे अध्यात्मिक व धार्मिक होत्या.[५४] या संस्था बहुजन, गोरगरीब व निरक्षर सामान्य जनतेचे ऐहिक व सामाजिक प्रश्न सोडवू शकत नव्हत्या. अशावेळी बहुजन अब्राह्मण समाजाच्या उद्धारासाठी २४ सप्टेंबर, १८७३ रोजी पुणे येथे महात्मा फुलेंनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. फुल्यांनी सत्यशोधक समाजाच्या अनुयायांकरिता 'सार्वजनिक सत्यधर्म' हा ग्रंथ लिहिला व या समाजाचे सदस्यत्व सर्व जातीतील लोकांना खुले केले.[५५]

### ३.१४.१ सत्यशोधक गुरूवर्य केशवराव विचारे

सातारा जिल्हयात सत्यशोधक चळवळ उभारण्यामागे सातारारोड पाडळी येथील गुरूवर्य केशवराव विचारे यांचे कार्य महत्त्वाचे आहे. केशवराव विचारे, भाऊराव पाटील, नाना पाटील, रा. ना. चव्हाण, राजाराम फाळके , शाहीर पुंडलिक फरांदे, दत्ताजीराव जाधव, व्यंकटराव कदम, मल्हारी ससाणे, शंकरराव कृष्णाजी माने, रावसाहेब वांगळे, ज्योत्याजीराव फाळके यांनी सत्यशोधक समाजाच्या कार्यात सहभाग घेतला.[५६]

### ३.१४.१.१ पूर्वचरित्र

गुरूवर्य केशवराव विश्रामराव विचारे यांचा जन्म रत्नागिरी जिल्हयातील गुहागर तालुक्यातील अडूर या गावी उच्चकुलीन मराठा कुटुंबात २९ जुलै, १८८९ रोजी झाला. त्यांच्या वडीलांचे नाव विश्रामराव व आईचे नाव आनंदीबाई असे होते.[५७] केशवराव लहान असताना त्यांच्या वडीलांचे निधन झाले. त्यामुळे कुटुंबाचे सर्व जबाबदारी आनंदीबाई यांच्यावर आली. केशवरावांचे प्राथमिक शिक्षण अडूरच्या शाळेमध्ये झाले. या शाळेत चौथीपर्यंतच शिक्षणाची सोय असल्याने १९०१ मध्ये वयाच्या १२ व्या वर्षी घरातील दारिद्र्यामुळे केशव घरात कोणाचीही परवानगी न घेता एका शिडाच्या बोटीतून मुंबईला यायला निघाला. या बोटीचा सारंग स्टुअर्ट बेल हा इंग्लिश होता. त्याने या पळून आलेल्या मुलाची आबाळ होऊ नये म्हणून सहा महिने सांभाळ केला. या काळात त्यांनी स्टुअर्टकडून इंग्रजी भाषा आत्मसात केली. याचा उपयोग

केशवरावांना आयुष्यभर झाला. इथच त्यांना वाचन, चिंतन व मनन करण्याची आवड निर्माण झाली. ६ महिन्यानंतर आई आनंदीबाईने त्यांचा शोध घेतला स्वतः मुंबईला जाऊन त्यांच्या पुढील शिक्षणाची जबाबदारी घेतली. येथे त्यांचे मॅट्रीक पर्यंतचे शिक्षण झाले. आपला मुलगा मुंबईकर होऊ नये म्हणून आपल्या नारायणराव शिर्के या भावाकडे कोल्हापूरला ठेवले.[५८]

### ३.१४.१.२ गुरूवर्य केशवराव यांचे कार्य

इ. स. १९०९ मध्ये नारायणराव शिर्के यांनी प्रयत्न करून केशवरावांना रेल्वेत नोकरी लावून दिली. त्यांना मिरजेला असिस्टंट स्टेशन मास्तर म्हणून नेमण्यात आले. याच काळात त्यांचा विवाह जीवनराव शिर्के यांची कन्या लक्ष्मीबाई यांच्याशी झाला. केशवराव मिरजेला असताना अतिशय धार्मिक वृत्तीचे होते. ते पोथ्यापुराणे वाचत, देवभक्ती करत. कपाळी गंध लावत असत. त्या काळातील पेशवाई पद्धतीच्या ब्राह्मणासारखे पूर्णपणे वागत असत.[५९] आतापर्यंत केशवरावांचा सत्यशोधक चळवळीशी संबंध आलेला नव्हता. त्यांच्या नीटनेटकेपणा व दैनंदिन कामातील चोखपणा या गुणांमुळे बढती होऊन स्टेशनमास्तर म्हणून कोल्हापूरला त्यांची बदली झाली. कोल्हापूर स्टेशन केशवराव विचारेंच्या जीवनाला कलाटणी देणारे ठरले. ना. भास्करराव जाधव व राजर्षि शाहू महाराज यांच्या प्रेरणेने केशवराव सत्यशोधक समाजाकडे वळले.[६०] यानंतर १९१२ मध्ये त्यांची बदली सातारारोड येथे करण्यात आली. सातारारोडला आल्यानंतर त्यांनी आपले आयुष्य रेल्वे रूळासारखे समांतर व सिग्नलपुरते मर्यादित ठेवले नाही. याउलट बहुजन समाजातील पिढयान्‌पिढया चालत आलेले रूढीप्रिय रूळ उखळून टाकले. याकाळात त्यांची मैत्री तालमीत ज्योत्याजीराव फाळके यांच्याशी झाली. त्यांनी गावचे पाटील ज्योत्याजीरावांबरोबर सत्यशोधकी विचार गावात रूजविण्यास सुरूवात केली. देव व धर्म यातून किती नुकसान होते. हे तरूणांच्या मनावर बिंबवले. १९१९ मध्ये स्टेशन मास्तरच्या नोकरीचा केशवराव विचारे यांनी राजीनामा दिला व सत्यशोधक समाजाच्या कार्याला वाहून घेण्याचे ठरविले.[६१]

### ३.१४.१.३ कॉरस्पॉन्डन्स विद्यार्थी संघ

सत्यशोधक समाजात कार्यरत असताना केशवराव विचारे यांना आढळून आले की, बहुजन समाजात निरक्षर लोकांचे प्रमाण खूप आहे. परंतु जे साक्षर आहेत तेदेखील आपल्या शिक्षणाचा उपयोग करू शकत नाही. त्यामुळे परिस्थितीचे योग्य ज्ञान त्यांना होत नाही. अशा

परिस्थिती बहुजन समाजातील प्रौढ व साक्षर व्यक्तींना धर्म, निती, राजकीय इतिहास याविषयीची माहिती पुरविल्यास त्यांच्यात ज्ञानाबद्दल आवड निर्माण होईल म्हणून त्यांनी प्रौढ शिक्षणाचा प्रसार करण्याचा उद्देशाने इ. स. १९३३ मध्ये कॉरस्पॉन्डन्स विद्यार्थी संघाची स्थापन केली. या संघाचे मुख्य कार्यालय सातारारोड येथे होते.[६२]

समाजातील तंटे, त्यांच्यातील अंधश्रद्धा इत्यादि गोष्टी अभ्यासाच्या अभावामुळे घडतात याची जाणीव या संघाने समाजाला करून दिली. विचारे यांनी कॉरस्पॉन्डन्स विद्यार्थी संघामार्फत बहुजन समाजात जागृती घडवून आणण्याचे कार्य केले. या संघामार्फत काढलेल्या प्रचारपत्रकात ते म्हणतात, ''भविष्यातील सुखे वर्तमानकाळी आपण जे ज्ञान वाढवाल त्यावरच अवलंबून राहणार म्हणून तुम्ही आजच कॉरस्पॉन्डन्स विद्यार्थी संघात सामील व्हा. तुम्हाला घरच्या घरीच कोणत्याही उद्योगात व्यत्यय न आणता निरनिराळया विषयांचे ज्ञान वाढविण्याची ही अमोल संधी आहे.[६३]

### ३.१४.१.४ सत्यशोधक विद्यार्थी संघ

इ. स. १९३९ मध्ये केशवराव विचारे यांनी सत्यशोधक विद्यार्थी संघाची स्थापना केली. पत्रव्यवहारातून अभ्यासक्रम चालविण्याऐवजी माणसांना संघटीत करून त्यांना आपले विचार पटवून त्यातून निर्माण झालेल्या कार्यकर्त्यांना गावोगाव पाठवून त्यांच्याकडून लोकशिक्षणाचे कार्य करावे असा या संघस्थापनेमागील उद्देश होता. सत्यशोधक संघाच्या सभासदांना प्रतिज्ञापत्रक भरून द्यावे लागे. त्यामध्ये समता, बंधुता व सहकारिता या तत्त्वांच्या आधारे स्वतः आचरण करून शेतकरी कामगार वर्गात रोज दोन तास याप्रमाणे विचार जागृतीचे काम करावे लागे.[६४] या संघाचा विचारेंनी अभ्यासक्रम तयार केला होता. त्यात आपण कोठे आहोत? अन्न, युद्ध, मन, भिन्न विचारप्रणाली, शिक्षण, धर्म, निती, देव, भक्ती असा अभ्यासक्रम तयार केला होता.[६५]

वरील अभ्यासक्रमातून विचारे खेडयापाडयातील गरीब लोकांना महात्मा फुलेंचे तत्वज्ञान साध्या व सोप्या भाषेत समजावून सांगत. खेडोपाडी शिबीरे घेऊन व्याख्याने देत. केशवरावांनी उत्तर कोरेगावातील पाडळी, भक्तवडी, तडवळे, वाघोली येथे रात्रशाळा काढल्या. येथे शिकवायला ते स्वतः जातीने हजर असत.[६६] सत्यशोधक विद्यार्थी संघामार्फत लोकरंजनातून लोकशिक्षणाचे आकर्षण कार्यक्रम घेतले जात. त्यात चित्तवेधक नाटिका, स्फूर्तीदायक पोवाडे,

बोधप्रद लोकगीते, सांस्कृतिक जलसा, नकला, विचारप्रवर्तक व्याख्याने, संताचा बहुमोल संदेश देणारे किर्तन, कसरतपटूंचे प्रेक्षणीय प्रयोग यासारख्या कार्यक्रमातून समाजप्रबोधन केले जात असे.[६७] विचारे गुरूजींनी सत्यशोधक संघामार्फत संपूर्ण महाराष्ट्र ढवळून काढला. सामाजिक व धार्मिक क्षेत्रात विचार परिवर्तन घडवून आणले.

### ३.१४.१.५ मृत्यू

१९२० ते १९५७ या कालावधीत गुरूवर्य केशवराव विचारेंनी सातत्यांनी केलेले सामाजिक कार्य, कामामुळे अनिश्चित जेवण, कामाचा व्याप व ताण, वाढत जाणारे वय यामुळे त्यांची प्रकृती १९५३ च्या अखेरीस बिघडली होती. ते अधूनमधून सतत आजारी पडत होते. पुढे १९५५ ते १९५७ अशी सलग दोन वर्षे ते आजारीच होते. सातारारोडला या काळात त्यांचे वास्तव्य होते. त्यांच्या मुलांनी त्यांची सेवा अविरत चालविली होती. विचारेंच्या शिक्षणप्रसाराच्या व ग्रामीण जनतेच्या सेवाकार्यामुळे वाईच्या ख्रिश्चन मिशनरींनी शेवटच्या चार महिन्यात आजारपणात वाईच्या मिशनरी हॉस्पिटलमध्ये दाखल करून घेतले होते. परंतु प्रकृती सुधारण्याची काहीही लक्षणे न दिसून आल्यामुळे त्यांना घरी सातारारोडला पुन्हा आणले. गुरूवर्यांना ल्युकोमिया नावाचा एक प्रकारचा ब्लड कॅन्सर हा आजार होता व त्याकाळी या आजारावर भारतात औषधच नव्हते. घरी आणल्यावर दि.०७ नोव्हेंबर १९५७ रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास त्यांची जीवनज्योत मालवली.[६८]

### ३.१४.२ सत्यशोधक ज्योत्याजीराव फाळके

### ३.१४.२.१ पूर्वचरित्र

ज्योत्याजीरावांचा जन्म पुणे जिल्हयातील इंदापूर तालुक्यातील बोराटेची वाडी या गावी इ. स. १८९२ साली झाला. जनक वडीलांचे नाव बाबाजी गोपाळा पाटील हे होते. आणि बयाजीराव बाबाजी फाळके–पाटील यांनी दत्तक घेतले. ज्योत्याजीरावांचे चौथीपर्यंतचे शिक्षण पाडळी–सातारारोड येथे झाले. वयाच्या १९ व्या वर्षी म्हणजे १९११ साली गुरूवर्य केशवराव विचारे यांचे सत्यशोधकी विचारांचे मार्गदर्शन त्यांना मिळाले.[६९]

### ३.१४.२.२ सत्यशोधक ज्योत्याजीराव फाळके व गुरूवर्य केशवराव विचारे मैत्रीसंबंध

गुरूवर्य केशवराव विचारे यांची बदली सातारारोडला स्टेशन मास्तर झाल्यानंतर त्यांचा तालमीत जाण्याचा व तेथील मुलांबरोबर मैत्री करण्याच्या छंदामुळे केशवरावांची मैत्री

ज्योत्याजीराव फाळके यांच्याशी झाली. प्रकृतीने धडधाकट, बेडर, धाडशी वृत्तीचा ज्योत्याजीराव विचारेंना भावले. शिकारीची आवड हा त्यांच्या मैत्रीचा समान धागा होता. १९१४ साली ज्योत्याजीरावांकडे पाडळी गावाची पाटीलकी आली. दादा पांडू फाळके, सयाजीराव फाळके, विश्वनाथ गाढवे (पैलवान), जिजाबा नाना फाळके हे ज्योत्याजीरावांचे सहकारी मित्र होते. शिकारीच्या निमित्ताने ही मित्रमंडळी फिरत असत.[७०] त्यांच्यामध्ये सत्यशोधकी विचारांचे संस्कार रूजविण्यास विचारे गुरूजींनी सुरूवात केली. देव व धर्म यांचे अवडंबर केल्यामुळे किती नुकसान होते. हे या तरूणांच्या मनात बिंबविले. इ. स. १९१५ मध्ये या साऱ्या मंडळींना विचारेंनी सत्यशोधक समाजाची दीक्षा दिली. जुन्या रूढीप्रिय प्रतिगामी हिंदू धर्मातील अनिष्ट प्रवृत्ती व वर्णभेदातून निर्माण झालेल्या रूढी त्यांना पटवून दिल्या.[७१]

### ३.१४.२.३ सत्यशोधक ज्योत्याजीराव फाळके व राजर्षि शाहू महाराज यांची भेट

इ. स. १९१६ मध्ये ज्योत्याजीराव फाळके व केशवराव विचारे राजर्षि शाहू महाराजांना भेटण्यासाठी कोल्हापूरला गेले. तेथे त्यांचा परिचय भास्करराव जाधव, हरिभाऊ चव्हाण, रामचंद्र बाबाजी जाधव यांच्याशी झाला. कोल्हापूरातील एक आठवडयाच्या वास्तव्यात त्यांना सत्यशोधकाची भूमिका समजली. सत्यशोधकी जलसा काढण्याचा विचार घेऊनच ते पाडळीला आले. सत्यशोधकाचे संस्कार त्यांना गुरूवर्य केशवराव विचारे व राजर्षि शाहू महाराज यांच्याकडून मिळाल्यानंतर त्याच्या अंमलबजावणीचा प्रारंभ स्वतःपासून सुरू केला.[७२]

### ३.१४.२.४ सत्यशोधक ज्योत्याजीराव फाळके यांचा सत्यशोधकी जलसा

ज्योत्याजीराव यांचा १९१६ साली सत्यशोधकी जलसा बनविला आणि त्याद्वारे समाजप्रबोधनाचे कार्य करू लागले. सत्यशोधक विचारांचे जलशांचे प्रयोग करीत. ज्योत्याजीराव फाळके यांनी जिजाबा फाळके, भिकोबा फाळके, सोनोपंत दांडेकर, आबा साबळे, महादू पाटील, शाहीर बाबुराव भोईटे, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासोबत जलश्यांमध्ये काम केले. जलशाची सुरूवात गणाने होत असे. पुरूषच स्त्रियांची कामे करीत असत. त्यांनी सातारा, पुणे, कोल्हापूर, धुळे (खान्देश), विदर्भ भागात जलसे करून १९२५ ते १९३५ या दहा वर्षाच्या कालावधीत ग्रामीण परिसरात एका वेगळया सामाजिक प्रबोधनाचे कार्य केले.[७३] २७ मे १९५० रोजी कोल्हापूरात अखिल भारतीय सत्यशोधक समाजाचे अधिवेशन 'दीनमित्र' कार रावसाहेब मुकुंदराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाले. अधिवेशनाचे उद्घाटक लक्ष्मणशास्त्री जोशी व

स्वागताध्यक्ष दासराम होते. या परिषदेत सत्यशोधक समाजाची नवी घटना तयार करण्यात आली व या घटनेनुसार परिषदेत श्री. केशवराव विचारे यांना सत्यशोधक समाजाचे महाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.[७४] यापुढील कालावधीत गुरूवर्य केशवराव विचारे गुरूजींच्या सोबतीने ज्योत्याजीरावांनी सत्यशोधक संघामार्फत संपूर्ण सातारा जिल्हा ढवळून काढला. सामाजिक व धार्मिक क्षेत्रात विचार परिवर्तन घडवून आणले.

### ३.१४.२.५ ज्योत्याजीरावांनी घरातील देव्हारा विहिरीत टाकला

ग्रामीण परिसरात वेगवेगळया गावात सामाजिक प्रबोधनाचे कार्य करीत असतांना मौजे आरफळ, ता.कोरेगाव येथील पाटलाने ज्योत्याजीरावांना प्रश्न विचारला की, ''पाटील तुम्ही देवाबद्दल बोलताय पण तुमच्या घरी देव्हारा आहे हे विसरला काय? तेव्हा सत्यशोधक ज्योत्याजीरावांना ही विसंगती लक्षात आली. ते घरी आले आणि त्यांनी आपल्या घरातील देव्हारा घरातील सर्वांचा विरोध असूनही विहीरीत फेकून दिला.[७५] अशा प्रकारे ज्योत्याजीरावांनी घुमजाव न करता सत्यशोधक विचारांप्रमाणे कृतीही केली.

### ३.१४.२.६ ज्योत्याजीरावांचे शैक्षणिक, सामाजिक, कार्य

ज्योत्याजीरावांनी त्या काळामध्ये जे जनजागरण व सत्यशोधन केले. त्यामुळे राजकारण, शिक्षण व समाजकारण अशा विविध क्षेत्रामध्ये आज बहुजन समाजातील मंडळी दिसतात. त्यामागे ज्योत्याजीराव फाळके–पाटील यांची तपश्चर्या आहे हे मान्य केले पाहिजे त्यांनी बुद्धीजीवी मंडळीविरूद्ध केलेले सामाजिक बंड हे समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. शेतकरी शहाणा झाला पाहिजे यासाठी त्यांनी रात्रीची शाळा काढली. अलिकडील काळातील प्रौढ शिक्षणाची संकल्पना त्या काळात राबविली.[७६] सत्यशोधक विद्यार्थी संघामार्फत लोकरंजनातून लोकशिक्षणाचे आकर्षक कार्यक्रम घेतले जात. त्यात चित्तवेधक नाटिका, स्फूर्तीदायक पोवाडे, बोधप्रद लोकगीते, सांस्कृतिक जलसा, नकला, विचारप्रवर्तक व्याख्याने, संताचा बहुमोल संदेश देणारे किर्तन, कसरतपटूंचे प्रेक्षणीय प्रयोग यासारख्या कार्यक्रमातून समाजप्रबोधन केले जात असे.[७७] शेतीचा व्यवहार आर्थिक दृष्टिकोनातून सुधारला पाहिजे यासाठी सामुदायिक शेतीचा प्रयोग १९४६ मध्ये राबविला. आयुष्यभर सत्याला परमेश्वर, माणुसकीला धर्म व सहकाराला नीती मानून त्यांनी काम केले. रूढीप्रिय समाज रचनेविरूद्ध आयुष्यभर लढणारा एक वैचारिक बंडखोर ही प्रतिमा विशेष आहे.[७८]

असे हे सत्यशोधक ज्योत्याजीराव फाळके विचारांना कृतीची जोड देणारे असे होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व अभ्यासू, चिंतनशील व संस्कारक्षम होते. त्यांचे शिक्षण चौथीपर्यंत झाले असले तरी त्याकाळात त्याही शिक्षणाचा दर्जा मोठा होता. त्यांनी म. फुलेंचे चरित्र, म. फुलेंचे ग्रंथ उदा. गुलामगिरी, शेतकऱ्याचा आसूड, शिवाजी महाराजांचा पोवाडा, ब्राह्मणांचे कसब अशा ग्रंथांचे वाचन केल्याने या ग्रंथांचा त्यांच्यावर प्रभाव होता. 'वाचाल तर वाचाल' हे बोधवाक्य सर्वपरिचित असले तरी 'ध्येयवादी आणि संस्कारक्षम मनाने वाचाल तर, इतरांनाही वाचवाल' असा आदर्श समाजापुढे ठेवला. ज्योत्याजीरावांनी आपल्या कर्तृत्वाने समाजाला एक नवीन दिशा दिली. जीवनाचा अखेरपर्यंत त्यांनी सातारारोड, पाडळी यासारख्या छोटया गावात राहून सत्यशोधक समाजाची किर्ती महाराष्ट्रभर व किंबहुना भारतभर पसरविली. अशा या सत्यशोधक ज्योत्याजीरावांची प्राणज्योत २१ फेब्रुवारी, १९७७ साली मालवली.[७९] त्यांच्यानंतर त्यांचे पुत्र वसंतराव फाळके यांनी कोरेगाव तालुक्यात सत्यशोधक समाजाचे कार्य आजतागायत अविरतपणे चालविले आहे.

### ३.१४.३ सत्यशोधक ॲड्. वसंतराव फाळके

गुरूवर्य केशवराव विचारे व पिताश्री जोत्याजीराव फाळके यांच्याकडून ॲड्. वसंतराव फाळके यांना सत्यशोधक समाजाचा वारसा मिळाला. सामान्यतः वडिलांनी सुरू केलेला उपजिविकेचा, व्यवसायाचा वारसा त्यांची मुलं चालवितांना दिसतात. परंतु समाजसेवेचा वडिलांचा वारसा चालविणारी मुलं अपवादानेच दिसून येतात. त्यांनी ह्या वारशातून मिळालेले तत्वज्ञान, शिकवणूक जपण्याचे परिपूर्ण कार्य आजतागायत केलेले आहे. सत्यशोधक विचारांची शिदोरी कोरेगाव व सातारा जिल्हयातील जनतेला पुरविण्याचे सर्वतोपरी प्रयत्न त्यांनी केले आहे. त्यांनी १९ व्या व २० व्या शतकातील ग्रामीण भागातील जनतेला सत्यशोधकांच्या बुद्धीवादी विचारसरणीचा माध्यमातून समाजातील अनिष्ट रूढी परंपरा, अंधश्रद्धा यांच्या जोखडातून मुक्त करण्याचे कार्य केले.[८०]

### ३.१४.३.१ ॲड्. वसंतराव फाळके यांचे पूर्वचरित्र

ॲड्. वसंतराव फाळके यांचा जन्म कोरेगाव तालुक्यातील पाडळी–सातारारोड या गावी उच्चकुलीन मराठा कुटुंबात १४ मे, १९३६ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव ज्योत्याजीराव व आईचे नाव गयाबाई असे होते.[८१] वडिल सत्यशोधक समाजाचे समर्थक असल्याने

लहानपणापासूनच वसंतरावांवर सत्यशोधकाचे विचार रूजले. वसंतरावांचे चौथीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण पाडळी–सातारारोड येथे झाले. माध्यमिक शिक्षण (जुनी एस. एस. सी. ११ वी पर्यंत) न्यू इंग्लिश स्कूल, सातारा येथे झाले. वसंतराव कुशाग्र बुध्दीचे असल्याने त्यांना एस. एस. सी. परीक्षेत त्याकाळात ७५ टक्के गुण मिळाले. शिक्षणाबरोबरच त्यांना कुस्तीची आवड असल्याने ते उत्तम कुस्तीगीरही बनले.

महाविद्यालयीन शिक्षण राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर येथे बी. ए. प्रथम वर्ष पूर्ण केले. तसेच कुस्ती केल्या व सर परशूरामभाऊ कॉलेज, पुणे येथून अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र या विषयातून बी. ए. ची पदवी संपादन केली. लॉ कॉलेज, पुणे या ठिकाणी त्यांनी एल. एल. बी. ही शैक्षणिक गुणवत्ता संपादन करून १९६१ मध्ये मुंबई येथून बार कौन्सिलची परीक्षा देऊन वकीलीची सनद प्राप्त केली.[८२]

### ३.१४.३.२ ॲड्. वसंतराव फाळके यांचे कार्य

बालपणापासून कोणता आदर्श लाभतो यावरही व्यक्तीच्या जीवनाची दिशा ठरत असते आणि त्या अनुषंगानेच त्याची यशस्विता ठरत असते. वसंतरावांवर बालपणापासून म. फुल्यांच्या सत्यशोधक समाज विचारसरणीचे संस्कार वडिलांकडून आल्यामुळे वयाच्या १४ व्या वर्षी म्हणजे १९५० पासून म. फुल्यांच्या सत्यशोधक समाजाच्या कार्याला वाहून घेतले ते आज तागायत. ते लहान असताना त्यांच्या घरात कसलाही धार्मिक विधी होत नसे व घरात सर्व जातीधर्माचे लोक येत असत. त्यामुळे सत्यशोधक समाजाचे बाळकडू त्यांना लहान वयातच मिळाले. शालेय शिक्षण घेत असतानाच समाज सेवकाचा त्यांचा पिंड घडत गेला. सत्यशोधक गुरूवर्य केशवराव विचारे यांचे यांचाही सहवास आणि संस्कार त्यांना लाभला.[८३]

इ. स. १९३९ मध्ये केशवराव विचारे यांनी सत्यशोधक विद्यार्थी संघाची स्थापना केली. पत्रव्यवहारातून अभ्यासक्रम चालविण्याऐवजी माणसांना संघटित करून त्यांना आपले विचार पटवून त्यातून निर्माण झालेल्या कार्यकर्त्यांना गावोगाव पाठवून त्यांच्याकडून लोकशिक्षणाचे कार्य करावे असा या संघस्थापनेमागील उद्देश होता. या सत्यशोधक विद्यार्थी संघात वसंतरावांनी १९४७ पासून शालेय शिक्षणाबरोबरचे सत्यशोधनाचे शिक्षण घेतले. या विद्यार्थी संघात त्यांना सत्यशोधक विचारसरणी शिकविली गेली. सत्यशोधक संघात प्रवेशित सभासदांना प्रतिज्ञापत्रक भरून द्यावे लागत असे. त्यामध्ये समता, बंधुता व सहकारिता या तत्त्वांचा आधारे

स्वतः आचरण करून शेतकरी कामगार वर्गात रोज दोन तास याप्रमाणे विचार जागृतीचे काम करणार असे लिहून द्यावे लागत असे. या संघाचा अभ्यासक्रम गुरूवर्य केशवराव विचारे यांनी तयार केला होता. त्यात आपण कोठे आहोत? अन्न, युद्ध, मन या भिन्न विचारप्रणाली तसेच शिक्षण, धर्म, निती, देव व भक्ती असा अभ्यासक्रम त्यांनी तयार केला होता. सत्यशोधक विद्यार्थी संघात शिक्षण घेतल्यामुळे वसंतरावांमध्ये अंधश्रध्दा, जुन्या रूढी–परंपरा यांच्याविरूध्द चीड निर्माण झाली. लहान वयातच त्यांना देव–धर्म, अंधश्रध्दा, कर्मकांड हया गोष्टी कशा थोतांड आहेत हया गोष्टींचे शिक्षण मिळाल्यामुळे त्यांच्या नसानसात सत्यशोधकांची विचारसरणी भिनली. पुढे वसंतरावांनी इ. स. १९५४ मध्ये एस. एस. सी. ची परीक्षा दिल्यानंतर सत्यशोधक विद्यार्थी समाजाची परीक्षा देऊन सत्यशोधक विद्यार्थी संघाचे शिक्षक बनले. त्याकाळात शिक्षक बनल्यानंतर एक वर्ग चालवावा लागत असे. म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये सत्यशोधक विचारसरणी रूजविण्याचे कार्य केले. त्यांनी सत्यशोधक विद्यार्थी संघाचा ५० विद्यार्थ्यांचा वर्ग शाहू महाराजांचे मराठा वसतिगृह, कोल्हापूर येथे चालविला. गुरूवर्य केशवरावांनी व त्यांचे वडील ज्योत्याजीराव फाळके यांनी वर्गाचे कामकाज पाहून समाधान व्यक्त केले होते. त्यात खेडयापाडयातील गरीब लोकांना म. फुलेंचे तत्वज्ञान साध्या व सोप्या भाषेत समजावून सांगणे. खेडोपाडी शिबीरे घेऊन व्याख्याने देण्याचे कार्य वसंतरावांनी केले. १९४७ ते १९५७ या कालावधीत गुरूवर्य केशवराव विचारे यांच्या सत्यशोधक संघामार्फत अध्ययन व अध्यापनाचे कार्य करून सामाजिक व धार्मिक क्षेत्रात विचार परिवर्तन घडवून आणले.

दि. ०७ नोव्हेंबर १९५७ रोजी गुरूवर्य केशवराव विचारे यांची जीवनज्योत मालवली. तसेच वसंतरावांचे वडील ज्योत्याजीराव फाळके हे देखील थकले. त्यामुळे सत्यशोधक चळवळ थंडवली. मात्र वसंतरावांनी १९६१ मध्ये मुंबई येथून बार कौन्सिलची परीक्षा देऊन वकीलीची सनद प्राप्त केल्यानंतर आपल्या वकीली व्यवसायाबरोबर सत्यशोधक समाजाचे कार्यही सुरू ठेवले. पुढे १९८९ मध्ये सत्यशोधक चळवळ पुन्हा पुनर्जीवीत केली. सत्यशोधक समाजाचे १९ अधिवेशन झाल्यानंतर पुढील काळात अधिवेशन झालेले नव्हते. हे बंद पडलेले अधिवेशनाचे कार्य सुरू करून २० वे अधिवेशन नोव्हे. १९८९ मध्ये औरंगाबाद येथे घेतले. सत्यशोधक समाज कार्यकारिणीत एकूण ९ सदस्य घेण्यात येऊन सत्यशोधक समाजाचे पुनर्जीवन केले.[८४]

१९९० मध्ये सत्यशोधक समाजाची कार्यकारिणी स्थापन केली. त्यात अध्यक्ष म्हणून आय. ए. एस. अधिकारी रायभानजी जाधव (मंत्रालयातील सेक्रेटरी व मुख्यमंत्र्यांचे मुख्य सचिव) यांना घेण्यात आले व उपाध्यक्ष नं.१ म्हणून ॲड्. वसंतराव फाळके यांना स्थान मिळाले. घटनेप्रमाणे एकूण ५ उपाध्यक्ष होते. इ. स. १९९० ते १९९५ या काळात रायभानजी जाधव यांनी अध्यक्ष म्हणून कार्य केले. त्यानंतर त्यांच्या काळात २१ वे अधिवेशन सातारारोड_येथील कूपर शाळेत १९९० मध्ये घेतले. या अधिवेशनात स्वागताध्यक्ष म्हणून ॲड्. वसंतराव फाळके यांनी कार्य केले. २२ वे अधिवेशन १९९१ मध्ये नाशिक येथे तर २३ वे अधिवेशन १९९२ मध्ये धुळे जिल्हयातील बोराडी येथे घेण्यात आले. इ. स. १९९५ मध्ये रायभान जाधवांनंतर व्यंकटराव अण्णा रणदिवे १९९६ सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष बनले. अण्णा वयाने थकलेले होते. म्हणून बहुतेक सर्व काम वसंतरावांना करावे लागले. १९९५ ते २००० या काळात वसंतरावांनी काही ठिकाणी अण्णांसोबत तर काही ठिकाणी एकटे फिरून महाराष्ट्रातील २४ जिल्हयात सत्यशोधक समाजाच्या कार्यकारिणी बनविल्या. जिल्हाध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव नेमले व त्यांच्या कार्यकारिणी त्यांच्या जिल्हयातील लोकांना नेमावयास लावल्या. या काळात दरवर्षी सत्यशोधक समाजाचे अधिवेशन घेतले. २००१ मध्ये ॲड्. वसंतराव फाळके सत्यशोधक समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले. यानंतर इ. स. २००१ ते २०१३ अशी सलग १२ वर्षे सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष म्हणून कार्य केले. त्यांच्या कारकिर्दीत सत्यशोधक समाजाचे ३७ वे अधिवेशन पार पाडले. तसेच २००१ मध्ये स्थापन झालेल्या सत्यशोधकी साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषदेचे महत्त्व लक्षात घेऊन नागनाथ अण्णा नायकवडी यांच्याबरोबर वाटाघाटी करून साहित्य संमेलन घेतले. येथून पुढे या परिषदेची ९ साहित्य संमेलने यशस्वीरित्या पार पाडली. त्यामुळे अखिल भारतीय सत्यशोधक समाजाच्या वार्षिक अधिवेशनाइतकेच महत्त्व अखिल भारतीय सत्यशोधकी साहित्य संमेलनाला मिळाले. यामुळे सत्यशोधकी साहित्याचा, नियतकालिकांचा इतिहास, सत्यशोधकांचा चरित्रकोश, सत्यशोधक समाजाच्या अधिवेशनांचा इतिहास इत्यादि लेखन प्रकल्प मार्गी लागले. २०१३ मध्ये वयोमानानुसार ॲड्. वसंतराव फाळके पदावरून निवृत्त झाले. त्यांच्यानंतर २०१४ मध्ये १ वर्ष उत्तमराव माधवराव पाटील (तरवडी), इ. स. २०१५ मध्ये प्रा. जे. ए. उगले (पैठण) व इ. स. २०१५ मध्ये वर्धा येथील प्रा. अशोकराव चोपडे अध्यक्ष झाले.[८५]

ॲड्. वसंतराव फाळके निवृत्त झाले असले तरी ते आजही वयाच्या ८० व्या वर्षी सत्यशोधक समाजाच्या चळवळीत सक्रीय कार्यरत आहेत. विविध ठिकाणी जाऊन सत्यशोधक समाजाचे महत्त्व ते शास्त्रीयदृष्टया पटवून देतात. ते अंधश्रध्दा मानत नाही. त्यापुढे जाऊन ते हिंदुधर्म व हिंदुधर्मातील देव मानत नाही. ते चातुवर्ण्य पध्दती नाकारतात. जाती उपजाती नाकारतात. ते सत्यधर्मी मानतात. थोडक्यात महात्मा फुलेंनी १८७४ साली सुरू केलेल्या सत्यशोधक समाजाला आजच्या आधुनिक युगातही जिवंत ठेवण्याचे कार्य ॲड्. वसंतराव फाळके यांनी केले आहे.

सातारा जिल्हयातील कोरेगाव तालुक्यातील सातारारोड याठिकाणासारख्या ग्रामीण भागात म. फुले आणि त्यांच्या सत्यशोधक समाजाचे लोण पसरविण्याचे कार्य गुरूवर्य केशवराव विचारे यांनी केले. म्हणून सातारा जिल्हयातील सत्यशोधक चळवळीच्या नेतृत्वाने स्वातंञ्य लढयात भाग घेऊन देशाला स्वातंञ्य मिळवून देण्यात महत्त्वाची कामगिरी बजावली. सत्यशोधक केशवराव विचारे यांचे कार्य आधुनिक महाराष्ट्रातील सामाजिक पुनर्घटनेसाठीची चळवळ सुरू करणारी ठरली. ब्राह्मण समाजाने जमेल त्या मार्गाने विरोध करूनही सत्यशोधक समाजाने सामाजिक गुलामगिरीविरूद्ध आवाज उठविला. सामाजिक न्यायाची आणि पुनर्रचनेची मागणी केली. गुरूवर्य केशवराव विचारेंनी सुरू केलेल्या या चळवळीचा सातारा जिल्हयावर मोठा परिणाम होऊन बहुजन समाजात शिक्षणाची आवड निर्माण झाली. ग्रामीण परिसरातील लोकांना कर्मकांडातून मुक्ती देऊन नव्या विचारसरणीची ओळख करून देणे, शिक्षणाचे लोण ग्रामीण भागापर्यंत पोहोचविणे, खेडोपाडी शिबीरे व व्याख्याने घेऊन खेडयापाडयातील गरीब लोकांना महात्मा फुलेंचे तत्त्वज्ञान साध्या व सोप्या भाषेत समजावून सांगण्याचे महत्त्वाचे कार्य सत्यशोधक समाजातील या सत्यशोधकांनी केले. धर्माच्या नावाखाली ब्राह्मण समाजाने चालविलेल्या शोषणाची जाणीव बहुजन समाजाला व शूद्रातिशूद्रांना झाली. कमी खर्चात ब्राह्मण पुरोहितांच्या अनुपस्थितीत लग्न समारंभे पार पाडली गेली. ब्राह्मणांचे वर्चस्व नाकारून जातीभेद, वर्णव्यवस्था, सावकारशाही, पुरोहितशाही व मूर्तीपूजेला जबरदस्त धक्का दिला गेला. नुसताच देवधर्म केल्याने कोणाचे पोट भरत नाही, त्यासाठी कृतीची जोड आवश्यक असते. हे कार्य कर्मकांडाच्या जमान्यात सत्यशोधक समाजाने केले. अलिकडच्या काळात महाराष्ट्रात आधुनिकीकरण झाले असले तरी अजूनही समाज पूर्णपणे प्रबोधित झालेला नाही. समाजात

आजही अंधश्रद्धा, जुन्या चालीरिती, रूढी–परंपरा दिसून येतात. फ ुल्यांनी सांगितलेले बुद्धीवादी तत्त्वज्ञान समाजाला कृतीने पटवून सांगण्याचे कार्य सत्यशोधक समाज करीत आहे. आजच्या आधुनिक शिक्षित समाजालाही जे पटत नाही ते पटवून देण्याचे कार्य सत्यशोधक समाज करीत आहे. त्यासाठी 'जलसा' सारख्या लोककलेचा वापर केला. आजच्या आधुनिक शिक्षित समाजाला जे पटत नाही ते तत्कालीन समाजाला पटवून सांगितले. भारतीय समाज २१ व्या शतकातही हया गोष्टी स्वीकारत नाही. याचे उदा. म्हणजे नरेंद्र दाभोळकर, गोविंद पानसरे व कुलबुर्गी यांच्या हत्येने स्पष्ट होते. त्यामुळे १९ व्या शतकात होऊन गेलेल्या हया महामानवांचा आदर्श आजच्या इंटरनेटच्या युगात स्वतःला विज्ञानयुगी म्हणविणाऱ्या नेत्यांनी व समाजाने घेतले पाहिजे.

सत्यशोधक केशवराव विचारे व ज्योत्याजीराव फाळके यांचे कार्य ॲड. वसंतराव फाळके यांनी सुरू केलेल्या चळवळीला व त्यांच्या विचारांची परंपरा जपून आधुनिक महाराष्ट्रातील सामाजिक जडणघडण आणि पुनर्घटनाचे कार्य चालू ठेवले असून गुरूवर्य केशवराव विचारे यांनी सुरू केलेल्या सामाजिक प्रबोधनच्या कार्याला अखंडपणे जपले आहे. त्यांच्यानंतर त्यांच्या कार्याचा वारसा चालविल्यामुळे त्यांनी सुरू केलेल्या कार्याला आजतागायत पूर्णविराम मिळालेला नाही. त्यामुळे सातारा जिल्हा आजही सामाजिक व शैक्षणिकदृष्टया पुढारलेला जिल्हा म्हणून ओळखला जातो.

### ३.१५ करमणूकीसाठीचे खेळ

कोरेगाव तालुक्यातील लोकांना खेळांची पूर्वीपासून आवड होती. स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतर येथील उच्च वर्गीय प्रौढ लोकांना बुद्धीबळ, फासे, गंजिफा व सोंगटया यासारखे खेळ आवडत असत. मुलांना विटी–दांडू, लगोऱ्या आणि मुलींना झिम्मा, फुगडी, लंगडी हा खेळांची आवड होती. सामान्य मुलं खो–खो, कबड्डी, सुर–पारंब्या, क्रिकेट, आणि मुली आटयापाटया, आंधळी कोशिंबीर वगैरे खेळ खेळत असत.

कोरेगाव तालुक्यात यात्रेप्रसंगी कुस्ती, बैलगाडयांची शर्यत, कोंबडयांची झुंज यासारखे खेळ खेळले जात असत. यासाठी प्रत्येक गावागावात चुरस असे. व श्रीमंत लोक हे छंद जोपासत असत. कोरेगाव तालुक्यात अनेक कुस्तीगीर मल्ल झालेले आपणास पहावयास मिळतात. गुरूवर्य केशवराव विचारे आणि ज्योत्याजीराव फाळके यांची मैत्रीही कुस्तीच्या

माध्यामातून झालेली दिसून येते. गुरूवर्य केशवराव विचारे यांची बदली सातारारोडला स्टेशन मास्तर झाल्यानंतर त्यांचा तालमीत जाण्याचा व तेथील मुलांबरोबर मैत्री करण्याच्या छंदामुळे केशवरावांची मैत्री ज्योत्याजीराव फाळके यांच्याशी झाली.[८६] विविध शाळा महाविद्यालयातून यासारख्या खेळात विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पदक जिंकलेले आहेत. उदा. देऊर येथील श्री मुधाईदेवी मंदिरातील विद्यार्थीनी कु. सुरेखा कदम महाराष्ट्र राज्याच्या कबड्डी संघातून १९७८ साली उपकप्तान म्हणून खेळली.[८७]

तसेच लेझीम या खेळातही कोरेगाव तालुक्यातील विद्यार्थ्यांनी आपला ठसा उमटवलेला दिसून येतो. आजही खो–खो, कबड्डी, कुस्ती, भारतीय व्यायामदर्शन मल्लखांब व लेझीम यासारखे खेळ यात्रा व इतर प्रसंगी खेळले जातात. अलिकडील काळात क्रिकेट हा खेळ अधिक प्रसिद्ध झालेला दिसून येतो.

## ३.१६ कोरेगाव तालुक्याची इतर तालुक्यांशी तुलना

कराड व वाई तालुक्यातील सामाजिक लोकजीवन हे प्राचीन काळापासून चालत आलेल्या परंपरा, धार्मिक समजूती यावरच आधारलेले आहे. यात काळानुसार बदल झालेला आहे. त्याचप्रमाणे कोरेगाव तालुक्यातील लोकजीवनही यावरच आधारलेले आहे. कराड व वाई तालुक्यातील समाजातही परिवर्तन घडवून आणण्यासाठी तेथील सामाजिक संस्थेच्या कार्यकर्त्यांनी फार मोठया प्रमाणावर प्रयत्न केलेले दिसून येतात.[८८] वाई व कराड तालुक्याप्रमाणेच कोरेगाव तालुक्यातील शिक्षणक्षेत्रात सतत प्रगती होत होती. पूर्वप्राथमिक व पाथमिक शाळा, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालयीन शाळा असून विद्यार्थ्यांना ज्ञानदान चांगल्या प्रकारे होण्यास मदत होते. शाळा व विद्यार्थी यांचे प्रमाण काळाप्रमाणे वाढत गेल्याचे दिसते. शाळामधून विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न सुरू होते.

कराड व वाई तालुक्यातही शैक्षणिक सुधारणा मोठया प्रमाणावर झालेल्या दिसून येतात. परंतु या दोन तालुक्याच्या तुलनेत वाई तालुक्यात प्राज्ञपाठशाळेने संस्कृत व शास्त्र शिक्षणाबरोबरच आधुनिक शिक्षण दिल्याने फार मोठी प्रगती झालेली दिसून येते. तसेच वाई येथे स्वातंत्र्योत्तर काळात अनेक शैक्षणिक संस्थांनी आपापल्यापरीने प्रगती केलेली दिसून येते.

त्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात वाई शहर कोरेगाव तालुक्यापेक्षा प्रगतीपथावर होते हे स्पष्ट होते. तसेच समाजिक चववळीही झालेल्या आढळतात.[८९]

### ३.१७ समारोप

कोरेगाव तालुक्याला छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा लाभलेला आहे. कोरेगाव तालुक्यातील समाजजीवन प्राचीन काळापासून प्रगत असे आहे. कोरेगाव तालुक्यातील समाज जीवनामध्ये अनेक जाती धर्माच्या लोकांचा समावेश होता व आहे. येथील लोकांचा आहार, निवास व्यवस्था, भाषा व संस्कृती म्हणजे चालीरिती, रूढी–परंपरा प्रगत होत्या. येथील समाजात स्त्रियांना सन्मानाचे स्थान होते. हिंदू धर्मातील लोक अधिक प्रमाणात राहत असले तरी यात ब्राह्मण, मराठा, कुणबी, अस्पृश्य, बलुतेदार आणि अलुतेदारांचा अशा विविध जातींचा भरणा आहे. असे असूनही हया लोकांमध्ये ऐक्याची भावना दिसून येते. आपल्या राज्याप्रती व राजाप्रती निष्ठा दिसून येते. या भागातील लोक विविध सण–उत्सव साजरे करणारे व विविध देवतांना मानणारे असून यांच्या सामाजिक परंपराही भिन्न–भिन्न असलेल्या आढळून येतात. तरीही यांच्यात सौहार्द आहे. हिंदू धर्माव्यतिरिक्त अन्य धर्म अल्प प्रमाणात आहेत. हिंदू धर्मानंतर मुस्लिम धर्म मोठा आहे. परंतु शिवकाळापासून हिंदू–मुस्लिम गुण्यागोविंदाने राहत असलेले दिसून येतात. येथील बरेचसे मुस्लिम मराठी भाषा बोलणारे असून हिंदूंच्या सण–उत्सवात सहभागी होतात. तसेच हिंदूही मुस्लिमांच्या उत्सवात सहभागी होतात.

तालुक्यात अंधश्रद्धा व जातीयता होती. अंधश्रद्धा व जातीयता दूर करण्यासाठी किंवा समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी सत्यशोधक समाजातील गुरूवर्य केशवराव विचारे व ज्योत्याजीराव फाळके यांनी कोरेगाव तालुक्यात सुरू केलेल्या सामाजिक प्रबोधनच्या चळवळीला येथील जनतेने पाठिंबा दर्शविला आहे. सत्यशोधकांनी अंधश्रद्धा निर्मूलनासाठी अनेक उपक्रम राबविले होते. त्यांनी कॉरस्पॉन्डन्ट विद्यार्थी संघ काढला. त्याद्वारे लोकांना सत्यशोधक समाजाचे तत्त्वज्ञान सांगितले. रात्रशाळा काढून प्रौढ शिक्षणाचा आदर्श उपक्रम राबविला. कोरेगाव तालुक्यातील सातारारोड व पाडळी, कोलवडी, पळशी, यासारख्या ग्रामीण भागात म. फुले आणि त्यांच्या सत्यशोधक समाजाचे लोण पसरविण्याचे कार्य केले. खेडोपाडी शिबीरे व व्याख्याने घेऊन खेडयापाडयातील गरीब लोकांना म. फुलेंचे तत्त्वज्ञान साध्या व सोप्या भाषेत समजावून सांगण्याचे महत्त्वाचे कार्य सत्यशोधक समाजातील या सत्यशोधकांनी

केले. त्यांच्यानंतर आज तागायत पूर्णविराम मिळालेला नाही. त्यांच्या पश्चात ॲड्. वसंतराव फाळके यांनी त्यांच्या विचारांची परंपरा जपलेली आहे.

## संदर्भ


१. पाठक अरूणचंद्र (संपा.), 'महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सातारा जिल्हा', सुधारित आवृत्ती, १९९९, पृ. २४३–२४४

2. Censes of India 1991, Series 14, Maharashtra, Part-2, 1, Primary Censes Abstract, General Population, Page No. 10

३. मुलाखत– प्रा.डफळे विजय, रहिमतपूर, दि. १०.१२.२०१५, स्थळ : रहिमतपूर, वेळ : सायं. ६ वा.

४. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. २५१

५. कित्ता, पृ. २४४

६. पाठक अरूणचंद्र (संपा.), 'महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सातारा जिल्हा', सुधारित आवृत्ती, २०१२, पृ. २४५

७. कित्ता, पृ. २४६

८. मुलाखत–जंगम, देऊर, दि. ३०.०२.२०१५, स्थळ : देऊर, वेळ : सायं. ४ वा.

९. गायधनी रं. ना. व राहुरकर व. ग., प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९५५, पृ.१५६

१०. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. २४७

११. गुंदेकर श्रीराम, सत्यशोधकी साहित्याचा इतिहास खंड–१, सत्यशोधकी साहित्य प्रकाशन, मे २०१०, पृ. २०९

१२. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. ३०१

१३. उपाध्ये महादेव चिंतामण व बहुलेकर बाळसाहेब, आपला सातारा, मावळा प्रकाशन, मार्च १९९४, पृ. १५५

१४. पाटील शालिनीताई, स्वयंसिद्धा, चंद्रकांत पाटील प्रतिष्ठान, साताररोड, सप्टे.२००३, पृ. १७–१८

१५. साळुंखे आ. ह., हिंदू संस्कृती आणि स्त्री, लोक वाङ्मयगृह प्रकाशन, फेब्रु.२०११, पृ.७४

१६. खंडागळे चंद्रकांत, भारतीय समाज, खंडागळे प्रकाशन, सांगली, जुलै १९९८, पृ.

१३३–१३४
१७. काळदाते सुधा, भारतीय समाजरचना, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, औरंगाबाद, १९७६, पृ. १९०
१८. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. २८२–८३
१९. जोशी महादेवशास्त्री (संपा.) भारतीय संस्कृतिकोश खंड ३, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे पृ. ४०२
२०. कुलकर्णी अ. रा., खरे ग. ह., मराठयांचा इतिहास खंड १, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८५, पृ. ४१०
२१. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. २८७–२८९
२२. मुलाखत–भारती चंद्रशेखर, भाडळे दि. २५.३.२०१५, स्थळ : भाडळे, वेळ : सायं. ७ वा.
२३. मुलाखत–गिरी बापू , पंढरपूर, दि. ३०.०३.२०१५, स्थळ : पंढरपूर, वेळ : सायं. ४ वा.
२४. आत्रे त्रिंबक, गावगाडा, नाग नालंदा प्रकाशन, इस्लामपूर, २०११, पृ. ११०
२५. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. २७७
२६. कित्ता, पृ. २७९
२७. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. २९५, २९६
२८. काळदाते सुधा, उपरोक्त, पृ. १२
२९. पानसे मु.ग., यादवकालीन महाराष्ट्र, मुंबई, १९६६, पृ. १५
३०. कित्ता, पृ. ६०
३१. जोशी सु.ह., महाराष्ट्र दर्शन, समाजदर्शन, पुणे १९८६, पृ. ४५
३२. आत्रे त्रिंबक नारायण, गावगाडा, नागनालंदा प्रकाशन, इस्लामपूर, २०११, पृ. १०८
३३. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. २९१ व २९२
३४. शेणोलीकर ह. श्री., देशपांडे प्र. न., महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९७२, पृ. २८२
३५. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. २७५

३६. पानसे मु. ग., उपरोक्त, पृ. ११०

३७. आत्रे त्रिंबक नारायण, उपरोक्त, पृ. १०९

३८. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. २९४ व २९५

३९. कित्ता, पृ. २५६

४०. पेशवेदप्तर सा. प. लेख–७५, पृ. १७

४१. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. २८१

४२. आत्रे त्रिंबक नारायण, उपरोक्त, पृ. ११०

४३. केतकर श्री. व्य., महाराष्ट्रीय ज्ञानकोश, नागपूर, विभाग २१, पृ. ११०

४४. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. २९१

४५. शेणोलीकर ह. श्री., देशपांडे प्र. न., उपरोक्त, पृ. २८१

46. Censes of India 1991, Series 14, Maharashtra, Part-2, 1, Primary Censes Abstract, General Population, P. 302 to 312

47. Censes of India 1991, Series 14, Maharashtra, Part-4, 2, Religion, (Table C-9), P. 127 to 132

४८. माटे गो. रा., असा घडला सातारा जिल्हा, १९८८, पृ. ७०

४९. कुलकर्णी पी. के., भारतातील धर्म, विद्याभारती प्रकाशन, लातूर, पृ. १६२

५०. कित्ता, पृ. १६३

51. Gazetter Of  Satara District, 1885, P. 135-136

५२. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. २७६

५३. कित्ता, पृ. ३००, ३०१

५४. चव्हाण रा. ना. (संपा. गुजर जयवंत), सत्यशोधक परिषद उगम व विकास सत्यशोधक समाज प्रबोधन पत्रिका, १९९०

५५. कीर धनंजय, महात्मा जोतीराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९६ पृ. १४४

५६. सत्यशोधक नामावली (संपा. गुजर जयवंत), सत्यशोधक समाज प्रबोधन पत्रिका १९९०

५७. नलावडे उज्वला, सत्यशोधकाची संक्षिप्त गाथा, अजिंक्य सहकारी मुद्रणालय, सातारा

पृ. २०, २१

५८. गुजर जयवंत, जगावेगळा सत्यशोधक गुरूवर्य केशवराव विचारे, विचारे फार्मस् प्रा. लि. इदगाव, ठाणे, २००४, पृ. ४३

५९. नलावडे उज्वला, उपरोक्त, पृ. २२, २३

६०. सुर्यवंशी राजाराम, सत्यशोधक समाजवादी गुरूवर्य केशवराव विचारे, सत्यशोधक छत्रपती ज्ञानपीठ, देवपूर–धुळे, पृ. १७

६१. गुजर जयवंत, उपरोक्त, पृ. ६९–७०

६२. बागल माधवराव, केशवराव विचारे बहुजन समाजाचे शिल्पकार, श्री. लेखन वाचन भांडार, पुणे, १९६६, पृ. १६

६३. मुलाखत–गुरूवर्य केशवराव विचारे यांचे नातू श्री.सुबोध भरतराव विचारे दि. २७.०९.२०१५, स्थळ : सातारारोड पाडळी, वेळ : सायं. ७ वा.

६४. सत्यशोधक विद्यार्थी संघ–प्रतिज्ञा पत्र, १९५१, पृ. १–४

६५. नरके हरी (संपा.) सत्यशोधक केशवराव विचारे समग्र वाङ्मय पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००० पृ. १५५

६६. मुलाखत–गुरूवर्य केशवराव विचारे यांचे नातू , उपरोक्त

६७. सत्यशोधक विद्यार्थी संघ कार्यक्रम पत्रिका, १९५१, पृ. १–४

६८. सुर्यवंशी राजाराम, उपरोक्त, पृ. १२८–१२९

६९. भोसले आशा (संपा.), कमंडलूचा माथा वसनेची गाथा, चौंडेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळ, रहिमतपूर, पृ. ०८

७०. गुजर जयवंत, उपरोक्त, पृ. ६९–७०

७१. मुलाखत– ॲड्. वसंतराव फाळके, दि. ०२.११.२०१५, स्थळ : सातारारोड पाडळी, वेळ : सायं. ६ वा.

७२. गुजर जयवंत, उपरोक्त, पृ. ७१–७२

७३. फाळके राजाराम बापू, केशवराव विचारे गुरूजी जीवन दर्शन, रामराव विचारे, सातारारोड, २००२, पृ. ७१

७४. भारतीय सत्यशोधक समाज घटना, प्रकाशक के. व्ही. विचारे, महाध्यक्ष, महाराष्ट्र

प्रिंटींग प्रेस, २०१ खेतवाडी मेन रोड, मुंबई ४, पृ.१–४

७५. भोसले आशा (संपा.), उपरोक्त, पृ. ०९

७६. बागल माधवराव, केशवराव विचारे बहुजन समाजाचे शिल्पकार, श्री.लेखन वाचन भांडार, पुणे, १९६६, पृ. १६

७७. सत्यशोधक विद्यार्थी संघ कार्यक्रम पत्रिका, उपरोक्त, पृ. १–४

७८. पाटील शालिनीताई, स्वयंसिद्धा, चंद्रकांत पाटील प्रतिष्ठान, सातारारोड, सप्टे., २००३, पृ. २२

७९. भोसले आशा (संपा.), उपरोक्त, पृ. ०९

८०. गुजर जयवंत, उपरोक्त, पृ. ७५

८१. भोसले आशा (संपा.), उपरोक्त, पृ. १२

८२. कित्ता, पृ. १२

८३. सुर्यवंशी राजाराम, सत्यशोधक समाजवादी गुरूवर्य केशवराव विचारे, उपरोक्त, पृ. १३०

८४. श्रीराम गुंदेकर, उपरोक्त, पृ. ४

८५. मुलाखत– ॲड्. वसंतराव फाळके, उपरोक्त

८६. गुजर जयवंत, उपरोक्त, पृ. ६९–७०

८७. कदम संभाजीराव (संपा.), श्री मुधाईदेवी शिक्षण संस्था, देऊर सुवर्णमहोत्सवी स्मरणिका, डिसें., २००५, पृ. ४०

८८. पाटील ए. जे. (डॉ.), कऱ्हाडचा इतिहास (सन १९५० ते २०००), पीएच. डी. अप्रकाशित शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०११

८९. कोरडे डी. डी. (डॉ.), वाई शहराचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास (१९०० ते २०००), पीएच. डी. अप्रकाशित शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१२

# प्रकरण चौथे

# कोरेगाव तालुक्याचा सांस्कृतिक इतिहास

## ४.१ प्रास्ताविक

छत्रपती शिवाजी महाराजांच्या तसेच विविध संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेले १७ व्या शतकातील सातारा हे ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा असणारे जिल्हा आहे. या जिल्हयात शंभू महादेव डोंगर श्रेणीचा दक्षिणेकडच्या कृष्णा खोऱ्यातील पूर्वेकडील भागातील कोरेगाव विभागात चंदनवंदन, कल्याणगड तर श्री चवणेश्वर मंदिर, श्री जरंडेश्वर देवस्थान, देऊर येथील श्री मुधाईदेवीचे मंदिर व विठ्ठल मंदिर, किन्हई येथील यमाई देवीचे मंदिर, चिमणगाव येथील काळेश्वर मंदिर, कोरेगाव येथील श्री केदारेश्वर मंदिर, तारगावजवळील बोरबन मंदिर ही कोरेगावातील मध्ययुगीन काळात निर्मिलेली विविध देवीदेवतांचे आखीव-रेखीव दगडात बांधलेली अतिशय सुबक अशी मंदिरे आहेत. यातील बरीचशी मंदिरे एखाद्या किल्यासारख्या असलेल्या डोंगरावर आहे. तसेच रयत शिक्षण संस्था, स्वामी विवेकानंद संस्था, कोरेगाव एज्युकेशन सोसायटी, पंचक्रोशी शिक्षण संस्था, रहिमतपूर श्री मुधाईदेवी शिक्षण संस्था इत्यादींनी सामाजिक बांधिलकीने परंपरा व आधुनिकता यांच्यातील समन्वय साधण्यासाठी केलेले सामाजिक कार्य व राबविलेली विविध उपक्रम यामुळे कोरेगाव तालुका वैशिष्टयपूर्ण बनला आहे.

कोरेगाव तालुका हा प्राचीन काळापासून विद्या आणि कला या क्षेत्रात अग्रेसर आहे. कोरेगाव तालुक्यात आपणास प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन काळातील अनेक मंदिरे, मूर्ती, घाट, भग्नावशेष व उद्याने इत्यादि शिल्पे तसेच रंगचित्र, वाद्य व संगीत या ललितकला आढळून येतात. कोरेगाव विभागातील मंदिरांनी सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक क्षेत्राची समाजाला विसर पडू दिली नाही. या परिसरातील गावांमध्ये आजही प्राचीन व मध्ययुगीन पध्दतीप्रमाणे रीतीरिवाज चालीरिती पाळल्या जातात. यात्रा, जत्रा, मंदिरातील पूजा-अर्चा नित्यनियमाने चालतात. आधुनिक काळात समाजात बदल झालेला दिसून येत असला तरी या मंदिरांनी धार्मिक संस्कृतीची जाण जागृतावस्थेत ठेवली आहे.

या प्रकरणाचे ग्राम पंचायतीतील नोंद, मंदिरे, मूर्ती, मध्ययुगीन भौतिक अवशेषांची प्रत्यक्ष पाहणी व निरीक्षण, मुलाखत, कोनशिला, महाराष्ट्र शासनामार्फत पर्यटन विकास कार्याच्या

योजनांचा अभ्यास इत्यादि प्राथमिक व इतर दुय्यम साधनांचा वापर करून ऐतिहासिक संशोधन पद्धतीनुसार लिखाण व समालोचन केलेले आहे.

## ४.२ कोरेगाव तालुक्यातील प्रसिद्ध मंदिरे

### ४.२.१ श्री क्षेत्र चवणेश्वर

कोरेगावाच्या उत्तर सीमेलगत उंच डोंगरावर चवणेश्वर येथे महादेवाचे मंदिर आहे. चवणेश्वर गावास प्राचीन काळापासूनचा इतिहास लाभला असून स्वातंञ्यानंतर १९८९ साली चवणेश्वर ग्रामपंचायतीची स्थापना करण्यात आली. हे मंदिर व गाव ज्या टेकडीवर आहे ती टेकडी चवण ऋषींच्या पदस्पर्शाने पावन झालेली आहे असे येथील लोकांमध्ये प्रचलित आहे. तसेच या मंदिराची स्थापना मध्ययुगीन काळामध्ये झालेली असल्याचे येथील अवशेषांवरून निदर्शनास येते. या ठिकाणी पूर्वीचे श्री शंभू महादेवाचे मंदिर, ज्याठिकाणी चवण ऋषींनी तपश्चर्या केली त्याठिकाणी असलेले चवणेश्वर मंदिर व काही अंतरावर असलेले केदारेश्वराचे मंदिर आहे. सांस्कृतिक दृष्टीने कोरेगाव तालुक्यातील श्री क्षेत्र चवणेश्वर मंदिराला अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झालेले आहे. या मंदिराला शासनाने 'क' वर्ग श्रेणी पर्यटन क्षेत्राचा दर्जा दिल्याने येथे सातारा, कोरेगाव, फलटण, वाई, पुणे व इतर भागातील भाविक दर्शनासाठी येत असतात. सांस्कृतिक दृष्टीने चवणेश्वर येथील या मंदिराला महत्त्वाचे स्थान आहे. कोरेगाव तालुक्यातील श्री क्षेत्र चवणेश्वराचा सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक इतिहास महत्त्वपूर्ण असा आहे.

#### ४.२.१.१ चवणेश्वर मंदिराचे स्थान व रचना :

महाराष्ट्रात गडकोट वैभव मोठया प्रमाणावर आहे. दक्षिण पठारावर निर्माण झालेल्या अवशेष टेकडया आणि त्यांना विभक्त करण्याऱ्या दऱ्या ही सातारा जिल्हयातील प्रमुख भुदृश्ये आहेत. त्यात १. सहयाद्री आणि त्याच्या शाखा २. शंभू महादेव डोंगररांग श्रेणी व तिच्या शाखा हे दोन मुख्य गिरीसमुह आहेत.[१] शंभू महादेव डोंगर श्रेणीचा दक्षिणेकडच्या कृष्णा खोऱ्यातील पूर्वेकडील भागात कोरेगाव विभागात चंदन, चवणेश्वर, हर्णेश्वर, कल्याणगड आणि जरांडा हया पाच टेकडया आहेत. खंबाटकीजवळील हरळी येथे सुरू होणारी व जरंडेश्वरपाशी संपणारी एक लांब डोंगररांग आहे. हया डोंगरांची उंची १०६० ते १२१२ मीटर आहे. हयापैकी नांदगिरी किल्ला साताऱ्यापासून ईशान्येश १९ कि.मी., चंदनवन हा किल्ला साताऱ्यापासून उत्तरेस २४ कि.मी.

आणि जरांडा सातान्यापासून पूर्वेस १३ कि.मी.अंतरावर आहेत.[२] तर चवणेश्वर कोरेगावपासून वायव्येला ३६ कि.मी.अंतरावर असलेल्या ३० हजार फूट उंचीच्या डोंगरात आहे.

### ४.२.१.२ चवणेश्वरकडे जाण्यासाठीचे मार्ग :

चवणेश्वरकडे जाण्यासाठी पुढील मार्ग आहे. पहिला मार्ग सातारा – शिवथर – पिंपोडे खु. – देऊर – वाठार – पिंपोडे बु.– सोनके –करंजखोप – चवणेश्वर असा आहे. दुसरा मार्ग कोरेगाव – सातारा रोड – पळशी – देऊर – वाठार – पिंपोडे बु.– सोनके –करंजखोप – चवणेश्वर असा आहे. असा आहे. तिसरा मार्ग वाई – ओझर्डे – सर्कलवाडी – वाघोली पिंपोडे बु.– सोनके –करंजखोप – चवणेश्वर या गावापासून आहे. तसेच पुण्याकडून राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ वरील वेळे घाटातून सोळशी करंजखोप चवणेश्वर असे जाता येते. पूर्वी पायथ्यापर्यंत आल्यानंतर मंदिराकडे जाण्यासाठी एक तास पायवाटेने डोंगर चढून वर जावे लागत असे. १९७४ नंतर गावाने श्रमदानातून ०४ कि.मी.अंतराचा घाट तयार केल्याने गावाला तसेच मंदिराकडे जाण्यासाठी भक्त व पर्यटकांना मार्ग मिळाला. तसेच १९७४ मध्ये दुष्काळ पडल्यानंतर गावाने निवडणुकीवर बहिष्कार टाकल्यानंतर श्री. शंकरराव जगताप यांनी रोजगार हमी योजनेतून गावांतर्गत रस्ते तयार केले.[३] अलिकडच्या काळात हा रस्ता वनविभागाच्या हद्दीत आल्याने या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम रखडले आहे. डांबरीकरणासाठी वनविभाग व केंद्र सरकारची परवानगी घेणे आवश्यक आहे.

### ४.२.१.३ चवणेश्वरच्या चवण ऋषींची आख्यायिका :

कोरेगाव तालुक्याच्या उत्तर सीमेला चवणेश्वर पर्वत आहे. हे पर्वत कोरेगावची उत्तरेकडील सिमा आहे. कोरेगाव शहराच्या वायव्येस ४३ कि. मी. अंतरावर गडवजा डोंगर आहे. याच्या माथ्यावर झाडी असल्याने त्या ठिकाणचे वातावरण अतिशय रमणीय असून येथे गाव वसलेले आहे. डोंगरावर सुमारे ९०० एकर सपाट भूभाग असून चवणेश्वराचे मंदिर आहे. चवणेश्वराबाबत अशी आख्यायिका आहे की, भृगू ऋषींना शुक्र व चवण नावाची दोन मुले होती. त्यातील चवण ऋषींनी या डोंगरावर शंकराची तपश्चर्या केली. ते तपश्चर्या करत असताना एक राजा त्या ठिकाणी शिकारीसाठी आला. त्याच्याबरोबर त्याची कन्या होती. ही राजकन्या जंगलातून फिरत असताना तिला वारूळातून दोन प्रकाश किरणे दिसली. राजकन्येने तेथे दोन बाण रोवले. ते बाण तपश्चर्येला बसलेल्या चवण ऋषींच्या डोळयात गेले. बाण डोळयात गेल्याने

चवण ऋषींची तपश्चर्या भंग होऊन त्यांची दृष्टीही गेली. त्यामुळे चवण ऋषी क्रोधीत झाले. चवण ऋषींच्या क्रोधामुळे परिसरात वादळ निर्माण झाल्याने राजाचे सैन्य सैरावैरा झाले. राजाला काही कळेनासे झाले. तेव्हा त्याने परिसरातून माहिती घेतली असता त्याला घडलेली घटना समजली. त्याने चवण ऋषींना आपल्या तंबूत बोलावले व त्यांची क्षमा मागितली तसेच त्यांना द्रव्य देण्याचे कबूल केले. परंतु चवण ऋषींनी राजाला सांगितले की, तुमच्या क्षमा मागण्याने अथवा द्रव्याने माझी भंग पावलेली तपश्चर्या व गेलेले डोळे परत येणार नाही. या वेळेला राजाची राजकन्या सुकन्या हिने चवण ऋषींना सांगितले की, माझ्यामुळे आपले डोळे गेले तेव्हा येथून पुढील आयुष्य मी तुमच्या सेवेत वाहीन. राजाने सुकन्येला यापासून परावृत्त करण्याचा खूप प्रयत्न केला परंतु तिने राजाचे म्हणणे ऐकले नाही. चवण ऋषींनीही सुकन्येची विनवणी ऐकली व पुन्हा १४ वर्षे तपश्चर्या केली. या चवण ऋषींच्या तपश्चर्येच्या काळात सुकन्या ऋषींबरोबर राहून तिने ऋषींची मनोभावे सेवा केली. तपश्चर्या पूर्ण झाल्यानंतर ऋषी तिला स्वतंत्र होण्यासाठी सांगितले. मात्र सुकन्या त्यास नकार देऊन ऋषींबरोबर राहणेच पसंत केले.

सुकन्येच्या निष्काम सेवेने श्री शंकर प्रसन्न होतात व तिची सत्वपरीक्षा घेण्यासाठी दोन दूत पाठवितात. ते दूत सुंदर राजकुमार वेषात येऊन वैरागी ऋषीबरोबर न राहता आमच्याशी विवाह कर अशी सुकन्येला मागणी घालतात. परंतु सुकन्या त्यांच्या मागणीला नाकारते. तेव्हा ते प्रसन्न होतात व ते चवण ऋषींचे डोळे पूर्ववत करतात. सुकन्येला फुलांची माळ देऊन चवण ऋषींना घालावयास सांगतात. ती जेव्हा चवण ऋषींना माळ घालण्यास येते तेव्हा ते दोघेही चवण ऋषीचे रूप घेतात. त्यामुळे सुकन्या संभ्रमात पडते. तिने डोळे मिटले व मनात विचार केला की, जर मी चवण ऋषींची निस्वार्थपणे सेवा केली असेल तर मी योग्य व्यक्तीस माळ घालेल. व त्याप्रमाणे ती चवण ऋषींना माळ घालते. देवांचे गुरू अश्विनीकुमार यांनी चवण ऋषींना चवणप्राश व कायाकल्प बनविण्याचे तंत्र सांगितले. त्याने चवण ऋषींचा कायाकल्प होऊन त्यांना पुन्हा तारूण्य प्राप्त झाले. या कायाकल्प होणाऱ्या आयुर्वेदीक औषधाला पुढील काळात च्यवन प्राश म्हणून ओळखले गेले.[४] चवण ऋषींची माहिती जॉन डॉसन यानेही आपल्या ग्रंथात दिलेली आहे. त्याने पुराणे, रामायण, महाभारत यात चवण ऋषींबद्दलची माहिती व त्यांनी तयार केलेल्या च्यवन प्राश संदर्भातील माहितीचे वर्णन आपल्या

ग्रंथात केलेले आहे.[५]

### ४.२.१.४ चवणेश्वर डोंगरावरील वास्तू

#### ४.२.१.४.१ चवणेश्वर मंदिर

घाट चढून वर गेल्यावर उजव्या बाजूला चवणेश्वराचे मंदिर आहे. मंदिराला सभामंडप असून आत मुख्य गाभारा आहे. मुख्य गाभाऱ्यात चवण ऋषी ज्या ठिकाणी तपश्चर्या करीत होते. त्या ठिकाणी शिवलिंगाची स्थापना करून मध्ययुगीन कालखंडात मंदिर बांधले गेले होते. कारण चवणेश्वर मंदिराच्या गाभाऱ्यात आजही हेमाडपंथी बांधणीचे खांब आहेत. मंदिराचा गाभारा जिर्णोद्धारावेळी गावकऱ्यांनी तसाच ठेवलेला आपल्याला पहावयास मिळतो. सभामंडपात ९. ७६ मी. X ९. ७६ मी. आकाराचा आर. सी. सी. आहे. मंदिराला भव्य कळस आहे. मंदिराच्या गाभाऱ्याचे बांधकाम बांधीव दगडात केलेले आहे.

सन २००२ मध्ये मध्ये मंदिराचा जीर्णोद्धारासाठी मा. जिल्हाधिकारीसाो.सातारा यांच्या आदेशानुसार मौजे चवणेश्वर येथे भाविकांसाठी व पर्यटन स्थळांचे बहुउद्देशीय हॉल बांधण्यासाठीचे आदेश देण्यात आले. त्यानुसार जि. प. दि. ०४.१०.२००६ रोजीच्या पत्रानुसार ९.७६ मी. X ९.७६ मी. आकाराचा आर. सी. सी. हॉल वीट बांधकाम आतून बाहेरून गिलाव व रंगकाम नामफलकासाठी ५.१० लाख रू. मंजूर करण्यात आले. या कामाचा मक्ता मक्तेदार अमोल जी. चंद, रा. लोणंद यांना मिळाला. त्यानुसार दि. १५.१०.२००६ रोजी भूमी पूजन करण्यात आले व दि. ०४.११.२००७ रोजी हॉलचे उद्‌घाटन करण्यात आले. या कामाबरोबरच मंदिराच्या गाभाऱ्याचे व कळसाचा जीर्णोद्धार करण्यासाठी दत्तात्रय रंगराव मुसळे यांच्या प्रेरणेने मधुकर रंगराव मुसळे यांनी संपूर्ण ग्रेनाईटचे काम पूर्ण केले. (रविवार दि. ०४.११.२००७). तसेच श्री. नरसिंग आनंदराव जाधव व सौ. पार्वती नरसिंग जाधव रा. गुळुंब या दाम्पत्याने मंदिराच्या संपूर्ण बांधकामासाठी स्टील (लोखंड) दिले.[६]

#### ४.२.१.४.२ चवणेश्वर मंदिरासमोरील मूर्ती व विरगळ यांचे अवशेष

याठिकाणी मूर्ती व वीरगळ भौतिक अवशेष आढळून येतात. या मूर्तीमध्ये प्रामुख्याने गज–लक्ष्मी, गणेश मूर्ती, शिवलिंग व वीरगळामध्ये अखंड आणि तुकडा, नदी इत्यादि अवशेष आहेत. या मंदिरातील या अवशेषांवरून हे मंदिर मध्ययुगीन काळातील असल्याने आढळून येते. बांधकामाचे निरीक्षण केले असता हे बांधकाम १२ ते १५ व्या शतकातील असावे असे वाटते.[७]

### ४.२.१.४.३ श्री महादेव मंदिर

ज्याठिकाणी चवणऋषींनी १२ वर्षे तपश्चर्या केली तेथे चवणेश्वर मंदिर आहे. तेथे श्री शंभू महादेवाची पिंड आहे. मंदिराचा बाहेर दगडात बनविलेला नंदी स्थित आहे व दीपमाळ बनविलेली आहे. तसेच चवणेश्वर मंदिराच्या शेजारी पूर्वीपासून जुने श्री महादेव मंदिर होते. ते मंदिर ढासळू लागले होते. तेव्हा ग्रामस्थानी व काही देणगीदारांनी एकत्र येऊन २८ एप्रिल, २००८ साली या मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम पूर्ण केले. याकामी महायोगी पं. पु. गगनगिरी महाराज व भक्त परिवार आणि श्री. मधुकर रंगराव मुसळे यांनी देणगी दिली.[८]

### ४.२.१.४.४ केदारेश्वर मंदिर

चवणेश्वर मंदिर व श्री महादेव मंदिर यांचेपासून साधारण दीड किलोमीट उत्तरेकडे गेल्यास आपणास हेमांडपंथी बांधकाम केलेले श्री केदारेश्वराचे मंदिर पहावयास मिळते. येथील मंदिर हे पूर्वीचेच असून याठिकाणी श्री शंभू महादेवाची पिंड, नंदी व मंदिराचे शिखर आपल्याला पहावयास मिळते.[९]

या मंदिराबद्दल अशी आख्यायिका आहे की, गुळुंब गावातील एक स्त्री दररोज सायंकाळी स्वयंपाक करून श्री केदारेश्वराला नैवेद्य दाखवित असे. ही सायंकाळी दररोज कुठे जाते याबद्दल तिच्या घरच्यांनी तिच्यावर संशय घेतला. व एकेदिवशी तिचा पाठलाग केला असता त्यांना सर्व हकीकत समजली. त्या स्त्रीच्या निष्काम भक्तीमुळे प्रसन्न होऊन श्री केदारेश्वरांनी तिला दृष्टांत दिला व वर मागावयास सांगितले. यावर तिने आपण माझ्या घरी यावे असे सांगितले. मी आपल्या घरी येणार परंतु आपण मागे वळून पाहायचे नाही असे सांगितले. गुळूंब येथे त्या स्त्रीने मागे वळून पाहिल्याने श्री केदारेश्वर परत माघारी फिरले. त्या स्त्रीने केलेल्या भक्तीमुळे तिचे मंदिर गुळूंब येथे बांधण्यात आलेले आहे. या मंदिराला सतीआईचे मंदिर असेही म्हणतात. व चवणेश्वराची यात्रा अश्विन महिन्याच्या चौथ्या रविवारी भरते त्यावेळी करंजखोप, रणदुल्लाबाद, वरकरवाडी, गुळूंब येथून काठया येतात त्यात पहिला मान गुळूंबच्या काठीला दिला जातो.[१०]

### ४.२.१.४.५ बारव व पाण्याचा तलाव

चवणेश्वर येथे पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून मंदिराच्या पुढे जुन्या पद्धतीने आखीव दगडात बांधलेला बारव अर्थात विहीर आहे. १९७२ साली गावाच्या पिण्याच्या पाण्याची

सोय व्हावी म्हणून तळे व विहीर बांधण्यात आली.[११]

### ४.२.१.४.६ शेती

हे मंदिर डोंगरावर असून येथील वातावरण अतिशय रमणीय आहे. डोंगरावर मंदिराबरोबरच फार पूर्वीपासून गाव वसलेले असून येथे राहण्याची सोय, पाण्याची सोय व शेती योग्य ९०० एकर जमीन आहे. गावाची लोकसंख्या ३०० असून येथे गहू, ज्वारी व बाजरी यासारखी पिके घेतली जातात. परंतु रान डुकरांचा उपद्रवामुळे गावकऱ्यांचे खुप नुकसान होत असते. त्याचबरोबर माकड, भेकड, सालिंदर, लांडगे, तरस, वाघ, सरडा व नाग यासारख्या प्राण्यांपासून शेतीला व लोकांच्या प्राणाला धोका संभवित असतो.[१२]

### ४.२.१.५ चवणेश्वर येथील यात्रा

श्री क्षेत्र चवणेश्वराची यात्रा अश्विन महिन्याच्या चौथ्या रविवारी भरते त्यावेळी करंजखोप, रणदुल्लाबाद, वरकरवाडी, गुळूंब येथून काठया येतात त्यात पहिला मान गुळूंबच्या काठीला दिला जातो. यात्रा दरवर्षी साधारण नोव्हेंबर महिन्यात भरते व त्यासाठी पुणे, वेळे, सोळशी, करंजखोप व कोरेगाव, सातारा येथील भाविक मोठया प्रमाणात यात्रेत हजर राहतात. या यात्रेवेळी नोव्हेंबर महिना असूनही येथील आंब्याला फळ येते व हया आंब्याचे पहिले फळ देवाला नैवेद्य म्हणून दाखविले जाते.[१३]

### ४.२.१.६ चवणेश्वर मंदिराचे सांस्कृतिक महत्त्व

जगात ख्रिश्चन, मुस्लिम, जैन, बौद्ध, शीख असे अनेक धर्म आहेत. प्रत्येक धर्माला स्थापन करणारा कोणीतरी प्रेषित आहे. प्रत्येक प्रेषिताने आपल्या धर्माला उपदेश केला ते त्या धर्माचे तत्वज्ञान म्हणून प्रसिद्ध आहे. मात्र हिंदू धर्माला कोणी प्रेषित नाही. सिंधू संस्कृतीनंतर आर्यांचे आक्रमण भारत देशावर झाले. त्यांनी अनार्यांना पराभूत करून आपली संस्कृती भारतात निर्माण केली. आर्यांनी ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद मांडले. त्यानंतर ब्राह्मणे, अरण्यके, उपनिषधे व त्यानंतर १८ पुराणे निर्माण झाली. रामायण आणि महाभारत ही महाकाव्ये भारतीय संस्कृतीचे मार्गदर्शक आहेत. गेल्या अनेक शतकांपासून भारतीय हिंदू समाज याच्यावर आपली श्रद्धा ठेऊन जीवन जगत आहे. यातून भारतीय समाजामध्ये अनेक रूढी–परंपरा, कर्मकांड, आचार–विचार निर्माण झाले.[१४] या प्रथा परंपरेत अनेक गोष्टी हया शास्त्रीय आधारावर असलेल्या आपणास पहावयास मिळतात. उदा. मंदिर डोंगरावर बांधल्याने

मंदिरात जाण्यासाठी माणसाला डोंगर चढून जावे लागते. ते त्याच्या आरोग्यासाठी चांगले असते. देवपूजा करण्यासाठी माणसाला पहाटे लवकर उठावे लागते. त्यासाठी तो सायंकाळी लवकर झोपतो. मंत्रपठण केल्याने माणसाची बुद्धी तल्लख बनते. आरती, भजन, पूजा याने माणसाचे मन प्रसन होते. देवावर श्रद्धा असणारा मनुष्य शक्यतो कुकर्म करत नाही. निराशा आल्यावर देवावर श्रद्धा ठेवून आशेने जीवन जगत असतो. मात्र या अनेक ठिकाणातील कथांमध्ये साम्य आढळून येते. त्यामुळे त्यांची विश्वासार्हता राहत नाही. तो एक श्रद्धेचा भाग म्हणून समाजात रूढ राहतो. समाजही त्यातील सत्यासत्यता पडताळून पाहत नाही.

चवणेश्वर येथील श्री महादेव देवस्थान परिसरातील लोकांना जगण्याचे बळ देत असते. जीवनातील विविध समस्यांना सामोरे जाण्याचे सामर्थ्य निर्माण करत असते. दुष्काळी व डोंगराळ भागात प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देण्याचे बळ देत असते. थोडक्यात चवणेश्वर येथील देवस्थान समाजाला प्रतिकूल परिस्थितीशी लढण्याचे सामर्थ्य देऊन एकविसाव्या शतकात मानव भौतिकतेच्या आहारी जाऊन आपली संस्कृती विसरत चालला आहे, अशा वेळी भक्तीना मनस्वी आनंद देणारे हे संस्कृतीचे एक केंद्र आहे.

### ४.२.२ किन्हई देवस्थान

कोरेगावात विभागातील बरीचशी मंदिरे किल्ल्यासारख्या असलेल्या डोंगरावर आहेत. सांस्कृतिक दृष्टिकोनातून माहिती पाहत असताना वसना नदीच्या उपनदीकाठी वसलेल्या किन्हई गावाने कोरेगाव तालुक्याच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक व धार्मिक इतिहासात मोलाची भर घातली आहे. यामध्ये किन्हई येथील यमाई देवीचे मंदिर व किन्हई गावास छत्रपती राजारामांच्या काळापासूनचा इतिहास लाभलेला आहे. किन्हई येथील मंदिर एका टेकडीवर बांधलेले असून ते एखाद्या किल्यासारखे आहे. हे मंदिर मध्ययुगीन काळात रेखीव दगडात बांधलेले अतिशय सुबक असे हेमाडपंथी मंदिरे आहे. या मंदिराला श्री क्षेत्र साखरगड निवासिनी देवी देवस्थान, किन्हई असे नाव आहे. या देवीच्या नावाने मंदिराला साखरगड असेही म्हणतात.

#### ४.२.२.१ यमाई देवीच्या मंदिराचे स्थान व रचना :

कोरेगावपासून उत्तरेला १६ कि. मी. अंतरावर किन्हई देवस्थान आहे. कोरेगाव तालुक्याच्या उत्तरेला किन्हई देवस्थान पर्वत आहे. किन्हई गावाच्या अग्रेयेस असलेल्या

टेकडयापैकी पूर्वेकडील टेकडीवर पंतप्रतिनिधींची कुलदेवता यमाई (यम्माई) देवीचे मंदिर आहे. या मंदिराला श्री क्षेत्र साखरगड निवासिनी देवी देवस्थान, किन्हई असेही म्हणतात. या देवीच्या नावाने मंदिराला साखरगड असेही म्हणतात. शके १६४८ कार्तिक (ऑक्टो., १७२६) मध्ये देवीच्या देवालयाची निर्मिती झालेली आहे.[१५] म्हणजेच या मंदिराची बांधणी २९० वर्षापूर्वीची आहे. मंदिराकडे जाण्यासाठी सरळ रस्ता आहे. टेकडीच्या पायथ्यापासून मंदिराच्या प्रवेशद्वारापर्यंत ४४२ दगडी पायऱ्या बांधलेल्या आहेत.[१६]

### ४.२.२.२ तटबंदी

डोंगर चढून यमाई देवीचे मंदिरावर गेल्यावर चोहोबाजूंनी तटबंदी बांधलेली आहे. तटबंदी बांधण्याचे कारण म्हणजे मुस्लिम आक्रमकांचे आक्रमणापासून मंदिरांचे संरक्षण करणे हे होते. तसेच शत्रूवर तोफांचा मारा करण्यासाठीही या तटबंदीचा उपयोग होत होता. याचबरोबर बंदूकांच्या मारा करण्यासाठी खाचासुद्धा याठिकाणच्या तटबंदीत आजही पहावयास मिळतात. थोडक्यात संरक्षणाच्या दृष्टीने भक्कम तटबंदी बांधलेली आहे.[१७]

### ४.२.२.३ मंदिराची रचना

मंदिराला भव्य शिखर असून मुख्य गाभारा हा चौकोनी असून पितळी मुखवटा असलेली देवीची मूर्ती आहे. मूर्ती दागिन्यांनी मढविलेली असून मूर्तीवर पडणारा प्रकाश परावर्तित होण्यासाठी दागिन्यात काचेचा वापर केलेला आहे. तसेच लाकडी मंडप आहे. मंदिराच्या डाव्या बाजूच्या छताजवळ लहान प्रवेशद्वाराच्या उत्तेरस दोन्ही बाजूला चार विशाल दीपमाळा आहेत. एका दीपमाळेवर दोनदा वीज पडून पडझड झाल्याने ती पुन्हा बांधण्यात आली. परंतु तिच्यावर तिसऱ्यांदा वीज पडली तेव्हा तो अपशकून समजण्यात आला.[१८] मंदिराचे बांधकाम हेमाडपंथी वास्तूशास्त्राप्रमाणे आहे. मंदिराच्या घुमट, शिखर व सज्जालासुद्धा मुस्लिम स्थापत्यकलेचा प्रभाव असलेला दिसून येतो. मुस्लिम आक्रमकांपासून मंदिर वाचावे यासाठी मंदिराच्या स्थापत्यकलेत मुस्लिम स्थापत्याचा वापर केला असावा.[१९]

### ४.२.२.४ मंदिराचे नूतनीकरण

अलिकडील काळात सन २०१३–२०१४ मध्ये या मंदिराच्या नूतनीकरणाचे काम करण्यात आले. या कामासाठी मूळचे किन्हईचे असलेले व सध्या अमेरिकेत स्थायिक असलेले श्री. सतीश वामुदेव कुलकर्णी, श्री. श्रीरंग वामुदेव कुलकर्णी, श्री. मुकूंद वामुदेव कुलकर्णी व

त्यांची बहीण मृणालिनी सामंत यांनी ६० लाख रूपये खर्च करून मंदिराचे नूतनीकरणाचे काम पूर्ण केले. या कामाचे वैशिष्टय असे आहे की, बांधकाम पूर्वीच्या स्थापत्यकलेनुसार केलेले असून आधुनिक फरशा, टाईल्स, सिमेंट, रंग यांचा कुठेही वापर केलेला नाही. त्यामुळे मंदिराचे प्राचीनत्व टिकून राहिले आहे. या मंदिराच्या बांधकामास २८ फेब्रुवारी, २०१५ रोजी पुणे येथे युनेस्कोचे प्रतिनिधी श्री. मोईचिबा (जपानी) यांच्या हस्ते 'बेस्ट रिनोवेशन वर्क – २०१४' चा पुरस्कार मिळालेला आहे.[२०]

### ४.२.२.५ जमादारखाना–

पावसाळयात साहित्य, बेजमी म्हणजे देवीच्या अंगावरील सोने नाणे ठेवण्यासाठी जमादारखाना बांधलेला आहे. यात देवीचे दागिने ठेवलेले असत. याच्या संरक्षणासाठी गडावर दोन कमानी आहेत. या कमानीत रामोशी समाजात रक्षक मंदिराच्या संरक्षणासाठी तैनात असत.[२१]

### ४.२.२.६ किन्हईच्या कुलकर्णींचा इतिहास

छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात सर्जाखानाने सातारचा किल्ला घेण्याचे ठरविले. त्यावेळी शंकराजी नारायण, रामचंद्रपंत अमात्य, संताजी व धनाजी यांनी बादशहाला यश मिळू दिले नाही. याच काळात कोरेगाव तालुक्यातील नांदगिरीजवळील किन्हई गावचा परशुराम त्रिंबक हा सरदार म्हणून प्रसिद्धीस आला होता. माधवराव व परशुराम हे दोघे किन्हई गावचे कुलकर्णी होते. रामचंद्रपंत अमात्याच्या तालमीत परशुरामपंत तयार झाला होता. युद्धात पराक्रम गाजविल्यामुळे 'सुभालष्कर' व 'समशेरजंग' हे किताब व पुढे प्रतिनिधी, प्रधान व अमात्य अशी पदे त्यास मिळत गेली. परशुरामपंताचा पहिला पराक्रम पन्हाळा किल्ला परत मिळविण्यात दिसून येतो. परशुरामपंताने बादशहाकडे नोकरी करणाऱ्या मराठा सरदारांची मने वळवून व त्यांना नवीन वतने देऊन स्वराज्यात आणण्याचे फार मोठया प्रमाणावर प्रयत्न केले होते. उदा. फलटणच्या अमृतराव निंबाळकर व म्हसवडचा नागोजी माने.[२२] पुढील काळात त्याच्या कामगिरीवर खुश होऊन राजाराम महाराजांनी त्यास प्रतिनिधी पद दिले. ते पंतप्रतिनिधी म्हणून नावारूपास आले. इ. स. १७१० मध्ये अल्पकाळ त्यांना पेशवेपद मिळाले होते.[२३] पुढे त्यांनी औंध संस्थानाची स्थापना केली व पंतप्रतिनिधी औंधमध्ये स्थायिक झाले. स्वातंत्र्यानंतर औंध संस्थान विलीन झाल्यावर किन्हईचा कोरेगाव तालुक्यात समावेश करण्यात आला. पंत

प्रतिनिधींचा वाडा आजही गावात असून तो सुंदर व मजबूत आहे.[२४]

### ४.२.२.७ ट्रस्ट

औंधचे पंतप्रतिनिधी यांच्या अखत्यारीत हे मंदिर आहे. पब्लिक ट्रस्ट, औंध यांच्या नियंत्रणात १६ ते १७ देवस्थाने आहेत. त्यात एकविरा, राम, माहुली यासारखी मंदिरे आहेत.

### ४.२.२.८ किन्हईच्या यमाई देवीची आख्यायिका

किन्हईच्या उत्तरेला हिवरे नावाचे गाव आहे तेथील त्र्यंबकपंत कुलकर्णी दररोज खटाव तालुक्यातील औंधला यमाई देवीच्या दर्शनाला जात असत. यमाई देवीस बोलीभाषेत अंबाबाई असेही म्हटले जाते. त्र्यंबकपंत सलग १२ वर्षे देवीच्या दर्शनाला जात असत. तेव्हा देवीने आपल्या भक्ताची परीक्षा घेण्याचे ठरविले. त्यांच्या घरी त्यांची पत्नी गर्भवती होती व त्यांचे बाळंतपण करणारे दुसरे कोणीही नव्हते. त्यांच्या पत्नीने त्यांना सांगितले की, अडचण असल्याने बाळंतपण होईपर्यंत आपण देवीच्या दर्शनाला जाऊ नये. तेव्हा पंतांनी आपल्या पत्नीला मी माझा सलग १२ वर्षाचा नियम मोडणार नाही असे सांगून ते देवीच्या दर्शनाला गेले. त्यांनी औंधला जाऊन देवीची प्रार्थना केली की मी इथेच थांबणार माझ्या पत्नीचे बाळंतपण पार पाडण्याची जबाबदारी देवीने घ्यावी. ते तेथेच १५ दिवस थांबले. १५ दिवसानंतर ते जेव्हा आपल्या गावी आले तेव्हा बाळ व बाळंतीण सुखरूप होते. त्यांनी आपल्या पत्नीला विचारले असता त्यांनी सांगितले की, दूरच्या नात्यातील बहिणीने माझे बाळंतपण केले. पंतांनी विचारले बहीण कुठे आहे. त्यावर पत्नी म्हणाली की धुणभांडी करण्याकरीता नदीवर गेली आहे. पंत नदीवर पहावयास गेले असता तेथे भांडी व कपडे होती मात्र कुणीही व्यक्ती तेथे नव्हती. तेव्हा पंतांच्या लक्षात आले की दूरची बहीण दुसरे–तिसरे कोणीही नसून देवीने बहीणीचे रूप घेऊन आपल्या पत्नीचे बाळंतपण पार पाडले. देवीने भक्ताच्या संकटाची जबाबदारी घेऊन त्याला संकटातून बाहेर काढले. त्यानंतर ते औंधला गेले. तेथे जाऊन त्यांनी देवीची प्रार्थना केली. आपण माझ्या पत्नीला दर्शन दिले तसे दर्शन अजून मला घडले नाही. मला दर्शन द्यावे. देवीने प्रसन होऊन पंतांना साक्षात्कार दिला व सांगितले की, ‘मी तुझ्यावर प्रसन्न आहे तू वर माग’. पंतांनी सांगितले मला पैसा–अडका, सोने–चांदी बाकी काहीही नको तुम्ही माझ्या घरी येऊन देव्हाऱ्यात वास करावा. देवीने मी तुमच्याबरोबर येते म्हणून सांगितले. मात्र वाटेत कुठेही मागे वळून न पाहण्याची अट घातली. कोरेगावपासून पुढे आल्यानंतर देवीचे अस्तित्व नसल्यासारखे

जाणवले म्हणून कुलकर्णी यांनी मागे पाहिले. तेथेच देवी लुप्त झाली. परत कुलकर्णी औंधले गेले. देवीने सांगितले तुम्ही अट पूर्ण केलेली नाही त्यामुळे मी तुझ्या घरी येणार नाही पण मी किन्हई गावाजवळच्या डोंगरावर वास्तव्य करीन. जेथे वनगाय स्वतःच्या धारा सोडेल तेथे माझे अस्तित्व आहे. तेथेच माझी पूजा कर. गडावर आज ज्याठिकाणी मूर्ती आहे त्याच्यासमोर स्वयंभू स्थान आहे.

या देवीला साखरगड निवासिनी म्हणतात याचीही आख्यायिका आहे. एक व्यापारी साखर भरून रस्त्याने जात होता. देवीने त्याची परीक्षा घेण्यासाठी भिल्लीणीचे रूप घेतले व त्याला विचारले की, काय आहे या पोत्यात? त्या व्यापाऱ्याने उत्तर दिले की मी मीठ घेऊन जात आहे. घरी येऊन त्याने पाहिले तर पोत्यात मीठ होते. आपण खोटे बोललो ही चूक त्याच्या लक्षात आली. त्याने देवीची माफी मागितल्यावर पुन्हा मिठाची साखर झाली. तेव्हापासून साखरगड निवासिनी असे देवीला म्हटले जाते.

### ४.२.२.९ यमाई देवीचे नैमित्तिक पूजाविधी व यात्रा उत्सव

#### ४.२.२.९.१ उपासनेचा दिवस व नामजप

मंगळवार हा देवीचा उपासनेचा दिवस असून देवीला प्रसन्न करण्यासाठी ''श्री दुर्गे जय दुर्गे, जय जय दुर्गे '' असा नामजप केला जातो. रोज नित्यनियमाने देवीची पूजा–अर्चा, दुपारी नैवेद्य, आरती, मंत्रपुष्पाजली केली जाते. दर मंगळवारी देवीच्या पादुकांची मिरवणूक निघते. तसेच दर पौर्णिमेला देवीची मिरवणूक निघते. मध्ययुगीन काळापासून चालत आलेली ही सांस्कृतिक परंपरा आजही श्रद्धा व भक्तिभावाने पार पाडली जात आहे. यातूनच आपली भारतीय संस्कती टिकून आहे.

#### ४.२.२.९.२ यात्रा व उत्सव

अश्विन महिन्यात असणारे शारदीय नवरात्र आणि कार्तिक महिन्यात असणारी कार्तिक यात्रा हे येथील प्रमुख उत्सव आहेत. रोज अभिषेक, महापूजा, मंत्रपुष्प, दुपारी पालखी व मिरवणूक गडावरून निघते. सप्त शांतीपठण व होमहवन होतात. दुर्गाष्टमीला हार जागराचा कार्यक्रम होतो. पालखीपुढे सडा टाकतात. सुवासिनी देवीला ओवाळणी करतात. दुर्गाष्टमीला भोसले समाजाचे निशाण गडावर येते. दुर्गाष्टमीला भोसले घराण्याला घट उठविण्याचा मान आहे.

### ४.२.२.९.३ कार्तिक यात्रा

कार्तिकी पौर्णिमेला औंधवरून देवी त्र्यंबकपंत कुलकर्णीवर प्रसन्न होऊन ज्या मार्गाने आली होती. त्यामार्गाने औंधवरून पालखी यमाईदेवीच्या भेटीसाठी निघते. त्रिपूरारी कार्तिक पौर्णिमेला सायंकाळी घाटजाई मंदिराजवळ किन्हई व औंधच्या देवीच्या पालखीची भेट होते.[२५]

### ४.२.२.१० किन्हई देवस्थानाचे सांस्कृतिक महत्त्व

सांस्कृतिक दृष्टीने कोरेगाव तालुक्यातील श्री क्षेत्र चवणेश्वर मंदिराला अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झालेले आहे. या मंदिराला शासनाने 'ब' वर्ग श्रेणी पर्यटन क्षेत्राचा दर्जा दिलेला आहे.[२६] त्यामुळे येथे सातारा, कोरेगाव, फलटण, वाई, पुणे व इतर भागातील भाविक दर्शनासाठी येत असतात. सांस्कृतिक दृष्टीने किन्हई येथील या मंदिराचा इतिहास व मंदिराला प्राप्त झालेले महत्त्व यातून कोरेगाव विभागातील समाजाचा सांस्कृतिक विकास झालेला आहे. कोरेगाव विभागातील श्री क्षेत्र साखरगड निवासिनी देवी देवस्थान किन्हईचा अर्थात कोरगाव तालुक्याच्या सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक इतिहासात भर घालणारे महत्त्वाचे मंदिर आहे. आधुनिक काळात समाजाला विसर पडत चाललेली धार्मिक संस्कृतीची जाणीव करून देणारे महत्त्वाचे स्थान आहे.

### ४.२.३ श्री क्षेत्र जरंडेश्वर

मारूतीरायाच्या जरंडेश्वर या धार्मिक क्षेत्रांने कोरेगाव तालुक्याच्या सांस्कृतिक इतिहासात मोलाची भर घातली आहे. यामध्ये जरंडेश्वर येथील मारूतीचे मंदिरास प्राचीन काळापासूनचा इतिहास लाभला आहे. हे मंदिर ज्या टेकडीवर आहे ती टेकडी मारूतीरायाने रामायणकाळात लक्ष्मणासाठी संजीवनी बुटी नेण्यासाठी मंदाद्री पर्वत उचलून नेला होता त्या पर्वताचा एक तुकडा येथे पडला अशी दंतकथा या भागातील लोकांमध्ये प्रचलित आहे. तसेच या मंदिराची स्थापना समर्थ रामदास यांनी केली आहे असेही मानले जाते. सांस्कृतिक दृष्टीने कोरेगाव तालुक्यातील श्री क्षेत्र जरंडेश्वर मंदिराला अनन्य साधारण असे महत्त्व प्राप्त झालेले आहे. श्रावण महिन्यातील प्रत्येक शनिवारी येथे हजारोंचा संख्येने सातारा, कोरेगाव, फलटण व इतर भागातील भाविक दर्शनासाठी येत असतात. सांस्कृतिक दृष्टीने जरंडेश्वर येथील या मंदिराचा इतिहास व मंदिराला प्राप्त झालेले महत्त्व आहे.

**४.२.३.१ श्री क्षेत्र जरंडेश्वर मंदिराचे स्थान व रचना :**

महाराष्ट्रात गडकोट वैभव मोठया प्रमाणावर आहे. दक्षिण पठारावर निर्माण झालेल्या अवशेष टेकडया आणि त्यांना विभक्त करण्याऱ्या दऱ्या ही सातारा जिल्हयातील प्रमुख भू–दृश्ये आहेत. त्यात १. सहयाद्री आणि त्याच्या शाखा २. शंभू महादेव डोंगररांग श्रेणी व तिच्या शाखा हे दोन मुख्य गिरीसमूह आहेत.[२७] शंभू महादेव डोंगर श्रेणीचा दक्षिणेकडच्या कृष्णा खोऱ्यातील पूर्वेकडील भागात कोरेगाव विभागात चंदन, चवणेश्वर, हर्णेश्वर, कल्याणगड आणि जरांडा हया पाच टेकडया आहेत. खंबाटकी जवळील हरळी येथे सुरू होणारी व जरंडेश्वरपाशी संपणारी एक लांब डोंगररांग आहे. हया डोंगरांची उंची १०६० ते १२१२ मीटर आहे. हयापैकी नांदगिरी किल्ला साताऱ्यापासून ईशान्येश १९ कि. मी., चंदनवन हा किल्ला साताऱ्यापासून उत्तरेस २४ कि. मी. आणि जरांडा साताऱ्यापासून पूर्वेस १३ कि. मी. अंतरावर आहेत.[२८] यात जरांडा याचा उल्लेख किल्ला असा केला आहे. या ठिकाणी किल्लेसदृश्य परिस्थिती असली तरी हे एक मध्ययुगीन काळातील एक मंदिर आहे.

**४.२.३.२ जरंडेश्वरकडे जाण्यासाठीचे मार्ग :**

जरंडेश्वरकडे जाण्यासाठी चोहोबाजूंनी मार्ग आहेत. पहिला मार्ग सातारा ते त्रिपुटी – भिवडी–जांब–जरंडेश्वर असा आहे. दुसरा मार्ग सातारा–वडूज–सातारारोड पाडळी जरंडेश्वर असा आहे. तिसरा मार्ग जळगाव या गावापासून आहे. तसेच बोरखळ, माहुली येथूनही मार्ग आहेत. सातारा, कोरेगाव व वाठार स्टेशन या अनुक्रमे पश्चिम, पूर्व व उत्तर भागातून पायथ्यापर्यंत जाण्यासाठी मार्ग आहेत. येथून पुढे खडा चढ असलेली पूर्वीपासूनची पायवाट आहे. अलिकडच्या काळात वनविभागाने पायऱ्या बांधून भाविकांची सोय केलेली आहे. पाडळी गावाजवळून गेलेल्या मार्गात एकूण १२१० पायऱ्या आहेत. येथील ‘श्री राम व हनुमानाचे मंदिर’ अतिशय आखीव–रेखीव असे आहे.[२९]

**४.२.३.३ जरंडेश्वरचा इतिहास :**

सातारा–कोरेगाव मार्गाच्या मध्यावर जरंडेश्वर पर्वत आहे. तो सातारा शहराच्या ईशान्येस १३ कि. मी. आणि कोरेगावच्या वायव्येस ७ कि. मी. अंतरावर आहे. साताराहून कोरेगावला जाताना गडवजा डोंगर दिसतो. याच्या माथ्यावर झाडी असल्याने त्या ठिकाणचे वातावरण अतिशय रमणीय आहे. येथे मारूती हे समर्थांचे उपास्य दैवत असल्याने त्यांना हे

स्थान फार आवडले. समर्थ रामदास स्वामी येथे इ. स. १६४४ च्या उन्हाळयात या ठिकाणी राहिले होते. येथे वास्तव्यास असताना ते रोज पहाटे उठत. माहुलीला जाऊन कृष्णा नदीमध्ये स्नानसंध्या आदी आन्हिके उरकीत व माधुकरीला जात. दुपारी कृष्णा नदी तीरावरील वाळवंटात तेथील मुलांबरोबर खेळत असत व रात्री पुन्हा जरंडयाला येत असत. असा त्यांचा दिनक्रम बरेच दिवस चालला होता. समर्थ रामदास जेथे-जेथे जात तेथे-तेथे मारूतीची स्थापना करीत. प्रथम महाबळेश्वर नंतर वाई व त्यानंतर ते जरंडयास आले व तेथेही त्यांनी मारूतीची प्रतिष्ठापना केली. हे मारूतीचे मंदिरही पाहण्यासारखे आहे. समर्थांच्या अकरा मारूतींपैकी हा एक मारूती असल्याने यास विशेष असे महत्त्व आहे. जरंडेश्वराबाबत असाही इतिहास आहे की, गोविंदबाबा सिधये नावाचे एक हनुमान भक्त सातारा येथे राहत होते. त्यांना एकदा मारूतीचा साक्षात्कार झाला. त्यांनी लोकांकडे भिक्षा, वर्गणी मागून पैसे जमा केले आणि जरंडेश्वराच्या माथ्यावरील मारूतीचे देऊळ, मंडप, धर्मशाळा इत्यादि इमारती बांधल्या. गोविंदबाबा अश्विन शुद्ध षष्ठी या तिथीस संन्यास घेऊन समाधिस्त झाले. सध्या देवस्थानचे अधिपती म्हणून एका सत्पुरूषाने अधिकार ग्रहण केले आहेत.[३०]

### ४.२.३.४ जरंडेश्वर डोंगरावतरील वास्तू

#### ४.२.३.४.१ श्रीराम मंदिर

जरंडेश्वर मारूती मंदिराच्या मागील बाजूस पूर्वेला प्रभू श्रीरामाचे प्राचीन मंदिर आहे. मंदिराला सभामंडप असून आत मुख्य गाभारा आहे. मुख्य गाभाऱ्यात राम, सीता आणि लक्ष्मण यांच्या सुबक मूर्ती स्थापित करण्यात आलेल्या आहे. सभामंडपात द्वारपालाच्या दोन्ही बाजूला पाच फुट उंचीच्या सुबक अशा दगडी उभ्या मूर्ती आहेत. मंदिराला भव्य कळस असून कळसाच्या आत जाता येण्यासारखी जागा आहे. मंदिराचे बांधकाम बांधीव दगडात केलेले आहे. बांधकामाचे निरीक्षण केले असता हे बांधकाम १२ ते १५ व्या शतकातील असावे असे वाटते.

#### ४.२.३.४.२ मारूती मंदिर

श्री रामाच्या मंदिराच्या समोरच्या बाजूस मारूतीरायाचे भव्य असे मंदिर आहे. श्रीरामाच्या मंदिरासारखेच हे मंदिरदेखील आहे. परंतु या मंदिराला सभामंडपाला पत्र्याचे आच्छादन आहे. परंतु सभामंडप हा फार मोठा आहे. तेथील भिंतींवर अलिकडच्या काळात विविध देवीदेवतांचे व रामायण-महाभारतातील प्रसंगाचे वर्णन करणारे चित्र आहेत. तसेच

विविध साधूंच्या समाधीही या सभामंडपात आपणास पहावयास मिळतात. गाभाऱ्यात रामभक्त हनुमानाची पश्चिमभिमुख मूर्ती आहे. तसेच कळसात श्री रामाची मूर्ती प्रस्थापित केलेली आहे. मंदिराच्या पुढे दगडी दीपमाळ आहे. मूर्ती पाहण्यासाठी मंदिराच्या मागील बाजूने लोखंडी शिडीवरून जाता येते. या मंदिराचेही बांधकाम बांधीव दगडात केलेले आहे. बांधकाम अगदी आखीव–रेखीव असून लाकडी दरवाजे बसविलेले आहे.

### ४.२.३.४.३ पाण्याचा तलाव व विहीर

जरंडेश्वर भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून पूर्वीपासून मंदिरापासून खाली २०० पायऱ्या उतरून गेल्यावर अथवा पाडळीकडून डोंगर चढताना २०० पायऱ्या बाकी असताना एक तलाव आहे. हे तलाव दगडांनी बंदीस्त केलेले आहे. तीन बाजूंनी मजबूत तट बांधल्यामुळे पावसाळयात पडणारे पाणी डोंगर उताराने वाहून या तलावात साठते. या तलावातील पाणी एप्रिल–मे महिन्यापर्यंत शिल्लक राहते. पाण्याचा हा तलाव त्या काळातील वास्तूशास्त्रज्ञांचे कौशल्य व लोकांची दूरदृष्टी सांगणारा आहे. तसेच मंदिराच्या पूर्वेकडील बाजूस १५० मीटर अंतरावर दगडात बांधलेली विहीर आहे. या विहीरीत पाण्यापर्यंत दोन बाजूंनी पायऱ्या असून विहीरीकडे जाण्यासाठीही दगडी पायऱ्या बांधलेल्या आहेत. सद्यस्थितीत या पायऱ्या मोडकळीस आलेल्या दिसतात. विहीरीला बाराही महिने पाणी राहते.[३१]

### ४.२.३.४.४ धान्याचे कोठार

मंदिरावरील परिसर हा किल्लेवजा असल्याने तेथे जमीन उपलब्ध आहे. तसेच पाण्याची सोय असल्याने तेथे शेती केली जात असावी. कारण या मंदिराच्या समोर डाव्या बाजूला आपल्या प्रशस्त असे धान्याचे कोठार आढळते. या कोठारात लाकडी नांगर आपल्यास पहावयास मिळतो. तसेच या ठिकाणी माल वाहून नेणारी गाडीही आहे. अथवा मंदिरात बाहेरून आलेले धान्य ठेवण्याकरीताही हे धान्याचे कोठार उपयोगात आणले जात असावे. मंदिरात आजही आपल्याला गाई, बैल असे पशुधन पहावयास मिळते. तसेच मंदिराच्या उजव्या बाजूला लंगर म्हणजे जेवण तयार करण्याची मोठी खोली आहे. तेथे अलिकडील काळात भाविकांसाठी प्रसाद, जेवण तयार करून ते लोकांना वाटले जाते. जेवण तयार करण्यासाठी पूर्वीपासून असलेली तांबा व पितळेची मोठी भांडी आहेत. या ठिकाणी मंदिराच्या डाव्या बाजूला 'सीतामातेचे जातं' म्हणून प्रसिद्ध असलेले मोठे जाते आहे. हे जाते दळणासाठी पूर्वीच्या

काळात उपयोगात आणले जात होते.[३२]

### ४.२.३.४.५ चुन्याचा घाणा

श्री राम मंदिराच्या पाठीमागे पूर्वेला लागूनच चुण्याचा घाणा आहे. घाण्याचा मधला मोठा दगड व अवतीभोवतीचे रिंगणाचे अवशेष आपल्याला पहावयास मिळतात. यावरून पूर्वी येथे मंदिराच्या बांधकामासाठी या घाण्याचा वापर केलेला होता असे स्पष्ट होते.[३३]

### ४.२.३.४.६ साधुसंतांची व भाविकांसाठी राहण्याची सोय

मंदिराचे बांधकाम करतानाच दूरदृष्टीने मंदिरावरील साधुसंतांची येणाऱ्या भाविकांची राहण्याची सोय व्हावी म्हणून खोल्या बांधलेल्या आहेत. मंदिराच्या उजव्या बाजूला मंदिरात वास्तव्यास राहणाऱ्या साधूसंतांना राहण्यासाठी खोल्या बांधलेल्या आहेत. मंदिरावर आजपर्यंत अनेक साधूसंतांनी वास्तव्य केल्याचे आढळते. आजही या ठिकाणी संतांचे वास्तव्य आपल्याला पहावयास मिळते. हे साधु मंदिराची देखभाल, साफसफाई व ईश्वर भक्तीमध्ये आपले आयुष्य अर्पण करतात.

मंदिराच्या डाव्या बाजूला भक्तांसाठी राहण्याची सोय केलेली दिसून येते. याठिकाणी भक्त रात्रीची विश्रांती घेत. यातील काही खोल्या आता बंद आहेत. मार्गशीर्ष शु.८ शके १८५४ सन १९३२ साली गोविंददास विठ्ठलदास गुजराथी, राहणार सातारा यांनी आपली आई राधाबाई व वडील विठ्ठलदास यांच्या स्मरणार्थ 'राधाभुवन' हे भक्तांना राहण्यासाठी निवासस्थान बांधले. हे निवासस्थान आजही वापरात आहे. यात आजही १० ते १२ लोक वास्तव्य करू शकतील एवढी जागा आहे. अलिकडच्या काळातही श्री राम भक्त हनुमानावर अपार श्रद्धा असणारे भाविक शुक्रवारच्या रात्री येऊन मुक्काम करतात. तेथे रात्रभर भजन करून सकाळी ५ वाजेच्या मंदिरातील आरतीस उपस्थित राहून पुन्हा आपल्या कामकाजास लागतात.[३४]

### ४.२.३.४.७ दुकाने

मंदिराच्या पुढे भाविकांच्या सोयीसाठी नारळ, फुले व पूजेचे साहित्य विकणाऱ्याची दुकाने आहेत. तसेच एक हॉटेलही आहे. तेथे आपणास चहा, नाश्ता, फराळाचे पदार्थ मिळतात. याशिवाय शनिवारी दोन–तीन दुकाने आणखी वाढतात. मात्र श्रावणातील शनिवारी भाविकांची गर्दी खूप वाढत असल्याने पाडळीकडून येणाऱ्या रस्त्यावर तसेच सातारा–कोरेगावातून जांबकडून येणाऱ्या रस्त्यावर अनेक दुकाने तसेच खेळण्यांची दुकाने लागल्याने

श्रावणातील प्रत्येक शनिवार यात्रेसारखा असतो. यावेळी दोन्ही बाजूला असणाऱ्या रस्त्यावर वाहने दोन ते तीन किलोमीटर अंतरावर लागतात. यावेळी पाडळी गावातील युवक व जरंडेश्वर येथे कार्यरत असलेले ट्रस्ट यांचे नियंत्रण वाखाणजोगे असे असते. हजारोंच्या संख्येने भाविक येत असतात. प्रशासनाच्या वतीने कायदा व सुव्यवस्थेच्या व्यवस्थेसाठी पोलिसांची कुमकही पुरविली जाते.[३५]

### ४.२.३.५ जरंडेश्वर मंदिराचे सांस्कृतिक महत्त्व

संत रामदास स्वामींनी मध्ययुगीन काळात ज्यावेळी यवनांचे अन्याय–अत्याचार वाढले. अशा वेळी शक्तीची उपासना लोकांनी करावी या उद्देशाने अनेक ठिकाणी श्री हनुमानाची देवळे स्थापन करून समाजाला शक्तीची उपासना करण्यासाठी प्रेरित केले. लोकांना बलोपासना करण्यासाठी उद्युक्त केले. सदृढ शरीरात सदृढ मन वास करीत असते असे सांगून लोकांना बलशाली बनवून लोकांच्या मनातील न्यूनगंडाची, पराभूतपणाची भावना दूर केली. शिवाजी महाराजांनी देखील रामदास स्वामींना वास्तव्यासाठी सज्जनगड दिला.

जरंडेश्वर येथील श्री मारूती देवस्थान आजही माणसातील न्यूनगंडाची भावना दूर करीत आहे. त्याला बलशाली होण्यास प्रेरणा देत आहे. जरंडेश्वरला जाण्यासाठी व्यक्तीला जवळ–जवळ एक तास डोंगर चढावा लागतो. तेथेच त्याच्या बलाची चाचणी होत असते. पूर्वीच्या काळी जे भाविक रोज जात असत. व अलिकडच्या काळातही जे जातात. त्यांच्यात शारीरिक बलाबरोबर मानसिक बलही निर्माण होत असते. बलाने व मनाने खच्ची झालेली व्यक्ती पुन्हा जरंडेश्वरला जात नाही. थोडक्यात जरंडेश्वर देवस्थान समाजात एकीची भावना निर्माण करीत आहे. एकविसाव्या शतकात मानव भौतिकतेच्या आहारी जाऊन आपली संस्कृती विसरत चालला आहे. अशा वेळी भक्तांना मनस्वी आनंद देणारे हे संस्कृतीचे एक केंद्र आहे.[३६]

### ४.२.३.६ श्री मारूती जरंडेश्वर देवस्थान ट्रस्ट

श्री मारूती जरंडेश्वर देवस्थान ट्रस्टची स्थापना १९५३ मध्ये झाली आहे. या ट्रस्टने एन. एस. ए. ४२ असे रजिस्ट्रेशन केलेले आहे. ट्रस्टची मुख्य शाखा ६ प्रतापगंज पेठ, सातारा येथे आहे. या देवस्थानात कार्यकारी मंडळात सातारारोड, पाटखळ, पाडळी, खेड येथील ७ ट्रस्टी आहेत. या ट्रस्टचे प्रमुख पाडळी (सातारा रोड) येथील श्री. तानाजी फाळके हे अध्यक्ष आहेत. श्री. सुरेश शहा हे खजिनदार आहेत. या ट्रस्टने मंदिराची संपूर्ण देखभालीची जबाबदारी

सांभाळली आहे. येथील मंदिरात होणारी पूजा–अर्चा, प्रासाद, मंदिरातील इमारतींची देखभाल, पूजाऱ्यांची व्यवस्था, आलेल्या देणगीचे योग्य विनियोग या सर्व गोष्टींचे व्यवस्थापन ट्रस्टमार्फत केले जाते.[३७]

### ४.२.४ श्री मुधाईदेवी मंदिर, देऊर

देऊर गावाला प्राचीन काळापासून राजकीय व सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. या गावाला पूर्वीपासूनची लोकसंस्कृती लाभलेली आहे. येथे सामाजिक, धार्मिक दृष्टीने देवतांना मानले जाते व विविध देवताविषयक विधी पूर्वीपासून पार पाडल्या जात आहेत. गावाचे रक्षण करणारे जे दैवत असते त्याला ग्रामदेवता म्हटले जाते. त्याला संतुष्ट करण्यासाठी त्याची कृपादृष्टी आपल्यावर व्हावी यासाठी नवस करणे, विधी करणे या गोष्टी केल्या जातात. आपल्या देशात प्राचीन काळापासून शक्तीची देवता म्हणजे काली, दुर्गा, भवानी, चंडी, आदिमाया या देवतांची उपासना केली जाते. या आदिमायेची महाराष्ट्रात कोल्हापूरची महालक्ष्मी, वणी–नाशिकची सप्तशृंगीदेवी, तुळजापूरची तुळजाभवानी देवी तर माहूरगडची रेणुकादेवी ही साडे तीन शक्तीपीठे आहेत. यांना प्राचीन अशा परंपरा, रिती–रिवाज आहेत. या आदिमायेप्रमाणेच कोल्हापूरच्या महालक्ष्मीचे प्रतिक म्हणून मानले जाणारे देऊर येथील श्री मुधाईदेवी दैवत सतराव्या शतकापासून देऊरमध्ये नांदत आहे.

#### ४.२.४.१ देऊर गावचे स्थान व इतिहास

सातारा जिल्हयात कोरेगाव तालुक्याच्या उत्तर भागामध्ये कोरेगावच्या वायव्येला २२ कि.मी. अंतरावर तर सातारा–पुणे राज्यमार्गावर साताऱ्यापासून २५ कि. मी. अंतरावर वसना नदीकाठी देऊर हे गाव वसलेले आहे. छत्रपती शाहू महाराजांनी महाराजांनी १७०७ नंतर पेशव्याला नेमले. तेव्हा महाराष्ट्रातील काही कर्तबगार सरदार घराणी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर भारतात इतरत्र पसरली. त्यात गुजरातमध्ये गायकवाड, इंदूरला होळकर, नागपूरला भोसले, ग्वाल्हेरला शिंदे यांनी आपले साम्राज्य निर्माण केले. यातील नागपूरच्या भोसले घराण्यातील प्रमुख रघुजी भोसले हे मूळचे देऊर गावचे आहेत. छत्रपती शाहू महाराजांनी रघुजी भोसले यांना देऊरचे वतन दिलेले होते. रघुजी भोसले यांना देऊरचे राजे (राजा ऑफ देऊर) हा किताब मिळालेला होता. त्यांनी स्वकर्तृत्वाने आपल्या राज्याच्या विकास करून नागपूर येथे आपली राजधानी निर्माण केली. म्हणून त्यांना नागपूरकर भोसले या नावाने ओळख प्राप्त

झाली.[३८] आजही त्यांच्या तत्कालीन इतिहासाची साक्ष देणारा राजवाडा देऊर गावात जीर्ण अवस्थेत उभा आहे.

अशा हया ऐतिहासिक परंपरेने नटलेल्या देऊर गावात मध्ययुगीन काळातील हेमाडपंथी बांधकामाचे विठ्ठल मंदिर, महादेव मंदिर, ग्रामदैवत श्री मुधाईदेवी, भैरवनाथ, भवानी, मारूती, गणपती या हिंदू देवतांची मंदिरे आहेत. तसेच गोडोजी पार्श्वनाथ हे जैनांचे मंदिर, मुस्लिमांची मस्जिद व ब्रिटीशांच्या काळातील विश्रामगृह या वास्तू आहेत. [३९]

### ४.२.४.२ श्री मुधाईदेवी मातेच्या स्थापनेची आख्यायिका

देऊर गावापासून चार कि. मी. अंतरावर दहिगाव हे गाव आहे. या गावचे सुपूत्र श्री मुधोजीराव चव्हाण हे कोल्हापूरच्या श्री महालक्ष्मीच्या पुजा–अर्चा अनेक वर्षे अखंडित करीत होते. त्यांना वार्धक्य आल्याने श्री महालक्ष्मीच्या पुजेसाठी कोल्हापूरला जाणे आवाक्याबाहेरचे झाल्याने त्यांनी देवीला आपल्या गावी वास्तव्याला येण्याचे साकडे घातले. श्री मुधोजीरावांनी केलेल्या निस्सीम भक्तीमुळे देवीने आपल्या भक्ताची इच्छा पूर्ण करण्याचे ठरविले. मात्र देवीने एक अट घातली की, आपण स्वतः पुढे पाहत आपल्या गावचा रस्ता धरावा. मी तुमच्या मागे येते परंतु तुमच्या गावात पोहचेपर्यंत तुम्ही मागे वळून पहायचे नाही. देवीची अट मुधोजीरावाने मान्य केली व ते अतिशय प्रसन्न होऊन आपल्या गावाचा मार्ग आक्रमू लागले. लहान बालिकेचे रूप धारण करून त्यांच्या मागे–मागे देवी चालू लागली. त्यांच्या पायातील नुपूरांचा रूणझुण आवाज ऐकत तल्लीन होऊन मुधोजीराव आपल्या गावाकडे जात असताना वाटेत देवापूर उर्फ देऊर गावातील एका टेकडीवर येऊन पोहोचले. आता दहिगाव अगदी जवळ होते. त्याचवेळी देवी महालक्ष्मीचे लक्ष देऊरमधील तुळजाभवानीच्या मंदिरात चाललेल्या उत्सवाकडे गेले आणि त्या क्षणभर थांबल्याने नपुरांची रूणझुण थांबली आणि मुधोजीरावांची तंद्री भंग पावली. नपुरांचा आवाज का येईना म्हणून देवीने घातलेली अट विसरून मुधोजीरावांनी मागे वळून पाहिले. तेवढयात वीज कडाडल्याचा आवाज झाला व देवी मुधोजीरावांना आपल्या चरणी विलीन करून घेऊन आता आपल्या दोघांचेही वास्तव्यस्थान हेच म्हणून अंतर्धान पावली. मात्र तुमच्या स्मरणार्थ दरवर्षी अश्विन शुध्द अष्टमीला (दुर्गाष्टमी) तुमच्या घराण्यातील व्यक्तीच्या हातून माझी पूजा झाल्याशिवाय माझी पालखी निघणार नाही. हा मान अव्याहतपणे तुमच्या घराण्याला राहिल असा शब्द देवीने दिला.

त्यावेळी तुळजाभवानी मंदिरातील भक्तगण अचानक वीज कडाडल्याचा आवाज झाल्याने आश्चर्यचकीत झाले व वीज कडाडल्याच्या रोखाने टेकडीवर गेले असता तेथे एक विवर पडलेले दिसले. त्यावेळी मुधोजीराव चव्हाणांनी साक्षात्कार देऊन घडलेले इतिवृत्त सांगितले व ते लोप पावले. तो दिवस पौष पौर्णिमेचा होता. घडलेल्या घटनेने सर्वांचे मन भरून आले. या आनंदात लोकांनी मुदीचा नैवेद्य दाखवून तो प्रसाद सर्वांना वाटला. श्री महालक्ष्मीदेवीचे हे देऊरमधील स्थान मुधोजीरावांच्या स्मृतीपित्यर्थ श्री मुधाईदेवी या नावाने प्रसिध्द पावले. हीच आख्यायिका कवी सिताराम गुरव देऊरकर यांनीही काव्यबध्द केलेली आहे.[४०]

या आख्यायिकेनुसार अजूनही अश्विन शुध्द अष्टमीला (दुर्गाष्टमी) देवी मुधाईमातेची पूजेचा व पालखीचा मान चव्हाण घराण्याकडेच आहे. ही परंपरा अखंडीत चालू आहे.

### ४.२.४.३ श्री मुधाईदेवी मूर्ती व मंदिर

मूळचे देवापूर नाव असलेले व पुढील काळात अपभ्रंश होऊन देऊर म्हणून ओळखले जाणारे देऊर गाव हे श्रीमंत रघुजीराजे भोसले नागपूरकर यांचे मूळ गाव आहे. शके १७४३ मध्ये देवीने रघुजीराजांना स्वप्नात दृष्टांत देऊन सांगितले की, मी तुझ्या शेजारी आली आहे. तू माझी सेवा करावी. यामुळे राजांनी देवीची सेवा केली व श्री मुधाईदेवीचे भव्य मंदिर बांधले. मंदिरातील कामे पाहणाऱ्या लोकांना उदरनिर्वाहासाठी आपल्या मालकीची जमीन दिली.[४१] अजूनही या मंदिराची मालकी रघुजीराजे यांचे वारस अजितसिंह भोसले यांच्याकडे आहे. हे मंदिर देऊर गावाच्या उत्तर व दक्षिण वाहणाऱ्या वसना नदीच्या पूर्व किनाऱ्यावर नदीपासून साधारणतः ५०० मीटर अंतरावर आहे. हे मंदिर २५० वर्षापूर्वीचे असून पूर्णपणे दगडाचे आहे. या मंदिराचे बांधकाम दक्षिणेतील हेमाडपंथी मंदिराप्रमाणे आहे. जमिनीखाली असलेल्या गुहेसारख्या गर्भगृहात देवीची स्वयंभू मूर्ती असून ती पूर्वाभिमुख आहे. गुहेस ६७.५ सें.मी.उंच व ४० सें. मी. रूंदीचे प्रवेशद्वार आहे. गर्भगृहाची लांबी ६ मीटर असून दीड ते दोन मीटर आहे. मंदिराच्या सभोवती तिन्ही बाजूस यात्रेकरूंसाठी दगडी ओवऱ्या आहेत. एक मोठा मंडप आहे.[४२]

मंदिराच्या पूर्वेस मुख्य प्रवेशद्वार आहे. त्याच्या दोन्ही बाजूस दोन दीपमाळा आहेत. या दीपमाळा दसरा व गावच्या यात्रेवेळी प्रज्वलित केल्या जातात. मंदिराच्या प्रवेशद्वारावर नगारखाना आहे. पूर्वी देऊरच्या खलिफा या मुस्लिम समाजातील लोकांकरवी सकाळ–

संध्याकाळ नगारा वाजविला जात होता. मुख्य प्रवेशद्वारास लागून संपूर्ण मंदिराभोवती भक्कम दगडी तटबंदी आहे. ती अजूनही सुस्थितीत आहे. तटबंदीस पश्चिमेला प्रवेशद्वार आहे. ज्यातून न्हाणकुंडाकडे जाता येते. देवीच्या पूजाविधीसाठी वापरलेले सर्व पाणी या न्हाणकुंडात जमा होते. येथील पाणी वर्षभर टिकून असते. मंदिराच्या मुख्य गर्भगृहाच्या बाहेर गणपती, द्विलिंगी महादेवाची पिंड तर गणपतीच्या उजव्या बाजूला देवीचे भक्त असलेले श्री मुधोजीराव चव्हाण यांची शिळा असून तिला चव्हाण बाबांची शिळा असे म्हटले जाते. मंदिराच्या चारही बाजूंना महालक्ष्मी अवतार चिन्ह म्हणून ओळखले जाणारे सुदर्शन चक्र कोरलेले आहे. मुख्य मंदिराच्या समोर असणाऱ्या लाकडी छताच्या मंडपात जागरण–गोंधळ, सवाष्णी इत्यादि विधी संपन्न होतात.[४३]

### ४.२.४.४ श्री मुधाईदेवीची नित्यनियमाने केली जाणारी पूजा–अर्चा

दररोज पहाटे ५ ते ६ व सायंकाळी ६ते ७ या वेळेत देवीची सालकरी पुजाऱ्याकरवी साध्या पध्दतीने पूजा केली जाते. गर्भगृहातील स्वयंभू मूर्तीला अंघोळ घातली जाते व फुलांची सजावट केली जाते. यात देवीची आवडती कण्हेरीची फुले खास करून घातली जातात. गर्भगृहातील नंदीदीप मात्र रात्रंदिवस तेवत ठेवले जातात. देवीच्या पूजेवेळी धूपारती होते. पूजेनंतर देवीला भाजी–भाकरी व खडीसाखर असा नैवेद्य अर्पण केला जातो. देवीच्या उपासनेचा वार मंगळवार व शुक्रवार तसेच प्रत्येक अमावस्या व पौर्णिमेला खास महत्त्व आहे.

### ४.२.४.५ देवीचे नैमित्तिक विधी

#### ४.२.४.५.१ न्हाण घालणे

देवीच्या न्हाणासाठी सर्व तयारी व त्यासाठीचा खर्च भक्त करीत असतो. न्हाण म्हणजे देवीच्या स्वयंभू मूर्तीला विधिवत स्नान व पूजा–अर्चा करणे होय. यासाठी दातवण, शिकेकाई, साबण, दुध, सुगंधी द्रव्ये, गरम पाणी यांचा उपयोग केला जातो. देवीच्या स्नानानंतर देवीला भक्तीकरवी साडी चोळी, अलंकार व पुरण पोळीचा महानैवेद्य केला जातो. हा सर्व विधी पुजाऱ्याच्या (गुरव) हस्ते केला जात असतो.

#### ४.२.४.५.२ गोंधळ व सुवासिनी घालणे

श्री मुधाईदेवी ज्यांची कुलस्वामीनी आहे असे भक्त दर तीन वर्षातून एकवेळा आपल्या मुलाबाळांच्या विवाहाचा गोंधळ व सुवासिनी घालण्याचा विधी करतात. देवीच्या गोंधळाचा विधी

हा पुजारी व पाच मानकऱ्यांच्या मदतीने केला जातो. या मानकऱ्यांमध्ये गोंधळी, भाट, कुंभार, तेली व रागी यांचा समावेश असतो. हा गोंधळविधी देवीच्या समोर सभामंडपात होत असतो. यजमान भक्त गोंधळाकरीता सपत्निक किंवा एकटे बसतात. त्यानंतर गोंधळाची गाणी गायिली जातात. सर्व देवतांना गोंधळासाठी गाफातून बोलाविले जाते. गोंधळाच्या उत्तर भागात काकडे नाचविले जाते व 'आई मुधाईच्या नावान चांग भल' चा जयघोष केला जातो. नंतर देवीला महानेवैद्य अर्पण करून मानकऱ्यांना वाढणी दिली जाते. त्यानंतर सुवासिनींना जेवण दिले जाते. यावेळी सुवासिनींना पानाचा विडा, हळदी कुंकू व ओटी भरण्याची पद्धत आहे.

### ४.२.४.५.३ कौल घालणे

कौल लावणे किंवा कौल घेणे हा प्रकार अनेक देवी–देवतांच्या मंदिरामध्ये दिसून येतो. कौल लावणे म्हणजे व्यवहारी जीवनात योजलेले एखादे काम पूर्ण होण्यासाठी देवीची अनुमती घेणे होय. श्री मुधाईदेवीच्या मंदिरात आजही कौल लावण्याची प्रथा चालू आहे. मंदिरात गुरवाकरवी कौल लावला जातो. पहाटे देवीच्या पूजेनंतरचा कालावधी हा कौल लावण्यासाठी सर्वात पवित्र कालावधी मानला जातो. कौल लावण्याचे दोन प्रकार आहेत. १.प्रकट कौल २.मनोमन कौल हे प्रकार आढळतात. भक्त आपल्या मनातील इच्छा गुरवाकरवी देवीसमोर बोलून व्यक्त करतो तो प्रकट कौल. तर भक्त आपली इच्छा आपल्या मनोमन देवीसमोर व्यक्तवितो तो मनोमन कौल. यामध्ये जर देवीच्या अंगावर सजविल्याने फुलांमधील उजव्या बाजूचे फुल खाली पडले तर भक्ताच्या मनातील इच्छितासाठी देवीचा होकार आहे व डाव्या बाजूचे फुल खाली पडले तर देवीचा नकार आहे असे समजले जाते. तसेच देवीच्या छातीवरील फुल खाली पडले तर देवीचा ठाम होकार आहे असा अर्थ घेतला जातो. आजही भक्तगणांचा या कौल घेण्याच्या विधीवर ठाम विश्वास आहे.[४४]

### ४.२.४.५.४ काळ भैरवनाथ व मुधाई यांचे नाते

काळ भैरवनाथ हा मुधाईचा भाऊ मानला जातो. या काळ भैरवनाथाचे छोटेसे मंदिर देऊरच्या उत्तरेस मुधाईच्या मंदिरापासून साधारतः एक ते दीड किलोमीटर अंतरावर आहे. या भैरवनाथाच्या मंदिर परिसरास मळवी म्हणून संबोधिले जाते. श्री मुधाईदेवी नागपंचमीच्या सणाला भावाकडे जाते. श्री मुधाईदेवी नागपंचमीच्या मंगळवार किंवा शुक्रवार या दिवशी गावकरी गावातील मरीआईचा गाडा विधीवत गाववेशीवर नेऊन सोडतात. देवीचा कौल घेऊन

रक्षाबंधन या सणानंतर मुधाईदेवीला मंगळवार किंवा शुक्रवार या दिवशी भैरवनाथाच्या मळवीतून वाजतगाजत विधीवत रीतीने देवीच्या सर्व मानकरी व सेवेकऱ्यांच्या उपस्थितीत पालखीतून घेऊन येतात. यावेळी भैरवनाथाच्या मंदिरापासून निघालेली देवीची पालखी कुठेही न थांबता मुधाईदेवीच्या मंदिरात येते.[४५]

### ४.२.४.५.५ मुधाईदेवीचा उत्सव

अश्विन मासारंभ ते विजयादशमी दसरा या कालावधीत देवीच्या मंदिरात नवरात्रोत्सव साजरा केला जातो. अश्विन प्रतिपदेला पहाटे चार ते पाच वाजून तीस मिनिटे या वेळेत देवीची विधीवत महापूजा करून देवीला महावस्त्र अर्पण केले जाते. मंदिराच्या गर्भगृहात देवीच्या समोर घटस्थापना केली जाते. हा क्रम प्रतिपदेपासून ते सप्तमी अखेर सुरू असतो.

नवरात्रौत्सवातील अष्टमीचा दिवस हा महत्त्वपूर्ण मानला जातो. या दिवशी दिवसा बारा वाजता देवीची पालखी देवीच्या सर्व मानकरी व सेवेकऱ्यांसोबत स्नानासाठी निघते. स्नानासाठी जाता–येता प्रमुख देव–देवतांच्या गावातील आरत्या घेत, ओवाळण्या घेत हा छबिना मंदिरात परततो. या दिवशी देवीच्या मुखवटयाऐवजी संपूर्ण हातापायाची मुधाईदेवी मंदिरातील मुख्य मंडपात सजविलेल्या मखरात महावस्त्र परिधान करून जड जवाहिरासहित स्थानापन्न होते. या दिवशी पुन्हा रात्री बारा वाजता देवीची पालखी निघते. ती जागोजाग भक्तांचे गोंधळ व ओवाळण्या घेत गावातील विठ्ठल मंदिर व पाटील मानकऱ्यांच्या घरापर्यंत जाते. हा छबिना पहाटे चार वाजता मंदिरात परततो.

दशमीला पहाटे देवीची महापूजा होऊन देवी महावस्त्र व महानेवैद्य ग्रहण करते व सायंकाळी सात वाजता देवीच्या विजयाची मिरवणूक निघते. ही मिरवणूक सर्व मानकरी व सेवेकऱ्यांचा उपस्थितीत पारंपारिक रितीने पालखीतून निघते. देऊर गावची जुनी शिव जिला ढाल या नावाने संबोधिले जाते. तिथे म्हणजेच ढालेवर पालखी येते. ढालेवर नवीन भगवी पताका फडकावून देवीचा विजयघोष करत मिरवणूक संपूर्ण गावातून ओवाळणी घेत रात्री अकरा वाजेपर्यंत मंदिरात येते. मंदिरात देवीच्या सर्व मानकरी व सेवेकऱ्यांचा वर्षाचा मानपान देऊन देवी सालकरी पुजाऱ्याच्या घरी जाते. तेथून रात्री एक वाजता देवी मंदिरात परत येते त्यावेळी शिणवटा काढण्याचा पारंपरिक विधी घेऊन देवी विश्रांतीसाठी गर्भगृहात स्थानापन्न होते. अखंड दहा दिवस चालणाऱ्या या उत्सवात भक्तगणांचा उत्साह हा शिगेला पोहोचलेला

असतो. मंदिरामध्ये पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत अबालवृद्ध भक्तगणांचा उत्साह भरून वाहत असतो. या नवरात्रौत्सवाप्रमाणेच देवीची पालखीतून मिरवणूक माघ व पौष पौर्णिमांना निघत असते.[४६]

### ४.२.४.६ श्री मुधाईदेवी मंदिराचे सांस्कृतिक महत्त्व

कोरेगाव तालुक्याच्या उत्तरेला वसलेल्या देवापूर उर्फ देऊर या गावाला श्रीमंत रघुजीराजे भोसले यांचा समृद्ध इतिहास लाभलेला आहे. देऊर गावच्या या सुपुत्राने पेशवाईच्या काळात आपल्या स्वपराक्रमाने नागपूरसारख्या अतिदूरच्या मुलूखात विजयपताका फडकविली. याचाच अर्थ त्यांची राजकीय कारकीर्द ही सातारा व कोरेगाव तालुक्यापुरती मर्यादित न राहता नागपूरपर्यंत होती. त्यांनीच १८ व्या शतकात आपल्या जन्मभूमीमध्ये श्री मुधाईदेवीचे मंदिर उभारले. श्री मुधाईदेवी देऊर व देऊर गावच्या पंचक्रोशीतील लोकांचे कुलदैवत आहे. हे मंदिर २५० वर्षापूर्वीचे असून पूर्णपणे दगडाचे आहे. या मंदिराचे बांधकाम दक्षिणेतील हेमाडपंथी मंदिराप्रमाणे आहे. जमिनीखाली असलेल्या गुहेसारख्या गर्भगृहात देवीची स्वयंभू मूर्ती असून ती पूर्वाभिमुख आहे. या मंदिराचे प्रवेशद्वार अतिशय अरूंद असून त्यातून एकावेळी एकच व्यक्ती बसून प्रवेश करू शकते. नवसाला पावणारी म्हणून श्री मुधाईदेवीची ख्याती संपर्ण पंचक्रोशीत व पंचक्रोशिबाहेर पसरलेली आहे. या मंदिराला २५० वर्षाची सांस्कृतिक परंपरा लाभलेली असून अजूनही गावाने ती जपलेली आहे. दररोज विधीवत पूजा-अर्चा नैवेद्य, स्नान, कौल लावणे यासारख्या गोष्टी केल्या जातात.

### ४.२.५ चिमणगाव

चिमणगाव या गावाला प्राचीन, मध्ययुगीन काळापासून राजकीय व सांस्कृतिक वारसा आहे. पूर्वीपासून येथे सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीने अनेक देव-देवतांना मानले जाते. चिमणगाव येथील काळेश्वर मंदिर हे यादवकालीन आखीव-रेखीव दगडात बांधलेली अतिशय सुबक असे मंदिर आहे. तसेच येथे भवानीमातेचे मंदिर, समर्थांनी स्थापिलेला मारूती, दत्तमंदिर यासारखी मंदिरे आहेत.

### ४.२.५.१ चिमणगावचे स्थान व इतिहास

कोरेगावच्या वायव्येला सहा कि. मी. अंतरावर वसलेले आहे. भौगोलिकदृष्टया या गावचा विस्तार पूर्व-पश्चिम सीमावर्ती भागात १७$^{\circ}$४०′ उत्तर अक्षांश आणि ७४$^{\circ}$१०′ पूर्व रेखांश असा

आहे. या गावाचा इतिहास पाहत असताना आपणास असे पहावयास मिळते की, इ. स. १८०७ मध्ये बापू गोखले यांनी मुळचे किन्हईचे व औंधचे प्रमुख पंत प्रतिनिधींना वसंतगडाखाली कैद करून ठेवले होते. यानंतर गोखले पुण्याला परतत असताना वर्धनगडावर हल्ला केला होता. त्यावेळी गोखले यांचा मुक्काम चिमणगाव येथे होता. यावरून या गावाचे ऐतिहासिक महत्त्व दिसून येते. याचबरोबर समर्थ रामदास स्वामी यांनी येथे मारूती मंदिराची स्थापना केल्यामुळे गावचा प्राचीन सांस्कृतिक इतिहास आपणासमोर येतो.[४७]

### ४.२.५.२ श्री काळेश्वर मंदिर

चिमणगाव येथे महादेवाचे अतिशय सुबक असे यादवकालीन मंदिर आहे. मंदिराची रचना मुख्य गाभारा, सभामंडप, सभामंडपाबाहेर नंदी, चौक, प्रवेशद्वाराभोवती दगडी भिंत अशी आहे. श्री काळेश्वर मंदिराच्या मुख्य गाभाऱ्यात श्री शंभू महादेवाची पिंड आहे. मंदिराला भव्य असा शिखर आहे. अलिकडील काळात शिखराचा जीर्णोध्दार झाला असला तरी त्याच्या मूळच्या अवस्थेला बाधा आणलेली दिसत नाही. मंदिराच्या बाहेर सर्व महादेव मंदिराच्यासमोर असतो तसा दगडात बनविलेला नंदी स्थित असून त्यास मंडप बनविलेला आहे. मंदिराच्या समोर भिंतीत भव्य अशा दोन दीपमाळा आहेत. श्री काळेश्वराच्या उत्सवावेळी या दीपमाळा प्रज्ज्वलित केल्या जातात.[४८]

मंदिरालगत सभामंडप असून त्यास १६ खांब आहेत. प्रत्येक स्तंभाच्या मध्यस्तंभावर कोरीव काम आहे. हे स्तंभ दक्षिणेतील हेमाडपंथी मंदिराच्या स्तंभासारखेच आहेत. कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिरातील स्तंभ, देऊरच्या मुधाईदेवी मंदिरातील स्तंभ, तडवळे सं.वाघोली येथील महादेवाच्या मंदिरातील स्तंभ तसेच येथील महाकाली मंदिरातील स्तंभ एकसारखेच आहेत. यावरून ही सर्व मंदिरे एकाच काळातील हेमाडपंथी असल्याचे सिद्ध होते. तसेच छतावर वर्तृळाकृती आकृतीबंध व पानाफुलांच्या वेलबुट्टी व मणिमंडित केलेले नक्षीकाम केलेले आहे. मंदिर अजूनही सुस्थितीत असून या मंदिराला अलिकडेच रंगकाम केलेले असले तरी त्यांच्या मूळ स्वरूपात बदल झालेला नाही.[४९]

### ४.२.५.३ श्री काळेश्वर मंदिरांतील नैमित्तिक पूजा विधी

श्री काळेश्वर मंदिरात दररोज नैमित्तिक पूजा विधी होत असतो. दररोज नियमितपणे पारंपरिक पद्धतीने अभिषेक, पूजाविधी पुजाऱ्याकडून पार पाडला जातो. दर महाशिवरात्रीला व

श्रावण महिन्यातील दर सोमवारी महाभिषेक केला जातो. या मंदिरात दर्शनासाठी दूरवरून लोक येत असतात.[५०]

### ४.२.५.४ चिमणगाव मंदिरसमोरील मूर्ती व वीरगळ यांचे अवशेष

याठिकाणी मूर्ती व वीरगळ भौतिक अवशेष आढळून येतात. या मुर्तीमध्ये प्रामुख्याने गणेश मूर्ती, शिवलिंग व नागदेवता दिसून येतात. या मंदिरातील या अवशेषांवरून हे मंदिर मध्ययुगीन काळातील असल्याने आढळून येते. बांधकामाचे निरीक्षण केले असता हे बांधकाम १२ ते १५ व्या शतकातील असावे असे वाटते.[५१]

### ४.२.५.५ समर्थ रामदास स्थापित मारूतीरायाचे मंदिर

समर्थ रामदास स्वामी यवनांचे आक्रमणापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी व हिंदू धर्मात निर्माण झालेली ग्लानी दूर करण्यासाठी सातारा जिल्हयात अनेक ठिकाणी मारूतीची मंदिरे स्थापन करून लोकांना बलोपासना करण्यासाठी उद्युक्त केले. त्यातून कोरेगावातही श्री क्षेत्र जरंडेश्वर, कल्याणगड या ठिकाणी मारूतीची मंदिरे स्थापित केली. याचप्रमाणे त्यांनी चिमणगाव येथेही मारूती मंदिराची स्थापना केली होती. येथील मंदिरात श्रावण महिन्यातील प्रत्येक शनिवारी यात्रा भरत असून कोरेगाव तालुक्यातील व बाहेरील असंख्य भाविक दर्शनासाठी येत असतात.[५२]

### ४.२.५.६ भवानीमातेचे मंदिर

भवानी आई ही भोसले घराण्यातील छत्रपती शिवाजी महाराजांची कुलदेवता आहे. भवानी आईच्या आशीर्वादाने महाराजांनी अफजलखानासारख्या क्रूर सरदाराला ठार केले. हे समाजात मानले जाते. त्यामुळे या मंदिराला महत्त्व प्राप्त झालेले आहे. प्रत्येक मराठी कुटुंबे असलेल्या गावात आपणास भवानी आईचे मंदिर पहावयास मिळते. त्याचप्रमाणे येथील भवानीमातेचे मंदिर आकर्षक आहे. मंदिराच्या समोर दीपमाळ आहे. दर भवानी पौर्णिमेला आईचा उत्सव साजरा केला जातो. तसेच नित्यनियमाने पूजा–अर्चा केली जाते.[५३]

### ४.२.५.७ चिमणगावचे सांस्कृतिक महत्त्व

कोरेगाव तालुक्यातील चिमणगाव महादेव, मारूती, महालक्ष्मी, अंबा भवानी, इ. जुनी मंदिरे आपणास पहावयास मिळतात. या मंदिरांमुळे कोरेगाव तालुक्याच्या सांस्कृतिक इतिहासात भर पडलेली आहे. यामुळे गावात भक्तिभावाचे वातावरण निर्माण होऊन एकोपा व

सलोखा निर्माण झालेला आहे. गावाने आजही हिंदू धर्मातील रितीरिवाज, रूढी–परंपरा यांचे पालन करून आपला सांस्कृतिक वारसा जपलेला आहे.

### ४.२.६ तारगाव

तारगाव या गावाला प्राचीन मध्ययुगीन राजकीय व सांस्कृतिक वारसा आहे. येथील सुमारे ३०० वर्षापूर्वीच्या तारकेश्वर मंदिराच्या नावावरून या गावाला तारकेश्वर हे नाव पडले.[५४] तसेच गावापासून २ कि. मी. अंतरावर बोरवन नावाचे रमणीय स्थळ आहे. येथे विठ्ठलाचे प्राचीन मंदिर आहे. तारगाव येथील तारकेश्वराचे मंदिर हे आखीव–रेखीव दगडात बांधलेली अतिशय सुबक असे मंदिर आहे. या मंदिरामुळे गावाला परिसरात एक आगळे–वेगळे स्थान प्राप्त झालेले आहे.

### ४.२.६.१ तारगावचे स्थान

हे गाव रहिमतपूरपासून दक्षिणेला ११ कि. मी. अंतरावर वसलेले आहे. भौगोलिकदृष्टया या गावचा विस्तार कोरेगावाच्या दक्षिणेला $१८^{\circ}००'$ उत्तर अक्षांश आणि $७४^{\circ}००'$ पूर्व रेखांश असा आहे. दक्षिण मध्य रेल्वेमधील इंग्रजांच्या काळातील महत्त्वाचे रेल्वे स्थानक आहे.[५५]

### ४.२.६.२ तारकेश्वराचे मंदिर

तारकेश्वर मंदिर हे सुमारे ३०० वर्षापूर्वीचे असून येथील बांधकाम दगडात केलेले आहे. मंदिराच्या समोरे दगडी चौथऱ्यावर विशाल नंदी आहे. नंदीला दगडाचे छत बनविलेले आहे. मंदिराच्या चारही कोनाला चार मनोरे आहेत. मंदिराला भव्य शिखर आहे. चार मनोऱ्यांपैकी एक मनोरा नष्ट झालेला आहे. मंदिराची रचना गर्भगृह व त्यासमोर सभागृह अशी आहे. गर्भगृहात महादेवाची पिंड आहे. तसेच महादेव, विष्णू व दुर्गादेवी यांच्या संगमरवरी मूर्ती आहेत. ललाटबिंबावर गणेशमूर्ती आहे. सभागृहात एक कूर्मशिला आहे. या मंदिराच्या पायऱ्या कृष्णा नदीच्या पात्रापर्यंत आहेत. मंदिराभोवती दगडी तटबंदी असून तिला बुरूजही होता. बुरूजाची पडझड झालेली आहे. याशिवाय येथे गणेशाचे मंदिर आहे.[५६]

अशा प्रकारे कोरेगाव तालुक्यात प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळात अनेक मंदिरांची निर्मिती झालेली आहे. ही मंदिरे स्थापत्य कलेच्या दृष्टीने अत्यंत वैशिष्टयपूर्ण आहेत. साधारणतः १२ व्या ते १७ शतकापर्यंत निर्माण झालेली ही मंदिरे कोरेगाव तालुक्याच्या सांस्कृतिक वारसामध्ये भर घालणारी आहेत. येथील समाजातील चाली–रिती, रूढी–परंपरा येथील

मंदिरांच्या अभ्यासातून दिसून येते. जगात अनेक धर्म आहेत व त्या धर्मानि लोकांनी सन्मार्गाने जावे म्हणून आपले तत्त्वज्ञान चर्च, मशिद, मंदिर व मठांच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य केले आहे. त्याचप्रमाणे हिंदू धर्मानेही आपल्या मंदिरांच्या माध्यमातून लोकांना सन्मार्ग अवलंबिण्याचे सांगितले आहे. हिंदू धर्मातील अनेक चालीरिती, कर्मकांड हे शास्त्रीय आधारावर आहेत. मात्र काही स्वार्थी व भोंदू लोकांनी हे शास्त्र लोकांपर्यंत पोहचविले नाहीत. त्यामुळे काही अंधश्रद्धा निर्माण झाल्या आहेत. मात्र अलिकडील काळात मानव हा बुद्धिवादी विचारसरणीने वागू लागला असला तरी त्याला मनाच्या शांतीसाठी दैववादाकडे सद्सद्विवेक बुद्धीने विचार करून जाणे गरजेचे आहे.

## ४.३ कोरेगाव तालुक्यातील दुर्ग (किल्ले)

### ४.३.१ चंदनगड व वंदनगड

खंबाटकीजवळील हरळी येथे सुरू होणारी व जरंडेश्वरपाशी संपणारी एक लांब डोंगररांग आणि या डोंगररांगेवर अभेद्य वाटणारे हे दोन किल्ले. चंदन व वंदन हे दोन्ही किल्ले एकमेकांजवळ असून दोन्हीमध्ये खोगीरासारखा खोलगट भाग आहे. चंदनगडाची समुद्र सपाटीपासूनची उंची आहे ३८३६ तर वंदनगडाची उंची ३८४१ फूट आहे. चंदनगड हा कोरेगाव तालुक्याच्या तर वंदनगड हा वाई तालुक्याच्या हद्दीत येतो.[५७]

यातील चंदनगड हा किल्ला इब्राहिम आदिलशहा दुसरा याने इ. स. १६०० मध्ये बांधला. या किल्ल्यावर महादेवाचे मंदिर आणि पाच वटवृक्ष आहेत. तसेच किल्ल्यावर एक मशिद आहे. येथील दर्गेवर दरवर्षी उरूस भरत असतो.[५८] चंदनवंदन किल्ले आदिलशहा, छत्रपती शिवाजी महाराज, औरंगजेब व छत्रपती शाहू महाराज यांच्याकडे अनुक्रमे आलेले होते. इ. स. १७५२ मध्ये पेशवा नानासाहेब यांनी महाराणी ताराबाईच्या हालचालीवर लक्ष ठेवण्याकरिता दादोपंत वाघ याची या किल्ल्यावर नेमणूक केलेली होती. सन १७५६ मध्ये तुळाजी आंग्रे याला या किल्ल्यात काही दिवस डांबून ठेवलेले होते. हा किल्ला सन १८१८ मध्ये ब्रिटिशांच्या ताब्यात गेला. [५९]

मध्ययुगीन शिल्पकारांनी दुर्गबांधणीस प्राधान्य दिले. बुरूज, तटबंदी, माची, प्रवेशव्दारमंडल अशा ठिकाणी दगडांचा मोठया प्रमाणावर वापर केलेला आढळतो. अशाच पठडीतील चंदन–वंदन ही दुर्गजोडी आहे. या दुर्गजोडीकडे जाण्यासाठी दोन मार्ग आहेत. पहिला

मार्ग सातारा ते भुईंज–किकली असा आहे. तर दुसरा मार्ग सातारा फलटण मार्ग धरून सातारा–वडूथ–अंबवडे फाटा–अरबवडी–बनवडी असा आहे. गडाचा किल्लेदार इब्राहिमखान होता. यावरून पायथ्याच्या गावास इब्राहिमपूर पडले असावे असे म्हणतात. येथील 'सोमनाथ मंदिर' अतिशय रेखीव अशा पध्दतीचे आहे.

या खिंडीतून उजव्या बाजूच्या पायवाटेने आपण प्रथम वंदन किल्ल्याकडे निघायचं. वंदन किल्ला सातारा तालुक्यातील मालगावच्या हद्दीत येतो. पुढे गडाचा पहिला दरवाजा पार करून थोडं वर चढून गेल्यानंतर आपण पोहोचतो ते फारशी शिलालेख कोरलेल्या दुसऱ्या प्राचीन प्रवेशव्दाराजवळ. या प्रवेशव्दाराच्या आतील बाजूस पहारेकऱ्यांकरिता बांधलेल्या खोल्या आहेत. या प्रवेशव्दारातून आत गेल्यानंतर आपण वंदन या किल्ल्याच्या माथ्यावर येऊन पोहोचतो. वर आपणास अनेक जुन्या इमारतींचे अवशेष व तेथेच दोन रांगेत उभे असलेले ब्राह्मण आळीचे चौथरे दिसतात. येथून पायरी पायरीच्या वाटेने गेल्यानंतर आपणास सरकारवाडा लागतो. या वाडयाला लागूनच तीन खोल्या असलेला एक वाडा आहे. याचे छप्परही अद्याप शाबूत आहे. येथील लोकांच्या मते हे दारूकोठार असावे. पश्चिमेस एक शाबूत असलेली मशीद आहे. येथे दोन टाके अस्तित्वात आहेत. वंदन किल्ल्याचे पठार तसे मोठे असून आपणास संपूर्ण गडफेरी व्यवस्थित पूर्ण करण्यासाठी तासाभराचा अवधी लागतो. वंदनगडावरील एका चांगल्या तोफेचा नाश करण्यासाठी १८५७ मध्ये कॅप्टन रॉस या गडावर आला होता. तोफेच्या नाशाबरोबर त्याने इमारती व पाण्याच्या टाक्यांचीही नासधूस केली.[६०]

येथून आल्या वाटेने परत आल्यानंतर आपण खिंडीकडे पोहोचतो. खिंडीतून चंदनगडाला उजवीकडून पायवाट जाते. त्या पायवाटेने गडाला वळसा घालून आपण पलिकडच्या टोकाला पोहचतो. येथून चंदनगडाच्या दगडी पायऱ्या चढून आपण गडाच्या पहिल्या दरवाजातून वर चढत माथ्यापर्यंत पोहोचतो. येथे समोरच महादेव मंदिर व त्याच्या शेजारीच एक प्रचंड वटवृक्ष आहे. या मंदिरासमोरील पायऱ्या चढून गेल्यानंतर वाटेत आपल्याला एकावर एक रचलेल्या पाच दगडांचे दोन स्तंभ लागतात.

येथून पायऱ्यांच्या वाटेने पुढे गेल्यावर आपण गडाच्या सपाट माथ्यावर येतो. गडाच्या या सर्वोच्च माथ्यावर अब्दुल कादर जिलानी यांचा दर्गा आहे. इराकच्या दर्ग्याची ही प्रतिकृती आहे. हे ठिकाण 'गौसपिया' या नावाने ओळखले जाते. अनेक जातीधर्माचे लोक गुरूवारी येथे

दर्शनास येतात. मुस्लिम वर्षातील रबिलारवर या महिन्याच्या दहाव्या व अकराव्या तिथीस याचा उरूस मोठया भक्तीभावाने साजरा केला जातो. या दर्ग्यामागील विहीरीचे थंडगार पाणी गड चढण्याचा थकवा क्षणार्धात नाहीसा करते. या दर्ग्याच्या मागील बाजूस मशिद, किल्लेदाराच्या जुन्या वाडयांचे अवशेष, दारूकोठार व तटबंधीचे वेगवेगळे अवशेष तसेच सध्या गाळाने भरून गेलेली गडावरील सात टाकी आपल्याला पहावयास मिळतात. गडावरील दक्षिण बाजूस अनेक मुस्लिम थडगी आहेत. यावरून या गडावर भरपूर लोकवस्ती असली पाहिजे. चोहोबाजूंनी उभा खडक असून काही ठिकाणी तटबंदी घातलेली आहे. या किल्ल्यावरूनही वंदन किल्ल्यास जाता येते पण वाट अतिशय बिकट आहे.[६१] चंदन किल्ला बघून आपण त्याच्या पायथ्याशी असणारा बनवडी या गावात जाऊ शकतो. बनवडीमधून परतीसाठी एस. टी. ची सोय उपलब्ध आहे.

ग्रॅट डफच्या मते चंदन वंदन किल्ल्याची उभारणी पन्हाळयाच्या शिलाहार राजांनी केली, तर काहीजण या किल्ल्याच्या उभारणीचे श्रेय आदिलशहाकडे देतात. पन्हाळयाचा शिलाहार नृपती भोज राजाने जे पंधरा किल्ले बांधले, त्यात चंदन – वंदन किल्ल्याचा समावेश होता. हे किल्ले १६७३ मध्ये शिवरायांनी जिंकले. पुढे १६९५ मध्ये या किल्ल्याजवळ धनाजी जाधव व मुघल फौजांची लढाई झाली. पुढे ३१ ऑक्टोंबर, १६९९ रोजी येथून धनाजीसह राजाराम महाराज लढाईसाठी बाहेर पडले. नंतर १७०१ मध्ये चंदन व वंदनगड हे किल्ले औरंगजेबाकडे गेले. पण परत शाहूच्या सुटकेनंतर मराठयांनी ते जिंकून घेतले.[६२] आज प्रत्येक गडावर आपण ज्यावेळी जातो तेव्हा ढासळलेले बुरूज, कोसळलेले तट, झाडांच्या मुळयांनी वेढून टाकलेले दरवाजे व नष्ट होणारे अवशेष आपल्याला पहावयास मिळतात.

### ४.३.२ नांदगिरीचा किल्ला (कल्याणगड)

कोरेगाव तालुक्यात नांदगिरी या गावाजवळ नांदगिरीचा किल्ला उर्फ कल्याणगड हा किल्ला आहे. या किल्ल्याचे पूर्वीचे नाव नांदगिरीचा किल्ला असे होते. परंतु रामदास स्वामी यांचे शिष्य कल्याणस्वामी यांच्या वास्तव्यामुळे या गडाला कल्याणगड असे नाव पडले. या किल्ल्याच्या पूर्वेला ५ कि. मी. पंतप्रतिनिधी यांचे किन्हई हे गाव असून यमाईदेवीचे तटबंदीने युक्त असे गडवजा मंदिर आहे. दक्षिणेला श्री क्षेत्र जरंडेश्वर यांचे डोंगरावरील मंदिर गडावरून दिसते. वायव्येला चंदनवंदन किल्ले आहेत. तर उत्तरेला चवणेश्वर येथील डोंगरावर प्राचीन मंदिर आहे.

तसेच येथून कोरेगाव व पूर्वीची राजधानी सातारा हेदेखील जवळच आहे. त्यामुळे या किल्ल्याला महत्त्व प्राप्त झाले होते.

### ४.३.२.१ भौगोलिक स्थान

कोरेगावपासून उत्तरेस १३ कि. मी. आणि साताऱ्याच्या ईशान्येस २१ कि. मी. अंतरावर नांदगिरी गावानजिक हा किल्ला आहे. लहान अशा खिंडीमुळे हा किल्ला मूळ डोंगररांगेपासून वेगळा झालेला आहे. किल्ल्यावरील डोंगराच्या चारही बाजूने तुटलेला कडा असल्यामुळे हा किल्ला चढण्यास अवघड झाला आहे. मात्र नेहमी ट्रेक करणाऱ्यांसाठी हा किल्ला अर्ध्या तासात चढण्यासारखा आहे.[६३]

### ४.३.२.२ गडाचा इतिहास

पन्हाळ्याचा शिलाहारवंशीय राजा दुसरा भोज याने १२ व्या शतकात हा किल्ला बांधला. छ. शिवाजी महाराजांनी इ. स. १६७३ मध्ये राज्याभिषेकाच्या एक वर्षापूर्वी हा किल्ला जिंकून घेतला. पुढे महाराणी ताराबाईच्या काळात इ. स. १७०७ मध्ये हा किल्ला बादशाह औरंगजेब याने जिंकला. तोपर्यंत हा किल्ला स्वराज्यात सामील होता. यानंतर छ. शाहू यांचे पेशवे पहिला बाजीराव यांनी हा किल्ला इ. स. १७२४ मध्ये जिंकला. पुढे दुसऱ्या बाजीराव पेशव्यापर्यंत हा किल्ला किन्हई येथील पंतप्रतिनिधींच्या ताब्यात होता. इ. स. १८१८ मध्ये इंग्रज सेनापती प्रिटझ्लरने मुत्सद्देगिरीने हा किल्ला लढाई न करताच जिंकला. किल्ल्यावरील दोन तोफा इ. स. १८५७ मध्ये इतरत्र हलविल्या गेल्या.[६४]

### ४.३.२.२ गडाविषयीचे वर्णन

किल्ले कल्याणगड हा डोंगरी किल्ला आहे. या किल्ल्याची समुद्र सपाटीपासूनची उंची ३५३७ फूट म्हणजे ११००० मीटर एवढी आहे. गडाच्या पायथ्याला असलेल्या धुमाळवाडी या गावातून किल्ल्यावर जाणारी पायवाट आहे. हा किल्ला धुमाळवाडी गावाच्या हद्दीत आहे.[६५] गड चढतांना निम्म्यापेक्षा जास्त अंतर चालल्यावर एक गुहा लागते. त्यात हिवाळ्यात पाणी साठलेले असते. या टाक्याला खांब असल्याने त्यास खांब टाके म्हणतात.[६६] हे टाके खडकात खोदलेले असून ते तीन भागात विभागलेले आहे. त्यावरील छत दगडी खांबावर आहे.

किल्ल्यावर पोहोचल्यावर सर्वप्रथम उत्तराभिमुख प्रवेशद्वार आढळते. हे प्रवेशद्वार सुस्थितीत असून तसेच पुढे गेल्यावर बाजूस महोदेवाचे मंदिर आहे. आणि डाव्या बाजूला खाली

पायऱ्या उतरून गेल्यावर जवळच एक गुहेचे तोंड आहे. त्यात वाकून आत जावे लागते. आत गेल्यावर संपूर्ण अंधार असतो. त्यामुळे तेथे मेणबत्ती किंवा बॅटरी नेणे गरजेचे आहे. तसेच पुढे गेल्यावर भुयारात गुडघाभर पाण्यात वाट काढत पुढे जावे लागते. रस्त्याच्या बाजूला लोखंडी रेलिंग लावलेले असून रस्ता चुकल्यास खोल पाण्यात पडण्याची शक्यता असते. तसेच पुढे गेल्यावर ३० ते ४० अंतरावर पार्श्वनाथाची १२ व्या शतकातील लक्षवेधक मूर्ती आहे. पार्श्वनाथ हे जैन तीर्थंकर होते. तसेच त्याच्याजवळच दत्ताची मूर्ती चौथऱ्यावर स्थानापन्न आहे. मंदिरावर राहणारा पुजारी अथवा ग्रामस्थ येथे दर गुरूवारी दिवाबत्ती करीत असतात.[६७] पूर्वी येथील चौथऱ्यावर साधू तपश्चर्येला बसत असत. अलिकडे जैन लोक पार्श्वनाथाच्या दर्शनासाठी श्रद्धेने येतात. तसेच काही परदेशी पर्यटक व महाराष्ट्रातील दुर्गप्रेमी हे अद्भुत ठिकाण पाहण्यासाठी येतात. या गुहेत सोबत माहितीची व्यक्ती घेतल्याशिवाय जाऊ नये.[६८]

गडावरील पार्श्वनाथाची गुहा पाहिल्यावर पुन्हा प्रवेशद्वारापाशी यावे लागते. येथून पूर्वेकडे असलेल्या दुसऱ्या दरवाजाने बालेकिल्ल्यात जाता येते. येथे उजव्या बाजूला मारूतीचे सुरेख मंदिर आहे. या काळातील मारूतीच्या मूर्ती हया अतिशय सुरेख व वैशिष्टयपूर्ण अशा आहेत. निनाम पाडळी येथील ढाणे बुवांनी या मंदिरांचा जीर्णोद्धार केलेला आहे.[६९] पुढे गेल्यावर गडाचा माथा लागतो. माथ्यावर एक मोठे तळे व तीन छोटी तळी आहेत. बामणघर नावाची एक पडकी वास्तू लागते. कदाचित ते ब्राह्मणाचे घर असावे. तसेच एका वडाच्या झाडाजवळ पीराचे थडगे आहे. हे थडगे अब्दुल करीम नावाच्या पीराचे आहे असे म्हणतात. याचा उरूस होळी पौर्णिमा झाल्यानंतर पाच दिवसानंतर असतो. हा उरूस मुस्लिम लोक मोठया उत्साहाने साजरा करतात.[७०] गडाच्या उत्तरेला खंडोबाचे मंदिर असून या मंदिराजवळ एक शिलालेख आढळून येतो. यावर शके १६२८ असे लिहिलेले आढळते.[७१] मात्र उर्वरित लेख अस्पष्ट झाल्याने वाचता येत नाही.

कोरेगाव तालुका हा सातारा गादी होते त्यावेळेस आणि सातारा जिल्हा झाल्यावरही सातारचा एक महत्त्वपूर्ण भाग मानला जातो. कारण सातारा आणि कोरेगाव तालुक्याच्या सिमा एकमेकास लागून आहेत. स्वराज्याच्या संरक्षणासाठी शत्रूच्या नजरेस सहज पडणार नाही असे चंदनगड व वंदनगड हे जोडकिल्ले, तसेच नांदगिरीचा किल्ला महत्त्वपूर्ण आहेत. या किल्ल्यांना बादशाहा औरंगजेबाने जिंकले होते. तसेच पेशवाईच्या काळात पेशव्यांनी इंग्रजांच्या काळात

इंग्रजांनी हे किल्ले आपल्या ताब्यात ठेवले होते. यावरून या किल्ल्यांचे लष्करी व प्रशासकीय महत्त्व लक्षात येते. सद्यस्थितीत चंदनवंदन गड हे कोरेगाव व वाई यांच्या सरहद्दीवर येतात. तर कल्याणगड हा एकमेव किल्ला कोरेगाव तालुक्याचा मध्यभागात आहे. या किल्ल्याकडे जाणाऱ्या वाटा बिकट असल्याने या किल्ल्यावर पर्यटक सहसा जात नाहीत. परंतु या किल्ल्यांवर हिंदू, जैन व मुस्लिम यांची धार्मिक ठिकाणे असल्याने धार्मिक उद्दिष्टाने व काही हौसी पर्यटक माहिती काढून येथे येतात.

### ४.४ कोरेगाव तालुक्यातील दर्गे आणि मशिदी

#### ४.४.१ चंदन व वंदन गडावरील दर्गे

चंदनगड हा किल्ला इब्राहिम आदिलशहा दुसरा याने इ. स. १६०० मध्ये बांधला. गडाच्या सर्वोच्च माथ्यावर अब्दुल कादर जिलानी यांचा दर्गा आहे. इराकच्या दर्ग्याची ही प्रतिकृती आहे. हे ठिकाण 'गौसपिया' या नावाने ओळखले जाते. अनेक जातीधर्माचे लोक गुरूवारी येथे दर्शनास येतात. मुस्लिम वर्षातील रबिलारवर या महिन्याच्या दहाव्या व अकराव्या तिथीस याचा उरूस दरवर्षी मोठया भक्तीभावाने साजरा करतात. या दर्ग्यामागील विहीरीचे थंडगार पाणी गड चढण्याचा थकवा क्षणार्धात नाहीसा करते. या दर्ग्याच्या मागील बाजूस मशिद आहे. अशाच प्रकारची दर्गा वंदन किल्ल्यावरदेखील आहे. त्याठिकाणीही ऊरूसाच्या दिवशी भाविक भेट देतात.[७२]

#### ४.४.२ नांदगिरी किल्ल्यावरील दर्गा

नांदगिरी किल्ल्याच्या पठारावर एका वडाच्या झाडाजवळ पीराचे थडगे आहे. हे थडगे अब्दुल करीम नावाच्या पीराचे आहे असे म्हणतात. याचा उरूस होळी पौर्णिमा झाल्यानंतर पाच दिवसानंतर असतो. हा उरूस मुस्लिम लोक मोठया उत्साहाने साजरा करतात.[७३]

#### ४.४.३ रहिमतपूर येथील रणदुल्लाखान दर्गा व मशीद

इ. स. १६५० मध्ये विजापूरचा सरदार रणदुल्लाखान हा पैगंबरवासी झाला. त्यावेळी संत मिरा सय्यद हुसैनी यांच्या स्थानाच्या एका रेषेत (नजरेखाली) रणदुल्लाखान याचे घुमटाचे व प्रार्थना स्थळ याचे निर्माण करण्यात आले. मशीद व दर्गा एकाच मोठया दगडी चौथऱ्यावर असून दोहामध्ये अंदाजे ८ X ८ मीटर आकाराचा हौद आहे. त्यात दगडी कारंजे आहे. पूर्वेच्या बाजूला घुमट असलेली २.७८ X २.७८ मीटर आकाराची मोठी कबर (यास दर्गा म्हणतात)

आहे. रणदुल्लाखानाच्या स्मृतीप्रित्यर्थ हा घुमट आणि मशिद बांधण्यात आली आहे. या घुमटास बापलेकाचा घुमट म्हणण्याची प्रथा आहे. मशिदीच्या आग्नेयेस रस्त्याच्या दक्षिणेला १५.२४ मीटर उंचीचा मनोरा आहे. तो पश्चिमेला जमिनीकडे झुकलेला आहे. त्यावर हत्तीच्या मोटेची व्यवस्था होती. त्याद्वारे मशिदीतील कारंजाला पाणी पुरविले जात असे. ही वास्तु म्हणजे तत्कालीन सुबत्ता व श्रद्धा यांचे प्रत्यंतर देणारे आहे.[७४]

### ४.५ ऐतिहासिक स्थळे

#### ४.५.१ किन्हई (पंतप्रतिनिधी घराणे)

पंतप्रतिनिधी घराण्याचे मूळ पुरूष यमाजीपंत कुलकर्णी हे देशस्थ ब्राह्मण होते. ते किन्हई गावचे कुलकर्णी होते. किन्हई हे गाव सातारा जिल्हयातील कोरेगाव तालुक्यात आहे.[७५] यमाजीपंत कुलकर्णी यांना नागोजी व त्रिंबकपंत अशी दोन मुले होती. त्रिंबकपंतास इ. स. ७ डिसेंबर, १६६० रोजी परशुराम हा मुलगा झाला.[७६] या परशुरामपंतानी वयाच्या १४ व्या वर्षी निळो सोनदेव यांचे पदरी नोकरी पत्करली. निळो सोनदेव यांचा मुलगा रामचंद्रपंत व परशुरामपंत हे दोघे समवयस्क होते. त्यामुळे त्यांची लहानपणापासून मैत्री जमली. छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत रामचंद्रपंतांना स्वराज्याचे अमात्य पद प्राप्त झाले. रामचंद्रपंत अमात्यांनी शंकराजी नारायण व परशुरामपंत यांना बरोबर घेऊन छत्रपतींच्या गैरहजेरीत विशाळगडावरून स्वराज्य टिकवून ठेवण्यासाठी अपार कष्ट घेतले होते. म्हणून छत्रपती राजाराम महाजांनी जिंजीवरून स्वराज्यात आल्यावर अमात्यांच्या सल्ल्याने परशुरामपंतांना इ. स. १६९८ मध्ये प्रतिनिधीपद बहाल केले. तेव्हापासून परशुरामपंतांचे घराणे पंतप्रतिनिधी घराणे म्हणून ओळखले जाऊ लागले.

छत्रपती राजाराम महाराजांनी जिंजी येथे असताना इ. स. १६९२ मध्ये प्रतिनिधी पद निर्माण करून ते प्रल्हादपंतास दिले होते. प्रल्हादपंत हे राजाराम महाराजांच्या विश्वासातील होते तसेच महाराजांचे खरे आधारस्तंभ होते. राजपत्रावर प्रधानांच्या उजव्या बाजूस प्रतिनिधींची मुद्रा व्हावी असे ठरले होते.[७७] राजाराम महाराज जिंजी येथे असतांनाच इ. स. १६९७ मध्ये प्रल्हादपंत प्रतिनिधींचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर प्रतिनिधी पदावर निमाजी हणमंते यांची नेमणूक केली होती. परंतु छत्रपती राजाराम महाराज जिंजीच्या वेढयातून सुटून स्वराज्यात आले. त्यावेळी पाठीमागे निमाजी हणमंते मोगलांच्या कैदेत सापडले होते. म्हणून

छत्रपतींनी स्वराज्यात आल्यानंतर इ. स. १६९८ मध्ये सातारा मुक्कामी परशुरामपंताची प्रतिनिधी पदावर नेमणूक केली. त्यावेळी त्यांना कऱ्हाड, आटपाडी, औंध हे परगणे जहागीरी म्हणून मिळाले होते. वस्त्रे, अलंकार, वहाने, शिक्का व कटयार देण्यात आले होते. त्यावेळी परशुरामपंत प्रतिनिधींचा शिक्का पुढीलप्रमाणे होता.

''श्री आई आदिपुरूष प्रसन्न
श्री राजाराम स्वामी प्रतिनिधी ।।
तस्य परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी ।।''[७८]

हा शिक्का अद्याप औंध आणि विशाळगड येथील दोन्ही प्रतिनिधींच्या घराण्यात चालू आहे.

छत्रपती राजाराम महाराजांच्या नंतर काही महिन्यांनी निमाजी हणमंते मोठया कष्टाने, साहसाने आणि युक्तीने मुघलांच्या कैदेतून सूटून स्वराज्यात आले होते. त्यांच्याकडील प्रतिनिधीपद त्यांना पुन्हा देवून त्यांचा गौरव करणे आवश्यक आहे. म्हणून छत्रपती राजाराम महाराजांनी इ. स. १६९९ मध्ये परशुरामपंताकडील प्रतिनिधीपद पुन्हा निमाजीपंतास दिले व निळोपंत पिंगळे यांच्या मृत्यूमुळे रिकामे झालेले प्रधानपद परशुराम पंतास दिले होते. छत्रपती राजाराम महाराज यांच्या मृत्यूनंतर महाराणी ताराबाई यांनी परशुराम पंत यांच्याकडे पुन्हा प्रतिनिधी पद दिले होते. शाहू–ताराबाई संघर्षाच्या काळात परशुरामपंत प्रतिनिधी ताराबाईच्या पक्षाचे आधारस्तंभ होते.[७९] छत्रपती शाहू महाराजांनी परशुरामपंतांना अनेक आमिषे दाखविली. पण त्यांनी शेवटपर्यंत ताराबाईचा पक्ष सोडला नाही. इ. स. १७०७ च्या डिसेंबर महिन्यात सातारा किल्ल्याचे किल्लेदार परशुरामपंत प्रतिनिधी याना कैद करून सातारा किल्ला ताब्यात घेतला होता. १२ जानेवारी, १७०८ रोजी शाहू महाराजांनी सातारा किल्ल्यावर आपला राज्याभिषेक करून घेतला. त्यावेळी त्यांनी आपले अष्टप्रधान मंडळ घोषित केले, त्यावेळी परशुरामपंत छत्रपती शाहू महाराजांच्या कैदेत होते.[८०] छत्रपती शाहू महाराजांनी आपला प्रतिनिधी म्हणून गदाधर प्रल्हाद यांची नेमणूक केली होती. म्हणजे छत्रपती शाहूंचा पहिला प्रतिनिधी गदाधर प्रल्हाद हा होता. परशुरामपंत जेष्ठ मुत्सद्दी आणि पराक्रमी सेनानी होती. त्यांना फारकाळ कैदेत ठेवणे योग्य नाही असे शाहू महाराजांना वाटू लागले. मराठा दौलतीचा भार छत्रपती शाहू नीट सांभाळू शकतील असे परशुरामपंतांना वाटत होते. त्यातूनच दोघांचा समेट होऊन छत्रपती शाहू महाराजांनी परशुरामपंतांची कैदेतून सुटका करून त्यांना डिसेंबर,

१७१० मध्ये प्रतिनिधीपद बहाल केले. तसेच कऱ्हाड परगणा जहागिरी म्हणून दिला. अशा प्रकारे परशुरामपंतांना छत्रपती शाहू महाराजांनी स्वराज्याच्या कारभारात योग्य स्थान दिले.[८१]

छत्रपती शाहू महाराजांनी ऑक्टोबर, १७११ मध्ये परशुराम प्रतिनिधीस चंद्रसेन जाधवांचा बंदोबस्त करण्यासाठी पाठविले. पण प्रतिनिधींनी अचानक चंद्रसेन जाधवांचा बरोबर समेट करून शाहूविरोधी हालचाली सुरू केल्या. म्हणून शाहू महाराजांनी परशुराम पंताच्या जागी नारो प्रल्हाद याची प्रतिनिधी म्हणून निवड केली. तसेच परशुराम पंतास २० नोव्हेंबर, १७११ रोजी कैद करून त्याचे कऱ्हाड परगण्याच्या सरदेशमुखीचे वतन जप्त केले. शिवाय परशुरामपंताची तेथील घरे व सरंजाम जप्त केले.[८२] तसेच परशुराराम पंतास कठोर शासन करण्याचे ठरविले. पण खंडो बल्लाळ चिटणीस यांनी शाहू महाराजांची समजूत घातली की, अशा अविचारी क्रूर कृत्याने आपल्याच पक्षाची शक्ती कमी होईल पराक्रमी सेवक माणूस असे मारू नयेत. अघटीत कामावर घालून मारावे.[८३] म्हणून छत्रपती शाहू महाराजांनी परशुरामपंतास कैदेत ठेवण्याचा निर्णय घेतला. पुढे कान्होजी आंग्रे यांचे संकट उभे राहिले तेव्हा छत्रपती शाहू महाराजांनी परशुरामपंतांची कैदेतून सुटका करून पेशवेपद देऊ केले होते. पण परशुरामपंतांनी पेशवेपद स्वीकारले नाही. बाळाजी विश्वनाथ पेशवे व खंडो बल्लाळ चिटणीस यांच्या विनंतीवरून १९ जून, १७१३ रोजी छत्रपती शाहू महाराजांनी प्रतिनिधीपद पुन्हा परशुरामपंतास दिले व त्या पदाच्या कायदेशीर सनदा दि. ८ एप्रिल, १७१४ रोजी दिल्या.[८४] त्यामुळे कऱ्हाड परगण्याची जहागिरी परशुपंतास वंशपरागत मिळाली. इ. स. १७१४ मध्ये परशुरामपंताचा मुलगा कृष्णाजी परशुराम यास कोल्हापूरच्या छत्रपती संभाजीने प्रतिनिधीपद दिले.

### ४.५.२ देऊर

सातारा जिल्हयात कोरेगाव तालुक्याच्या उत्तर भागामध्ये कोरेगावच्या वायव्येला २२ कि. मी. अंतरावर तर सातारा–पुणे राज्यमार्गावर साताऱ्यापासून २५ कि. मी. अंतरावर वसना नदीकाठी देऊर हे गाव वसलेले आहे. छत्रपती शाहू महाराजांनी महाराजांनी १७०७ नंतर पेशव्याला नेमले. तेव्हा महाराष्ट्रातील काही कर्तबगार सरदार घराणी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर भारतात इतरत्र पसरली. त्यात गुजरातमध्ये गायकवाड, इंदूरला होळकर, नागपूरला भोसले, ग्वाल्हेरला शिंदे यांनी आपले साम्राज्य निर्माण केले. यातील नागपूरच्या भोसले घराण्यातील प्रमुख रघुजी भोसले हे मूळचे देऊर गावचे आहेत. छत्रपती शाहू महाराजांनी रघुजी

भोसले यांना देऊरचे वतन दिलेले होते. रघुजी भोसले यांना देऊरचे राजे (राजा ऑफ देऊर) हा किताब मिळालेला होता. त्यांनी स्वकर्तृत्वाने आपल्या राज्याच्या विकास करून नागपूर येथे आपली राजधानी निर्माण केली. म्हणून त्यांना नागपूरकर भोसले या नावाने ओळख प्राप्त झाली.[८५] आजही त्यांच्या तत्कालिन इतिहासाची साक्ष देणारा राजवाडा देऊर गावात जीर्ण अवस्थेत उभा आहे.

अशा हया ऐतिहासिक परंपरेने नटलेल्या देऊर गावात मध्ययुगीन काळातील हेमाडपंथी बांधकामाचे विठ्ठल मंदिर, महादेव, ग्रामदैवत श्री मुधाईदेवी, भैरवनाथ, भवानी, मारूती, गणपती या हिंदू देवतांची मंदिरे आहेत. तसेच गोडोजी पार्श्वनाथ हे जैनांचे मंदिर, मुस्लिमांची मस्जिद व ब्रिटीशांच्या काळातील विश्रामगृह या वास्तू आहेत.[८६]

### ४.५.३ रहिमतपूर

संत महात्म्ये इतिहासपुरूष, समाज संत, क्रांतिकारक यांच्या पदस्पर्शाने व कमंडलू कर्पूर या नदीच्या पवित्रतेने पावन झालेली ही रहिमतपूर नगरी आहे. संत जनाबाई, संत मलंगबाबा, संत बिप्रबंधू, संत राधाकृष्ण स्वामी, संत चन्नेबसवेश्वर महाराज, संत बहिणाबाई, संत निरंजनबाबा अशा महात्म्यांची समाधी स्थाने रहिमतपूरमध्ये आहेत. त्याचबरोबर संत श्रेष्ठ रामदास स्वामी, संत सेवागिरी महाराज, संत गाडगे महाराज, यांचे वास्तव्य हे काही काळ रहिमतपूरमध्ये होते असा इतिहास आहे.[८७] रहिमतपूर हे गाव बरीच वर्षे विजापूरच्या आदिलशहाच्या नियंत्रणाखाली होते. छत्रपती शिवाजी महाराजांना पकडण्यासाठी सन १६५९ मध्ये अफजलखान रहिमतपूरमार्गे वाईला आला होता. त्यावेळी त्याचा मुक्काम रहिमतपूरमध्ये झाला होता. रहिमतपूर शहरामध्ये अनेक ऐतिहासिक व धार्मिक स्थळे आढळून येतात.[८८] त्यामध्ये जोतीबाचा माळ, खंडोबाचा माळ, श्री चौंडेश्वरीदेवी मंदिर, जहाँगिर माँ साहब दर्गा (मायलेकीचा घुमट), श्री रोकडेश्वर मंदिर व इतर मंदिरे, गजधरण, चंद्रागिरी, कार्तिक स्वामी मंदिर व देवदरी, प्रति पंढरपूर म्हणून ओळखले जाणारे श्री क्षेत्र ब्रह्मपुरी अशी विविध स्थळे आहेत. रहिमतपूर गावामध्ये हिंदू–मुस्लिम ऐक्याचे प्रतिक म्हणून कमंडलू नदीवरील राम पूल हा आजही डौलात उभा आहे. याचे वैशिष्टये म्हणजे या पुलाचे निम्मे बांधकाम मुस्लिम धर्मियांनी तर निम्मे हिंदू धर्मियांनी केलेले आहे. हे आपणास आजही पहावयास मिळते. त्याचे कारण

म्हणजे निम्मा पूल हा आखीव–रेखीव व निम्मा पूल ओबडधोबड असून याचे बांधकाम भक्कम झालेले आहे.[८९]

### ४.५.४ कण्हेरखेड

कोरेगाव तालुक्यामध्ये कोरेगाव शहराच्या आग्नेयेस १९ कि. मी. अंतरावर कण्हेरखेड हे गाव वसलेले आहे. ग्वाल्हेरच्या शिंदे घराण्याचा मूळ संस्थापक राणोजी शिंदे यांचे हे जन्मगाव आहे. ते या गावचे पाटील होते. याच गावामध्ये महादजी शिंदेंचा जन्म झाला. छत्रपती शाहू महाराज मोगलांच्या कैदेत असतांना या गावातील मराठा–पाटील कुटुंबातील एका मुलीशी त्यांचा विवाह झाला होता. पेशवेकाळात महाराष्ट्रातील अनेक मराठा घराण्यांनी नाव कमाविले होते. त्यामध्ये हे प्रमुख घराणे होते. सन १७३० ते ३१ च्या दरम्यान माळवा सुभा हे या घराण्याचे मुख्य कार्यक्षेत्र बनले. तेथून या गावचा संबंध कमी होत जाऊन संपुष्टात आला. आज या गावामध्ये राणोजी शिंदेचा भव्य असा वाडा पडलेला होता तो पुरातत्व विभागाने आपल्या ताब्यात घेऊन त्याचे जतन व संवर्धन केले आहे.[९०] या गावात अनेक मंदिरे असून त्यापैकी कंडेश्वर मंदिर आणि जानाईदेवी मंदिरांचा जीर्णोद्धार शिंदे घराण्यातील विजयाराजे शिंदे यांनी केला आहे.[९१] शिंदे घराण्यातील माधवराव सिंदीया यांचा विमान अपघातात मृत्यू झाल्यानंतर त्या गावात त्यांचा पुतळा उभारण्यात आलेला आहे.[९२]

## ४.६ कोरेगाव तालुक्यातील हिंदू धर्मातील सण, उत्सव व जत्रा

कोरेगाव तालुक्यातील लोकही हिंदू धर्म परंपरेप्रमाणे दरवर्षी अनेक सण साजरे करीत असत. हिंदू लोक गुढीपाडवा, रामनवमी, दसरा, दिवाळी, मकरसंक्रांत, होळी, शिवरात्र, गोकुळाष्टमी, नारळी पौर्णिमा व गणेश चतुर्थी इत्यादि सण साजरे करीत असत. प्रत्येक महिन्यात पुढीलप्रमाणे सण व उत्सव साजरे केले जातात.

सणाच्या वेळी स्त्रिया उंची लुगडी व चोळी घालतात. समाजातील सर्व थरातील स्त्रिया सध्या मराठे आधुनिक पोशाख परिधान करीत असल्या तरी सणाला पारंपरिक पोशाख धारण करून रीतीरिवाज करतात. शहरी भागातील स्त्रियांपेक्षा ग्रामीण भागातील स्त्रिया जास्त भक्तीभावाने सण उत्सव साजरे करतात. एकादशी, शिवरात्र, चतुर्थी, सोमवार व शनिवार इत्यादि उपवास करतात.

### ४.६.१ गुढीपाडवा

गुढीपाडवा हा सण चैत्र महिन्यात साजरा केला जातो. चैत्र शुद्ध प्रतिपदा या शालीवाहन शकाच्या नववर्षदिनी रामाने चौदा वर्षे वनवास आणि लंका विजयानंतर याच दिवशी अयोध्येत प्रवेश केला अशी कथा रूढ आहे. या दिवशी ब्रह्मदेवाने जगाची निर्मिती केली अशीही समजूत आहे. या दिवशी संपूर्ण तालुक्यात हिंदू धर्मातील लोक घराच्या दाराशी बांबूच्या काठीवर एखादे नवीन वस्त्र, चांदीचा, तांब्याचा किंवा अन्य धातूचा पेला व पुष्पमाळ घालून ती घराच्या दाराशी उभारतात तिला 'गुढी' असे म्हणतात. या दिवशी गुळ, चणे व कडुलिंबाच्या झाडाच्या पानांचे मिश्रण कुटुंबातील सर्व मंडळी खातात.[९३] चैत्र महिन्यातील पहिल्या दिवसापासून नव्या वर्षाची सुरूवात होत असल्याने गुढया, तोरणे उभारून हा सण साजरा केला जातो. नवीन कामाची सुरूवात प्रत्येक जण या शुभदिवशी म्हणजेच मराठी नववर्षाच्या सुरूवातीला करतात. हिंदू धर्मात मानल्या गेलेल्या साडेतीन शुभमुहूर्तांपैकी हा एक मानला जातो.[९४] याशिवाय चैत्र महिन्यात रामनवमी व गौरीपूजा हेही सण साजरे केले जातात.

### ४.६.२ रामनवमी

चैत्र शुद्ध नवमीच्या दु.१२ वा. रामजन्मोत्सव साजरा केला जातो. त्यावेळी रामाची मूर्ती पाळण्यात घालून किर्तनकार आईची भूमिका बजावून त्याला झोके देतात. तालुक्यातील किन्हई, जरंडेश्वर, कोरेगाव, रहिमतपूर याठिकाणच्या राममंदिरात रामजन्मोत्सव साजरा केला जातो. या दिवशी सर्व भक्तांना सुंठवडा व तीर्थप्रसाद देण्यात येतो. रात्रंदिवस भजन–किर्तन चालते.

### ४.६.३ गौरी पूजन

गणपती समवेत गौरीचे आगमन होत असते. स्त्रिया मोठया थाटाने गौरीपूजा करतात. स्त्रिया मोठया उत्साहाने गौरीसमोर सजावट करतात. याप्रसंगी स्त्रिया एकमेकांना हळदी–कुंकू लावण्याकरिता बोलावतात. हा सण स्त्रियांचा असला तरी सर्व समाज यात गढून गेल्याचे चित्र दिसते. या सणादिवशी जिल्हयातील सर्व स्त्रिया हळदी–कुंकूसाठी एकमेकींच्या घरी जातात. अक्षयतृतीया दिवशी हळदी–कुंकवाचा शेवटचा दिवस असतो. यानंतर गौरी आपल्या माहेरी जाते असा समज आहे.

### ४.६.४ अक्षयतृतीया

अक्षयतृतीया हा सण साडेतीन मुहूर्तापैंकी अर्धा मुहूर्त मानला जातो. वैशाख शुद्ध तृतीयेस हा सण साजरा केला जातो. या दिवशी हिंदू धर्मातील सर्व लोकांप्रमाणे कोरेगाव तालुक्यातही लोकही पितरांची पूजा करून कलश दान करतात. शेतकरी शेतीच्या कामांचा शुभारंभ करतात.[९५]

### ४.६.५ बेंदूर

बेंदूर म्हणजे पोळा हा सण होय. शेतकऱ्यांचा हा सण आषाढ शुद्ध त्रयोदशीला साजरा केला जातो. रात्री बैलांच्या मानेस तेल लावून खांद मळणी करतात. सणाच्या दिवशी शेतकरी आपल्या बैलांना आंघोळ घालतात. त्यांच्या शिंगांना रंग लावतात. शिंगे रंगविण्यासाठी जो रंग वापरला जातो त्यास स्थानिक भाषेत 'हिंगुळ' असे म्हणतात. शिंगांना बेगडीचे कागद, रंगीत कापडी गोंडे आणि पताका बांधतात. तसेच पाठीवरही विविध रंगाचे छाप टाकून नक्षीने सजवितात. बैलांना आंबील–घुगऱ्या किंवा बाजरीच्या पिठाचे उंडे खायला देतात. बैलांच्या अंगावर झुली टाकून वाजतगाजत संपूर्ण गावातून मिरवणूक काढली जाते. ही मिरवणूक पाहण्यासाठी आबालवृद्ध गर्दी करतात. घरी आणल्यानंतर बैलांची व मालकाची सुवासिनीकडून ओवाळणी केली जाते. बैलांना पुरणपोळीचा नैवद्य दिला जातो.[९६]

### ४.६.६ नारळी पौर्णिमा

श्रावण शुद्ध पौर्णिमेच्या दिवशी नारळी पौर्णिमा साजरी केली जाते. वरूण देवतेची पूजा म्हणून या दिवशी गावातल्या नदी किंवा तलावात नारळ अर्पण केला जातो. या दिवशी यजुर्वेदी किंवा अथर्ववेदी ब्राह्मण उपाकर्म म्हणजे श्रावणी करतात. तालुक्यातील शेतकरी समाजात हा दिवस पोवत्याची पौर्णिमा म्हणून ओळखला जातो. या दिवशी स्त्रिया कापसाचे सुत काढून ते हळदीत बुडवून पुरूषांच्या गळयात बांधतात व उपवास करतात. त्याचप्रमाणे घरातील दिव्यांच्या व शेतीतील अवजारांभोवती सुत गुंडाळतात. हा दिवस फार पूर्वीपासून रक्षाबंधनाचा दिवस म्हणून ओळखला जातो. या दिवशी संपूर्ण भारतात बहीण आपल्या भावाला सुताचा धागा म्हणजे राखी बांधून, तिलक लावून त्याची ओवाळणी करते. भाऊ आपल्या बहिणेचे सदैव रक्षण करण्याचे वचन बहिणीला देतो.[९७]

### ४.६.७ गणेश चतुर्थी

दरवर्षी भाद्रपद शुद्ध चतुर्थीपासून ते अनंतचतुर्दशीपर्यंत हा सण साजरा केला जातो. गणपतीला पुराणांमध्ये प्रथम आराध्य दैवत म्हणून मान्यता मिळालेली आहे. सर्व कार्यात श्री गणपतीची पूजा केल्याशिवाय कार्य आरंभ होत नाही. लोकमान्य टिळकांनी इ. स. १८९३ साली सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यास सुरूवात केली. यापूर्वी गणेशोत्सव हा आपापल्या घरापुरता मर्यादित होता. त्यास लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक उत्सवाचे रूप दिले. टिळकांनी या उत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्रीयन लोकांमध्ये राष्ट्रवाद निर्माण केला.[९८]

गणेश चतुर्थाला गणेश मुर्तीची स्थापन केली जाते. या मुर्ती बनविण्याचे कामास कलाकार व मुर्तीकारांमार्फत गणेश चुतर्थीच्या सहा महिने पूर्वीपासून सुरूवात केली जाते. कलाकार मातीच्या अतिशय आकर्षक अशा मुर्ती बनवितात. विविध रूपांमध्ये श्री गणेशाच्या मुर्ती बनविल्या जातात. या मातीच्या मुर्ती मोठया समारंभाने घराघरात तसेच सार्वजनिक मंडळाच्या प्रतिष्ठापना ठिकाणी स्थापन करून मुर्तीचे पुजन केले जाते. घरातील गणपती दीड, पाच, सात व दहा दिवस ठेवतात. या दिवसात श्री गणेशाची दररोज पूजा–अर्चा, आरती केली जाते. श्री गणेशाला अतिप्रिय असणाऱ्या मोदकाचा नैवेद्य दाखविला जातो. याप्रसंगी कथा, किर्तन, गायन, वादन, नृत्य, प्रबोधनपर नाटक यासारख्या कला सादर केल्या जातात. अशा तऱ्हेने दहा दिवस गणेशाची वंदना करून अनंतचतुर्दशीला मोठया समारंभपूर्वक निरोप देऊन मुर्ती समुद्र, नदी अथवा तलावात विसर्जित केली जाते.[९९] तसेच श्री गणेशाची पुढच्या वर्षी लवकर येण्याची विनंती केली जाते.

या उत्सवामुळे समाजात राष्ट्रवादाची व एकतेची भावना निर्माण होऊन विशिष्ट वर्गाला रोजगार मिळतो. अलिकडील काळात मुर्ती बनविण्यासाठी मातीऐवजी प्लास्टर ऑफ पॅरीसचा (पीओपी) वापर केला जातो. तसेच रासायनिक रंग वापरल्याने मुर्ती विसर्जनानंतर नदी व तलावाचे प्रदुषण वाढत आहे. याचे प्रबोधन होणे काळाची गरज बनली आहे.

गणेशचतुर्थीनंतर तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशी पितळेचा किंवा मातीचा मुखवटा घालून गौरीची स्थापना करतात. गौरी स्थापनेनंतर तिसऱ्या दिवशी तिचे विसर्जन करतात. यावेळी स्त्रिया उपवास करतात व एकमेकीस हळदी–कुंकू लावतात.

### ४.६.८ दसरा

अश्विन शुद्ध प्रतिपदेला नवरात्रोत्सवाचा प्रारंभ होऊन दहाव्या दिवशी म्हणजेच विजयादशमी किंवा दसऱ्याला समाप्ती होते. साडेतीन मुहूर्तापैकी हा एक मुहूर्त असल्याने समाजातील सर्व थरातून हा सण साजरा केला जातो. तालुक्यातील शेतीची कामे करणारी लोकं आपल्या हत्यारांची साफसफाई करून त्यांची पूजा करतात. घोडयाला सजवून गावोगावी सीमेलगत असणाऱ्या 'शमी' या वृक्षाची पूजा केली जाते. शमीची पाने सोने म्हणून लुटून आणून परस्परांना देतात. याला सोने लुटणे असे म्हणतात. सोने लहानांनी थोरांना देण्याची प्रथा आहे.[१००]

### ४.६.९ दिवाळी

दिवाळी अथवा दीपावली अश्विन महिन्याच्या वद्य त्रयोदशीपासून सुरू होऊन कार्तिक शुद्ध द्वितीयेला संपते. या पाच दिवशी घरोघरी आकाशकंदील व मातीच्या पणत्या लावतात. धनत्रयोदशीपासून लाडू, करंज्या, चकल्या, चिवडा इत्यादि फराळाचे पदार्थ तयार करतात. दुसऱ्या दिवशी नरकचर्तुदशीला घरातील सर्व माणसे अभ्यंगस्नान करतात. अमावस्येला लक्ष्मीपूजन होते. या दिवशी व्यापारी व कारखानदार इष्टमित्रांना व ग्राहकांना बोलावतात. त्याप्रसंगी मिठाई व भेटवस्तू देतात. कार्तिक शुद्ध प्रतिपदेला 'बलिप्रतिपदा' पाडवा म्हणतात. या दिवशी बळी या दैत्यराजाला वामनाने पाताळात दडपले अशी कथा आहे. या दिवशी स्त्रिया आपल्या पतीला ओवाळतात. भाऊबीज अथव यमद्वितीया हा दिवाळीचा शेवटचा दिवस. या दिवशी बहीण भावाला आपल्या घरी जेवायला बोलावून त्याला ओवाळते. भाऊ तिला यथाशक्ती भेटवस्तू देतो.[१०१]

### ४.६.१० मकरसंक्रांत

सुर्य मकर राशीत जानेवारीच्या १४ तारखेपर्यंत प्रवेश करतो. या दिवशी मकरसंक्रांत हा सण साजरा केला जातो. तो पौष या महिन्यात येतो. या दिवशी कुंभाराकडून आणलेल्या सुगडांची सुवासिनी पूजा करतात. सुवासिनी सुगड कडेवर धरून मंदिरात जातात व एकमेकांना भेटवस्तू देतात. त्यात ऊसाचे तुकडे, हरभऱ्याचे घाटे, बोरे, गाजर ठेवतात. या दिवशी तिळगुळ वाटले जाते.

### ४.६.११ होळी (शिमगा)

फाल्गुन शुद्ध पौर्णिमेच्या रात्री होळी सजविली जाते. त्यासाठी लाकडे, गोवऱ्या, नारळाचे हार लावले जातात. त्यानंतर होळी गावातील प्रतिष्ठित व्यक्तीकडून पेटवली जाते. होळी पेटविल्यानंतर तिची पूजा करतात. या दिवशी पुरणपोळी हे मिष्टान्न करून ती होळीला अर्पण करतात. दुसऱ्या दिवशी धुलिवंदनाचा सण साजरा केला जातो. पूर्वी होळीला एकमेकांच्या खोडया करणे, रंग खेळणे, होळीची राख एकमेकांच्या अंगावर फेकणे हया गोष्टी केल्या जात. अलिकडच्या काळात शहरी भागात त्याचे प्रमाण कमी झाले आहे. परंतु ग्रामीण भागातले लोक अजूनही होळी (शिमगा) हा सण पाच दिवस साजरा करतात. पाचव्या दिवशी रंगपंचमी साजरी करतात. यावेळी एकमेकांवर रंग उडवितात.[१०२]

### ४.६.१२ जत्रा

त्याचप्रमाणे त्गावातील ग्रामदेवतेचे उत्सव साजरे करण्यासाठी गावात यात्रा भरविली जाते. या यात्रा गावातील ग्रामदेवता भैरवनाथ, श्री मुधाईदेवी, श्री यमाईदेवी, भैरोबा अशा विविध देवीदेवतांच्या नावाने साजऱ्या केल्या जातात. या प्रसंगी यात्रेच्या आदल्या दिवशी देवीच्या नैवेद्यासाठी पुरण पोळीचा स्वयंपाक केला जातो. तसेच गोड पदार्थ बनविले जातात. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी मात्र घरोघरी मटनभाकरी बनविली जाते व आपल्या आपेष्ट व मित्रांना भोजनासाठी बोलाविले जाते. कोरेगाव तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये अशा प्रकारच्या यात्रा प्रसिद्ध आहेत. या प्रसंगी लहान मुलांसाठी खेळण्यांची दुकाने, स्त्रीयांसाठी सौंदर्य प्रसाधनांची दुकाने, दैनंदिन जीवनासाठी लागणाऱ्या गरजेच्या वस्तू, मसाल्याचे पदार्थ विक्रीला येत असतात. यात्रेची परंपरा अनेक वर्षांपासून कोरेगाव तालुक्यातील गावामध्ये आहे. यात्रेप्रसंगी विशेष म्हणजे गावातील लोकांकडून वर्गणी गोळा करून तमाशाचे आयोजन केले जाते. भिका–भिमा, सुरेखा पुणेकर यासारख्या नामवंत कलावंतांना भरपूर रक्कम देऊन यात्रेप्रसंगी तमाशाचे आयोजन केले जाते. यात गावातील पाटील व नामवंत व्यक्ती विशेष सहभाग घेतात. स्त्रीया मात्र तमाशा पहायला जात नाही.[१०३]

कोरेगाव तालुका ग्रामीण परिसरात मोडत असल्याने येथे प्राचीन काळापासून सण–उत्सव, जत्रा साजरे करण्याची परंपरा आहे. यामुळे समाजातील लोकांची दैनंदिन दिनक्रमातून

सुटका होऊन त्यांची करमणूक होते. तसेच सामाजिक, धार्मिक एकोपा निर्माण होऊन राष्ट्रवादाला चालना मिळते.

### ४.७ संगीत व नृत्यकला

कोरेगाव तालुक्यात तमाशा हे करमणुकीचे लोकप्रिय साधन होते. यात नाच, गाणी, विनोदी संवाद याद्वारे करमणूक केली जाते. यात भाडळेकर तमाशा मंडळ, भाडळे, साहेबराव नांदवळकर लोकनाटय तमाशा मंडळ यासारखे तमाशा मंडळ हे कोरेगाव तालुक्यातील ३० ते ४० टक्के गावामध्ये आहेत. हे लोककलेच्या माध्यमातून मनोरंजन व प्रबोधनत्मक कार्यक्रम करतात. त्याचबरोबर गोंधळ, वाघ्या–मुरळी, बहुरूपी दशावतार, वासुदेवाची गाणी, भेदिक लावणी असे विविध धार्मिक विधीनाटये अस्तित्वात होती. ही मंडळे धार्मिक विधीप्रसंगी जागरण गोंधळ करतात.[१०४]

त्याचप्रमाणे भजन, किर्तन, जलसे, तमाशा व करमणुकीचे इतर कार्यक्रम साजरे केले जातात. देवालयामध्ये किर्तने, प्रवचन व भजनाचे कार्यक्रम होत असतात. किर्तन रंगविण्यासाठी मृदंग, चिपळया, टाळ, हार्मोनियम या वाद्यांचा उपयोग केला जातो. भजन किर्तनाप्रमाणे गोंधळी लोक देवी अंबाबाईच्या (मुधाईच्या) नावाने गोंधळ घालतात. गोंधळाच्यावेळी संबळ, तुणतुणे व झांज ही वाद्ये वाजविली जातात. तर एकजण दिवटी धरून नाचवत असतो. तसेच संपूर्ण तालुक्यात दरवर्षी सप्ताहाचा कार्यक्रम घेतला जातो. यावेळी भागातील विविध ह. भ. प. यांचे प्रवचन घेतले जातात. याशिवाय चौघडा, नगारा, सनई, सूर, शिंग, एकतारी, वीणा, तंबोरा, सारंगी, सतार, तबला, मृदूंग इत्यादि वाद्यांचा उपयोग करमणुकीच्यावेळी केला जातो.

कोरेगाव तालुक्यात तमाशा हे करमणुकीचे लोकप्रिय साधन होते. यात नाच, गाणी, विनोदी संवाद याद्वारे करमणूक केली जाते. यात भाडळीकर तमाशा मंडळ, भाडळे, साहेबराव नांदवळकर लोकनाटय तमाशा मंडळ यासारखे तमाशा मंडळ हे कोरेगाव तालुक्यातील ३० ते ४० टक्के गावामध्ये आहेत. हे लोककलेच्या माध्यमातून मनोरंजन व प्रबोधनत्मक कार्यक्रम करतात. त्याचबरोबर गोंधळ, वाघ्या–मुरळी, बहुरूपी दशावतार, वासुदेवाची गाणी, भेदिक लावणी असे विविध धार्मिक विधीनाटये अस्तित्वात होती. ही मंडळे धार्मिक विधीप्रसंगी जागरण गोंधळ करतात.[१०५]

## ४.८ कोरेगावातील किर्तन परंपरा

### ४.८.१ किर्तन परंपरा

कोरेगाव तालुक्याने अनेक किर्तनकार तयार केले. वारकरी संप्रदायातील साताऱ्याचे हरिभक्त परायण ठाकूरदास बुवा, गोंविदस्वामी आफळे, बाळासाहेब साठे, भाऊराव जोशी त्रिंबकबुवा रामदासी, राशीनकर बुवा, कोपरकरबुवा, काका देवधर, रामचंद्रबुवा, सावदेकर गुरूजी, गोविंदराव मटंगे इत्यादि किर्तनकरांनी आपल्या किर्तनांच्या माध्यमातून वेगवेगळया भागातील समाजजीवन ढवळून काढले. राघूअण्णा धोपाटे, पागनिस गुरूजी, इत्यादि प्रवचनकारांनी कोरेगाव व कोरेगावच्या आसपासच्या भागात आपल्या प्रवचनाच्या माध्यमातून सांस्कृतिक प्रबोधन घडवून आणले. त्याचबरोबर वारकरी संत परंपरेतील सतगुरू दादा महाराज सातारकर, बाबा महाराज सातारकर यासारख्या मंडळींनी किर्तन व प्रवचनाच्या माध्यमातून समाजात ज्ञानेश्वरी संप्रदायाचा प्रचार व प्रसार केला.[१०६]

रहिमतपूर येथील राधाकृष्ण स्वामी या योगी पुरूषाने महाराष्ट्रामध्ये सर्वप्रथम करंडढोल भजनप्रथा सुरू केली. त्यासाठी त्यांनी भक्तीपर कवने रचली. आजही करंडढोल भजनामध्ये त्यांचीच कवने गायिली जातात.[१०७]

## ४.९ कोरेगाव तालुक्यातील शिक्षण व्यवस्था

कोरेगाव तालुक्याने सत्यशोधक चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान दिले असून त्यामुळे कोरेगाव तालुक्यात अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, जातीभेद यादृष्टीने समाजात सुधारणा घडून आली. त्याचबरोबर कोरेगाव तालुक्यातील समाजाचा विकास घडून येण्यात येथील शैक्षणिक संस्थाचाही महत्त्वपूर्ण वाटा आहे.

### ४.९.१ प्राथमिक शिक्षण

शिक्षणाच्या दृष्टीने सातारा जिल्हयाचा विचार केला असता सन १८५५–५६ देशी भाषेच्या २५ शाळा व इंग्रजी १ शाळा होती. प्रतापसिंह हायस्कूल या इंग्रजी भाषेच्या शाळेची स्थापना इ. स. १८५१ मध्ये झाली. तेव्हा या शाळेतील विद्यार्थी संख्या १८३४ होती. तर १८६५–६६ मध्ये मुलींसाठी कन्या शाळा स्थापन झाली. तेव्हा एकूण सातारा जिल्हयात १०३ व्हर्नाक्युलर व १ ॲग्लो व्हर्नाक्युलर शाळा होती.

कोरेगाव तालुक्याचा विचार केला असता या तालुक्यात इ. स. १८८२–८३ मध्ये तालुक्यातील प्राथमिक शाळांची संख्या खालीलप्रमाणे होती.[१०८]

| तालुका | गावांची संख्या | लोकसंख्या | शाळा |
|---|---|---|---|
| कोरेगाव | ०७३ | ७५१०५ | २४ |

स्वातंत्र्यानंतर पश्चिम महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांनी सहकारी संस्था आणि शैक्षणिक संस्थांच्या स्थापनेसाठी प्रयत्न केले. देऊर हे गाव सातारा जिल्हयातील कोरेगाव तालुक्याच्या उत्तरेस डोंगराळ व दुष्काळी भागातील गाव. येथे प्राथमिक शाळा इ. स. १८७१ मध्ये स्थापन झाली.[१०९] कोरेगाव एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक कै. शंकरराव जगताप यांचा जन्म कोरेगाव तालुक्यातील वाघोली येथे डोंगराळ व दुर्गम भागात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण वाघोलीला झाले व पुढील शिक्षण वाई व पुणे येथे झाले. गोरगरीबांच्या मुलांच्यासाठी त्यावेळी कोरेगाव तालुक्यात विविध शिक्षण संस्था कार्यरत होत्या. तरी सुध्दा डोंगर व दुर्गम भागात काही गावे वस्तीशाळेपासून वंचित होती. अशा ठिकाणी त्यांनी शाळा काढून ज्ञानगंगा खुली केली.[११०]

स्वातंत्र्यपूर्वकाळातील शाळांच्या तुलनेत स्वातंत्र्यानंतर आजतागायत तालुक्यातील शाळांची संख्या ही कमालीची वाढलेली आहे. आज शिक्षणाबाबतीत समाजाचा सकारात्मक दृष्टिकोन झालेला असून प्रत्येक गावामध्ये किमान एक जिल्हा परिषदेची मराठी शाळा आहे. तसेच गावाच्या लोकसंख्येनुसार शाळांचीही संख्या वाढलेली आहे.

### ४.९.२ माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण

कोरेगाव तालुक्यात स्वातंत्र्योत्तर काळात प्राथमिक शिक्षणाच्या विस्ताराबरोबरच माध्यमिक शिक्षणाचाही विस्तार मोठया प्रमाणात झालेला आहे. त्यात आदर्श शिक्षण संस्था, रहिमतपूरचे आदर्श विद्यालय, रहिमतपूर, स्थापना. जून १९६८, कमंडलू शिक्षण संस्था रहिमतपूरचे वसंतदादा पाटील, रहिमतपूर, स्थापना १० जून १९७०, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सातारारोडचे डॉ. गदगकर हायस्कूल, सातारारोड, स्था. १९६३, मॉडर्न एज्यु. सोसायटी, कोरेगावचे न्यु सरस्वती इंग्लिश स्कूल कोरेगाव, स्था. २ जून, १९४१, रयत शिक्षण संस्था साताराचे शेतकरी हायस्कूल, तारगाव, स्था. १२ जून, १९५५, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरचे श्री अंबामाता विद्यालय, वाठार किरोली, स्था. १० जून, १९५८, श्री मुधाईदेवी शिक्षण संस्था देऊरचे श्री मुधाईदेवी विद्यामंदिर, देऊर, स्था. १ जून, १९५६,

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरचे श्री काळेश्वर हायस्कूल, चिमणगाव, स्था. जून, १९६०, रयत शिक्षण संस्था, साताराचे आर. ही. तारळकर हायस्कूल, भाडळे, स्था. जून, १९६०, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरचे श्री सिद्धेश्वर विद्यालय, साप, स्था. १८ जून, १९६१, श्री शिवाजी विद्यामंदिर, शिरंबी, स्था. १२ जून, १९६१, श्री वाग्देव विद्यालय, वाठार स्टे., स्था. जून, १९६३, न्यू इंग्लिश स्कूल, कुमठे, स्था. जून, १९६०, भीमाशंकर शिक्षण प्रसारक मंडळ आर. व्ही. चे श्री समर्थ विद्यालय आर. व्ही., स्था. जून १९६७, कृष्णाबाई शिक्षण प्रसारक मंडळ, धामणेरचे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, धामणेर, स्था. १२ जून, १९७२, न्यू एज्यु.सोसायटी, कराडचे श्री सिध्देश्वर हायस्कूल तडवळे, स्था. १० जून, १९७१, रयत शिक्षण संस्था, साताराचे न्यू इंग्लिश स्कूल, करंजखोप, स्था. जून, १९५७, रयत शिक्षण संस्था, साताराचे न्यू इंग्लिश स्कूल, रूई, स्था. १२ जून, १९६७, रयत शिक्षण संस्था, साताराचे न्यू इंग्लिश स्कूल, पिंपोडे बु., जून, १९६८, रयत शिक्षण संस्था, साताराचे कर्मवीर विद्यालय, किन्हई, स्था. ९ जून, १९६०, श्री संत गाडगे महाराज मिशन, मुंबईचे श्री गाडगे महाराज पोस्ट बेसिक आश्रमशाळा, रहिमतपूर, स्था. १० जून, १९७४, कोरेगाव एज्युकेशन सोसायटी, चौंडेश्वरी एज्युकेशन सोसायटी, रहिमतपूरचे सौ.एस.पी.फडतरे कन्या प्रशाला इत्यादि शाळा स्थापन केल्या गेल्या.[१११] या शाळांना जोडूनच पुढील काळात अनेक ठिकाणी कनिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यात आले. या शाळा ग्रामीण भागात आजही पहावयास मिळतात. यांच्या माध्यमातून तळागाळातील समाजपर्यंत शिक्षण जाऊन पोहोचले. व त्याच्या माध्यमातून कोरेगाव तालुक्यातील लोकांचा सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिकदृष्टया विकास घडून आलेला आहे.

### ४.९.३ उच्च शिक्षण

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सातारा जिल्हयातील काले ता. कराड या गावी इ. स. १९१९ मध्ये 'रयत शिक्षण संस्थेची' स्थापना केली.[११२] याच संस्थेचे डी. पी. भोसले महाविद्यालय, कोरेगाव, आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे रहिमतपूरचे सहकार महर्षि शंकरराव मोहिते–पाटील महाविद्यालय, रहिमतपूर, स्वामी विवेकानंद संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाठार स्टे., श्री मुधाईदेवी शिक्षण संस्थेचे श्री मुधाईदेवी विद्यामंदिर, देऊर, श्री.मा.कृ.माने कनिष्ठ महाविद्यालय, देऊर, प्रा.संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर

यासारख्या संस्था कार्यरत आहेत. या महाविद्यालयांच्या स्थापनेमागील उद्दिष्ट असे होते की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दूरवर शहरात शिक्षण घेण्यासाठी जावे लागत असे. त्यात आर्थिकदृष्ट्या कमकुवत मुलामुलींना शिक्षणापासून वंचित राहावे लागे. या महाविद्यालयांच्या स्थापनेमुळे ग्रामीण व दुष्काळी भागातील मुलामुलींची उच्च शिक्षणाची सोय गावात व गावाजवळच झाली. त्यातून शिकून ग्रामीण भागातील लोकांचे राहणीमान उंचावले. तसेच शिक्षणामुळे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक दर्जा उंचावला.

## ४.१० कोरेगाव तालुक्याची इतर तालुक्यांशी तुलना

कोरेगाव तालुक्याप्रमाणेच कराड व वाई तालुक्यातही प्राचीन व मध्ययुगीन काळातील अनेक देवदेवतांची मंदिरे पहावयास मिळतात. ही मंदिरे आधुनिक काळातही चांगल्या पद्धतीने जोपासलेली पाहावयास मिळतात. त्यांचा वेळोवेळी जिणोद्धार केलेला आढळतो. कोरेगाव तालुक्यातील अनेक प्राचीन व मध्ययुगीन मंदिरांचा जिर्णोद्धार झालेला पहावयास मिळतो.[११३]

कोरेगाव तालुक्यातील मंदिरांना आपला स्वतंत्र असा इतिहास आहे. त्याच प्रकारचा इतिहास आपणास कराड व वाई तालुक्यातील मंदिराचा पहावयास मिळतो. याचबरोबर सातारा जिल्हयातील कराड व वाई तालुक्यातील लोक जे सण व उत्सव साजरे करत होते त्याच प्रकारचे सण व उत्सव कोरेगाव तालुक्यातही साजरे केले जातात. कोरेगाव विभागातील सण, उत्सव, खेळ व करमणूक यामुळे कोरेगाव तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे ठरले आहे. त्याचप्रमाणे वाई व कराड तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी तेथील शैक्षणिक संस्थांनी फार मोठी कामगिरी केलेली पहावयास मिळते. यावरून हे स्पष्ट होते की, सातारा जिल्हयातील सर्व तालुक्यात चालीरिती, रूढी, परंपरा, शिक्षणाची परंपरा सर्वत्र सारखीच दिसून येते.[११४]

## ४.११ समारोप

कोरेगाव तालुक्यात अनेक लहान–मोठी मंदिरे आहेत. यातील काही मदिरांची पडझड झालेली आहे तर काही मंदिरे अजूनही सुस्थितीत आहेत. यातील बहुसंख्य मंदिरे डोंगरावर किल्लेवजा बांधलेली आहेत. शंभू महादेव डोंगर श्रेणीचा दक्षिणेकडच्या कृष्णा खोऱ्यातील पूर्वेकडील भागात व कोरेगाव तालुक्याच्या उत्तर सीमेवर श्री चवणेश्वर देवस्थान, मध्ययुगीन काळात निर्मिलेले यमाई देवीचे मंदिर शत्रूच्या आक्रमणापासून सुरक्षित करण्यासाठी हे मंदिर

टेकडीवर बांधले गेले असून या मंदिराला चोहोबाजूंनी तटबंदी असल्याने मंदिराला गडाचे स्वरूप प्राप्त झालेले आहे.

या मंदिरांना आपला स्वतंत्र असा इतिहास आहे. या मंदिरांनी मध्ययुगीन काळात जेव्हा हिंदू धर्माला अवकळा आली होती. यवनांचे राज्य सर्व देशभर पसरले होते. त्यावेळी हिंदू धर्म व हिंदू धर्मियांना तसेच महाराष्ट्र राज्याला संजीवनी देण्यासाठी सज्जनगड, जरंडेश्वर, चवणेश्वर व यमाई अशा अनेक ठिकाणी देवदेवतांच्या मंदिराची स्थापना झालेली आहे. या मंदिरानी सातारा जिल्हा व कोरेगाव विभागातील सांस्कृतिक इतिहासात भर घातली आहे. तसेच समाजातील लोकांमधील न्युनगंडाची भावना दूर करून समाजास नवसंजीवनी देण्याचे कार्य केले आहे. आजही या मंदिरांमध्ये नैमित्तिक पूजाविधी व यात्रा उत्सव, नामजप नित्यनियमाने केले जात असून सांस्कृतिक परंपरा जपण्याचे कार्य चालू आहे. यातील काही मंदिराविषयीची माहिती सातारा गॅझेटियर मध्येही दिलेली नाही. या दुर्लक्षित देवस्थानाचा इतिहास समाजापुढे आणण्याचा प्रयत्न या प्रकरणात केलेला आहे.

याचबरोबर कोरेगाव विभागातील सण उत्सव, खेळ व करमणूक, शैक्षणिक संस्थांनी केलेले कार्य कोरेगाव तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे ठरले आहे. तसेच सण, उत्सव, यात्रा साजरी करणे, गोंधळ, सुवासिनी घालणे या गोष्टी नित्यनियमाने केल्या जातात. या मंदिराच्या वास्तव्यातून लोकांच्या मनामध्ये भक्तीभाव, प्रेमभाव व शांततेचे भाव निर्माण होऊन गावात सामाजिक सलोख्याचे वातावरण राहते. याचबरोबर भजन, किर्तन, भावगीत, वासुदेव, गोंधळ, वाघ्या–मुरळी यातून समाजाचे करमणूक, प्रबोधन तसेच संस्कृतीचे जतन आजही केले जात आहे. यातून समाजात नैतिक मूर्तीची जपणूक होत आहे. तसेच धार्मिक स्थळांमुळे समाजात एकोपा निर्माण झालेला दिसून येतो. हिंदू–मुस्लिम हे एकमेकांच्या धार्मिक रीती–रिवाजात सहभागी होतात. प्रवचनकारांनी समाजातील अनिष्ट रूढी–परंपरांविरूध्द आवाज उठविला व इंग्रजांच्या भारत प्रवेशानंतर मात्र आधुनिक शिक्षणास सुरूवात झाली. त्यातून ग्रामीण भागात खेडोपाडयांपर्यंत प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन शिक्षण पोहोचले. त्यातून ग्रामीण भागातील समाजाचा सर्वांगीण विकास घडून आलेला दिसून येतो.

**संदर्भ**


१. पाठक अरूणचंद्र (संपा.), 'महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सातारा जिल्हा', सुधारित आवृत्ती, १९९९, पृ. ०४

२. कित्ता, १९९९, पृ. ०९

३. चवणेश्वर डोंगरावर प्रत्यक्ष पाहणी व सर्वेक्षण दि. १४.०६.२०१५, स्थळ : चवणेश्वर, वेळ : दु .३.०० वा.

४. मुलाखत–चवणेश्वर मंदिराचे पुजारी श्री. राजेंद्र बाबूराव पवार, दि. १४.०६.२०१५, वेळ : दु. ४ वा., स्थळ : चवणेश्वर

5. Dowson John (2004), A classical dictionary of Hindu mythology and religion, geography, history, Delhi : Asian Educational services P. 73

६. जिल्हाधिकारीसाो. आदेश, पर्यटन स्थळांचे विकास कार्य २००५–०६, मौजे चवणेश्वर येथे भाविकांसाठी व पर्यटन स्थळांचे बहुउद्देशीय हॉल बांधणेकामी, प्र. मा. भा. २००५–०६

७. चवणेश्वर मंदिरात प्रत्यक्ष पाहणी व सर्वेक्षण १४.०६.२०१५, वेळ : दु. ३.०० वा., स्थळ : चवणेश्वर

८. चवणेश्वर येथील श्री महादेव मंदिरात दि. २८ एप्रिल, २००८ रोजी लावलेल्या कोनशिलेवरून

९. चवणेश्वर डोंगरावर प्रत्यक्ष पाहणी व सर्वेक्षण १४.०६.२०१५, वेळ : दु. ३.०० वा., स्थळ : चवणेश्वर

१०. मुलाखत–चवणेश्वर मंदिराचे पुजारी श्री. राजेंद्र बाबूराव पवार, उपरोक्त

११. प्रत्यक्ष पाहणी व सर्वेक्षण १४.०६.२०१५, वेळ : दु. ३.०० वा., स्थळ : चवणेश्वर

१२. मुलाखत–चवणेश्वर ग्रामपंचायत सरपंच श्रीमती निता पवार, दि. १४.०६.२०१५, वेळ : सायं. ५ वा., स्थळ : चवणेश्वर

१३. मुलाखत–चवणेश्वर मंदिराचे पुजारी श्री. राजेंद्र बाबूराव पवार, उपरोक्त

१४. गायधनी रं. ना. व राहुरकर व. ग., प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९५५, पृ. २७–३१

१५. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. ९११

१६. कित्ता, पृ. ७६१

१७. किन्हई येथील गडाची प्रत्यक्ष पाहणी व सर्वेक्षण १२.०७.२०१५, वेळ : दु. ३.०० वा., स्थळ : किन्हई

१८. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. ७६१

१९. प्रत्यक्ष पाहणी व सर्वेक्षण दि. १२.०७.२०१५, वेळ : दु. ३.०० वा., स्थळ : किन्हई

२०. किन्हई देवस्थानाला युनेस्कोकडून मिळालेला 'बेस्ट रिनोवेशन वर्क–२०१४' चा पुरस्कार, पुणे, २८ फेब्रुवारी, २०१५

२१. मुलाखत–किन्हई मंदिराचे पुजारी डॉ. सिताराम कालीदास अयाचित, दि. १२.०७.२०१५, वेळ : दु. ४ वा., स्थळ : किन्हई

२२. सरदेसाई गो. स. 'मराठी रियासत' खंड–२,१९८८, पृ. २३५

२३. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. ७३६

२४. कित्ता, पृ. ७६०

२५. मुलाखत–किन्हई मंदिराचे पुजारी डॉ. सिताराम कालीदास अयाचित, उपरोक्त

२६. 'ब' तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रम २०१२–१३ अंतर्गत मा. आमदार शशिकांत शिंदे यांच्या प्रयत्नातून केलेले संरक्षक भिंतीचे बांधकामाचा बोर्डावरून 'ब' वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा मिळालेला आहे असे समजते.

२७. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. ०४

२८. कित्ता, पृ. ०९

२९. प्रत्यक्ष माहिती व सर्वेक्षण दि. ०७.०२.२०१५, स्थळ : जरंडेश्वर देवस्थान, सातारारोड पाडळी

३०. लांजेकर रूपा, सातारा जिल्हयातील प्रेक्षणीय स्थळे, २००३, पृ. ९६

३१. प्रत्यक्ष पाहणी व सर्वेक्षण दि. ०८.०२.२०१५, उपरोक्त

३२. मुलाखत – संत श्री. शंकर फाळके महाराज दि. ०८.०२.२०१५, वेळ स. ९.०० वा., वेळ : दु. १ वा., स्थळ : जरंडेश्वर देवस्थान, साताररोड पाडळी

३३. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि. ०९.०२.२०१५, उपरोक्त

३४. मुलाखत – श्री मारूती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष श्री. तानाजी पांडुरंग फाळके, दि. ०८.०२.२०१५, वेळ : सायं. ६ वा., स्थळ : साताररोड

३५. कित्ता

३६. माटे श्री. म., संत, पंत व तंत, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, १४ नोव्हे.२००६, पृ. २०२–२०५

३७. घटना – श्री मारूती जरंडेश्वर देवस्थान, पाडळी स्टेशन, पृ. १, २

३८. कदम संभाजीराव (संपा.), श्री मुधाईदेवी शिक्षण संस्था, देऊर, सुवर्ण महोत्सवी स्मरणिका, २००६, पृ. ३०

३९. शेलार अशोक, लोकदैवत, आंतरविद्याशाखीय मराठी राष्ट्रीय चर्चासत्र पुस्तिका, डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव, डिसें. २०१३, पृ. २७०–२७१

४०. कदम संभाजीराव (संपा.), श्री मुधाईदेवी शिक्षण संस्था, देऊर, स्मरणिका, उपरोक्त, पृ. १७

४१. कित्ता, पृ. ३३–३४

४२. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. ७८१

४३. प्रत्यक्ष सर्वेक्षण व पाहणी दि. १०.०५.२०१५, वेळ सायं. ६.०० वा., स्थळ : देऊर

४४. मुलाखत – गुरव पंढरीनाथ (सालकरी पुजारी, श्री मुधाईदेवी मंदिर) देऊर, दि. ०६.०५.२०१५, वेळ सायं. ५.०० वा., स्थळ : देऊर

४५. कित्ता

४६. मुलाखत–रोकडे अनिल (सेवक) देऊर, दि. ०७.०५.२०१५, वेळ : सायं. ५.०० वा., स्थळ : देऊर

४७. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. ७७३–७७४

४८. प्रत्यक्ष सर्वेक्षण व पाहणी दि. १६.०६.२०१५ सायं. ५.३० वा., स्थळ : चिमणगाव

४९. कित्ता

५०. मुलाखत–पुजारी श्री काळेश्वर मंदिर, चिमणगाव, १६.०६.२०१५, वेळ : सायं. ७.०० वा., स्थळ : चिमणगाव

५१. प्रत्यक्ष सर्वेक्षण व पाहणी दि. १६.०६.२०१५ वेळ : सायं. ५.३० वा., स्थळ : चिमणगाव

५२. सातारा जिल्हा गॅझेटियर, उपरोक्त, २०१२, पृ. ७७४

५३. प्रत्यक्ष सर्वेक्षण व पाहणी दि. १६.०६.२०१५ सायं. ५.३० वा., स्थळ : चिमणगाव

५४. चिमणगाव ग्रामपंचायत कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीवरून

५५. सातारा जिल्हा गॅझेटियर, उपरोक्त, १९९९, पृ. ७७८

५६. कित्ता, पृ. ७७८

५७. चिले भगवान, गडकोट, शिवस्पर्श प्रकाशन, कोल्हापूर, द्वितीयावृत्ती मार्च २००५, पृ. ७८

५८. लांजेकर ज. रा. वाई परिसरातील प्रेक्षणीय स्थळे, मार्च २०००, पृ. २८, २९

५९. घाणेकर प्र. के., महाराष्ट्रातील गड व किल्ले, १९७९, पृ. ५८

६०. देशपांडे द. ग., महाराष्टातील किल्ले, डायमंड पब्लिकेशन, पुणे–२९ ऑक्टोबर, २००९ पृ. १०३ व १०४

६१. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. २५६, २५७

६२. कुलकर्णी अ. रा. व देशपांडे प्र. न. 'मराठयांचा इतिहास, खंड २', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ. ०४

६३. सातारा जिल्हा गॅझेटियर, १९६३, पृ. ८५४

६४. माटे गो. रा., असा घडला सातारा जिल्हा, उपरोक्त, पृ. १३२

६५. नांदगिरी, ता. कोरेगाव ग्रामपंचायतीकडून मिळालेल्या माहितीवरून

६६. दांडेकर गो. नी., किल्ले, उपरोक्त, १९८२, पृ. ५३

६७. प्रत्यक्ष पाहणी व सर्वेक्षण, दि. २६.०८.२०१५, स. ९.०० वा., स्थळ : कल्याणगड

६८. देशपांडे द. ग., महाराष्टातील किल्ले, उपरोक्त, पृ. ८१

६९. लांजेकर ज. रा., सातारा जिल्हयातील प्रेक्षणीय स्थळे, उपरोक्त, २००३

७०. दै. सकाळ, सातारा आवृत्ती, १७ जाने., २०१३, पृ. ०१

७१. कल्याणगडावरील खंडोबा मंदिर परिसरातील शिलालेखावरून.

७२. लांजेकर ज. रा. वाई परिसरातील प्रेक्षणीय स्थळे, मार्च २०००, पृ. २८

७३. दै. सकाळ, उपरोक्त, पृ. ०१

७४. माने अरूण (संपा.), श्री चौडेश्वरी एज्युकेशन सोसायटी, रहिमतपूर, रहिमतपूर वैभव, स्मरणिका, पृ. २

७५. भागवत अनंत नारायण, सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास, पुणे १९७१ पृ. ४

७६. कित्ता. पृ. ८

७७. भावे वि. ल., मराठी दप्तर, रूमाल नं. १, ठाणे १९१७, पृ. ११८

७८. सोवनी अविनाश, स्वराज्याचे छत्रपती आणि अष्टप्रधान, पुणे, १९९८, पृ. ९५

७९. सरदेसाई गो. स., पेशवा दप्तर – खंड ३०, पृ. २३०

८०. सरदेसाई गो. स., मराठी रियासत भाग ३, मुंबई १९४४, पृ. १०४

८१. चिटणीस ब. म., शाहू महाराजांचे चरित्र, ठाणे १९५६ पृ. ४४

८२. सरदेसाई गो. स., उपरोक्त, पृ. १०३

८३. कित्ता, पृ. १०४

८४. गुप्ते य. रा., कऱ्हाड, १९२७, पृ. ४६

८५. कदम संभाजीराव (संपा.), श्री मुधाईदेवी शिक्षण संस्था, देऊर, सुवर्ण महोत्सवी स्मरणिका, उपरोक्त, पृ. ३०

८६. शेलार अशोक, लोकदैवत, दोन दिवसीय आंतरविद्याशाखीय मराठी राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्र पुस्तिका, डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव, डिसें. २०१३, पृ. २७०–२७१

८७. संपा. माने अरूण, श्री चौडेश्वरी एज्युकेशन सोसायटी, रहिमतपूर, रहिमतपूर वैभव, स्मरणिका, पृ. ५–६

८८. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. ८६२

८९. रहिमतपूर नगर परिषद आयोजित, रहिमतपूरची मुद्रा, स्मरणिका, रहिमत महोत्सव समिती प्रकाशन, २०१२, पृ. १२२–१२५

९०. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. ७४०

९१. जानाईदेवी मंदिरात कोरलेल्या शिलालेखावरून, कण्हेरखेड

९२. प्रत्यक्ष पाहणी व सर्वेक्षण, सायं. ४.३० वा., स्थळ : कण्हेरखेड

९३. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. २५०

९४. सावंत व जाधव, मराठयांचा प्रशासकीय, सामाजिक व आर्थिक इतिहास, १९९७, पृ. १७८

९५. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. २५४

९६. कित्ता, पृ. २५०–२५१

९७. कित्ता, पृ.२५१

९८. खंडागळे चंद्रकांत, भारतीय समाज, खंडागळे प्रकाशन, उपरोक्त, पृ. १३०

९९. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. २५१

१००. कुलकर्णी अ. रा., खरे ग. ह., मराठयांचा इतिहास खंड २, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८५, पृ. ३१८

१०१. केतकर श्री. व्यं., महाराष्ट्रीय ज्ञानकोश, नागपूर विभाग २१, पृ. ११ व ४४३

१०२. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. २५२–२५३

१०३. मुलाखत – गुरव पंढरीनाथ (सालकरी पुजारी, श्री मुधाईदेवी मंदिर) देऊर, दि. ०६.०५.२०१५, वेळ सायं. ५.०० वा., स्थळ : देऊर

१०४. कित्ता

१०५. प्रत्यक्ष पाहणी व सर्वेक्षण, दि. १०.०९.२०१५, वेळ सायं. ७.०० वा., स्थळ : देऊर

१०६. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. ६९८

१०७. माने अरूण (संपा.), उपरोक्त, पृ. ३

१०८. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. ६४६

१०९. कदम संभाजीराव (संपा.), उपरोक्त, पृ. १२

११०. सुनिता जगताप (संपा.), आठवणींची पुष्पांजली – स्मृतीग्रंथ, प्रकाशक मुंबई, ३० सप्टेंबर २०१३, विपीन वैराट, शिक्षण, पृ. ५२

१११. शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य, पुणे, माध्यमिक शाळांची यादी, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई प्रकाशन, १९७९, पृ. ३४–३५

११२. रयत शिक्षण संस्था वार्षिक अहवाल १९७४–१९७५, पृ.१

११३. कोरडे डी. डी. (डॉ.), वाई शहराचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास (१९०० ते २०००), पीएच. डी. अप्रकाशित शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१२

११४. पाटील ए. जे. (डॉ.), कऱ्हाडचा इतिहास (सन १९५० ते २०००), पीएच. डी. अप्रकाशित शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०११

## प्रकरण पाचवे

# कोरेगाव तालुक्याचा आर्थिक इतिहास

### ५.१ प्रास्ताविक

भारत देश हा खेडयांचा देश मानला जातो. त्यामुळे प्राचीन काळापासून येथे शेती मोठया प्रमाणावर केली जाते. भारतातच उगम पावलेल्या नद्या व उपनद्या यांच्यामुळे मोठया प्रमाणात सुपीक शेती निर्माण झालेली आहे. नद्यांच्या प्रदेशातील शेती ही बागायती असून तेथील उत्पन्नही चांगले आहे. पावसावर आधारित असणारी शेती ही मोठया प्रमाणावर आहे. त्यामुळे भारतातील लोकांचा प्रमुख व्यवसाय हा शेती बनला आहे. प्राचीन काळापासून ते आजपर्यंतचा भारताचा आर्थिक विकास हा शेतीवर अवलंबून आहे. आज २०११ च्या जनगणनेनुसार पाहिले असता भारतात शेती शेती करणारे ६४.३३ टक्के लोक आहेत. म्हणजेच हे लोक शेतीवर अवलंबून आहेत. या शेतीला पूरक असणारे व्यवसाय ही भारतात मोठया प्रमाणावर चालतात. त्यामुळे छोटयामोठया उद्योगधंद्याना व व्यापाराला चालना मिळत गेलेली दिसून येते. प्राचीन काळापासून भारतासह महाराष्ट्रातील खेडी ही स्वयंपूर्ण होती. म्हणजेच त्यांना लागण्याऱ्या गरजेच्या वस्तू हे लोक खेडयातच तयार करत असत. त्यांना इतरांवर अवलंबून राहावे लागत नसे. खेडयातच बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार राहत असल्याने त्यांना इतरांवर अवलंबून राहावे लागत नसे. खेड्यातील पाटील किंवा प्रमुख व्यक्ती यांच्या मदतीने गावाची व्यवस्था चालत होती. त्यामुळे राजाचा व चालविलेल्या राज्यव्यवस्थेचा खेडयातील जनतेशी फारसा संबंध येत नव्हता. राज्यव्यवस्था व खेडे यांचा संबंध जमीन महसुलापुरता मर्यादित होता. मर्यादित लोकसंख्या, जमीनीची विपुलता व भरपूर उत्पन्न यामुळे महसुल भरल्यानंतरही लोकांकडे विपुल धनसंपदा शिल्लक राहत असल्याने त्या काळात भारतातील जनता आर्थिकदृष्टया संपन्न होती.

१६ व्या शतकात औद्योगिक क्रांती घडून आली. त्याचा परिणाम भारतावरही झालेला दिसून येतो. इंग्रजांनी भारतावर आपले राज्य निर्माण केले. हा काळ भारताचा आधुनिक काळ म्हणून ओळखला जातो. या काळात इंग्रजांनी भारतात शेती व उद्योगधंद्यांच्या विकासासाठी काही उपाययोजना केलेल्या दिसून येतात. ब्रिटीशांमुळे भारतीय शेती व उद्योगधंद्यांमध्ये आमुलाग्र बदल झाला. ब्रिटीश हे भारतात व्यापार करण्यासाठी आले होते. त्यांनी व्यापारातील

नफा वाढवण्यासाठी व कर वाचविण्यासाठी येथील राज्यकर्त्यांमधील आपसातील हेवेदाव्यांचा फायदा घेऊन येथे आपले राज्य स्थापन केले. या राज्याचा प्रमुख हेतू आर्थिक नफा मिळविणे, करात सवलत मिळविणे हा असल्याने त्यांनी येथील शेतकऱ्यांवर विविध महसूल पद्धतींचा अवलंब करून कर लादले. त्यामुळे शेतकऱ्यांचे हाल झाले. तसेच इंग्रजांनी भारतातून कच्चा माल इंग्लंडमध्ये नेला व तेथील पक्का माल भारतात आणून जास्त किंमतीत विकला. त्यामुळे भारतातील शेतीचे व्यापारीकरण झाले. सुरूवातीला व्यापारी पिकांना इंग्रजांनी भाव दिला. परंतु पुढील काळात मन मानेल त्या भावाने शेतीमाल घेतल्याने शेतकरी हवालदिल झाले. त्यांचबरोबर इंग्रजांनी येथील व्यापार व उद्योगांवर आपला ठसा उमटवितांना उद्योगधंद्यांचे विऔद्योगिकरण केले. त्यामुळे भारतातील जनजीवन विस्कळीत झाले. पूर्वीचे स्वयंपूर्ण खेडे आता परावलंबी बनले. त्यामुळे शेती व उद्योगधंद्यांमध्ये आमुलाग्र बदल झाला. याचे काही सकारात्मक बदलही आपणास पाहावयास मिळतात. कारण इंग्रज येण्यापूर्वी भारतातील शेती ही पारंपारिक पद्धतीने केली जात होती. मात्र इंग्रजांनी आणलेल्या नवनवीन तंत्रज्ञान व शोधामुळेभारतात शेती आधुनिक पद्धतीने केली जाऊ लागली. तसेच औद्योगिकरणामुळे नवनवीन उद्योगधंद्यांचा विकास होऊन भारतात लोह, पोलाद व पेट्रोलियमचे मोठमोठे उद्योग निर्माण झाले. यात भारतात टाटा, बिरला यांचे उद्योग ब्रिटीशकाळापासून निर्माण व विकसित झालेले आहेत. कोरेगाव तालुक्यात धनजीशहा कूपर यांनी सुरू केलेली कूपर कंपनी ही ब्रिटीश काळापासूनची आहे. आजही कूपर कंपनी भारतातील नावाजलेल्या उद्योग समुहांपैकी असून धनजीशहा कूपर यांना उद्योगक्षेत्रात आदराचे स्थान आहे. त्यामुळे कोरेगाव तालुक्याची आर्थिक परिस्थिती विकसित झालेली दिसून येते.

व्यापाराबाबतही अंतर्गत व परराष्ट्रीय व्यापार त्या काळात चालत असलेला दिसून येतो. त्यावेळच्या सत्ताधिशांनी आपापल्या परीने व्यापारास उत्तेजन दिले होते. तसेच उद्योगधंद्याबाबतही खेडयातील लोकांचा जातीनुसार व्यवसाय ठरलेला होता. त्यामुळे खेडयातील लोकांच्या गरजा भागवून उरलेल्या वस्तू हे कारागीर पेठेच्या ठिकाणी विक्रीसाठी आणीत होते. त्यामुळे उद्योगधंद्यास चालना मिळत होती. याशिवाय सरकारी कारखान्यातून विविध उद्योगधंदे मध्ययुगीन काळात चालू होते.

सातारा जिल्हा हा छत्रपतींची राजधानी असल्याने येथे व्यापार व उद्योगधंदे विकसित

झालेली दिसून येतात. कोरेगाव तालुका हा सातारा जिल्हयाला जोडूनच पूर्वेला उत्तर–दक्षिण पसरलेला आहे. या तालुक्यात मध्ययुगापासून बर्गे घराण्याची सत्ता असल्याचे दिसून येते. त्यामुळे येथे शेती, व्यापार व उद्योगधंदे भरभराटीस आले होते. या प्रकरणात भारताच्या स्वातंत्र्यापूर्वीचा काही काळ व भारत स्वतंत्र झाल्यापासून ते इ.स. २००० पर्यंतच्या काळात कोरेगाव तालुक्याची शेती, व्यापार व उद्योगधंद्यांच्या माध्यमातून कशा प्रकारे भरभराट झाली याविषयीची माहिती घेणार आहे. तसेच कोरेगाव पंचायत समिती व ग्रामपंचायतमार्फत तालुक्यातील लोकांना पुरविल्या गेलेल्या विविध सुविधा व त्यासाठी झालेला खर्च व विविध माध्यमातून कोरेगाव पंचायत समिती व ग्रामपंचायतीला जमा होणारे उत्पन्न यांचाही अभ्यास या प्रकरणात करणार आहे.

## ५.२ स्वातंत्र्यपूर्व काळातील कोरेगाव तालुक्याची आर्थिक परिस्थिती –

सातारा जिल्हयास प्राचीन काळापासून वैभवशाली इतिहासाची परंपरा लाभलेली आहे. सातारा जिल्हयाचा कोरेगाव तालुका हा पूर्वीपासूनचा अविभाज्य घटक आहे. सातारा परिसरावर राष्ट्रकुट, वाकाटक, बदामीचे चालुक्य, शिलाहार, देवगिरीचे यादव या घराण्यांची राजवट कमी–अधिक प्रमाणात होती. म्हणजेच पर्यायाने कोरेगाव तालुक्यावरही यांचा अंमल होता. या काळामध्ये सातारा परिसर व कोरेगाव तालुक्यात शेती, उद्योगधंदे व व्यापार यावर आधारित अर्थव्यवस्था होती. त्याचबरोबर विविध व्यवसाय चालत होते. शेतीतून गहू, बार्ली, जवस, तांदूळ इत्यादी. पिकांचे उत्पादन काढले जात होते. शेतीला पाणीपुरवठा व्हावा यासाठी तलाव, बंधारे व विहीरी बांधलेल्या होत्या. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून पशुपालन केले जात होते. याचबरोबर विविध वस्तूंचा व्यापारही मोठया प्रमाणावर परकीय देशांशी व राज्यांतर्गतही होत होता. हा व्यापार खुष्कीच्या व समुद्र मार्गाने चालत असे. यामुळे वस्तूंच्या मोबदल्यात परकीय हिरे, मोती, सोनेचांदी यांची आवक मोठया प्रमाणात होत होती. त्यामुळे या कालखंडात सातारा जिल्हयाची आर्थिक भरभराट झालेली होती. हे सर्व व्यवसाय व उद्योग वंशपरंपरेने चालत होते.[१]

मध्ययुगीन कालखंडात सातारा परिसरात यादवांचे राज्य होते. महाराष्ट्राच्या राजकीय स्थित्यंतरात यादवांच्या खालोखाल शिलाहार घराण्याचे महत्त्व आहे. या घराण्याचा सातारा जिल्हयाशी संबंध आला आहे. यानंतर हसन गंगू बहमनीने स्थापन केलेली बहमनी सत्ता,

त्याच्या अस्तानंतर विजापूरची आदिलशाही, शिवशाही, पेशवाई यांची सत्ता सातारा जिल्हयावर व कोरेगाव तालुक्यावरही होती. हया काळात शेती,व्यापार व उद्योगधंदे यामध्ये सातारा जिल्हा पुढारलेला होता. या काळात नागरी आणि ग्रामीण भागातील आर्थिक जीवन हे भिन्न होते. खेडयात राहणाऱ्या लोकांचा शेतीबरोबर पशुपालन हा प्रमुख व्यवसाय होता. या काळात शेती राजे, सामंत व श्रीमंत लोक यांनी शेतीसाठी पाणीपुरवठा करण्यासाठी बंधारे बांधले व कालवे काढले. त्यामुळे मध्ययुगीन काळातील शेतीला मुबलक पाणीपुरवठा होऊ लागल्याने शेतीचे उत्पादन वाढले व शेती व व्यापारास चालना मिळाली.[२]

शेतकरी व शेतीत काम करणारा शेतमजूर हे आपल्या व्यवसायास जोड मिळावी या हेतूने पशुपालन हा व्यवसाय करत असे. पशुपालन करण्याचा प्रमुख उद्देश हा होता की, दूध व मांस यांची विक्री करून आर्थिक बाब सांभाळणे. तसेच काही प्राण्यांचा वापर हा जड वस्तू वाहून नेण्यासाठी केला जात होता. पशुमध्ये प्रामुख्याने बैल, गाय, म्हैस, शेळया, मेंढया, घोडे, गाढव इत्यादी प्राणी पाळले जात असत. खेडेगावातील कारभार हा तेथील प्रमुख म्हणजे पाटील हा अधिकारी पाहत असे. त्याच्या मदतीसाठी कुलकर्णी व चौगुला हे अधिकारी असत. ते पाटलाला गावचा महसूल गोळा करण्याकामी मदत करत असत. सरकारने ठरवून दिलेला महसूल सरकारला दिला की, सरकारचा गावाशी संबंध राहत नसे अशावेळी त्या खेडयातील गरजा वस्तुविनिमयाच्या पद्धतीने भागविल्या जात असत. त्यासाठी प्रत्येक खेडयात बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार असत. यामध्ये लोहार, सुतार, महार, मांग, कुंभार, चांभार, परीट, न्हावी, भट, गुरव, मुलाणी, कोळी, जंगम, डवरी, ठाकर, घडशी, तराळ, सोनार, चौगुला, शेटे व महाजन यांचा समावेश होता. या सर्वानाच त्यांनी केलेल्या कामाच्या मोबदल्यात शेतकऱ्याकडून धान्य मिळत असे. त्या धान्यावर त्यांचा उदरनिर्वाह चालत असे. ही पद्धत गावात वंशपरंपरेने चालू होती. त्यामुळे गावचा कारभार सुव्यवस्थित चालत होता. त्यामुळे याकाळातील खेडी आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण होती.[३]

प्राचीन व मध्ययुगीन काळात सातारा जिल्हा व कोरेगाव परिसरात शेती, व्यापार व उद्योगधंदे ही पारंपारिक पद्धतीने केलेली आढळून येते. मध्ययुगीन काळात ऐतदेशीय राजांनी बांध, कालवे बांधल्याने येथील शेतीत सुधारणा झालेली दिसून येते. पुढील काळात भारतात इंग्रजांची सत्ता निर्माण झाली. त्याचबरोबर इ. स. १८१८ मध्ये महाराष्ट्रातील पेशव्यांची सत्ता

ब्रिटीशांनी नष्ट केली व साताऱ्याच्या छत्रपतींच्या गादीचे पुनरूज्जीवन केले. त्यांनी सातारा ही राजधानी निर्माण करून तेथे ग्रँट डफ याला आपला रेसिडेंट म्हणून नेमला व त्याच्या मदतीने सातारच्या छत्रपतीने राज्यकारभार केला. ब्रिटीशांनी सत्तेवर आल्यानंतर सातारा व कोरेगाव परिसरातील शेती व उद्योगधंद्यांना चालना देण्यासाठी प्रयत्न केले. त्यातून त्यांनी शेतीसाठी बंधारे, कालवे निर्माण केली. तसेच उद्योगधंद्यांना चालना देण्यासाठी रस्ते, लोहमार्गाची निर्मिती केली.[४]

## ५.३ कोरेगाव तालुक्याची स्वातंत्र्योत्तर काळातील आर्थिक परिस्थिती

### ५.३.१ शेती

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. कारण भारतात प्राचीन काळापासूनच मोठया प्रमाणावर शेती केली जाते. भारतीय लोकांच्या उपजिविकेचे साधन शेती हेच आहे. देशाची अर्थव्यवस्था शेतीवर आधारीत आहे. कारण एकूण लोकसंख्येच्या ६० ते ७० टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. प्राचीन कालखंड, मध्ययुगीन कालखंड आणि आजही भारतीय लोक हे जास्तीतजास्त प्रमाणात शेती व शेतीस पुरक असे व्यवसाय करताना पाहावयास मिळतात. या पूरक व्यवसायात मुख्यतः पशुपालन, शेळीपालन, कुक्कुटपालन, वराहपालन इत्यादी व्यवसया केले जात होते. यातून मांस, दुध व ओझी वाहण्यासाठी या प्राण्यांचा उपयोग केला जात होता. भारत देश हा प्राचीन काळापासून शेतीप्रधान देश आहे. याचे कारण भारताचा राष्ट्रीय उत्पन्नात शेती उत्पादनाचा फार मोठा वाटा आहे. तसेच प्राचीन व मध्ययुगीन काळात परंपरागत पद्धतीने शेती केली जात असल्याने पाहिजे तेवढे उत्पन्न मिळत नाही. परंतु आधुनिक काळात शेती ही आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने केली जात असल्याने उत्पन्नातही वाढ झालेली आहे. अशाप्रकारे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेतीच्या उत्पादनाने फार मोठी भर घातली आहे.

कोरेगाव तालुक्यातील शेती अर्थव्यवस्थेविषयी माहिती पाहत असताना यामध्ये कोरेगाव तालुक्यातील परंपरागत पीक पद्धती, खरीप हंगाम पीक पद्धत, रब्बी हंगाम, बारमाही पीक पद्धती (बागायत जमीन), कोरेगाव तालुक्यातील प्रमुख पिके यात ज्वारी, बाजरी, हरभरा, तूर, मटकी, उडीद, चवळी, भुईमूग, करडई, ऊस, मिरची, हळद, आले, फळे, फुले व भाजीपाला सातारा जिल्हयातील सन १९७८–७९ मधील निघालेले कृषी उत्पन्न संकरित बी–बियाणे

उत्पादन पशुपालन व दुग्धव्यवसाय, कृषि उत्पन्न बाजार समिती कोरेगाव इत्यादीची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

### ५.३.१.१ कोरेगाव तालुक्यातील परंपरागत पीक पद्धती

कोरेगाव तालुक्यातील बराचसा भाग हा दुष्काळी भाग म्हणून समजला जातो. केवळ विहीर, तलाव व नद्या याद्वारेच शेतीस पाणीपुरवठा केला जात होता. शासनाच्या निरनिराळया येणाऱ्या योजनांचा लाभ कोरेगाव तालुक्यात कमी प्रमाणात घेतला जात होता याचे कारण लोकांना त्याविषयीची कल्पना नसायची म्हणजेच त्यांचे मागासलेपण यातून दिसून येत होते.याचाच परिणाम असा झाला की, शेती ही पारंपारिक पद्धतीने केली जाऊ लागली. यामध्ये पुढील तीन शेती पीक पद्धतींचा समावेश होतो. १) खरीप हंगाम २) रब्बी हंगाम ३) बागायत किंवा बारमाही पीक पद्धती

### ५.३.१.२ खरीप हंगाम पीक पद्धत

खरीप हंगाम हा साधारणपणे जून महिन्यात सुरू होतो. ७ जून रोजी मृग नक्षत्र सुरू होते. त्यावेळी या हंगामास सुरूवात होते.या काळात शेतकरी उन्हाळयात शेतीची जी नांगरणी केलेली असते. त्या नांगरटीत वळीव पावसाचे पाणी पडून ती ढेकळे विरघळली जातात. त्या शेतीची मेहनत करून मग तो शेतीमध्ये पीक पेरतो. उदा. आरगड, भात, तूर, सोयाबीन, श्रावण घेवडा, मटकी, चवळी, मूग, उडीद, कारळा, पावटा, घेवडा, हायब्रीड, ज्वारी, बाजरी, भुईमूग इत्यादी पीकांचे बियाणे पेरतो. यास काळास खरीप हंगाम असे म्हणतात. विशेष म्हणजे या हंगामातील पीके पावसावर अवलंबून असतात. त्यांना पाणी कमी प्रमाणात लागते. त्यामुळे जिथे पाणीपुरवठयाची सोय नाही अशा ठिकाणी ही पीके घेतली जातात. ज्याठिकाणी पाण्याची खचरे आहेत अशा ठिकाणी भात हे पीक घेतले जाते. या निघणाऱ्या उत्पन्नातून गरजेपुरते धान्य स्वतःसाठी ठेवून बाकीचे धान्य बाजारात नेऊन विकले जाते. त्यामुळे आर्थिकदृष्टया ही पीके परवडणारी आहेत.

### ५.३.१.३. रब्बी हंगाम

रब्बी हंगामात खरीप हंगाम संपल्यानंतर दिपावळीच्या दरम्यान म्हणजेच ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत असतो. या हंगामात ज्या जमिनीत पाण्याची उपलब्धता आहे त्या जमिनीत ही पीके चांगली येतात. काही जमिनी अशा असतात की, दिवाळीच्या दरम्यान

पडणाऱ्या पावसाचे पाणी शोषून घेवून त्या पाण्याच्या आधारावरच रब्बी पीक घेतले जाते. तेवढया पाण्याच्या आधारावरच ते पीक काढले जाते. कोरेगाव तालुक्यात रब्बी हंगामात प्रामुख्याने ज्वारी, हरभरा, गहु, बटाटा, सुर्यफुल, जवस करडई इत्यादी पीके घेतली जातात.

### ५.३.१.४ बारमाही पीक पद्धती (बागायत जमीन)

या पीक पद्धतीत वर्षातील कोणत्याही महिन्यात पिकांची पेरणी किंवा लागवड करतात. त्या जमिनीतून पीके ही वर्षभर शेतात जतन केली जातात.म्हणून सदर पीक पद्धतीस बारमाही पीक पद्धत असे म्हणतात. या जमिनीस पाण्याचा पुरवठा मोठया प्रमाणावर केला जातो. केवळ पाण्याच्या जोरावरच ही पीके घेतली जातात. एप्रिल ते जून या दरम्यान जमिनीत पीक पेरले जाते. हळद, कापूस, ऊस, आले, मिरची व इतर बागायती भाजीपाला इत्यादी पीकांची लागवड करतात. तसेच जून ते जुलै महिन्यात आडसाली ऊस पीकाची लागवड करतात तर सुरूची ऊस लागवड नोव्हेंबर ते जानेवारी पर्यंत करीत असतात.[५]

### ५.३.१.५ कोरेगाव तालुक्यातील प्रमुख पिके

**१) ज्वारी :**

ज्वारी हे पीक खरीप व रब्बी हंगामात कोरेगाव तालुक्यात घेतले जाते. इ. स. १८८४ मध्ये कोरेगाव तालुक्यात दुधमोगरा, काळबोंडी, शाळू, तांबड, उतावळी व अरगड इत्यादी प्रमुख जाती घेतल्या जात होत्या त्यापैकी काळबोंडी व उतावळी खरीप हंगामातील जाती होत्या. सन १९६१–६२ च्या पूर्वी आरगड आणि महमदापुरी जातीचे खरीप वाण आणि दगडी व मालदांडी जातीचे रब्बी वाण पेरत असत. सध्या खरीप हंगामात संकरित ज्वारीचे प्रमाण वाढले आहे. तसेच रब्बी हंगमात मुख्यतः दगडी व मालदांडी ज्वारी, सी. एस. एच. ४ या सुधारित ज्वारीच्या जाती घेतल्या जातात. याशिवाय कराडच्या कृषि संशोधन केंद्राने विकसित केलेल्या शेणोली ४२, शेणोली ४५, सी. एस. ३५४१, सी. एस. १६८ व एस. पी. व्ही. ३४६ या खरीप ज्वारीच्या जाती घेतल्या जातात. खरीप ज्वारीची पेरणी जून–जुलैमध्ये करतात. या पिकांबरोबर आंतरपीक म्हणून तूर, मूग, उडीद व चवळी ही पिके घेतात. या पिकांची काटणी ऑक्टोबर–नोव्हेंबर मध्ये करतात. रब्बी ज्वारीची पेरणी सप्टेंबर–ऑक्टोबर मध्ये करतात. फेब्रुवारी–मार्चमध्ये याची कापणी करतात. सध्या ज्वारीचे जास्त उत्पादन मिळावे या उद्देशाने संकरित जातीचे पीक घेण्यावर लोकांचा भर आहे. या ज्वारीमुळे उत्पनात २५ ते ३०

टक्क्यांनी वाढ होते. तसेच या संकरित वाणास रासायनिक खताचाही वापर भरपूर प्रमाणात करतात.

**२) बाजरी :**

बाजरी हे पीक कोरेगाव तालुक्यात मोठया प्रमाणात म्हणजेच ज्वारी पिकाच्या खालोखाल घेतले जाते. बाजरी पीकामध्ये मिश्र पीक म्हणून प्रामुख्याने तूर, तीळ, राळा, अंबाडी इ. घेतली जात होती. मात्र अलिकडे बाजरी पिकाखालील क्षेत्र दिवसेंदिवस घटत चाललेले दिसते.

**३) गहू :**

हे रब्बी हंगामातील पीक असून शक्यतो बागायत जमिनीतून या पिकाचे उत्पादन घेतले जात होते. बक्षी व खपली या दोन जाती मोठया प्रमाणावर पेरल्या जात असत. ऑक्टोबर महिन्यात या पीकाची पेरणी केली जाते. अलीकडच्या काळात शेतीतून गव्हाचे उत्पादन काढण्यासाठी एन. आर. ७४७१, कल्याण सोना, सोनालिका, एन. आर. ३४३९, मोती व ५९ या जातीच्या गहू बियाण्याची पेरणी केली जाते. गव्हाच्या सुधारित जातीसाठी महाबळेश्वरच्या गहू गेरवा संशोधन केंद्रावर संशोधन केले जाते.[६]

**४) हरभरा :**

कोरेगाव तालुक्यात रब्बी हंगामात हे पीक घेतले जाते. हे पीक मिश्र पीक म्हणून उत्पादित केले जाते. या पीकाची पेरणी ऑक्टोबर महिन्यात करतात.

**५) तूर :**

या पीकाची पेरणी खरीप हंगामात करतात. कोरेगाव तालुक्यात या पीकाचे क्षेत्र अल्प आहे. या पीकाची काढणी फेब्रुवारी–मार्चमध्ये करतात.

**६) मटकी :**

हे पीक कोरेगाव तालुक्यात सर्वत्र घेतात. विशेष म्हणजे ज्याठिकाणी पाण्याची अपुरी सोय आहे. अशा माळरानात हे पीक मोठया प्रमाणावर पेरले जाते. कोरेगाव तालुक्यात उत्तर भागात या पीकाचे उत्पादन मोठया प्रमाणावर होते. हे पीक बाजरी पिकामध्ये मिश्र पीक म्हणूनही करतात. या पीकाची पेरणी जून–जुलैमध्ये करतात. तर कापणी नोव्हेंबरमध्ये करतात.

**७) उडीद :**

कोरेगाव तालुक्यातही या पीकाचे उत्पादन मोठया प्रमाणाव घेतले जाते. हे ज्वारी पीकात आंतरपीक किंवा मिश्र पीक म्हणूनही घेतले जाते.

**८) चवळी :**

हेही पीक कोरेगाव तालुक्यात घेतले जाते. ज्वारी पीकामध्ये आंतरपीक म्हणजेच मिश्रपीक म्हणून घेतले जाते. या पीकाची पेरणी जून–जुलैमध्ये करतात. तर काढणी ऑक्टोबरमध्ये करतात.

**९) भुईमूग :**

हे नगदी पीक कोरेगाव तालुक्यातील बागायत जमिनीमध्ये घेतले जाते. खरीप व उन्हाळी या दोन हंगामात हे पीक घेतले जाते. सन १९१०–११ पर्यंत कोरेगाव तालुक्यात हे पीक घेतले जात नव्हते. पुढे पहिल्या महायुद्धानंतर मात्र हे पीक घेण्यास सुरूवात झाली. अलीकडे हे पीक ऊसात घेतले जाते. कोरेगाव तालुक्यात उशिरा तसेच लवकर येणाऱ्या भुईमूगाच्या जाती आहेत. त्यामध्ये उपटया, पसऱ्या, जपानी, देशी, घुंगरी इत्यादी स्थानिक जाती व कराड ४११, शेणोली ४२, शेणोली ४५, के३, के४ या संकरित व अधिक उत्पादन देणाऱ्या सुधारित जाती आहेत. यांचे उत्पादनही घेतले जाते.[७]

**१०) करडई :**

करडई हे पीक रब्बी हंगामात घेतले जाते. गहू व ज्वारी पिकात मिश्र पीक म्हणूनही घेतले जाते. या पीकाची पेरणी ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्ये करतात व कापणी मार्च–एप्रिलमध्ये केली जाते. करडई पीकाचा उपयोग हा खाद्यतेल काढण्यासाठी व रंगाचे द्रावण तयार करण्यासाठी वापर करतात. त्यामुळे या पीकाच्या दोन जाती आहेत. कोरेगाव तालुक्यात खाद्यतेल वर्गातील जातीची पेरणी मोठया प्रमाणावर केली जाते. त्यामुळे खाद्यतेलाचेही उत्पन्न मोठया प्रमाणावर निघते तसेच या खाद्यतेलाच्या गाळपावेळी निघणारा चोथा असतो त्याचा उपयागे पशुंना पेंड म्हणजेच खाद्य म्हणून केला जातो. त्यामुळे या पीकाचा उपयोग हा दुहेरी होत असलेला दिसून येतो.

**११) ऊस :**

या नगदी पीकावरच कोरेगाव तालुक्याची अर्थव्यवस्था आधारलेली आहे. सातारा

जिल्हयात एकूण सात कारखाने आहेत. त्या कारखान्यास मोठया प्रमाणावर ऊस पुरविण्याचे काम कोरेगाव तालुक्यातून केले जाते. ऊस लागवडीचे आडसाली, पूर्व हंगामी व सुरू असे तीन हंगाम आहेत. या व्यतिरिक्त बहुतांश शेतकरी ऊसाच्या खोडव्याचेही पीक घेतात. आडसाली ऊसाची लागवड जुलै–ऑगस्टमध्ये करतात. या पीकाचा सरासरी कालावधी १६ ते १८ महिन्याचा असतो. त्याचा दर हेक्टरी सरासरी उत्पादन १५० मेट्रीक टनापर्यंत येते. पूर्व हंगामी ऊसाची लागवड ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्ये करतात. हे पीक १५ महिन्याचे असते. याचेही दर हेक्टरी उत्पादन १५० मेट्रीक टनापर्यंत असते. सुरू ऊसाची लागवड जानेवारीफेब्रुवारी महिन्यात करतात. याचे पीक १२ ते १३ महिन्यात तयार होते. याचे उत्पादन १०० मेट्रिक टन दर हेक्टरी असते. कोरेगाव तालुक्यात उत्पादनाच्या दृष्टीने आडसाली ऊसाची लागवड करतात.[८] कोरेगाव तालुक्यात सन १८६० मध्ये इम्फी या चिनी ऊसाची लागवड केली होती. परंतु या ऊसाचे उत्पादन फारच काम निघाल्याचे त्याची लागवड बंद झाली.[९]

पुढे ऊसाची पुंडिया ही स्थानिक जात लावली जाऊ लागली. अलिकडच्या काळात पाडेगावच्या ऊस संशोधन केंद्रात तयार केलेल्या सुधारित को ४१९, को ४७०, को ६२१७५, को. एम. ७१२५, सी. ओ. ७४० या जातीची लागवड करण्यात येते.[१०]

**१२) मिरची :**

हे मसालेवर्गीय पीक असून कोरेगाव तालुक्यात मोठया प्रमाणात घेतात. हे बागायती पीक तसेच जास्त पावसाच्या जमिनीतही हे पीक चांगले येते. कोरेगाव तालुक्यात संकेश्वरी मिरचीची लागवड मोठया प्रमाणावर केली जाते. हे पीक शेतकऱ्यांना ठोक रोखीने पैसे मिळवून देते.

**१३) हळद :**

मसालेवर्गीय पीकात हे दुसऱ्या क्रमाकांचे पीक आहे. कोरेगाव तालुक्यात या पीकाचे प्रमाण फारच कमी आहे. हळद पिकाची लागण ही साधारणपणे उन्हाळयात म्हणजेच मे महिन्यात केली जाते. तर ६ ते ७ महिन्यानी म्हणजेच डिंसेबर ते जानेवारी महिन्यात हळद पिकाची काढणी करतात. हळदीपासून हळद पूड व रंग तयार करतात. या पिकास महाराष्ट्रात मोठया प्रमाणावर मागणी आहे.

### १४) आले :

हेही मसालेवर्गीय नगदी पीक आहे. कोरेगाव तालुक्यात अलिकडील काळात मोठया प्रमाणावर हे पीक घेतले जाते. हे पीक शेतात घेण्यापूर्वी हरभऱ्याचे पीक घेतात. या पिकाला शेणखताची आवश्यकता असते. हे पीक ८ ते १० महिन्यात काढणीसाठी येते.[११]

### १५) फळे, फुले व भाजीपाला :

कोरेगाव तालुक्यातून फळबागा व भाजीपाला यांचे उत्पादन घेतले जाते. यामध्ये विही, शेव, अळू, शकताळू, बेदाणा, नासपती, गलगल, चकोतरा, कौल, संगता, मकरंद, फणस, बदाम ही झाडे तर केतकी, मोदपोय, बटमोगरा, सुरू व बनमजलसी ही फुलझाडे लावली जात होती. पेरू, लिंबे, नारिंगी, आंबे, द्राक्षे, पपई, मोसंबी, रसबेरी इत्यादींचेही उत्पादन घेतले जाते.

कांदा, रताळे, बटाटे, वांगी, गवार, भेंडी, मेथी, घोसाळे, दोडका, भोपळा, काकडी, गाजर, मुळा, वाटाणा, टमाटे, कोबी, कलिंगड, खरबूज, चवळी इत्यादी फळभाज्या व पालेभाज्यांचे उत्पादन घेतले जाते. कोरेगाव तालुक्यात १९५६५७ पर्यंत केळीचे उत्पादन मोठया प्रमाणावर घेतले जात होते. सध्या द्राक्ष व डाळींब फळझाडांची मोठया प्रमाणावर लागवड केली जाते. त्याचबरोबर बटाटा पीकासाठीही कोरेगाव तालुका प्रसिद्ध आहे.[१२]

### ५.३.१.६ सातारा जिल्हयातील सन १९७८–७९ मधील निघालेले कृषी उत्पन्न :

सातारा जिल्हयात कोरेगाव तालुक्याचा समावेश होतो. त्यास अनुसरून कृषी उत्पन्न हे सातारा जिल्हयाचे याठिकाणी देत आहे. शासनाने महाराष्टात कृषी उत्पन्नाचा अंदाज घेण्यासाठी सन १९७८–७९ मध्ये वि. म. दांडेकर समिती नेमली होती. या समितीने दिलेल्या अहवालानुसार सातारा जिल्हयाचे या वर्षातील कृषी उत्पन्न पुढीलप्रमाणे होते.

| अ.नं. | बाबी तपशील | उत्पन्न लाखात |
|---|---|---|
| १ | केवळ शेती विभागातील एकूण कृषि मूल्य(मूळचे) | १,१०,५५ |
| २ | १९७७–७८ ते १९८०–८१ च्या केवळ शेतीतील एकूण मूल्याची सरासरी | १,३३,६८ |
| ३ | बाब दोन मधील एकूण बेरजेशी टक्केवारी | ४.० टक्के |
| ४ | बाब तीन च्या टक्केवारीनुसार १९७८–७९ च्या राज्य पातळीवरील केवळ शेती विभागातील एकूण मूल्याचे वितरण | १,१७,५४ |
| ५ | पशुसंवर्धनापासूनचे एकूण उत्पन्न | २६.६५ |

| | | |
|---|---|---|
| ६ | शेती व पशुसंवर्धन यापासूनचे मूल्य (४ अधिक ५) | १,४४,१९ |
| ७ | एकूण निविष्टी | २९,६८ |
| ८ | शेती व पशुसंवर्धन यापासून निव्वळ उत्पन्न (६ अधिक ७) | १,१४,५१ |
| ९ | संलग्न कामापासून निव्वळ उत्पन्न | ३.४७ |
| १० | शेतीपासून मिळणारे निव्वळ उत्पन्न (बाब ८ अधिक ९) | १,१७,९८[१३] |

याच वर्षी सातारा जिल्हयात कृषि विकास दर हा १.४० रूपये हा होता. सन १९९१–९२ मधील मुख्य पिकांचे दर हेक्टरी उत्पादन व एकूण उत्पादन खालीलप्रमाणे होते.

| **अ.न.** | **पीक** | **उत्पादन दर हेक्टरी (कि. ग्रॅ.)** | **एकूण उत्पादन** |
|---|---|---|---|
| १ | तांदूळ | १,७२३ | ७०२ |
| २ | गहू | १,५०४ | ४२५ |
| ३ | ज्वारी | ९२७ | १,८२३ |
| ४ | बाजरी | ३४४ | ४०१ |
| ५ | बार्ली | ९२४ | १ |
| ६ | मका | १,०८४ | ४८ |
| ७ | नाचणी | ८४६ | १३१ |
| ८ | इतर धान्ये | ८०१ | ३३ |
| ९ | एकूण धान्ये | ९२३ | ३,७६४ |
| १० | हरभरा | ४४१ | ६३ |
| ११ | तूर | ३९८ | ३१ |
| १२ | उडीद | ४४५ | २२ |
| १३ | मूग | ३४७ | २७ |
| १४ | इतर कडधान्ये | १८३ | ३४ |
| १५ | एकूण कडधान्ये | ३५८ | १० |
| १६ | तीळ | ४२३ | १ |
| १७ | भईमूग | १,१४५ | ८८२ |
| १८ | मोहरी व राई | ११३ | १ |
| १९ | ऊस (ड्रेस्ट केन) | ७१,४३२ | २४,३२१ |
| २० | कापूस | ३५९ | २ |
| २१ | तंबाखू | ९७८ | १ |
| २२ | सुंठ | ८६३ | ३९० |
| २३ | मिरची | ६७९ | १२ |

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | हळद | १,१९८ | १,१६३ |
| २५ | बटाटा | ३,७०९ | १३७[१४] |

## ५.३.१.७ संकरित बी–बियाणे उत्पादन

संकरित बियाण्यांचा निर्मितीचा कार्यक्रम कोरेगाव तालुक्यातही राबविला जातो. कारण उत्पादित संकरित दाण्याची संकरण क्षमता कमी होत असल्यामुळे त्यापासून दुसऱ्या हंगामात अपेक्षित उत्पन्न मिळत नाही. संकरित बिजोत्पादनाचा कार्यक्रम घेताना पाणीपुरवठा, शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती याचा विचार करावा लागतो. हा कार्यक्रम जिल्हा परिषदेमार्फत १९६५–६६ पासून कोरेगाव तालुक्यातील काही गावांमध्ये राबविला जात आहे. यासाठी जिल्हा परिषदेकडून बिजोत्पादकांना बियाणे देण्यात येते. सन १९८८–८९ मध्ये ६२,१८६ क्विंटल बियाणे सातारा जिल्हयात उत्पादित करण्यात आले होते.

जिल्हा परिषदेने १९७३ मध्ये गोडोली ता.सातारा येथे उत्पादित संकरित बियाण्यावर बीज प्रक्रिया केंद्र सुरू केले. या केंद्रावर दरवर्षी ४ ते ६ हजार क्विंटल बियाण्यावर प्रक्रिया व प्रमाणीकर केले जाते. महाराष्ट्र राज्यात सातारा जिल्हा परिषद ही एकमेव अशी आहे की स्वतःचे बियाणे प्रक्रिया केंद्र असणारी आहे.[१५] तसेच शिवथर व गोवे येथेही ही केंद्रे आहेत. बीज प्रक्रियेनंतर बियाणांचे नमुने परिक्षणासाठी पाठविले जातात. सन १९६९–७० मध्ये बीज प्रमाणीकरणाचे काम राष्ट्रीय बीज निगम करीत होते. परंतु १९७०–७१ पासून हे काम शासनाचा कृषि विभाग करीत आहे. बाजारात विक्रीसाठी येणाऱ्या प्रमाणीत बियाण्यांच्या प्रतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी १९६६ चे बी–बियाणे विधेयक १९६९ पासून लागू करण्यात आले. संकरित बी–बियाण्यांची खरेदी व विक्री महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ करते.[१६]

## ५.३.१.८ पशुपालन व दुग्धव्यवसाय

कोरेगाव तालुक्यात पशुपालन हे गायी, बैल, म्हैस, शेळया व मेंढया इत्यादीचे केले जात होते. गायी या खिल्लारी जातीच्या तर बैल हणंम जातीचे होते. ही जात दिसण्यास देखणी व शरीराने बळकट व चपळ असे. खिल्लार बाळगण्याचा प्रमुख उद्देश म्हणजे जातीवंत जनावरे शेतीच्या व इतर कामास मोठया प्रमाणावर उपयोगी पडत असत. याशिवाय गावोगावी या जातीच्या जनावरांची पैदास व्हावी, उत्तम बैल व दुभत्या गायी उत्पन्न व्हाव्या आणि खताचा व दुधाचा उपयोग लोकांना व्हावा, हा आहे.[१७]

महाराष्ट्र शासनाने इ.स.१८८२ मध्ये मुंबई येथे पशुवैद्यक विभाग निर्माण केला. पुढे १८८६ मध्ये मुंबई येथे पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय सुरू केले. याचा उद्देश असा होता की, पशुंच्यावर संशोधन होवून त्याचा अभ्यास केला जावा. तसेच त्याचे संवर्धन व्हावे हा होय. या महाविद्यालयात शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना त्यावेळी लष्करी नोकरीत घेतले जात होते. यापूर्वी म्हणजेच सन १९०० मध्ये गुजरातमधील छारोडी येथे पहिले पशु पैदास केंद्र स्थापन झाले होते. हेच मुंबई प्रांतातील पहिले पशु पैदास केंद्र होते. सन १९१८ मध्ये पशुसंवर्धनाचे कार्य कृषि संचालकाकडे सोपविण्यात आले होते. सन १९३२ व १९३७ मध्ये अनुक्रमे पशुजैव पदार्थ निर्मिती व मेंढी विकास विभाग सुरू केले गेले. सन १९४३ मध्ये जनावरांचे सांसर्गिक आजार निवारणाचे काम हाती घेण्यात आले. भारतात पहिली पशुगणना ही सन १९१६ मध्ये झाली. पशुसंवर्धन काम कृषि संचालक विभागाकडून पशुवैद्यक विभागाकडे सन १९४७ मध्ये हस्तांतरीत करण्यात आले. महाराष्ट्र शासन, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमार्फत सन १९६२ पासून पशुसंवर्धनाच्या योजना राबविणे सुरू झाले.[१८]

कोरेगाव तालुक्यात परंपरागत पशुपालन केले जात असून जनावरांना चाराही मुबलक मिळतो. बागायती क्षेत्र काही प्रमाणात असल्याने हिरवा चाराही मुबलक मिळतो. दुध उत्पादनही चांगले आहे. कोरेगाव तालुक्यासह संपूर्ण सातारा जिल्हयाचा विचार केल्यास असे आढळून येते की, सन १९८२–८३ मध्ये बैलांची संख्या २,४६,९२१, गायींची संख्या १,५२,६४०, म्हशींची संख्या ८२,७११, रेडे ३२,६००, घोडे १३,३९०, गाढवे ४,३९४, शेळयामेंढया ४२,३३७, उंट ३१ व हत्ती ५ इतके होते.[१९]

कोरेगाव तालुक्यातील चपळ व खिल्लार बैलांची जात प्रसिद्ध आहे. या जातीच्या बैलांची पैदास व विक्री करणारे अेनक शेतकरी या तालुक्यात आहेत. खिल्लार जातीच्या गाई मात्र कमी दूध देणाऱ्या असतात. अलिकडील काळात काही ठिकाणी एच.एफ.व जर्सी क्रॉस जातीचे बैलही आढळतात. याशिवाय स्थानिक बैलांच्या व गायींच्या जातीही आढळतात. संकरित पशुपैदास कार्यक्रमांतर्गत संकरित गायी पाळून अधिक दूध उत्पादनाकडे शेतकरी लक्ष देत आहेत. संकरित गायीत जर्सी, रेडट्रेन, होलस्टेन फ्रिजीयन जातीच्या गायी आढळतात. देशी गायीपासून संकरित गायींची पैदास करतात. कोरेगाव तालुक्यात शेळयामेंढया मात्र सर्वत्र आढळतात.

कोरेगाव तालुक्यात कोरेगाव, वाठार स्टे., किन्हई येथील यात्रेत गुरांची मोठी खरेदी–

विक्री केली जाते. सन १९८४–८५ पासून एकंबे ता. कोरेगाव येथे केंद्र पुरस्कृत गोकुळ ग्राम योजनेद्वारा पशुधन विकासाचे विविध कार्यक्रम राबविले जातात. सन १९८०–८१ पासून फिरते विस्तार निर्देशन पथक योजनेंतर्गत दुर्गम व अविकसित भागात जनावरांना विनामूल्य वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. याशिवाय संकरित पशुपैदास, खाद्य वाटप व केंद्र पुरस्कृत पश्चिम घाट विकास योजनेखाली पशुधन सुधारण्याचे काम केले जाते.[२०]

कोरेगाव तालुक्यात दुग्ध व्यवसायही मोठया प्रमाणावर चालतो. या व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नामुळे शेतकऱ्यांना शेतीस जोडधंदा म्हणून त्याचा उपयोग होऊ लागला आहे. महाराष्ट्र शासनाने दुग्ध व्यवसायाचे जाळे खेडयापर्यंत पसरविण्याचे कार्य हाती घेतले आहे. त्यानुसार १९५५–५६ पासून ग्रामीण भागात संघटित दुध व्यवसायाला प्रारंभ झाला होता. सन १९५८ मध्ये या व्यवसायाचे महत्त्व ओळखून दुग्ध व्यवसाय विकास विभाग निर्माण केला. शेतकऱ्यांना या व्यवसायावर कायम रोजगार मिळावा व दुधास वर्षभर बाजारपेठ उपलब्ध व्हावी यादृष्टीने शासनाने दुधावर प्रक्रीया करण्यासाठी शासकीय दुग्धशाळा व दूध शितकरण केंद्रे स्थापन केलेली दिसतात. कोरेगाव तालुक्याच्या आसपासच्या परिसरात अनेक शासकीय दूध योजना आहेत. त्यामध्ये महाबळेश्वरची दूध योजना सन १९६० मध्ये स्थापन झाली. ही योजना सातारा जिल्हयातील पहिली मानली जाते. सन १९७९ मध्ये सातारा येथे दुसरी दूध योजना स्थापन झाली. तर पहिले शासकीय दूध शीतकरण केंद्र सन १९८० मध्ये पारगावला स्थापन झाले. त्यानंतर १९८० मध्ये वडूज, १९८१ मध्ये फलटणला हे केंद्र स्थापन झाले.

सातारा जिल्हयातील पहिला दूध संघ ऑक्टोबर १९५७ मध्ये कराड येथे कोयना सहकारी दूध उत्पादक व प्रक्रीया संघ या नावाने स्थापन झाला. सन १९८९–९० मध्ये सातारा जिल्हयात एकूण ९५३ दूध संस्था कार्यरत होत्या. त्यामध्ये सात संघ असून त्यांची सभासद संख्या ९६,९३६ होती.भागभांडवल २९.६२ लाख रूपये गुंतविले होते. पुढे दूध व्यवसायात प्रगती व्हावी यासाठी कोरेगाव तालुका सहकारी दूध उत्पादक संघ कोरेगाव याची स्थापना १९८६ मध्ये झाली.[२१]

अशा प्रकारे दुग्ध व्यवसायातून कोरेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपला आर्थिकतेचा मोठा प्रश्न मार्गी लावला होता. त्यामुळे या तालुक्यात बाहेरच्या तालुका किंवा जिल्हयातून दूध कधीच आयात करावे लागले नाही.

### ५.३.१.९ कृषि उत्पन्न बाजार समिती कोरेगाव

कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात उत्पादित झालेल्या कृषिमालाचे खरेदीविक्री व्यवहार सुरळीतपणे पार पाडण्याच्या दृष्टीने व त्या व्यवहारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी बाजार समित्यांची स्थापना महाराष्ट्र राज्य कृषि उत्पन्न पणन, विकास व नियमन नियम १९६३ या कायद्यान्वये झालेली आहे.[२२]

कोरेगाव कृषि उत्पन्न बाजार समितीची स्थापना सन १९४९ मध्ये झालेली असून प्रत्यक्ष कामकाज इ. स. ०१ ऑक्टोबर, १९५० पासून सुरू झालेले आहे. बाजार समितीचे अनन्यसाधारण घटक म्हणजे शेतकरी, व्यापारी व हमाल मापाडी या सर्व घटकांना प्राधान्याने यथाशक्ती पायाभूत सुविधांचा अभाव होणार नाही याचा विचार करून बाजार समिती आपल्या निधीतून सर्व घटकांना या सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करते. या सुविधा उदाहरणार्थ पिण्याच्या पाण्याची सोय, दिवाबत्तीची सोय, शेतकरी निवास, उपहार गृह, स्वच्छता गृह, लिलाव गृह, व्यापारी संकुलाची सोय, इलेक्ट्रॉनिक वजनकाटे इत्यादी सोयी उपलब्ध करून दिल्या जातात.

व्यापारी वर्गाकडून शेतमालाच्या खरेदी–विक्री व्यवहारात शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये, त्यांच्या शेतमालाला रास्त बाजारभाव मिळवा, उघड लिलाव पद्धतीने त्या मालाचा जास्तीत जास्त बाजारभाव ठरविला जावा. तसेच शेतकऱ्यांच्या शेतमालाची वजनमापे योग्य रीतीने व्हावी, त्यात तो कुठेही फसवला जाऊ नये. शेतकऱ्याला रोजच्यारोज त्याच्या शेतमालाचे हिशोब मिळावेत. अशी सर्व कामकाजे बाजार समितीच्या नियंत्रणाखाली होऊन शेतकरी शेतमालाचा व्यापार करीत असताना फसवला जाणार नाही याची दक्षता बाजार समिती घेत असते.

त्याच पद्धतीने शेतकऱ्यांसाठी शेतमालाची प्रतवारी करण्याकरीता धान्य चाळणी यंत्रासारख्या सुविधा उपलब्ध करून देणे. तसेच फळे व भाजीपाल्यासाठी योग्य पद्धतीचे पॅकींग सुविधा, सुविधांची उपलब्धता करणे, शेतकऱ्यांसाठी निर्यात सुविधा उपलब्ध करून देणे, बाजार समितीच्या आवारावर शेतमाल साठवणुकीसाठी शेतमाल गोदाम व शीतगृहांची उभारणी करून देणे. अशा सुविधाही बाजार समितीने कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून देणे हे या बाजार समितीला क्रमप्राप्त आहे.[२३]

शेतमाल खरेदीविक्री व्यवहारांवर १ टक्का रक्कम बाजार फी म्हणून वसूल करण्याचे अधिकार सदरच्या कायद्यान्वये बाजार समितीस प्राप्त आहे.तसेच त्याबरोबर ०.०५ टक्के एवढी देखरेख फी वसूल करून ती रक्कम बाजार समितीस शासनाकडे भरावी लागते. अशा प्रकारे बाजार समितीची बाजार फी तसेच इमारत भाडे अनुज्ञप्ती (खरेदी–विक्री परवाना फी) च्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या बाजार निधीतून बाजार समितीच्या घटकांसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतात. बाजार समितीचे वार्षिक उत्पन्न सरासरी ४० लाख एवढे आहे. कोरेगाव कृषि उत्पन्न बाजार समितीची वर्गवारी 'क' आहे.

सहकार विभागाच्या निवडणूक प्राधीकरणाकडून बाजार समितीच्या निवडणुका पार पाडल्या जातात. धोरणात्मक निर्णय ठरविण्याचे अधिकार हे संचालक मंडळाचे असतात. बॉडीमध्ये १८ संचालक इलेक्टेड असतात. त्यापैकी ११ सोसायटी मतदार संघातून, ०४ ग्रामपंचायत मतदार संघातून, ०२ व्यापारी व ०१ हमाल प्रतिनिधी असतो. तसेच नॉमिनेटेड (स्वीकृत) प्रतिनिधी पणन प्रक्रीया सहकारी मतदार संघातून ०१, लोकल शहरातील ग्रामपंचायत ०१ प्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य समिती (पं. स.) ०१ प्रतिनिधी, ०२ शासनाने नियुक्त केलेले प्रतिनिधी असतात. यांना मतदानाचा अधिकार नसून चर्चेत सहभागी होता येते. प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये सचिव हे प्रमुख पद आहे. त्यानंतर सहा. सचिव, लेखापाल हे अधिकारी असतात.[२४]

## ५.४ उद्योगधंदे

कोरेगाव तालुक्याचा प्राचीन काळापासून चालत आलेला व्यवसाय म्हणजे कुटिरोद्योग होय. भारतातील परंपरेने चालत आलेली स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था ही ब्रिटिशांचे राज्य सुरू झाल्यानंतर नाश पावली. एवढेच नव्हेतर इ.स.१८८७ मध्ये महाराष्ट्रातील पुणे–मिरज रेल्वेमार्ग सुरू झाल्यानंतर पाशिमात्य पद्धतीची औद्योगिक संरचनेस सुरूवात झाली. विशेषतः या रेल्वेमार्गाच्या आसपासच्या गावात त्याचा प्रभाव मोठया प्रमाणावर होण्यास सुरूवात झाली. कोरेगाव हे सुद्धा याच लोहमार्गाच्या निकट आहे. त्यामुळे या तालुक्यात अनेक उद्योगधंद्यात वाढ झाली. विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात औद्योगिक वसाहतीची स्थापना करण्यात आली. या वसाहतीत अभियांत्रिकी, खाद्य पदार्थ, अधातू खनिज पदार्थ, रसायने व रासायनिक पदार्थांचे कारखाने सुरू करून उत्पादन वाढीस लावले.

### ५.४.१ सातारारोड येथील कूपर कारखाना

इ. स. १९२२ मध्ये सातारारोड येथे कूपर इंजिनियरिंग हा शेतीची अवजारे व नांगर तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. त्या कारखान्यातून लोखंडी नांगर आणि डिझेल इंजिन यांची निर्मिती होऊ लागली. शेती औजाराच्या निर्मितीमुळे ग्रामीण भागात चैतन्य निर्माण झाले. ग्रामविकासाला गती मिळू लागली. कूपर शेतकऱ्यांना कमी किमंतीत चांगल्या प्रतीचे नांगर आणि डिझेल इंजिन पुरविण्याचा सतत प्रयत्न करत. त्यामुळे ग्रामीण भागात त्यांची लोकप्रियता वाढत गेली. तसेच ग्रामीण जीवनावर असलेला त्यांचा प्रभावही वाढला. कूपर यांच्या कार्यामुळे शेतकऱ्यांच्यात अधिक जागृती होऊ लागली. औद्योगिक क्षेत्रात नित्यनवीन करण्याची धनजीशांना ओढ होती. त्यांनी मोटारीचे नवीन इंजीन तयार करून १९२६ साली महाबळेश्वर येथे गव्हर्नरला त्याचे प्रात्यक्षिक दाखविले होते. त्याकाळातील देशातील हा पहिलाच प्रयोग होता. या कारखान्यातील नांगराची किंमत ही किर्लोस्कर कंपनीतील नांगरापेक्षा कमी होती. कूपर कंपनीच्या नांगराच्या प्रसारासाठी 'कुऱ्हाड' नावाचे साप्ताहिक काढले होते. या साप्ताहिकाची किंमत केवळ दोन पैसे होती. या साप्ताहिकाचे धोरण 'रयतेच्या हिताच्या आड आला की घाव' हे होते. याचे संपादक कर्मवीर भाऊराव पाटील हे होते. [२५]

### ५.४.२ जरंडेश्वर सहकारी साखर कारखाना, चिमणगाव (गोटा) ता. कोरेगाव

डॉ.शालिनीताई पाटील यांनी खटाव व कोरेगाव तालुक्यातील कार्यकर्त्यांना हाताशी धरून साखर कारखाना उभारण्याचा संकल्प ७ मे, १९८१ रोजी केला. हा प्रस्ताव तयार करताना त्याची गाळप क्षमता १२५० मेट्रीक टन ठेवण्यात आली. हा प्रस्ताव दाखल केला त्यास अनंत अडचणी निर्माण झाल्या. शेवटी नोव्हेंबर १९८९ मध्ये मा.डायरेक्ट ऑफ शुगर यांनी या कारखान्याची अधिकृत नोंदणी केली व कोरेगावखटाव तालुक्याच्या सीमेवर चिमणगाव गोटे येथे कारखान्यास लागणाऱ्या २१४ एकर जमिनीची खरेदी करून हा कारखाना उभारण्यात आला. या कारखान्याचे प्रारंभीचे भागभांडवल २,१५५.४७ लाख एवढे होते. सभासद संख्या ही एकूण २७,५५५, शेअर्स संख्या ७०,०४४ एवढी होती.[२६] यावरून कारखान्याच्या आर्थिकतेचा अंदाज येण्यास मदत होते.

कारखाना सुरू करण्याचा प्रस्ताव देतेवेळी कारखाना उभारणीचा अंदाजित खर्च साधारणतः ६० कोटी रूपये होता. परंतु प्रत्यक्ष कारखाना उभारणीच्या वेळेस कारखान्यात

सुमारे १२० कोटी रूपयांची आवश्यकता भासली. याचे कारण जागतिक बाजारपेठेत मालांच्या किंमती वाढल्या व पर्यायाने दुप्पट भांडवलाची रक्कम उभी करणे कारखाना प्रशासनास भाग पडले. यासाठी कारखान्याने महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून ६,४०,००,०००, बँक ऑफ महाराष्ट्र २००,००,०००, युनायटेड वेस्टर्न बँक व स्टेट बँक ऑफ इंडिया व मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ५००,००,०००, कराड जनता सहकारी बँक, सांगली जिल्हा सहकारी बँक व वसंतदादा शेतकरी सहकारी बँक १२०,००,००० असे एकूण २,२००,००,००० कोटी रूपये कर्ज उभे केले.[२७]

वरील रक्कमेशिवाय कारखान्याने शासकीय धोरणानुसार व सहकारी तत्वाच्या कारखान्यास आवश्यक नियमावलीनुसार विविध ठेवींच्या स्वरूपात रक्कम एकूण ५,२६,३५,४०४.५० लाख रूपये एवढी आहे.[२८]

**जरंडेश्वर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ऊसाखालील एकूण क्षेत्र**

जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील कोरेगाव तालुका व खटाव तालुक्यातील काही भाग मिळून एकूण ऊस उत्पादन क्षेत्र हे ८ लाख मेट्रीक टन आहे. सन १९९९२००० या काळातील ऊसाची नोंदणी व गटवार क्षेत्र हेक्टरमध्ये पुढीलप्रमाणे दिलेले आहे. १) पिंपोडे  ८३८ हेक्टर २) सातारारोड  १४२८ हेक्टर ३) कोरेगाव  ३५५९ हेक्टर ४) रहिमतपूर  ७९९ हेक्टर ५) पुसेगाव  ६९६ हेक्टर ६) पुसेसावळी  ३११ हेक्टर ७) मायणी  २१९ हेक्टर. अशा प्रकारे एकूण ७८५० हेक्टर क्षेत्र ऊसाचे होते. (जरंडेश्वर सहकारी साखर कारखाना वार्षिक अहवाल १९९९) यावरून असे दिसून येते की, कारखान्यास पुरेल एवढया प्रमाणात या कार्यक्षेत्रातून ऊस उपलब्ध होत आहे. हा कारखाना सुरू होण्यापूर्वी तालुक्यातील शेतकऱ्यांना स्वतःचा ऊस इतर कारखान्यांकडे नेऊन त्याचे गाळप करण्यासाठी वारंवार तारेवरची कसरत करावी लागत होती. परंतु कारखाना सुरू झाल्यानंतर तालुक्यातील ऊस नोंदीचे क्षेत्रही दिवसेंदिवस वाढतच गेले.[२९]

**कारखान्याचे ऊस गाळप व उत्पादन**

जरंडेश्वर सहकारी साखर कारखाना १९९८ मध्ये सुरू झाला. म्हणजेच सन १९९८ मध्ये या कारखान्याची पहिली चाचणी गळीत हंगाम करण्यात आला. यात १४३८०.६९८ मेट्रीक टन ऊसाचे गाळप होऊन ८८०० साखर पोत्यांचे उत्पादन घेण्यात आले. पुढे १९९९

मध्ये ऊसाचे गाळप हे ३,००,९७३.६०८ मेट्रीक टन केले गेले. त्यावेळी कारखान्यातून ३,३२,२६० क्विंटल साखरेचे उत्पादन काढले गेले. सन २००० मध्ये सर्वात जास्त म्हणजे ४ लाख ६४ हजार ७५० क्विंटल उत्पादन निघाले.[३०]

**साखर उत्पादन (विविध प्रकार)**

जरंडेश्वर सहकारी साखर कारखाना, चिमणगाव यामधून नियमित साखर उत्पादनाबरोबरच कारखान्याचे एस.एन.पी., एस. व एच.एन.टी. साखर उत्पादन घेतले गेले. त्यानुसार १९९८९९ मध्ये ५६० क्विंटल, १९९९२००० मध्ये ५६१ क्विंटल व २०००२००१ मध्ये ८०५ क्विंटल इतके उत्पादन घेतले गेले.[३१]

**कारखान्याने शेतकऱ्यांना दिलेला ऊस दर**

जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्याने सुरूवातीपासूनच अनियमित ऊस दर दिलेला दिसून येतो. १९९८९९ मध्ये एक टन  ५६० रूपये, १९९९२००० मध्ये एक टन  ७२५ रूपये व २०००२००१ मध्ये एक टन  ७२५ रूपये इतका दर दिला होता. इतर कारखान्यांच्या तुलनेत या साखर कारखान्याने ऊसाच दर चांगला दिलेला दिसून येतो.[३२]

साखरेच्या उत्पादनाबरोबरच जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्याने पुढील प्रकल्प राबविले आहेत. त्यामध्ये वृक्ष शेती व फळबागा, यामध्ये फळझाडे, शोभेची झाडे, फुलझाडे, लहान मोठी सावलीची झाडे त्याचप्रमाणे प्रायोगिक तत्वावर काही प्रमाणात औषधी झाडांची लागवड केलेली आहे. सध्या या फळबागेतील उत्पादन फळांची विक्री सभासद कर्मचाऱ्यांना सवलतीच्या दरात उपलब्ध करून कारखान्याने एका बाजूने उत्पादनाचा मार्ग अवलंबिला आहे. तर दुसऱ्या मार्गाने सभासद कर्मचाऱ्यांना स्वस्त बाजारपेठ उपलब्ध करून दिलेली आहे.

सध्या या कारखान्याची स्वतःची ३ एकर चिक्कू बाग, २ एकर आंबा बाग, १ एकर नारळ बाग, याशिवाय मोठया प्रमाणात साग, बाभूळ, चिंच, आवळा, कडूलिंब, निलगिरी इत्यादी झाडांची लागवड कारखाना परिसरात करण्यात आलेली आहे.[३३]

या कारखान्याने डिस्टिलरी प्रकल्प सुरू केलेला आहे. त्यानुसार प्रतिदिन सुमारे ३०,००० लिटर उत्पादन क्षमतेचा अल्कोहोल निर्मितीचा प्रकल्प आहे. याशिवाय या काखान्यात कोजनरेशन सुरू करण्यात आले आहे. भारतात व महाराष्ट्रात कोजनरेशनची सुरूवात सन १९६८ मध्ये झाली परंतु साखर उद्योगात त्यास मोठया प्रमाणात वाव मिळाला

नाही. सध्या देशात वीज निर्मिती करून ती कोजनरेशनने ती वीज ग्राहकांपर्यंत पाहोचविली तर आज आपणास विजेचा तुटवडा जाणवणार नाही. याच उद्देशातून जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्यात १९९९ साली कोजनरेशनची सुरूवात झाली. या कोजनरेशनमार्फत सुमारे ३००० ते ४००० किलो वॅट वीज निर्माण होते.

याशिवाय ड्रेनेज पूल, व्यायामशाळा व सांस्कृतिक केंद्रे हे प्रकल्प राबविले जातात. तर नियोजित प्रकल्पामध्ये मेडिकल कॉलेज, कृषी अवजारे निर्मिती केंद्र यामध्ये पेरणी यंत्र, वाफायंत्र, सारा यंत्र, मळणी यंत्र, नवीन ऊस लागवड यंत्र, ऱ्होटर, फरांडी, नांगर, कल्टीव्हेटर, पाभर, कोळपे, टिकाव, खुरपे, कोयता व विळा इत्यादींचा समावेश होतो. ही अवजारे स्वतःच निर्माण करण्याची कारखान्याची योजना असून ती सवलतीच्या दरात सभासद, शेतकरी व कर्मचारी यांना उपलब्ध करून देण्याची योजना आहे.[३४]

नियोजित प्रकल्पामध्ये गोडाऊन उभारणी, ऊस शाळा, माती परीक्षण शाळा, ऊस बियाणांचा मळा इत्यादी प्रकल्प राबविले जातात.

**साखर कारखान्याच्या माध्यमातून रोजगाराची निर्मिती**

साखर कारखान्याच्या माध्यमातून पंचक्रोशित लघुद्योग, कुटीरोद्योग, महिला बचत गट, स्वयंरोजगार यांच्या माध्यमातून अनेक प्रकारे चालना मिळून कुशल, अकुशल, हंगामी कामगारांना रोजगार मिळाला आहे. कारखान्याच्या माध्यमातून तालुक्यात विविध हंगामी व अकुशल रोजगारामध्ये वाढ झालेली आहे. यात मुख्यतः ऊस तोड कामगार, वाहतुकीसाठी व त्यातल्या त्यात ट्रक व ट्रॅक्टर ड्रायव्हर्स, हवा पंक्चर काढणारे, वेल्डींग दुकानदार इत्यादींचा समावेश होतो. कारखाना प्रणाली नियमित चालण्यासाठी लागणाऱ्या सुमारे ४०० बैलजोडया, तेवढेच ट्रक, ट्रॅक्टर, ट्रॉलीज, १० कोयत्यांच्या १०० ते १२५ टोळया उपलब्ध कराव्या लागतात. ऊसतोड कामगार, वाहतूकदार इत्यादींना रोजगार उपलब्ध झाला. तसेच बगॅस, मळी, मोलॅसिस, डिस्टिलरी इत्यादीच्या निर्मितीसाठीही कुशलअकुशल कामगारांच्या रोजगाराची सोय कारखान्याच्या माध्यमातून करण्यात आलेली आहे.

अशा प्रकारे जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्यामुळे शहरी विभागातील १५ टक्के कुशल कामगार, १० टक्के अकुशल कामगार व ५ टक्के हंगामी कामगारांना रोजगार उपलब्ध झालेला आहे. तर ग्रामीण भागातील कुशल कामगार ८५ टक्के, अकुशल कामगार ९० टक्के तर

हंगामी कामगार ९५ टक्के इतका रोजगार उपलब्ध केलेला आहे.[३५] यावरून या कारखान्याने आर्थिकतेच्या दृष्टीने रोजगार उपलब्ध व्हावा, बेकारी दूर करावी या हेतूने फार महत्त्वाचे काम केले आहे.

**जरंडेश्वर कारखान्याने जलसिंचन योजनेवर केलेला खर्च**

या कारखान्याने जमिनीचे क्षेत्र जास्तीतजास्त ओलिताखाली यावे यादृष्टीने प्रयत्न केलेले दिसून येतात. त्यासाठी फार मोठया प्रमाणावर खर्चही केलेला आहे.

| अ.नं. | योजना | खर्च |
|---|---|---|
| १ | कटापूर पाणीपुरवठा योजना | २,१७,०८३.५० रू. |
| २ | साइट विहीर पाणी पुरवठा योजना | १,६५,३४०.२५ रू. |
| ३ | एकंबे विहीर पाणी पुरवठा योजना | २१,६३,९२८.४२ रू. |
| ४ | तिळगंगा पाणी पुरवठा योजना | २५,५०,९८८.३४ रू. |
| ५ | कॉलनी पाणी पुरवठा योजना | ४,९१,५४९.२० रू. |
| ६ | सांगवी पाणी पुरवठा योजना | ४,६८,६६४.०० रू.[३६] |

(संदर्भ  कोरेगाव तालुका कृषी विभागीय कार्यालय, कोरेगाव)

**कर्जाची उपलब्धता**

शेतीतून उत्पादन निघावे यादृष्टीने या कारखान्याने शेतकऱ्यांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सहकारी बँका, पतसंस्था, विविध कार्यकार सहकारी सेवा सोसायटया, नाबार्ड यासारख्या संस्थांकडून कर्ज उपलब्ध करून दिले. यातून सुलभ व्याज दराने कर्जपुरवठा करून दिला. त्यासाठी कारखान्याने सभासद शेतकऱ्यांना हमीपत्र देऊन या वि.का.स.सेवा सोसायटयांच्या माध्यमातून कर्जे उपलब्ध करून दिली. ही कर्जे देत असताना ऊसाखालील क्षेत्राचा अंदाज घेऊनच जास्तीतजास्त कर्जे शेतकऱ्यांना देत असत. याचा फायदा कारखान्यास असा झाला की, कारखान्याच्या माध्यमातून तालुक्यातील ऊस लागवडीखालील क्षेत्रही वाढले. त्याचबरोबर कारखाना सभासद शेतकऱ्यांना हमीपत्र देऊ लागला. असा दुहेरी फायदा कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना होऊ लागला. यामध्ये बहुतांशी ऊस उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांची दीर्घ मुदतीची, वाहन खरेदी, शेती खरेदी, शेती सुधारणा, विहीर सिंचन विषयक सुविधा, पशुधन खरेदी या प्रत्यक्ष शेतीसंबंधी तसेच घर व घर सुधारणा यासाठी कर्जे घेतलेली

आहेत.[३७]

या कारखान्याने शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन म्हणजेच शेतकऱ्यांच्या ऊसाच्या हप्त्याच्या निमित्ताने किंवा लाईटचे बील भरण्यासाठी तो बँकेत जात असतो. हे लक्षात घेऊन जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्याने स्वतःची जरंडेश्वर सहकारी बँक स्थापन केली. तिचा उपयोग शेतकरी व सभासदांना होऊ लागला. त्याचबरोबर इंदिरा सहकारी बँक लि.मुंबई यांची शाखा कोरेगाव येथे स्थापन केली. या बँकेमार्फत महिलांना आर्थिक व्यवहार करण्याची संधी मिळाली. अशा प्रकारे कारखाना निर्माण झाल्यानंतर त्याच्या परिसरात जवळजवळ ३५ बँका व पतसंस्थांच्या शाखा निर्माण झाल्या. या बँकांनाही मुबलक प्रमाणात ठेवी तसचे दैनंदिनीच्या स्वरूपातून भांडवल उपलब्ध झाले. वाढत्या बँकांमुळे सर्वसामान्य लोकांना दैनंदिन, वेळोवेळी बचत करण्याची सवय लागली. छोटेमोठे व्यवसाय सुरू करण्यासाठीही या बँकेने कर्जपुरवठा केल्याचे दिसून येते.

वरील योजनांशिवाय या साखर कारखान्याने शिक्षण, सांस्कृतिक सुधारणा कामगार कल्याणकारी योजना इत्यादी उपक्रम राबविले. तसेच या कारखान्यामुळे कोरेगाव तालुक्यात परंपरेने चालत आलेल्या पीक पद्धतीत बदल झालेला आढळतो. शेतकरी हा आंतरपीक पद्धत, नगदी पीके, एकाच वर्षात एकापेक्षा जास्त पीक उत्पादन करण्याची पद्धत, शेतीकडे पाहण्याचा व्यवहारी दृष्टीकोन इत्यादीबाबत शेतकरी जागृत झालेला आहे.

कारखान्यामुळे पशुधन व दुग्ध व्यवसायाचा विकास झालेला आहे. २० वर्षापूर्वी कोरेगाव पंचक्रोशित निव्वळ कौटुंबिक पातळीवर पशुपालन व दुग्धव्यवसाय केलेला आढळून येतो. परंतु कारखान्याच्या निर्मितीनंरत त्यात खुप मोठया प्रमाणावर बदल झालेला दिसून येतो. यामध्ये जातीवंत पशूंची पैदास, पशुवैद्यकीय केंद्राची निर्मिती, कृत्रिम रेतन केंद्रे यांच्यात झालेली वाढ, सकस खाद्य पुरवठा, पशुसंवर्धनाच्या तंत्राची माहिती इत्यादीमुळे पशुधनात मुबलक प्रमाणात वाढ झालेली आहे. उदा. कारखाना स्थापन होण्यापूर्वी कोरेगाव तालुक्यातील म्हशींची संख्या ही २६,६९५ होती. ती २००७ मध्ये ३०,१७९ एवढी झाली. तर संकरित गाईंची कारखाना स्थापनेपूर्वीची संख्या ३२,०६३ होती. त्यामध्येही वाढ होऊन ३५,०३३ झाली. मात्र शेळया, कोंबडया व मेंढया यात घट झलेली दिसून येते.[३८]

या अनुषंगाने कोरेगाव तालुक्यात पशुवैद्यकीय विभागही मोठया प्रमाणात कार्यरत असून

सातारा जिल्हा परिषद व त्यांच्या अंतर्गत काम करणाऱ्या पंचायत समितीमार्फत विविध पशूवैद्यकीय दवाखाने (श्रेणी १ व श्रेणी २) चालविली जातात.

अशा प्रकारे जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्याने कोरेगाव तालुक्याचा आर्थिक विकासात मोठा हातभार लावला आहे. कोरेगाव तालुक्यातील शेतीला पारंपारिकेतून आधुनिकतेकडे आणले. नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वर्षात एका पिकाऐवजी बारमाही पीक पद्धतीचा अवलंब सुरू केला. पाणीपुरवठा योजनांच्या माध्यमातून तालुक्यातील १६ टक्के शेतजमीन सिंचनाखाली आली. रासायनिक खते बी–बियाणे याबरोबरच सेंद्रीय खते, जैविक खते यांचा वापर करून शेतकरी शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करू लागला. ७६ टक्के शेतकऱ्यांचा शेतीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदललेला आहे.तसेच ६० टक्के शेतकरी हा शेतीबरोबरच शेतीपूरक व्यवसाय करू लागला. यामध्ये कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, शेळीपालन, इमुपालन, वराहपालन यासारख्या नवनवीन गोष्टींकडे उत्पन्नाचे प्रमुख साधन म्हणून पाहू लागला आहे. कोरेगाव तालुक्यातील १४१ गावांमध्ये असणाऱ्या सुमारे ९० विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटया कार्यरत असून त्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना व सभासदांना विविध कर्जे घेण्यात आली व त्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांची प्रगती साधली गेली. कारखान्याच्या स्थापनेनंतर कोरेगाव तालुक्यामध्ये सुमारे १२ राष्ट्रीयकृत बँका, जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या २५ शाखा तेवढयाच प्रमाणात सहकारी पतसंस्थांची सुरूवात झालेली आढळून येते.[३९]

जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्यामुळे कोरेगाव तालुक्यातील १४२ गावांमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण केले. पूर्वी साधारण असलेला शेतकरी हा ऊस उत्पादक शेतकरी बनला. यातूनच शेतकऱ्यांचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक दर्जा वधारला गेला. शेतकऱ्यांच्या दैनंदिन राहणीमानात बदल झालेला पहावयास मिळतो.

### ५.४.३ खाद्य तेलाचे उत्पादन

कोरेगाव तालुक्यात तेल गाळणे हा फार पूर्वीपासून चालत आलेला उद्योग आहे. सन १९४७–४८ मध्ये कोरेगाव तालुक्यात केवळ ११ तेलगिरण्या होत्या. यात एकूण ३१२ कामगार काम करत होते. ते मुख्यतः शेंगदाणा तेल व करंजीचे तेल गाळीत असत.[४०]

### ५.४.४ पेये, तंबाखू व तंबाखूच्या पदार्थाचे उत्पादन

पेये, तंबाखू व तंबाखूच्या पदार्थाचे उत्पादन करणारे कारखाने कोरेगाव व परिसरात

होते. सातारा शहरास लागूनच कोरेगाव तालुक्याची सीमा येत असल्याने सातारा येथे सन १९३० मध्ये विश्वनाथ नारायण चिपळूणकर यांनी केवळ दहा रूपये भांडवल गुंतवून तंबाखूमध्ये जर्दा व्यवसायास प्रारंभ केला होता. आज या व्यवसायास ८७ वर्षे झाली तरीही हा व्यवसाय टिकून आहे. या व्यवसायात वार्षिक उलाढाल ही सव्वा दोन कोटीची आहे. जर्दा व्यवसायासाठी लागणारा कच्चा माल गुजरातमधून आणला जातो. सातारा येथे हा तयार होणारा जर्दा तंबाखूचा माल सातारा जिल्हयासह संपूर्ण कोरेगाव तालुक्यात विक्रिसाठी येतो. विशेष म्हणजे खेडयापाडयात या मालाला खूप मोठया प्रमाणावर मागणी होती. तसेच कोरेगाव तालुक्यात देशी दारूच्या भट्टया होत्या. त्यातून दारू उत्पादीत केली जात होती. याशिवाय कोरेगावसह अनेक मोठया गावात विदेशी दारूची दुकानेही पाहावयास मिळतात. यावरून दारू विक्रीही मोठया प्रमाणावर केली जात होती. यापासून सरकारला मोठया प्रमाणावर कर मिळत आहे.[४१]

### ५.४.५ रसायने व रासायनिक पदार्थ

या उद्योगातंर्गत सातारा व कोरेगाव तालुक्यात रसायने व रासायनिक पदार्थाचे उत्पादन घेतले जात होते. त्यामध्ये सेंद्रिय तसेच असेंद्रिय रसायनांचा समावेश होत होता. उदा. खते व कीटकनाशके, प्राणवायू व नायट्रोजनवायू, वार्निश व तत्सम उत्पादन, औषध उत्पादन, सौंदर्य प्रसाधने, सुंगधी द्रव्ये, केशभूषा साहित्य व सर्व प्रकारचे साबण व इतर रासायनिक उत्पादने करणारे लहान उद्योग सुरू होते.

### ५.४.६ अधातू खनिज पदार्थ

### मुलभूत व मिश्र धातू

कोरेगाव तालुक्यात लोखंड, पोलाद व लोहमिश्रीत धातूपासून  शेती उपयोगी वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जात होते. सातारा जिल्हयातील अशा प्रकारचा पहिला कारखाना वालचंदनगर इंडस्ट्रिज लिमिटेड (इंजिन अँड फौंड्री) सन १९३३ मध्ये सातारारोड येथे सुरू झाला होता.[४२]

### धातूच्या वस्तू व सुटे भाग

धातूच्या वस्तू, मेटल, शेतीची अवजारे, भांडी, कॅन, हार्डवेअर, पिंजरे, शिपिंग बॅरल, ड्रम इ. भांडी तयार करण्याचे कारखाने कोरेगाव तालुक्यातील सातारारोड येथे होते. ही भांडी

टिनप्लेट किंवा इनॅमल्ड शीटमेटलपासून तयार केलेली असत. सन १९२२ मध्ये सातारारोड येथे सुरू झालेल्या कूपर इंजिनिअरिंग कंपनीमध्ये प्रथम शेतीची अवजारे व नांगर उत्पादित केले जात होते.[४३]

**यंत्रसामग्री, यांत्रिक अवजारे व सुटे भाग**

या उद्योगात बांधकाम व खाणकाम उद्योगात वापरल्या जाणाऱ्या इतर जड यंत्रसामग्रीचे उत्पादन व दुरूस्ती, साखर व कापड उद्योगातील यंत्रसामग्री, शेतीसाठी लागणारी अवजारे, डिझेल इंजिन व त्याच्या सुटया भागांचे उत्पादन, रेफ्रिजरेटर करणारे व वातानुकूलित यंत्रासाठी लागणारी उपकरणे उत्पादन करणारे कारखाने सातारारोड येथे होते.

सन १९२० मध्ये सातारारोडला धनजीशाह कूपर यांनी डिझेल इंजिन बनविणारा देशातील पहिला कारखाना सुरू केला. सन १९४७ मध्ये तो वालचंद इंडस्ट्रिजला विकला. या कारखान्यात शेती अवजारे, प्लेन कॅलिको लुम्स, स्वयंचलित माग, पाच ते चाळीस हॉर्स पॉवरची इंजिने तयार होतात.[४४]

**५.५ कुटीरोद्योग**

कुटिरोद्योगात प्रामुख्याने हातमाग उद्योग, लोकर विणकाम, सुतारकाम, लोहारकाम, कुंभार उद्योग, चर्मोद्योग, कातडे कमाविणे, तेलघाणा, तांबे व पितळी भांडी, बांबू वेतकाम इ.चा समावेश होता. त्यांची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे

**५.५.१ हातमाग उद्योग**

सन १८८५ च्या गॅझेटियरमध्ये दिलेल्या माहितीनुसार सातारा जिल्हयातील सर्व शहरामध्ये विणकर राहत होते. या विणकरात प्रामुख्याने साळी, कोष्टी व मोमीन लोकांचा समावेश होता. मुंबईहून मुलायम सूत मागवूत त्यापासून मुलायम साड्या तयार करत असत. तासगाव, जत व अथणी येथून जाडेभरडे कापड सातारा येथे मागविले जात होते. या कापडापासून कोष्टी व साळी हे चादरी विणत होते. याशिवाय चोळयांचे कापड, पंचे, लुगडी, धोतर यांचेही कापड मागवून त्यापासून त्या प्रकारच्या वस्तू बनवत असत. मोमीन लोक हे हलक्या प्रतीचे पागोटे विणत होते. औद्योगिकरणामुळे कारखान्यात कापड मोठया प्रमाणात तयार होत असल्याने खेडेगाव किंवा स्थानिक कारागिरांना त्यांच्यांशी स्पर्धा करावी लागत होती. या स्पर्धेमुळे स्थानिक कारागिरांना त्यांच्या कामाचा पुरेसा मोबदला मिळत नव्हता.

वर्षभर काम करूनही त्यांना केवळ ६० ते १५० रूपये इतक्या उत्पन्नावर समाधान मानावे लागत होते. इ. स. १९१४ मध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले. त्याचा परिणाम कापड व्यवसायावर मोठया प्रमाणावर झालेला पाहावयास मिळतो. विशेषतः रंगाचा तुटवडा झालेला होता. तसेच सुताच्याही किमतीत भरमसाठ वाढ झालेली पाहावयास मिळते. त्यामुळे हातमाग व्यवसाय अडचणीत आलेला होता. याच काळात विणकर कारागिरांना आपल्या कामानिमित्त मुंबई येथे स्थलांतर करावे लागले होते. सन १९२१–२२ मध्ये या व्यवसायात सरकारने लक्ष पुरविल्याने सन १९२२–२३ ते १९२५–२६ या काळात हा व्यवसाय पुन्हा सुरळीत चालू लागला. पुढे सन १९३६–३७ मध्ये विणकर कारागिरांना पुन्हा गिरणीतील कापडाबरोबर तीव्र स्पर्धा करावी लागली होती. सन १९४६ मध्ये सातारा व कोरेगाव परिसरात एकूण १,८२८ विणकर व २,३३० माग होते.[४५]

### ५.५.२ लोकर विणकाम

लोकर विणकामात सनगर व धनगर जातीचे लोक अग्रेसर होते. हे लोक लोकर मेंढरापासून लोकर काढणे, ही लोकर पिंजणे, ताणणे व त्यापासून घोंगडया तयार करणे हा व्यवसाय करत असत. कोरेगाव तालुक्यात हा व्यवसाय चालत होता. या भागात तयार केलेली घोंगडी ही रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयात पाठविली जात होती. कारण येथील घोंगडयांना तेथे मोठया प्रमाणावर मागणी होती. या घोंगडया आठवडयाच्या बाजारातही विक्रीसाठी आणल्या जात होत्या. सन १८८५ च्या सातारा जिल्हा गॅझेटिअरनुसार सातारा शहरासह जवळजवळ सर्वच तालुक्यात सनगर लोक हे मोठया प्रमाणात घोंगडया विणत असत. विशेषतः हे लोक ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात या कामात व्यस्त असत. स्त्रियादेखील पुरूषांना या कामात मदत करत असत. या व्यवसायापासून धनगर व सनगर लोकांची वार्षिक कमाई प्रामुख्याने रूपये ५० ते २०० रूपयापर्यत असे. एका घोंगडीची किमंत ही ७५ पैशापासून ते ३ रूपयापर्यत होती.[४६]

### ५.५.३ सुतारकाम

सुतार हा बलुतेदारात सर्वात प्रमुख बलुतेदार समजला जात होता. त्याच्यावाचून शेतकऱ्याला शेती करता येत नव्हती. तो शेतीसाठी लागणारी लाकडी अवजारे व हत्यारे बनवत असे. या मोबदल्यात त्याला शेतकऱ्यांकडून सुगीच्या दिवसात बलुता दिला जात असे. ब्रिटिश

काळातही ही प्रथा सुरू होती. शेती करणाऱ्या शेतकऱ्यामध्ये हिंदू व मुस्लिम हे दोघेही सहभागी होत असत. सुताराला या कामाचे वर्षाला साधारणपणे ७५ ते १२० रूपये मिळत असत. सन १९५१ मध्ये कोरेगाव तालुक्यात एकूण ३९ सुतार अशा पद्धतीचे काम करीत होते.[४७]

### ५.५.४ लोहारकाम

सातारा येथे ब्रिटिश राजवट सुरू झाली त्यावेळी महाबळेश्वरजवळ कुरूंदी नावाचा दगड मोठया प्रमाणावर सापडत होता. घिसाडी किंवा लोहार जातीचे लोक या दगडापासून अशुद्ध लोखंड काढून घेवून त्यापासून शेतीची अवजारे तयार करीत असत. ब्रिटिश काळात त्यांना या दगडापासून अशुद्ध लोखंड काढण्याकरिता इंधन मिळेना झाले. तसेच ब्रिटिश सरकारने इंग्लडहून लोखंड आयात करून ते स्वस्त दराने विकण्यास सुरूवात केली. त्यामुळे महाबळेश्वर येथील लोखंड गाळण्याचे हे काम घिसाडी व लोहार यांनी बंद केले. सन १८८५ च्या गॅझेटियरमध्ये दिलेल्या माहितीनुसार या व्यवसायातील लोहार व घिसाडी जातीचे लोक हे मुख्यतः शेतीची अवजारे, स्वयंपाकाची भांडी व भांडयाची दुरूस्ती करीत होते. तर पावसाळयात तवे, खिळे आणि बादल्या तयार करीत होते. त्यांचे दरडोई वार्षिक उत्पन्न ६० ते १५० रूपये होते. सन १९२१ मध्ये या व्यवसायात ४,०६३ कारागीर होते.[४८]

### ५.५.५ कुंभार उद्योग

खेडयात मातीपासून भांडी तयार करण्यात कुंभार ही जात अग्रेसर होती. या भांडयामध्ये प्रामुख्याने माट, मडकी व रांजण तयार करीत असत. घरातील चूलही कुंभार बनवत असे. घर बांधण्यासाठी लागणाऱ्या विटा व घराच्या छपरावरील कौलेही बनविण्याचे काम कुंभार जातीचे लोक करत असत. कोरेगाव येथेही काही ठिकाणी कौले बनविण्याचा व्यवसाय प्रगत होता. सन १९२१ मध्ये या व्यवसायात ७८० लोक होते.[४९]

### ५.५.६ चर्मोद्योग

प्राचीन काळापासून ढोर, मोची व चांभार ही जात कातडी कमविणे व त्यापासून वस्तू तयार करणे हा त्यांचा व्यवसाय होता. हे लोक कातडयापासून चपला, पायपोसा, लगाम मोट व पखाली तयार करत असत. या व्यवसायापासून या जातीला सालीना ७५ ते १०० रूपये मिळत होते. कोरेगाव येथे हा उद्योग मोठया प्रमाणावर सुरू होता. त्यात प्रामुख्याने मोची व चांभार जातीचे लोक गुंतलेले होते.[५०]

### ५.५.७ कातडे कमविणे

सातारा गॅझेटियर सन १८८५ नुसार कातडी कमविणे या व्यवसायात प्रामुख्याने ढोर जातीचे लोक गुंतलेले दिसून येत होते. पुढे या व्यवसायात वाढ झाल्यामुळे काही चांभारांनीही हा व्यवसाय सुरू केला. सन १९३१ मध्ये या व्यवसायात ५३६ लोक काम करीत होते.[५१]

### ५.५.८ तेल घाणा

कोरेगाव तालुक्यात ठिकठिकाणी तेल गाळण्याचे लहान लहान घाणे होते. तर कोरेगाव येथे तेल गाळण्याचा मोठा घाणा सुरू होता. आजही हा घाणा सुरू आहे. या घाण्यावर सूर्यफूल, भुईमूग, तीळ, जवस, करडई, कारळा, करंजी व अंबाडीचे तेल गाळले जात होते.[५२]

### ५.५.९ तांबे व पितळी काम

तांबे व पितळी धातूपासून वस्तू बनविणारे कारागिर हे पांरपारिक पद्धतीने आपला व्यवसाय करत असत. हे लोक पुणे व मुंबई येथून यासाठी तांबे व पितळ या धातूंचे पत्रे मागवित होते. या धातूच्या पत्र्यापासून बनविलेल्या धातूच्या मूर्ती व भांडयांना आठवडयाच्या बाजारात मोठया प्रमाणावर मागणी होती. तसेच पुणे व मुंबई येथेही मोठया प्रमाणावर मागणी होती. कोरेगाव येथील या व्यवसायातील लोकांचे सरासरी वार्षिक उत्पन्न ५० ते ५०० रूपये होते. सन १९२१ मध्ये ७५४ कासार कारागीर होते. कासाराशिवाय मराठा, माळी व मुसलमान लोक हा व्यवसाय करीत होते. एक कारागीर दररोज २९३० रूपये किमंतीचे ७.२६ किलोग्रॅम वजनाची दोन तपेली तयार करीत होता. कारागिरास ७.४७ किलोग्रॅम वजनाच्या तांब्याच्या तपेली ४ रूपये ७.४७ किलोग्रॅम वजानच्या तांब्याच्या घागरीस किंवा हंडयास ५.५० रूपये व ७.४७ किलोग्रॅम वजनाच्या पितळी घागरीस किंवा हंडयास ७ रूपये मजुरी होती.[५३]

अशाप्रकारे कोरेगाव तालुक्यात वरील उद्योग व्यवसाय चालत होते. यामध्ये कापड उद्योग, धातू उद्योग, खाद्य उत्पादने, कातडी कमावणे, चर्मोद्योग, कुंभार उद्योग, लोहार, सुतार, लोकर विणकाम व हातमाग उद्योग मोठया प्रमाणावर विस्तारले होते. त्यामुळे तालुक्यातील लोकांच्या गरजा भागविण्यास मदत होत होती. ज्या वस्तू तालुक्यातील गरजा भागवून शिल्लक राहत होत्या त्या वस्तू कोरेगाव तालुक्याबाहेर निर्यात केल्या जात होत्या व कोरेगाव तालुक्यात तयार न होणाऱ्या वस्तू व्यापारी कोरेगाव तालुक्यात विक्रीसाठी आणत होते. त्यामुळे लोकांना हव्या असणाऱ्या वस्तू मिळण्यास मदत झाली होती.

## ५.६ व्यापार

### ५.६.१ साप्ताहिक बाजार

प्राचीन काळापासून खेडी ही स्वयंपूर्ण होती. खेडयातील लोक आपल्या गरजा खेडयातच भागवत होते. यामध्ये बलुतेदार व अलुतेदार यांनी तयार केलेल्या शेतीपूरक वस्तू त्या खेडयातील लोकांच्या गरजा भागवून आठवडा बाजारात आणत असत. हे आठवडे बाजार हे प्रामुख्याने ३० ते ४० छोटया छोटया खेडयांच्यामध्ये मध्यवर्ती ठिकाणी असणाऱ्या कसबा पेठेत भरत असत. या आठवडे बाजारात या बलुतेदार व अलुतेदार यांनी बनविलेल्या वस्तू व शेतकऱ्यांनी शेतीतून पिकविलेल्या परंतु गावातील लोकांच्या गरजा भागवून उरलेल्या वस्तू विक्रीसाठी आणल्या जात होत्या. या वस्तूमध्ये प्रामुख्याने अन्नधान्य, भाजीपाला, तेल, गूळ, मिरची, फळे, मसाले, कापड, तांबे–पितळीची भांडी व इतर वस्तू इत्यादी वस्तू बाजारात विक्रीसाठी आणल्या जात होत्या. या बाजारात व्यापारी लोकही वस्तू विक्रीसाठी आणत असत. हे व्यापारी कापडाबरोबरच त्या मीठ, व इतर जीवनावश्यक वस्तू विक्रीसाठी आणत असत. खेडयातील लोहार, सुतार, मांग हे लोकही अनुक्रमे लोखंडी वस्तू, लाकडी वस्तू, दोरखंड विक्रीसाठी घेवून येत असत. त्या आठवडा बाजारात मोठया प्रमाणात मालाची विक्री होत असे. खेडयातील व शहरातील लोक वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारात गर्दी करत असत. शिवकाळात असे बाजार किल्ल्यावरही भरत असत. या बाजाराची देखभाल करण्याचे काम तेथील शेटे व महाजन करत असत.[५४]

### ५.६.२ व्यापारी पेठ

आठवडा बाजाराबरोबरच मध्ययुगीन काळात कोरेगाव तालुक्यातील महत्त्वाच्या गावात व्यापारी पेठा अस्तित्त्वात होत्या. या पेठांचे विशेष म्हणजे तेथे आठवडा बाजारासारखेच आसपासच्या खेडयातील शेतकरी लोक माल विक्रीसाठी आणत होते. या पेठेत सातारा जिल्हा व परिसरात न पिकणारा किंवा तयार न होणारा माल दुसऱ्या जिल्हयातून किंवा राज्यातून येथे आणला जात होता. यात मुख्यतः भुईमूग शेंगा, गूळ, तांदूळ, तंबाखू, धणे, हळद, मिरची, घोंगडी इत्यादी मालाचा समावेश होत होता. हा माल प्रामुख्याने मुंबई, पुणे व कोकणात पाठविला जात होता. मुंबई व पुणे येथून परदेशी कापड, नागपूर व सोलापूरहून कापड, चिपळूण, महाड व रत्नागिरीहून नारळ, खजूर, खारीक, सुपारी, मीठ व मसाल्याचे पदार्थ याची

आयात होत असे. तसेच येथे तयार होणारे महिलांचे झगे, चोळीचे खण, हातमागावरील कापड आणि आयात केलेली लुगडी यांची विक्री स्थानिक बाजारात होत असे. प्रारंभी कोरेगाव येथील बाजारपेठेतून काळी काकवी, धान्य, भुईमूग शेंग, हळद, मिरची, कापूस, लाकूड व कापडाची निर्यात होत असे. ज्वारी गहू, हळद व तंबाखू सातारा येथून चिपळूण मार्गे मुंबईस पाठविण्यात येत होती.[५५]

### ५.६.२ व्यापारी मार्ग

मध्ययुगीन काळात विशेषतः मराठा काळात महाराष्ट्रातील प्रमुख शहरांना जोडणारे सहयाद्री पर्वत रांगेतून घाटमाथ्यावरून जाणारे दोन मार्ग होते. त्यामध्ये पहिला प्रमुख मार्ग म्हणजे पुणे–कोल्हापूर–कर्नाटक हा होता. हा मार्ग पुणे जिल्हयातील बोरघाटातून येऊन कोरेगावच्या क्रमशः ईशान्येस व आग्नेयेस असलेल्या सालपे घाटातून निघून जाऊन पुढे सातारा–तासगावमार्गे मिरजला किंवा तारगाव व मसूरहून कराडला जात होता. कोरेगाव तालुक्यातील देऊर येथून वाठार स्टेशन मार्गे नैऋत्येस सालपे घाटातून बैलगाडयांनी वाहतूक केली जात होती.

महाराष्ट्रातील प्रमुख शहरांना किंवा जिल्हयाच्या ठिकाणांना सातारा जिल्हयातून जाणारे प्रमुख दहा मार्ग होते. त्यापैकी दोन मार्ग हे सातारा येथून पूर्वेकडील बाजूस सोलापूरकडे जाणारे होते. हे दोन्हीही मार्ग कोरेगाव येथून जात होते. साताऱ्याहून पूर्वेस पंढरपूरमार्गे सोलापूरला जाणाऱ्या दोन रस्त्यापैकी त्रिपुटी, विसापूर, खातगुन व पिंगळीवरून जाणाऱ्या मार्गाची लांबी २०९.२ कि. मी. होती. याशिवाय कोरेगाव येथून वाठार स्टेशन, पिंपोडे बु.।। व वाघोली किंवा सोळशी मार्गे खंबाटकीच्या घाटातून जाणारा एक मार्ग होता. त्या रस्त्याने शक्यतो जनावरांची वाहतूक केली जात होती. कोरेगावहून ईशान्येस जाणाऱ्या दोन मार्गापैकी पुणे जिल्हयातील शिरूरला जाणाऱ्या मार्गाची लांबी १४० कि.मी. होती. तर अहमदनगरला जाणाऱ्या रस्त्याची लांबी १९३.१ कि.मी. होती. कोरेगाव येथून रहिमतपूर, पुसेसावळी, मायणी व कलेढोण घाटमार्गाने जाणाऱ्या मार्गाची लांबी २३८.१८ कि. मी. होती.[५६]

१९ व्या शतकाच्या मध्यास सालपे घाटातून धावणारा पुणे–सातारा हा पहिला बांधलेला मार्ग होय. हा मार्ग कोरेगाव तालुक्याच्या उत्तर भागातून जात होता. सन १८४१ मध्ये तो बैलगाडयासाठी योग्य करण्यात आला.

## ५.७ आयुर्विमा

सातारा जिल्हयासह कोरेगाव तालुक्यातील लोकांना जीवन विमा योजनेचा लाभ मिळावा यादृष्टीने सन १९१३ मध्ये सातारा येथे श्री. बा. ग. चिरमुले उर्फ नानासाहेब यांनी वेस्टर्न इंडिया लाईफ इंश्युरन्स कंपनी स्थापना केली. सन १९४९ मध्ये कंपनीकडे एकूण विमा निधी ३,२५,३६,८३६/- रूपये होता. तर कंपनीचा खर्च उत्पन्नाच्या केवळ २३.०९ टक्के होता. यामध्ये कोरेगाव तालुक्यातील लोकांचा सहभाग होता.[५७]

## ५.८ कोरेगाव तालुक्याची इतर तालुक्यांशी तुलना

कोरेगाव तालुक्याचा आर्थिक इतिहास हा इतर तालुक्यापेक्षा थोडयाफार वेगळया पद्धतीचा असल्याचा दिसून येतो. कोरेगाव तालुक्यात शेती हा जसा प्रमुख व्यवसाय होता. त्याचप्रमाणे इतर तालुक्याचाही प्रमुख व्यवसाय शेती हाच आहे. परंतु कराड व वाई तालुक्यातील बहुतांशी क्षेत्र हे बागायती आहे.[५८] तेथे बारमाही पाणीपुरवठयाची सोय होते. परंतु कोरेगाव तालुक्यात उत्तरेकडील भाग हा दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो. जेथे उन्हाळयाच्या दिवसामध्ये पाणी पिण्यासाठी मिळत नाही तेथे शेती कशी पिकणार त्यामुळे शेती करणे अवघड झाले आहे. त्याचा परिणाम कोरेगाव तालुक्याच्या आर्थिक परिस्थितीवर झालेला दिसून येतो. उद्योगधंद्याच्या बाबतीत कोरेगाव येथे आधुनिक काळात स्थापन झालेला जरंडेश्वर सहकारी कारखाना व साताररोड येथे असलेली कुपर कंपनी हे दोन मोठे उद्योग सोडले तर दुसरा मोठा कोणताही उद्योगधंदा नाही.[५९] त्यामुळे कोरेगाव तालुक्यातील खेडयातील बरेचसे बेरोजगार तरूण वर्ग मुंबई, पुणे यासारख्या मोठया शहरांकडे नोकरीनिमित्त जातात. वाई व कराड येथे मात्र अनेक मोठे उद्योगधंदे आहेत. कारखाने आहेत त्यामुळे तेथील तरूणांना तेथेच मोठया प्रमाणावर उद्योग मिळत आहे. तसेच व्यापाराबाबत विचार करावयाचा झाला तर कोरेगाव तालुक्यात कोरेगाव, रहिमतपूर, साताररोड व वाठार स्टेशन हीच तेवढी पेठेची आहेत. त्यामुळे व्यापारासाठी फारच कमी प्रमाणात पेठेची गावे आहेत. याउलट परिस्थिती ही कराड व वाई तालुक्यात पहावयास मिळते. तेथे पेठेची गावे फार मोठया प्रमाणावर आहेत. त्यामुळे तेथील व्यापारी उलाढाल फार मोठया प्रमाणावर चालते. त्याचा फायदा तेथील आर्थिक परिस्थिती वाढण्यास होतो.[६०] तसे पाहिले सातारा जिल्हयातील आर्थिक परिस्थितीचा विचार केला असता कोरेगावचा विकास फारच कमी प्रमाणात झालेला आहे, हे स्पष्ट होते.

## ५.९ समारोप

कोरेगाव तालुक्याचा आर्थिक इतिहास पाहत असताना असे दिसून येते की, स्वातंत्र्योत्तर काळात कोरेगाव तालुक्यातील व्यापार व संपत्तीत बरीच वाढ झाली होती. तरीही भूधारकांचा कर्जबाजारीपणा वाढलेला होता. कोरेगाव तालुक्याचा आर्थिकतेचा कणा म्हणून शेतीकडे पाहिले जात होते. शेतीतून नगदी पिके व खरीप हंगामातील पीकांचे मोठया प्रमाणावर उत्पादन घेतले जात होते. या पीकांचे उत्पादन मोठया प्रमाणावर मिळावे यासाठी शासनाकडूनही मदत घेतली जात होती. शेतीस पूरक व्यवसाय म्हणून पशुपालन व्यवसायही केला जातो. दुग्ध व दुग्धजन्यपदार्थ उत्पादनही मोठया प्रमाणावर घेतले जाते. त्याचबरोबर शेतीतून निघणारे उत्पादन हे आठवडयाचा बाजार, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विक्रीसाठी पाठविले जाते. त्यामुळे आर्थिकदृष्टया कोरेगाव तालुक्याचा विकास होण्यास मदत झाली आहे.

कोरेगाव तालुक्यात स्थापन झालेला श्री. जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्याने कोरेगावच्या आर्थिक विकासास हातभार लावलेला आहे. या कारखान्याने केवळ साखर तयार करणे हाच उद्देश डोळयासमोर न ठेवता शेतीस पाणीपुरवठा व इतर उद्योगासही हातभात लावला आहे. या कारखान्यामुळे ऊस बागायती क्षेत्रास व कोरेगाव तालुक्यातील बेकारीचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली आहे. या कारखान्यात साखरेचे उत्पादनही मोठया प्रमाणावर होत आहे.

कोरेगाव तालुक्यात धनजीशहा कूपर यांनी लोकांच्या शेती उत्पादनात वाढ व्हावी यासाठी इ. स. १९२२ मध्ये सातारारोड येथे कूपर इंजिनियरिंग हा शेतीची अवजारे व नांगर तयार करण्याचा कारखाना सुरू केला. या कारखान्यामुळे कोरेगाव तालुक्यातील तरूणांची बेकारी दूर होण्यास मदत झाली आहे. त्यामुळे हा कारखाना कोरेगाव तालुक्यासाठी आर्थिकदृष्टया वरदान ठरलेला आहे.

याशिवाय कोरेगाव तालुक्यात परंपरेने सुरू असणारे ग्रामीण भागातील बलुतेदार व अलुतेदार यांचे व्यवसाय स्वातंत्र्योत्तर काळातही टिकून आहे. त्यामध्ये कापड उद्योग, धातू उद्योग, खाद्य उत्पादने, कातडी कमावणे, चर्मोद्योग, कुंभार उद्योग, लोहार, सुतार, लोकर विणकाम व हातमाग उद्योग मोठया प्रमाणावर विस्तारले होते. तर व्यापारामध्ये अंतर्गत व परराष्ट्रीय व्यापारही मोठया प्रमाणावर कोरेगाव तालुक्यात चालत होता. व्यापारी व दैनंदिन

गरजेच्या वस्तू या आठवडयाच्या बाजारातून व्यापारी विकण्यासाठी आणत होते. तर पेठेच्या ठिकाणी मोठमोठी दुकाने मांडून हा वस्तू विकल्या जात होत्या. त्यामुळे कोरेगाव तालुका आर्थिकदृष्ट्या महत्वाचा मानाला जात होता.

## संदर्भ


१. गायधनी रं. ना., राहुरकर व. ग., प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९५५, पृ. ७४

२. पानसे मु. ग., यादवकालीन महाराष्ट्र, मुंबई १९६३, पृ. ४२

३. आत्रे त्रिंबक नारायण, गांवगाडा, नाग नालंदा प्रकाशन, इस्लामपूर, १७ सप्टेंबर २०११, पृ. १०९

४. पाठक अरूणचंद्र (संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र शासन, साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९९९, पृ. १०४

5. Gazetteer of the Bombay Presidency, Satara, Government Central Press, Bombay, 1885, Page No. 346-347

६. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. ३४३ ते ३४५

७. कृषी विभाग, पंचायत समिती कोरेगाव यांचेकडून मिळालेली माहिती

८. कित्ता, पृ. ३४८

९. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, १८८५, पृ. १६७

१०. प्रत्यक्ष भेट व सर्वेक्षण

११. पाठक अरूणचंद्र (संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९९९, पृ. ३४९

१२. कृषी विभाग, पंचायत समिती, कोरेगाव यांच्याकडील माहिती

१३. महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीचा (वि. म. दांडेकर समिती) अहवाल

१४. कित्ता

१५. सातारा जिल्हा परिषद गौरव गाथा, १९१७

१६. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. ३६६

१७. भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, १९८५, पृ. ३७२, ३७३

१८. लोकराज्य, महाराष्ट्र शासन, सप्टेंबर १९८४, पृ. १२ ते १४

१९. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. १५०

२०. कित्ता, पृ. ३६१

२१. कित्ता, पृ. ३६३

२२. महाराष्ट्र राज्य कृषी उत्पन्न पणन, विकास व नियमन नियम १९६३ चा कायदा

२३. कृषी उत्पन्न बाजार समिती कोरेगाव यांचेकडून मिळालेल्या माहितीनुसार

२४. कित्ता

२५. गुजर जयवंत, सहस्त्रकातील वेगळा पारशी–सर धनजीशा कूपर, चंद्रकला प्रकाशन, पुणे, जून २००३, पृ. ७५

२६. कोरेगाव तालुका कृषी विभागीय कार्यालय, कोरेगाव

२७. जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्याचा वार्षिक अहवाल १९९० ते २००८

२८. कित्ता

२९. कृषि विभाग, पंचायत समिती कोरेगाव यांच्याकडून मिळालेल्या माहितीवरून

३०. जरंडेश्वर सहकारी साखर कारखाना वार्षिक अहवाल १९९८–२०००

३१. जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्या वार्षिक अहवाल उत्पादन विभाग, १९९९–२०००

३२. जरंडेश्वर सहकारी साखर कारखाना वार्षिक अहवाल १९९८९९ ते २०००–२००१

३३. प्रत्यक्ष भेट, पाहणी व सर्वेक्षण

३४. प्रत्यक्ष भेट, पाहणी व सर्वेक्षण

३५. जरंडेश्वर सहकारी साखर कारखाना वार्षिक अहवाल, १९९० ते २००८

३६. कोरेगाव तालुका कृषी विभागीय कार्यालय, कोरेगाव यांनी दिलेल्या माहितीनुसार

३७. जरंडेश्वर सहकारी साखर कारखाना वार्षिक अहवाल , १९९८–९९ ते २०००–२००१

३८. पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती, कोरेगाव

३९. पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती, कोरेगाव

40. Report On The Administration Of the Bombay Presidency, 1911-12, P. 80

४१. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. ४१९

४२. मुलाखत–महाव्यवस्थापक, सातारा जिल्हा उद्योग केंद्र दि. २४.०४.२०१७ वेळ : सायं. ५ वा. स्थळ : सातारा

४३. कित्ता

४४. कित्ता

45. Statistical Atlas, Of Bombay State, 1950, P. 71

४६. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. ४३५

47. Statistical Atlas, Of Bombay State, 1950, P. 111

48. Ibid, P. 11

49. Ibid, P. 111

50. Gazetteer of the Bombay Presidency, Satara, Government Central Press, Bombay, 1885, P. 223

51. Statistical Atlas, Of Bombay State, 1950, P. 91

52. Gazetteer of the Bombay Presidency, Satara, Government Central Press, Bombay, 1963, P. 812

५३. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. ४३५

54. Senses Of India, 1961,Vol.10, Part 7-C, Maharashtra, P. 15

55. Report On The Administration Of the Bombay Presidency, 1923-24, P. 83

५६. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. १९४

५७. कणगली एस. एम., पुण्याचा माहितीगार, १९४९, पृ. १०

५८. पाटील ए. जे. (डॉ.), कऱ्हाडचा इतिहास (सन १९५० ते २०००), पीएच. डी. अप्रकाशीत शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०११

५९. मुलाखत श्री. किसनराव घाडगे, संचालक, जरंडेश्वर साखर कारखाना, दि. २५. ०६. २०१७, वेळ : रात्री ८. ०० वा., स्थळ : सातारारोड (पाडळी)

६०. कोरडे डी. डी. (डॉ.), वाई शहराचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास (१९०० ते २०००), पीएच. डी. अप्रकाशित शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१२

# प्रकरण सहावे

# उपसंहार

कोरेगाव तालुका हा प्राचीन काळापासून सातारा जिल्हयाचा अविभाज्य घटक असून सातारा जिल्हयातील राजकीय व सामाजिक चळवळीत कोरेगाव तालुक्याने महत्त्वपूर्ण योगदान दिलले आहे. ऐतिहासिक दृष्टीकोनातून या तालुक्याला महत्त्वाचे स्थान आहे. कोरेगाव तालुक्याच्या उत्तर टोकाला सोळशी येथील डोंगरातून वसना नदीच्या उगम झालेला आहे. येथून ते दक्षिणेत तारगावपर्यंत या नदीचा सहवास कोरेगाव तालुक्याला लाभलेला आहे. वसना नदीच्या सहवासाने कोरेगाव तालुका सुजलाम् सुफलाम झालेला आहे. या तालुक्याचा इतिहास वैभवशाली आहे. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात कोरेगाव तालुक्यात जे राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व आर्थिक बदल घडून आले व त्यातून कोरेगाव तालुक्याचा विकास घडून आला आहे. त्यातून साररूपाने कोणकोणते निष्कर्ष समोर येतात त्याचे सादरीकरण इथे करण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला आहे. अभ्यासाची जी उद्दिष्टये ठरविण्यात आली होती त्यानुसार ही चर्चा करण्यात आली आहे.

प्रबंधातील पहिले प्रकरण 'सातारा जिल्हयाचा पूर्वेतिहास' याबाबतची माहिती देणारे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी आलिशाही, निजामशाही, कुतूबशाही व मुघल बादशाह औरंगजेब यांच्याशी संघर्ष करून महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. त्यांच्या मृत्यूनंतर छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराम महाराज व महाराणी ताराबाई यांनी औरंगजेबाशी संघर्ष करून आपली सत्ता अबाधित ठेवली. या संघर्षात छत्रपती संभाजी महाराजांची औरंगजेब बादशहाने केलेल्या क्रूर हत्येमुळे संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठला व येथील रयतेने औरंगजेबाला अखेरपर्यंत महाराष्ट्र जिंकू दिला नाही. परंतु महाराणी ताराबाई व शाहू यांच्या संघर्षामुळे महाराष्ट्रात यादवी निर्माण झाली. यावेळी छत्रपती शाहू यांनी पेशव्याला सेनाकर्ते पद दिले. त्यातून पुढे पेशव्यांनी शाहूंची सत्ता वृद्धिंगत केली. परंतु पुढील काळात पेशवे हे मराठी राज्याचे सर्वेसर्वा बनले आणि छत्रपती नामधारी झाले.यानंतर भारतात व्यापार करण्यासाठी आलेल्या इंग्रजांनी इ. स. १७५७ च्या प्लासीच्या लढाईने बंगालमध्ये आपल्या साम्राज्याची मुहूर्तमेढ रोवली. त्दनंतर इ. स. १७९९ मध्ये त्यांनी म्हैसूरमध्ये आपले

राज्य स्थिर केले व एकोणीसाव्या शतकाच्या सुरूवातीला इ. स. १८१८ मध्ये महाराष्ट्रात पेशवाईचा शेवट करून आपली सत्ता प्रस्थापित केली. परंतु पेशवा आणि छत्रपती यांच्यातील सत्तासंघर्षात पेशव्यांनी सत्ताहीन केलेल्या सातारच्या छत्रपतींची गादी आणि दक्षिणेतील सातारा परिसरातील जहागीरदारांच्या जहागिरी त्यांनी सुरक्षित ठेवल्या. यामागे ब्रिटीशांची मुत्सद्देगिरी होती.त्यांना भारतातील इतर संस्थानिकांच्या तुलनेत मराठयांची सत्ता नष्ट करण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागला होता. छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपतींची सातारा गादी याच्या प्रती मराठी रयतमध्ये किती आस्था आहे याची कल्पना ब्रिटीशांना होती. यापुर्वी मराठयांना नेस्तनाभूत करण्यासाठी आलेल्या दिल्लीचा बादशाहाची महाराष्ट्रात काय अवस्था झाली होती. हे इंग्रजांना ठाऊक होते म्हणून पेशवाईबरोबर सातारच्या छत्रपतींची गादी नष्ट केली तर येथील जनतेच्या आक्रोशाला बळी पडावे लागेल या जाणीवेतून सातारा राज्याची निर्मिती करून छत्रपती प्रतापसिंह महाराजांना गादीवर बसविले.

सातारा राज्याचा इतिहास पाहत असताना त्यामध्ये समाविष्ट होणाऱ्या सर्व प्रदेशाची माहिती मिळते की ज्याप्रमाणे मध्ययुगीन सातारा जिल्हा अनुक्रमे आदिलशहा, निजामशहा, पुन्हा आदिलशहा, मराठे, मुघल व पुन्हा मराठे यांच्या अंमलाखाली होता. या सत्तांनी सातारा प्रदेशावर आपापल्या परीने सत्ता गाजविलेली दिसून येते. मध्ययुगीन काळात विशेषतः शिवपूर्वकाळ व शिवकाळात सातारचा प्रदेश हा 'वायदेशात' मोडत होता. 'वायदेश' म्हणजेच वाई शहरापासून ते खटाव माणपर्यंतचा संपूर्ण प्रदेश होय. या प्रदेशात सातारा जिल्हयातील जवळजवळ सर्वच जिल्हयाचा समावेश होत होता. यात कोरेगाव तालुकाही अपवाद नव्हता. यावरून हे स्पष्ट होते की, ज्याप्रमाणे वाईवर वरील सत्ताधीशांची सत्ता होती. त्याचप्रमाणे कोरेगाव तालुक्यावरही वरील सत्ता असल्याचे स्पष्ट होते. म्हणजेच मध्ययुगीन काळातील वाई, सातारा यासारख्या तालुक्यांशी कोरेगाव तालक्याची तुलना केली असता असे आढळून येते की, तिन्हीही ठिकाणी एकसारखीच सत्ता वेळोवळी दिसून येते. कारण हा सर्व भाग वायदेशात मोडत होता.

पेशवे काळातही सातारा, वाई व कराड येथे जी परिस्थिती होती. तिच परिस्थिती कोरेगाव तालुक्यातही असल्याचे स्पष्ट होते. फरक एवढाच होता की, वाई येथील कारभार सरदार रास्ते सातारच्या छत्रपतीच्या अधिपत्याखाली पाहत होते. तर इतरत्र मात्र थेट

सातारच्या छत्रपतींची सत्ता होती. त्यामुळे कोरेगाव तालुक्यातही छत्रपतींची सत्ता होती हे स्पष्ट होते.

सातारा जिल्हयाच्या इतिहासातील आधुनिकतेचे पर्व श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह राजे यांच्या काळापासून सुरू झाले. आपल्या राज्यरक्षणासाठी सातारच्या छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी ब्रिटीशांबरोबर संघर्ष केलेला दिसून येतो.हा सशस्त्र संघष नव्हता. परंतु यात रयतेप्रती आपुलकी, प्रेम, जिव्हाळा, आत्मीयता व कर्तव्यनिष्ठा दिसून येते. त्यामुळे त्यांनी ब्रिटीशांशी मुत्सुद्देगिरीने राजकारण करून साताऱ्यातील जनतेला न्याय मिळवून दिला व त्यांच्यासाठी अनेक सुधारणा केला. छत्रपतींनी आपल्या राज्यात जनहितार्थ अनेक सुधारणा केल्या. लंडनमधील न्यायालयात साक्ष देताना कर्नल ब्रिग्ज याने म्हटले आहे की. ज्या हिंदुस्थानी राजांशी आपला संबंध आला त्या सर्वात प्रतापसिंह सच्छील व सद्वर्तनी होता.

छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी महाबळेश्वर हे गिरीस्थान विकसित केले. त्यांनी कर्नल ब्रिग्जच्या सूचनेवरून स्वखर्चाने सातारा ते महाबळेश्वर असा रस्ता बांधून तो पुढे प्रतोगडापर्यंत वाढविला. प्रतापसिंह महाराजांनी आपल्या सातारा संस्थानचा रेसिडेंटच्या मदतीने विकास घडवून आणला. त्यांनी यवतेश्वर, महादरा याठिकाणी तलाव बांधून सातारा शहरासाठी पाण्याची व्यवस्था केली. शहरात आखीव-रेखीव रस्ते बांधले. न्यायनिवाडा व राज्यकारभारासाठी ते स्वत: कचेरीत जात असत. त्यांनी आपल्या राज्यात रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपन करून प्रवाशांसाठी सावली केली व धर्मशाळा बांधल्या. पाण्यासाठी विहीरी खोदल्या.शेतकऱ्यांना तगाई कर्जे दिली. राजे शिक्षणाबाबत पुढारलेल्या विचाराचे होते. आधुनिक शिक्षणाचे महत्त्व जाणून त्यांनी मुलामुलींच्या शिक्षणासाठी पाठशाळेची इमारत बांधून दिली. बहुजन समाजातील मुलामुलींना शिक्षणासाठी उत्तेजन दिले. दलितांच्या शिक्षणालासुध्दा गती दिली. पाश्चात्य शिक्षणाच्या सामर्थ्याबाबत लोकांच्यात जागृती केली. रू. १२००० खर्च करून छापखाना काढला. तसेच त्यातूनअनेक दुर्मिळ ग्रंथांची छपाई केली गेली. देवालय बांधून आपला धर्म आणि संस्कृतीचे जतन केले. अनेक मंदिरांचा जिर्णोध्दार केला. छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी लोकहितार्थ केलेल्या कामांवरून त्यांचे जनतेप्रती असलेल्या प्रेम, कर्तव्यनिष्ठा, दक्षता या गोष्टी दिसून येतात. त्यांनी राजधानी साताऱ्यातही अनेक सोयीसुविधा केल्याचे दिसून येते. त्यामुळे कारागिरी, उद्योग व व्यापार यास राजाश्रय प्राप्त झाला.

गव्हर्नर माऊंट एलफिन्स्टननंतर सत्तेवर सर जॉन माल्कम गव्हर्नर म्हणून आला. तर सातारचा रेसिडेंट म्हणून कर्नल रॉबर्टसन नियुक्त झाला. प्रतापसिंह महाराजांना एतद्देशीय शत्रूंनी व इंग्रजांनी कटकारस्थाने करून त्यांना अनेकदा कोंडीत पकडून पदच्युत करण्याचा कट रचला. त्यातूनच प्रतापसिंह महाराजांचा ऱ्हास झाला. पुण्यातील शनिवारवाडयावर इंग्रजांचा युनियन जॅक स्वहस्ते फडकविणारा बाळाजीपंत नातू प्रतापसिंहाविरूद्ध गेले हे स्पष्ट होते.

छत्रपती प्रतापसिंह महाराजांना पदावरून दूर सारून त्यांचा भाऊ अप्पासाहेब भोसले यांना इंग्रजांनी ४ सप्टेंबर, १८३९ रोजी नवीन तह करून गादीवर बसविले. हा नवीन तह म्हणजे सन १८१९ मध्ये केलेल्या तहातील कलमांची दुरूस्ती होय. त्यानुसार छत्रपतींकडे असलेल्या सहा जहागिरदारांवरील ताबा इंग्रजांनी स्वतःकडे घेतला. त्यामुळे सातारा संस्थानावर ब्रिटीशांची सत्ता दृढ होण्यास मदत झाली. त्याचवेळी प्रतापसिंह महाराजांना रेसिडेंट ओव्हन्सने रात्रीच्यावेळी पकडून लिंब या गावी नेले. तेथे दोन महिने ठेवून नंतर काशी येथे पाठविले. तेथेच १४ ऑक्टोबर, १८४७ रोजी त्यांचे निधन झाले.

छत्रपती प्रतापसिंह महाराजांना १८३९ मध्ये पदच्युत करून त्यांचा छळ केल्यामुळे महाराष्ट्रातील संस्थानिकांमध्ये असंतोष पसरला. सातारा परिसरात तर बंडाळी सुरू झाली. कराड येथे धारराव पोवार यांनी बंड पुकारले. त्यास 'धाररावाचे बंड' असे म्हणतात. इस्लामपूरच्या नरसिंग दत्तात्रय पेटकर या ब्राह्मण गृहस्थाने लिंब गावी प्रतापसिंह महाराजांची भेट घेऊन बंडाळी केली. त्यासाठी पुणे.अहमदनगर, नाशिक व रायचूर जिल्हयामध्ये दौरे करून अरब जमादारांची मदत घेऊन १००० सैनिक जमविले. देवदुर्ग या ठिकाणी सेना एकत्र जमवून ब्रिटीशांच्या ताब्यात असणारा बदामीचा किल्ला जिंकून घेतला. पुढे ब्रिटीशांनी हा किल्ला पुन्हा जिंकला. नरसिंगराव पेटकर व त्याच्या सहकार्यांना फाशीची शिक्षा ठोठावली. परंतु पुढे फाशीऐवजी जन्मठेप देण्यात आली.

सातारा राज्याची सूत्रे श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्याकडे आल्यानंतर त्यांचा ब्रिटिशांशी संघर्ष सुरु होता. त्या संघर्षात त्यांनी सातारा तालुक्यासह इतर तालुक्यातील जनतेलाही न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केलेला होता. आपल्या राज्यात फार मोठे बदल घडवून आणले. त्यांनी जनतेच्या हितार्थ कामे केली. त्यांनी महाबळेश्वरसारख्या थंड हवेच्या ठिकाणी फार मोठया प्रमाणावर सुधारणा घडवून आणल्या होत्या. त्याचप्रमाणे इतरत्रही त्यांनी

लक्ष दिले होते. त्यात कोरेगाव तालुक्याचाही समावेश होता. कारण कोरेगाव तालुका हा सातारा राजधानीपासून जवळच होता. त्यामुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष काही सुधारणा तेथेही घडून आलेल्या पहावयास मिळतात.

प्रतापसिंह महाराजांच्याविरोधात ब्रिटिशांनी कट रचून त्यांना पदच्यूत केले. त्यावेळी त्यांची सुटका व्हावी. यासाठी सातारा राज्यातील जनतेने ठिकठिकाणी बंडे उभारली होती. या बंडामध्ये कोरेगाव तालुक्यातील जनतेनेही सहभाग घेतला होता. त्यामुळे यावरून असे स्पष्ट होते की, सातारा जिल्हयातील कराड, वाई व सातारा तालुक्यातील जनतेने ज्याप्रमाणे यामध्ये सहभाग दर्शविला तशाच प्रकारचा सहभाग कोरेगाव तालुक्यातही पाहावयास मिळतो.

भारतास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सन १९५० च्या स्वतंत्रपणे आपल्या राज्यघटनेनुसार राज्यकारभार सुरू झाला. त्यासाठी सन १९५१ मध्ये संपूर्ण भारतात पहिली निवडणूक होऊन खऱ्या अर्थाने लोकशाही राज्य सुरू झाले. या लोकशाही राज्यात ज्या राजकीय वाटचाली सुरू झाल्या होत्या. त्यामध्ये महाराष्ट्रासह सातारा जिल्हा व सातारा जिल्हयातील वाई, सातारा, पाटण, फलटण, खंडाळा, खटाव, माण, कराड, दहिवडी इत्यादी तालुक्याबरोबर कोरेगाव तालुकाही सहभागी झालेला होता. यामध्ये असहकार आंदोलन, सविनय कायदेभंग चळवळ, १९४२ चे चले जाव आंदोलन इत्यादीमध्ये सहभाग घेतलेला होता. यावेळी स्वातंफ्रय चळवळीत विशेषतः सन १९४२ च्या लढयामध्ये ज्यांनी सातारा जिल्हयाचे नेतृत्व केले होते. त्यामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील, वाईचे किसन वीर यांच्याबरोबरीने कोरेगाव तालुक्यातील कुमठे येथील श्री. पांडुरंग बोराटे यांनीही फार मोठे कार्य केलेले दिसून येते. त्यामुळे वाई, सातारा, कराड व इतर तालुक्याच्या मानाने कोरेगाव तालुक्यानेही स्वातंफ्रय चळवळीत सहभाग घेवून भारताला स्वातंफ्रय मिळवून देण्याचा मोठा प्रयत्न केलेला होता.

भारताला स्वातंञ्य मिळाल्यानंतर भारतात जो राजकीय बदल झाला त्याचे पडसाद कोरेगाव तालुक्यातही उमटलेले दिसून येतात. येथील कार्यकर्त्यानी कोरेगाव तालुक्याचा राजकीय विकास व्हावा, या दृष्टीने प्रयत्न सुरू केले होते. २६ जानेवारी १९५० पासून ज्या सार्वत्रिक निवडणूका होऊ लागल्या त्यामध्ये कोरेगाव तालुक्यानेही सहभाग घेतला होता. कोरेगाव तालुक्यातील कार्यकर्त्यानी पंचायत समिती, जिल्हा परिषद, विधानसभा व लोकसभा या निवडणूकीत सहभाग घेतला होता.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीतही कोरेगाव तालुक्याने सहभाग घेतलेला होता. संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सोडविण्यासाठी महाराष्ट्रातील जनतेपुढे अडचण निर्माण झाला होता. त्यांच्यापुढे कॉंगेस किंवा सयुंक्त महाराष्ट्र हे दोन पर्याय होते त्यावेळी कोरेगाव तालुक्यातील कार्यकर्त्यांनी किसन वीर यांच्या नेतृत्वाखाली सातारा जिल्हयात कॉंग्रेस उभी केली होती. इ.स.१९५७ च्या निवडणूकीत पुन्हा कॉंग्रेसचा पराभव झाला होता. यावरून संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा प्रश्न फार गंभीर बनलेला होता हे दिसते. याचा प्रत्यय पंडित नेहरू प्रतापगडावर आले होते तेव्हा आला होता. पुढे पंडित नेहरू यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या प्रस्तावास मंजूरी दिली. अशाप्रकारे १ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा. श्री यशवंतराव चव्हाण हे झाले.

इ. स. १९६२ च्या लोकसभेच्या निवडणूकीत सातारा उत्तर मतदार संघातून किसन वीर निवडून आले होते. त्यांना यशवंतराव चव्हाण यांनी दिल्लीला पाठविले होते. तेथे त्यांनी सर्व संसद सदस्यांना एकत्र आणून त्यांच्यावर आपला प्रभाव निर्माण केला होता. इ. स. १९६२ च्या भारतचीन युद्धात कोरेगाव तालुक्यातील सैनिकांनीही सहभाग घेतला होता. इ. स. १९६५ च्या भारत पाकिस्तान युद्बातही कोरेगाव तालुक्यातील सैनिकांनी सहभाग घेतला होता.

महाराष्ट्राच्या राजकारणाचा विचार केला असता असे दिसून येते की, सन १९५१ ते २००० या काळात राजकारणात कॉंग्रेस पक्षासह इतर पक्षही सहभागी झाले होते. यामध्ये अनेक वेळा कॉंग्रेस पक्षालाच विजय मिळालेला पाहावयास मिळतो. इतर पक्षा एक दोन वेळा निवडून आले होते. परंतु कॉंग्रेस पक्षाने मात्र अनेक वेळा विजय मिळविला आहे. कॉंग्रेस पक्ष हा यशवंतराव चव्हाण व इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली निवडणूका लढवित असे. यावरून हे स्पष्ट होते की या काळात महाराष्ट्रात कॉंग्रेस पक्षासह इतर अनेक राजकीय पक्षांनी आपले स्थान अत्यंत मजबुतरित्या निर्माण केलेले आहे. मात्र हाच संदर्भ घेऊन सातारा जिल्हयाचे राजकारण अभ्यासले असता सातारा जिल्हयात कॉंग्रेस वगळता कोणत्याही राजकीय पक्षाला स्थान मिळालेले नाही. अपवादात्मक स्थितीत ज्या ज्या वेळी सातारा जिल्हयातील कॉंग्रेसतर कोणत्याही पक्षाला यश मिळालेले आहे ते यश त्या पक्षाचे नसून त्या पक्षामार्फत उभ्या करण्यात आलेल्या उमेदवाराचे वैयक्तिक यश असल्याचे स्पष्टपणे जाणवते कारण त्यापुढील निवडणूकांमध्ये जर तो उमेदवार दुसऱ्या पक्षामार्फत निवडणूकीस उभा राहील्यास मागील वेळी

विजयी झालेल्या पक्षाच्या उमेदवारास अत्यंत कमी मते मिळाली आहेत. सातारा जिल्हयाच्या राजकारणात फक्त काँग्रेस पक्षाचेच वर्चस्व असल्याचे जाणवते. सुरूवातीच्या काळात शेतकरी कामगार पक्षामार्फत क्रांतिसिंह नाना पाटील यांनी सातारा जिल्हयात काँग्रेस पक्षाला कडवा विरोध केला मात्र त्यांच्या नंतर यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वात सातारा जिल्हा हा काँग्रेसचा प्रमुख बालेकिल्ला म्हणून महाराष्ट्र आणि देशात ओळखला गेलेला आहे.

सातारा जिल्हयातील लोकसभा निवडणूकीत कोरेगाव तालुक्याचा समावेश हा उत्तर सातारा मतदारसंघात होत होता. त्यावेळी सातारा जिल्हयातील लोकसभेचे मतदारसंघ हे प्रामुख्याने उत्तर सातारा, दक्षिण सातारा, कराड हे होते. सन १९५१ च्या लोकसभा निवडणुकीत उत्तर सातारा व दक्षिण सातारा लोकसभा मतदारसंघात इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाचा विजय झालेला होता. सन १९५७ च्या लोकसभा मतदारसंघात कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियातर कराड मतदारसंघात पीझंटस अँड वर्कर्स पार्टी हे दोन काँग्रेस व्यतिरिक्त पक्ष निवडून आले होते. सन १९६२, १९६७, १९७२, १९७७ च्या लोकसभा निवडणूकीत सातारा व कराड लोकसभा मतदारसंघात इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाचा विजय झालेला होता. सन १९८० च्या लोकसभा निवडणूकीत सातारा येथे इंडियन नॅशनल काँग्रेस (यू) तर कराड मतदारसंघात इंडियन नॅशनल काँग्रेस (आय) हे पक्ष निवडून आले होते. सन १९८४, १९८९, व १९९१ च्या लोकसभा निवडणूकीत इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाचा विजय झालेला होता. तर सन १९९६ च्या लोकसभा निवडणूकीत सातारा मतदारसंघात शिवसेना व कराडमध्ये इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाचा विजय झालेला होता.

अशाप्रकारे या लोकसभा निवडणूकीवरून हे स्पष्ट होते की, सातारा जिल्हयातील लोकसभा मतदारसंघामध्ये इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाला जास्तीत जास्त वेळा बहुमत मिळाले होते. विशेष म्हणजे कोरेगाव तालुक्यातील जनतेनेही यात इंडियन नॅशनल काँग्रेसपक्षालाच जास्तीत जास्त वेळा निवडून दिलेले दिसते. यावरून हे स्पष्ट होते की, इतर तालुक्यातील जनतेने ज्याप्रमाणे आपले मतदान ज्या पक्षाच्या उमेदवाराला केलेले आहे. त्याच पक्षाच्या उमेदवाराला कोरेगाव तालुक्यातील जनतेने आपले मतदान केलेले दिसून येते.

विधानसभेच्या बाबतीत कोरेगाव तालुक्याची सातारा जिल्हयातील इतर विधानसभा मतदारसंघाशी तुलना केली असता ज्या काही निवडणूका झाल्या होत्या. त्या निवडणुकीत

कोणत्या विधानसभा मतदारसंघात कोणत्या पक्षाचा विजय झालेला होता हे पाहावे लागेल. त्यावरून कोरेगाव विधानसभा मतदारसंघात काय परिस्थिती होती. याची माहिती मिळण्यास मदत होते. तसेच इतर मतदारसंघाशी तुलना केल्यास काय अवस्था होती. हे समजण्यास मदत होईल तेव्हा यामध्ये सातारा जिल्हयातील विधानसभा मतदारसंघातील निवडून आलेल्या राजकीय पक्षाबाबतची माहिती पुढीलप्रमाणे सांगता येईल.

सन १९५१ च्या विधानसभा मतदारसंघात पुढील मतदार संघात विविध राजकीय पक्षांना विजय मिळालेला दिसून येतो. वाई खंडाळा व कराड दक्षिण मतदारसंघात पीझंटस अँड वर्कर्स पार्टी, खटाव, पश्चिम सातारा, जावळी, फलटर्णमाण, पाटण, कराड उत्तर व कोरेगाव मतदारसंघात इंडियन नॅशनल काँग्रेस पक्ष, तर पूर्व सातारा मतदारसंघात कामगार किसान पक्षाचा विजय झाला होता.

विधानसभा निवडणूक १९५७ विधानसभा मतदारसंघात पुढील मतदार संघात विविध राजकीय पक्षांना विजय मिळालेला दिसून येतो. वाई, जावळी व कराड दक्षिण मतदारसंघात पीझंटस अँड वर्कर्स पार्टीचा विजय झाला होता. प्रजा समाजवादी पार्टीचा विजय हा खटाव मतदारसंघात विजय झाला होता. कोरेगाव, पाटण व कराड उत्तर मतदारसंघात इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाचा विजय झालेला होता. पूर्व सातारा मतदारसंघात अपक्ष, फलटण मतदारसंघात कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया पक्षाचा विजय झाला होता.

विधानसभा निवडणूक १९६२ विधानसभा मतदारसंघात पुढील मतदार संघात विविध राजकीय पक्षांना विजय मिळालेला दिसून येतो. वाई, खटाव, कोरेगाव, सातारा, फलटण, जावळी, पाटण, कराड उत्तर मतदारसंघात इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाचा विजय झालेला होता. तर दक्षिण मतदारसंघात पीझंटस् अँड वर्कर्स पक्षाचा विजय झाला होता.

विधानसभा निवडणूक १९६७ विधानसभा मतदारसंघात पुढील मतदार संघात विविध राजकीय पक्षांना विजय मिळालेला दिसून येतो. वाई, खटाव, कोरेगाव, सातारा, माण, फलटण, जावळी, पाटण, कराड उत्तर व कराड दक्षिण या सर्व मतदारसंघात इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाचा विजय झालेला होता.

विधानसभा निवडणूक १९७२ मध्ये फलटण, माण, सातारा, वाई, जावली, पाटण, कराड उत्तर व कराड दक्षिण या मतदारसंघात सर्वत्र इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाचा विजय

झालेला होता.। तर खटाव कोरेगाव मतदारसंघात मात्र अपक्ष उमेदवार निवडून आले होते. १९७८ च्या विधानसभा निवडणूकीत प्रामुख्याने माण, खटाव, कोरेगाव वाई, जावली व कराड दक्षिण येथे इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाचा विजय झालेला होता. फलटण, सातार व पाटण येथे अपक्ष उमेदवार तर कराड उत्तर येथे पीझंटस अँड वर्कर्स पार्टीचे उमेदवार निवडून आलेले होते. विधानसभा १९८० च्या निवडणूकीत फलटण, माण, कोरेगाव, वाई जावली, कराड उत्तर, कराड दक्षिण येथे इंडियन नॅशनल काँग्रेस पक्ष (यू) विजयी झालेला होता. तर खटाव, सातारा व पाटण या मतदारसंघात इंडियन नॅशनल काँग्रेस पक्ष (आय) विजयी झालेला होता. सन १९८५ मध्ये विधानसभा मतदारसंघात कोरेगाव, वाई, जावली, सातारा, कराड दक्षिण येथे इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाचा विजय झालेला होता. इंडियन काँग्रेस सोशॅलिस्ट हा पक्ष माण, पाटण, कराड उत्तर या मतदारसंघात निवडून आलेला होता. फलटण व खटाव येथे अपक्ष उमेदवार निवडून आलेले होते. सन १९९० च्या विधानसभा मतदारसंघात फलटण, खटाव, कोरेगाव, वाई, जावली, सातारा, पाटण, कराड उत्तर व कराड दक्षिण येथे इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाचा विजय झालेला होता. तर माण मतदारसंघात मात्र अपक्ष उमेदवार निवडून आलेला होता.

सन १९९५ च्या निवडणूकीत कोरेगाव, सातारा, पाटण, कराड दक्षिण येथे इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाचा विजय झालेला होता. तर शिवसेनेचा उमेदवार जावली विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेला होता. तर अपक्ष उमेदवार हे फलटण, माण, खटाव, वाई, कराड उत्तर या मतदारसंघातून निवडून आलेले होते. सन १९९५ च्या निवडणूकीत फलटण, माण, खटाव, कोरेगाव, वाई, जावली, सातारा, पाटण, कराड उत्तर या मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचा विजय झालेला होता. तर दक्षिण कराडमध्ये इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाचा विजय झालेला होता.

अशाप्रकारे स्वातंफ्रयोत्तर काळातील निवडणूकींचा विचार केला असता व या निवडणूकीची सातारा जिल्हयातील सर्व मतदारसंघाची कोरेगाव विधानसभा मतदारसंघाशी तुलना केली असता वेगळेपणा दिसून येत नाही. कारण इतर मतदारसंघात ज्या पक्षाला यश मिळाले आहे त्याच पक्षाला कोरेगाव विधानसभा मतदारसंघात यश मिळालेले दिसून येते. या सर्वात इंडियन नॅशनल काँग्रेस या पक्षाने स्वातंफ्रयोत्तर काळात सातारा जिल्हयात जास्त काळ

यश मिळविलेले दिसून येते. त्यामुळे सातारा जिल्हा हा त्या काळात काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला समजला जात होता. पुढे मा.शरद पवार यांनी राष्ट्रवादी पक्षाची स्थापना केल्यानंतर मात्र सातारा जिल्हयातील बहुतांश विधानसभा मतदार संघात काँग्रेस पक्षाचा पराभव होऊन तेथे राष्ट्रवादी पक्षाचा विजय झालेला दिसून येतो. यात कोरेगाव तालुक्यातही तिच परिस्थिती झालेली पाहावयास मिळते. कोरेगाव तालुक्यात सातारा जिल्हयातील इतर विधानसभा मतदारसंघापेक्षा एक महत्वाचे वैशिष्टय आढळते ते म्हणजे सन १९७८, सन १९८०, सन १९८५, सन १९९० व सन १९९५ या सर्व निवडणूकात मा.श्री.शंकररावजी जगताप हे इंडियन काँग्रेस पक्षाचे उमेदवार निवडून आले होते. हेच या मतदारसंघाचे प्रमुख वैशिष्टय होय.

कोरेगाव विधानसभा निवडणूकीतही इंडियन नॅशनल काँग्रेसचेच वर्चस्व दिसून येते. या निवडणूकीत श्री. शंकरराव जगताप यांनी सलग पाच वेळा निवडून आमदार बनण्याचा बहुमान मिळविला. त्यामुळे या मतदार संघात काँग्रेसला किती महत्व प्राप्त झाले होते हे स्पष्ट होते. पुढे सन १९९९ मध्ये डॉ.शालिनीताई पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमार्फत निवडणूक लढवून श्री.शंकरराव जगताप यांचा पराभव केला. तेव्हापासून काँग्रेस आयचे वर्चस्व कमी होऊन राष्ट्रवादी काँग्रेसचे महत्व वाढीस लागलेले दिसून येते.

सातारा व कोरेगाव मतदार संघात ज्या राजकीय व्यक्तिमत्व लाभलेल्या व्यक्ती होऊन गेल्या त्यामध्ये श्री.क्रांतिसिंह नाना पाटील, किसन वीर, श्री.यशवंतराव चव्हाण, श्री.शंकरराव जगताप, डॉ.शालिनीताई पाटील इ. होत. यांनी आपापल्या परीने निवडणूका लढवून राजकीय, सामाजिक व सार्वजनिक सुधारणा केलेल्या पाहावयास मिळतात. या लोकांनी सर्वसामान्य लोकांच्या दुःखाला वाचा फोडून त्यांना न्याय मिळवून देण्याचे कार्य केले.

मा.यशवंतराव चव्हाण यांना महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनण्याचा मान मिळाला होता. त्यांनी यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या राजकीय कार्याबरोबरच समाजकारण, अर्थकारण, तांत्रिक प्रगती, शिक्षण, सहकार, आर्थिक इ.बाबतीत महत्वाचे कार्य केलेले दिसून येते. त्याचबरोबर शंकरराव जगताप व डॉ. शालिनीताई पाटील यांनीही लोकांच्या हिताची अनेक कामे करून कोरेगाव तालुक्यास महाराष्ट्रातील इतर तालुक्याप्रमाणे प्रगतीपथावर नेले.

कराड तालुक्याच्या विकासात राजकारणी व समाजकारणी म्हणून प्रसिद्ध असणारे आनंदराव चव्हाण व प्रेमिलाकाकी चव्हाण यांचे होते. यांचे घराणेही गांधी घराण्याशी एकनिष्ठ

होते. त्यामुळे त्यांना राजकारण व समाजकारणामध्ये मोठा पाठिंबा मिळाला होता. त्यंच्या प्रयत्नामुळे पश्चिम महाराष्ट्रातील वसंतदादा पाटील, यशवंतराव मोहिते, शिवराज पाटील, बाळासाहेब विखे पाटील, उदयसिंह गायकवाड इ. राजकारणी नेते इंदिरा कॉंग्रेस पक्षात सहभागी झाली होती. त्याचप्रमाणे कोरेगाव तालुक्याचे आमदार इंडियन नॅशनल कॉंग्रेसचे मा.श्री.शंकरराव जगताप यांनी कोरेगाव तालुक्याच्या विकासात फार मोठे योगदान दिले आहे. त्यांच्यावरून हे स्पष्ट होते की, ज्याप्रमाणे कराड तालुक्याने ज्याप्रमाणे आपला कौल इंदिरा कॉंग्रेसला दिलेला होता. त्याचप्रमाणे कोरेगाव तालुक्यानेही आपला कौल इंदिरा कॉंग्रेसकडे दिलेला होता.

श्री. यशवंतराव मोहिते हे कऱ्हाडच्या विकासाचे शिल्पकार मानले जातात. त्यांनी इ. स. १९४७ ते २००० च्या दरम्यान सातारा जिल्हयातील ज्ञान, विज्ञान, कृषी, शिक्षण आणि समाजकारण, अर्थ व सहकार क्षेत्रात फार मोठे काम केले होते. त्याचप्रमाणे कोरेगाव तालुक्याचे आमदार मा.शंकरराव जगताप यांनी ज्ञान, विज्ञान, कृषी, शिक्षण आणि समाजकारण, अर्थ व सहकार क्षेत्रात फार मोठे काम केले होते. त्यामुळेच आपल्या कार्यातून या कोरेगांव मतदारसंघावरची आपली पकड २५ वर्षे मजबुत ठेवलेली दिसते.

कोरेगाव तालुक्यातील समाजजीवनामध्ये अनेक जाती धर्माच्या लोकांचा समावेश होता व आहे. यात सर्व जाती धार्मिचे लोक एकत्र रहात होते. तिच परिस्थिती सातारा जिल्हयातील इतर सर्व तालुक्यात असलेली दिसून येते. कराड व वाई तालुक्यातील सामाजिक लोकजीवन हे प्राचीन काळापासून चालत आलेल्या परंपरा, धार्मिक समजूती यावरच आधारलेले आहे. त्याचप्रमाणे कोरेगाव तालुक्यातील लोकजीवनही यावरच आधारलेले दिसून येते. कोरेगाव तालुक्यातील समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी अनेक उपक्रम राबविले होते. त्यासाठी तालुक्यातील अनेक संस्थाही कार्य करीत होत्या. कराड व वाई तालुक्यातील समाजातही परिवर्तन घडवून आणण्यासाठी तेथील सामाजिक संस्थेच्या कार्यकर्त्यानी फार मोठया प्रमाणावर प्रयत्न केलेले दिसून येतात. कोरेगाव तालुक्यातील शिक्षणक्षेत्रात सतत प्रगती होत होती. पूर्वप्राथमिक व पाथमिक शाळा, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालयीन शाळा असून विद्यार्थ्यांना ज्ञानदान चांगल्या प्रकारे होण्यास मदत होते. शाळा व विद्यार्थी यांचे प्रमाण काळाप्रमाणे वाढत गेल्याचे दिसते. शाळामधून विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न

सुरू होते. शिक्षणाप्रमाणे ठिकठिकाणी ग्रंथालयेही सुरू करण्यात आली होती. यामुळे वाचकवर्ग वाढला होता. या ग्रंथालयात दुर्मिळ पुस्तके वाचकास मिळत असल्याने त्यांच्या बौद्धिक दर्जा वाढण्यास मदत होत होती. त्यामुळे लोकांच्यात जागृती निर्माण झाली असे दिसते. कोरेगाव तालुक्यातील लोकजीवन हे सुसंस्कृत व उच्च प्रतीचे होते. समाज हा परंपरा व रूढीप्रिय होता. कराड व वाई तालुक्यातही शैक्षणिक सुधारणा मोठया प्रमाणावर झालेल्या दिसून येतात. परंतु या दोन तालुक्याच्या तुलनेत वाई तालुक्यात प्राज्ञपाठशाळेने संस्कृत व शास्त्र शिक्षणाबरोबरच आधुनिक शिक्षण दिल्याने फार मोठी प्रगती झालेली दिसून येते. तसेच वाई येथे स्वातंत्र्योत्तर काळात अनेक शैक्षणिक संस्थांनी आपापल्यापरीने प्रगती केलेली दिसून येते. त्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात वाई शहर कोरेगाव तालुक्यापेक्षा प्रगतीपथावर होते हे स्पष्ट होते.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी चालत आलेली बंधने जातीसंस्थेवर टिकून होती. त्यामुळे धर्म, जाती, रूढी व परंपरा यांच्या मर्यादा कोणीही ओलांडत नव्हते. प्रत्येक व्यक्तीचा दर्जा हा ती व्यक्ती ज्या जातीत जन्माला आलेली आहे त्यावरून ठरत असे. त्यामुळे कोरेगाव तालुक्यात फारसे सामाजिक परिवर्तन झालेले दिसून येत नाही.

कोरेगाव तालुक्यात हिंदू, मुस्लिम, खिस्ती, बौद्ध व जैन धर्माचे लोक राहत आहेत. हिंदू समाजरचनेमध्ये बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार यांचा समावेश होता. कोरेगाव तालुक्यातील लोकसंख्येत मराठा समाज मोठया प्रमाणावर आहे. इतर जातीतील लोकही येथे एकत्र राहतात. येथील लोकांना जातीबाहय व्यवसाय करण्यास बंदी होती. त्यामुळे व्यवसायावर आधारीत जातीव्यवस्था निर्माण झालेली होती. या जातीतील लोकांचे पोशाख, विवाह पद्धती, चालीरिती, रूढी व परंपरा यात भिन्नता होती. हिंदू समाजात ब्राह्मणांना उच्च मान दिला जात होता. त्यानंतर मराठयाना समाजात मान होता.

याशिवाय मुस्लीम धर्माचे लोकही कोरेगाव तालुक्यात आदिलशाहीच्या काळात स्थायिक झाले होते. त्यांच्या मशिदी व दर्गे काही गावात व किल्ल्यावर आढळून येतात. याशिवाय जैन व बौद्ध धर्माचेही लोक कोरेगाव तालुक्यात राहत होते. हे लोक आपल्या धर्माप्रमाणे वर्तणूक करीत असत. तसेच त्यांच्या आर्थिक परिस्थितीनुसार त्यांचे राहणीमान असे.

कोरेगाव तालुक्यातील स्त्रियांची सामाजिक स्थिती ही स्वातंत्र्यपूर्व काळात फार दयनीय होती. तिला फक्त 'चूल आणि मूल' एवढाच अधिकार होता. मात्र स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने केलेल्या विविध कायद्याने त्यांना शिक्षणाचा हक्क मिळून त्यांना शासकीय नोकऱ्याही करण्याचा अधिकार मिळाला आहे.

कोरेगाव तालुक्यातील लोकजीवन हे महाराष्ट्रातील इतर शहराप्रमाणेच सुसंस्कृत व उच्च प्रतीचे होते. तेथील समाज हा परंपरा व रूढीप्रिय असलेला दिसतो. तसेच लोकांवर धर्माचा मोठा पगडा होता. दैनंदिन आचारविचारावर धर्मचे खूप प्राबल्य होते. समाजात प्रत्येक जातीधर्माप्रमाणे देव मानले जात होते. त्याप्रमाणे ते पूजाअर्चा करत होते. हिंदू धर्मात जसे प्रत्येक महिन्यात सण व उत्सव साजर केले जातात तसेच सण व उत्सव इतर धर्मियामध्ये साजरे केले जातात. कोरेगाव तालुक्यातील लोक करमणुकीसाठी अनेक खेळात रमत होते. तसेच भजन, कीर्तन , गोंधळ उत्सव व प्रवचन इत्यादी धार्मिक कार्यक्रम करत असत.

२० व्या शतकाच्या प्रारंभी इंग्रजी शिक्षणाचा प्रसार वाढला. त्यामुळे तेथील कर्मठपणा कमी झाला. इ.स.१९२० साली सुरू झालेल्या ब्राहणेत्तर चळवळीचा परिणाम समाजावर झाला होता. समता, समान हक्क इ. प्रश्न लोकापुढे आले होते. नगरपालिका व लोकलबोर्ड यात लोक प्रतिनिधी बसू लागले होते. त्यामुळे सनातनी वृत्ती व कर्मठपणाला आपोआपच मर्यादा आल्या होत्या. कोरेगाव तालुक्यामध्ये हे सामाजिक बदल घडून येण्यासाठी भजन, कीर्तन, सत्यशोधक जलसे व भारूडे आणि इतर काही उपक्रम राबविले होते.

कोरेगाव तालुक्यातील शैक्षणिक परिस्थिती चांगली होती. तेथे पूर्व प्राथमिक शाळा, प्राथमिक शाळा, उर्दू शाळा, शारीरिक शिक्षण, संगितशिक्षण, माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण, धंदेशिक्षण, उच्च व सक्तीचे मोफत शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू झालेल्या होत्या. त्यामुळे साक्षरतेच्या प्रमाणात वाढ झालेली होती. प्रारंभी फक्त उच्च वर्गीयांना शिक्षणाचा अधिकार होता पुढे सर्वसामान्य लोकांनासुद्धा शिक्षण घेण्यास परवानगी मिळाली होती. परिणामी शिक्षणसंस्थाची निर्मिती होवून शाळांची संख्या वाढली होती. ग्रामीण भागातून उच्च शिक्षण घेण्यासाठी वाईत अनेक विद्यार्थी येवू लागले होते. त्यामुळे महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या मोठया प्रमाणावर वाढली होती. यावरून लोकांना शिक्षणाचे महत्त्व समजले होते असे दिसते. या

शिक्षणाचे माध्यम मराठी, इंग्रजी व उर्दू होते. यात मराठी भाषेचा वापर मोठया प्रमाणावर शाळेत केलेला दिसतो.

समाजात जागृती व्हावी व विद्यार्थ्याचे प्रबोधन व्हावे यादृष्टीने कोरेगाव तालुक्यात अनेक खेडेगावात ग्रंथालयाची निर्मिती केली होती. या ग्रंथालयात वर्तमानपत्रे, मासिके, नियतकालिके, चरित्रग्रंथ, आत्मचरित्रे, विविध विषयांची पुस्तके ही मराठी, संस्कृत, हिंदी व इंग्रजी भाषेतील आहेत. त्याचा उपयोग वाईतील लोकांना व विद्यार्थ्याना मोठया प्रमाणावर होतो, असे दिसून येते.

कोरेगाव तालुक्यात अनेक लहानमोठी मंदिरे आहेत. यातील काही मंदिरांची पडझड झालेली आहे तर काही मंदिरे अजूनही सुस्थितीत आहेत. यातील बहुसंख्य मंदिरे डोंगरावर किल्लेवजा बांधलेली आहेत. शंभू महादेव डोंगर श्रेणीचा दक्षिणेकडच्या कृष्णा खोऱ्यातील पूर्वेकडील भागात व कोरेगाव तालुक्याच्या उत्तर सीमेवर श्री चवणेश्वर देवस्थान, मध्ययुगीन काळात निर्मिलेले यमाई देवीचे मंदिर शत्रूच्या आक्रमणापासून सुरक्षित करण्यासाठी हे मंदिर टेकडीवर बांधले गेले असून या मंदिराला चोहोबाजूंनी तटबंदी असल्याने मंदिराला गडाचे स्वरूप प्राप्त झालेले आहे.

कोरेगाव तालुक्याप्रमाणेच कराड व वाई तालुक्यातही अनेक देवदेवतांची प्राचीन व मध्ययुगीन काळातील मंदिरे पाहावयास मिळतात. ही मंदिरे आधुनिक काळातही चांगल्यापद्धतीने जोपासलेली पाहावयास मिळतात. त्यांचा वेळोवेळी जिणोद्धार केलेला आढळतो. कोरेगाव तालुक्यतील अनेक प्राचीन व मध्ययुगीन मंदिरांचा जिर्णोद्धार झालेला पाहावयास मिळतो.

कोरेगाव तालुक्यातील मंदिरांना आपला स्वतंत्र असा इतिहास आहे. त्याच प्रकारचा इतिहास आपणास कराड व वाई तालुक्यातील मंदिराचा पाहावयास मिळतो. या मंदिरांनी मध्ययुगीन काळात जेव्हा हिंदू धर्माला अवकळा आली होती. यवनांचे राज्य सर्व देशभर पसरले होते. त्यावेळी हिंदू धर्म व हिंदू धर्मियांना तसेच महाराष्ट्र राज्याला संजीवनी संजीवनी देण्यासाठी सज्जनगड, जरंडेश्वर, चवणेश्वर व यमाई अशा अनेक ठिकाणी देवदेवतांच्या मंदिराची स्थापना झालेली आहे. या मंदिरानी सातारा जिल्हा व कोरेगाव विभागातील सांस्कृतिक इतिहासात भर घातली आहे. तसेच समाजातील लोकांमधील न्युनगंडाची भावना

दूर करून समाजास नवसंजिवनी देण्याचे कार्य केले आहे.आजही या मंदिरांमध्ये नैमित्तिक पूजाविधी व यात्रा उत्सव, नामजप नित्यनियमाने केले जात असून सांस्कृतिक परंपरा जपण्याचे कार्य चालू आहे. यातील काही मंदिराविषयीची माहिती सातारा गॅझेटियर मध्येही दिलेली नाही. या दुर्लक्षित देवस्थानाचा इतिहास समाजापुढे आणण्याचा प्रयत्न या प्रकरणात केलेला आहे.

याचबरोबर सातारा जिल्हयातील कराड व वाई तालुक्यातील लोक जे सण व उत्सव साजरे केले जात होते. त्याच प्रकारचे सण व उत्सव कोरेगाव तालुक्यात साजरे केले जात होते. कोरेगाव विभागातील सण उत्सव, खेळ व करमणूक, शैक्षणिक संस्थांनी केलेले कार्य कोरेगाव तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे ठरले आहे. त्याचप्रमाणे वाई व कराड तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी तेथील शैक्षणिक संस्थांनी फार मोठी कामगिरी केलेली पाहावयास मिळते. तसेच सण, उत्सव, यात्रा साजरी करणे, गोंधळ, सुवासिनी घालणे या गोष्टी नित्यनियमाने केल्या जातात. या मंदिराच्या वास्तव्यातून लोकांच्या मनामध्ये भक्तीभाव, प्रेमभाव व शांततेचे भाव निर्माण होऊन गावात सामाजिक सलोख्याचे वातावरण राहते. याचबरोबर भजन, कीर्तन, भावगीत, वासुदेव, गोंधळ, वाघ्यामुरळी यातून समाजाचे करमणूक, प्रबोधन तसेच संस्कृतिचे जतन आजही केले जात आहे. यातून समाजात नैतिक मूल्यांची जपणूक होत आहे. तसेच धार्मिक स्थळांमुळे समाजात एकोपा निर्माण झालेला दिसून येतो. हिंदूमुस्लिम हे एकमेकांच्या धार्मिक रीतीरिवाजात सहभागी होतात. प्रवचनकारांनी समाजातील अनिष्ट रूढीपरंपरांविरूध्द आवाज उठविला व इंग्रजांच्या भारत प्रवेशानंतर मात्र आधुनिक शिक्षणास सुरूवात झाली. त्यातून ग्रामीण भागात खेडोपाडयांपर्यंत प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन शिक्षण पोहोचले. त्यातून ग्रामीण भागातील समाजाचा सर्वांगीण विकास घडून आलेला दिसून येतो. यावरून हे स्पष्ट होते की, सातारा जिल्हयातील सर्व तालुक्यात चालीरिती, रूढी, परंपरा, शिक्षणाची परंपरा सर्वत्र सारखीच दिसून येते.

कोरेगाव तालुक्याचा आर्थिक इतिहास पाहत असताना असे दिसून येते की, स्वातंत्र्योत्तर काळात कोरेगाव तालुक्यातील व्यापार व संपत्तीत बरीच वाढ झाली होती. तरीही भूधारकांचा कर्जबाजारीपणा वाढलेला होता. कोरेगाव तालुक्याचा आर्थिकतेचा कणा म्हणून शेतीकडे पाहिले जात होते. शेतीतून नगदी पिके व खरीप हंगामातील पीकांचे मोठया प्रमाणावर उत्पादन घेतले जात होते. या पीकांचे उत्पादन मोठया प्रमाणावर मिळावे यासाठी

शासनाकडूनही मदत घेतली जात होती. शेतीस पूरक व्यवसाय म्हणून पशुपालन व्यवसायही केला जातो. दुग्ध व दुग्धपदार्थ उत्पादनही मोठया प्रमाणावर घेतले जाते. त्याचबरोबर शेतीतून निघणारे उत्पादन हे आठवडयाचा बाजार, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विक्रीसाठी पाठविले जाते. त्यामुळे आर्थिकदृष्टया कोरेगाव तालुक्याचा विकास होण्यास मदत झाली आहे.

कोरेगाव तालुक्यात स्थापन झालेला श्री. जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्याने कोरेगावच्या आर्थिक विकासास हातभार लावलेला आहे. या कारखान्याने केवळ साखर तयार करणे हाच उद्देश डोळयासमोर न ठेवता शेतीस पाणीपुरवठा व इतर उद्योगासही हातभात लावला आहे. या कारखान्यामुळे ऊस बागायती क्षेत्रास व कोरेगाव तालुक्यातील बेकारीचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली आहे. या कारखान्यात साखरेचे उत्पादनही मोठया प्रमाणावर होत आहे.

कोरेगाव तालुक्यात धनजीशहा कुपर यांनी लोकांच्या शेती उत्पादनात वाढ व्हावी यासाठी इ. स. १९२२ मध्ये सातारारोड येथे कूपर इंजिनियरिंग हा शेतीची अवजारे व नांगर तयार करण्याचा कारखाना सुरू केला. या कारखान्यामुळे कोरेगाव तालुक्यातील तरूणांची बेकारी दूर होण्यास मदत झाली आहे. त्यामुळे हा कारखाना कोरेगाव तालुक्यासाठी आर्थिकदृष्टया वरदान ठरलेला आहे.

याशिवाय कोरेगाव तालुक्यात परंपरेने सुरू असणारे ग्रामीण भागातील बलुतेदार व अलुतेदार यांचे व्यवसाय स्वातंत्र्योत्तर काळातही टिकून आहे. त्यामध्ये कापड उद्योग, धातू उद्योग, खाद्य उत्पादने, कातडी कमावणे, चर्मोद्योग, कुंभार उद्योग, लोहार, सुतार, लोकर विणकाम व हातमाग उद्योग मोठया प्रमाणावर विस्तारले होते व व्यापारामध्ये अंतर्गत व परराष्ट्रीय व्यापारही मोठया प्रमाणावर कोरेगाव तालुक्यात चालत होता. व्यापारी व दैनंदिन गरजेच्या वस्तू या आठवडयाच्या बाजारातून व्यापारी विकण्यासाठी आणत होते. तर पेठेच्या ठिकाणी मोठमोठी दुकाने मांडून हा वस्तू विकल्या जात होत्या. त्यामुळे कोरेगाव तालुका आर्थिकदृष्टया महत्वाचा मानाला जात होता.

कोरेगाव तालुक्याचा आर्थिक इतिहास हा इतर तालुक्यापेक्षा थोडयाफार वेगळया पद्धतीचा असल्याचा दिसून येतो. कोरेगाव तालुक्यात शेती हा जसा प्रमुख व्यवसाय होता. त्याचप्रमाणे इतर तालुक्याचाही प्रमुख व्यवसाय शेती हाच आहे. परंतु कराड व वाई

तालुक्यातील बहुतांशी क्षेत्र हे बागायती आहे. तेथे बारमाही पाणीपुरवठयाची सोय होते. परंतु कोरेगाव तालुक्यात उत्तरेकडील भाग हा दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो. जेथे उन्हाळयाच्या दिवसामध्ये पाणी पिण्यासाठी मिळत नाही तेथे शेती कशी पिकणार त्यामुळे शेती करणे अवघड झाले आहे. त्याचा परिणाम कोरेगाव तालुक्याच्या आर्थिक परिस्थितीवर झालेला दिसून येतो. उद्योगधंद्याच्या बाबतीत कोरेगाव येथे आधुनिक काळात स्थापन झालेला जरंडेश्वर सहकारी कारखाना व सातारारोड येथे असलेली कुपर कंपनी हे दोन मोठे उद्योग सोडले तर दुसरा मोठा कोणताही उद्योगधंदा नाही. त्यामुळे कोरेगाव तालुक्यातील खेडयातील बरेचसे बेरोजगार तरूण वर्ग शहराकडे नोकरीनिमित्त जात आहेत. वाई व कराड येथे मात्र अनेक मोठे उद्योगधंदे आहेत. कारखाने आहेत त्यामुळे तेथील तरूणांना तेथेच मोठया प्रमाणावर उद्योग मिळत आहे. तसेच व्यापाराबाबत विचार करावयाचा झाला तर कोरेगाव तालुक्यात कोरेगाव, रहिमतपूर, सातारारोड व वाठार स्टेशन हीच तेवढी पेठेची आहेत. त्यामुळे व्यापारासाठी फारच कमी प्रमाणात पेठेची गावे आहेत. याउलट परिस्थिती ही कराड व वाई तालुक्यात पाहावयास मिळते. तेथे पेठेची गावे फार मोठया प्रमाणावर आहेत. त्यामुळे तेथील व्यापारी उलाढाल फार मोठया प्रमाणावर चालते. त्याचा फायदा तेथील आर्थिक परिस्थिती वाढण्यास होतो. तसे पाहिले सातारा जिल्हयातील आर्थिक परिस्थितीचा विचार केला असता कोरेगावचा विकास फारच कमी प्रमाणात झालेला आहे, हे स्पष्ट होते.

कोरेगाव तालुक्यात स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्रातील सांगली, कराड, कोल्हापूर, पुणे, सोलापूर अहमदनगर, नाशिक, पैठण, औरंगाबाद व मुंबई या जिल्हयाप्रमाणे जसे सातारा जिल्हयाने भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला होता. तसाच सातारा जिल्हयातील कोरेगाव तालुक्यानेही सहभाग घेतला होता. एवढेच नव्हे तर कोरेगाव तालुक्यातील कार्यकर्त्यांनी सातारा जिल्हयासहित इतर ठिकाणीही स्वातंत्र्य चळवळ यशस्वी करण्यासाठी महत्त्वपूर्ण कामगिरी केली होती. भारतात स्वातंत्र्य चळवळ सुरू झाल्यानंतर जे विविध उपक्रम झाले ते यशस्वी करण्यासाठी आटोकाट प्रयत्न केला होता त्यामध्ये राष्ट्रीय शिक्षण, असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळीत जंगल सत्याग्रह, मीठाचा सत्याग्रह, कोंडवाडा सत्याग्रह, अस्पृश्यता निवारण, वैयक्तिक सत्याग्रह व चले जाव आंदोलन यामध्ये फार मोठया उत्साहाने सहभाग घेऊन स्वातंत्र्य मिळविण्यासाठी यश मिळविले होत.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राजकीय परिस्थितीत बदल घडून येऊन लोकसभा, विधानसभा, नगरपरिषद, जिल्हा परिषद व पंचायत समिती या निवडणूकांमध्ये सहभागी होऊन लोकशाही पद्धत अमलात आणून निवडणूकीत सहभाग घेतला होता. त्यातून आपला प्रतिनिधी निवडून देऊन त्याच्यामार्फत कोरेगाव तालुक्यात राजकीय सुधारणा घडवून आणल्या होत्या.

सातारा जिल्हयातील इतर तालुक्याच्या तुलनेत कोरेगाव तालुक्यात सामाजिक व धार्मिक सुधारणा झालेल्या दिसतात. देवदेवता, सणवार, व्रतवैकल्य, भूतपिशाच्च इत्यादींचे स्तोम जास्त होते. महाराष्ट्रातील अहमदनगर, पुणे, नाशिक, पैठण, कोल्हापूर, सांगली व सोलापूर या जिल्हयानी व तेथील तालुक्यानी आपल्यामध्ये मोठया प्रमाणात समाजजागृती घडवून आणली होती. त्याचप्रमाणे सातारा जिल्हयासहित कोरेगाव तालुक्यात मोठया प्रमाणावर समाजसुधारणा चळवळ सुरू झाली होती. या चळवळीत सत्यशोधक समाजाचे कार्य मोठया प्रमाणावर दिसून आले. या समाजातील कार्यकर्ते गुरूवर्य केशवराव विचारे, ज्योत्याजीराव बयाजीराव फाळके, कर्मवीर भाऊराव पाटील, वसंतराव फाळके, वगैरेचा समावेश होता. त्यांचे हे समाजसुधारणेचे काम केवळ कोरेगाव तालुक्यापुरतेच मर्यादित नव्हते तर संपूर्ण तालुक्यातही केलेले दिसते.

महाराष्ट्रात कला व संस्कृतीचा मोठा खजिना जागोजागी असलेला दिसतो. भारतासह महाराष्ट्रावर वर्षानुवर्षे परकियांची आक्रमणे झाली होती. त्या आक्रमकांनी आपला देश व महाराष्ट्र लुटला होता. येथील कला व संस्कृतीचा विंध्वस केला, येथील वास्तू व प्रार्थनास्थळे उध्वस्त केली तरीही त्यातून जे शिल्लक राहीले, ते ही महत्त्वपूर्ण आहे. उलट त्यामध्ये जित व जेत्यांचा कला व संस्कृतीचा संगम होऊन नवीन कलाविष्कार निर्माण झालेला दिसतो. त्याचे प्रत्यतंर देणारी अनेक सुप्रसिद्ध ठिकाणे या देशात आहेत.

आपल्या महाराष्ट्रात पुणे, नाशिक व पैठण अशी अनेक प्राचीन व मध्ययुगीन गावे कला व संस्कृतीने परिपूर्ण आहेत. ही ठिकाणे निसर्गरम्य, सांस्कृतिकदृष्टया कलासंपन्न होती. त्याचप्रमाणे कोरेगाव तालुक्यातही ज्ञान, कला व संस्कृती यांचा संगम झालेला आहे. मध्ययुगीन काळापासून अनेक प्रतिभावंताना या तालुक्यातील काही ठिकाणांचे आकर्षण वाटत आले आहे. कोरेगाव तालुक्यातून महादेव डोंगराची रांग गेलेल असून काही नद्याही आहेत. या नद्यांचा व

डोंगररांगेचा कडेला व काही ऐतिहासिक गावात कलात्मक मंदिरे, ऐतिहासिक वास्तू, त्यातील भित्तीचित्रे, लाकडावरील कोरीव काम या सर्वांनी या तालुक्यातील काही गावे सुशोभित केलेली आहेत. कोरेगाव तालुक्यातील लोकांनी धर्म, ज्ञान, कला, संस्कृतीचा वारसा टिकवून ठेवलेला दिसतो.

राजकीय बाबतीतही पाठीमागे नव्हता. तेथे फार मोठया प्रमाणावर जागृती झाली. होती. स्वातंफ्रयपूर्वकाळात तेथील अनेक कार्यकर्त्यांनी स्वातंफ्रय चळवळीत फार मोठया प्रमाणावर सहभाग घेतला होता. त्यामध्ये असहकार आंदोलन, सविनय कायदेभंग चळवळ, वैयक्तिक सत्याग्रह, सन १९४२ चे चले जाव आंदोलन यामध्ये येथील कार्यकर्त्यांनी सहभाग घेतलेला होता. स्वातंत्र्योत्तर काळातही कोरेगाव तालुक्याने महाराष्ट्रातील राजकारणावर आपला ठसा उमटविला होता. इतर तालुक्यात ज्या घडामोडी घडत होत्या. त्याच प्रकारच्या घडामोडी कोरेगाव तालुक्यात घडत असलेल्या दिसून येतात. स्वातंफ्रयोत्तर काळात येथील राजकारणात इंडियन नॅशनल काँग्रेसचा प्रभाव पडलेला पहावयास मिळतो. कोरेगाव तालुक्याच्या सामाजिक इतिहासाची सातारा जिल्हयातील इतर तालुक्यांशी तुलना केली असता, असे दिसून येते की, सामाजिक परिस्थितीत फारसा बदल दिसून येत नाही. सर्वच तालुक्यात सर्व जातीधर्माचे लोक एकत्र राहत होते. गावगाडयाची रचना ही एकसारखी होती. त्यामुळे सामाजिक परिस्थिती ही वेगळी नव्हती हे स्पष्ट होते. सातारा जिल्हयाचा आर्थिक इतिहास पाहिला असता असे दिसते की, सातारा जिल्हयातील इतर तालुक्यात ज्याप्रमाणे शेती, उद्योगधंदे व व्यापार यावर तेथील आर्थिक परिस्थिती अवलंबून होती. त्याचप्रमाणे कोरेगाव तालुक्यातील आर्थिक परिस्थितीही त्यावरच अवलंबून होती. परंतु तेथे बागायती शेतीचे प्रमाण कमी आहे. तर दुष्काळाचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे शेतीतून मिळणारे उत्पादन हे अल्प आहे. उद्योगधंद्याबाबतीतही कोरेगाव तालुक्यात मोठे उद्योग दोनच आहेत. त्यामुळे त्यामार्फत मिळणारे उत्पादनही अल्प आहे. मात्र शिक्षण व सांस्कृतिकदृष्टया कोरेगाव तालुक्याची तुलना सातारा जिल्हयातील इतर तालुक्याशी तुलना केली असता हे स्पष्ट होते की, सर्वत्र समान परिस्थिती होती. हेच कोरेगाव तालुक्याचे वैशिष्टये होय.

# संदर्भ ग्रंथसूची

## अ) प्राथमिक साधने :

### इंग्रजी

1. Bombay Archive Dept., Home Department (Spl.), File No. 18/10/1942, Oct. 1942
2. File No. 800 (74) (14)-3, Bombay Archive Dept., Home Department (Spl.), 1941-43
3. File No. 18/9/1942, Bombay Home Department Sends a Confidential Report to Central Home Department, Bombay Congress Bulletin No. 27 & 18/1/1943
4. Canningham, Stoops of Bharhut, Article No. 135
5. Cashman Richard, The Myth of the Lokmanya Tilak and Mass Politics in Maharashtra
6. Censes of India 1991, Series 14, Maharashtra, Part-2, 1, Primary Censes Abstract, General Population
7. Censes of India 1991, Series 14, Maharashtra, Part-12, Satara District Censes, General Population
8. Censes of India 1991, Series 14, Maharashtra, Part-4, 2, Religion, (Table C-9)
9. Censes Of India, 1961,Vol.10, Part 7-C, Maharashtra
10. Chaudhari K. K., Maharashtra and Indian freedom struggle, 1989
11. Election commission of India - general Elections, 1951, 1957, 1962, 1967, 1978, 1972, 1978, 1980, 1985, 1990, 1995, 1996, 1999 (loksabha) statistical report - volume I (national and state abstracts & detailed results)
12. Husen M. Tughlak Dynasty, Calcutta, 1963
13. James Fergusson and James Burgess, The Cave Temples of India, W. H. Allen and Co. Waterloo Place, London, 1980
14. Kulkarni G. T., The Mughal- Maratha Relations, Twenty Five Faithful Cheers (1682-1707), Pune, 1983
15. Malik S. C., Stone Age Industries of the Bombay And Satara District, Baroda, 1959
16. Mirashi V. V., The Rashtrakutas of Manpore, In Studies in Indology, Nagpur, 1968

17. Naik J. V., New Indian Antiquery, Vol. – 9, 1947
18. Naravane M. S., Forts of Maharashtra, New Delhi, 1995
19. Report On The Administration Of the Bombay Presidency, 1911-12 & 1923-24
20. Sardesai G. S., History of The Maratha' s, Vol. 1, Mumbai, 1971
21. Source Material for History of Freedom Movement, Vol. 2
22. Statistical Atlas, Of Bombay State, 1950
23. Gazetteer of the Bombay Presidency, Satara, Government Central Press, Bombay, 1963 & 1985

## प्राथमिक साधने :

## मराठी

१. कोरेगाव तालुका कृषी विभागीय कार्यालय अहवाल, कोरेगाव
२. कण्हेरखेड येथील जानाईदेवी मंदिरात कोरलेला शिलालेख
३. जरंडेश्वर सहकारी साखर कारखाना वार्षिक अहवाल , १९९८–९९ ते २०००–२००१
४. घटना – श्री मारूती जरंडेश्वर देवस्थान, पाडळी स्टेशन
५. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, मार्च २००९, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई
६. जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्याचा वार्षिक अहवाल १९९० ते २००८
७. पंचायत समिती निवडणुक अहवाल १९६२, १९६७, १९७२, १९७९, १९९२, १९९७
८. पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती, कोरेगाव
९. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २००९–१०, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई
१०. महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीचा (वि. म. दांडेकर समिती) अहवाल
११. मुंबई विधानसभा निवडणूक अहवाल १९३७, १९४६
१२. सरदेसाई गो.स. 'मराठी रियासत' खंड–१, मुंबई, १९८८

१३. सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खंड–३, मुंबई, १९८८

१४. सरदेसाई गो. स., पेशवा दप्तर – खंड ३०

१५. शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य, पुणे, माध्यमिक शाळांची यादी, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई प्रकाशन, १९७९

१६. सप्तर्षी–आमची शाहुनगरी नगरपालिका अहवाल १९५३–५४

१७. सातारा जिल्हा परिषद गौरव गाथा, १९१७

१८. कल्याणगडावरील खंडोबा मंदिर परिसरातील शिलालेख

१९. चवणेश्वर येथील श्री महादेव मंदिरात दि. २८ एप्रिल, २००८ रोजी लावलेली कोनशिला

२०. पर्यटन स्थळांचे विकास कार्य २००५०६, मौजे चवणेश्वर येथे भाविकांसाठी व पर्यटन स्थळांचे बहुउद्देशीय हॉल बांधणेकामी, प्र. मा. भा. जिल्हाधिकारीसाो. आदेश २००५–०६

२१. भारतीय सत्यशोधक समाज घटना, प्रकाशक के. व्ही. विचारे, महाध्यक्ष, महाराष्ट्र प्रिंटींग प्रेस, २०१ खेतवाडी मेन रोड, मुंबई ४

२२. महाराष्ट्र राज्य कृषी उत्पन्न पणन, विकास व नियमन नियम १९६३ चा कायदा

२३. शिवकालीन पत्रसारसंग्रह, पुणे, १९३०, पत्र क्र. ८८५

२४. सत्यशोधक विद्यार्थी संघ कार्यक्रम पत्रिका

२५. सत्यशोधक विद्यार्थी संघ–प्रतिज्ञा पत्र

२६. पाठक अरूणचंद्र (संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९९९

२७. पाठक अरूणचंद्र (संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, २०१२

२८. कोरेगाव तालुका कृषी विभागीय कार्यालय, कोरेगाव यांनी दिलेल्या माहितीनुसार

२९. कृषी विभाग, पंचायत समिती, कोरेगाव यांच्याकडील माहिती

३०. कृषी उत्पन्न बाजार समिती कोरेगाव यांचेकडून मिळालेल्या माहितीनुसार

३१. ग्रामपंचायतीकडून मिळालेल्या माहितीवरून

३२. ग्रामपंचायत कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीवरून

३३. महाव्यवस्थापक, सातारा जिल्हा उद्योग केंद्र यांच्याकडून मिळविलेल्या माहितीनुसार

३४. किन्हई येथील गडाची प्रत्यक्ष पाहणी व सर्वेक्षण १२.०७.२०१५, दु. ३.०० वा.

३५. चवणेश्वर मंदिरात प्रत्यक्ष पाहणी व सर्वेक्षण १४.०६.२०१५, दु. ३.०० वा.

३६. चवणेश्वर डोंगरावर प्रत्यक्ष पाहणी व सर्वेक्षण १४.०६.२०१५, दु .३.०० वा.

३७. चंदनगडाची प्रत्यक्ष पाहणी व सर्वेक्षण दि. १६.०६.२०१५ सायं. ५.३० वा.

३८. नांदगिरी येथील गडाची प्रत्यक्ष पाहणी व सर्वेक्षण, १२.०७.२०१५, दु. ३.०० वा.

३९. वंदनगडाची प्रत्यक्ष पाहणी व सर्वेक्षण, १४.०६.२०१५, दु. ३.०० वा.

४०. श्री क्षेत्र जरंडेश्वर मंदिर व डोंगर परिसराची प्रत्यक्ष पाहणी व सर्वेक्षण, २६.०८.२०१५, दु. ४.०० वा.

## ब) दुय्यम साधने :
## इंग्रजी


1. Chavan Y.B., Pradhan R. D. (Ed.) Selected Speeches in Parliament 3 Volumes
2. Dowson John, A classical dictionary of Hindu mythology and religion, geography, history, Delhi : Asian Educational services, 2004
3. http://www.dainikgomantak.com


## दुय्यम साधने :

## मराठी


१. आत्रे त्रिंबक नारायण, गांवगाडा, नाग नालंदा प्रकाशन, इस्लामपूर, १७ सप्टेंबर, २०११

२. आपटे द. वि., दिवेकर स. म. (संपा.), शिवचरित्र प्रदीप, शिवापूर दप्तर यादी, पुणे, १९२५

३. आपटे द. वि., दिवेकर स. म. (संपा.), शिवचरित्र प्रदीप, जेधे करीना, पुणे, १९२५

४. इंगळे, व. न. पत्री सरकार : चरित्र, व्यक्तिमत्व आणि चळवळ

५. इंगळे व. न., सत्यशोधक क्रांतिसिंह नाना पाटील, साकेत प्रकाशन, २००९

६. उपाध्ये महादेव चिंतामण व बहुलेकर बाळसाहेब, आपला सातारा, मावळा प्रकाशन, मार्च, १९९४
७. कणगली एस. एम., पुण्याचा माहितीगार, १९४९
८. कल्याणकर बा. ह. (संपा.), युगंधर नेते: यशवंतराव चव्हाण, औरंगाबाद, १९८८
९. कांयदे पाटील, गंगाधर वि., यशवंतराव चव्हाण, नाशिक, २०००
१०. काळदाते सुधा, भारतीय समाजरचना, १९७६
११. काळे बाबूराव, यशवंतराव चव्हाण, गो. य. राणे प्रकाशन पुणे, व्दितियावृत्ती, १९६५
१२. कीर धनंजय, महात्मा जोतीराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९६
१३. कुंटे भ. ग., गुलशने इब्राहिमी (अनुवाद), महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८९
१४. कुलकर्णी अ. रा., खरे ग. ह., मराठयांचा इतिहास खंड १, कॉंन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८५
१५. कुलकर्णी अ. रा. व देशपांडे प्र. न. 'मराठयांचा इतिहास, खंड–२, कॉंन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
१६. कुलकर्णी पी. के., भारतातील धर्म
१७. कुलकर्णी सुमित्रा (प्रपाठक), मराठा काळ याविषयीचा लेख, पुणे विद्यापीठ, पुणे
१८. केतकर श्री. व्य., महाराष्ट्रीय ज्ञानकोश, नागपूर, विभाग २१
१९. केळकर न.चि., गतगोष्टी, १९८३
२०. खंडागळे चंद्रकांत, भारतीय समाज, खंडागळे प्रकाशन, सांगली, जुलै १९९८
२१. गायधनी रं. ना. व राहुरकर व. ग., प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९५५
२२. गुजर जयवंत, जगावेगळा सत्यशोधक गुरूवर्य केशवराव विचारे, विचारे फार्मस् प्रा. लि. इदगाव, ठाणे, २००४
२३. गुजर जयवंत, सहस्त्रकातील वेगळा पारशी–सर धनजीशा कूपर, चंद्रकला प्रकाशन, पुणे, जून २००३

२४. गुंदेकर श्रीराम, सत्यशोधकी साहित्याचा इतिहास खंड–१, सत्यशोधकी साहित्य प्रकाशन, मे २०१०

२५. चव्हाण यशवंतराव, युगांतर, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे, १९९९

२६. चव्हाण यशवंतराव, सहयाद्रीचे वारे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, तिसरी आवृत्ती, मुंबई, १९९२

२७. चव्हाण रा. ना. (संपा. गुजर जयवंत), सत्यशोधक परिषद उगम व विकास सत्यशोधक समाज प्रबोधन पत्रिका, १९९०

२८. चिटणीस ब. म., शाहू महाराजांचे चरित्र, ठाणे १९५६

२९. चिटणिस बी. एन. (संपा.) किसन वीर स्मृती विशेषांक, यशवंत शिक्षण संस्था, सुरूर, १९८१

३०. चिले भगवान, गडकोट, भगवान, शिवस्पर्श प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती डिसेंबर, २००४, व्दितीयावृत्ती मार्च २००५

३१. जोशी महादेवशास्त्री (संपा.) भारतीय संस्कृतिकोश खंड ३, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे

३२. जोशी रामभाऊ, यशवंतरावांचे अंतरंग विरंगुळा, यशोदा प्रकाशन, पुणे, २००८

३३. जोशी सु. ह., महाराष्ट्र दर्शन, समाजदर्शन, पुणे १९८६

३४. थोरात संभाजीबाबा, यशवंतराव चव्हाण झुंझार नेतृत्वाचा शोध आणि बोध, आगाशिव प्रकाशन, कराड, १९८८

३५. दिवान चंद्रशेखर, राजकिय सिध्दांत आणि राजकिय विश्लेषण, विद्या प्रकाशन, नागपूर

३६. दीक्षित दुर्गा (संपा.), डायमंड महाराष्ट्र संस्कृतीकोष, डायमंड प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००९

३७. दुकळे प्रकाश, यशवंतराव चव्हाण : माणूस आणि लेखक, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २०१२

३८. देगलूरकर गो. बं., पुरातत्व विभाग, डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट अड रिसर्च इन्स्टिटयुट, पुणे यांचे प्राचीन काळाविषयी लेखन

३९. देव शां. भा., महाराष्ट्र एक पुरातत्वीय समालोचन, मुंबई, १९६८

४०. देशपांडे द. ग., महाराष्ट्रातील किल्ले, डायमंड पब्लिकेशन, पुणे–२९ ऑक्टोबर, २००९
४१. धर्माधिकारी भालचंद्र वि., क्रांतिवीर, विश्वकर्मा प्रकाशन, सातारा, प्र. आ. ११ ऑगस्ट, १९९०
४२. नरके हरी (संपा.) सत्यशोधक केशवराव विचारे समग्र वाङ्मय पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०००
४३. नलावडे उज्वला, सत्यशोधकाची संक्षिप्त गाथा, अजिंक्य सहकारी मुद्रणालय, सातारा
४४. नलावडे प्रमोद, मासिक लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचनालय, मुंबई, मार्च २०१२
४५. पवार जयसिंगराव भाऊसाहेब (संपा.), क्रांतिसिंह नाना पाटील, अरूंघटी प्रकाशन, कोल्हापूर १९८३
४६. पाटील बी.एच.,(संपा.),किसन वीर जीवन दर्शन, किसन वीर सत्कार समिती, सातारा, १९६७
४७. पाटील रा.तु. यशवंतराव चव्हाण : एक कर्तबगार पण वादग्रस्त मुसद्दी, जनवाणी प्रकाशन, पुणे, १९८७
४८. पाटील रा. तू., सांगली साताऱ्याचे राजकारण, परखड प्रकाशन, कराड, १९८६
४९. पाटील विलास, क्रांतिसिह नाना पाटील, क्रांतिवैभव प्रकाशन कराड, १९८४
५०. पाटील शालिनीताई, स्वयंसिद्धा, चंद्रकांत पाटील प्रतिष्ठान, सातारारोड, सप्टे.२००३
५१. फाळके राजाराम बापू, केशवराव विचारे गुरूजी जीवन दर्शन, रामराव विचारे, सातारारोड, २००२
५२. बहुलेकर बाळासाहेब, आपला सातारा, मावळा प्रकाशन, मार्च १९९४
५३. बागल माधवराव, केशवराव विचारे बहुजन समाजाचे शिल्पकार , श्री.लेखन वाचन भांडार, पुणे, १९६६
५४. भगत रा.तु.(संपा.), क्रांतिसिह नाना पाटील यांची निवडक भाषणे, क्रांतिवैभव प्रकाशन कराड,१९८२
५५. भागवत अनंत नारायण, सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास, पुणे १९७१
५६. भावे वि. ल., मराठी दप्तर, रूमाल नं. १, ठाणे १९१७

५७. भोसले आशा (संपा.), कमंडलूचा माथा वसनेची गाथा, चौंडेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळ, रहिमतपूर
५८. माटे श्री. म., संत, पंत व तंत, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, १४ नोव्हे.२००६
५९. मिराशी वा.वी., 'वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ', नागपूर, १९६८
६०. मेहंदळे विश्वास, यशवंतराव ते विलासराव, अनुबंध प्रकाशन, पुणे, २००७
६१. लाड अप्पासाहेब व पाटील उत्तमराव, क्रांतिवीर नाना पाटील, १९८९
६२. लांजेकर ज. रा. वाई परिसरातील प्रेक्षणीय स्थळे, मार्च २०००
६३. लांजेकर रूपा, सातारा जिल्हयातील प्रेक्षणीय स्थळे, २००३
६४. लेले सुमती यशवंत, कर्मयोगी, २१ मार्च २००४
६५. वाघ रामनाथ (संपा.), युगप्रवर्तक यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण व्यासपीठ, अहमदनगर, व्दितिय आवृत्ती
६६. शिवचरित्र साहित्य खंड–६, पुणे, १९३७
६७. शेणोलीकर ह. श्री., देशपांडे प्र. न., महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९७२
६८. शेलार अशोक, लोकदैवत, दोन दिवसीय आंतरविद्याशाखीय मराठी राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्र पुस्तिका, डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव, डिसें. २०१३
६९. सत्यशोधक नामावली (संपा. गुजर जयवंत), सत्यशोधक समाज प्रबोधन पत्रिका १९९०
७०. सारडा शंकर, यशवंतराव कर्तृत्व आणि नेतृत्व, दिलिपराज प्रकाशन, पुणे, २००३
७१. सावंत व जाधव, मराठयांचा प्रशासकीय, सामाजिक व आर्थिक इतिहास, १९९७
७२. साळुंखे आ. ह., हिंदू संस्कृती आणि स्त्री, लोक वाङ्मयगृह प्रकाशन, फेब्रु. २०११
७३. जगताप सुनिता (संपा.), आठवणींची पुष्पांजली – स्मृतीग्रंथ, प्रकाशक मुंबई, ३० सप्टेंबर २०१३
७४. सुर्यवंशी राजाराम, सत्यशोधक समाजवादी गुरूवर्य केशवराव विचारे, सत्यशोधक छत्रपती ज्ञानपीठ, देवपूर–धुळे
७५. सोवनी अविनाश, स्वराज्याचे छत्रपती आणि अष्टप्रधान, पुणे, १९९८

**एम. फिल, पीएच. डी. शोधप्रबंध**


१. ओवाळे डी. जे..(डॉ.), सातारा शहराचा इतिहास (१८०८ ते १९४७), पीएच. डी. अप्रकाशित शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१५

२. कोरडे डी. डी. (डॉ.), वाई शहराचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास (१९०० ते २०००), पीएच. डी. अप्रकाशित शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१२

३. पाटील ए. जे. (डॉ.), कऱ्हाडचा इतिहास (सन १९५० ते २०००), पीएच. डी. अप्रकाशित शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०११

४. बोडके एस. एस. (डॉ.), सातारा नगरपरिषदेचा इतिहास, पीएच. डी. अप्रकाशित शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१५

५. जाधव व्ही. एस. (डॉ.), सातारा राज्यातील जहागिरदारएक चिकीत्सक अभ्यास (१८१८ ते १८४८), पीएच. डी. अप्रकाशित शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१२

६. सावंत जे.सी. (डॉ.), स्वातंत्र्योत्तर सातारा, पीएच. डी. अप्रकाशित शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१६

७. देशमुख आर.के. किसन वीर : जीवन व कार्य, एम. फिल अप्रकाशित शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, १९९०

८. धायगुडे ए. आर., सातारा जिल्हयातील सत्यशोधक चळवळ, एम. फिल अप्रकाशित शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, २००६


**मुलाखती :**

| अ.क्र. | मुलाखत दिनांक | मुलाखत वेळ व स्थळ | मुलाखत देणाऱ्याचे नाव |
|---|---|---|---|
| १ | दि. १२.०७.२०१६ | वेळ : सायं. ६.३०,<br>स्थळ : कोरेगाव | श्री. बर्गे विठ्ठल माधवराव,<br>ग्रामपंचायत सदस्य, कोरेगाव |
| २ | दि. १२.०७.२०१६ | वेळ : सायं. ६.३०,<br>स्थळ : कोरेगाव | श्री. बर्गे बाबुराव दिनकरराव,<br>सेवानिवृत्त शिक्षण विस्तार<br>अधिकारी, कोरेगाव |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | दि. २८.०८.२०११, | वेळ : स. १०.०० वा.,<br>स्थळ : कोरेगाव | श्री. लक्ष्मणराव पाटील, कोरेगाव |
| ४ | दि. ०८.०२.२०१५ | वेळ : स. ९.०० वा.,<br>स्थळ : सातारारोड | संत श्री. शंकर फाळके महाराज, सातारारोड |
| ५ | दि. ०६.०५.२०१५, | वेळ : सायं. ५.०० वा.,<br>स्थळ : देऊर | गुरव पंढरीनाथ (सालकरी पुजारी, श्री मुधाईदेवी मंदिर) देऊर |
| ६ | दि. ०८.०२.२०१५, | वेळ : सायं. ६ वा.,<br>स्थळ : सातारारोड | श्री मारूती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष श्री. तानाजी पांडुरंग फाळके, सातारारोड |
| ७ | दि.१९.१२.२०१३, | वेळ : स. ११:०० वा.,<br>स्थळ : वाघोली | ॲड्. सुनिता जगताप, वाघोली |
| ८ | दि. ०२.११.२०१५, | वेळ : सायं. ४ वा.,<br>स्थळ : सातारारोड | ॲड्. वसंतराव फाळके, सातारारोड |
| ९ | दि. १०.१२.२०१५, | वेळ : सायं. ७.०० वा.,<br>स्थळ : रहिमतपूर | डफळे विजय, रहिमतपूर |
| १० | दि. ०६.०५.२०१५ | वेळ : स. १०:०० वा.,<br>स्थळ : जकातवाडी | श्री. जगताप रामराव, जकातवाडी, ता. जि. सातारा |
| ११ | दि. २५.३.२०१५, | वेळ : सायं. ८.०० वा.,<br>स्थळ : भाडळे | भारती चंद्रशेखर, भाडळे |
| १२ | दि. १२.०७.२०१५, | वेळ : दु. ४ वा.,<br>स्थळ : किन्हई | किन्हई मंदिराचे पुजारी डॉ. सिताराम कालीदास अयाचित |
| १३ | दि. ३०.०३.२०१५ | वेळ : सायं. ४.०० वा.,<br>स्थळ : पंढरपूर | गिरी बापू , पंढरपूर |
| १४ | दि. ०७.०५.२०१५, | वेळ : सायं. ५.०० वा.,<br>स्थळ : देऊर | रोकडे अनिल, देऊर |
| १५ | दि. ०६.०५.२०१५, | वेळ : सायं. ५.०० वा.,<br>स्थळ : देऊर | गुरव पंढरीनाथ (सालकरी पुजारी, श्री मुधाईदेवी मंदिर) देऊर |
| १६ | द. २७.०९.२०१५, | वेळ : दु. ३ वा.,<br>स्थळ : सातारारोड | गुरूवर्य केशवराव विचारे यांचे नातू श्री. सुबोध भरतराव विचारे, सातारारोड |
| १७ | दि. १४.०६.२०१५, | वेळ : दु. ४ वा.,<br>स्थळ : चवणेश्वर | चवणेश्वर मंदिराचे पुजारी श्री. राजेंद्र बाबूराव पवार |
| १८ | दि. १४.०६.२०१५, | वेळ : सायं. ५ वा.,<br>स्थळ : चवणेश्वर | श्रीमती निता पवार, चवणेश्वर ग्रामपंचायत सरपंच |
| १९ | दि. १६.०६.२०१५ | वेळ : सायं. ७.०० वा.,<br>स्थळ : चिमणगाव | पुजारी श्री काळेश्वर मंदिर, चिमणगाव |

| | | | |
|---|---|---|---|
| २० | दि. २५.०६.२०१७ | वेळ : रात्री ८. ०० वा., स्थळ : सातारारोड (पाडळी) | घाडगे किसन, सातारारोड (पाडळी) |


**वृत्तपत्रे व साप्ताहिके**

१. दै .ऐक्य, दि.२६/०८/२०१२

२. दै. सकाळ २६ ऑगस्ट २०१३ सातारा

३. दै. सकाळ, सातारा आवृत्ती, १७ जाने., २०१३

४. दै. पुढारी, कोल्हापूर, दि.१४ जून, १९६०

५. लोकराज्य, महाराष्ट्र शासन, सप्टेंबर १९८४

६. साप्ताहिक स्थैर्य, सातारा आवृत्ती, दि. १९ ते २५ नोव्हेंबर, २०००

**स्मरणिका**

१. कदम संभाजीराव (संपा.), श्री मुधाईदेवी शिक्षण संस्था, देऊर सुवर्णमहोत्सवी स्मरणिका, डिसें., २००५

२. देशमुख शिवाजीराव, स्मरणिका, स्मृतीग्रंथ, आठवणीची पुष्पांजली

३. माने अरूण (संपा.), श्री चौडेश्वरी एज्युकेशन सोसायटी, रहिमतपूर, रहिमतपूर वैभव, स्मरणिका

4. रहिमतपूर नगर परिषद आयोजित, रहिमतपूरची मुद्रा, स्मरणिका, रहिमत महोत्सव समिती प्रकाशन, २०१२

5. शेंडे पंडीतराव, स्मरणिका, स्मृतीग्रंथ आठवणीची पुष्पांजली, प्रकाशक–सौ. सुनिता शंकरराव जगताप, सातारा सप्टेंबर, २०१३

## (परिशिष्ट १)

## कोरेगाव येथील केदारेश्वर मंदिर परिसरातील १० व्या शतकातील शिलालेख



**कोरेगावच्या केदारेश्वर मंदिरात सापडलेला १० व्या शतकातील शिलालेख**

सातार्‍यापासून पूर्वेस १५ कि. मी. अंतरावर असलेल्या कोरेगावमध्ये १० व्या शतकातील हा शिलालेख असून त्यावरील मजकूर हा संस्कृत मिश्रीत मराठी भाषेत आहे. हा शिलालेख एकूण १३ ओळींचा असून तो देवनागरी लिपित आहे. त्यातील 'ज' या अक्षराचे वळण १० शतकातील अक्षरासारखे आहे. हा शिलालेख अक्षीअलिबाग येथील शिलालेखाच्या समकालीन दुसरा शिलालेख असावा असा अंदाज संशोधकांनी मांडलेला आहे. याचे वैशिष्ट्य म्हणजे यावर गायवासरू आणि गधेगाळ ही दोन चिन्हे आहेत. वास्तविक पाहता एकाच शिलालेखावर ही दोन्हीही चित्रे पहावयास मिळत नाही. परंतु हा शिलालेख त्यास अपवाद आहे. या शिलालेखावरील मजकूराचा अद्याप उलगडा झालेला नाही.

## (परिशिष्ट २) वीरगळ



चवणेश्वर येथील श्री चवणेश्वर


मंदिरातील वीरगळ



कोरेगाव येथील केदारेश्वर

मंदिरातील वीरगळ

## (परिशिष्ट ३) सत्यशोधक समाज घटना व इतर बाबी.



भारतीय सत्यशोधक समाज

घटना


महात्मा ज्योतिबा फुले.

प्रकाशकः—श्री. के. व्ही. विचारे.
महाध्यक्ष

[ किंमत २ आणे ]

३६५ डिलाईल रोड,
मुंबई नं. ११

सत्यशोधक समाजाची घटना, मुखपत्र



# सत्यशोधक विद्यार्थी संघ


लोकरंजनांतून लोकशिक्षणाचे आकर्षक
कार्यक्रम

- चित्तवेधक नाटिका
- स्फूर्तिदायक पोवाडे
- बोधप्रद लोकगीतें
- सांस्कृतिक जलसा
- नकला
- विचारप्रवर्तक व्याख्यानें
- संतांचा बहुमोल संदेश देणारे कीर्तन
आणि
- कसरतपटूंचे प्रेक्षणीय प्रयोग

लिहा अगर भेटा—

सेक्रेटरी—स. वि. संघ,
३६५ डिलाईल रोड, मुंबई नं. ११

सत्यशोधक विद्यार्थी संघ, कार्यक्रमपत्रिका



# जाहीर खबर.

'सत्य शोधक विद्यार्थी संघाचे आजीव सेवक यांचे खास मदतीकरता'
'लोकरंजनातून लोक शिक्षणाचा अभिनव उपक्रम'
'आमचे कला पथक' मुंबई यांचा

## शाहिरी जलसा.

(१) [illegible] शाहीर हुंदरे (२) लोक शाहीर फरांदे (३) शाहीर चौगुले (४) शाहीर पोतदार (५) शेतकरी शाहीर घाटगे आणि (६) बाल शाहीर [illegible] यांचा सुस्वर कीर्तन, [illegible] कार्यक्रम ऐकण्याची संधी [illegible] मुले, मुली, [illegible] ऐकण्यास योग्य.


[illegible]

'[illegible] करणे फक्त आपणालाच शक्य आहे!!'
'[illegible] करूनच सामुदायिक जीवन सुखी करता येईल!!'

### कार्यक्रम.

| | गांव (स्थळ) | तारीख | वार | वेळ |
|---|---|---|---|---|
| (१) | [illegible] | ७।५।५१ | सोमवार | सकाळी ८ पासून [illegible] |
| (२) | रेठरे बु. (नवीचे) | ९।५।५१ | बुधवार | रात्रो ८ पासून |
| (३) | [illegible] | ११।५।५१ | शुक्रवार | " " |
| (४) | इस्लामपूर | १३।५।५१ | रविवार | " " |
| (५) | [illegible] | १५।५।५१ | मंगळवार | " " |
| (६) | [illegible] | १७।५।५१ | गुरुवार | " " |
| (७) | [illegible] | १९।५।५१ | शनिवार | " " |
| (८) | [illegible] | २१।५।५१ | सोमवार | " " |

जाहीर खबर (जाहिरात)



॥ शुभ लग्न ॥

– वर –
चि. बाबाराव
(बी. ई. इंजिनीयर)
श्री दिगांबरराव देशमुख
सेवानिवृत्त रेंजर
फोरेस्ट ऑफीसर
रा. अंजनगांव
यांचे तृतिय चिरंजीव.)

– वधू –
चि.सौ.कां. अनिता
बी.एससी., एम.ए.
श्री. दशरथराव वरदे
सिनीयर इंजिनीयर
रा. मुंबई
यांची जेष्ठ कन्या)

शुभ लग्न तारीख – ता. १८–२–८२ रोज गुरुवार सकाळचे १०–३० वाजता.
लग्न स्थळ – नोंदनी विवाह कचेरी, जबलपूर.

दैवी योगाने व मुला-मुलीचे प्राल्धाने हे शुभ कार्य जूळून आले आहे.

आपला कृपाभिलाषी
दिगांबरराव देशमुख

विशेष टीप :–

–: विनंती: –

★ अनाठाई पैसे खर्च करुन – प्रवासाचा दगदगा सहन करुन – दररोजचे कामे धंदे सोडून – लग्नास येऊ नये.

★ सद्भावना ठेऊन सोबतचे कार्डावर घरुनच पोष्टाने वधु-वर यांना आपला शुभाशिर्वाद पाठवावा.

卐 तसेच त्याच कार्डावर आपला अभिप्राय पण पाठविण्याची कृपा करावी.

आपला नम्र
दिगांबरराव देशमुख


–: नोंदणी विवाहाचे खास ठळक वैशिष्टें :–

▪ वधु पक्षाकडून वर पक्षाला मुळीच हुंडा नको ▪ वाजंत्री नको ▪ मंडप नको ▪ अहेर नको ▪ देणगी नको ▪ प्रेझेंन्ट या सप्रेम भेट नको ▪ घोडा गाडी नको डेकोरेशन नको ▪ लाऊडस्पीकर नको ▪ भपकेपणा डामडौलपणा नको ▪ सोने चांदीचा लोभ नको ▪ माहागी कपड्याचा मोह नको ▪ जेवनावळ नको ▪ आचारी नको ▪ पाहुण्यांची वर्दळ नको ▪ धावपळ नको ▪ चिंता व डोके दु:खी नको ▪ कर्जबाजारी होणे नको ▪ लग्नास समाज बांधव नातलग परीवार, ईतर मित्र मंडळी ह्या सर्वांचा प्रवासाचा दगदगा व त्यांचे पैशाची बचत ▪ दोन्ही पक्षाची कमित कमी ५०० च मंडळी धरली व प्रत्येकी १०० च रुपये खर्च धरला तर जवळ जवळ ५० हजाराची बचत ▪ वर पक्षाने वधुपक्षाची कदर बाळगुण वधु पक्षाची ३० ते ३५ हजाराची बचत करने ▪ अनाठाई व्यर्थ खर्चापासून वर-वधू दोही पक्षांचा बचाव होतो ▪ काळाची गरज लक्षात घेऊन माळी समाजाने अशा नोंदणी पद्धतीनेच लग्नास प्राधान्य द्यावे आणि तसा प्रघात पाडावा ▪ ह्या लग्नात नोंदणी विवाहमुळे एकुण जवळ जवळ एक लाखाची बचत झाली ▪ नोंदणी विवाह केला असला तरी, जर ईच्छा असल्यास बिना खर्ची घरगुती धार्मीक पुजापाती करण्यास असे काही बंधन नाहीत ▪ वधु पक्षाची हीच सुवर्ण संधी म्हणजे बिनाखर्ची गुणीने लग्न होणे.

दिगांबरराव देशमुख


सत्यशोधक समाजाची लग्नपत्रिका

(परिशिष्ट ४)



'कारे'असे उल्लेख वरील इनामपत्रात आहे. त्यावरून कोरेगाव हे नाव पडले.

## (परिशिष्ट ५)


Schedule A

Minute Book of the General Meeting of the Rahimatpur Municipality held on 19

| Subject of Resolution | Proposition and Amendment: Names of Proposer & Seconder | Proposition and Amendment: Wording | Votes given: For | Votes given: Against | Final Resolution: Serial No. & Date | Final Resolution: Substance | Nos. & dates of other resolutions on the same subject: Last Previous | Nos. & dates of other resolutions on the same subject: Next Subsequent | Brief Note of action taken with dates | Remar[ks] |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |

ब्रिटीश सरकारविरोधी रहिमतपूर नगरपरिषदेचा ऐतिहासिक ठराव दि. २५.१०.१९३९

## (परिशिष्ट ६)

नंबर RLF/Gen-3
सातारा: १७-६-६४

विषय:- ध्वजदिन फंडातून आर्थिक मदत-

खाली नमूद केलेल्या दहा व्यक्तिंना कळविण्यांत येते की- तुमचे नांवापुढे दर्शविल्याप्रमाणे आपणास ध्वजदिन फंडातून आर्थिक मदत मंजूर झाली आहे. सदरची रक्कम आपणास मनिऑर्डरनें पाठविण्यांत येईल.

(१) श्रीमती. शेवंताबाई बापू सकट, मु॥ पो. वेळे, ता. वाई रु. २५/—
(२) श्री. कृष्णा नारायण जाधव, ५६ मंगळवार पेठ, सातारा रु. ५०/—
(३) श्री. सुर्यकांत विठ्ठल नाईक, ८३ सदर-बाजार, सातारा. रु. ५०/—
(४) श्री. कृष्णा तात्याबा लेंभे, मु॥ पो. पिंपोडे बु॥, ता. कोरेगांव रु. ७५/—
(५) श्री. केरू बापू लावंघरे, मु॥ पो. अंबवडे बु॥, ता. सातारा रु. ५०/—
(६) श्री. दौलत कृष्णा यादव, रा. शिवडवाडी, चोरेगांव, ता. कराड, रु. २५/—
~~(७) श्री. [illegible]~~
(८) श्री. बापू पांडु सुतार, मु॥ पो. एकंबे, ता. कोरेगांव, रु. २५/—
(९) श्री. सिताराम संतू कवर, रा. केरळ, पो. ता. पाटण. रु. २५/—
(१०) श्री. रामा गोविंदा इंगळे, मु. पो. जळगांव, जि. बुलढाणा. रु. २०/—

इत्यादी —

तसेच खाली नमूद केलेल्या पांच व्यक्तिंना कळविण्यास दिलगिरी वाटते की- आपणास ध्वजदिन फंडातून वरिष्ठ ऑफिसकडून कांहीही रक्कम मंजूर झालेली नाही. कळावे.

(१) श्री. दशरथ येशवंत पवार, कामाठीपुरा, सातारा.
(२) श्री. शांताराम बाबूराव जांभास्कर, १७५ या. दो. गोपाळ पेठ, सातारा.
(३) कुमारी-निरा महादेव भोसले, २९१ गुरुवार पेठ, सातारा.
(४) श्री. सदाशिव सिताराम जाधव, ६६६ मोती चौक, वाई.
(५) श्री. दत्ताजीराव वाघमोर, १२५ व्यंकटपुरा, सातारा.

(सही)

कलेक्टर व अध्यक्ष
जिल्हा सोल्जर्स बोर्ड, सातारा, करिता.


SBP/-


**स्वातंत्र्य सेनानीस ध्वज फंडातून मिळालेली आर्थिक मदतीचे**
**१७ जून, १९६४ रोजीचे कलेक्टरचे पत्र**


(परिशिष्ट ७) सन १९५४ साली भारताला पहिले आशियायी रौप्यपदक मिळवून देणारे मल्ल कै. बी. जी. काशीद व त्यांना मिळालेले पुरस्कार आणि प्रमाणपत्र.















महाराष्ट्राचा नकाशा (संदर्भ डॉ. दास्ताने संतोष, महाराष्ट्र २०१२) ऑक्टोबर, २००९




सातारा जिल्हयाचा नकाशा (संदर्भ – सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९)




कोरेगाव तालुक्याचा नकाशा (संदर्भ – सेन्सस ऑफ इंडिया १९९१, सिरीज १४, महाराष्ट्र, पार्ट २, १, प्रायमरी सेन्सस अब्स्ट्रॅक्ट, जनरल पॉप्युलेशन)



कोरेगाव तालुक्यातील साप येथील कदमांचा वाडा



कोरेगाव तालुक्यातील कण्हेरखेड येथील महादजी शिंदे यांचा वाडा





किल्ले कल्याणगड

किल्ले वंदनगड





किल्ले चंदनगड

कल्याणगडावरील बुरूज






**श्री क्षेत्र जरंडेश्वर येथील मारूती मंदिर**



**किन्हई येथील यमाईदेवीचे मंदिर**



**किन्हई येथील आशिया खंडातील सर्वात मोठी दीपमाळ**




**चिमणगाव येथील श्री काळेश्वर मंदिर**



**चिमणगाव येथील श्री काळेश्वर मंदिराच्या सभामंडपातील कोरीव खांब**



कल्याणगड येथील गुहेत नव्याने प्रतिष्ठापना केलेली दत्त मूर्ती



श्री क्षेत्र चवणेश्वर येथील प्राचीन मंदिराचे केलेले नुतनीकरण



श्री क्षेत्र चवणेश्वर मंदिरासमोरील नंदी व दीपमाळ



बनवडी येथील बगाड उत्सव



पालखी सोहळा



नागपंचमी निमित्त नागदेवतेचे पूजन करताना महिला



बेंदूर सण साजरा करताना ग्रामस्थ



गणेश उत्सवातील गणेशाची भव्य मिरवणूक



नवरात्रप्रसंगी गरबा करणारे युवक–युवती